म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. 3979

# मराठी चरित्र मूलतत्त्वे व समीक्षा

डॉ. ग. का. रायते

REFBK-0025069

संदर्भ निबंध
वाङ्मय समीक्षा
३९७९
२५.८.९९
३९१५/८६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३९७९
ता. म. २५.८.९९
निबंध ३९१५/८६
शाखा

# मराठी चरित्र मूलतत्त्वे व समीक्षा

डॉ. म. का. रावते

वेष्टन सौ. **विद्या चव्हाण.**

---

**मराठी चरित्र : मूलतत्त्वे व समीक्षा.**

---

मुद्रक :

श्री. **यशवंत गोविंद म्हात्रे.**
नरेश मुद्रणालय, चेंढरे,
ता. अलिबाग–रायगड.

सर्वाधिकार :

सौ. **सरोज रावते.**

प्रकाशक :

सौ. **सरोज रावते.**
समर्थ प्रकाशन,
६४ पी, परळ व्हिलेज,
मुंबई ४०० ०१२.

REFBK-0025069

ज्यांनी आयुष्यभर माझ्यासाठी खस्ता खाल्ल्या त्या आईवडिलांना अत्यादरपूर्वक–

# अनुक्रमणिका


१. चरित्राचे उद्दिष्ट ५

२. चरित्रातले सत्य ३४

३. चरित्र आणि इतिहास ७८

४. चरित्र : कला की कारागिरी ? ११२

५. चरित्राचा विषय १५३

६. चरित्राची साधने १७७

७. प्रयोग आणि प्रवाह २१९

विभाग दुसरा

८. आंग्ल कालातील मराठी चरित्रे २६३



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ........
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# निवेदन

डॉ. ग्रामोपाध्ये यांनी ‘ गुरुचरित्र ’ हा अभ्यासासाठी विषय सुचविला. गुरुचरित्राचा अभ्यास करण्यापूर्वी चरित्राची मूलतत्त्वे समजावून घ्यावीत म्हणून या विषयाकडे वळलो आणि त्यात इतके विलक्षण झपाटलेपण अनुभवले की गुरुचरित्र बाजूलाच राहिले आणि प्रस्तुत विषय मनाशी निश्चित झाला. त्याचवेळी एक गोष्ट लक्षात आली की, चरित्र विषयक मूलभूत प्रश्नांची चर्चा मराठीत फार अल्प झाली. प्रस्तावनादाखल व परिक्षणाच्या निमित्ताने झालेले लेखन उणे करून तात्त्विक चर्चा करणारे उल्लेखण्याजोगे लेखन म्हणजे प्रा. अ. म. जोशी (चरित्र आणि आत्मचरित्र: तंत्र आणि विकास) व प्रा. वा. ल. कुलकर्णी यांची दोन पुस्तके (आत्मचरित्र : चित्र की चरित्र) व (आत्मचरित्र : काही विचार) एवढेच होय. त्यामुळे चरित्रलेखनाशी निगडित अशा मूलभूत प्रश्नांचा विविध दृष्टिकोनातून विस्ताराने विचार करणे आवश्यक वाटले.

प्रस्तुत ग्रंथात मुल्यविषयक चर्चा प्रामुख्याने अभिप्रेत असल्यामुळे उत्तर भागात परामर्श घेतलेल्या आंग्ल कालातील मराठी चरित्रांच्या संख्येवर अपरिहार्यपणे मर्यादा पडली आहे. या भागात केवळ आंग्ल कालातील चरित्रांचा उपयोग केला आहे. तथापि पूर्व भागात मूल्यविषयक चर्चा करताना उदाहरणे देण्याकरिता गं. दे. खानोलकरांचे ‘ माधव ज्यूलियन’, लक्ष्मीबाई पटवर्धन यांचे ‘ माझा नंदादीप ’ आणि इंदिरा भागवतांनी लिहिलेले ‘ या सदाशिव ’ या आंग्ल कालाच्या बाहेरच्या तीन चरित्रांचा उपयोग केला आहे.

श्री. विठ्ठल गणेश जोशी यांची प्रेरणा व आशीर्वाद यामुळेच मी हे लेखन पूर्ण करू शकलो. गुरुवर्य– कै. प्रा. ल. ग. जोग यांचे बहुमोल मार्गदर्शन या लेखनात मला लाभले. उभयतांनी मला कायमचे उपकृत करून ठेवले आहे.

सौ. विद्या चव्हाण यांनी अल्पकाळात सुरेख वेष्टन करून दिले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

बराच काळ रेंगाळत पडलेले हे लेखन प्रसिद्धीच्या मार्गावर आणण्याचे श्रेय माझे मित्र नरेश मुद्रणालयाचे श्री. यशवंत गोविंद म्हात्रे यांच्याकडेच जाते. त्यांनी केलेला पाठपुरावा व चिकाटी याशिवाय हे काम पूर्ण झालेच नसते. दुर्दैवाने पुस्तकाचे मुद्रण चालू असतानाच दि. ९–६–८५ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूनंतर सौ. माधुरी मधुकर म्हात्रे यांनी त्यांच्या इतक्याच जिव्हाळ्याने मुद्रणाचे काम पूर्ण करून दिले. उभयतांचे आभार मानणे माझे कर्तव्यच आहे. माझे मित्र प्रा. आ. ना. पेडणेकर यांचेही बरेच सहाय्य झाले, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

लेखक मुंबईला व मुद्रण अलिबाग येथे. यामुळे अनेक मुद्रण दोष राहिले आहेत याची मला जाणीव आहे. पुन्हा एकदा सर्वांचे आभार मानून हे निवेदन संपवितो.

मुंबई, ३–१०–८५

**ग. का. रावते**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२७१
निबंध
२५८६६
३१/०६/८६
शाखा ... प्रत

# एक

# चरित्राचे उद्दिष्ट

'थोर महात्मे होऊनि गेले चरित्र त्यांचे पाहा जरा' असे लाँगफेलो या कवीने: म्हटले आहे. आज दृष्टिकोन काहीसा बदललेला दिसतो. सामान्यांचे चरित्रही पाहाण्याजोगे असते असे म्हटले जाते. तसे पाहिले तर यात विरोध नाही. कारण, ज्यांचे चरित्र पाहाण्याजोगे ठरते, ते एका अर्थाने थोर महात्मेच ठरत नाहीत का? चरित्र लिहिणारा लिहून जातो. चरित्रविषय पुष्कळदा त्याच्या पूर्वीच होऊन गेलेला असतो. असतो फक्त वाचक. आजचा, उद्याचा, अनंत भविष्य-काळचा. ह्यामुळेच 'चरित्र' हा लेखकांचा, चिकित्सकांचा विषय बनला.

चरित्रात खऱ्या व्यक्तीची जीवनगाथा असते, तर कादंबरीत कल्पनेच्या पातळीवरच जीवनगाथा असते. असे असूनही कादंबरीच्या ललितसाहित्यांतर्गततेची शंका उपस्थित होत नाही, चरित्राविषयी होते. असे का व्हावे? चरित्र या वाङ्मय-प्रकाराची चर्चा करताना, ते अनेक वैचारिक अंगांना स्पर्शून जात असल्याने, विविधत्व लाभते. चरित्र व इतिहास, चरित्र व कादंबरी, चरित्र आणि चरित्रपर कादंबरी अशा अनेक अंगांची चर्चा ओघाओघाने येतेच, एवढेच नव्हे तर चरित्र-विषय व्यक्तीच्या मनाचे आकलन करून घेणे अपरिहार्य ठरते. मनोव्यापार समजायला मानसशास्त्राचे साह्य घ्यावे लागते. तसेच ती व्यक्ती ज्या काळाशी व समाजाशी एकरूप झालेली असते. त्यांच्याशी तिचे अतूट जडलेले नाते समाज-शास्त्राला आवाहन करू लागते. सारांशाने म्हणायचे तर 'चरित्रवाङ्मय' हे अनेक अंगांनी सुजाण वाचकाला आकर्षून घेते, घेत राहते.

अशा या साहित्य प्रकाराचे सामर्थ्य कशात आहे, त्याच्या रचनेची वैशिष्टये कोणती, त्याच्या निर्मितीमागच्या प्रेरणा काय असाव्यात याचा अभ्यास प्रस्तुत ग्रंथात करण्याचा यत्न करावयाचा आहे. तत्पूर्वी चरित्राच्या विविध व्याख्या तपासून पाहाणे आवश्यक आहे.

चरित्र हा शब्द १६८३ मध्ये जॉन ड्रायडेनकडून प्लूटार्कने लिहिलेल्या चरित्रांच्या भाषांतराला लिहिलेल्या प्रस्तावनेत प्रथम वापरला गेला. आणि 'The history of particular men 's lives' अशी चरित्र या शब्दाची व्याख्या त्याने दिली.' चरित्र' या संज्ञेत संस्कृतात जीवन, वर्तणूक, निरनिराळी कृत्ये इत्यादींचा समावेश होतो.कै. आपटयांच्या[१] नव्याने संपादित झालेल्या शब्दकोशात 'चरितम्' किंवा 'चरित्रम् याचे Life, biography, adventures, history असे अर्थ

दिले आहेत. त्याची ' उत्तरं रामचरितंतज्ञप्रणीतं प्रयुज्यते दशकुमारचरितम् ' ही उदाहरणे दिली आहेत. मोनियर वुइल्यम्सच्या[२] संस्कृत इंग्रजी शब्दकोशात चरित्र या शब्दाचे actings, behaving, behaviour, habit, practice, acts, adventures, deeds, exploits असे अर्थ दिले आहेत. वाचस्पत्य[३] कोशातही आचरण, स्वभाव, कृती या अर्थांचे शब्द दिले आहेत. उदाहरण म्हणून चरित या शब्दासाठी ' उत्तरं रामचरितं तत्प्रणीतं प्रयोक्ष्यते ' ही उत्तर रामचरितातील ओळ दिली असून चरित्र या शब्दासाठी परदेश प्रसूतानां सकाशादग्रजन्मनाम् । स्वं स्वं चरित्र शिक्षेरन् पृथिव्यां सर्व मानवाः, हे मनुवचन दिले आहे. य. रा. दाते[४] यांच्या मराठी शब्दकोशात चरित्र या शब्दाचे खालील अर्थ दिले आहेत.

(१) कृत्ये, क्रिया, आचरण, वर्तन,
' ये दशे चरित्र केलें नारायणें । तु. गा. ८५.
(२) अवस्था, स्थिती, प्रकार,
' जाणोनि चरित्र जवळीच होता । आली अनंता कृपा मग '
तु. गा. १०९.
(३) देवांचे, वीरांचे, पराक्रम, महत्कृत्ये, मर्दुमकीची कामे,
' स्त्रीचे चरित्र आणि पुरुषाचे भाग्य कोणास कळत नाही '.
(४) इतिहास, कथा, गोष्ट, प्रकार–
' ते गुणभेद चरित्र ऐसे झाले ' ज्ञा. १८–५२३.
(५) विशिष्ट व्यक्तीचा आयुष्यक्रम तो वर्णन करणारा ग्रंथ.

' मोलिअरच्या विश्वकोशामध्ये[५] Biography या शब्दाचा पुढील अर्थ दिला आहे. (Gr, Bios, Life, Ypaon, Writing) Literally ' Life writing ' or the history of an individual life,Cornhill मासिकात प्रसिद्ध झालेल्या ' Neo-Georgian Biography,' या लेखाच्या शिरोभागी इ. सी. बेन्टली (E. C. Bentley) यांच्या पुढील काव्यपंक्ती (पृ. १५५) दिल्या आहेत.

' The art of biography is different from geography, Geogrgphy is about maps, but biography is about chaps.'

चरित्र या शब्दाचा मूळ अर्थ आणि त्याच्या अर्थाच्या विविध छटा यांचा साकल्याने विचार केला म्हणजे चरित्राचा संबंध व्यक्तिजीवनाशी आहे ही गोष्ट स्पष्ट होते.

चरित्राचा वाङ्मयीन घाट लक्षात घेऊन चरित्राची व्याख्या वाल्डो डन (Waldo Dunn) यांनी केली आहे. ती अशी : '...the narrative from birth to death, of one man 's life in its outward manifestations and inward workings.'[६] चरित्राची लेखनपद्धती लक्षात घेऊन जे.सी. मेटकाफ

6– Dunn, ' English Biography ' P. XIV.

(J. C. Metcalf) यानी पुढील व्याख्या केली आहे. ‘ It is that type of writing which reveals, in narrative form, the outer and inner experiences of one personality through aonther.’[७] चरित्राची आधुनिकता विचारात घेणारी ऑझबर्ट बरडेट (Osbert Burdett) यांची व्याख्या पुढील प्रमाणे आहे ‘ It is the study and presentment of a human character, with its contradictions and its failures, with its inner conflict of aim and impulse and its outer struggle between circumstance and temperament.’ [८] कोलिअर विश्वकोशामध्ये समाविष्ट केलेली आणि चरित्राची तत्वे विशद करणारी एडमण्ड गॉस यांची व्याख्या ही अशी आहे. ‘ It is the faithful portrait of a soul in its adventures through life ’ [९] चरित्राचे वाङ्‌मयीन उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून केलेली पुढील व्याख्या (ऑक्सफर्ड) शब्दकोशात सापडते

‘ The history of the lives of individual men as a branch of literature.’[१०] हॅरल्ड निकलसन (Harold Nicolson) यांनी आपल्या ‘ The development of English Biography ’ या ग्रंथात अगदी प्रारंभीच वरील व्याख्या देऊन तीच स्वतःच्या शब्दात स्पष्ट केली आहे. ती अशी : ‘ Biography must be a truthful record of an individual and composed as a work of art.’[११] चेंबरच्या विश्वकोशात[१२] निकल्सनच्याच व्याख्येचा आशय आला आहे. ओनील (O ’Neill) यांनी अमेरिकन चरित्र वाङ्‌मयाच्या इतिहासामध्ये ‘ Biography is a narrative of a man ’s life from birth to death.’ [१३] अशी एक ढोबळ व्याख्या दिली आहे व त्यात वर्णनालाच प्राधान्य दिले आहे. अशी त्यातली अपूर्णता दाखवून शेवटी त्यांनी स्वतःची म्हणून पुढील व्याख्या दिली आहे : ‘ It is the recreation of a man as he really was as he lived and moved and had his being ’ [१३] ओनील यांनी ऑक्सफर्डची व्याख्या सर्वांत चांगली म्हणून सांगितली आहे. पण चरित्र हा एक इतिहासाचा भाग मानला जातो, ही त्यांनी उणीव म्हणून सांगितली आहे. बहुतेक विद्वानांनी ऑक्सफर्डचीच व्याख्या गृहीत धरून या विषयाची चर्चा केली आहे. अलिकडेच प्रा. पॉल मरी केन्डल (Prof. Paul Murray Kendall) यांनी ‘ The Art of Biography ’ या ग्रंथात पुढील व्याख्या दिली आहे. ‘...the simulation, in words, of a man ’s life, from all that is known, about that man ’’[१४] चरित्राचे व्यक्तित्व दर्शनाचे उद्दिष्ट सूचित करणारी प्रा. सिडनी ली (Prof. Sidney Lee) यांनी पुढील व्याख्या केली आहे : ‘ Biography is the endeavour to transmit as enduringly as is possible distinctive personality and achievement ’.[१५]

---

7– Balch, ‘ Modern Short Biography.’ P. 12.

8– Tradition–Present day literature. P. 161. 11, (P. 8), 13 (P. 7).

संस्कृत पंडितांनी साहित्याचा विचार करताना इतिहास व चरित्रे यांचा सामान्यत: एकत्र विचार केला आहे. मात्र त्यांनी माणसाचा स्वभाव, कृत्ये, वर्तन इत्यादींनाही ' चरित्र ' मानले आहे.

// पाश्चात्य विद्वानांच्या वर उद्धृत केलेल्या व्याख्यांतून चरित्र वाङ्मयाची तीन प्रमुख वैशिष्टचे स्पष्ट होतात. ती अशी : १) चरित्र म्हणजे व्यक्तिजीवनाचा इतिहास किंवा वृत्तांत होय. २) चरित्र हा व्यक्तिदर्शनाचा प्रयत्न आहे. ३) चरित्र ही एक वाङ्मयीन कृती आहे. //

// चरित्राचा संबंध व्यक्तीच्या जीवनाशी, त्या जीवनातून आकार घेणाऱ्या व्यक्तिमत्त्वाशी आहे. व्यक्ती जीवन जगत असताना प्रकट होणाऱ्या राग, द्वेष, प्रेम-दंभ आदी मनोविकारांशी आहे मानवी जीवनातील या शाश्वत भागाच्या चित्रणा-मुळे चरित्राचे वाङ्मयीन रूप उजळून निघते. जीवन दर्शनामुळें चरित्राला वाङ्मयीन घाट येतो. चरित्र नायक व त्याची पत्नी यांच्या संबंधातून व्यक्त होणारे भावजीवन चरित्राला वर्ज्य नाही. भावजीवनाच्या आविष्कारामुळे चरित्राला कथेचे परिमाण लाभते. व्यक्तिजीवनातील संघर्षाच्या चित्रणामुळे चरित्र चित्तवेधक होते. साहजिकच व्यक्तीची महत्त्वाकांक्षा, यशापयश, सुखदुःख आणि भोवतालचा परिसर आदी गोष्टींतून घडत जाणारे व्यक्तिमत्त्व चित्रित करणे हे चरित्राचे वाङ्-मयीन उद्दिष्ट ठरते // चरित्र ही एक वाङ्मयीन कृती आहे. याबाबतीत आता मतभिन्नता असण्याचे कारणच उरलेले नाही. पण गंमत अशी आहे, की चरित्राची कल्पना अवाङ्मयीन उद्दिष्टानेच रुजली. निदान धर्मभावनेची प्रेरणा ओसरेपर्यंत व्यक्तिदर्शन हे चरित्राचे वाङ्मयीन उद्दिष्ट म्हणून मान्यता पावू शकले नाही.

चरित्र या शब्दाचा वापर आणि चरित्राचे लेखन या गोष्टी जरी अलिकड घडू लागल्या, तरी चरित्राची मूळ कल्पना जुनीच आहे. सनातन कालापासून ती चालत आली आहे. कित्येक शतकापूर्वी केव्हातरी सृष्टीच्या व्यवहारातील आपल्या जीविताची नश्वरता माणसाला अतिशय उत्कटतेने जाणवली आणि त्याचवेळी आपल्याला प्रिय असलेल्या आदर्श वाटलेल्या व्यक्ती किंवा विभूतींची स्मृती शक्य तितकी टिकविण्याचा प्रयत्न त्याने सुरू केला. या प्रयत्नात चरित्रवाङ्मयाचे बीज सापडते. ज्या दिवशी हे घडले त्याच दिवशी कालपशावर चरित्राची पहिली खूण उमटली. थोड्याफार फरकाने पण याच प्रेरणेने चरित्राची कल्पना निरनिराळ्या देशात उदय पावली. या प्रेरणेसंबंधाने वाल्डो एच्. डन लिहितात :

' एका जीवनाची स्मृती जागृत ठेवण्याची माणसाची जी अंगभूत ठाम इच्छा असते त्या इच्छेचे मुळातच चरित्र हे एक फळ होय. या विषयाच्या इतिहासात आपल्याला जितके मागे जाता येईल तितके मागे गेले म्हणजे, चरित्रलेखनाच्या मुळाशी स्मारक उभे करणे हाच एक हेतू दिसून येतो. कुणीतरी जगला आहे,

अंतर्यामीच्या शक्तीमुळे म्हणा अथवा त्याच्या महत्कृत्याच्या महानतेमुळे म्हणा, आपल्या मित्रांवर त्याने छाप पाडली आहे. त्याच्या देहाबरोबर त्याचे मन त्याची महत्कृत्ये नष्ट व्हावीत अशी त्यांची इच्छ नसल्यामुळे काहीतरी चिरंतन स्मारक उभे करण्याचा प्रयत्न त्यानी सुरू केला आहे, असेच दिसून येईल.'[१६] (पृ. १३) मृतात्म्यांच्या स्मरणासाठी दगड पुरून ठेवले, त्यांची थडगी झाली. हळूहळू त्यांच्यावर परिचयात्मक शिलालेख कोरले गेले. पुढे अक्षरओळख झाल्यावर संगमरवरी दगड किंवा पंचरशीधातूपेक्षा लिखित किंवा छापील शब्द फार काळपर्यंत टिकतो, हे लक्षात येताच शिल्पकाराचा लेखक झाला. माध्यम बदलले तरी तीच ती मूळ प्रेरणा फार काळपर्यंत कायम राहिली. ॲसिरिया आणि बाबिलोनियामध्ये मृतात्म्यांच्या स्मृती लिहून ठेवीत. त्यात त्यांच्या कृत्यांचा आढावा घेतलेला असे हा सर्व धार्मिक प्रकार म्हणून पाळला जात असे भक्तिभाव हा त्या युगाचाच धर्म होता. रोममधील लोक किंवा ग्रीक लोक मुळातच पूर्वजांविषयी आत्यंतिक भक्तिभाव बाळगणारे होते. त्यांच्याकडे स्मशानभूमीवरील भाषणे हा एक महत्त्वपूर्ण सोहळा साजरा केला जाई. मृताचे गुणगान व त्याच्या चरित्रातील प्रमुख प्रसंगाचे वर्णन करीत. त्याच्या प्रती घरात राखून ठेवलेल्या असत अशा तऱ्हेचे उपलब्ध असलेले लेखन म्हणजे झेनॉफॉनचे (Xenophon) ॲगेसिलाऊस (Agesilaus) आणि आयसॉक्रॅटीझ (Isocrates) चे इव्हॅगोरस (Evagoras) हे होय. अशाच प्रकारच्या कृतींतून चरित्र लेखन उत्क्रांन्त होत गेले. प्राचीन काळच्या शासनकर्त्यांच्या आणि नेत्यांच्या कथा गौरवपूर्वक गाणारी आख्याने, महाकाव्ये आणि गाथा यांच्याकडेही चरित्रलेखनाच्या प्रेरणेचे श्रेय जाते. जुन्या करारामधील इस्रायलचे राजे आणि ग्रीक, जर्मन व कोल्टिक नेत्यांविषयींची काव्ये (epic and saga) ही या प्रकारची होत. संतांची बोधवचने आणि त्यांची कृत्ये किंवा लीला यांचाही लिखित वृत्तांत धर्ममंदिरातून त्या त्या सांप्रदायिकांकडून– जपून ठेवला जात असे, शिष्यांना शिकविला जात असे.

कसेही करून चरित्रनायकाची स्मृती टिकवून धरणे एवढेच उद्दिष्ट चरित्रकारापुढे असले म्हणजे चरित्र नायकासंबंधी जे जे चांगले तेवढ्याचीच नोंद होते. ही नोंद करीत असताना एक स्तोत्र लिहून हातावेगळे करणे एवढेच धोरण स्वीकारलेले असते चरित्र नायकाचे सामान्यजनांहून वेगळेपण सिद्ध करणारी, त्याला संस्मरणीय ठरविणारी अद्वितीयताच तेवढी चित्रित करण्यात येते. व्यक्तीचे ओळखू न येण्याइतके अतिरंजित चित्र रेखाटण्यात येते. अमक एक तसे घडू नये असे लेखकाला वाटते म्हणून घटिते कातरली जातात. गुणांचे अतिरंजन व दोषांचा अपलाप करून देवासारखी निर्दोष व्यक्ती निर्माण केली जाते. अशा चरित्रात नायकाच्या अंतरंगापेक्षा बाह्य कृतींनाच महत्त्वाचे स्थान मिळते. वास्तविक बाह्य कृती हा

16– Dunn, Waldo. H. ' English Biography,' P. 13.

अंतरंगाचा आविष्कार असतो. पण चरित्रनायकाचे स्मारक उभे करण्याच्या योजनेमुळे गाळीव चित्रणाला प्राधान्य मिळते. नायकाच्या दैनंदिन जीवनातील ज्या लहान गोष्टीत व्यक्तिमत्त्वाचे मर्म आढळते, त्या बाद ठरतात आणि केवळ महान कृत्यातून हे स्मारक उभे करण्यात येते. याचा अपरिहार्य परिणाम असा होतो, की या चरित्रातून नायकाची एक माणूस म्हणून ओळख पटत नाही. चरित्र म्हणजे निव्वळ प्रशंसा आणि चरित्रकार हा एक भाट ठरतो. चरित्रकारांचा कल एकांगी चित्रणाकडे असल्यामुळे, 'वेडेवाकुडे गाईन' हेच धोरण पत्करले जाते. कलात्मक अभिव्यक्तीकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही, वा पुढे असलेल्या जीवन-कथेचे वाङ्मयीन मूल्य जाणले जात नाही. चरित्रात महत्त्व असते घटितांच्या गुंफणीतून उभ्या राहणाऱ्या गुणदोषमिश्र आणि म्हणूनच जिवंत व्यक्तिमत्त्वाला, याची जाणीव निदान एकोणिसाव्या शतकापर्यंत तरी फार थोड्या पाश्चात्य चरित्रकारांना होती आणि मराठी चरित्रकारांनाही ती जाणीव विसाव्या शतका पूर्वी फारशी होती असे दिसत नाही. स्मृती टिकविण्याच्या उद्दिष्टासंबधाने हॅरल्ड निकलसन यांचे पुढील प्रतिपादन ग्राह्य वाटते– 'शुद्ध चरित्राच्या दृष्टीने स्मरणाची उपजत प्रवृत्ती अनिष्ट ठरते, कारण त्यामुळे स्मरण करणाराला चरित्रनायकाचा कमकुवतपणा, त्याच्या जीवनातील अंधार टाळून केवळ त्याच्या सामर्थ्यावर, सद्गुणावर अवधान केंद्रित करण्याचा मोह होतो. स्मरणाचा हा मोह स्थानिक रोगासारखा, कधीकधी साथीच्या रोगासारखा असतो, त्याने अनेक शतकातून चरित्रे बिघडवली आहेत.'[१७]

चरित्राची धर्मसंस्थेने पकड घेतली आणि स्मृती टिकवून धरण्याच्या उद्दिष्टाला उद्बोधनाची जोड मिळाली. प्राचीनकाळी इंग्लंडमध्ये चरित्रावर प्रामुख्याने चर्चचे वर्चस्व होते. त्यावेळी चर्चमधून उपदेशपर प्रवचनांसाठी चरित्रांचा भरपूर उपयोग करून घेतला जाई. इतकेच काय पण तेथील शिष्यांना जुनी भाषा शिकविण्यासाठी 'प्रायमर' म्हणूनही चरित्र वापरले जाई. चर्च हेच एकमेव सांस्कृतिक केंद्र होते. धर्मोपदेशक हे संस्कृतीचे पुरस्कर्ते. तेव्हा त्यांनी चरित्रे लिहिताना नायकाची स्मृती कायम टिकविण्याच्या उद्दिष्टांबरोबरच उद्बोधनाचे उद्दिष्टही डोळ्यापुढे ठेवले. कित्येक शतकेपर्यंत या सांस्कृतिक केंद्रामधून विद्वान आणि राजकारणी पुरुष तयार होत असत. ॲडम नन (Adam nan) या आयरिश संताने व इतिहासकाराने 'The Life of Saint Columba' हे चरित्र लिहिल्यापासून तो थेट एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत नैतिकमूल्ये जोपासण्याकरिता चरित्राचे माध्यम राबविण्यात आले. थोरांच्या जीवनाचा आदर्श लोकांच्यापुढे ठेवल्याने उद्बोधन होते. थोरांच्या सद्गुणांचे लोकांना अनुकरण करता यावे किंवा त्यांचे दोष टाळता यावेत म्हणून चरित्राला वेठीस धरण्यात आले. ख्रिस्तीधर्माच्या

---

17– Nicolson, Harold. ' English Sense of Humour PP.148–149

उदयाबरोबर Hagiography हा एक जीवनवृत्तान्ताचा प्रकार अस्तित्वात आला, आणि विकास पावला. उद्बोधनाच्या हेतूने संतांची चरित्रे लिहिणे हे या प्रकाराचे मूळ उद्दिष्ट होते. अशा तऱ्हेच्या चरित्रांचा नवा करार हा एक नमुना होय. ख्रिस्तोत्तर दुसऱ्या शतकातील सेन्ट पॉलिकार्प (St. Polycarp) च्या जीवनवृत्तान्तापासून तो थेट सोळाव्या शतकातील सेन्ट इग्नेशस लॉइओल (St. Ignatius Loyola) आणि सेन्ट टेरिसा (St. Teresa) यांच्या जीवनवृत्तान्तातून असंख्य चरित्रे सर्व युरोपभर लिहिली गेली. मध्ययुगातील असंख्य संतांच्या चरित्रांचे व क्वचितच् ॲलफ्रीड (Alfred) आणि शार्लमेन (Charlemagne) यांसारखे लौकिक नायक असलेल्या चरित्रांचे उद्दिष्ट उद्बोधन हेच आहे. चरित्र विषयांच्याकडे विशिष्ट मतांचे. विचारांचे नमुने म्हणून पाहिले जात असे. चरित्रातून व्यक्तिविशेषांना स्थान न मिळता ज्या वर्गाचे, विचाराचे व्यक्तींनी प्रतिनिधित्व केले, त्या वर्गाच्या विचारांच्या वैशिष्ट्यांनाच तेवढे स्थान मिळत असे.

अमेरिकेतील या काळातील चरित्रवाङ्मयदेखील, प्रशंसेच्या हेतूने, ऐतिहासिक, धार्मिक किंवा नैतिक प्रेरणेने लिहिले गेले आहे. अमेरिकेत धर्मोपदेशकांची चरित्रवाङ्मयावरची पकड एकोणिसाव्या शतकापर्यंत कायम होती. अमेरिकेत एकोणिसाव्या शतकात एखादा प्रतिष्ठित नागरिक, वकील, न्यायाधीश, व्यापारी अथवा लेखक मरण पावला तर त्याने बहीण, भाऊ किंवा पत्नी यांच्याकडून अपेक्षा केली नसेल, तर धर्मोपदेशक चरित्र लिहिणारच असे गृहीत धरले जात असे.

संस्कृतमध्ये शंकर दिग्विजय, वल्लभचरित्र यासारखी काही चरित्रे आहेत. त्या त्या आचार्यांची धार्मिक व तात्त्विक मते स्पष्ट करणे हा त्या मागील हेतू आहे.

मराठीतील जुन्यात जुने महानुभावीयकालचे 'लीलाचरित्र' घ्या, किंवा पुढे महिपतीने लिहिलेली संत चरित्रे घ्या, त्यात पूर्वी होऊन गेलेल्या आदरणीय व्यक्तींचे गुणवर्णन करून त्यांची स्मृती कायम ठेवावी आणि शक्य असल्यास त्यांच्या चरित्रापासून पुढच्या पिढीने योग्य तो बोध घ्यावा असा हेतू स्पष्ट दिसतो.

लीलाचरित्राचा उपयोग पुढील लोकांना व्हावा अशी इच्छा म्हाइंभटानी व्यक्त केली आहे. डॉ. कोलते यांनी जो उतारा चरित्रात दिला आहे, तोच (इतिहास प्रकरण) अधिक विस्ताराने गोविंदप्रभु चरित्राच्या प्रस्तावनेतही दिला आहे. तो असा—

मग महीभटी भणितले : भटो तुम्हासी सर्वज्ञा करू :
मणौनि सर्वज्ञे निरोपिले ज्ञान : शास्त्र, आन सर्वज्ञे
जीया केलीया लीळा सांगितलीया तुम्हासि आठवताति :
तरि आतां श्रीचरण सन्निधानी आम्हासि आन पुढा
जो सर्वज्ञाचा मार्ग होईल त्यासि तव इतुके

शास्त्र न धरे : तरि सर्वज्ञाचीया लीळा तुम्ही
सांगा : आन लीहीन : भटी भणितीले : हो कां ?
लीहीले तरि मार्गासि उपयोग जाईल : सर्वज्ञाते
मार्गाची वृत्ति असे : का या : सर्वज्ञे भणितीले :
शास्त्र घेइजे : घोकीजे : मग काळे करूणी
उपयोगा जाये : मग महीभटी लेखन आरंभीलं. '[१८]

संत चरित्रकारांनी 'जाईल भवताप' हीच अपेक्षा आपल्या मनाशी बाळगलेली दिसते भक्तकथांच्या श्रवणाने विविधताप शांत होतात. विकल्प नाहीसे होऊन ज्ञानदृष्टी येते, भवसागर सहजपणे तरून जाता येतो व सर्वशक्तिमान परमेश्वर आपले कल्याण करतो अशी महिपतीची श्रद्धा आहे.

' कीं सुधारस लाधताचि हातीं । सकळ रोगव्याधि पळती दंड ।
तेवीं भक्तकथा जे ऐकती । त्यांसी भवदुःख चित्तीं बाधेना ।।
(श्री भक्तविजय– पृ. २७३, अ २२, ओ. ६)

महिपतीने चरित्राच्या द्वारा उपदेशही साधला आहे. तात्त्विक किंवा व्यावहारिक उपदेश करण्याची संधी तो सहसा दवडीत नाही. श्रोत्यांच्या मनावर उपदेशाचा ठसा उमटावा म्हणून बुद्धिपुरस्सर प्रयत्न करताना महिपती आढळतो. नमुना म्हणून भक्तविजय मधील काही उदाहरणे देता येतील.

| पृष्ठ | अध्याय | ओवी | |
|---|---|---|---|
| १६ | २ | ११८ ते १२० | जयदेवाने राजाला उपदेश केला, संतसेवा, ब्राह्मण भोजन, दान धर्म. |
| ३८, ३९ | ३ | १९९ ते २४३ | तुलसीदासाने ब्राह्मणांना नाममहिमा सांगितला आहे. |
| ९९९ | ५४ | ३१ ते ३३ | बोधलेबोवांनी कुणबिणीला केलेला उपदेश. |

भक्तांच्या विजयाच्या कथा मांडताना गौरव हा आलाच. अनेक व्यक्तींच्या बाह्य व अंतरंगाची चित्रणे करीत असताना श्रोत्यांच्या मनात त्यांच्याविषयी नितांत आदर उत्पन्न होईल अशा पद्धतीने या कथांची मांडणी महिपतीने केली आहे. उदा.–

'पाठीसी चालावया काय कारण । तेही तुम्हास सांगतो खूण ।
नामयाचे लागावया रजचरण । जगज्जीवन इच्छितसे ।'
(पृ. १६१, अ. १३, ओ. ७८)

आपल्याकडे काय किंवा पाश्चिमात्यांकडें काय ऐहिक जीवनाकडे पाठ फिरवून परमार्थाकडे डोळे लावून बसलेल्या शास्त्रीपंडितांना आणि धर्मोपदेश-

१८– श्री. गोविंदप्रभु चरित्र, सं. वि. भि. कोलते. पृ. २२.

कांना माणसाबद्दल आणि माणसाच्या जीवनाबद्दल आस्था आणि कुतूहल असे कधी वाटलेच नाही. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंतच्या इंग्रजी चरित्र वाङ्मयाकडे एक ओझरता दृष्टिक्षेप टाकला तरी चटकन् एक गोष्ट लक्षात येते ती अशी, की माणूस म्हणून माणसाकडे फारच थोडे लक्ष देण्यात आले. जे थोडेफार व्यक्ति-चित्रण आढळते, त्यातही बाह्य कृतींनाच प्राधान्य मिळाले आणि माणसाचे अंतरंग उपेक्षित राहिले. व्यक्तीपेक्षा धर्मसंस्थांना मोठेपण प्राप्त झाले. व्यक्तीची कृत्ये आणि धर्मसंस्था यांच्याबद्दल जितके लिहिले गेले, त्या मानाने माणसाबद्दल फारच थोडे लिहिले गेले. धर्मसंस्थांच्या फापटपसाऱ्यात माणसाचे व्यक्तिमत्त्व लोपून गेले. धर्मसंस्था आणि त्यांचे कार्य यांना इतके अवास्तव महत्त्व प्राप्त झाले, की माणूस हा केवळ साधनभूत ठरला आणि त्याच्या जीवनाची उपेक्षा झाली. पुरोहितांच्या आणि परमेश्वराच्या तेजाने दिपून गेलेल्या धर्माभिमान्यांच्या विशिष्ट वर्तुळात ही चरित्रे उदयाला आली आणि प्रतिष्ठा पावली.

स्मृती टिकवून धरण्याच्या उद्दिष्टाला जेव्हा उद्बोधनाची जोड मिळाली, तेव्हा गाळीव चित्रणाद्वारे काही एक नैतिक परिणाम साधण्याचा प्रयत्न झाला. हे लेखन प्रबळ अशा धर्मभावनेने झाले. त्यामुळे वाचकांच्या मनावर नैतिक मूल्ये ठसविण्याच्या हेतूने केवळ संतांचीच चरित्रे लिहिली गेली. चरित्रविषय व्यक्तीं-कडे विशिष्ट वर्गाचे प्रतिनिधी, विशिष्ट मतांचे, विचारांचे नमुने म्हणून पाहिले गेले. नित्शेने म्हटले आहे. ‘ The education of a people with a view to culture is essentially a matter of becoming used to good models.’[१९] साहजिकच चरित्रलेखन नैतिक अभिनिवेशाने दूषित झाले. नैतिक अभिनिवेशामुळे चरित्रनायक जसा होता तसा तो चित्रित न होता. चरित्रकाराला हवा तसा तो चित्रित झाला व्यक्तीकडे एक माणूस म्हणून पाहाण्याचा प्रयत्न असा झालाच नाही.उद्बोधनाच्या सिद्धीसाठी चरित्रविषयभूत जीवनकथा बेतून, आखून, कातरून वाचकांच्यापुढे सादर करण्याची प्रवृत्ती वाढली वाचकांच्या पुढे एक आदर्श ठेवताना सूर्यकिरण काचेच्या भिंगातून केंद्रित करावे तद्वत नायकाच्या सर्व कृती आणि गुण चरित्रातून एकवटले गेले. हेतू असा की त्यांचा वाचकांच्या मनावर ठसठशीत ठसा उमटावा. मात्र या चरित्रांतून नायकाचे कर्तृत्व आणि अंतरंग दोन्ही एकाच वेळी साकार होत नाहीत. मनावर उमटलेल्या ठशांतून जे संस्कार बाकी उरतात, ते केवळ चरित्रनायकाच्या कृतींचे आणि त्याच्या सद्गुणांचे. बेतलेल्या जीवनकथेतून चरित्रनायकाची माणूस म्हणून ओळख पटत नाही. व्यक्ति-चित्रण रेखीव व जिवंत वाटत नाही. तत्कालीन संतचरित्रांच्या संदर्भात प्रा. स्टॉफर (Prof. Stauffer) लिहितात : ‘ संताला व्यक्तिरूप दिले जात नाही. तो क्वचितच् प्राणधारी होतो. त्याचे जे पावित्र्य एकवटले जाते, त्यामुळे या जीवनचरित्रांना कौतुकास्पद एकात्मता लाभते, परंतु त्यामुळे स्वभावदर्शन अशक्य होते.’[२०]

19– Brooks. V. W. ‘ Sketches in Criticism.’ P. 105.
20– Pinto. V. D. Biography in 17th Century P.17.

चरित्रकार वर नमूद केलेल्या पारंपारिक उद्दिष्टांच्या आहारी गेल्यामुळे चरित्रवाङ्मयाची कोंडी झाली. उद्दिष्टानुरूप नायक घडविताना रुळलेली चाकोरी कधी सुटली नाही. साहजिकच या चरित्रांना साचेबंद स्वरूप प्राप्त झाले. मराठी संत चरित्रकारांना चरित्रविषयभूत व्यक्तींकडे माणूस म्हणून पाहाण्याची दृष्टी लाभली नाही. संत म्हटला, की त्याच्या चरणी लागून चरित्र लिहायचे अशी प्रथाच पडून गेली. अमुक एक आदर्श लेखकु झाला, म्हणून 'गाऊ त्यांना आरती' हेच धोरण स्वीकारले गेले. संतांच्या चरित्रात बहुधा गुरूभक्तीचा एकांतिक भावच प्रामुख्याने आढळून येतो. भक्तिभावाबरोबरच संप्रदायनिष्ठा, चमत्कार या गोष्टी आल्या, तेव्हा चरित्राचा एक साचा तयार झाला. परंपरागत संतचरित्रात, '...चौकसपणापेक्षा भाविकपणानेच साधुसंतांची चरित्रे लिहावी, असा रोख नेहमीच लेखकांचा दिसतो. आपण ज्यांचे चरित्र गाणार तो अत्यंत थोर साधुपुरुष होता, किंबहुना परमेश्वराचा प्रत्यक्ष अवतार होता; अद्भुत गोष्टी तो सहज करी; हे मुख्यत्वे करून वाचकांच्या मनावर बिंबविणे हेच आपले मुख्य कार्य बहुतेक चरित्रकार समजतात...'[२१] संतचरित्रातील भक्तिभावात नास्तिकांचा निषेध हे प्रमुख उद्दिष्ट आहे. आजगावकर हे स्वतः भाविक असून त्यांनी, 'महाराष्ट्रातील जो बहुजनसमाज देवधर्म मानतो आणि साधुसंतांविषयी पूज्यबुद्धि बाळगतो, त्या समाजासाठी हे ग्रंथलेखन आहे, देवधर्म न मानणारा व साधुसंताची टवाळी करणारा जो नवीन कंपू दुर्दैवाने हल्ली महाराष्ट्रात निर्माण झाला आहे त्यांच्या-साठी हा ग्रंथ नाही.'[२२] असे 'संतश्रेष्ठ तुकाराम' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत स्पष्ट म्हटले आहे. एकांतिक भक्तिभाव, गौरवाचे प्रस्थ, नास्तिकांचा निषेध आणि थोर व्यक्तींच्या जीवनातून काहीतरी तत्त्वोपदेश करण्याच्या हेतूनेच चरित्र लिहिण्याची बोधवादी दृष्टी, या चौकटीतून सुटलेले चरित्र विरळा. साहजिकच मराठी संत चरित्रांना एकसाची रूप लाभले. 'वरवी संत चरित्रं हो। पावन परम पवित्र हो'। असा हवाला देऊनच ही चरित्रे लिहिली गेली. या चरित्रकारांनी थोर महात्म्यांचे गौरवग्रंथ लिहिले, स्तोत्रे लिहिली, पण मनुष्याचे मनुष्यपण चित्रित करणारी चरित्रे ते लिहू शकले नाहीत.

आतापर्यंत स्मृती टिकवून धरणे, उद्बोधन या उद्दिष्टांचा विचार केला. अर्थप्राप्ती हेही चरित्रलेखनाचे उद्दिष्ट मानता येईल. संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासात राजानुग्रह व धनप्राप्ती यासाठीही काही चरित्रकार लेखनास प्रवृत्त झाल्याचे आढळते. या संबंधात प्रा. श्री. मा. वेर्णेकर लिहितात, 'धनं राज प्रसादते दंड' या न्यायाने राजानुग्रह संपादन करून तद्द्वारा धन व मान प्राप्त करण्याच्या इच्छेने प्रेरित झालेल्या कित्येक लेखकांनी राजपुरुषांची चरित्रे काव्यात्मक पद्धतीने गायिलेली आढळतात.'[२३] यासाठी त्यांनी रघुनाथ भू पालीयम्, शरभविलास काव्यम्, गायकवाड बन्धकाव्यम् या काव्यांची उदाहरणे दिली आहेत. प्रत्यक्ष

२१- भावे. 'महाराष्ट्र सारस्वत' १९२८ पृ. १८५. २२- जोशी. चरित्र आत्मचरित्र' पृ. १६४. २३- वेर्णेकर. आर्वाचीन संस्कृत इतिहास पृ. २१.

मम्मटानेही काव्याच्या प्रयोजनात अर्थ प्राप्तीचा समावेश केला आहेच. म्हणजे संस्कृत परंपरेला हा हेतू नवीन नाही. मराठीतही वैजनाथ शर्माने साहेबलोकांचा अनुग्रह संपादन करण्यासाठी चरित्र लेखन केल्याचे उदाहरण आढळते. मराठी चरित्रकारांनी अर्थप्राप्तीची अपेक्षा बाळगलीच नाही. असेही म्हणता येत नाही. साहित्यलेखनाच्या मुळाशी अर्थप्राप्तीची इच्छा ही बहुधा असतेच. चरित्रलेखनामुळे अर्थप्राप्ती होते, हे खरे असले तरी अर्थप्राप्ती हे काही चरित्राचे वाङ्मयीन उद्दिष्ट होऊ शकत नाही. चरित्राचे वाङ्मयीन उदिष्ट साध्य झाल्याचा तो परिणाम म्हणता येईल. केवळ अर्थप्राप्तीकरिता केलेल्या चरित्रलेखनाला गुणगौरव ग्रंथाची अवकळा येते. चरित्रकारावर कुणाचेही दडपण असता कामा नये. तो कुणाचाही मिंधा असता कामा नये. चरित्रलेखनासाठी तो पूर्णपणे स्वतंत्र असला पाहिजे. ' ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी,' हे धोरण अनुसरल्यावर चरित्रनायक जसा होता तसा तो चित्रित होत नाही अशा ग्रंथातून यथार्थ व्यक्तिदर्शनाचे वाङ्मयीन उद्दिष्ट असाध्य होते आपल्याला प्रामुख्याने विचार करावयाचा आहे तो वाङ्मयीन उद्दिष्टांचा, तेव्हा तूर्त एवढी नोंद पुरे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रवादाचा उदय झाला. तेव्हा मराठीत इतिहासापासून स्फूर्ती घेऊन ऐतिहासिक चरित्रे लिहिली गेली ही शाखा चांगलीच फोफावली. पारतंत्र्याच्या निराकरणाला पोषक होईल अशी देशाभिमानाची भावना प्रज्वलित करताना ऐतिहासिक चरित्रांचे महत्त्व जाणवले. दत्तो वामन पोतदार व डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे स्फूर्ती देणे हे चरित्राचे उद्दिष्ट मानतात.

चरित्रकार हा समाजाचा शिक्षक आहे. असे डॉ. सहस्रबुद्धे यांना वाटते, '...इतिहासाप्रमाणेच समाजाला ज्ञान देणे, राष्ट्रभक्तीची शिकवण देणे, स्फूर्ति देणे हेच चरित्र लेखनाचे अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे. हे आपणास सहज मान्य होईल. केवळ कलात्मक सौन्दर्यांचे, रचनेच्या सौन्दर्याचे दर्शन घडविणे हाच चरित्राचा हेतू असावा ही खरोखरच अगदी करंटी कल्पना आहे. स्फूर्ति देणे, ध्येयवाद शिकविणे, थोर आदर्श समाजापुढे उभे करणे हेच चरित्राचे खरे कार्य असले पाहिजे. श्रेष्ठ चरित्रकार हा समाजाचा शिक्षक आहे. त्याने त्याला पटलेला पक्ष घेऊन स्वतः काढलेले निष्कर्ष समाजाला शिकवावयाचे नाहीत तर कोणी शिकवायचे ?'[२४]

दत्तो वामन पोतदार चरित्रनायकाच्या जीवनातील प्रेरक शक्तीला प्राधान्य देतात.' थोर पुरुषांची चरित्रे ' ही राष्ट्राची बहुमोल संपत्ती आहे. त्या भांडवलाचे बळावर राष्ट्रे आपला भावी संसार चालविताना हिमतीने पुढे पाऊल टाकतात. तरुण मंडळीच्या बुद्धीस ही चरित्रे म्हणजे एक प्रकारचा खुराकच असतो. तो त्यास सतत पुरविणे अगत्याचे आहे. थोरांचे पावलावर पाऊल ठेवून त्यांचा मार्ग चोखा-

---

२४– सहस्रबुद्धे, पु. ग. ' संस्काराचे आपत्य,' हंस दिवाळी अंक. १९६१.

ळणे हे जसे पवित्र कर्तव्य आहे, त्याचप्रमाणे त्यांच्या मार्गांचा, हेतूंचा, ध्येयांचा उलगडा करून ती लोकांपुढे ठेवणे हीदेखील मोठी राष्ट्रसेवा आहे. कर्त्या पुरुषांची सांप्रदाय गंगा अखंड वाहती ठेवण्यास या चरित्रांचा मोठा उपयोग होत असतो.'[२५]

स्मृती कायम टिकविणे, स्फूर्ती देणे, उद्बोधन करणे, कुणाच्यातरी अनुग्रहाची अपेक्षा करणे किंवा अर्थप्राप्ती ही उद्दिष्टे चरित्राच्या वाङ्मयीन मर्यादेत सर्वस्वी बसत नाहीत. चरित्रनायकाच्या जीवनाची केवळ प्रदर्शनीय, उजळ बाजू तेवढीच चित्रित केल्याने उद्बोधनाचा अपेक्षित परिणाम कितपत साधला जाईल याबद्दल शंका आहे. काळा रंग डावलून उभ्या केलेल्या निर्जीव दगडी पुतळ्याचे अनुकरण ते कसे व्हावे ? चरित्रनायकावर असामान्यत्व, अलौकिकत्व लादण्याचा प्रयत्न अखेरीस निरर्थक ठरतो. कारण त्यामुळे चरित्रनायक मानवी वाटत नाही. अलौकिक जीवन अनुकरणापलिकडचे असते. एक माणूस म्हणून चित्रित झालेल्या व्यक्तीतले असामान्यत्व मनाला चटका लावून जाते. वानगीदाखल इंदिरा भागवतांचे ' या सदाशिव ' हे चरित्र घेऊ. या चरित्रात नायकाभोवती अलौकिकत्वाचे वलय उभे करण्याचा प्रयत्न झालेला नाही यादवराव भागवत हे एक फोटोग्राफर, फोटो स्टुडिओचे मालक. पुढे चित्रमंदिर उभारून सिनेमाच्या धंद्यातही त्यांनी प्रवेश केला. इंदिराबाईंनी त्यांचे व्यक्तिदर्शन घडविले आहे, ते एक माणूस म्हणूनच. धंद्यातल्या स्पर्धेमुळे लाखो रुपये खर्चून बांधलेले चित्रमंदिर डोळ्यासमोर अग्नये स्वाहा होत असताना त्यांनी दाखविलेली चित्ताची शांतता व मानसिक धैर्य असामान्यच म्हटले पाहिजे. एक माणूस म्हणून त्यांच्यातले वेगळेपण चरित्रकर्तीने अचूक पकडले आहे. त्यामुळे त्यांच्या चरित्रात साकार होणारे त्यांचे जिवंत व्यक्तिमत्व अंतःकरणाचा ठाव घेते. चरित्रातून वाचकांपुढे आदर्श ठेवण्यास प्रत्यवाय नसावा; पण तो खऱ्या खुऱ्या जीवनाचा आदर्श असावा; तरच वाचक अनुकरणास उद्युक्त होतात. माणसाने कसे वागावे हे शिकविणाऱ्या, मागणीप्रमाणे तयार केलेल्या नीतिकथांचा वाचकांच्यावर व्हावा तसा परिणाम होत नाही कारण, त्यांना कल्पिताचा आधार असतो. खऱ्याखुऱ्या, वास्तव जीवनाबद्दल वाचकांना आस्था आणि कुतूहल वाटते. अरबी भाषेतल्या सुरस कथांचा रस चाखल्यानंतरही हे जीवन कितपत सत्य आहे, असा प्रश्न उरतोच. चरित्रातले वास्तव जीवन अधिक परिणामकारक असते. आणि म्हणूनच चरित्रनायकाचे पाय भुईवर टेकलेले असावेत. सभोवताली पसरलेल्या ऐहिक जीवनातीलच तो एक आहे, याची वाचकांना खात्री पटावी. म्हणजे मग चरित्रनायक वाचकांचे लक्ष वेधून घेतो. काळ्या आणि पांढऱ्या दोन्ही रंगांनी रंगलेले त्याचे भलेबुरे जीवन वाचकांच्या मनाची पकड घेते गाळीव चित्रणामुळे चरित्रनायकाचे व्यक्तिदर्शन यथार्थपणे घडविता येत नाही, असेच प्रा. सिडनी ली

२५– साने गुरुजी, ' ना. गोखले चरित्र ' प्रस्तावना. आ. २ मार्च १९६६ पृ. ११–१२.

यांना वाटते : 'चरित्रकार हा निवेदक आहे, तो नीतिविवेचक नव्हे आणि मनाचा मोकळेपणा हे त्याच्या निवेदनाचे मीठ होय. माणसाला जे स्पष्टपणे अनुकूल असते त्याचा तो स्वीकार करतोच पण जे स्पष्टपणे प्रतिकूल असते त्याचाही तो तितकाच स्वीकार करतो. वगळणे अथवा पक्षपात करणे, दोषनिरसन करणे या गोष्टींना कलेच्या प्राथमिक गरजा भागविता येणार नाहीत.'[२६]

एखाद्या चित्रपटगृहात जसा ऑपरेटर असतो, तसा चरित्रकार आहे. जितक्या अलिप्तपणे ऑपरेटर पडद्यावरचे जीवन दाखवीत असतो, तितक्याच अलिप्तपणे, दुरून त्याने चरित्रनायकाचे जीवन चित्रित करावयाचे असते. चरित्रनायकाचे जीवन जसेच्या तसे चित्रित व्हावे, म्हणून वस्तुनिष्ठा आणि अलिप्तता हे अत्यंत आवश्यक गुण ठरतात. चरित्रकाराने व्यक्तिजीवनाचे चित्रण करावे, पण त्या जीवनावर काही लादू नये. थोर व्यक्तीचे जीवनदर्शन यथार्थपणे घडविले, तर चरित्रातून काहीएक जीवनविषयक तत्त्वज्ञान आपोआप सूचित होते. आणि म्हणूनच वृक्षाचा जीवनरस शोषून घेणाऱ्या व स्वतः पुष्ट होणाऱ्या बांडगुळाप्रमाणे ते तत्त्वज्ञान व्यक्तिजीवनावर लादले जाऊ नये. चरित्रकार हा शिक्षक नव्हे; तो न्यायाधीश नव्हे; आणि भाटही नव्हे. चरित्रनायकाचे जीवन जसेच्या तसे चित्रित व्हावे म्हणून लेखकाने चरित्रात डोकावता कामा नये. चरित्रकाराने नायकाच्या जीवनात ढवळाढवळ करू नये असेच वाल्डो एच्. डन सुचवितात : 'चरित्राकडे जोपर्यंत नीतिशास्त्रांकरिता माहिती पुरविण्याचे केवळ एक माध्यम या दृष्टीने पाहिले जाते, तोपर्यंत स्वत:च्या खऱ्याखुऱ्या कार्यापासून ते दूर राखले जाते. चरित्राला स्वतःलाच उभे राहण्याची किंवा पडण्याची मुभा दिली पाहिजे. चरित्राला निंदा किंवा स्तुतीच्या हेतूने सत्याला पीळ न देता मानवी अंतःकरणाचा इतिहास प्रामाणिकपणे कथन करू द्या; नैतिक उद्‌बोधन अथवा काही एक परिणाम साधण्याकरिता ओढाताण न करता आपल्यापुढे सत्य निवेदन ठेवू द्या; म्हणजे मग ते आपल्यावर समर्थरीत्या परिणाम साधण्यास अथवा आपल्याशी स्पष्टपणे संवाद करण्यास अपयशी ठरणार नाही.'[२७]

चरित्रातून एक संपन्न व्यक्तिमत्त्व यथार्थपणे साकार झाले म्हणजे तात्पर्य सापडते, स्फूर्ती मिळते, राजानुग्रह वा वाचकानुग्रहाची अपेक्षा करता येते, आपोआपच चरित्रनायकाची स्मृती कायम टिकून राहते. आणि अर्थ प्राप्तीही होते. पण हा यथार्थ व्यक्तिदर्शनाचे उद्दिष्ट साध्य झाल्याचा परिणाम म्हणता येईल. उपदेश करणे, स्मृती टिकवून धरणे, स्फूर्ती देणे ही काही चरित्राची उद्दिष्टे नव्हेत. एका महादेवाला नमस्कार केला, की सर्व देवांना तो पोहचतो. तशी यथार्थ व्यक्तिदर्शनात ही सारी उद्दिष्टे आपसुख सामावतात. चरित्रव्यक्ति जीवनातून मानवी जीवनाचा अर्थ शोधू पाहते. चरित्राचे हें फलित आहे. फलप्राप्ती व्हावी म्हणून चरित्र नाय-

26— Lee, S. 'Principles of Biography' P. 22.
27— Dunn, W. H. 'English Biography' P. 265.

काच्या कृति–उक्ती बरोबरच त्याच्या अंतरंगाचे दर्शन घडावे. चरित्रनायकाने काय केले, तो काय बोलला, या बरोबरच तो कसा होता, याची नोंद व्हावी. त्याचे यशापयश, त्याचे मनोविकार, त्याची सुखदुःखे, त्याचे भावविश्व प्रकट व्हावे. व्यक्तिजीवनाच्या झरोक्यातून विशाल मानवी जीवनाचा एखादा भव्य तुकडा दृष्टीस पडावा म्हणून चरित्र हा व्यक्तिजीवनाचा, व्यक्तिमत्त्वाचा आरसा ठरतो. त्यात व्यक्तीचे जीवन, तिचे व्यक्तिमत्त्व जसे होते तसे दिसावे. साहजिकच व्यक्तिमत्त्वाचे विकृत दर्शन घडविणारा आरसा टाकाऊ ठरतो. यथार्थ व्यक्तिदर्शनाच्या संदर्भात प्रा. सिडनी ली लिहितात. ' सद्गुण अथवा दुर्गुण यांच्या अवलोकनातून फुलून निघणारे नैतिक उद्बोधन हे चरित्राचे उद्दिष्ट नव्हे. व्यक्तिमत्त्वाचे सत्यनिष्ठ दशन घडविणे हेच चरित्राचे उद्दिष्ट होय,'[२८]

वाचकांची तरी चरित्राकडून यापेक्षा वेगळी अपेक्षा कुठे असते ? वाचक चरित्राकडे वळतात ते व्यक्तिजीवन जाणून घेण्याच्या जिज्ञासेने. व्यक्तिजीवनातून मानवी जीवनाचा उलगडा व्हावा; शक्य झाल्यास व्यक्तिजीवनाच्या प्रकाशात स्वतःचे जीवन उजळून घ्यावे अशीच सुप्त इच्छा त्यांनी मनाशी धरलेली असते. मानवी जीवनाचे कूट उलगडताना इतरांच्या जीवनापासून सर्वांचाच कमी अधिक प्रमाणात फायदा होतो. चरित्रापासून हा फायदा मिळावा म्हणून प्लूटार्कने चरित्रलेखन केले. इतरांच्या करिता त्याने चरित्र लेखनाला प्रारंभ केला परंतु त्या लेखनाशी तो जखडला गेला तो स्वतःकरिता. थोर लोकांचे सद्गुण त्याला एकप्रकारे आरशाप्रमाणे उपयोगी पडले आहेत, त्यात डोकावून त्याला स्वतःचे जीवन कसे नीटनेटके करावे, सजवावे, हे पाहता आले, अशी चरित्रलेखनाबाबतची आपली प्रतिक्रिया त्याने टिमोलिअनच्या (Timoleon) चरित्रात स्पष्ट केली आहे. गंमत अशी की, काही थोर पुरुष प्लूटार्कची चरित्रे मोठ्या आवडीने वाचत आले आहेत. कारण त्यांना त्या चरित्रात स्वतःचे मनोविकार, अपयश, संभाव्यशक्ती यांचे प्रतिबिंब सापडत असे. नेपोलिअनने जवळ जवळ वीस वर्षे प्लूटार्कची चरित्रे आपल्याजवळ बाळगली. लढाईच्या धुमश्चक्रीतही तो आपल्या तंबूत शांतपणे सिझरचे जीवन समजावून घेत असे. भर तारुण्यात महान कृत्य करण्यास व्यक्तिजीवनातून प्रेरणा मिळते आणि प्रौढावस्थेत व्यवहारी असा सल्ला मिळतो. चरित्रवाङ्मयाच्या लोकप्रियतेचे मर्म उकलून दाखविताना इ. एच्. ओनील लिहितात : ' शतकापूर्वीच्या माणसापेक्षा आधुनिक माणूस स्वतःबद्दल अधिक जागृत आहे. थोरांच्या जीवनात तो स्वतःची प्रतिबिंबे शोधण्याचा प्रयत्न करतो आणि ते जसे वागले तसे वागण्याचा यत्न करतो. पुष्कळ स्त्रीपुरुष चरित्र वाचतात त्याचे हेच कारण होय.'[२९] साहजिकच जे जीवन वाचकांना जाणून घ्यावयाचें असते ते कल्पित नसावे; मुद्दाम घडविलेले नसावे; ते जसे घडले तसेच ते असावे; अशीच त्यांची इच्छा असते. चरित्रनायकाच्या सत्य

28– Lee, ' Principles of Biography ' PP. 25–26.

29– O' Neill, History–American Biography 178.

जीवनाबद्दलची वाचकांची आस्था लक्षात घेता यथार्थ व्यक्तिदर्शन, जीवनदर्शन हेच चरित्राचे वाङ्मयीन उद्दिष्ट ठरते.

व्यक्ती चरित्राच्या केंद्रस्थानी धरून, एक माणूस म्हणून तिच्याकडे पाहाण्याचा प्रयत्न, तिचें स्वभावदर्शन घडविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू झाला तो एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात. उद्बोधनात गुरफटलेला चरित्राचा पाय मोकळा व्हायला कित्येक वर्षे लागली. तोपर्यंत जुन्याची चाकोरी सुटली नाही. नव्याची वाट मोकळी झाली नाही. तसे पाहिले तर बायबलच्या दोन्ही करारांत 'रूथचे पुस्तक' आणि 'लूककृत शुभवर्तमान' ही आधुनिक चरित्रांशी तुलना करता येईल इतक्या तोलामोलाची चरित्रे आढळतात. पण चरित्राला व्यक्तिअभिमुख करण्याचे काम प्लूटार्कशिवाय आणखी कोणी करू शकला नाही. प्लूटार्कने चरित्रलेखनातील कूट प्रश्न तर समजावून घेतलेच, पण ते सोडवलेही. क्षुल्लक कृतीकडे दुर्लक्ष करण्याऐवजी क्षुल्लक कृतींतूनच व्यक्तिविशेष वेचण्याचा, त्या कृतींमागल्या प्रेरणांचा वेध घेण्याचा आणि त्यातून प्रकट होणारे व्यक्तिमत्व टिपण्याचा प्रयत्न त्याने केला. प्लूटार्कचे महत्त्व हे की, त्याने चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्वाची नाडी हाती घेण्याचा; चरित्रनायकाच्या अंतःकरणाची कवाडं सताड उघडी करून आत डोकावून पाहण्याचा; मानवी मनाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला. वस्तुतः प्लूटार्कने चरित्रे लिहायला हाती घेतली ती उद्बोधनाच्या हेतूनेच. पण चरित्रनायकांच्या स्वभावाची उकल करताना, त्यांच्या मानसिक वैभवाने तो इतका दिपून गेला, की लिहिता लिहिता कळत न कळत उद्बोधनाचे उद्दिष्ट मागे पडले आणि व्यक्तिदर्शनाचे उद्दिष्ट तो साध्य करून बसला.

प्लूटार्कनंतर काही शतकांनी डॉ. जॉनसनला चरित्रनायकाच्या घरगुती जीवनाच्या चित्रणाची आवश्यकता पटली. डॉ. जॉनसनचे चरित्रवाङ्मयाविषयीचे विवेचन आणि प्रत्यक्ष लेखन यामुळे इंग्रजी चरित्रवाङ्मयाला एक विशिष्ट वळण लागले. त्याला जणू पुढे येणाऱ्या स्ट्रॅची युगाचा साक्षात्कार घडला होता. त्याने लिहिलेल्या कवी चरित्रात स्ट्रॅची युगाची चाहूल लागते. चरित्र ही एक वाङ्मयीन कृती आहे आणि चरित्रातून नायकाचे स्वभावदर्शन झाले पाहिजे, हा विचार डॉ. जॉनसनने ठामपणे मांडला. प्लूटार्कच्या चरित्रातून जसे नायकाच्या खाजगी जीवनाचे चित्रण झाले आहे, तसेच ते चरित्रातून व्हावे, हा विचार त्याने पुढील शब्दात मांडला आहे : 'क्षुद्र मोठेपणाला वाव देणारी विशेषकृत्ये आणि घटनांकडे वारंवार थोडे दुर्लक्ष करणे; घरगुती पडदपोशीतील जीवनात विचारांना घेऊन जाणे; जिथे माणसे सद्गुण-विवेकाने एकमेकांवर ताण करतात, जिथे बाह्य आनुषंगिक गौण गोष्टी दूर केल्या जातात, अशा दैनंदिन जीवनातील सूक्ष्म तपशील व्यक्त करणे हे चरित्रकाराचे काम आहे.'[३०] डॉ. जॉनसनच्या दृष्टीने चरित्रातले जीवनदर्शन लक्षणीय ठरते.

30– Clifford, 'Biography as an Art,' P. 42.

प्लूटार्कचेच सूत्र हाती घेऊन एकोणिसाव्या शतकात फ्रेंच चरित्रकार सेंट ब्यूव्ह (Sainte-Beuve) याने चरित्रनायकाच्या जीवनातील क्षुल्लक गोष्टींची दखल का घ्यावयाची याची पुढील कारणे दिली आहेत. तो म्हणतो, ' चरित्रनायकाच्या जीवनातील क्षुल्लक गोष्टींची दखल घ्यायची ती इतरांप्रमाणेच ज्या दैनंदिन सवयींवर थोरपुरुष अवलंबून असतात. त्या सवयींशी या धरेशी, ऐहिक जीवनाशी सर्वांगाने त्याला जखडून टाकण्यासाठी त्याच्या स्वतःच्या घरात, त्याच्या खाजगी जीवनातही त्याचा मागोवा घेण्यासाठी, तो जसा जगला असता, चालला, बोलला असता तसा त्याला जगायला लावण्यासाठी, चालता बोलता करण्यासाठी, त्याचा पूर्ण ताबा घेऊन विविध अंगाने त्याचे शक्य तितके अंतरभेदी दर्शन घडविण्यासाठी.'[३१]

क्षुल्लक अशा तपशीलातून व्यक्तीविशेषांचा मागोवा घेऊन त्यांचे चित्रण करण्याची एक नवी लकब प्लूटार्कने चरित्रवाङ्मयात आणली. मोठ्या कार्यात जे व्यक्तिमत्वाचे मर्म आढळत नाही, ते अगदी लहान गोष्टीतच नेमके सापडते, हे तत्व आता स्ट्रॅची, ब्रॅडफोर्ड, आंद्रे मोर्वा, निकलसन इत्यादी सर्वच चरित्रकारांना मान्य झाले आहे. आधुनिक चरित्रकारांपैकी एमिल लुडवीगने आपली मान्यता पुढील शब्दात दिली आहे. तो म्हणतो : ' अत्यंत क्षुल्लक सवय केव्हाही फार मोठ्या व्यक्तिविशेषाच्या स्पष्टीकरणाची सूचना देईल '.[३२]

प्लूटार्कने नव्याची दिशा दाखवून दिली. पण नवे रुजायला त्यावर फुलोरा यायला फार काळ लोटला. नवे रुजत असताना परिस्थितीचे खतपाणी भरीस पडले. सोळाव्या शतकात तत्पूर्वीच लागलेला छपाईचा शोध, लॅटिन आणि ग्रीक कृतींच्या बद्दलची उत्सुकता, प्लूटार्क, टॅसिटस (Tacitus) व स्विटोनिअस (Suetonius) यांच्या कृतींचा अभ्यास आणि व्यक्ती मनातील मानवतेसंबंधीची आस्था यामुळे इंग्रजी वाङ्मयात चरित्रलेखनाला उत्तेजन मिळाले. वाङ्मयीन मूल्य असलेली काही चरित्रे लिहिली गेली.

सतराव्या शतकाच्या मध्यावर युरोपमधल्या लोकमतात जे परिवर्तन घडले, ते चरित्राच्या दृष्टीने फायद्याचे ठरले. या परिवर्तनामुळे जीवनाकडे पाहण्याची दृष्टीच बदलली. याचा पाश्चात्य चरित्र वाङ्मयावर व्यापक परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. पुढे येणाऱ्या शास्त्रीय युगाची ती नांदी होती. इंग्लंडमधल्या शास्त्रीय क्रांतीचा प्रवर्तक बेकन, त्याने निसर्ग, भौतिक विश्व हे परमेश्वराचे पुस्तक असून जितक्या कळकळीने लोकांनी धर्माचा अभ्यास केला तितक्याच तळमळीने लोकांनी निसर्गाचे पुस्तक वाचावे असे प्रतिपादन केले. सामान्य विगमनशील अनुमानाने सत्याचा वेध घेण्याची पद्धत आणि प्रयोग यांचे महत्त्व त्याने विशद केले. निसर्ग हा स्वयंप्रेरित नियमांनी नियंत्रित असा रंगहीन, निर्जीव आहे, ही

31– Balch, ' Modern Short Biographies ' P. 5.
32– Ibid, P. 5.

कल्पना बेकनला आणि त्याच्या अनुयायांना मान्य नव्हती. निसर्ग हा परमेश्वराकडून नियंत्रित आणि म्हणूनच शास्त्रीय जिज्ञासेबरोबरच धार्मिक दरारा आणि पूज्य-बुद्धीने अभ्यासिता येण्यासारखा आहे, ही त्याची भूमिका होती.

बेकनने लोकांची अंतर्मुख दृष्टी निसर्गाकडे वळविली. इटालियन पदार्थ-विज्ञान-शास्त्रज्ञ आणि खगोल शास्त्रवेत्ता गॅलिलिओ गॅलिली (१५४६–१६४२) याने पदार्थ आणि विश्वोत्पत्तिशास्त्रासंबंधीची ॲरिस्टॉटलची श्रद्धाळू मते खोडून काढली आणि प्राचीन तत्त्वज्ञानातील परमाणूसंबंधी उपपत्तीचे पुनरुज्जीवन केले. गॅलिलिओने नव्यानेच संशोधित केलेल्या दुर्बीणीतून चंद्र आणि स्वर्गीय ग्रहताऱ्यांचे निरीक्षण केले आणि इंद्रिय ठशाच्या पुराव्याने ॲरिस्टॉटलच्या अनुयायांना खोडून काढले. अरिस्टॉटल आणि त्याच्या अनुयायांना अभिप्रेत असलेले सत्य आध्यात्मिक गूढ किंवा तात्त्विक होते, तर गॅलिलिओने शास्त्रीय सत्याचा पाठपुरावा केला. सर्व युरोपभर प्रागतिकमताच्या लोकांकडून शास्त्रीय सत्याचा स्वीकार मोठ्याउत्साहाने झाला. काही काळ एका नव्या भौतिक विश्वाचे चेतविणारे दृश्य लोकांच्या नजरेस पडले. ते नवे विश्व समजावून घेण्याचे, पचविण्याचे मानवी मनाचे सामर्थ्य नव्यानेच प्रत्ययास आले. इंग्लंडमध्ये शास्त्रीय सत्याचा पुरस्कार थॉमस हॉब्झने मोठ्या हिरीरीने केला. जॉन ऑब्री हा सतराव्या शतकातील उल्लेखनीय चरित्रकार हॉब्झला आपला गुरु मानत असे, ही गोष्ट इथे मुद्दाम नमूद करणे आवश्यक आहे.

नव्या प्रायोगिक शास्त्राचे केंद्र म्हणून 'रॉयल सोसायटी ऑफ लंडन' ही संस्था सर्व युरोपभर प्रसिद्धीस आली. १६६२ मधे या संस्थेला राजमान्यता मिळाली. इंग्लंडला प्रायोगिक ज्ञानाचा देश बनविणे हे या संस्थेचे मुख्य ध्येय होते. साहजिकच या संस्थेच्या कार्यात शब्द प्रामाण्याला वाव नव्हता. या संस्थेच्या सभासदांच्या दृष्टीने बेकनने शिफारस केलेल्या अनुभवैक शास्त्रवादी पद्धतीने जाणिवांच्या व निसर्गाच्या विश्वाचा अभ्यास म्हणजेच मानवतेचा योग्य अभ्यास ठरला. माणूस हा त्याच विश्वाचा एक घटक मानला गेला. मनुष्याकडे केवळ स्वर्ग आणि नरक यामधून हेलकावे खाणारा अमर जीवात्मा म्हणून न पाहता ज्यांची नोंद करता येईल अशा काही शारीरिक, मानसिक गुणविशेषांनी नटलेला, स्वतःच्या काही सवयींनी जखडलेल्या अवस्थेत तो जसा जगला, तसा त्याच्याकडे पाहाण्याचा दृष्टिकोन निर्माण झाला.'

शास्त्रीय दृष्टिकोनाचा जसजसा विकास होत गेला, तसतसा त्याचा चरित्र लेखनावर अनुकूल आणि क्रांतिकारक असा परिणाम झालेला दिसून येतो. काही धार्मिक चळवळींनी सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात स्वभावदर्शन, व्यक्तित्त्व दर्शन निर्भीडपणे घडविण्यास उत्तेजन दिले. विशेषतः प्रोटेस्टन्ट पंथाचे अनुयायी नैतिक क्षेत्रापुरते का होईना विविध प्रयोग करणारे होते व तत्त्वज्ञाइतकाच सर्व

प्रकारच्या असत्याबद्दल त्यांना तिटकारा होता. चरित्रातल्या वास्तवदर्शनाला ही वृत्ती उपकारक ठरली.

आतापर्यंत नव्याच्या वाटा रोखल्या होत्या. बौद्धिक पुनरुज्जीवनाचा अपरिहार्य परिणाम असा झाला की, दृढमूल प्रस्थापिताविरुद्ध बंडखोरी करून नव्या वाटा शोधण्यास सुरवात झाली. सत्याचा शोध जसजसा तीव्र होत गेला, तसतशी साहित्यिकांची बंडखोरी न् चाकोरीबाहेर पडण्याची जिद्द वाढत गेली. केवळ अध्यात्मात रस घेणारे, अंतर्मुख बनलेले लोक बहिर्मुख बनले. ऐहिक जीवनाकडे पाठ फिरवून परमार्थात दंग झालेले, सभोवतालच्या ऐहिक जीवनात रस घेऊ लागले. माणूस म्हणून माणसाकडे पाहाण्याची दृष्टी चरित्रकारांना लाभली. शास्त्रज्ञांचा सत्याबद्दलचा आदर चरित्रकारात निर्माण होऊ लागल्याची चिन्हे दिसू लागली. चरित्राचे लेखन सत्यान्वेषी बुद्धीने करावयाचे असते. हा समज आता दृढ होऊ लागला. १७५० ते १८५० च्या दरम्यान झालेल्या औद्योगिक क्रांतीने हे परिवर्तन पूर्ण केले. जीवनाची घडीच बदलली. पूर्वीच्या कल्पना मूळा-पासून उखडल्या गेल्या. फार पुरातन काळी होती ती अध्यात्मवादी भूमिका गाडली गेली आणि भौतिकवादी भूमिका दृढमूल झाली. विसाव्या शतकाच्या सुरवातीच्या वाङ्मयीन झगड्यात, आक्रमक, स्फोटक रुपात, ज्वलंत क्रांतिकारी प्रवृत्तीची ध्वजा मिरवीत, जेव्हा लिटन् स्ट्रॅचीची चरित्रे प्रकट झाली, तेव्हा जुन्या चाको-रीत न मावणारे व्यक्तित्वदर्शनाचे नवे उद्दिष्ट पक्के निश्चित झाले होते.

नवे रुजू लागण्याची चिन्हे सतराव्या शतकात दिसू लागली होती. फ्रेंच तत्वज्ञ, गणितज्ञ, नव्या प्रायोगिक शास्त्राचे पुरस्कर्ते पिएअर गॅसान्डी (Pierre Gassendi) यांनी १६४१ मध्ये त्यांचे एक समकालीन निकलस डी पायरिस्की (Nicholas de Peiresc) यांचे लॅटिन भाषेत चरित्र लिहिले. व्हिटॅ पायरिस्की (Vita Peireskil) या चरित्राचा फ्रेंच आणि इंग्लिश या दोन्ही भाषांतून अनुवाद करण्यात आला. चरित्राच्या प्रस्तावनेत त्यांनी केलेले निवेदन डॉ. जॉनसनच्या वर उल्लेखिलेल्या Rambler मधील प्रतिपादनाशी जुळणारे आहे ते लिहितात : '...जे थोर लोकांना पूर्णपणे जाणून घेऊ इच्छितात, त्यांनी जें त्यांचे खाजगी जीवन थोर स्वतःहून खुशीने जगाला ज्ञात करून देणार नाहीत, अशा खाजगी जीवनाचे ज्ञान मिळविणे अप्रिय ठरणार नाही.'[33] सतराव्या शतकातील हे चरित्र असे आहे, की ज्यात चरित्रनायक राजाही नाही किंवा धर्मोपदेशकही नाही. या चरित्रात व्यक्तित्त्व दर्शनाचा प्रामाणिक प्रयत्न झालेला आहे.

सतराव्या शतकात नवे रुजू लागले होते, असे वर म्हटले त्याचा अर्थ असा

---

33– Pinto, Vivian De Sola.
‘ English Biography in the seventeenth Century ’, P. 29.

नव्हे की, चरित्रलेखनात तावडतोब क्रांती घडून आली. बदलण्याची ही प्रक्रीया मंदगतीने चालू होती. इंग्रजी वाङ्मयात तरी अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत उत्तम चरित्रे प्रकट होऊ शकली नाहीत. नवे रुजत असतानाच चरित्रातून नैतिक मूल्यांची जोपासना करणे, उद्बोधन साधणे इत्यादी जुन्या प्रवृत्ती रेंगाळत राहणे स्वाभाविकच होते.

नवे पक्के रुजले आणि त्याला बहर आला तो विसाव्या शतकाच्या प्रारंभी. विसावे शतक हा चरित्रवाङ्मयाच्या उत्कर्षाचा काळ ठरला. जगातील प्रमुख भाषांतून उत्तमोत्तम चरित्रे लिहिली गेली, ती याच काळात. बौद्धिक पुनरुज्जीवनाच्या काळात झाक एमायत (Jacques Amyot) यांनी प्लूटार्कच्या Parallel Lives चे फ्रेंच भाषांतर केले आणि चरित्रवाङ्मयाविषयी एक आगळीच आस्था सर्व युरोपभर निर्माण झाली अॅनतोल फ्रान्स (Anatole France) यांनी लिहिलेले La vie de feanne d ' Arc (१९०८) हे फ्रेंच भाषेतील एक उत्कृष्ट चरित्र आहे. श्मीट (Schmidt) चे Lessing (१८८४–९२) आणि बिलस्कोव्हस्की (Bielschowsky) चे गर्त (Goethe) (१८९५–१९०३) ही जर्मन भाषेतील उल्लेखनीय चरित्रे होत. रशियन भाषेतील मिरझकोव्हस्की (Merezhkovsky) ची टॉलस्टॉय आणि डॉस्टॉइव्हस्की ही चरित्रे (१९०१–०२) किंवा माक्सेम गॉर्कीची टॉलस्टॉय आणि चेकॉव्ह ही सुप्रसिद्ध चरित्रे याच काळातली होत. विसाव्या शतकाच्या प्रारंभी लिहिलेल्या अमेरिकन चरित्रात कार्ल सॅन्डबर्गने (Carl Sandburg) लिहिलेले अब्राहम लिंकनचे चरित्र (१९२६–३९) सर्वोत्तम गणले जाते. इटालीमधील आधुनिक चरित्रकारांचा अग्रणी, सॉव्हॉनरॉल (Savonarola) आणि मॅकीअव्हेली (Machiavelli) या गाजलेल्या चरित्रांचा लेखक पस्कवाली व्हिलारी (Pasquale Villari) याने चरित्रलेखन १८२७–१९१७ याच काळात केलेले आहे.

मानवी जीवनाकडे पाहण्याची दृष्टीच कशी अमूलाग्र बदलली व त्याचा पाश्चात्य चरित्र वाङ्मयावर कसा परिणाम झाला, या मुद्याची चर्चा विस्ताराने केली ती एवढ्याचसाठी, की हे परिवर्तन मराठी चरित्रांपुरते मर्यादित नव्हते. ते फार व्यापक होते ही गोष्ट लक्षात यावी. परिवर्तनाची ही लाट. इथें मराठीचिये नगरी येऊन थडकली होती ती एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस.

आधुनिक मराठी चरित्र प्राचीन चरित्रांच्या अनुकरणातून स्फुरलेले नाही. संस्कृत–प्राकृत परंपरा खंडित झाल्यावर पाश्चात्यांच्या संसर्गातूनच ते निर्माण झाले आहे. भाषांतरांकरिता निवडलेल्या इंग्रजी चरित्रांच्या द्वारे पाश्चात्य मूल्ये मराठी चरित्रकारांना परिचित झाली. चरित्र नायकाकडे एक माणूस म्हणून पाहण्याचा नवा दृष्टिकोन लाभला. पाश्चात्य चरित्रांच्या अनुकरणाने मनुष्याचे मनुष्यपण

चित्रित करणारी चरित्रे लिहिली गेली. बॉसवेलवर डॉ. जॉनसनच्या मूल्यविषयक विचारांचा प्रभाव होता. चरित्र लेखनाच्या उद्दिष्टांसंबंधाने स्पष्ट कल्पना त्याच्या पुढे होती. चरित्रनायकाकडे तिऱ्हाइतपणे पाहून ' चरित्रनायक जसा होता तसा ' तो चित्रित झाला पाहिजे, या डॉक्टर जॉनसनच्या विचाराने बॉसवेलच्या मनात पक्के मूळ धरले होते. साहजिकच त्याने लिहिलेल्या डॉ. जॉनसनच्या चरित्रात डॉ. जॉनसनचे सत्यरूप न्याहाळता येते. १८७६ मधे डॉ. जॉनसनचे चरित्र मराठीत लिहिताना विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी बॉसवेलचाच आदर्श अनुसरला. आणि तोच आदर्श पुढे ठेवून त्यांचे बंधू ल. कृ. चिपळूणकर यांनी १८९४ मधे विष्णूशास्त्र्यांचे चरित्र लिहिले. येथून पुढे जुन्याची चाकोरी सुटली आणि मराठी चरित्र नव्याकडे झुकले.

मराठी चरित्रात व्यक्तित्त्वदर्शनाचे उद्दिष्ट मान्यता पावल्याची खात्री पटते, ती विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात लिहिलेल्या काशिबाई कांनिटकरांचे ' आनंदीबाई जोशी ', लक्ष्मीबाई टिळकांचे ' स्मृतिचित्रे ', इंदिराबाई भागवत यांचे 'या सदाशिव ' आणि खानोलकरांचे ' माधवराव पटवर्धन ' यासारख्या चरित्रातून. ' या सदाशिव 'मध्ये कौटुंबिक अभिनिवेश असला तरी यादवरावांची व्यक्ती डोळ्यांपुढ स्पष्ट उभी राहाते. चरित्र ही एक वाङ्मयीन कृती आहे, ही नवी जाणीव लक्ष्मीबाई टिळकांच्या ' स्मृतिचित्रांनी ' निर्माण केली. चरित्र कथा कादंबरीसारखे नव्हे, वाङ्मयहीन आणि स्तुति–जड, भारावलेले, थोरांच्या चरित्रांचे गंभीर साहित्य ही चरित्राबद्दलची परंपरागत कल्पना या बिंदूपासून खंडित झाली. ते चरित्र तसेच आत्मचरित्रही आहे. ते बायकोचे आत्मचरित्र व नवऱ्याचे चरित्र आहे. लक्ष्मीबाई रेव्हरंड टिळकांच्या निकटवर्ती असल्यामुळे चरित्रात टिळकांच्या खाजगी जीवनातील बारीकसारीक तपशील भरत जातात त्यामुळे चरित्र कादंबरी इतकेच सरस आणि चित्तवेधक झाले आहे. चरित्राला थोडाफार ख्रिस्ती धर्म प्रसाराचा वास येतो, ही गोष्ट मान्य करूनही एक ललित-कृती म्हणून हे चरित्र अजोड ठरते. काशिबाई कानिटकरांनी आनंदीबाईच्या चरित्रात पत्रांचा भरपूर उपयोग केला आहे. व्यक्तिवत्त्दर्शनाचे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवूनच पत्रांची निवड केलेली दिसते. इथे लेखनातल्या पद्धतीतला फरक लक्षात घेण्याजोगा आहे. आनंदीबाईची व्यक्ती सतत वाचकांच्या डोळ्यापुढे उभी ठेवण्यात लेखिकेला यश आले आहे, यात शंका नाही. खानोलकरांनी माधवरावांच्या चरित्रात त्यांची आदळआपट, पोरकटपणा, भिडस्त वृत्ती, खंतखोरपणा हा प्रांजळपणे मांडला आहे. माधवरावांच्या व्यक्तिमत्त्वावर आक्रमण न करता, त्या व्यक्तिमत्त्वाला जिवंत कलात्मक स्वरुप दिले आहे. हे चरित्र समग्र चरित्र-वाङ्मयात वेगळे दिसेल असे आहे. ल. ग. बापटांचे रामानंद बिडकर महाराजांचे

चरित्र घेतले, तरी ते परंपरागत संतचरित्राहून वेगळे आहे. संप्रदायनिष्ठेचा सांकेतिकपणा बिडकर चरित्रात दिसत नाही. लेखकाने स्वतः अलिप्त राहून बिडकर महाराज जसे होते तसे ते चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. मराठी-तले एक वास्तव संत चरित्र म्हणून या चरित्राचे महत्त्व जाणवते.

मानवी जीवनाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन बदलल्यानंतर व्यक्तिदर्शनाच्या हेतूने जे आधुनिक चरित्रलेखन झाले त्याची वैशिष्टये तपासून पाहण्यापूर्वी व्यक्तिमत्त्व म्हणजे काय ते पाहू.

व्यक्तिमत्त्व म्हणजे व्यक्तीचे वेगळेपण सिद्ध करणाऱ्या व्यक्तिविशेषांची एकात्म परिणती. मानवी जीवन सुलभ करणाऱ्या किंवा भविष्यकालीन सुलभतेची हमी देणाऱ्या बौद्धिक, मानसिक आणि नैतिक गुणविशेषांनी व्यक्तिमत्त्वाला आकार मिळतो. जीवन ही एक अनुभूतीची अखंड मालिका असते. अनुभवातून व्यक्ती घडत जाते. जेव्हा उतू जाणाऱ्या जीवनशक्तीमुळे रूढी आणि भोवतालचा परिसर यांचा ताण असह्य होत नाही, तेव्हा अंगभूत व्यक्तिविशेषांची रुढी व भोवतालचा परिसर यावर प्रतिक्रिया होऊन त्यांची पूर्तता होते. व्यक्तिमत्त्व प्रकट होते. जीवन हे जगण्यासाठी असते आणि व्यक्तिमत्त्वामुळे ते उत्तम तऱ्हेने जगता येते. यथार्थ व्यक्तिदर्शन घडविणाऱ्या चरित्रात डोकावून पाहिले, म्हणजे व्यक्तीच्या अंतरबाह्य जीवनाचे, तिच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब मुळाबरहुकूम उमटलेले असते.

व्यक्तित्वदर्शनाच्या उद्दिष्टामुळे चरित्रवाङ्मयाला काही वैशिष्टये लाभली आहेत. त्यांचा इथे परामर्श घेणे संयुक्तिक ठरेल. व्यक्तिदर्शनाचे उद्दिष्ट निश्चित झाले ते आधुनिक चरित्रकारांच्या जीवननिष्ठेतून. जीवनाश्रयामुळे या चरित्रांना मानवी जीवनाबद्दलचे कुतूहल शमविण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले आहे. जीवनदर्शनामुळे त्यांना कथेचे परिमाण लाभले. वाङ्मयीन घाट आला. आधुनिक चरित्रात महत्त्व असते ते आशयाला. आणि म्हणूनच चरित्रात व्यक्तीच्या खाजगी जीवनावर पसरलेला पडदा दूर सारला जातो. मानवी अंतःकरणाचा वेध घेणे हे चरित्रकाराचे मुख्य कार्य. चरित्र या शब्दाच्या अर्थातूनच चरित्राचे जीवनदर्शनाचे कार्य सूचित होते. चरित्र bio–graphia म्हणजे जीवनाचे लेखन. चरित्रात नायकाच्या सखोल आणि व्यापक जीवनानुभूतींतून जीवनाचा आविष्कार घडतो. जे अमूर्त आहे ते साकार होते. मराठीतील काशिबाई कानिटकरांचे ‘ डॉ. आनंदी-बाई जोशी ’, इंदिरा भागवतांचे ‘ या सदाशिव ’, लक्ष्मीबाई पटवर्धनांचे ‘ माझा नंदादीप ’, गं. दे. खानोलकरांचे ‘ माधवराव पटवर्धन ’ आणि लक्ष्मीबाई टिळकांचे ‘ स्मृति–चित्रे ’ ही चरित्रे तत्पूर्वीच्या चरित्राहून वेगळी पडतात ती त्यातल्या जीवनदर्शनामुळेच. जीवन ही एक व्यक्तीच्या अनुभूतींची अखंड मालिका असते

असे वर म्हटले. 'स्मृतिचित्रे'च्या यशाचे मर्म– चरित्रातील व्यक्तींच्या व्यापक आणि सखोल अनुभूतीद्वारे प्रतीत होणाऱ्या जीवनदर्शनात आहे.

चरित्रातले जीवनदर्शन वैशिष्टयपूर्ण ठरले. साहजिकच चरित्रात व्यक्तींना महत्त्व आले. कृतीपेक्षा व्यक्ती महत्त्वाची ठरली. आधुनिक चरित्रात कृती गौण ठरतात. अग्रक्रम मिळतो तो व्यक्तींना, चरित्रातून केवळ विचार मांडले जातात असे नव्हे, तर विचारवंतांचे व्यक्तिदर्शनही घडविले जाते केवळ कृत्यांची नोंद होत नाही, तर कर्त्याच्या स्वभावाचीही नोंद होते. जॉन ॲडिंगटन सिमन्डस यांनी म्हटले आहे : 'लोक काय करतात त्यावरून मानवी जीवनाचे मोजमाप करावयाचे नसून लोक कसे आहेत यावरून ते करावे.' [३४] आधुनिक चरित्रात लढाई, राज्यारोहण किंवा राजकीय चळवळ यासारख्या घटनांच्या चित्रणापेक्षा व्यक्तीचे विचार आणि भावनांचे चित्रण महत्त्वाचे ठरते. कृती आणि व्यक्ती यांची पूर्णपणे फारकत करणे कठीण असले, तरी आधुनिक चरित्रात व्यक्तीच्या महत्कृत्यापेक्षा व्यक्तित्व अधिक महत्वाचे गणले जाते. चरित्रनायकाला भेटलेली माणसे आणि त्याच्या कृतीचे वर्णन मोठे चित्तवेधक असते यात शंका नाही. पण चरित्रात नोंदलेल्या कृतींच्या मागे असलेली व्यक्ती प्रत्यक्षात कशी होती, हे समजावून घेता यावे, यात चित्तवेधकतेपेक्षा अधिक काहीतरी आहे. 'खरोखरीच्या चांगल्या चरित्राची मुख्य गरज ही आहे. की ते चरित्र व्यक्ती जगली, चालली, बोलली आणि त्या व्यक्तीचे काही मानवी गुण होते याची खात्री होईल अशा रीतीने तिची पुनर्निर्मिती करते. त्या व्यक्तीने काय केले हेच केवळ आपल्याला दाखविले जाऊ नये, तर ती व्यक्ती कशी होती. ती कशाकरिता होती आणि ती तशी का होती हेही दाखविले जावे. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे त्या व्यक्तीच्या अंतरंगाचा अथवा निदान व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार घडावा.' [३५]

आधुनिक चरित्रात व्यक्तीला अग्रक्रम मिळतो याचा अर्थ असा नव्हे की चरित्रात व्यक्ती आणि कृती यांची पूर्णपणे फारकत होते. विशिष्ट समयी व्यक्ती कशी वागली ? आणि ती तशीच का वागली ? या प्रश्नाचे उत्तर कृतींच्या अनुरोधानेच सापडते. आणि म्हणूनच व्यक्ती आणि कृती यांची पूर्णपणे फारकत करणे अशक्य ठरते. व्यक्तींच्या कर्तृत्वाची साक्ष देणाऱ्या कृती तर मुळीच वगळता येत नाहीत. आधुनिक चरित्रात व्यक्तित्वावर प्रकाश टाकणाऱ्या आणि कर्तृत्वाची साक्ष देणाऱ्या कृतींची निवड होते आणि मग कृती आणि व्यक्ती दोन्ही साकार होतात. ज्या घटितांच्यामुळे व्यक्तीचे कर्तृत्व सिद्ध होते आणि पर्यायाने व्यक्ति-

---

34– Fuess, Claude. M. 'Debunkery and Biography', Atlantie Monthly, March 1933, P. 349.

35– Nev ns, Allan 'The Gateway to History', 1938, P. 326.

मत्त्वाची बांधणी होते, ती घटिते वगळणे चुकीचे ठरते. नंदादीप या लक्ष्मीबाई पटवर्धनांनी लिहिलेल्या त्यांच्या पतीच्या डॉ. पटवर्धनांच्या चरित्रांतील पुढील प्रसंग पाहा–

दुसरे कसे कां वागेनात, आपण मात्र त्यांचेबरोबर वागताना कर्तव्यालाच धरून वागायचे अशी डॉक्टरांचे स्वभावाची पद्धत होती. इतर लोकांनी त्यांचा द्वेष केला, नाना तऱ्हेने त्यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न करून पाहिले, परंतु डॉक्टरांनी मात्र शेवटपर्यंत त्यांच्याशी निर्मत्सर वृत्ति ठेवली. एक डॉक्टर सम-व्यवसायी म्हणून डॉक्टरांचा आतून द्वेष करीत व रोगी लोकांना 'पटवर्धन डॉक्टरांचेकडे कशाला जाता ? मी कमी पैशात औषधे देईन, इंजेक्शने करीन,' वगैरे सांगून त्यांना डॉक्टरांच्याकडे जाऊ न देता आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न करीत. पण डॉक्टरांनी मात्र त्यांचेबद्दल कधीही वाकडेपणा दाखवला नाही.

एकदा एका रोग्याची लघवी अडली म्हणून तो सरकारी दवाखान्यात आला. त्यावेळी डॉक्टर खेडेगावात गेले होते. म्हणून तो दुसरीकडे म्हणजे वरील डॉक्टरांकडे गेला. त्यांनी त्याला पाहिला व सांगितले की, 'लघवी सरळपणे निघणार नाही, ऑपरेशन करायला पाहिजे, मी करीन पण २५ रुपये घेईन.' रोगी कबूल झाला. काय करतो बिचारा ? लघवी अडली असल्याने पोट फुगून कळा लागल्या होत्या, तळमळत होता. डॉक्टरांनी लघवी काढायच्या ऐवजी त्याची सुंता केली व सांगितले की, 'थोडा वेळ वाट पाहा. तुला बरे वाटले नाही तर मात्र येथे कोणालाही न दाखवता ताबडतोब मिरजेला जायला पाहिजे.' अर्थातच लघवी निघाली नसल्याने रोग्याची तळमळ कायमच होती. त्यात या नवीन जखमेची भरच पडली. तेव्हा त्याचे शेजारी त्याला त्या डॉक्टरांकडे गेल्याबद्दल दोष देऊ लागले. व तू पटवर्धन डॉक्टरांचेकडेच जा म्हणून म्हणू लागले. रात्री ११–१२ च्या सुमारास त्याला पुन्हा दवाखान्यात आणण्यात आले. आम्ही सिनेमाला गेलो होतो. तेथे एक माणूस बोलवायला आला. सिनेमा संपताच आला होता. 'तू पुढे हो आम्ही येतोच' असे त्याला सांगून डॉक्टरांनी कंपौन्डरला 'हत्यारे उकळून तयार ठेव' अशी चिठी दिली. आम्ही सिनेमा संपताच घरी आलो. डॉक्टर लगेच दवाखान्यात गेले. त्यांना घरी परत यायला बराच वेळ लागला. आल्याबरोबर मी त्यांना सर्व हकीगत विचारली. ते म्हणाले, 'पेशंटला मी जाण्यापूर्वीच टेबलावर घेतला होता. पण त्याच्या कपड्यावर रक्ताचे डाग दिसले म्हणून मी विचारले की, हे रक्ताचे डाग कसले ? तेव्हा सर्व हकीगत मला कळली. प्रत्यक्ष तपासून पहातो तो लघवी तशीच अडलेली आणि कारण नसता सुंता केलेली. त्या माणसाची लघवी मधून मधून अडत असे. व तो दवाखान्यांत येतहि असे. नियमित काही दिवस येत जा म्हणून सांगितले असताही लघवी होऊ लागली की तो यायचा नाही. त्यामुळे त्यातील

दोष पुरता कमी होत नसे. असे दोन तीन वेळा झाले होते. तेव्हा मी तो नियमित येत नाही म्हणून रागावेन या भीतीने त्याला माझ्याकडे येणे अवघड वाटत होते. पण काय करतो ? शेवटी अशा अवस्थेत आला. मी लघवी काढली. लगेच त्याला आराम वाटला. ' तेव्हा मात्र सर्व लोक त्या डॉक्टरांवर चिडले व म्हणू लागले, की आम्ही त्यांच्यावर खटला भरतो म्हणून.'

मी ही हकीगत डॉक्टरांच्या तोंडून ऐकली तेव्हा मला खूपच राग आला. आपणाला येत नाही, त्यातले काही कळत नाही तर दुसऱ्याचे विनाकारण नुकसान कशाला करावे ? आणखी इथे कोणाला न दाखविता मिरजेला जा असे का सांगावे? मीही म्हटले, ते लोक म्हणतात ते बरोबर आहे. त्या डॉक्टरांवर खटलाच भरायला पाहिजे. रात्री आमचे इतके बोलणे झाले. सकाळी रोग्याकडचे लोक आले आणि डॉक्टरांना म्हणाले की, ' डॉक्टरसाहेब, आम्ही तुमची साक्ष काढणार आहो,' परंतु डॉक्टरांनी स्पष्ट सांगितले की, ' काय वाटेल ते झाले तरी आम्ही एका व्यवसायातले लोक.' मी त्यांच्या विरुद्ध कदापि साक्ष देणार नाही.' मलाही डॉक्टरांच्या या उत्तराने धक्काच बसला. पण विचारान्ती त्यांच्या वर्तनातील खरी उदात्तता दिसून आली. खरोखरी पहाता डॉक्टरांच्याबद्दल त्या डॉक्टरांनी अनेक वेळा लोकांच्याजवळ उणेदुणे व खोटेनाटे बोलणे केले होते. तेव्हा डॉक्टरना आयती संधी चालून आली होती. परंतु डॉक्टरांचे मन मोठे; त्यांनी या बाबतीत कधीही काही विरुद्ध केले नाही.'[३६]

वरील प्रसंग इथे समग्र कथन करण्याचा हेतू एवढाच की, डॉक्टरांचे वैद्यकीय कर्तृत्व आणि तदनुषंगाने प्रकट होणारा निर्भत्सरी स्वभाव आणि उदार मन यांची साक्ष असलेले हे घटित चरित्रातून वगळणे केवळ अशक्य होते हे लक्षात यावे. अशा घटितांच्या आधारे व्यक्तित्वदर्शन घडविण्यातच चरित्रकाराचे खरे कौशल्य आहे. व्यक्तीचे कर्तृत्व कृतीद्वारे सिद्ध होते. आणि कर्तृत्व हे तर व्यक्तीच्या जीविताचे फलित. व्यक्तीचे कर्तृत्व घडत असताना तिच्या अंगचे गुण कशाला लागतात. चरित्रात व्यक्तीचा विचार करताना कृतींचा, पर्यायाने कर्तृत्वाचा विचार करणे अपरिहार्य ठरते. मात्र चरित्रात व्यक्तित्वदर्शनाला प्राधान्य असल्यामुळे कृती अखेरीस साधनरूपच असते. प्रा. सिडनी ली यांनी व्यक्तिदर्शी घटितांचे महत्त्व पुढील शब्दात व्यक्त केले आहे : ' सर्वसाधारणपणे स्त्रीपुरुष व्यक्तींचा इतिहास पुढच्या पिढीच्या हाती देणे, त्यांची स्वभावरचना आणि महत्कृत्ये न डगमगता परंपरागत करणे, हे चरित्राचे उद्दिष्ट आहे. चरित्रलेखनाच्या कामी स्वभावरचना आणि महत्कृत्ये अविभाज्य असतात. जी स्वभावरचना महत्कृत्यात व्यक्त होत नाही, ती चरित्रकाराच्या दृष्टीने केवळ आभास ठरते. महत्कृत्याचा

---

३६– पटवर्धन, लक्ष्मीबाई, ' माझा नंदादीप ' १९५२, पृ. १३३–१३५.

पल्ला जॉनसनप्रमाणे केवळ बोलण्यापासून, ज्युलिअस सिझर किंवा नेपोलिअन प्रमाणे साम्राज्याची उभारणी अथवा सैनिकी विजयापर्यंत असू शकेल. परंतु स्वभावरचना आणि महत्कृत्ये यांनी मिळून चरित्रातले व्यक्तिमत्त्व उभे राहते.'[३७]

आधुनिक चरित्रांचे हे वैशिष्टय म्हणता येईल, की त्या चरित्रात व्यक्तीने जे काही केले त्याचा उपयोग व्यक्ती कशी होती हे दाखविण्याकरिता मोठ्या कौशल्याने केला जातो. व्यक्तीचे मन उकलण्याचा प्रयत्न होतो. व्यक्ती कशी होती हे दाखविताना, तिच्या मनाची जडणघडण आणि विकास चरित्रातून टिपला जातो. व्यक्तीच्या मनोविकासाचा आलेख काढला जातो. बॉसवेलने जॉनसनच्या चरित्रात याच तंत्राचा अवलंब केला आणि या तंत्राच्या यशाबद्दल आपला आत्मविश्वास त्याने विल्यम टेम्पल यांना लिहिलेल्या पत्रात पुढील शब्दात व्यक्त केला. 'जॉनसनच्या प्रकाशनांचा आणि जगातील त्याच्या दृश्य प्रगतीचा केवळ इतिहास न देता, त्याच्या पत्रातून आणि संभाषणातून त्याचे मनोदर्शन घडविणारी माझी चरित्रलेखनाची पद्धत योजता येण्याइतकी परिपूर्ण आहे. आणि आतापर्यन्त प्रसिद्ध झालेल्या कोणत्याही कृतीपेक्षा अधिक जिवंत ठरेल.'[३८]

आधुनिक चरित्रातून मानवी जीवनातील सार्वत्रिक, सार्वकालीन अशा शाश्वत भागाचे चित्रण होते. मानवी जीवनातील हा शाश्वत भाग इतका सार्वत्रिक आणि सार्वकालीन असतो की, त्या चित्रणात सामान्य आणि असामान्य हा भेदच उरत नाही. माणसाच्या सर्व देहातून जशी एकच नाडी वाहते तसा शाश्वत मानवी मूल्याचा धागा काही आधुनिक चरित्रातून आढळतो. स्थलकालाच्या मर्यादा ओलांडणाऱ्या, मानवी जीवनातील शाश्वत भागाच्या या चित्रणामुळे चरित्रात वाङ्मयाचा परिपोष होतो. त्यांना वाङ्मयीन घाट येतो. काशिबाई कानिटकरांनी लिहिलेल्या 'डॉ. आनंदीबाई जोशी' अथवा लक्ष्मीबाईनी लिहिलेल्या 'स्मृतिचित्रातून' खेळकरपणा, विक्षिप्तपणा, दुष्टपणा, औदार्य, प्रेम अशा अनेकविध मानवी भावनांनी, स्वभावविशेषांनी नटलेल्या व्यक्तींचे चित्रण झाले आहे. मानवी स्वभावाचे विविध नमुने चित्रित करणाऱ्या या चरित्रकारांनी मानवी जीवनाचे शाश्वत मूल्य जाणले आहे. आधुनिक चरित्रकारांपैकी लिटन स्टॅचीने मानवी जीवनाच्या शाश्वत मूल्यावर अधिक भर दिला आहे, 'माणसे इतकी महत्त्वाची आहेत की त्यांच्याकडे केवळ भूतकाळाच्या खूणा म्हणून पाहता येणार नाही. त्यांना एक मूल्य असते की जे कोणत्याही कालदर्शक पद्धतीहून स्वतंत्र असते,

37– Prof Lee, Sidney. 'The Principles of Biography', Cambridge University Press 1911, PP. 8–9.

38– Dunn, Waldo. H. 'English Biography', New York : E. P. Dutton & Co. 1916, P. 114.

शाश्वत असते आणि मूल्य म्हणूनच ते वाटले पाहिजे '[३९]

सत्याच्या प्रकृती-सिद्ध बंधनात राहून चरित्राने मानवी स्वभावाची गुंतागुंत उकलण्याचा, मानवी स्वभावावर उत्तरोत्तर अधिकाधिक प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करावा असेच आधुनिक चरित्रवाङ्मयाचे टीकाकार अपेक्षितात. ऑर्थर एम् विल्सन (Arthur M. Wilson) यांच्या मते : '... चरित्राला उच्च प्रकारचे सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व आहे. मानवी स्वभावाची विविधता आणि गुंतागुंत अनुभवण्याकरिता आपल्याला दुसऱ्याच्या वतीने अधिक सामग्री पुरविणे, हे चरित्राचे श्रेष्ठ संयुक्तिक कारण आहे. चरित्राचे मुळातले मानवी स्वरुप टिकवून धरणे ही महत्त्वाची गोष्ट आहे. आपल्या चरित्र लेखनाच्या प्रयत्नातून माणसाचा स्वभाव कसा आहे, या संबंधींचे नवे ज्ञान सतत सुचविले जाऊ द्या, आणि जुनी माहिती निश्चित होऊ द्या. टाऊनसेन्ड स्कुडर (Townsend Scudder) यांनी म्हटल्याप्रमाणे चरित्र हे मानवतेचे आकलन करून देणाऱ्या साधनांपैकी एक प्रमुख साधन आहे.' [४०]

जीवनदर्शनामुळे चरित्राला कथेचे परिमाण लाभते, चरित्रलेखनाला कथाकथनाचे स्वरुप प्राप्त होते. चरित्रनायकाच्या जीवनकथेद्वारा मानवी स्वभावाचा उलगडा होतो व्यक्तीचे जीवन नेहमीच सरळ राहात नाही. त्या जीवनप्रवाहावर मधून मधून भोवरे उठतात. व्यक्तीच्या बाह्य जीवनात आणि अंतरंगातही संघर्षाचे क्षण उभे राहातात. मानवी अनुभूतीच्या विविधक्षेत्रात व्यक्ती जीवनाशी तडजोड करीत असते. व्यक्तीचे तिच्या कालखंडाशी असलेले संबंध किंवा कालखंडाचे व्यक्तीशी असलेले संबंध, व्यक्तीचे समाजाशी असलेले संबंध, गूढ नैतिक प्रश्नांकडे, धर्माकडे पाहाण्याचा तिचा दृष्टिकोन या विविध संदर्भात किंवा श्रद्धा आणि बुद्धी, बुद्धी आणि इच्छाशक्ती यान समाधानकारक समतोल राखण्याच्या प्रयत्नात ही तडजोड सतत घडत असते. जीवनातल्या संघर्षातून मार्ग काढीत असताना चरित्रनायकातला माणूस प्रकट होतो. आणि म्हणूनच व्यक्तीने ही तडजोड कशी साधली, ह्याची चरित्रात नोंद व्हावी. या संदर्भात आर्थर विल्सन यांचे पुढील प्रतिपादन योग्य वाटते : ' प्रत्येक माणसाच्या अंतरंगात, जे बाह्य जीवनाचे स्पष्टीकरण करते व बाह्य जीवनाच्या दृष्टीने पूर्वगामी असते अशा आंतरिक जीवनात काही छेदनबिंदूंचे म्हणा किंवा भोवऱ्यांचे म्हणा विभाग असतात व या विभागात ज्याचा आपण अभ्यास करीत असतो असा

---

39– Strachey, Lytton. ' Eminent Victorians ', London Chatto & Windus, Dec. 1918, Iutroduction, P. Viii.

40–41 ' Engliso Institute Annual ', 1942, New York : Morningside Heights, 1943, PP. 64–65.

माणूस जर गतप्राण झालेला नसेल तर संघर्ष व तडजोड सतत चालू असते. मला असे म्हणायचे आहे की, कुशल चरित्रकाराने या वैशिष्टयपूर्ण विभागात त्याच्या चरित्रनायकाने तडजोड कशी केली हे ठरविणाऱ्या पुराव्याच चरित्रात अंतर्भाव करण्याची काळजी घेतली पाहिजे.'[४१] फांदीवर फांदी घासली गेली म्हणजे स्फुल्लिंग बाहेर पडतात, तद्वत जीवनातल्या संघर्षातून व्यक्तिमत्त्वाचे तेज प्रकट होते. फर्गसन कॉलेज प्रकरणी माधवराव पटवर्धनांच्या जीवनातला संघर्ष शिगेला पोचला. त्यांच्या तत्त्वनिष्ठेची आणि मनाच्या खंबीरपणाची कसोटी लागली. त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनी त्यांना जीवनातून उठविण्याचा घाट घातला, पण माधवरावांनी पुढे अप्रतिष्ठा आणि हाल दिसत असूनही सत्य सोडले नाही. या सर्वच प्रसंगातून माधवरावांचे व्यक्तिमत्त्व तावून सुलाखून निघाले आणि अधिकच तेजाळले. कधी कधी जीवनातल्या संघर्षातून तडजोड करताना व्यक्तिमत्त्वातले हीन व्यक्त होते. जीवनातल्या संघर्षातून व्यक्तीने कशाची निवड केली यावर व्यक्तिमत्त्वाचा कस अवलंबून असतो. जीवनातल्या संघर्षाला तोंड देता देता व्यक्तीच्या निष्ठा बदलतात. अमुक एका गोष्टीबद्दलचा तिचा जिव्हाळा संपतो किंवा दुसऱ्या एखाद्या गोष्टीबद्दलचा जिव्हाळा नव्याने उत्पन्न होतो. जीवनातल्या संघर्षाला तोंड देत असताना व्यक्तीने काय करायला हवे होते आणि प्रत्यक्षात काय केले यावरून तिच्या व्यक्तिमत्त्वाची कसोटी लागते. न्यायमूर्ती रानडयांना प्रथम पत्नीच्या मृत्यूनंतर विधवेशी विवाह करून आपण केवळ बोलके सुधारक नसून कर्ते सुधारक आहोत हे जगाला दाखवून देण्याची संधी प्राप्त झाली असताना वडिलांच्या रागालोभाखातर त्यांनी कुमारिकेशी लग्न केले, यात पितृभक्तीपेक्षा त्यांची कचखाऊ वृत्तीच दिसून येते. विधवा विवाहाबद्दलचा प्रतिबंध फोडून विधवांना सौभाग्य प्राप्तीचा मार्ग खुला करून देणे हे त्यांचे ध्येय होते. पण प्रत्यक्ष ध्येयपूर्तीची वेळ येऊन ठेपताच, वडिलांचा विरोध रानडयांना जाणवला आणि त्यांनी या संघर्षातून निवड केली ती एका कुमारिकेशी होणाऱ्या पुनर्विवाहाची. व्यक्तिजीवनातील संघर्षाचे मूळ शोधून काढले म्हणजे व्यक्तिमत्वाबद्दल अंदाज बांधता येतो.

व्यक्तीच्या जीवनात जी परस्पर विरोधी शक्तींची रस्सीखेच चालू असते त्यामुळे चरित्राला संविधानक आणि नाटयमय संघर्षाची बैठक लाभते. संघर्ष हा मुळातच चित्तवेधक असतो. आधुनिक चरित्रात जेव्हा गतिमान, संघर्षपूर्ण जीवनदर्शन घडते, तेव्हा चरित्र चित्तवेधक होते. 'या सदाशिव' आणि 'माधवराव पटवर्धन' या चरित्रात यादवराव आणि माधवराव यांच्या व्यक्तिगत जीवनातल्या संघर्षाचे चित्रण वाचकांना खिळवून टाकणारे आहे.

व्यक्तित्त्वदर्शनाच्या उद्दिष्टामुळे चरित्रातून जीवनदर्शनाबरोबरच उत्कट

तोलदार अनुभवदर्शन होत राहते. चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्व घडविणाऱ्या आणि मानवी जीवनाबद्दलची जिज्ञासा जागविणाऱ्या जीवंत अनुभूतींच्या अपेक्षेने वाचक चरित्रे वाचतात. चरित्रातून आरशात उमटावे तसे व्यक्तीचे तिच्या अनुभतींसह प्रतिबिंब उमटते. वाचकांना प्रत्यक्ष मानवी अनुभूतीचा प्रत्यय येतो. आणि त्या अनुभूतीचे मोल जोखता येते. चरित्र वाचत असताना जणू सजीव व्यक्तीचे साहचर्य लाभते. चरित्र नायकाचे व्यक्तिमत्त्व संपन्न बनविणाऱ्या अनुभूती वाचकांच्या मनाची पकड घेतात. चरित्रनायकाच्या जीवन कथेशी त्यांना खिळवून टाकतात. 'फर्गसन कॉलेज प्रकरण' हे माधवरावांच्या धूर्त सहकाऱ्यांनी रचलेले शुद्ध कुभांड होते. असली ही कुभांडे व आयुष्यात आलेले विपरीत अनुभव यामुळे पूर्वी मोकळ्या अंतकरणाने व निःशंक मनाने समाजात वावरणारे माधवराव' काहीसे नियतीवादी व एकलकोंडे बनत चालले. दुधाने जीभ पोळली म्हणजे माणस ताकही फूंकर घालून घेतो. फर्गसन कॉलेजमधून दोन वर्षेपर्यन्त सक्तीने रजा घेणे भाग पडल्यावर अमळनेरच्या प्रताप हायस्कूलमध्ये नोकरी करीत असताना सुरुवातीला त्यांना कोणाचाही संग नको होता. एकांत मिळेल तेवढा बरा असे त्यांना वाटे. फर्गसन कॉलेजला रामराम ठोकल्यानंतर त्यांना कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजात प्राध्यापकाची नोकरी मिळाली तेव्हाही कॉलेजांतील सहकाऱ्यांशी त्यांचा जेवढ्यास तेवढा संबंध असे. आपला पाणउतारा करावयास कोणालाही कधी संधी न देण्याकडे त्यांचा नेहमी कटाक्ष असे. त्यांच्या स्वाभिमानाला डिवचणारे प्रसंग कॉलेजात कित्येकदा घडत, पण त्यांचे परिणाम ते स्वतःवर कधी होऊ देत नसत. अध्यापनाव्यतिरिक्त कॉलेजच्या कसल्याही उठाठेवीत ते पडत नसत. आपल्या सर्व सहकाऱ्यांशी ते खेळीमेळीने वागत. पण विशेष असा संबंध ठेवीत नसत. आपण कोणाशी लगट करायला जावयाचे नाही, आणि दुसऱ्या कोणालाही आपल्याशी लगट करू द्यावयाची नाही, असे त्यांचे धोरण होते. नेमक्या अशाच परिस्थितीतून जाणाऱ्या वाचकाला चरित्रातून त्याच त्या अनुभूतींचा पुनः प्रत्यय जेव्हा येतो, तेव्हा त्याला पुनःप्रत्ययाचा आनंद लाभतो आणि चरित्रातल्या जीवनाबद्दल विलक्षण आस्था वाटते.

स्त्रीने लिहिलेल्या पतीच्या चरित्रात घडणारा भावजीवनाचा मुक्त आविष्कार हे काही आधुनिक मराठी चरित्रांचे एक लक्षणीय वैशिष्टच आहे. भावजीवनाच्या मुक्त आविष्कारामुळे या चरित्रांना कथेचे परिमाण लाभले आहे. ती चित्तवेधक झाली आहेत. कथा कादंबरीशी ती स्पर्धा करू पाहतात. काशिबाई कानिटकरांनी लिहिलेले डॉ. आनंदीबाई जोशींचे चरित्र किंवा रमाबाई रानडे यांनी लिहिलेले न्यायमूर्ती रानडे यांचे चरित्र या दृष्टीने उल्लेखनीय आहेत

आधुनिक चरित्रकार उपलब्ध झालेल्या साधनांच्या द्वारे एका संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा वाचकांच्या मनावर ठसठशीत ठसा उमटावा म्हणून प्रयत्न करताना

आढळतात. एका आकृतिबंधात व्यक्तिमत्त्वाचे अणुरेणू ते सजीव करतात. जीवनदर्शन, स्वभावदर्शन, संघर्षाचे चित्रण, मानवी जीवनाच्या शाश्वत भागाचे चित्रण आणि भावजीवनाचा मुक्त आविष्कार यापैकी एक किंवा अनेक घटकांच्या अस्तित्वामुळे आधुनिक चरित्रात वाङ्मयाचा परिपोष होऊन, ती वाचनीय होतात. त्यांना वाङ्मयीन घाट येतो आणि चरित्र ही एक वाङ्मयीन कृती असल्याची खात्री पटते.

आतापर्यंत झालेल्या चर्चेचा सारांश हा, की स्मृती टिकविणे, उद्बोधन, स्फूर्ती देणे, अर्थप्राप्ती, विशिष्ट व्यक्तीच्या वा वाचकांच्या अनुग्रहाची अपेक्षा करणे ही चरित्र लेखनाची उद्दिष्टचे नाहीत. फारतर यथार्थ व्यक्तिदर्शनाचा तो परिपाक म्हणता येईल. चरित्र ही एक वाङ्मयीन कृती आहे. तेव्हा जीवनदर्शन, व्यक्तिदर्शन हेच चरित्राचे वाङ्मयीन उद्दिष्ट होय.

❋

# दोन
# चरित्रातले सत्य

' To write a good life is almost as hard as to live one '[1] असे कार्लाइलने म्हटले आहे. कार्लाइलच्या विधानातील सत्य चरित्रातील मोकळ्या जागांच्या बाबतीत तीव्रतेने जाणवते. चरित्रनायकाच्या जीवनातील विवक्षित क्षणाच्या संदर्भात विपुल माहिती उपलब्ध आहे म्हणून त्या चित्रणाने अधिक जागा व्यापावी; त्या चित्रणाला भरपूर वेळ द्यावा; आणि अपुरी माहिती असल्यास ते चित्रण कसेबसे घाईघाईने उरकून घ्यावे; असेच बहुतांशी होते. पुरेशा माहितीच्या अभावी चित्रण आकसले म्हणजे वाचकांना काहीतरी चुकल्या चुकल्या सारखे हरवल्यासारखे वाटते. चरित्रकाराने आपल्याला चकवले आहे याची जाणीव होते. ते चित्रण वाचकांच्या मनाची पकड घेण्यास अपयशी ठरते. कंटाळवाणे होते. चरित्रनायकाच्या जीवनातील विवक्षित क्षणाच्या चित्रणाने व्यापलेली जागा, त्या चित्रणाकरिता दिलेला वेळ, या गोष्टी उपलब्ध असलेल्या माहितीपेक्षा त्या क्षणाच्या चरित्रनायकाच्या जीवनातील महत्त्वावर अवलंबून असतात. शिवाय चरित्रकाराला कथनाचा वेग असा काही जुळवावा लागतो की, त्या कथनाच्या गतीतून नायकाच्या जीवनाची गती प्रतिबिंबीत व्हावी. चरित्रकाराने नायकाच्या जीवनातील विवक्षित क्षणाचे मोल जाणले, पण त्या चित्रणाकरिता हवी असलेली माहिती त्याच्याजवळ उपलब्ध नसली, कसून शोध घेऊनही ती उपलब्ध झाली नाही, म्हणजे मोकळी जागा कशी भरून काढावी असा पेच त्याच्यापुढे उभा राहातो. चित्रणातले उणेपण अपरिहार्यपणे स्वीकारण्यापेक्षा कल्पिताचा आधार घेण्याचा मोह होणे अगदी स्वाभाविक आहे. पण चरित्रातल्या मोकळ्या जागा कल्पिताच्या आधाराने भरून न काढता येणें, ही चरित्र लेखनावरची फार मोठी मर्यादा आहे. सत्याच्या बंधनात राहावयाचे म्हणजे चित्रणातला हा उणेपणा अपरिहार्यपणे स्वीकारावा लागतो. बॉसवेलसारख्या चरित्रकारालाही डॉ. जॉनसनच्या प्रत्यक्ष सहवासात येण्यापूर्वीच्या भागाचे चित्रण करताना हव्या असलेल्या सूक्ष्म तपशीलाच्या अभावी हा उणेपणा अपरिहार्यपणे स्वीकारावा लागला आहे. त्या भागाचे चित्रण कंटाळवाणे झाले आहे.

समग्र चरित्रवाङ्मय डोळ्यापुढे ठेवून या प्रश्नाचा विचार केला म्हणजे

---

1– Drew, Elizabeth. ' The Enjoyment of Literature ', Cambridge University Press 1935, P. 85.

चरित्रकार कधी मोकळ्या जागा भरून काढताना तर कधी कलानिर्मितीसाठी कल्पिताचा आधार घेताना आढळतात. पण असे असूनही श्रेष्ठ चरित्रवाङ्मय सत्याच्या बंधनातच राहिलेले आहे. नवव्या शतकाच्या मध्यावर राव्हेन्ना (Ravenna) चे बिशम अँगनेलस (Agnellus) यांनी पूर्वसूरींची चरित्रमाला पूर्ण करताना ऐकीव माहिती, कागदोपत्री नोंद किंवा अन्य विश्वसनीय पुराव्याच्या अभावी चरित्रनायकाविषयीचा पूर्ण तपशील जिथे जिथे उपलब्ध होऊ शकला नाही, तिथे तिथे केवळ मालेत खंड पडू नये म्हणून परमेश्वराच्या प्रेरणने तो तपशील पूर्ण केला. ' In order that there might not be a break in the series, I have composed the life myself, with the help of god and the prayers of the brethren.'[२] या स्पष्ट कबुली जबाबावरून असे दिसते, की, लेखकाने चरित्रातल्या मोकळ्या जागा कल्पनेच्या आधाराने भरून काढल्या. जिथे ऐतिहासिक पुरावा अपुरा पडला, तिथे दैवी साक्षात्काराने हात दिला.

अगदी दुसऱ्या टोकाला म्हणजे आधुनिक काळातही सत्याच्या बंधनातून मुक्त होण्याची धडपड संपलेली नव्हती. आंद्रे मोर्वाचेच उदाहरण घेऊ. शॅलीच्या चरित्रांत (१९२३) मोर्वाने कल्पिताचा आधार घेतला होता. चरित्राला ' Life of Shelley- a romance ' असे त्याने म्हटले. पण अखेरीस त्यालाही आपला दृष्टिकोन बदलावा लागला. या बाबतीतली त्याची प्रतिक्रिया त्याच्याच शब्दात देणे योग्य होईल. ' एरिअलमधे शेलीने ज्या गोष्टींचा उच्चार कधीही केला नाही त्या गोष्टीचे श्रेय त्याला न देण्याचे स्वातंत्र्य मी घेतले, पण त्याचबरोबर आमच्याकडे असलेल्या त्याच्या पत्रातील अप्रत्यक्ष संभाषणांचे संवादात रूपांतर करण्याचे स्वातंत्र्यही मी घेतले. तसे मी पुन्हा केले नाही आणि ती पद्धतही मला पसंत नाही. त्या पद्धतीमुळे वाचकांचा विश्वास ढासळतो आणि शिवाय सदिच्छा बाळगूनही त्यात विचार विकलांग अथवा बेडौल होण्याचा नेहमीच धोका असतो.'[3]

वास्तविक १९३० च्या सुमारास हेस्केथ पियर्सन (Hesketh Pearson) लुईज मम्फर्ड (Leuis Mumford) यांच्या सारखे टीकाकार सत्याचे बंधन जरा सैल सोडावे असेच प्रतिपादन करताना आढळतात. चरित्रकाराने लहरी दैवाने जपून ठेवलेल्या घटितांच्या बंधनात स्वतःला जखडून घेऊ नये. चरित्र नायकाचा शरीर विच्छेदक होण्या ऐवजी त्याने मोकळ्या जागा खुशाल कल्पिताच्या आधाराने भरून काढाव्यात. ' He must be able to restore the missing nose in

---

2– Clifford, James. L. ' Biography as an Art ', Oxfort University Press, 1962. Introduction. P X.

3– Maurois, Andre. ' Ethics of Biography ', English Institute Annual 1942, Morning side Heignts, 1943, P. 16.

plaster, even if he does not find the original marble.'[४] असे स्पष्ट प्रतिपादन लुईज मंफर्ड यांनी केले होते. नाहीतरी प्रत्येक चरित्रकार उपलब्ध असलेल्या घटितांतून निवड ही करतोच मग व्यक्तिमत्त्वाला पूर्णता येणार असेल तर एक पाऊल पुढे टाकून मुळात नसलेला पुरावा तयार का करू नये ? असा प्रश्न आपल्या मताच्या समर्थनार्थ त्यांनी उपस्थित केला होता. काही काळ त्यांच्या मताचा प्रभाव पडला यात शंका नाही. पण अखेरीस आधुनिक चरित्रकारांना पुन्हा सत्याकडे वळावे लागले. कारण, निर्भीड सत्यदर्शनावरच चरित्राचे सामर्थ्य नि अस्तित्व अवलंबून आहे.

चरित्र म्हणजे व्यक्तिजीवनाचा इतिहास. आणि इतिहास म्हटला म्हणजे मग तो राष्ट्राचा असो किंवा व्यक्तिजीवनाचा असो, त्याचा संबंध जे घडले किंवा जे घडत आहे त्याच्याशी आहे. त्याचे विश्व प्रत्यक्षाचे कागदोपत्री पुराव्याने सिद्ध करता येणाऱ्या कृतिउक्तीचे. इतिहास व्यक्ती व घटनाया संबंधी बोलतो, स्थलकाल परिस्थितीचे सतत भान ठवतो, परंतु हे करताना त्याचे पाय जमिनीवर प्रत्यक्षात घट्ट रोवलेले असतात. तेव्हा प्रत्यक्ष जीवनात घडलेले प्रसंग तर चरित्रकाराला बदलता किंवा नाहीसे करता येत नाहीत. कारण, ती व्यक्ती त्याने समोर धरलेली असते. प्रत्यक्षाचे बंधन त्याला पाळावे लागते. व्यक्तीच्या जीवनातले प्रसंग, तिच्या कृतिउक्ती ज्या ज्ञात असतात त्या टिपून घेऊन रचना करावयाची. ते जीवन जसे घडले तसे त्याचे वस्तुनिष्ठ निवेदन करावयाचे; व्यक्तिविषयक सत्य अविकृत ठेवून, त्याचे सजीव दर्शन घडवायचे; एवढेच चरित्रकाराला करता येण्यासारखे आहे. चरित्रकाराला व्यक्तीचे जीवन आपल्या मनाप्रमाणे घडविता येत नाही. याबाबतीत चरित्रकार आणि इंजिन ड्रायव्हर या दोघामधे साम्य आहे. इंजिन ड्रायव्हरला आपल्या इच्छेप्रमाणे गाडी डावीकडे किंवा उजवीकडे वळविता येत नाही. गाडीची दिशा अगोदरच रेल्वेरुळांनी आखून दिलेली असते. गाडीचे काम रुळावरून धावण्याचे. ड्रायव्हरला गाडी फक्त थांबविता किंवा सुरू करता येण्यासारखे आहे. जन्म आणि मृत्यू ही मानवी जीवनाची दोन अज्ञात टोके. कारण ती जाणिवेच्या टप्प्यात येत नाहीत. जन्म आणि मृत्यू यांनी सीमित असलेल्या जीवनप्रवाहातून वेचलेले प्रत्यक्षाचे अवशेष बदलण्याचा अधिकार चरित्रकाराला नाही, किंवा प्रत्यक्षावर कल्पनेचे कलम करण्याचे स्वातंत्र्यही नाही. कथा, कादंबरी, नाटके इत्यादी ललितकृती व चरित्र यामधला मूलभूत फरक हा की, चरित्रलेखनावर प्रत्यक्षाचे बंधन असते. चरित्रलेखन सत्याच्या चौकटीतच झाले पाहिजे. चरित्र-काराला सत्याची लक्ष्मणरेषा ओलांडून कल्पनेच्या प्रांतात प्रवेश करता येत नाही. काटेकोर सत्य ही चरित्रलेखनाची प्रतिज्ञा होय.

---

4– Mumford, Lewis, 'The task of Modern Biography', English Journal 1934, XXIII, PP. 1–9.

चरित्राचे वर जे प्रकृती वैशिष्टय पाहिले, ते लक्षात घेता चरित्रकार जेव्हा चरित्र लिहायला बसतो, तेव्हा सत्य व्यक्तीचे, सत्य जीवन चित्रित करण्याचा संकल्प त्याने सोडलेला असतो, असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. कोणत्याही परिस्थितीत काल्पनिक जीवन वाचकांच्यावर लादण्याचा हक्क त्याला पोचत नाही. साहजिकच सर्जनशील कल्पनाशक्तीला किंवा प्रतिभेला त्या चित्रणात पूर्ण अवकाश मिळत नाही. चरित्रविषय व्यक्तीचे जीवन जसेच्या तसे चित्रित झाले, म्हणजे चरित्रात वास्तवता डोकावू लागते. इतर कुठल्याही साहित्य प्रकारापेक्षा चरित्राला वास्तवाचा अधिक फायदा मिळतो आणि त्यामुळेच ते चित्तवेधक होते. मूळ जीवनाचा कस जितका, तितके ते कमी प्रमाणात ओढ निर्माण करते. चरित्रातले वास्तव वाचकांच्या मनाची पकड घेते याचे कारण सत्य व्यक्तीचे सत्य जीवन जाणून घेण्याची जिज्ञासा हे होय. वस्तुनिष्ठ सत्याच्या पातळीवरून कल्पनेचा विचार केला म्हणजे त्यातला नकलीपणा जाणवू लागतो. चरित्रातले जीवनप्रत्यक्षाच्या पातळीवरून चित्रित होते आणि जेव्हा ते इतके वास्तव होते की, आपण जणू भूतकाळातल्या त्या व्यक्तीबरोबर प्रत्यक्ष जीवन जगत असल्याचा प्रत्यय वाचकांना येतो. तेव्हा त्या व्यक्ती जीवंत वाटतात. त्यांची सुखदुःखे वाचकांच्या मनाला भिडतात. चरित्रातल्या वास्तवतेपासून आशयाचे पाय अधांतरी उचलले जातात, तेव्हा ते चित्रण प्रत्यक्ष जीवनाशी विसंगत आणि म्हणूनच नकली, कृत्रिम वाटते. त्या चित्रणात लेखकाने काही एक कलात्मक पातळी गाठली असल्यामुळे कदाचित ते चित्तवेधक होईल, पण त्यात चित्रित झालेल्या व्यक्तींची सुखदुःखे वाचकांच्या मनात फार काळपर्यंत रेंगाळत नाहीत. विशेषतः अद्‌भुताचा पगडा असलेल्या चरित्रांच्या बाबतीत असा प्रत्यय आल्यावाचून राहात नाही. या उलट, बॉसवेलने लिहिलेले डॉ. जॉनसन्‌चे चरित्र घ्या. चरित्रातून व्यक्त होणारे जीवन प्रत्यक्षाशी जुळणारे, अकृत्रिम आणि म्हणूनच विलक्षण ओढ निर्माण करते. डॉ. जॉनसन्‌चा विक्षिप्तपणा, त्याचे दारिद्र्य, त्याच्यावर आलेल्या आपत्ती, संशोधन व लेखनकार्याकरिता त्याने केलेला अपूर्व स्वार्थत्याग आणि दाखविलेली युयुत्सुवृत्ती या गोष्टी वाचकांच्या मनात कायमचे, घर करून राहातात. '... this book is nothihg, if it is not a genuine slice of life.'[५] असे एडमंड गॉस यांनी आपल्या वडिलांच्या चरित्राच्या प्रस्तावनेत म्हटले आहे, ते अगदी योग्यच आहे. मात्र वास्तवता हा चरित्राचा एकमेव आधार असे समजण्याची आवश्यकता नाही. चरित्रातल्या वास्तव चित्रणाला सत्याच्या मर्यादेत का होईना कलात्मकतेची जोड मिळाली म्हणजे ते रेखीव

---

5– Gosse, Edmund, ' Father and Son ', William Heinemann, London 1907, Introduction, P. VI.

प्रमाणबद्ध होते आणि मग ते सखोल, सत्य चित्रण अधिक परिणामकारक होते यात शंका नाही.

वास्तव चित्रणाच्या संदर्भात लिट्टन स्टॅचीचे ' क्विनव्हिक्टोरिया ' हे चरित्र उल्लेखनीय आहे. टीकाकारांच्या मते स्ट्रॅचीच्या एलिझाबेथच्या चरित्रापेक्षा व्हिक्टोरिया राणीचे चरित्र अधिक यशस्वी होण्याचे कारण असे की, चरित्रकाराने वास्तव घटनेचा आधार घेऊनच ते चरित्र लिहिले आहे. व्हिक्टोरिया राणीचा काळ हा जवळचा असल्यामुळे त्या संबंधी भरपूर साधन सामग्री उपलब्ध होती, पण एलिझाबेथ राणीचा काळ बराच दूरचा असल्यामुळें लेखकाला कल्पितावर भर द्यावा लागला. त्याचा परिणाम असा झाला, की व्हिक्टोरिया राणीचे चरित्र जितके यशस्वी झाले, त्या मानाने एलिझाबेध राणीचे चरित्र यशस्वी होऊ शकले नाही. व्हिक्टोरिया राणी कल्पिताच्या अभावी जशी जिवंत वाटते, तशी इलिझाबेथ राणी वाटत नाही. व्हिक्टोरिया राणीचे चरित्र लिहिताना आपण अधिकृत घटनांचा आधार घेतला असे लेखकाने स्पष्ट म्हटले आहे. अर्थात वास्तव घटना व त्या संबंधीचे पुरावे यांना महत्व देण्यात लेखकाने चरित्र लेखनाचे मुख्य तंत्र पाळले यात मुळीच संशय नाही.

चरित्राचा वास्तवाचा आधार सुटला म्हणजे चरित्र कसे हीणकस ठरते, किंबहुना चरित्राचे अस्तित्वच कसे धोक्यात येते याचे उदाहरण म्हणून नागेश विनायक बापट यांच्या ' थोरले बाजीराव साहेब यांचे चरित्र ' या ग्रंथाकडे बोट दाखविता येईल. प्रा. श्री. ना. बनहट्टी लिहितात. ' हे चरित्र प्रसिद्ध झाले त्यावेळी फारच गाजले, आजच्या घटकेस मागील कालाचे निरीक्षण करण्याच्या नजरेतूनहि अनेक कारणास्तव ते सुटू शकत नाही. ह्या ग्रंथास दक्षिणा प्राइज कमिटीने बक्षिस दिले व कमिटीचे सेक्रेटरी रावजीशास्त्री गोडबोले व इतर परिक्षक यांची त्यावर मुरकुंडी वळली परंतु आधुनिक वाङ्मय विवेचक चरित्र कसे नसावे हे दाखवायचे झाल्यास, निखालस या पुस्तकाकडे बोट दाखवील. हे पुस्तक केवळ कल्पना देवीच्या प्रसादाचे फळ आहे. अनैतिहासिकता, कल्पनाममत्व या दोषाबरोबरच चरित्रनायकास सर्वगुणसंपन्न अशी दिव्य विभूति कल्पिण्याचा अनुचित प्रकार प्रस्तुत पुस्तकात केला असल्यामुळे व अवास्तव, कृत्रिम व अलंकारिक वर्णनांच्या अवडंबरात चरित्र नायकाचा जीवन वृत्तांत गुरफटून टाकला असल्याकारणाने यास चरित्रग्रंथाच्या रांगेत स्थानहि देऊ नये, असे कोणी म्हटल्यास ते वावगे होणार नाही.'[६] प्रा. बनहट्टी यानी या ग्रंथाच्या संबंधी घेतलेली शंका अगदी रास्त आहे. कल्पिताचा आधार घेतल्यामुळे प्रस्तुत ग्रंथाचे चरित्र म्हणून अस्तित्वच संपुष्टात आले आहे

६– प्रा. बनहट्टी श्री. ना., ' आर्वाचीन मराठी साहित्य ', (१८७५ ते १९३१) संपादक नेने, वि. पा. बडोदे, १९३५, पृ. २७०.

या चरित्राला चरित्रपर कादंबरीचा घाट कसा प्राप्त झाला आहे. यासंबंधीचे सविस्तर विवेचन पुढच्या प्रकरणात येणार असल्यामुळे तूर्त एवढी नोंद पुरे.

सत्य हा कथा, कादंबरी, नाटके इत्यादी ललितकृतींहून चरित्राचे वेगळेपण सिद्ध करणारा मूलभूत घटक आहे. चरित्रातले सत्य हरपले तर चरित्राचे अस्तित्वच संपुष्टात येते. चरित्र आपले सत्त्व हरवून अन्य कृतीत विलीन होते. एकतर चरित्राची कादंबरी होते किंवा चरित्रपर कादंबरीचा मार्ग मोकळा होतो. चरित्राचे अस्तित्त्व टिकवून धरावयाचे असेल तर चरित्रातले सत्य टिकविले पाहिजे. 'कथा हे एक व्यक्तीचे अथवा सर्वसाधारणपणे मानवी स्वभावाचे चित्र आहे. ते जर खोटे असेल, तर ते कशाचेच चित्र नव्हे. तेव्हा चरित्रकाराने, जोपर्यंत आपल्याला शक्य आहे तोपर्यंत पूर्णपणे, बिनशर्तपणे सत्यनिष्ठ असलेच पाहिजे.'[७] या डॉ. जॉनसनच्या प्रतिपादनातून वर नमूद केलेल्या मूळ वस्तुस्थितीवर प्रकाश पडतो.

चरित्रात सत्याचा आग्रह धरला जातो, त्याचे वाङ्मयीन कारण वर पाहिले. आता वाङ्मयबाह्य कारणे पाहू. वाङ्मयबाह्य हा शब्द मुद्दामच वापरला. कारण इथे चरित्रातल्या वास्तवाचा जो विचार करावयाचा आहे, तो वाचकांच्या दृष्टीने. चरित्रवाचनात आपण रस का घेतो ? या प्रश्नाची उत्तरे शोधू पाहाता जीवन विषयक कुतूहल हे एक कारण सापडते. चरित्राच्या वाचकांना शैलीतील शिथिलता एक वेळ खपेल, नको तिथे चरित्रकार डोकावलेलाही परवडेल, तपशीलाचे रूक्ष निवेदनही चालेल, पण जाणिवपूर्वक सत्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न मात्र मानवणार नाही. समोर असलेले चरित्र विश्वसनीय आहे, याची वाचकांना सतत खात्री पटावी लागते. वाचक चरित्राकडून सत्याची अपेक्षा करतात याचे कारण सत्य व्यक्तीचे सत्य जीवन त्यांना जाणून घ्यावयाचे असते. विशिष्ट व्यक्ती विशिष्ट परिस्थितींत कशी वागली, परिस्थितीने चरित्र नायकाची कशी ससेहोलपट केली, प्राक्तन त्याने कसे भोगले किंवा परिस्थितीशी दोन हात करताना त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा कस कसा लागला, इत्यादी गोष्टी वाचक मोठ्या उत्सुकतेने वाचत असतो. कारण, चरित्रनायकाच्या जीवनाबद्दल वाचकांना एक प्रकारचे कुतूहल, जिज्ञासा, औत्सुक्य असते. आणि त्यातही खाजगी जीवनाबद्दल फारच. Biography differs from imaginative literature in that readers come to it primarily in search of information '[८] असे बर्नार्ड डी व्होटो यांनी म्हटले आहे ते याच अर्थाने.

---

7– Drew, Elizabeth. 'Enjoyment of Literature', Cambridge 1935, P. 83.

8– Devoto, Bernard. 'The Skeptical Biographer', Harper 's Magazine, January 1933, Volume 166, P. 183.

चरित्रातल्या वास्तवाची ही बैठक लक्षात घेतली म्हणजे या प्रश्नाची आणखी एक बाजू लक्षात येते. व्यक्तिजीवनविषयक जिज्ञासेपोटी मानवी जीवनाचे नेमके स्वरूप समजावून घेण्याची, मानवी स्वभावाचे कोडे उलगडण्याची इच्छा दडलेली असते. मानवी जीवनाचे नेटके स्वरूप एका दमात आवाक्यात येणं कठीण असते. आणि म्हणूनच मनाला धक्का देणाऱ्या, थक्क करून सोडणाऱ्या प्रत्येक अनुभवाबरोबर, घ्यावा तितका अनुभव थोडाच असे आपण मधून मधून म्हणत असतो. अनुभवाची कक्षा जसजशी रूंदावते तसतशी आपली जीवनविषयक जाण व्यापक होते. आपली जीवन विषयक जाणीव सखोल आणि व्यापक व्हावी म्हणून इतरांच्या चरित्रात वा जीवनात आपण डोकावून पाहातो. कारण चरित्रनायक प्रगतीच्या धोरणाने जीवनाचा शोध घेत असतो. आणि आपणही आपल्या परीने जीवनाचा शोध घेत असतो. सर्वसाधारण अनुभव असा आहे, की बालपणी, तारुण्यात ध्येयाचा विपर्यास करणाऱ्या भिंगातून जीवनाकडे पाहाण्याची प्रवृत्ती असते. वास्तवाचे चटके बसू लागले म्हणजे मग आपल्याला पूर्वीचे दृष्टिकोन बदलणे भाग पडते. हा जो सातत्याने चालणारा जीवनाचा शोध तो चरित्रविषय व्यक्तीला मानवी गुण चिकटवितो. ' चरित्र भूतकाळाला मानवी-रुप देते आणि त्याचबरोबर प्रत्यक्ष जीवनात फारच थोडयांच्या अनुभवाला येणाऱ्या जीवनाचे पूर्णपणे, ठळकपणे दर्शन घडवून वर्तमानकाळ समृद्ध करते.'[९] या ॲलन नेव्हीन्झ (Allan Nevins) यांच्या प्रतिपादनातून चरित्रवाचनाकडे वाचकांचा ओढा का असतो या प्रश्नाचा उलगडा होत नाही, असे कोण म्हणेल ?

' As gold which he cannot spend will make no man rich, so knowledge which he cannot apply will make no man wise '[१०] या विधानातून डॉ. जॉनसनने या प्रश्नाच्या व्यावहारिक बाजूवर नेमके बोट ठेवले आहे. मानवी जीवनाचे स्वरुप जसजसे ध्यानी येत जाते, मानवी स्वभावाचे कोडे जसजसे उलगडत जाते, तसतशी जगण्याची कला हस्तगत होत जाते. चरित्र-नायकाच्या जीवनापासून प्राप्त झालेल्या मार्गदर्शक अनुभूतीचा वाचकाला प्रत्यक्ष जगताना उपयोग होतो. चरित्रनायकाच्या जीवनप्रकाशात मानवी जीवनाचे अंधारे कोपरे तर वाचक धुंडाळून घेतोच; पण त्या प्रकाशात त्याच्या स्वतःच्या जीवनाचाही मार्ग उजळून निघतो. हा चरित्राचा वाचकांवर होणारा परिणाम

---

9– ' Nevins, Allan. ' The Gateway to History ', D. Appleton Century 1938, P. 319.

10– Johnson, Samuel. Idler, No. 84, 24 November 1759. Also reprinted by Clifford, James. L. ' Biography as an Art ', Oxford University Press, 1962, P. 44.

म्हणता येईल. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली म्हणजे, 'Biography is almost as necessary to human life as life is to biography'[११] हे मार्स्टन बॉल्च- (Marcton Balch) यांचे विधान अर्थपूर्ण वाटते.

पांगारकरांनी आपल्या आत्मचरित्राला 'चरित्रचंद्र' हे मोठे सूचक आणि समर्पक नाव दिले आहे, त्यातून चरित्राचा वाचकांवर होणारा परिणाम यथार्थपणे व्यक्त होतो, 'चंद्राला पाहून सागराला भरती येते, चकोर व कुमुदिनी यांचा संकोच जाऊन त्यांना प्रफुल्लितपणा येतो, चंद्रकांत मण्याला पाझर फुटतो, व हा परोपकार घडत असतांना चंद्राच्या प्रकाशात काही कमतरता येत नाही.'[१२] स्वत: पांगारकरांवर डॉ. जॉनसनच्या चरित्राचा झालेला परिणाम याहून वेगळा आहे, असे म्हणता येईल काय? आत्मचरित्राला लिहिलेल्या प्रस्तावनेतील त्यांचे पुढील आत्मनिवेदन पाहा : 'वेब्स्टरची डिक्शनरी चाळीत असतांना तिला जोडलेले वेब्स्टरचे चरित्र माझ्या वाचण्यात आले. तत्पूर्वी डॉ. जान्सनचे बॉस्वेलने लिहिलेले चरित्र वाचण्यात आले होते. त्यामुळे दारिद्र्यांत वाढलेल्या मनुष्यालाही डोके वर काढता येते असा उत्साह मनात भरला व परिस्थितीशी झगडण्याचे धैर्य अंगी आले.'[१३] डॉ. जॉनसनच्या चरित्रापासून इतर अनेक वाचकांप्रमाणे पांगारकरांनाही स्फूर्ती मिळावी हे अगदी स्वाभाविक आहे. चरित्रनायकाच्या जीवनात डोकावून पाहिले म्हणजे कधी धीर येतो, खचलेली हिम्मत पुन्हा बळकट होते, कधी उत्तेजन मिळते, तर कधी उन्नतीचा मार्ग आढळतो, ही खरी वस्तुस्थिती आहे. चरित्राच्या वाचनात वाङ्मयीन मनोरंजनापेक्षा काहीतरी अधिक आहे. 'चरित्राच्या वाचनामुळे धीर येतो, सहानुभूती व्यापक बनते स्वार्थ दूर केला जातो आणि महत्त्वाकांक्षा वाढते.'[१४] या ॲसक्वीथ (Asquith) यांच्या विधानातून चरित्रलेखनाची प्रेरक शक्ती त्यांनी मान्य केली आहे.

चरित्राचे जीवनदर्शनाचे सामर्थ्य त्यातल्या आशयावर अवलंबून असते. मानवी जीवनातली वास्तवता, त्या जीवनाचे मूल्य या संबंधीचे प्रत्येकाचे जे अंदाज असतात त्यावर प्रत्येकाची आवड अवलंबून असते. चरित्रे आपल्याला आवडतात

---

11- Balch, Marston. 'Modern Short Biographies and Autobiographies', Harcourt, Brace and Company 1939, Introduction, P. 1.

१२- पांगारकर ल. रा. 'चरित्र चंद्र म्हणजेच पांगारकरांचें आत्मचरित्र', १९३८, पृ. १२-१३.

13- Ibid., P. 12-13.

14- Nevins, Allan. 'The Gateway to History', D. Appleton Century, 1938, P. 319.

याचे कारण जीवन हीच खरी वास्तवता आहे, याची आपल्याला जाणीव झालेली असते. आणि म्हणूनच ते जीवन जाणून घेताना चरित्रातल्या आशयाचा सच्चेपणा आपण पारखून घेतो, सत्यकथनाची अपेक्षा करतो. चरित्रातल्या घटना आणि विधाने सत्य आहेत, अशा श्रद्धेने विश्वासाने वाचक चरित्र वाचत असतो. त्याची ही श्रद्धा जोपर्यंत टिकून असते तोपर्यंत चरित्राच्या वाचनात तो रस घेतो. चरित्र-वाचनाचा वाचकांचा हेतू आणि त्या वाचनाचा वाचकांवर होणारा परिणाम या दोन्ही गोष्टी साध्य होणे तेव्हाच शक्य आहे, जो जेव्हा व्यक्तिचित्रणाची इमारत सत्याच्या भरभक्कम पायावर उभी राहाते. चरित्रातले चित्रण शक्य तितके वस्तु-निष्ठ आणि वास्तव असावे ते एवढ्याकरिताच.

चरित्राला सत्याचे अधिष्ठान असावे, हे मत या विषयाच्या अभ्यासकांपैकी बहुतेक विचारवंताना आता मान्य झालेले आहे. तेव्हा चरित्रातल्या सत्याचे स्वरुप समजावून घेणे पुढच्या विवेचनाच्या दृष्टीने सोयीचे ठरेल. चरित्रनायकाचे विचार, त्याच्या कृतिउक्ती, आणि व्यक्तिविशेष यांच्या संकलित परिणामातून चरित्र-नायकाच्या जीवनाची ओळख पटवून देणारे, प्रत्यक्षात तो कसा होता याचा प्रत्यय आणून देणारे ते चरित्रातले सत्य. चरित्र ही नायकाच्या प्रत्यक्षातील जीवनाची पुर्निर्मिती असते. नायकाच्या जीवनातील घटिते जशी त्याच्या जीवनात प्रत्यक्षात संघटित झालेली असतात, तशी ती चरित्रातून संघटित झाली म्हणजे त्याचे व्यक्तिदर्शन यथार्थपणे घडविता येते. चरित्रनायक जसा होता तसा तो वाचकांच्या डोळ्यापुढे उभा राहावा, म्हणून त्याचे जीवन जसे घडत गेले तसे ते चरित्रात चित्रित झाले पाहिजे. याचाच अर्थ असा, की चरित्रातले सत्य हे ऐति-हासिक सत्याप्रमाणे प्रत्यक्षाशी जुळणारे असते त्या दृष्टीने पाहिले तर चरित्र ही चरित्रविषयक व्यक्तीच्या जीवनाची कार्बन कॉपी ठरते.

चरित्र ही चरित्रविषयक व्यक्तीच्या जीवनाची कार्बनकॉपी असे जरी वर म्हटले, तरी त्याचा अर्थ असा नव्हे, की चरित्रापासून पूर्ण सत्याची अपेक्षा करावी. सत्य ही दुर्मिळ चीज आहे. पूर्ण सत्याची अपेक्षा करणे तसे धाडसाचे आहे. व्यक्तिविषयक सत्य हाती येणे मूळातच कठीण काम आहे. आणि त्याची यथायोग्य अभिव्यक्ती हे त्याहूनही कठीण आहे. 'The truth about man as about things, is difficult to discover and when discovered it is no less difficult to preserve.'[१५] हे सेंटब्यूव्ह या सुप्रसिद्ध चरित्रकाराचे विधान या प्रश्नांचा विचार करतांना दृष्टिआड करून चालणार नाही वास्तवाच्या अतिरिक्त कल्पनेने कधीकधी चरित्रातून पूर्ण

---

15– White, Newman, I 'The Development, Use and Abuse of Interpretation in Biography' English Institute Annual, 1982, P. 56.

सत्याची अपेक्षा केली जाते. चरित्रातून सत्य व्यक्त व्हावे; केवळ पूर्ण सत्य व्यक्त व्हावे; आणि सत्याहून अधिक काही व्यक्त होऊ नये; असे म्हणणे सोपे आहे. परंतु प्रत्यक्षात पूर्ण सत्य हाती येणे ही अशक्यप्राय गोष्ट आहे चरित्राचे लेखन बाहेरून केलेल्या निरीक्षणाच्या आधारे होते. आकाश आणि समुद्र यांच्यापेक्षाही अथांग आणि अजब चीज जर जगात कोणती असेल तर ती मनुष्याचे मन ही होय. त्या मनात सत्याचा अतिमहत्त्वाचा भाग दडलेला असतो. चरित्रनायकाचा पोषाख, त्याचे बोलणे, चालणे यासंबंधी माहिती एकवेळ सहज मिळू शकेल, पण त्याच्या अंतर्मनाचा वेध घेणे वाटते तितके सोपे नाही. मनाच्या सांदीकोपऱ्यात दडून राहिलेले एखादे सत्य कधीच प्रकट होत नाही. ते त्या व्यक्तिबरोबरच अखेरीस नष्ट होते. महत्त्वाकांक्षा, स्वार्थत्याग, उदारपणा वा सूडबुद्धी यासंबंधीचे त्याच्या मनातले वादळ, त्याच्या आजाराची वा प्रकृती सुधारणेची मानसिक कारणे, त्याच्या व्यक्तिमत्त्वातील बऱ्यावाईट घटकांचे सामर्थ्य आपल्याला कितीसे ठाऊक असते ? नायकाच्या दैनंदिन जीवनातील अपघात आणि संघर्ष चरित्रकाराला ठाऊक असण्याची शक्यता आहे. परंतु त्या संघर्षाला तोंड देण्यास समर्थ करणाऱ्या आंतरिक प्रेरणांचे काय ? चरित्रनायकाला स्वतःलाच अशा प्रश्नाचे उत्तर सापडण्याची शक्यता कमी असते. कारण, नंतरच्या आयुष्यात काळाच्या ओघात गतकालीन स्मृती एकतर पुसल्या तरी जातात किंवा जे काही घडते त्या संबंधीच्या आठवणींना विकृत स्वरूप प्राप्त होते. खुद्द बॉसवेलला जॉनसनची शेकडो पत्रे उपलब्ध होऊ शकली, त्याच्याशी असंख्य वेळा संभाषण करण्याची, त्याचे विचार समजावून घेण्याची संधी मिळाली. तथापि जॉनसन दिव्यांच्या खांबांना स्पर्श करून पावले का मोजत असे, हे सांगता आले नाही. कादंबरीकारा-प्रमाणे चरित्रकाराला नायकाच्या मनात डोकावून पाहून तिथे होणाऱ्या हालचाली बाहेरून टिपता येत नाहीत. यातच चरित्राची असमर्थता आहे. चरित्र कादंबरीशी बरोबरी का करू शकत नाही, त्याचेही हे एक कारण आहे. अशा परिस्थितीत चरित्रकार फक्त अनुमान करू शकतो. पण अनु-मानालाही पुरेशा पुराव्याचे पाठबळ असावे लागते. चरित्रात पूर्ण सत्याचा आग्रह धरणे कसे चुकीचे आहे यासंबंधीचे मार्क ट्वेनचे प्रतिपादन ग्राह्य वाटते : ‘ व्यक्तीचे शब्द आणि कृती त्याच्या जीवनाचा किती अल्पसा भाग आहे ! त्याचे खरेखुरे जीवन तो डोक्यात जगत असतो आणि ते त्यालाच फक्त ठाऊक असते. प्रत्येक दिवशी सबंध दिवस त्याच्या मेंदूची चक्की पिसत असते, त्याचा इतिहास म्हणजे अन्य गोष्टी नसून त्याचे विचार हेच होत... त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा बराचसा भाग दडलेला असतो. हा दडलेला भाग आणि त्याचा ज्वालामुखीचा अग्नी उकळतो, हेलकावे खातो आणि रात्रंदिवस कधीच शांत होत नाही. ह्या गोष्टी म्हणजेच त्याचे जीवन आणि त्या लिहिल्या जात नाहीत, लिहिता येणे शक्य नाही. चरित्रे

म्हणजे व्यक्तीचे कपडे आणि त्यावरची बटणे व्यक्तीचे स्वतःचे असे चरित्र लिहिता येणे शक्य नाही.'[१६]

चरित्रातच काय पण शास्त्रीय सिद्धांतातही पूर्ण सत्य असेलच असे नाही. शास्त्रीय सिद्धांत कित्येकदा ज्ञात घटकांच्या आधाराने बसविलेला असतो. त्यातले अज्ञात घटक ज्ञात झाले म्हणजे तो सिद्धांत पुन्हा तपासून घ्यावा लागतो आणि मग त्याचे रूप पालटते. इतिहासाचेही असेच आहे. काही विधानांवर प्रकाश टाकणारा नवीन अस्सल पुरावा उपलब्ध झाला म्हणजे ती विधाने तपासून घ्यावी लागतात वा फिरवावी लागतात. इतिहासाकडून, शास्त्राकडून जिथे पूर्ण सत्याची अपेक्षा करता येत नाही, तिथे चरित्राकडून मात्र पूर्ण सत्याची अपेक्षा का करावी ? चरित्रनायकाच्या जीवनाची एखादी बाजू नव्याने प्रकाशात आली म्हणजे त्याचे चरित्र पुन्हा लिहून काढावे लागण्याची शक्यता निर्माण होते, ही वस्तुस्थिती खरी नव्हे काय ? थोडक्यात म्हणजे चरित्रात पूर्ण सत्याचा आग्रह धरणे, हे सर्वस्वी योग्य नव्हे.

चरित्रात जर पूर्ण सत्याची अपेक्षा करता येत नसेल तर मग चरित्रात नेमके किती सत्य व्यक्त व्हावे ? असा एक प्रश्न येथे उपस्थित होतो. या प्रश्नाचे चटकन देता येण्यासारखे उत्तर असे आहे, की पूर्ण सत्य अशक्य आहे हे जाणूनही चरित्र-काराने शक्य तितके सत्य हस्तगत करण्याची पराकाष्टा केली पाहिजे. चरित्रकार हा सत्य घटनांनी बांधला गेला आहे आणि म्हणूनच चरित्रनायकासंबंधी जेवढ्या जेवढ्या सत्य गोष्टी त्याला जमा करता येणे शक्य आहे. तेवढ्या तेवढ्या गोष्टीवर त्याचा हक्क आहे. चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे पूर्ण आकलन झाल्याशिवाय त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे यथार्थदर्शन ते कसे घडविता येईल ? चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे आकलन व्हावे; त्याचे व्यक्तिदर्शन यथार्थपणे व्हावे; म्हणून चरित्रकाराने नायकाच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारी समग्र उपलब्ध घटिते आणि तद्द्वारा व्यक्त होणारे सत्य उपयोगात आणावे. चरित्रविषय व्यक्ती वाच-कांच्या डोळ्यापुढे ठसठशीत उभी राहावी म्हणून तिच्या व्यक्तिमत्त्वाची बांधणी करणारी, कृतींवर परिणाम साधणारी, आणि आत्मविकास घडविणारी घटिते चरित्रकाराने विचारात घेणे आवश्यकच आहे. व्यक्तिदर्शी घटितांच्या द्वारे जितके अधिक सत्य व्यक्त होईल, तितके ते यथार्थदर्शनास पोषकच ठरते. अधिकाधिक व्यक्तिदर्शी घटिते उपलब्ध व्हावीत म्हणून शक्य तितकी साधने उपयोगात आणली पाहिजेत. कोणत्याही साधनाची उपेक्षा होता कामा नये. कारण, केव्हा केव्हा अनपेक्षितपणे एखादे साधन, चरित्रनायकाच्या जीवनावर प्रकाश टाकणारे एखादे उपाख्यान किंवा पुराव्याचा काही भाग उपलब्ध होण्याची शक्यता असते. अशा

16– Ponsonby, Arthur. ' Casual Observations ', George Allen and Unwin Ltd , 1930. P, 101.

रीतीने सगळ्या सामग्रीचा उपयोग करून उपलब्ध झालेल्या सत्याच्या आधारे चरित्राची इमारत उभी राहाते.

सत्य हे चरित्राचे जीविततत्व असल्यामुळे चरित्रविषय व्यक्तीचे प्रत्यक्षातले जीवन आणि चरित्रात होणारी त्याची पुनर्निर्मिती यामधे अविकृत संबंध प्रस्थापित होणें अपरिहार्य आहे. चरित्रातल्या आशयाशी, सत्याशी इमान राखणे फार मोठे दिव्य आहे. केव्हा, केव्हा लेखकांना अन्य मोह पडतात. या ना त्या कारणास्तव चरित्रकार सत्य सांगायला कचरतो एक तर लपवाछपवी होते किंवा सत्याला मुरड घातली जाते. बहुधा चरित्रकाराची दृष्टी कोणत्या ना कोणत्यातरी अभिनिवेशाने कललेली असते. परिणाम असा होतो की, सत्य विकृत स्वरुपात जगापुढे ठेवले जाते. आणि मग अपरिपक्व कृति जन्म घेतात. अभिनिवेश हा चरित्रलेखनातला मुख्य दोष होय. अभिनिवेश अनेक प्रकारचे असतात. ते असे

१) कौटुंबिक नात्यामुळे येणारा पक्षपात, गुणदोषांविषयी कोत्या समजुती व समर्थने ज्यात येतात तो कौटुंबिक अभिनिवेश.

२) ज्यात अनिर्बंध विभूतिपूजा असते, मृताचा अतिरिक्त गौरव असतो—तो विभूतिपूजा— अभिनिवेश.

३) ज्यात नीतीचे अवास्तव स्तोम माजवले जाते तो नैतिक अभिनिवेश.

४) पारंपारिक सामाजिक प्रतिष्ठांना व मूल्यांना ज्यात अवास्तव प्राधान्य दिले जाते तो सार्वजनिक अभिनिवेश. मराठी चरित्रात आढळून येणारा सांप्रदायिक अभिनिवेश सार्वजनिक अभिनिवेशातच मोडतो.

५) ज्यात ऐतिहासिकता राखण्याची भावना व पद्धती नायकाचे सारे व्यक्तिमत्व नष्ट करते तो ऐतिहासिक अभिनिवेश.

६) धर्म प्रसाराच्या प्रेरणेतून जो चरित्रात डोकावतो, तो धार्मिक अभिनिवेश.

काही वेळा अभिनिवेश एकमेकांच्या प्रांतावर अतिक्रमण करतात. परंतु प्रत्येक अभिनिवेशाचे स्वतःचे असे वैशिष्ट्य आहेच.

सत्य निर्भीडपणे सांगणे हे चरित्रकाराचे ब्रीद होय. पण प्रत्यक्षात मात्र होते असे की, चरित्रकाराला नायकाच्या कुटुंबियांची भीड पडते. थोरामोठ्यांच्या संबंधी त्याच्या आप्तांच्या भावना किती तीव्र असतात, त्यांची मनोवृत्ती नेमकी कशी असते, याचा Raleigh News and Observer चे संपादक जोसफ डॅनयल (Josephus Daniels) यांनी निवेदन केलेल्या पुढील गमतीदार हकीकतीवरून उलगडा होईल. उत्तर करोलिनाच्या न्यायाधिशाच्या जागेसाठी उमेदवारी करणाऱ्या गृहस्थाच्या पत्नीला प्रसिद्धीसाठी फोटो पाठविण्यास सांगितले असता तिने मधुचंद्राला जाताना, जेव्हा पतीच्या डोक्यावर विपुल केस होते आणि तुळतुळीत दाढी केलेली असे त्यावेळचा फोटो पाठविला. वास्तविक उमेदवारीच्यावेळी तिच्या पतीचे डोके बिलिअर्ड बॉलसारखे तुळतुळीत झाले होते. मिशांवर करडा रंग

चढला होता. त्यावेळी तो फोटो छापला गेला असता तर मतदारांनी उमेदवाराला ओळखलेच नसते.

मोठ्या माणसाच्या मृत्यूनंतर त्याचे जीवन चरित्र लिहिताना उजळभाग ठसठशीत रेखाटला जाऊन वैगुण्ये झाकली जावीत अशी अपेक्षा त्याच्या कुटुंबियांनी करावी हे मनुष्य स्वभावाला धरूनच आहे. अगदी जाणत्या माणसांचीही प्रवृत्ती आपल्या मृत आप्तांचे चरित्र लिहिण्याचे काम वस्तुनिष्ठ पद्धतीने लेखन करणाऱ्या चरित्रकाराकडे न सोपविता ज्याला प्रतिकूल सत्य दडपून टाकण्याचा मोह होईल, अशा अकुशल परंतु कुटुंबनिष्ठ नातेवाईकाकडे सोपविण्याची असते. समजा बाहेरच्या माणसाकडे हे काम सोपविले गेलेच, तर संबंधितांच्या भावना दुखावल्या जाण्याची सबब पुढे करून त्याच्या स्पष्टवक्तेपणाला प्रतिबंध केला जाण्याचीच शक्यता अधिक. चरित्रनायकाच्या आप्तांची भावनेच्या ओलाव्यामुळे कटू सत्याचे जसेच्या तसे स्वागत करण्याची मानसिक तयारी नसते, ही याबाबत फार मोठी अडचण आहे.

प्रेमापायी म्हणा, किंवा चरित्रनायकाबद्दल वाटणाऱ्या आत्मीयतेमुळे म्हणा विदारक सत्य पचविण्याचे सामर्थ्य आप्तांच्या अंगी असू नये हे स्वाभाविक आहे, पण परक्या चरित्रकाराचे तसे नसते. पडद्यावरचे जीवन दाखविणाऱ्या सिनेमा ऑपरेटरचा त्या जीवनाशी जेवढा संबंध तेवढाच चरित्रकाराचा नायकाच्या जीवनाशी असतो. वास्तविक कुणाच्याही रागालोभाचा मुलाहिजा न ठेवता केवळ सत्य कथन करणे हे त्याचे ब्रीद. पण कधी कधी चरित्रकाराला आप्तांच्या भावना जपण्याचा मोह सुटत नाही, त्यात तो गुरफटतो, त्याची तटस्थाची भूमिका ढळते आणि परिणामत: सत्याचा विपर्यास होतो. चरित्रकार पत्नी, पुत्र, मित्र. नातेवाईक यांच्या भावनांना जपताना तर आढळतोच, पण त्यातही विधवेच्या अश्रूंनी तो पार विरघळतो. अशा परिस्थितीत विधवा चरित्रकाराच्या मार्गातला एक मोठा अडथळा ठरते. विधवा सत्यकथन टाळावे अशी अपेक्षा करते ही याबाबत मुख्य अडचण नसून तिचे सत्य हे ज्या वस्तुनिष्ठ वास्तवात जग रस घेते त्याहून वेगळे असते. ही आहे. चरित्रकार विधवेच्या भावना दुखवू नये म्हणून सत्यकथनास कसा कचरतो याचे उदाहरण कै. शंकरराव मजुमदारांनी लिहिलेल्या अण्णासाहेब किर्लोस्करांच्या चरित्रात आढळते. विविध ज्ञान विस्तारमध्ये या चरित्रावर लिहिलेल्या परीक्षणात श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी सत्य दडविण्याच्या प्रकारावर प्रकाश टाकला आहे. ते लिहितात, : 'अण्णासाहेब बरेच विषयी असावेत असे दिसते. याविषयी आम्ही एक आख्यायिका ऐकिली आहे, ती प्रस्तुत चरित्रात कोठे दिसली नाही. ती अशी– पूर्ववयात अण्णासाहेबांनी आपल्या स्वभावास अनुसरून एक नाटक मंडळी थाटली होती. ज्या गावी त्या मंडळीचा मुक्काम होता ते गाव काही आकस्मिक कारणामुळे रात्रीचे रात्री सोडून परत

गावी येण्यास अण्णासाहेबांस निघावे लागले. ज्या गावाहून ते निघाले त्या गावी त्यांनी एक प्रियपात्र संपादन केले होते. त्यांनी प्रयाण केल्यावर लागलीच त्या प्रिय पात्रानेही मर्दानी वेष चढवून त्यांचा पाठलाग सुरू केला. मार्गात एक नदी लागली. तिच्या पैलतीरास अण्णासाहेब जाऊन पोहोचतात, तोच त्यांचे प्रियपात्र अलीकडील तीरास येऊन थडकले. आपल्या प्रियकरणीने आपणाकरिता केवढें साहस केले हे कळताच अण्णासाहेबांनी उपदेशपर शब्दांनी तिचे समाधान करून तिची परत बोळवण केली. ही आख्यायिका अण्णासाहेबांच्या कुटुंबाचे मन दुखवू नये, याच हेतूने चरित्रकारांनी गाळली असावी असे पृ. २०० मध्ये, त्यांनी अण्णासाहेबांच्या थट्टेखोरपणाची जी आख्यायिका दिली आहे, तिजवरून उघड होते. कदाचित् चरित्रनायकास लांछन येईल या भीतीने त्यांनी हा भाग वगळला असावा...'[१७]

कधी कधी चरित्रनायकाच्या कुटुंबातील एखादी व्यक्ती किंवा स्वत: विधवाच चरित्रलेखनाचे काम आपल्याकडे घेते. अशा चरित्रकारांना रक्ताच्या नात्यामुळे चरित्रकाराचा प्रत्यक्ष सहवास लाभतो. ते जीवन त्यांच्या डोळ्यापुढूनच घडून गेलेले असल्यामुळे त्या जीवनाबद्दलचा सूक्ष्म तपशील उपलब्ध होतो. अर्थातच् अशा चरित्रातून नायकाच्या प्रापंचिक जीवनाचे यथार्थ दर्शन घडावे. लक्ष्मीबाई टिळकांचे स्मृतिचित्रे, रमाबाईचे, न्यायमूर्ती रानड्यांचे चरित्र आणि इंदिरा भागवतांचे 'या सदाशिव' ही चरित्रे या संदर्भात उल्लेखनीय होत. पण त्याचबरोबर चरित्रकाराला रक्ताच्या नात्यामुळे सत्यदर्शनासाठी आवश्यक ती तटस्थाची वृत्ती टिकवून धरता आली नाही, म्हणजे चरित्रात कौटुंबिक अभिनिवेश डोकावतो. विधवा, नायकाच्या सार्वजनिक जीवनाबद्दल लिहू लागली म्हणजे बहुधा अपुऱ्या माहितीमुळे गूढ तरफदारी वाचायला मिळते. डोंगराप्रमाणे माणूसही दुरून अगदी पूर्णपणे न्याहाळता येतो. कारण, परक्या चरित्रकाराची दृष्टी भावनिक असण्याचे कारण नाही. शिवाय, चरित्रविषय व्यक्तीच्या जीवनाकडे दुरून तटस्थ वृत्तीने पाहिल्यामुळे सत्यशोधक दृष्टी प्राप्त होते. चरित्रनायकाबद्दल वाटणारा जिव्हाळा किंवा आत्मीयता या पासून चरित्रातल्या सत्याला नेहमीच धोका असतो. चरित्रविषय व्यक्तीच्या प्रत्यक्ष प्रभावामुळे तिचे व्यक्तिमत्त्व जे चरित्रकाराच्या मनात आकार घेत असते त्यावर परिणाम होतो, आणि तटस्थाची वृत्ती अवघड बनते. प्रभावी व्यक्तिमत्त्व असलेल्या चरित्रनायकाच्या सहवासात अलिप्ततेची जाणीव होणे तितकेसे सोपे नाही. वास्तविक 'या सदाशिव' हे मराठीतले एक उत्तमपैकी चरित्र आहे. पण इंदिराबाई भागवतांना जेव्हा तटस्थाची

१७– खांडेकर, वि. स. माडखोलकर, ग. त्र्यं. खानोलकर, गं. दे., 'कोल्हटकरांचा लेखसंग्रह,' १९३२, पृ. २४५. मूळ लेख, 'अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे चरित्र,' विविध ज्ञानविस्तार, पृ. २६, अंक ८, १९०५.

वृत्ती राखणे अवघड झाले, तेव्हा चरित्राला कौटुंबिक अभिनिवेशाचे गालबोट लागले. चरित्राच्या (पृष्ठ १२५) वर इंदिराबाई म्हणतात. 'त्यांची राहणी साधी होती' व लगेच पुढे या साध्या राहाणीचे त्यांनी केलेले स्पष्टीकरण आढळते. ते असे 'पण तिच्यातच त्यांचं वैशिष्टय होतं. कारण एकच प्रकारचा पोशाख ते कधीच करीत नसत. आणि जो करीत तो इतरांसारखा ठराविक पद्धतीचा नसायचा. अचकन घातली म्हणजे कुणी चुस्त पायजामा घालतील पण ते नेमकं पांढरंशुभ्र तलम धोतर नेसायचे. सूट ते क्वचित घालीत आणि पँट नेसले की, बुटाऐवजी चप्पल आणि टायऐवजी एकादा स्कार्फ, कितीतरी प्रकारच्या देशी इंग्रजी टोप्या, कपड्यांचे विविधरंग, शर्टच्या शिवणीचे निरनिराळे प्रकार, अशा कितीतरी गोष्टी सांगता येतील. ग्वाल्हेरच्या एका मार्मिक टीकाकाराने एकदा सार्वजनिक रीतीने टीका केली होती. 'किती तरी नवीन गोष्टींबरोबर ग्वाल्हेरला वाय. सदाशिवांनी नवीन नवीन फॅशन्स आणल्या आणि तरुण मंडळी त्यांचं अनुकरण करू लागली.' याच परिच्छेदाच्या शेवटी वाय. सदाशिव यांच्या वैशिष्टयपूर्ण पोशाखासंबंधी लोक काय म्हणत ते सांगताना त्या लिहितात. 'वाय सदाशिवांनी काही घातले तरी ते अशा रीतीने घालतात की ते त्यांना अगदी खुलून दिसतं.' कौटुंबिक अभिनिवेशाचा हा एक उत्तम मामला आहे. 'यादवरावांची राहाणी फारच साधी होती.' (पृ. १२५) हे विधान व त्या साध्या राहाणीचा लेखिकेच्याच शब्दातून होणारा उलगडा यात मेळ बसत नाही. यादवरावांच्या साध्या राहाणीचेही कौतुक आणि त्यांनी आणलेल्या फॅशन्सचेही कौतुक. एकूण काय तर लेखिकेची दृष्टी आपुलकीच्या भावनेने ओथंबलेली आहे आत्यंतिक भावनिकतेमुळे अभिमान जागृत झाला, म्हणजे चरित्रनायकाच्या गूढ तरफदारी शिवाय दुसरे काय वाचायला मिळणार ?

व्हिक्टोरिया राणीच्या काळात फक्त थोर पुरुषांचीच चरित्रे लिहिली जात होती. थोरपुरुषांचा आदर्श वाचकांच्यापुढे उभा करणे हे त्या चरित्रांचे उद्दिष्ट असे. साहजिकच चरित्रकारांना नायकाचे दोष झाकून गुणांचेच तेवढे वर्णन करणे उचित वाटले. काही अपवाद सोडल्यास अगदी जागतिक युद्धापर्यंतच्या काळात निष्कलंक नायकाच्या (आणि तो निष्कलंक असलाच पाहिजे असा जणू त्यांचा हट्ट असे) अंगावरचे डाग दिसू नयेत; लांछनास्पद गोष्टी प्रकाशात येऊ नयेत; म्हणून चरित्रकार प्रयत्नांची पराकाष्ठा करताना दिसतात. चरित्रनायकाचा आदर्श वाचकांच्यापुढे उभा करण्याची कल्पना त्याकाळी इतकी मुरली होती, की नायकाचे साधे मानवी दोषही वाचकांच्या नजरेस पडता कामा नयेत असा जणू संकेत ठरून गेला होता.

अमेरिकेतही १८६० ते १९०० च्या दरम्यान चरित्रनायकाच्या जीवनाची पुनर्निर्मिती करण्याऐवजी त्याचे भव्य स्मारक उभे करण्याची कल्पना रुजलेली

होती. चरित्रनायकाचे इष्टमित्र, सगेसोयरे डोळ्यापुढे ठेवूनच ही चरित्रे लिहिली जात असत. चरित्रनायकाविषयी पूज्यभाव बाळगून व गांभीर्य ओळखून, एक परम पवित्रकर्तव्य म्हणून हे काम हाती घेतले जात असे. साहजिकच चरित्रनायकातला मानवी अंश वगळून हे स्मारक उभे राहात असे. ज्यांचे स्मारक उभे करावयाचे त्यांचे पडदपोशीतले जीवन, त्यांच्या इष्टमित्रांच्या आदरास पात्र झाले पाहिजे ही या मागची दृष्टी असे.

व्यक्तिदर्शनाच्या बाबतीत मराठी चरित्रकारांची दृष्टी किती कोती होती, हे मालाकारांचे चरित्रकार श्री. ल. कृ. चिपळूणकर यांच्यापुढील निवेदनावरून दिसून येईल. ते लिहितात. '... आमचे भाषेत जी थोडी चरित्रे लिहिलेली, आढळतात, त्यात चरित्रनायकाचे काही ठोकळ सद्‌गुणाशिवाय बहुधा दुसरे काही सापडायचे नाही. त्याचे आंगचे कमी योग्यतेचे गुण व प्रायः सर्वच दुर्गुण यांचा पूर्ण अभाव असायचा. यामुळे मूळ चरित्रनायकाचे खरे स्वरुप वाचकांच्या ध्यानात येत नाही. ज्याप्रमाणे थोरले बाजीराव साहेब पेशवे वगैरे ऐतिहासिक पुरुषांच्या जुन्या तऱ्हेच्या नुसते रूपरेषेने एकचष्मी काढलेल्या तजबिरीवरून मूळ पुरुषांचे, स्वरूप चांगले ध्यानात येत नाही, त्याचप्रमाणे हल्ली आपले भाषेतील बापू गोखले, परशुरामभाऊ पटवर्धन वगैरे पुरुषांचे चरित्रावरून त्यांचे खरे स्वरूप ध्यानात येत नाही.' [१८]

चरित्रनायकाच्या थोरवीविषयी चरित्रकाराची जी काही एक विशिष्ट अवास्तव कल्पना असते, त्या कल्पनेत उणेपणाला स्थान नसते. त्या कल्पनेला त्या कल्पनेनुसार लेखकाच्या मनात आकार घेणाऱ्या चरित्रविषय व्यक्तीच्या मूर्तीला जपण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न होतो. त्या मूर्तीवर कुठे शितोडे उडलेले दिसले म्हणजे लगेच रंगसफेदी होते. चरित्रनायकाविषयीच्या पूर्वकल्पनेला धक्का देणारे प्रसंग, दडपण्याचा प्रयत्न होतो. जोसेफ रीडने (Joseph Reed) अमेरिकन क्रांती घडत असताना महत्त्वाची कामगिरी बजावली. तो वॉशिंग्टनचा निकटवर्ती मित्र होता. १८४७ साली प्रसिद्ध झालेल्या 'जोसेफ रीडचे जीवन आणि पत्रव्यवहार' या ग्रंथात प्रसिद्ध झालेली वॉशिंग्टनची पत्रे आणि अमेरिकन इतिहासतज्ज्ञ स्पार्कस् (Sparks) याने प्रसिद्ध केलेली पत्रे यात फार मोठी तफावत आढळून आली. स्पार्कसने वॉशिंग्टन विषयीच्या पूर्वकल्पनेला चिकटून राहाण्याच्या प्रयत्नात वॉशिंग्टनने आपल्या पत्रात केलेल्या व्याकरणाच्या चूका तर दुरुस्त केल्याच; परंतु वाक्येच्या वाक्ये बदलून टाकली आणि स्वतःची काही वाक्ये त्या जागी घातली. वॉशिंग्टन थोर होता. त्याच्या हातून चुका घडणेच शक्य नाही. या कल्पनेने

१८– चिपळूणकर, ल. कृ. 'विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे चरित्र,' (हेडमास्तर हायस्कूल), १८९४, पृ. ३.

स्पार्कस्ला मारून टाकले होते. इतर कोणत्याही विद्वानाइतकीच वॉशिंग्टनची पत्रेही रचना आणि अभिव्यक्ती या दृष्टीने पूर्ण होती असे त्याला दाखवायचे होते. त्या पत्रात जे ग्राम्य होते त्याला त्याने सौम्य स्वरूप दिले. जिथे जिथे राग व्यक्त झाला होता, तो भाग साफ काढून टाकला. १८५१ साली लॉर्ड महोन (Lord Mahon) या इतिहासतज्ञाने 'इंग्लंडचा इतिहास' या ग्रंथात हा सारा प्रकार उघडकीस आणला आणि स्पार्कस्ला आपण फेरफार केले ही गोष्ट मान्य करावी लागली.

चरित्रनायकाच्या थोरवी विषयींच्या चरित्रकाराच्या अवास्तव कल्पनेमुळे चरित्रनायकाची माणूस म्हणून ओळख पटणे दुरापास्त होते. चरित्रनायक जसा होता तसा तो चित्रित न होता, त्याचे व्यक्तिमत्त्व चरित्रकाराच्या कल्पनेनुसार आकार घेते. आन्द्रे मार्वाचे पुढील निवेदन त्या दृष्टीने लक्षात ठेवण्यासारखे आहे : 'चरित्रनायकाविषयीच्या स्वतःच्या पूर्वकल्पनेशी विसंगत असे घटित दडपून टाकण्याचा अधिकार अर्थात्च चरित्रकाराला नाही. वर्डस्वर्थ संत होता या कल्पनेने तुम्ही सुरवात केलीत आणि त्याचेही स्वतःचे दौर्बल्य होते, असा शोध तुम्हाला लागला तर तसे सांगायला डगमगू नका. राजकीय कारणास्तव सॅम्यूअल अॅडम्स (Samuel Adams) विषयी तुमचा अनुकूल ग्रह असेल आणि तुमच्या अभ्यासातून तुम्हाला असे आढळून आले की, तुम्हाला त्याच्याबद्दल काही कौतुक उरलेले नाही, तर सत्य सांगा. तुमच्या चरित्रनायकाच्या फसव्या चित्राबद्दल कसलीही आस्था उरत नाही. ते कुणाचेही चित्र नव्हे; तसे म्हटले तर ते चित्रही नव्हे; ते एक अमानुष आकृतीचे एक प्रकारचे कल्पित चित्र होय.'[१९]

चरित्रनायकाच्या अतिरिक्त गौरवातून चरित्रात विभूतिपूजा– अभिनिवेश डोकावतो. नायकाच्या दोषांचा उल्लेख टाळून गुणगौरवाचा अतिशय केल्याने चरित्र म्हणजे केवळ स्तुतिपाठ ठरतो. चरित्रात वाचकांच्या दृष्टीस पडते ती डोक्यावर उधळलेली स्तुतिसुमने झेलून, सर्व सामर्थ्यानिशी वावरणारी, दैदिप्यमान मूर्ती. याचे कारण चरित्रकाराच्या नायकाविषयीच्या उत्कट भावना व भक्तीमध्ये सापडते. चरित्राचा विषय होण्याची पात्रता अतिमानुष, अवतारी किंवा असामान्य व्यक्तींमध्ये असते. या परंपरागत कल्पनेला लेखक चिकटून राहातो. चरित्रविषयाभोवती अलौकिकाचे, अद्भुताचे वलय निर्माण करतो. वास्तव आणि अद्भुत यामधला हा जुना संघर्ष आहे. बहुधा लोकांना काल्पनिकाची, अद्भुताची आवड असते आणि मग चरित्रनायकाची आदर्शाकृती मुद्दाम घडविली जाते. भक्तीची भावना उचंबळून आली म्हणजे सत्याची चाड उरत नाही. साहजिकच चरित्र-

19– Maurois, Andre. 'The Ethics of Biography', English Institute Annual, 1982, New York : Morning side Heights 1943, p. 13.

३७५९ ... शाखा



नायकाला परमपद प्राप्त होते. चरित्रनायकाच्या अत्युत्कृष्टपणाचे ध्येयोदात्तवादी करण होते. गुणांचे अतिरंजन व दोषांचा अपलाप करून देवासारखी निर्दोष व्यक्ती जेव्हा घडविली जाते, तेव्हा चरित्राच्या विश्वसनीयतेबद्दल शंका घेण्यास जागा उरते. चरित्रकाराला नायकाबद्दल योग्य ती सहानुभूती असावी; त्याच्या कर्तृत्वाचे योग्य ते कौतुक असावे; पण तो स्वत: हळव्यामनाचा चाहता असू नये. सत्यशोधक बुध्दीला हळव्यामनाचा अवरोध होतो. आणि मग चरित्र हे विभूतिपूजेचे साधन ठरते.

गुणांचे अतिरंजन व दोषांचा अपलाप करून देवासारखी निर्दोष व्यक्ती निर्माण केल्याने पुढील पिढीवर त्याचा चांगला परिणाम होईल, अशी कल्पना करणे चुकीचे आहे. चरित्रनायकाचे दोष दडपून केवळ गुणवर्णन केल्याने चरित्र-वास्तव होणे अशक्य आहे. त्या चित्रणातला खोटेपणा वाचकांना जाणवल्याशिवाय राहात नाही. मोठ्या माणसांच्या भव्यदिव्य कृती गुणदोषांच्या विरोधा'तून जन्म घेतात. डॉ. केतकरांचे चरित्र लिहिताना ते खिशात भजी ठेवून रस्त्याने जाता जाता खात असत ही गोष्ट सांगितली तर पुढच्या पिढीला त्यांच्याबद्दल आदर काय राहणार ? ही भीती अकारण आहे. वाचकांना चरित्रनायकाच्या व्यक्ति-मत्त्वातील सामर्थ्य आणि कमकुवतपणा, भव्य सौन्दर्य आणि पोरकट क्षुद्रता यांचे सारखेच आकर्षण असते. वाङ्मयाच्या इतर शाखांप्रमाणे मानवी जीवनातील विरोध आणि संघर्ष, यशापयश, सुखदु:ख, वैभव आणि दारिद्र्य यांचे स्पष्ट चित्र चरित्रातही उमटावे. कारण, आश्चर्याची गोष्ट अशी आहे, की चरित्रनायकाच्या जीवनातील नेमके अपयश आणि उणेपण वाचकांचे मन वेधून घेते. अशा तऱ्हेच्या उणेपणातच वाचकाला आपल्या जीवनानुभूतीचे नाते सापडते. चरित्रनायकाच्या न्यूनतेत स्वत:च्या नैराश्याचा प्रत्यय येतो. चरित्रनायकाच्या यशाने वाचकाला आनंद होईलच, परंतु अपयशाच्या वर्णनाशिवाय त्याचे समाधान होणार नाही. चरित्रात नायकाच्या भव्यते बरोबर उणेपणाला स्थान मिळाले म्हणजे त्याच्यातला दैवी अंश गळून पडतो, माणूस म्हणून त्याची ओळख पटते आणि मग वाचकांना तो आपल्यातलाच एक वाटू लागतो. अशा चरित्रनायकाच्या अंगी नेहमीच सामान्य माणसांचे गुण आढळले नाहीत तरी त्यांचे दोष आणि त्यांच्या मर्यादा यांनी त्याचे जीवन व्यापलेले आहे, याची जाणीव होते. थोर पुरुष चुका करतात, त्यांचेही स्वत:चे काही दोष असतात असे आढळून आले म्हणजे सामान्य माणसाला जरा धीर येतो, समाधान लाभते. थोरांचे मनोदौबल्य पाहिले म्हणजे स्वत:चे दोष कमी लेखावेसे वाटतात. वाचकाने मनात आणले तर आपण थोरामोठ्यांपेक्षा श्रेष्ठ नसलो तरी मानसिक दृष्ट्या त्यांच्याच पातळीवरचे आहोत, अशा सुख-दायक भ्रमात तो राहू शकतो.

टेनिसनने 'बायरनचा बेफामपणा जाणून घेण्याची वाचकांना काय आवश्यकता आहे ?' असा प्रश्न विचारून 'वाचकानी बायनरच्या सुंदर कलाकृतीत समाधान मानून राहावे.'[२०] असा वर उपदेशही केला होता. बायनरच्या जीवनातील बेफामपणा वगळून लिहिलेल्या त्याच्या चरित्रात व्यक्तिमत्त्वाचे यथार्थ दर्शन ते कसे घडावे ? बायनरच्या चरित्रात त्याच्या कलाकृतींच्या संदर्भाबरोबरच त्याच्या बेफामपणाला योग्य ते स्थान मिळणे आवश्यक आहे. दोषदिग्दर्शनामुळे चरित्रनायकाच्या आदर्शाचे मूल्य हीणकस ठरेल अशी जर भीती चरित्रकाराच्या वा नायकाच्या आप्तांच्या मनात डोकावत असली तर ती निराधार आहे. कुणाचेही व्यक्तिमत्त्व आहे तसेच राहात नाही. आपण अनभवाने घडत असतो. अनुभवाने वा परिस्थितीच्या दाबाखाली व्यक्तिमत्त्व बदलत जाते, वाढते. एलिझाबेथ फ्राय या परोपकारी स्त्रीबद्दल असे सांगतात की ती लहानपणी अतिशय लाजरी व भित्री असून आईला सोडून कधी बाहेर जावयाची नाही. तीच पुढे गरिबांची कैवारी आणि तुरुंग व्यवस्थेत सुधारणा घडवून आणणारी मोठी कार्यकर्ती स्त्री म्हणून, प्रसिद्धीस आली. चरित्र हे जीवनाचे चित्र आहे. त्यात जीवनातल्या भल्याबुऱ्या प्रवृत्तींची गुंतागुंत पाहायला मिळते भव्यतेबरोबर उणेपणाला इथे स्थान आहे. वास्तव चित्रणामुळे जीवनाचे मोल मुळीच उणे ठरत नाही. चिखलात उगवल्यामुळे कमळाचे सौन्दर्य नष्ट होत नाही. दोषदिग्दर्शनामुळे गुणांचे तेज कमी होण्याचे कारण नाही. सामान्य माणसाची असामान्यत्वाकरिता चाललेली धडपड आणि त्यात त्याने मिळविलेले यश चरित्र नायकाच्या परिस्थितीतील, मन:स्थितीतील माणसाला दिलासा देणारी घटना आहे व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत असताना सद्‌गुणांच्या अनुकरणाबरोबरच व्यक्तीविघातक दोषांचे नेमके स्वरुप आणि परिणाम समजावून घेणे आवश्यक असते. बोध सद्‌गुणांपासून घेता येतो. दोषांपासून घेता येत नाही, असे थोडेच आहे. किंबहुना दोषांपासून जागरुक राहिल्यानेच समतोल व्यक्तिमत्त्व विकसित होते. भरघोस पीक यावे म्हणून खतपाण्याची तर आवश्यकता असतेच, परंतु आलेले पीक हाती लागावे, त्याला कीड लागू नये म्हणून डोळ्यात तेल घालून जपावे लागते. अॅडिसन आणि पार्नेल दारू पीत होते हे सत्य आहे. पण हे पूर्ण सत्य चरित्रात प्रकट करण्यात फार मोठा धोका आहे. कारण, हे सत्य प्रकट झाल्याने अॅडिसन आणि पार्नेलसारखी मोठी माणसे दारू पितात मग आपणही दारू प्याल्यास काय बिघडेल ? असा गैरसमज करून घेऊन लोक दारू पिण्याची शक्यता जास्त. हा धोका बॉसवेलने

20– Lee, Sidney. 'Principles of Biography', The Leslie Stephen Lecture delivered in the senate House Cambridge on 13 May 1911, P. 21.

निदर्शनास आणून दिल्यावर जॉनसनने पुढील उत्तर दिले. '... नशापानामुळे पार्नेल सारख्याचीही विद्वत्ता व बुद्धिवैभव हीणकस होऊ शकते हे पाहिल्यावर नशापान टाळण्याची बोधपर, सावधगिरीची सूचना मिळू शकेल.'[२१] चरित्रवाचनाचा वाचकांवर होणारा हा विशिष्ट परिणाम लक्षात घेता वाचकांबद्दलचे चरित्रकाराचे कर्तव्य मृतांसंबंधीच्या कर्तव्यापेक्षा अधिक महत्त्वाचे ठरते.

चरित्रनायकाचे उणेपण, त्याचे अपयश यामुळे त्याचे व्यक्तिमत्त्व हीणकस न ठरता अशा उणेपणावर मात करण्यात त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा खरा कस लागत असतो. आन्द्रे मोर्वाचे पुढील प्रतिपादन ह्या मुद्याला अधिक बळकटी आणणारे आहे : '...मला असे वाटते की, माणसाचे मोठेपण घडविणाऱ्या सगळ्या घटकांचा त्याच्याविषयीच्या सत्यात अंतर्भाव होणे मुख्यत्वेवरून आवश्यक आहे. परंतु मला असेही वाटते की, आपण नेहमीच त्याच्या न्यूनतेच्या घटकांची उपेक्षा करू नये. कारण, अशा घटकांच्यावर मात करण्यातच त्याचे थोरपण अवलंबून असते.'[२२] शेवटी मोठी माणसे ही माणसेच आहेत हे विसरता कामा नये. सामान्यजनांना ताप देणारी ओझी, दडपणं आणि मनोविकारांनी ती जखडलेली असतात. आयुष्यात येणाऱ्या समस्यांचा निरास किंवा सामना करून त्यांनी आपल्या जीवनाचा मार्ग मोकळा केलेला असतो, हे कळले म्हणजे सामान्य माणूस वैगुण्ये कमी करण्यास सगळ्या शक्तीचा पूर्णपणे उपयोग करायला उत्तेजित होतो. कधी कधी माणसापेक्षा माणसाची कृती मोठी असते. त्या कृतीमुळेच त्याला थोरपण प्राप्त होते. मानवी, दोषांनी जखडलेल्या सामान्य माणसाने त्या वैगुण्यांच्या छातीवर पाय ठेवून मिळवलेले अलौकिक यश कुणाला स्फूर्तिदायक वाटणार नाही ? चरित्रनायकाच्या उणेपणावर नेमके बोट ठेवल्याने त्याच्याबद्दलचा आदर कमी होण्याऐवजी काही काळ का होईना पण त्याचे पाय मागे खेचणारे उणेपण पुढच्यास ठेच मागचा शहाणा या न्यायाने मार्गदर्शक ठरते.

चरित्रकार सत्य सांगायला बांधला गेला आहे. चरित्रनायकांसंबंधी उपलब्ध असलेल्या सत्य घटितांवर चरित्रकाराचा हक्क आहे. चरित्रनायकाचे जर वाकडे पाऊल पडले असेल तर त्या सत्यावर चरित्रकाराचा हक्क आहे. त्या वाकड्या पावलाचा ठसा चरित्रात उमटला पाहिजे. तसे झाले नाही तर चरित्रातल्या सत्याचा प्राण गुदमरतो आणि असत्याचा प्रचार होतो. श्री. ल. ग. बादट यांनी लिहिलेल्या

---

21– Life, 17 September 1767 (III, 154–55) Also reprinted by Clifford, James–. 'Biography as an Art', Oxford Vniversity Press 1962, P. 48.

22– Mekenna, Marthe. , Write your own best seller,' Jarrolds Publishers London Limited, P. 162.

रामानंद बीडकर महाराजांच्या चरित्रात 'एका वारांगनेच्या नेत्रकटाक्षरूपी जाळ्यात ते सापडले'[२३] असा स्पष्ट उल्लेख केला आहे, बीडकर महाराजांसारख्या एका महान संताचे उणेपण प्रांजळपणे दाखवून दिल्यामुळे त्यांच्या परमार्थविकासाचा झगझगाट काही क्षीण होत नाही, उलट ज्या धडाडीने, निश्चयाने त्यांनी कामवासनेवर विजय मिळविला ती निग्रहीवृत्ती, तो निश्चय पाहिला म्हणजे त्यांच्याबद्दल सहानुभूती आणि आदरच वाटतो. ऐन तारुण्यात त्यांनी जीवनातले विविध भोग जितक्या तीव्रतेने भोगले तितक्याच तीव्रतेने पुढे त्यांचा त्याग केला. पूर्वायुष्यातील भावनांचे प्राबल्य कमी होऊन उत्तरार्धात त्यांच्या जीवनाला विवेकाचे, चिंतनाचे, अध्यात्माचे अधिष्ठान लाभले. मराठीतील सांप्रदायिक चरित्रांच्या पार्श्वभूमीवर हे चरित्र अधिक उठून दिसते याचे कारण त्यातले वास्तव चित्रण होय.

चरित्रातल्या वास्तव चित्रणातून वर एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे वाचक मानवी मनाचे कोडे उलगडू पाहातात, मानवी जीवनाचे नेमके स्वरूप समजावून घेऊ पाहातात. मानवी जीवनाचे वेगवेगळे पापुद्रे उकलणाऱ्या घटना वाचायला त्यांना नक्कीच आवडतात. जीवनाचा तळ पाहिल्याचा आनंद लाभू देणारी कृती वाचकांच्या मनाची पकड घेते. साहजिकच मानवी जीवनाच्या शाश्वत, गूढ भागावर प्रकाश टाकणाऱ्या चरित्रातून सत्याचा अपलाप झालेला वाचकांना कसा रुचावा ? चरित्र लिहिण्याइतकी व्यक्ती जर मोठी असेल तर तिचे चरित्र अचूकपणे, स्पष्टपणे, सत्यनिष्ठेने लिहिण्याइतकी ती मोठी असणारच. मग चरित्रात दोषदर्शन करावयास काय हरकत आहे ?

दोषदर्शनामुळे चरित्रनायकाच्या आप्तांची मने विव्हळ होतील, कदाचित मागे राहिलेल्या त्याच्या विधवेचा जीव पोळेल, त्याची हताश माता मागे राहिली असेल तर तिच्या हृदयास डाग दिल्यासारखे होईल, त्याच्या इतर आप्तांचे मन दुखावेल ही भीती बहुधा चरित्रकाराच्या मनात दबा धरून बसलेली असते. पण चरित्रकाराने अशी भीती बाळगण्याचे कारण नाही. चरित्रनायकाविषयीचे अप्रिय सत्य गोड भाषेत आच्छादित करण्याविषयी काळजी घेतली तर त्यातील पुष्कळसा विषारीपणा नाहीसा होईल. याबाबत अत्यंत महत्त्वाची गोष्ट नेहमी लक्षात ठेवली पाहिजे. ती अशी, की या दोषदर्शनास शक्यतो अश्लीलत्वाचा वारा लागू देता कामा नये. त्यात सभ्यतेच्या मर्यादेचे मुद्दाम अतिक्रमण होऊ देऊ नये. जखमेवरची खपली नख न लावता हळुवार हाताने दूर करावी तद्वत चरित्र नायकाविषयीचे त्याच्या आप्तांना प्रतिकूल वाटणारे सत्य उघड्यानागड्या स्वरूपात न मांडता सदभिरुचीच्या विशिष्ट पातळीवरून मांडावे. चरित्रनायकाचे

२३– बापट लक्ष्मण गणेश. 'श्री सद्‌गुरु रामानंद बीडकर महाराज यांचे चरित्र' आवृत्ती तिसरी, १९५१, पृ. २६.

अगदी तिरस्करणीय दोष आईच्या हलक्या हाताने, प्रेमाने, सहानुभूतीने दाखविले तर वाचकांच्या मनावर कोरली जाणारी त्याची आकृती जिवंत रसरशीत वाटावी. कारण, प्रेम ही माणसाच्या अंतःकरणाची सगळी कवाडं सताड उघडी करणारी गुरुकिल्ली आहे. मात्र इथे एक धोका संभवतो, तो चरित्रकाराने लक्षात घेतला पाहिजे. आईची माया म्हणजे अतिलाड नव्हेत, आपला तो बाब्या या न्यायाने केवळ चांगल्या गुणांचे कौतुक करण्याची प्रवृत्ती निर्माण होण्याची शक्यता असते. केवळ अनुकूल स्वभावविशेषांची नोंद करून चालणार नाही. चरित्रकाराने चरित्रविषयाचे दोष आणि सद्‌गुण यात सारखाच रस घेतला पाहिजे. चरित्रनायकाचे दोष किंवा त्याच्या जीवनातील एखादी शोचनीय कथा दडपून टाकण्याचे धोरण न अवलंबिता अशा काही कौशल्याने ते संदर्भ चरित्रात आणावेत, की त्यामुळे सामान्य वाचक तर गोंधळात पडणार नाहीतच, परंतु चरित्रनायकाच्या आप्तांच्या आणि मित्राच्या नाजूक भावना दुखावल्या जाणार नाहीत. दिव्याखालचा अंधार जागरूक वाचकांच्या चटकन् दृष्टीस पडेल. अर्थात यात चरित्रकाराच्या कौशल्याचा भाग अधिक आहे. सुप्रसिद्ध आंग्ल टीकाकार सिड्‌ने ली यांनी सातव्या एडवर्डच्या चरित्रात अगदी हलक्या हाताने कुणालाही न दुखविता एडवर्डच्या अधाशीपणाची चिरफाड केली आहे. सिड्‌ने ली यांना एडवर्डच्या नातेवाईकांना तर दुखवायचे नव्हतेच, परंतु चेहऱ्यावरच्या चामखिळीसह एडवर्डचे जिवंत चित्र उभे करावयाचे होते. एडवर्ड हा अतिशय खादाड माणूस होता. चविष्ट खाद्य पदार्थ नजरेस पडल्यावर शिष्टसंमत बंधने तोडून तो त्यावर तुटून पडत असे. सिड्‌ने ली यांनी दोष निर्देश तर केलाच, परंतु तो अशा काही हातचलाखीने. जो दोष दाखवायचा असेल त्याची विरुद्ध बाजू नाकारून दोषदिग्दर्शन करण्याची एक नवी लकब त्यांनी चरित्रवाङ्‌मयात आणली. ' He had a splendid appetite at all times, and never toyed with his food.' कुणालाही न दुखविता, अगदी हलक्या हाताने दोषाविष्कार करून हा प्रश्न तारतम्याने सोडविता येईल, हेच सिड्‌ने ली यांनी दाखवून दिले आहे.

चरित्रनायक जसा होता तसा तो चित्रित व्हावा म्हणून दोषदर्शनाची आवश्यकता आहे, हे वर पाहिले आहेच. आता दोषदर्शनाच्या बाबतीत मराठी चरित्रकारांचे व टीकाकारांचे विचार काय आहेत ते पाहू. व्यक्तिदर्शन हे चरित्राचे उद्दिष्ट ' बालबोध कर्त्या 'ना मान्य नसावे असे दिसते. त्यांची दृष्टी बोधवादी आहे. बोध जर घ्यावयाचा आहे तर तो चरित्रनायकाच्या गुणांपासून घ्यावा, त्याच्या अंगच्या दोषांशी आपणास काय करावयाचे आहे, असे त्यांचे विचारणे आहे; आणि हे त्यांचे मत एक व्यवहारातले उदाहरण घेऊन स्थापित करण्याचा

त्यांनी प्रयत्न केला आहे. ते म्हणतात, 'आपण कोणाचे घर पाहावयास गेलो तर त्याच्या माडच्या, जिने, भिंती, तुळचा पाहून घेतो, त्या घरातल्या मोऱ्या आणि शौचकूप पाहण्यास जात नाही; तसेच चरित्रनायकाच्या गुणदोषांविषयी समजावे.'[२५] हे त्यांचे विचार बालबोधातील चरित्रांच्या संदर्भात मांडलेले असतील तर ते समजण्यासारखे आहेत. कारण 'बालबोधातील' चरित्रे अपरिपक्व बुद्धीच्या, अल्पवयस्क व परप्रत्ययनेय अशा बालकांनी वाचावी ह्या उद्देशाने लिहिलेली असतात. लहान मुले अनुकरणाने शिकतात. त्यांच्या मनावर योग्य ते संस्कार व्हावेत म्हणून मुलांकरिता जी चरित्रे लिहावयाची त्यात चरित्रनायकाच्या दोषांचे वर्णन टाळणे मूळ हेतूला धरूनच होईल. परंतु बालबोध कर्त्यांनी आपले विचार समग्रचरित्र वाङ्मयाच्या संदर्भात मांडले असतील तर त्यातली तर्कदुष्टता लक्षात यावयाला वेळ लागत नाही. श्री. वा. गो. आपटे यांनी बालबोध कर्त्यांचे विचार खोडून काढताना पुढील प्रतिपादन केले आहे. ते अगदी समर्पक आहे. 'रामाचे माहात्म्य कळण्यास जसे रावणाचे चरित्र समजणे आवश्यक तसे गुणांची महति कळण्यास दोषांचेही विवेचन आवश्यक असे म्हटले तर कोठे चुकले ? आणि 'बालबोध कर्त्यांनी' घेतलेले व्यावहारिक उदाहरणही त्यांच्याच विरुद्ध पक्षाचे समर्थन कसे करते ते पाहा, घराची परीक्षा करावयाची ती त्याच्या पायाच्या व लाकडी सामानाच्या मजबुतीवरून व घराच्या बांधणीच्या प्रमाणशीर पद्धतीवरून हे जितके खरे आहे तितकेच मोऱ्यांचा निकास कसा केला आहे.' शौचकूपांची रचना कशी आहे व या दोहोंपासून घराच्या निरोगीपणास व स्वच्छतेस किती बाध येईल वगैरे गोष्टी पाहण्यावर आहे. यावरून घराची परीक्षा करताना मोऱ्या व शौचकूप अवश्य पाहिले पाहिजेत ही साधी व्यवहारातील गोष्ट बालबोधकर्त्यांच्या लक्षात कशी आली नाही कोण जाणे.'[२६]

चरित्रविषय व्यक्तीच्या गुणांबरोबर दोषदर्शन करावे की नाही ? या विषयाची विविध ज्ञान विस्तारामध्ये चर्चा करताना श्री. वा. ना. देव यांनी मेकॉलेच्या पुढील प्रतिपादनाचा अनुवाद दिला आहे. 'ज्या दोषांचे नामाभिधान नुसते उच्चारण्यास मूर्तिमंत निंदेसही लज्जा वाटते. इतिहास ज्याकडे नुसता दृष्टिक्षेप करण्यासही धजत नाही, सर्व प्रकारच्या मानवी मूर्तिमंत भ्रष्टतेच्या रसातळास जाऊन पोहोच-

25– Nicolson, Harold. 'The Practice of Biography', Originally published in 'The American Scholar' Spring 1954, p. p. 153–61, reprinted in 'The English Sense of Humour,' Constable and Company, London, 1956, P. 157.

२६– आपटे वा. गो. 'इतिहास व चरित्र' विविधज्ञान विस्तार, पु. ३२ अंक ५, मे १९०१, पृ. १३२.

लेल्या जीवाने ज्याकडे नुसता दृष्टिपात केला तरीदेखील त्यास ओकारी आल्यावाचून राहात नाही.'[२७] या वर्गातील दोषांचा नामनिर्देशही चरित्रात कामाचा नाही, असा यावर देवांनी आपला अभिप्राय दिला आहे. श्री. ना. गो. चापेकरांनी मेकॉलेच्या प्रतिपादनातील अतिशयोक्ती आणि विसंगती दाखवून देवांच्या अभिप्रायाचा योग्य परामर्श घेतला आहे. तो असा '... मेकॉलेसाहेबांच्या ज्या कित्येक अतिशयोक्ति आहेत त्यापैकीच ही एक समजली पाहिजे. अगोदर असे नीच दोष कोणते ते समजत नाही व दुसरे असे दोष चरित्र लिहिण्यास पात्र झालेल्या माणसांत क्वचित आढळतील त्यातूनही जर असलेच तर ते प्रस्तुत असल्यास त्यांचा अवश्य निर्देश झाला पाहिजे. साधुसंत म्हणून जो काही लोकांस पूज्य झाला त्यांच्यात जर मेकॉले-साहेब म्हणतात असे काही दोष अथवा दुर्गुण लेखकांस खात्रीपूर्वक सिद्ध करता येतील, तर ते दोष दाखवून त्याच्या साधूपदास गौणत्व येते असे म्हणण्यास काय हरकत आहे ? आम्हास तरी कळत नाही. एखाद्या यंत्रशोधकाच्या चरित्रांत त्याने एखादे प्रसंगी हलकटपणाचे कृत्य केले असल्यास त्याचा उल्लेख नसावा हे म्हणणे ठीक आहे, पण नीतितत्त्ववेत्याच्या चरित्रासंबधाने हे म्हणणे कधीही संयुक्तिक होणार नाही.'[२८] वास्तविक देवांना दोषदर्शनाची आवश्यकता पटलेली आहे, असे त्यांच्या लेखावरून दिसते. परंतु मेकॉलेच्या प्रभावाने शेवटी शेवटी त्यांनी आपल्या मूळ विचाराला मुरड घातली, त्याची काहीच आवश्यकता नव्हती.

रा. रा. विष्णुपंत महाजनी यांनी ठाण्यास ग्रंथसंग्रहालयाच्या वार्षिक समारंभाच्या प्रसंगी अध्यक्ष या नात्याने भाषण करताना कै. विष्णूशास्त्री चिपळूणकरांबद्दल सडेतोड उद्‌गार काढले म्हणून चापेकरांनी त्यांच्यावर टीकास्त्र सोडले. चापेकरांच्या मते, ' सुशिक्षित, संपन्न व स्वास्थ्य उपभोगणाऱ्या समाजात चरित्रनायकाच्या दोषांचे वर्णन त्याच्या गुणांबरोबर करण्यास काही हरकत नाही. तेथे कोणत्याही गोष्टीचा सर्व बाजूंनी शांतपणे विचार करण्यास लोक पात्र असतात समाजाला स्थैर्य प्राप्त झाल्यामुळे, चरित्रलेखनाने समाजात कोणत्याही विशिष्ट कल्पनांचा प्रक्षोभ करावयाचा नसतो. कोणत्याही गुणाने लोकादरास प्राप्त झाले-ल्यांची इत्थंभूत हकीकत समजून घेण्याची लोकांची उत्कटेच्छा तृप्त करणे हाच अशा समाजात चरित्रलेखनाचा प्रधान हेतु असतो. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका ह्या देशांत चरित्रनायकाचे दोष यथातथ्य वर्णन करून चरित्रे लिहिण्यास हरकत नाही. पण रशिया, चीन अथवा हिंदुस्थान यासारख्या अज्ञानरूपी महानिद्रेतून जागृत होऊ पहाणाऱ्या देशात, गुणांबरोबर दोषांचाही परिस्फोट करून

---

27– Ibid., P. 132.

२८– देव बा. ना. ' चरित्र विषयनायकाच्या गुणांबरोबर दोषदर्शन करावे की नाही ?' विविधज्ञान विस्तार, पु. ३६, अंक ८, ऑगस्ट १९०५, पृ. ३०७

थोर व पराक्रमी पुरुषांची चरित्रे लिहिणे केव्हाहि श्रेयस्कर होणार नाही.'[२९] या विचारसरणीला धरून शिवाजी व विष्णूशास्त्री चिपळूणकर या महाराष्ट्राच्या दोन देवतांना कमीपणा आणणारा कोणताही प्रयत्न चापेकरांना रुचणारा नव्हता. विष्णुशास्त्री हे महाराष्ट्राचे खरे नायक होत. महाराष्ट्रातील सर्व लोकांच्या विचारांचा ओघ बदलून इष्ट मार्गाकडे नेण्याचे अद्वितीय कार्य त्यांनी केले आहे. निखिल महाराष्ट्रीयांस दीपस्थानी झालेल्या थोर व्यक्तीचे काल्पनिक अगर अकाल्पनिक दोष विकाराभिनिविष्ट जनतेच्या समोर उच्चारण्यात रा. महाजनींच्या हातून चूक झाली असेच चापेकरांना वाटते. चिपळूणकर गर्विष्ठ होते, ढोंगी होते, त्यांचे खरे विचार त्यांच्या लेखनातून प्रकट केलेल्या विचारांहून भिन्न होते, इत्यादी खऱ्या खोटया गोष्टी चरित्रात आल्यास त्यांच्याविषयी पूज्यबुद्धी लुप्तप्राय होईल. मग त्यांचे लेखन कोण वाचणार? देशात जागृती उत्पन्न कशी होणार? अशीही चिंता त्यांनी व्यक्त केली आहे. शेवटी चापेकरांनी निष्कर्ष काढला आहे, तो असा– 'ज्या व्यक्तींनी राष्ट्राला कायमचे इष्ट वळण लावले, ज्यांच्या पश्चातही लोक त्यांचे अनुकरण उत्साहपूर्वक करीत आहेत व विशेषतः हे अनुकरण जोपर्यंत राष्ट्राभिवृद्धीस श्रेयस्कर आहे, तोपर्यंत तरी निदान अशा व्यक्तीचे दोष अगर अवगुण वास्तविक असले तरी चरित्रात न आणणे एकंदरीत देशाच्या फायद्याचे आहे... राष्ट्रनायकांच्या चरित्रात राष्ट्रप्रगति विघातक दोषवर्णन केव्हाही येता कामा नये.'[३०]

श्री. ना. गो. चापेकरांनी वरील टीकेत एक नवीनच मुद्दा उपस्थित केला आहे. तेव्हा त्याचा परामर्श घेणे आवश्यक आहे. हा मुद्दा मांडतांना चापेकरांनी स्फूर्ती देणे हे चरित्राचे उद्दिष्ट गृहीत धरलेले आहे. थोर पुरुषांची चरित्रे हा मानवजातीचा अमोल ठेवा आहे. महान तत्त्वज्ञ मुत्सद्दी, ग्रंथकार, समरधुरंधर, आणि कलावंत यांची चरित्रे भावी पिढ्यांना दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या पावलांचा मागोवा घेत, त्यांच्या जीवनकार्यापासून स्फूर्ती घेत, मानवजात आपल्या विकासाची वाटचाल करीत असते, याबद्दल शंका घेण्याचे वा मतभेद होण्याचे कारण नाही पण हा चरित्रवाचनाचा अपेक्षित परिणाम साधता यावा म्हणून व्यक्तिदर्शन यथार्थपणे झाले पाहिजे. चरित्र, ही वाङ्मयीन कृती आहे, तेव्हा चरित्राच्या उद्दिष्टाचा विचार वाङ्मयीन दृष्टीने होणे अधिक श्रेयस्कर ठरते. ज्या व्यावहारिक दृष्टीने चापेकर या प्रश्नाचा निकाल लावू पाहातात, त्या व्यावहारिक दृष्टीने जरी विचार केला

---

२९– चापेकर ना. गो. 'निवडक लेख' गणेश महादेव आणि कंपनी, ऑगस्ट १९२४, पृ. ४४.

30– Ibid., P. 46–47.

तरी समाधानकारक उत्तर मिळत नाही. कर्तृत्ववान पुरुषांची चरित्रे समाजाला मार्गदर्शन करण्यासाठी लिहावी असा दंडक घालणे मुळातच चुकीचे आहे. कारण त्यामुळे सत्याचा अपलाप करण्याचा मोह होतो. चरित्रविषय व्यक्ती जशी होती तशी ती चित्रित न होता समाजाकरिता मुद्दाम घडविली जाते आणि मग चरित्र-नायकाचे लेखकाला वांछित असे व्यक्तिमत्त्व चित्रित होते. परिणामतः अंधश्रद्धा आणि विभूतीपूजेचे स्तोम माजते. ढब वाजणारे नाणे अस्सल म्हणून समाजापुढे फेकल्याने समाजाची फसवणूक मात्र होते. अंधश्रद्धा आणि विभूतीपूजेमुळे समाजाचा तात्पुरता फायदा झाला तरी अखेरीस या गोष्टी राष्ट्रप्रगतिविघातक ठरतात.

संपन्न राष्ट्रांकरिता व्यक्तिदर्शन हे वाङ्मयीन उद्दिष्ट आणि मागासलेल्या, अज्ञानरूपी महानिद्रतून जागृत होऊ पाहाणाऱ्या देशांकरिता स्फूर्ती देणे हे वाङ्मय-बाह्य उद्दिष्ट, ही उद्दिष्टांची चापेकरांनी केलेली दुहेरी योजना शक्य असली तरी अनर्थकारक आहे. कारण, जी चरित्रलेखने वाङ्मयबाह्य हेतूने अपरिपक्व मनावर ध्येयवादी संस्कार करण्यासाठी लिहिली जातात ती सत्यालाप करू शकतात. आणि तसे झाले म्हणजे अखेरीस ही चरित्रे दुय्यम स्थानच प्राप्त करून घेतात.

मागासलेल्या राष्ट्रात स्थैर्य प्राप्त न झाल्यामुळे कोणत्याही गोष्टीचा सर्व बाजूंनी शांतपणे विचार करण्यास लोक पात्र नसतात. विकाराभिनिविष्ट जनतेच्या समोर राष्ट्रनायकांचे दोष ठेवल्याने त्यांच्याबद्दल पूज्यबुद्धी कमी होईल, त्यांचे अनुकरण लोक उत्साहपूर्वक करणार नाहीत आणि त्यामुळे राष्ट्राभिवृद्धीस ढळ पोचेल हे चापेकरांचे मत मान्य करूनही प्रश्न असा उपस्थित होतो की, राष्ट्रनायकांचे दोष दडविल्यामुळे अंधश्रद्धा आणि विभूतीपूजेचे स्तोम माजून भावी प्रगतीच्या वाटा रोखल्या जातील त्याचं काय ? मानवी समाज हा पूर्णतया स्थितिमान कधीही राहत नाही आणि कोणताही समाज चांगलाच गतिमान होतो तेव्हा त्या समाजाच्या डोळ्यावर चढलेले परंपरेच्या अंध अभिमानाचे, अंध-श्रद्धेचे आणि विभूतीपूजेचे पटल दूर झालेले असते. कारण, त्यामुळे सत्यशोधनास अडथळा झालेला असतो. चापेकरांनी निर्देशिलेल्या राष्ट्रांची जेव्हा झोप उडाली, निसर्गाच्या नेमक्या शक्ती होऊन त्याला आपल्या हितासाठी त्यांनी कामाला जुंपला, तेव्हा हे अंधश्रद्धेचे, विभूतीपूजेचे पटल त्या समाजाच्या डोळ्यावरून साफ दूर झाले होते. लोक प्रत्येक प्रश्नाच्या मुळाशी जाऊन चिकित्सक दृष्टीने विचार करू लागले होते. त्यांची सत्यशोधक बुद्धी प्रगल्भ झाली, तेव्हा औद्योगिक क्रांतीचा मार्ग मोकळा झाला, या राष्ट्रांची संपन्नता आणि त्या अनुषंगाने लाभलेले स्वास्थ्य हा औद्योगिक क्रांतीचा परिपाक आहे. आणि औद्योगिक क्रांती होण्यापूर्वी त्या त्या राष्ट्रात बौद्धिक जागृती झालेली होती, हे एक ऐतिहासिक सत्य आहे. अज्ञानरूपी महानिद्रेतून जागृत होऊ पाहणारे

राष्ट्र विशिष्ट संक्रमणावस्थेतून जात असते, या अवस्थेत झोपी गेलेल्याला जाग येणेच आवश्यक असते. परंपरांचा अंध अभिमान, अंद्धश्रद्धा, विभूतीपूजा यापायी राष्ट्राने काळझोप घेण्यापेक्षा लोकांना डोळसपणे विचार करायला लावणे श्रेयस्कर ठरते. लोकांवर विकारांपेक्षा विचारांचे प्राबल्य झाले म्हणजे त्यांना राष्ट्रनायकांच्या दोषांकडे खेळकरपणे, सहानुभूतीने पाहण्याची दृष्टी लागते. राष्ट्रनायकांच्या दोष दृष्टीस पडले म्हणून त्यांचे सद्‌गुण कमी लेखण्याची प्रवृत्ती राहत नाही. आणि मग राष्ट्रपुरुषांच्या गुणांचे आरोपण कसे होणार ही चापेकरांनी व्यक्त केलेली भीतीही उरत नाही.

भारतात विसाव्या शतकाच्या प्रारंभी, स्वातंत्र्यपूर्वकालात, संपन्नता आलेली नव्हती. स्वास्थ्य लाभलले नव्हते, पण इंग्रजी शिक्षणाच्या परिणामाने लोक डोळसपणे विचार करू लागले होते. याचा परिणाम असा झाला, की महात्मा गांधींच्या दोषांचा उच्चार होऊनही, त्यांच्यावर टीका होऊनही जनमानसावरील त्यांची पकड फारशी ढिली झाली नाही, अथवा दोष दर्शनाचा राष्ट्राभिवृद्धीस अडसर झाला नाही. ‘ भारतीय समाजशास्त्र ’ या ग्रंथात डॉ. केतकरांनी महात्मा गांधींचा निर्देश रा. मोहनदास गांधी असा केला असून (पृ. ५०) आजच्या मोहनदासी खटपटीत शास्त्रशुद्धता मुळीच नाही. असे मत व्यक्त केले आहे. (पृ. ६२) दिल्लीच्या ‘ सेंट स्टीफन्स ’ कॉलेजचे प्रिन्सिपल रुद्र यांचा व गांधीचा चांगलाच स्नेह होता. इतका की गांधी दिल्लीस आले की, त्यांचा मुक्काम रुद्रांच्या बंगल्यावर असे. पण गांधींचा राजकारणविषयक मते रुद्रांना बिलकूल संमत नव्हती. एकदा गांधी दिल्लीस आले. व रुद्रांच्या बंगल्यातच उतरले. गांधींनी त्या सुमारास ‘ यंग इंडिया ’मध्ये संतति नियमनावर लेख लिहून गर्भप्रतिबंधक कृत्रिम उपायांचा तीव्र निषेध केला होता व अल्प संतती व्हावी यासाठी पतिपत्नींनी कडक ब्रह्मचर्याने रहावे असे प्रतिपादले होते. संभाषणाच्या ओघात प्रि. रुद्र यांनी गांधींच्या या लेखाचा विषय काढला व त्यांचे प्रतिपादन किती अव्यवहार्य आहे ते दाखवून द्यायला सुरवात केली. गांधी हट्टी व वादपटू. पतिपत्नींनी ब्रह्मचर्य व्रताचे पालन केलेच पाहिजे हे पालुपद ते काही केल्या सोडीनात. शेवटी प्रि. रुद्र यांनी मुद्दे काढायचे सोडून मिस्किलपणे हसत म्हटले :

‘ ब्रह्मचर्य, ब्रह्मचर्य ! तुला काय लागतंय ब्रह्मचर्याच्या गोष्टी शिकवायला ! पन्नाशी झाली तुझी, अन् अर्धा डझन मुलं झाली तुला तेव्हा करतो आहेस हा उपदेश ! पण बाबा, तू हे विसरतोयस की या देशातली अर्धी लोकसंख्या कुणाची आहे, तर ऐन विशी–पंचविशीतल्या स्त्री पुरुषांची ! त्यांचा विचार कर जरा! ’[३१]

---

३१– प्रा. फडके ना. सी. ‘ माझ्या साहित्यसेवेतील स्मृती ’ भाग १ ला कॉन्टिनेन्टल बुक सर्व्हिस, पुणे, १५ सप्टेंबर १९४३, पृ. ६२.

वैयक्तिक हल्ल्याने गांधीजी निरूत्तर झाले आणि मोठमोठ्याने हसू लागले. वरील हकीकत प्रा. ना. सी. फडके यांनी ‘ माझ्या साहित्यसेवेतील स्मृती ’ या आत्मपर ग्रंथात दिलेली आहे. प्रा. फडक्यांनी गांधीजीचे मनोदौर्बल्य, आचार विचारातील विसंगती दाखवून दिल्यामुळे त्यांच्या सद्‌गुणांकडे डोळेझाक झाली असेही नाही. गांधीजींचे जीवन आणि मरणही अलौकिक कोटीतील होते. ध्येया-साठी, सत्यासाठी, प्राणपणाला लावून ते जीवनयुद्ध खेळले. त्यांची जीवननिष्ठा आणि त्यांचा स्वतःचा धर्मयुद्धात पडलेला बळी याबद्दलही तितक्याच स्पष्टपणे लिहिले गेले. या नाण्याच्या दोन्ही बाजू लोकांच्या दृष्टीस पडल्या. कदाचित गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाचा अधिक डोळसपणे विचार झाला असेल. पण म्हणूनच गांधीजी लोकांच्या मनातून पार उतरले किंवा त्यामुळे राष्ट्रप्रगतीस अडथळा झाला असेही म्हणता येत नाही.

चापेकरांच्या टीकेचे मूळ नफ्यातोटयाच्या व्यवहाराशी जखडलेले आहे. त्यांनी या प्रश्नाचा वाङ्‌मयीन दृष्टीने विचार केला असता तर सत्य पचविण्याचे सामर्थ्य लोकांच्या अंगी नाही, म्हणून सत्य दडपले तर तेच सत्य विकृत स्वरूपात वाचकांच्या दृष्टीस पडते, ही गोष्ट त्यांच्या ध्यानी यायला वेळ लागला नसता. गंमत अशी, की ज्यांच्याकरिता चापेकरांनी टीकेचा एवढा प्रपंच केला त्या खुद्द विष्णुशास्त्री चिपळूणकरांना दोषदर्शनाची आवश्यकता पटलेली होती. किंबहुना दोषदर्शनाची आवश्यकता प्रतिपादन करणाऱ्या टीकाकारात मराठीतील मेकॉले मानलेले ‘ निबंधमालाकार ’ हेच प्रमुख होत, ‘ चरित्र म्हटले म्हणजे त्यात तद्विषयभूत मनुष्याच्या संबंधीची साऱ्या प्रकारची माहिती आली पाहिजे. ज्या गोष्टींनी त्यांचा गौरव होतो त्यांचा उल्लेख जसा अवश्य आहे, तसेच जेणे करून त्यात हीनत्व येईल तेही निःपक्षपाताने सांगणे जरूर आहे.’ [३२] या निःसंदिग्ध प्रतिपादनावरून मालाकारही या प्रश्नाकडे वाङ्‌मयीन दृष्टीने पाहताना आढळतात. मालाकारांचे मत न्या. माधवराव रानडे यांनाही ग्राह्य होते. असे त्यांनी रा. निगूडकरकृत ‘ परशुरामभाऊ पटवर्धन ’ यांच्या चरित्रावर दिलेल्या अभिप्रायात स्पष्टपणे नमूद केले आहे. रा. रा. विष्णुपंत महाजनी यांनी ठाण्यास दिलेल्या व्याख्यानात हेच मत आपणास मान्य आहे, असे जाहीर केले होते.

मालाकारांचे चरित्रकार व बंधू श्री. ल. कृ. चिपळूणकर यांचे विचारही शास्त्रीबुवांप्रमाणेच आहेत. ‘... मोठमोठे पुरुषांची जर खरी चरित्रे लिहावयाची व त्यापासून बोध होईल म्हणून अपेक्षा धरावयाची तर वरील गोष्टी चांगल्या व वाईट अशा दोन्हीही– यांचा संग्रह केल्यावाचून मोठे पुरुषांची चरित्रे व्हावीत कशी ?’ [३३] असा प्रश्न उपस्थित करून ते स्वस्थ बसले नाहीत. शास्त्रीबुवांचे

---

३२– विविधज्ञान विस्तार, पु. ३६, ऑगस्ट १९०५, पृ. ३०१–२.

३३– चिपळूणकर ल. कृ. ‘ विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे चरित्र ’ (हेडमास्तर हायस्कूल) १८९४, पृ. १८२– पृ. ११.

चरित्र नात्याचे संबंध असूनही अगदी अलिप्तपणे, कुठल्याही तऱ्हेचा आडपडदा न धरता त्यांनी ते निःपक्षपातीपणे लिहिले आहे. सत्य निर्भीडपणे सांगणे हे चरित्रकाराचे ब्रीद त्यांनी कसोशीने पाळले आहे. त्यांची सत्याची उपासना किती प्रखर होती, हे पुढील निवेदनावरून लक्षात येईल. ' शास्त्रीबुवांस बाहेरचा नाद फार लागल्यामुळे मामा व माई (आजोबा व आजी) यांस फार दुःख होई. एकदा बरीच रात्र झाली तरी शास्त्रीबोवा घरी आले नाहीत हे पाहून मामा मनात फार तळमळून म्हणाले की, ' मी याला एकदा बोलू का ?' परंतु माई ही अधिक शहाणी ! तिने उत्तर केले, ' तुम्ही बोलू नका, बोलण्याने तो आपला काही नाद सोडणार नाही, तुमचा थोडा बहुत जो वचक आहे तो मात्र नाहीसा होईल.' (पृ. ११)

बॉसवेल, हॅवलॉक एलिस आदी पाश्चात्य टीकाकारांचे विचार या प्रश्नाची मूलगामी पकड घेणारे आहेत. बॉसवेलच्या मते ज्याचे जीवन चरित्र लिहावयाचे त्याच्या जीवनातील अपूर्णता, दोष खुशाल चव्हाटयावर मांडावेत, परंतु तसे करताना अपूर्णतेच्या छटा पूर्णत्वात मिसळल्यामुळे त्या व्यक्तीच्या सद्‌गुणांचे तेज कमी होणार नाही, याची खात्रीपूर्वक काळजी घ्यावी. वैगुण्यांचे वेगळेपण कायम ठेवून वाचकांच्या मनात वाईटाबद्दलची योग्य ती जाणीव निर्माण व्हावी; आणि अशा व्यक्तीत ती आढळल्याबद्दल त्यांना विषाद वाटावा. सामान्य माणसाला बुडवून टाकणाऱ्या या अपूर्णतेमुळे प्रभावी व्यक्तीची कशी ससेहोलपट होते याची जाणीव होऊन त्यापासून दूर राहण्याकडे वाचकांच्या मनाचा कल व्हावा.[३४]

चरित्रनायकाच्या संबंधीचे त्याच्या आप्तांच्या दृष्टीने कटू भासणारे सत्य सभ्य भाषेत सांगावे असेच एडमंड गॉसचे मत आहे. ' माणसांच्या अंगी प्रशंसनीय गुण असतील आणि त्या गुणांचे पूर्ण श्रेय त्याला मिळणार असेल तर त्याची बुद्धी आणि तिच्या अतिरिक्त गुणवत्तेच्या अनुषंगाने निर्माण होणारे दोष झाकून टाकणे अनैतिक आहे. प्रतिष्ठित आणि बुद्धिमान माणूस मुलंबाळं मागे ठेवून गेला असेल आणि त्या मुलांचा पिता दारुड्या होता, असे सरळ सरळ जगाला सांगून टाकले तर त्यांच्या भावना दुखावतात. कोणत्याही बाबतीत असभ्य भाषा वापरू नये आणि माणसाच्या व्यक्तिबद्दलच्या संयुक्तिक विकल्पांचा आदर राखावा. पण

---

34- ' The Hypochondriack ' No. 35, London Magazine, August- 1780, reprinted in the Hypochondriack, ed. Margery Bailey, Stanford University Press, 1928, I. I. PP. 13–14.

Also reprinted by Clifford, James. L. ' Biography as an Art ', Oxford University 1962, P. 50–51.

इथेही मी असे म्हणेन की हा आदर काही विशिष्ट मर्यादेत असावा. मुद्दाम खोटे सांगण्यापर्यंत मजल जाऊ नये.[३५]

हॅवलॉक एलिसचे या संदर्भातले विवेचन मर्मग्राही आहे. रणांगण गाजविणारा शूर योद्धा दंतवैद्यापुढे भित्रा ठरू शकेल. साम्यवादी विचारसरणीला ज्याने प्रतिकार केला आहे असा माणूस इतका भित्रा असू शकेल, की तो लिसन ग्रोव्हच्या बाजूला फिरणारही नाही. परंतु या गोष्टी शौर्याचा प्रभाव सौम्य करू शकत नाहीत. किंबहुना त्याचाच तो एक भाग आहे. कुणालाही एकाच वेळी दोन ठिकाणी शक्ती वेचता येत नाही; आणि माणसाची शक्ती नेमकी हेरण्यापूर्वी त्याचे दोष त्याचा कमकुवतपणा ठाऊक असला पाहिजे, कारण नीतितज्ञ मानतात त्याप्रमाणे चरित्रनायकाच्या सामर्थ्याचे बीज त्याच्या वैगुण्यात असते. हिन्टन (Hinton) म्हणत असे की, कमकुवतपणा हा कमीतकमी प्रतिकाराचा मार्ग होता व तद्वारा निसर्गाच्या मूळातल्या प्राथमिक शक्ती मानवामध्ये उतरल्या. योग्य कारण असेल तर बारकाव्यासहित दोषांचे निरुपण टाळावे– चरित्रकार नेहमीच अब्रू घेणारा असू नये, या म्हणण्यातही तथ्य आहे. परंतु दोषांची नोंद घेण्याचे नाकारलेत तर तुम्ही चरित्रकाराच्या कार्याची सुस्पष्ट कल्पनाच चुकीची ठरविता आणि मग तुम्ही जीवनाच्या कोणत्याही नकली चित्राइतकेच अनैतिक असत्य निर्माण करता. आपल्या प्रतिपादनाच्या समर्थनार्थ हॅवलॉक एलिसनने पुढील उदाहरणे दिली आहेत, मॅकील अॅन्जलो (Machael Angelo) च्या पुरुषाबद्दलच्या निरुपद्रवी विकारातूनच (Platonic affection) त्याचे शिल्प आकाराला आले. विक्टर ह्यूगोच्या दिव्य पावित्र्याच्या कल्पनांशी त्याचे पोकळ घरगुती जीवन असंबंधित नव्हते. अशा तऱ्हेचे साहचर्य नाकारून जीवितवृक्षाच्या ज्या मुळांतून पानं फुलं डवरतात, घाणेरडी अनैतिक असा ज्यांचा उल्लेख केला जातो त्या मुळांकडे म्हणजेच दोषांकडे ढोंगीपणापायी दुर्लक्ष करायचे आणि ज्या सद्गुणांच्या पानाफुलांचा नैतिक असा उल्लेख केला जातो त्यांचाच फक्त निर्देश करावयाचा म्हणजे जीवितवृक्ष गाभ्यातूनच कुजविण्यासारखे आहे.[३६]

विलफ्रांड पार्टिंगटनने या (Wilfed Partington) प्रश्नाची व्यावहारिक बाजू मांडलेली आहे. सत्य दडवून ठेवल्याने वाईट गोष्टी केवळ अनिर्बंध राहतात

35– Gosse, Edmund. ' Ethics of Biography ', The Cosmopolitan July 1903, PP. 317–23. Reprinted by clifford, James. L. Oxford University Press 1962, PP. 118–119.

36– Ellis, Havelock. ' An open Letter to Biography ', from ' View And Reviews ', Houghton Mifflin Company, 1932, 93–94.

असे नव्हे, तर त्यांना उत्तेजन मिळते. स्वैराचाराला, लुच्चेपणाला जे यश मिळते ते त्यापासून होणाऱ्या तात्कालिक फायद्यामुळे नसून या गोष्टी अंधारात राखल्या जातात म्हणूनच[३७] हेस्केथ पिरसन यांच्या मते दुर्गुणांवर विजय मिळवून कसाला उतरलेल्या व्यक्तिमत्वाचे चित्रण करताना दोष आधारभूत ठरतात. प्रसिद्ध स्त्री पुरुषांच्या दोषांची पूर्ण दखल घेतल्याने त्यांच्या प्रसिद्धीवर यत्किंचितही परिणाम होत नाही. जितके त्यांचे दोष अधिक तितके त्यांचे कर्तृत्व मोठे. कारण प्रत्येक दोष प्रयत्नाला खिळ घालत असतो. तेव्हा जो चरित्रविषय व्यक्तीच्या उणेपणाकडे डोळेझाक करून ते कटाक्षाने लपवून ठेवतो, तो वस्तुतः चरित्रनायकाचे व्यक्तिमत्व हीणकस ठरवितो. ज्या समस्यांचा चरित्रकार निरास करतो त्या समस्याच चरित्र-काराने गाळून टाकलेल्या असतात.[३८]

दोषदर्शनाच्या संदर्भात ‘ शशिमाजी लांछनाची बहु शोभा दिसते ’ ही उक्ती स्मरते. चंद्रावरचा डागही इतकाच आहे, की त्यामुळे त्याची शोभा वाढते. पण चंद्रावरचा डाग मोठा होत होत चंद्राइतकाच किंवा त्याहूनही मोठा झाला तर चंद्राचे तेज लोपून जाईल. आप्तांच्या भावना जपण्याच्या प्रयत्नात चरित्रनायकाचे दोष झाकण्याचा प्रयत्न होतो, तर द्वेष भावनेने लिहिलेल्या चरित्रात केवळ दोषांनाच महत्त्व प्राप्त होते. चरित्रकार दोषगर्तेत आपण उडी घेऊन वाचकांसही तीत लोटू पाहतो. चरित्रविषयव्यक्तीस वैगुण्यांच्या काळचाकुट्ट रंगाने दैत्य बनवितो. चरित्रनायकाचा कुसळाएवढा दोष दिसला तर लेखक तो मुसळाएवढा फुगवील. अशा चरित्रात दानवीकरणाचा अतिरेक दृष्टीस पडला तर त्यात नवल नाही. साहजिकच चरित्र नायक जसा होता तसा तो चित्रित न होता, चरित्रकाराला वांछित असे त्याचे एकांगी व्यक्तिमत्व चित्रित होते. वि. स. खांडेकरांच्या शब्दात सांगायचे म्हणजे ‘ मनुष्यात जेवढे पशुत्व आहे तेवढेच दैवत्वही आहे. कदाचित त्यांच्यातले पशुत्व अधिक लौकर प्रगट होत असेल ! पण त्याच्यांतले देवत्व सुप्त असले तरी ते त्याच्या ठिकाणी वास करीत आहे. याची सामान्य माणसाला सदैव मनोमन साक्ष पटायला हवी. ही साक्ष अशा छोटचा पण मोठचा माणसांच्या चरित्रात मिळते.’ [३९] व म्हणूनच खांडेकरांसारख्या सुबुद्ध वाचकांना त्यांचे स्वागत करण्यात आनंद होतो. छिद्रान्वेषणामुळे, द्वेषाने पेटलेल्या चरित्र-

37– Partington, Wilfred ‘ Should A Biographer Tell ?’ Atlantic Monthly August– 1947, Volume 180, Number 2, P. 57.

38– Pearson, Hesketh. ‘ About biography ’, Royal Society of Literature. Essays by direrse hands,– Vol. XXIX P. 58.

३९– पटवर्धन, लक्ष्मीबाई ‘ माझा नंदादीप,’ प्रकाशन स्थळ २३, डेक्कन जिमखाना पुणे ३, १९५२, प्र. आ. पृ. ७.

काराला नायकावर सूड उगवल्याचे समाधान लाभेल, फार तर त्यामुळे वाचकांची घटकाभर करमणूक होईल, पण त्यामुळे सत्याचा विपर्यास होतो त्याचे काय ? गुणदोषवर्णनाच्या बाबतीत चरित्रकाराने एकांगी, अतिरेकी धोरण स्वीकारल्यामुळे यथार्थ व्यक्तिदर्शन दुरापास्त होते.

ऑलिव्हर क्रॉमवेलने आपल्या चरित्रकाराला सक्त ताकीद दिली होती. Paint as I am, if you leave out the scars and wrinkles, I will not pay you a shilling.'[४०] क्रॉमवेलने आपल्या चरित्रकाराकडून दोष-दर्शनाची अपेक्षा केली हे ठीकच झाले.पण तो जेव्हा 'Paint me as I am' असे म्हणतो, तेव्हा असाही अर्थ सूचित होतो, की त्याच्या चरित्रकाराने त्याच्या अंगी नसलेले गुण अथवा दोष त्याला चिकटवू नयेत. चरित्रात सत्याचा आग्रह धरला जातो, दोष दर्शनाची आवश्यकता प्रतिपादली जाते त्याचा अर्थ असा नव्हे, की चरित्रनायकाच्या अंगी नसलेले दोष त्याला चिकटवावेत. चरित्रात गुणदोष वर्णनाची आवश्यकता असते ती चरित्रनायकाचे व्यक्तिदर्शन यथार्थपणे घडविता यावे म्हणून. चरित्रनायकाच्या गुणदोषांच्या जमाखर्चाचा ताळमेळ घालून त्याच्या व्यक्तित्वाचा चोख हिशेब देणे हे चरित्रकाराचे कर्तव्य होय. केवळ गुणांचा निर्देश करून अथवा केवळ दोष प्रकट करून (आणि तेही नसलेले) व्यक्तिमत्त्वाचे वास्तव चित्र उभे राहात नाही. चरित्रकार नायकाच्या भल्याबुऱ्या जीवनाच्या कुठल्यातरी एकाच अंगावर प्रकाश झोत फेकतो, तेव्हा सत्याचा विपर्यास होतो. एका कवीने म्हटले आहे :

In men whom we condemn as ill
I find so much of goodness still,
In men whom men pronounce divine
I find so much of sin and blot,
I do not dare to draw a line
Between the two where God has not. [४१]

माणूस स्खलनशील आहे. No man is perfect ' या सुप्रसिद्ध वचनावर कवीने नेमके बोट ठेवले आहे. चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वात सद्गुण, दुर्गुणांचे मिश्रण असणे हे स्वाभाविक आहे. चरित्र म्हणजे नायकाच्या बऱ्यावाईट जीवनाची गुंतागुंत असलेले खरेखुरे चित्र. ज्या चरित्रात पदरची काहीएक भर न घालता ही गुंतागुंत जशीच्या तशी पाहायला मिळते, ते चरित्र वाचकांना भारून टाकते.

40– Smith, V. A. ' Macaulay, Eassy on Warren Hastings 1911, P. 5.

41– Fuess, Claude, M. ' Debunkery And Biography,' Atlantic Monthly CLI March 1933, Volume 151, Number 3, P. 348.

चरित्र म्हणजे दुकानाची प्रदर्शनीय बाजू नव्हे, तालमीचा आखाडाही नव्हे. चरित्रात नायकाच्या गुणदोषांचे यथार्थ विवेचन असणे आवश्यक आहे. आणि हे विवेचन चरित्रनायकाविषयींच्या अनुकूल वा प्रतिकूल पूर्वग्रहांना आपल्या मनात थारा न देता निर्विकार मनाने, समतोलपणे, संयमशीलतेने व्हावे. म्हणजे मग चरित्रनायक जसा होता तसा तो चित्रित होणे शक्य होते. 'We owe consideration to the living; to the dead we owe truth only.'[४२] हे व्हॉल्टेअरचे वचन या संदर्भात चरित्रकारांनी पक्के ध्यानात ठेवले पाहिजे.

चरित्रकारांनी गुणदोषवर्णनाच्या बाबतीत बॉसवेलचा कित्ता गिरविण्यासारखा आहे. अगदी बारीकसारीक तपशीलाबाबतची सत्यनिष्ठा हे बॉसवेलच्या यशाचे मर्म आहे. डॉ. जॉनसनचे व्यक्तिमत्त्वच असे आहे की, त्याची जीवनकथा खुलवून, सजवून सांगताना ठिकठिकाणी बॉसवेल अभिनिवेशाला बळी पडण्याची शक्यता होती. बॉसवेलने जॉनसनचे चरित्र लिहिल्याला एक शतक लोटले, इतक्या दीर्घ कालावधीत त्या कृतीचा सूक्ष्म अभ्यास झाला, त्यावर टीकाही झाली, पण चरित्राची गोडी कणभरही कमी झाली नाही अथवा उच्च श्रेणीचा चरित्रकार म्हणून बॉसवेलच्या लौकिकाला तसूभरही ढळ पोचला नाही. बॉसवेलने जॉनसनची विद्वत्ता, त्याचे विचार या संबंधीचे शक्य तितके प्रामाणिक निवेदन केले आहेच, परंतु त्याचबरोबर त्याचे मानवी गुणदोष, त्याचा पोरकट दिमाख यासंबंधाने अगदी निर्भीडपणे लेखन केले आहे. डॉ. जॉनसनच्या व्यक्तित्वावर प्रकाशझोत टाकण्याकरिता बॉसवेलने कल्पनेच्या आधारे नवीन पुरावा निर्माण करून पदरची भर टाकली नाही किंवा आवश्यक असा पुरावा दडपूनही टाकला नाही. म्हणूनच काळाच्या ओघात त्याचे चरित्र टिकून राहिले आहे. सूक्ष्म तपशीलातून जिवंत आकृती साकार झाली आणि ती आकृती बॉसवेलच्या डॉ. जॉनसनची आहे.

मराठीत विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी डॉ. जॉनसनचे चरित्र लिहिले आहे. त्यात सद्‌गुणांबरोबरच त्याचे कित्येक दोष प्रांजलपणे दाखविले आहेत. तो लहानपणी उनाड होता, त्यामुळे शाळेत नेहमी शिक्षकांच्या हातचा मार खाण्याचा त्यावर प्रसंग येत असे, इतकेच नव्हे पण पुढे आपल्या मित्रांबरोबर रात्री बेरात्री बाहेर भटकण्याचीही त्याला सवय लागली होती व 'एकदोनदा त्याचे जरा वाकडे पाऊल पडले.' असे चिपळूणकरांनी स्पष्ट लिहिले आहे. पण कुठेही नसलेले गुणदोष चिकटविण्याचा प्रयत्न केलेला नाही आणि त्यातही हे वर्णन समतोलपणे, संयमशीलतेने केले आहे, हे विशेष.

विभूतिपूजाभिनिवेशाच्या अनुषंगाने गुणदोष वर्णनाच्या आवश्यकतेचे वर विवेचन केले. आता नैतिक अभिनिवेशाचा परामर्श घेऊ. एक काळ असा होता,

42– I bid, P. 348.

की, जेव्हा दुष्टपणाचे तोटे, सद्गुणांचे फलित यांची उदाहरणे देण्याकरिता नैतिक उद्बोधनाच्या स्पष्ट हेतूने चरित्रे लिहिली जात होती. प्राचीन चरित्रकारांपैकी प्लूटार्क, टॅसिटस् (Tacitus) आणि स्विटोनिअस यांनी चरित्रनायकाच्या जीवनकथेचे रुपांतर नैतिक प्रबंधात करण्याचा प्रयत्न केला. आधुनिक चरित्रकार आणि या विषयाचे अभ्यासू उद्बोधन हे चरित्रलेखनाचे उद्दिष्ट नव्हे, असे स्पष्ट मत मांडतात, ते एका परीने योग्यच आहे. चरित्राने नैतिक मूल्ये वाचकांच्या मनात ठसवावीत अशी अपेक्षा करणे मुळातच चुकीचे आहे. चरित्रकाराने नैतिक मूल्यांची जोपासना करायचे ठरविले तर चरित्राकरिता फक्त संत स्त्री -पुरुषांचीच निवड करावी लागणार आणि समजा यदाकदाचित् त्याने अन्य पुरुषाची निवड केलीच, तर त्या पुरुषाच्या पापांची धार बोथट करून तो संत असल्याचा आभास निर्माण करावा लागणार. हे शक्य नसेल तर धाक बसविण्याजोगे उदाहरण वाचकांच्यापुढे ठेवता येईल इतका चरित्राचा विषय (Theme) पिळवटून काढला पाहिजे. म्हणजे मग त्या उदाहरणाच्या प्रतिसारक शक्तीमुळे जरबेने का होईना वाचक सन्मार्गावर राहतील. श्रद्धायुक्त भावनेने, धर्म किंवा ग्रंथप्रसाराच्या प्रेरणेने नैतिक उद्बोधनाचा हेतू मनात बाळगून चरित्र लिहिले म्हणजे केवळ व्यक्ती म्हणून व्यक्तीकडे न पहाता एखाद्या प्रमेयासाठी किंवा सिद्धान्तासाठी व्यक्तीकडे पाहण्याची प्रवृत्ती बळावते. चरित्रविषय व्यक्तीकडे विशिष्ट मतांचे, विचारांचे नमुने म्हणून पाहिले जाते. एखाद्या विचाराच्या, मताच्या सिद्धीसाठी चरित्रनायकाचे जीवन वाचकांच्यापुढे खडे करताना, जे घडले तसे ते लिहिले जात नाही. 'अगा जे घडलेचि नाही.' ते घडवावे लागते. चरित्रकारापुढे असलेल्या मानवाचा दानव किंवा देव बनवावा लागतो. चरित्रविषय व्यक्तीच्या जीवनाचा ओघ वळणावळणाने, आडवळणाने इच्छित दिशेने वळवावा लागतो. एका परीने वाचकांची नजरबंदी करून अपेक्षित परिणाम साधावा लागतो. हे सगळे सद्हेतूने होते हे मान्य. पण त्यामुळे सत्याचा विपर्यास होतो. सत्याचा विपर्यास सद्हेतुने झाला तरी तो समर्थनीय ठरत नाही. वास्तविक व्यक्तिदर्शन यथार्थपणे झाले, तर चरित्रनायकाच्या अस्सल जीवनकथेतून उद्बोधन आपोआपच होते. जो भाव अथवा आशय वाचकांच्या मनी ठसावा असे वाटते, तो इतकी आडवळणे न घेताही ठसतो. 'चरित्रकाराने जर सत्य सांगण्याचा निश्चय केला असेल तर सत्यापेक्षा अधिक बोधपर दुसरे काही असू शकणार नाही.'[४३] जाणूनबुजून उद्बोधन करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे व्यक्तिदर्शनाच्या उद्दिष्टाचा विपरीत अर्थ लावण्यासारखे आहे. आणि म्हणूनच हेस्केथ पिरसन यांनी चरित्रकारांना धर्मोपदेशक

43 - Mac Carthy Desmond. 'Modern Biography,' Life and Letters, Vol. 1, No 2, July 128, P. 1936.

आणि प्रचारक यापासून दूर राहावयाला सांगितले आहे. त्यांच्या मते 'जीवनाचे अस्सल चित्र बोधपर असते एवढा मर्यादित अर्थ सोडल्यास चरित्रातून उद्बोधनाचा प्रयत्न होऊ नये. जीवनानुभूती आणि विचार करण्याचे सामर्थ्य यामुळे आपल्या दृष्टीने उत्तम तेवढे नैतिक धडे आपण घेत असतोच. खास वकिली, पक्षपाती धोरण, निंदा आणि उपशम यांना चरित्रात स्थान नाही. त्यामुळे चरित्र बिघडते. जीवनकथा सांगणे आणि व्यक्तिचित्रण करणे हाच चरित्रकाराचा मुख्य हेतू असतो. आणि तसे करीत असताना त्याने एखाद्या पंथाची किंवा धोरणाची जाहिरात केली, की तो ताबडतोब अविश्वसनीय होतो आणि त्याच्याबद्दल शंका घ्यायला जागा उरते.'[४४] तेव्हा मोहरमच्या वाघाचा नरशार्दूल बनवून उपदेशाचे ओढून ताणून चंद्रबळ आणण्याऐवजी चरित्रनायक जसा होता तसा तो चित्रित होणे श्रेयस्कर ठरते.

नीतीचे आवस्तव स्तोम माजविण्याच्या प्रयत्नातून चरित्रात नैतिक अभिनिवेश डोकावतो, तर पारंपारिक सामाजिक प्रतिष्ठांना व मुल्यांना अवास्तव प्राधान्य दिल्याने चरित्रात सार्वजनिक अभिनिवेश जाणवतो. सत्कारसमयी व्यक्ती संबंधाने चांगले तेवढेच बोलावे. मृत व्यक्तीसंबंधाने वाईट बोलू नये किंवा लिहू नये. हे झाले काही सामाजिक संकेत. सामाजिक शिष्टाचार आणि संकेत यांची मानवी मनावर अशी काही जबरदस्त पकड असते, की सामान्यतः ते आपोआप पाळले जातात. शिष्टाचार किंवा संकेतपालनाच्या मुळाशी त्यावरची अंधश्रद्धा, मूढ भक्ती आणि आत्यंतिक आदर असतो पुढिलांच्या पावलावर डोळे झाकून पाऊल टाकताना, त्यांची पाऊले अचूक पडतात असा ठाम विश्वास असतो. कित्येकदा हा विश्वास अनाठायी असतो त्यामुळे बौद्धिक परावलंबित्व वाढते आणि एकदा का ते अंगी मुरले म्हणजे सामाजिक मूल्यांशी, परंपरांशी सहसा कुणी फटकून वागण्यास धजत नाही. सामाजिक संकेताना बळी पडलेल्यांना व्यक्तीच्या प्रतिष्ठेला, मानमान्यतेला दिलेले आव्हान मुळीच खपत नाही. सामाजिक शिष्टाचारांना जखडलेल्या अंधश्रद्धेमुळे थोरांच्या मान्यतेला तडा जाऊ नये म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न होतो. अशा परिस्थितीत दोषपरामर्श म्हणजे चरित्रनायकाविषयी अनादर असे समीकरण मांडले जाते. सामान्यतः लोक प्रतिष्ठितांच्या बाबतीत सार्वजनिकरीत्या सत्य बोलायला कचरतात, काही बाबतींत मुग्धता पाळतात, वरवर गोडवे गातात. सार्वजनिक क्षेत्रात मान्यता पावलेल्या व्यक्ती किंवा अधिकाराची जागा भूषविणारे मान्यवर, आचार्य संप्रदायातील श्रेष्ठ दर्जाचे पुरुष आणि लोकप्रियता लाभलेले साहित्यिक इत्यादींच्या प्रतिष्ठेला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपण्याच्या प्रयत्नातून गार्यजनिक अभिनिवेश उद्भवतो. व्यक्तीची प्रतिष्ठा जर ठिसूळ असेल

44– Pearson, Hesketh. 'About Biography,' Royal Society of Literature, Essays by diverse hands, Vol. XXIX P. 61.

तर चरित्रकाराने तिला जपण्याचे काहीच कारण नाही. मूढ भक्तीने संकेताला चिकटून राहण्याऐवजी संकेत मोडणे हेच त्याचे कर्तव्य. याकामी भिडस्त स्वभाव कामाचा नाही. सत्यावर नेमके बोट ठेवणे हे प्राप्तपरिस्थितीत चरित्रकाराचे कर्तव्य ठरते. त्याकरीता शिष्टसंकेतांचे प्रामाण्य धुडकावण्याचे साहस हवे.

सार्वजनिक अभिनिवेशामुळे चरित्रात नायकाच्या सार्वजनिक जीवनाला प्राधान्य मिळते. त्यामुळे पूर्ण सत्य प्रकट होत नाही. चरित्रनायकाचे समग्र व्यक्तिमत्त्व वाचकांपुढे उभे राहत नाही. प्रतिष्ठितांचे खाजगी जीवन क्षुद्र मानून शिष्टाचार म्हणून त्यावर पडदा टाकला जातो. चरित्राच्या दृष्टीने नायकाच्या सार्वजनिक वा लौकिक जीवनातील डामडौल कमी महत्त्वाचा ठरतो· चरित्रनायकाच्या सार्वजनिक जीवनाबरोबरच यथार्थ व्यक्तिदर्शनास आवश्यक इतके खाजगी जीवन चित्रित होणे आवश्यक असते. सार्वजनिक अभिनिवेशाला बळी पडलेले चरित्रकार क्षुद्र गोष्टीतच व्यक्तिमत्त्वाचे मर्म आढळते हे प्लूटार्कचे सूत्र विसरतात क्षुद्र गोष्टीतूनच नायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा अंदाज बांधता येतो, कृती-मागल्या प्रेरणांचा वेध घेता येतो. अखेरीस या प्रेरणाच महत्कृत्याला कारणीभूत होतात. चरित्रविषय व्यक्तीचे खाजगी जीवन वगळून चरित्रलेखन तिरकस होते. कारण त्यामुळे चरित्रनायकाचे व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने मोलाचे व्यक्तिविशेष एकतर अजिबात चित्रित होत नाहीत, किंवा त्यांची अस्पष्ट सूचना मिळते. याचा अपरिहार्य परिणाम असा होतो की, वाचकांना चरित्रनायकाच्या जिवंत व्यक्तिमत्त्वापासून वंचित राहावे लागते.

मराठी संतचरित्रातील सांप्रदायिक अभिनिवेश वर विवेचिलेल्या सार्वजनिक अभिनिवेशातच येतो. मराठी वाङ्मयातील सांप्रदायिक चरित्रकार, संत म्हटला की, त्याच्या चरणी लागूनच चरित्र लिहायचे या संकेताचे बळी आहेत. मराठी साहित्या-तील सांप्रदायिक चरित्रांचे मूल्यमापन श्री. द. वा. पोतदारांनी केले आहे, ते या दृष्टीने लक्षात घेण्यासारखे आहे. 'अंतःकरणाच्या सामरस्यामुळे सांप्रदायिकांचे चरित्रात भक्तिरस ओथंबलेला असतो... ही सांप्रदायिक चरित्रे जरी एका दृष्टीने आतील भक्तिरसामुळे मोठी रसाळ वठतात. तथापि त्यात गुणगौरवाचा अतिशय झालेला असतो आणि त्यामुळे चरित्रवस्तूचे हीनांग झाकले जाऊन यथार्थ बोध होत नाही आणि अपूर्ण वस्तुदर्शनाने सत्यही लोपून आपली दिशाभूल होते. एकीकडे रसाळपणाचा उत्कर्ष होतो, तर दुसरीकडे चोखटपणास आपण आचवतो. या जातीच्या चरित्रांचे पर्यवसान चरित्रवस्तूच्या दैवीकरणात होते '[४५]

वर क्रमाने आलेल्या चारही अभिनिवेशांहून ऐतिहासिक अभिनिवेश थोड्याफार वेगळ्या पायावर उभा राहतो. राजकीय जीवन जगलेल्या व्यक्तीचे

४५– साने गुरुजी. 'ना. गोखले,' प्रस्तावना : द. वा. पोतदार पृ. ४.

चरित्र लिहिताना चरित्रकाराला इतिहासाची मदत घेणे आवश्यक असते. स्वातंत्र्य-पूर्व कालातील राजकीय पार्श्वभूमी वगळून गांधीजींचे चरित्र लिहिणे कठीणच आहे. परंतु चरित्रात जेव्हा इतिहासाच्या चौकटीत व्यक्तिजीवन न बसविता व्यक्तिजीवनाच्या चौकटीत इतिहास ऐसपैस बसविलेला असतो तेव्हा ऐतिहासिक अभिनिवेश जाणवतो. कारण, इथे ऐतिहासिकता राखण्याच्या अतिरिक्त प्रयत्नात व्यक्तीचे सारे व्यक्तिमत्त्वच नष्ट होते.

भारतीय चरित्रलेखनात जातीय अभिनिवेश जाणवतो असे दुर्गा भागवत म्हणतात ते अगदी रास्त आहे. उदाहरणादाखल त्यांनी श्री. म. माटे यांच्या परशुराम चरित्राचा निर्देश केला आहे. त्यांच्या मते, 'या चरित्रात मुख्य आक्षेपाची टाळाटाळ केल्याने जातीय अभिनिवेश भरलेला आढळतो. क्षत्रियवधाची मीमांसा माटयांनी केवळ चुचकारून नेली आहे. तिची पंचजनांच्या आधारे माटयांना उपपत्ती लावता आलेली नाही. 'वरिष्ठ वर्णातील स्त्रिया आपणास प्राप्त व्हाव्या हा अभिलाष कनिष्ठ वर्गातल्या पुरूषांना अधिकाधिक वाटत जाईल' ही माटेप्रणित परशुराम कथेची फलश्रुति.[४६]

ईजिप्त देशामधे काही बाबतीत आपल्या हिंदूंच्या जातिभेदाच्या पद्धती-सारखीच विषमतेच्या तत्त्वावर रचलेली समाजपद्धती होती. जपानमधेही प्राचीन समाजरचना अशीच विषम होती. सामुराई (सम्राट किंवा समरराय) या नावाची क्षत्रिय जातीच काय ती जन्मत: श्रेष्ठ मानली जात असे. पण या दोनही देशात जातीयता पार कोलमडून पडली. भारतात मात्र आनुवंशिक संस्काराने जिवलग झालेली अनेक भेदोत्पादक परिस्थितींच्या कारणाने अंतरात्म्यापर्यंत भिनून गेलेली जातीयता आजही मधून मधून डोके वर काढते. चरित्र लेखनात तिचा प्रभाव जाणवला तर त्यात नवल नाही. भारतीय चरित्र लेखनाच्या संदर्भात का होईना जातीय अभिनिवेशाचा विचार होणे आवश्यक आहे. वर्णव्यवस्थेनुसार प्राप्त झालेले महत्त्व टिकवून धरण्याच्या अतिरिक्त प्रयत्नातून जातीय अभिनिवेश निर्माण होतो. चरित्रकार आणि चरित्रनायक दोघेही एकाच जातीचे असतात तेव्हा, जातीय अभिनिवेशाला खरा वाव मिळतो. चरित्रकाराचा जन्माच्या श्रेष्ठत्वाचा अभिमान जागृत झाला म्हणजे त्याची नि:पक्षपातीपणाची भूमिका ढळते आणि मग एकतर तो सत्य झाकून टाकतो किंवा उच्चपणाच्या कल्पनेला अनुरूप अशा विकृत स्वरूपात जगापुढे ठेवतो. व्यक्तीमुळे जातीला मोठेपणा प्राप्त होणे हे अगदी स्वाभाविक आहे. पण चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्व चित्रित करताना जातीचे मोठेपण विचारात घेण्याचे वा प्रस्थापित करण्याचे कारण नसते. जातीचे मोठेपण प्रस्थापित करून ते

४६– भागवत, दुर्गा. 'चरित्र,' (एकोणीसशे एकवीस ते अठ्ठावन), आलोचना डिसेंबर १९६४, पृ. १५.

चरित्रनायकाला चिकटविले म्हणजे वाचकांच्या मनावर उमटणारा त्याच्या कर्तृत्वाचा ठसा पुसट होतो. व्यक्तिविषयक सत्य जसे आहे तसे ते कथन करता यावे म्हणून चरित्रकाराने जातिविशिष्ट अहंकारापासून दूर राहाणे आवश्यक आहे. चरित्रकाराला अभिनिवेश टाळता आलेतर यथार्थ व्यक्तिदर्शनाला आवश्यक ती तटस्थाची भूमिका त्याला धारण करता येते.

धर्मप्रसाराच्या प्रेरणेतून धार्मिक अभिनिवेश निर्माण होतो. काय वाटेल ते झाले तरी धर्मप्रसार झाला पाहिजे, या चरित्रकाराच्या आग्रहामुळे चरित्र विषय व्यक्तीच्या जीवनकथेला अकारण फाटे फुटतात. त्या जीवनकथेचे प्रवाहित्व नष्ट होते. चरित्रनायक सतत वाचकांच्या डोळ्यापुढे उभा राहण्यात व्यत्यय येतो. चरित्रकार अखेरीस व्यक्तिचित्रणाचे परिणामैक्य गमावून बसतो. धार्मिक अभिनिवेशामुळे व्यक्तिजीवनाचा उपयोग साधन म्हणून केला जातो. चरित्रात असा अभिनिवेश डोकावला, म्हणजे चरित्रनायकाच्या जीवनकथेच्या आघातात सापडलेल्या वाचकाला आपण त्या जीवनकथेपासून दूर फरफटले जात आहोत याची जाणीव होते आणि त्याच्या मनात प्रश्न डोकावतो तो असा, की या धर्मप्रसाराचा चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाशी संबंध तरी काय ?आणि असा संबंध शोधू पाहता सापडत नाही, तेव्हा वाचकांना ते लेखन असह्य होते. निदान मराठीतले रोमनबादशहांचा इतिहास हे चरित्र वाचताना असा अनुभव निश्चित येतो. या चरित्रातख्रिस्तांचे थोरपण वाचकांच्या मनावर ठसविण्यासाठी धर्मग्रंथाचा हवाला देऊन तात्पर्य सांगण्याची कोणतीही संधी चरित्रकाराने दवडलेली नाही. त्यामुळे चरित्रनायकांच्या जीवनकथांच्या अकलनात सतत व्यत्यय येत राहातो. धार्मिक अभिनिवेशामुळे सत्याकडे पाहण्यासाठी एकांगी दृष्टी स्वीकारली जाते. त्यामुळे सत्य जसे आहे तसे ते न स्वीकारता चरित्रकाराच्या स्वीकृत एकांगी दृष्टीला पोषक होईल अशा स्वरूपात ते मांडले जाते. धार्मिक अभिनिवेश चरित्रनायकाचे जीवन जाणून घेण्याच्या जिज्ञासे आड येत राहिला, म्हणजे आगंतुक पाहुण्याचे अगत्य कमी व्हावे, तशी धार्मिक प्रचारामुळे हळू हळू वाचकांची त्या धर्म प्रसाराबद्दलची वा त्या जीवनकथेबद्दलची आस्था कमी होत जाते.

अभिनिवेशांबरोबरच सत्यकथनाच्या आड येणाऱ्या काही गोष्टी चरित्रकाराने टाळणे अत्यंत आवश्यक आहे. चरित्रकाराच्या बुद्धीला भावनेचा जोपर्यंत स्पर्श होत नाही. तोपर्यंत चांगल्या चरित्राची अपेक्षा करता येते. ज्या क्षणी धर्मविषयक श्रद्धा, पूज्यबुद्धी, प्रेम, द्वेष इत्यादी भावनांपैकी एखाद्या भावनेच्या आहारी चरित्रकार जातो त्याच क्षणी सत्याचा विपर्यास होण्याची शक्यता निर्माण होते. आणि परिणामतः यथार्थ व्यक्तिदर्शन दुरापास्त होऊन बसते. जिव्हाळा आत्मीयता, शिष्यत्वाबरोबर येणारे आंधळेपण यांचा समतोल व्यक्तिचित्रणावर अनिष्ट परि-

णाम होतो. सत्याच्या धगधगत्या निखाऱ्याचे दर्शन घडायचे असेल तर त्यावर साचलेली भावनेची राख दूर व्हावी लागते. भावनाविवशतेमुळे चरित्रकृतीच्या साऱ्या अंगांच्या सच्चेपणालाच मुळी बाध येतो. चरित्रकाराने भावनाविवशता टाळून नायकाच्या जीवनाकडे त्रयस्थपणे पाहिले म्हणजे सत्य अविकृत स्वरूपात प्रकट होते. चरित्रनायकाच्या दोषांची काटछाट करण्याची वा काही गुणविशेष कृत्रिमपणे चिकटविण्याची आवश्यकताच राहत नाही. चरित्रनायकाच्या चेहऱ्यावर खोटा मुखवटा चढविण्याची मुळी गरजच भासत नाही. साहजिकच त्या चित्रणात प्लॅस्टर ऑफ पॅरीस गुळगुळीतपणा उरत नाही. चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा काही विशिष्ट दिशांनी होणारा विकास जसाच्या तसा टिपला जातो. चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्व वाचकांच्या डोळ्यांपुढे मानवी गुणदोषासहित जिवंत उभे राहते. व्हिक्टोरिया राणीच्या काळातील जनमानसावर धार्मिक भावनेचा पगडा होता, हे त्या काळातील चरित्रवाङ्मयाच्या अपयशाचे कारण आहे. विष्णूशास्त्री चिपळूणकरांचे चरित्र लिहिताना चरित्रकार आपल्या बंधूकडे भावनिक दृष्टीने पाहात नाहीत. ल. कृ. चिपळूणकरांनी दुरून अगदी अलिप्तपणे ते चरित्र लिहिले यातच त्या चरित्राच्या यशाचे मर्म आहे.

व्यक्तित्त्वदर्शनाच्या हेतूशिवाय अन्य हेतूनी सत्याला राबविण्याची इच्छा उत्पन्न झाली म्हणजे सत्य चटकन पुसट होते. त्याचा विपर्यास होतो आणि अखेरीस नाश होतो. साक्षीदारांच्या मनात काहीतरी सिद्ध करण्याची इच्छा उत्पन्न झाली, की त्याची निःपक्षपातीपणाची रास्त भूमिका ढळते आणि त्याचा पुरावा विश्वसनीय ठरत नाही. मूळ सत्याकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोनच पार बदलून जातो. मनातला हेतू साध्य व्हावा म्हणून सत्य हवे तसे तो वाकवितो. चरित्रनायकाविषयी उपलब्ध असलेली माहिती जरी अस्सल असली तरी ज्या क्षणी व्यक्तिदर्शनाशिवाय सूड उगविणे, उद्बोधन साधणे या सारखा अन्य कोणता तरी हेतू चरित्रकाराच्या मनात डोकावतो त्याच क्षणी सत्याच्या रुळलेल्या मार्गापासून तो दूर होतो. चरित्रविषय व्यक्तीसंबंधाने त्याने जी काही माहिती अनुमानाने, परिश्रमाने गोळा केलेली असते तिचे रूप त्याच्या मनात दडलेल्या हेतूमुळे पार पालटून जाते आणि शेवटी उरते ते विकृत सत्य, व्यक्तिदर्शनाव्यतिरिक्त अन्य हेतूशी सुसंगत अशा सत्याच्या पूर्वअपेक्षित रूपबंधात अनेक सत्ये कोंबण्याचा प्रयत्न करणे म्हणजे सत्याचा दुरुपयोग करण्यासारखे आहे. व्यक्तित्त्वदर्शन हे चरित्रलेखनाचे उद्दिष्ट असल्यामुळे चरित्रात नायकाच्या व्यक्तिमत्त्वाला प्राधान्य मिळणे आवश्यक आहे ज्या हेतूमुळे व्यक्तिमत्त्वाला दुय्यम स्थान लाभते तो हेतू चरित्रकाराने टाळला पाहिजे.

चरित्रकाराने नायकाला अचूकपणे, पुर्णपणे सर्वांगाने समजून घेतला पाहिजे.

समग्र पुरावा उपलब्ध झाल्याशिवाय चरित्रकाराने नायकाविषयी प्रतिकूल वा अनुकूल पूर्वग्रह मनात बाळगू नये. माहितीच्या अभावी असा पूर्वग्रह झालाच तर त्याला शह देणारा पुरावा उपलब्ध होताच चरित्रकाराने तो पूर्वग्रह मनातून साफ काढून टाकला पाहिजे. एक दोन उदाहरणावरून चरित्रनायक कंजूष आहे असा प्रतिकूल ग्रह झालेल्या चरित्रकाराने नायकाच्या औदार्याची पाचपंचवीस उदाहरणे आढळून येताच आपला पूर्वग्रह दूर केला पाहिजे. त्याने सत्यप्रतिपादन करताना मौन स्वीकारता कामा नये. पूर्वग्रह विमुक्त मनाने चरित्रनायकाचे व्यक्तिदर्शन यथार्थपणे घडविता येते. सबळ पुरावा डावलून चरित्रनायकाकडे पूर्वग्रहदूषित दृष्टीने पाहणाऱ्या आग्रही, हेकट चरित्रकाराकडून नायकाला न्याय मिळेलच अशी अपेक्षा करता येत नाही. कारण पूर्वग्रहानुसार आकार घेणाऱ्या चरित्रनायकांच्या मूर्तीला जपण्याच्या प्रयत्नात प्रतिकूल पुरावा दडपण्याचा मोह होतो. चरित्रनायकाकडे पूर्वग्रहदूषित दृष्टीने पाहिल्याने सत्य शोधक बुद्धीलाच मुळी बाध येतो. चरित्रनायक जसा होता तसा तो चित्रित न होता. चरित्रकाराच्या पूर्वग्रहांनी डागळलेली त्याची आकृती साकार होते पूर्वग्रह सत्यकथनाच्या आड येतात म्हणून ते चरित्रकाराने टाळले पाहिजेत.

कित्येकदा चरित्रविषय व्यक्तीच्या जीवनातील ज्या भागाने चरित्रकाराचे मन वेधून घेतलेले असते. जो भाग त्याच्या मनावर पक्का ठसलेला असतो, तेवढाच अगदी ठसठशीत ठळकपणे रेखाटण्याचा प्रयत्न होतो. चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे चित्रण करताना कोणत्यातरी एकाच गुणाला व्यक्तिमत्त्वाचे भेददर्शीलक्षण ठरवून इतर गुणांना गौणस्थान देण्याचा प्रयत्न होतो. मानवी स्वभावाची गुंतागुंत शद्बांकित करून प्रमाणबद्ध व्यक्तिचित्रण करण्याऐवजी यामार्गानं चरित्रकाराला जसेच्या तसे चित्रण करून त्याचा वाचकांच्या मनावर ठसठशीत ठसा उमटविता येतो. चरित्रकाराचे मन वेधून घेणारा नायकाच्या जीवनाचा भाग म्हणजेच चरित्रनायकाच्या समग्र व्यक्तिमत्त्वाची गुरुकिल्ली असा समज दृढ झाला, म्हणजे चरित्रनायकाच्या जीवनाचा इतका भाग वगळला जातो, की अंती सत्य लुप्त व्हावे. चरित्रकाराला भारून टाकण्यास असमर्थ ठरलेल्या चरित्रनायकाच्या जीवनाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे किंवा त्या भागाचे चित्रण पुसट झाल्यामुळे चरित्रात उमटणारी नायकाची आकृती सौन्दर्यहीन ठरते. देहाप्रमाणेच चरित्राचे सौन्दर्य सगळ्या अवयवांच्या रेखीव, प्रमाणबद्ध रचनेवर अवलंबून असते. एकाच अवयवाच्या ठळक चित्रणावर भर दिल्यामुळे प्रमाणबद्ध रचना अशक्य होऊन बसते. चरित्रकाराच्या ठाम परंतु एकांगी दृष्टीकोनातून रेखाटले गेलेले चरित्रनायकाचे चित्र मुळाबरहुकूम असले तरी ते दिशाभूल करणारे असते. गुणदोष वर्णनाच्या बाबतीत एकांगी दृष्टीकोन स्वीकारल्याने सत्याचा विपर्यास कसा होतो त्याचे विवेचन वॉशिंग्टनच्या पत्रांच्या बाबतीत वर झाले आहेच. निखालस

सद्गुणी अगर दुर्गुणी व्यक्तिमत्त्व ही वस्तुस्थिती नसून कल्पनानिर्मिती आहे. एकसंघ व्यक्तिमत्त्वातील अनेक विभिन्न छटांचे समतोल, प्रमाणबद्ध चित्रण यथार्थ व्यक्तिदर्शनाचा मूलाधार होय. चरित्रनायकाचे सत्याशी सुसंगत व्यक्ति-चित्रण प्रमाणबद्ध व्हावे म्हणून चरित्रकाराने एकांगी दृष्टिकोन टाळला पाहिजे

समकालीन वा भतकालीन व्यक्तीविषयी लिहिताना चरित्रकाराला नेहमीच एका अडचणीला तोंड द्यावे लागते. चरित्रकार चरित्रविषय व्यक्तीशी तद्रुप होण्याचा संभव असतो. चरित्रकाराचे चरित्रनायकाशी तादात्म्य होण्यात फार मोठा धोका असतो. चरित्रनायक भला किंवा बुरा, जिवंत किंवा मृत असो चरित्र-विषयाशी तद्रूप होण्यात धोका हा असतोच आणि विशेषतः चरित्रनायक मृत असला म्हणजे हा धोका अधिकच जाणवतो. कारण, चरित्रनायक हयात असला म्हणजे चरित्रकार त्याला भेटू शकतो, त्याच्याशी बोलू शकतो, त्याचे सद्गुण दुर्गुण हेरण्याची, चरित्रकाराला आयतीच संधी लाभते. परंतु मृत नायकाच्या बाबतीत त्याचे गुणदोष हेरण्याचा वा त्याच्या व्यक्तिमत्त्वाची नाडी हाती घेण्याचा वरच्यासारखा हितावह मार्ग उपलब्ध होत नाही. नायकाविषयींचा चरित्रकाराचा अभ्यास सखोल होऊ लागला म्हणजे पूर्वी अज्ञात असलेले, त्याच्या व्यक्तिमत्त्वाला उजाळा देणारे गुण उजेडात येतात. पूर्वचरित्रकारांनी दुर्लक्षिलेला त्याच्या व्यक्ति-मत्त्वाला मानवी अंश नव्याने जाणवु लागला. चरित्रनायकावर केलेले दोषारोप निराधार आहेत, तो निरपराध आहे असे सिद्ध करणारा, त्याच्या व्यक्तिमत्त्वावर नव्याने प्रकाश टाकणारा पुरावा उपलब्ध होताच जोरदार समर्थनाची आवश्यकता वाटू लागते आणि मग चरित्रकार हा नायकावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करणारा त्याचा पाठिराखा होतो. एकदा का चरित्रकाराने ही भूमिका स्वीकारली म्हणजे नायकाला बदनाम करणाऱ्या हलक्या वृत्तीच्या लोकांना भर चव्हाट्यावर आणून त्यांची निर्भत्सना करण्याची गरज भासते. ही भूमिका वठविताना चरित्र-कार नायकाशी असा काही तद्रुप होतो की, त्याचे प्रेमद्वेषादी विकार चरिकाराला आपलेच वाटतात, नायकावर झालेली टीका जणू चरित्रकाराला आपल्यावरच झाल्यासारखी वाटते आणि मग चरित्रात नायकाची जीवनकथा चित्रित न होता, चरित्र म्हणजे केवळ वादविवादात्मक समर्थन ठरते. दादोबा पांडुरंग यांच्या चरि-त्रात प्रियोळकरांनी दादोबांच्या वृत्तीशी समरस होता होता अखेर संशोधकाची तटस्थता सोडली आहे. परमहंस सभेच्या बैठकीसंबंधी दादोबांची वर्तणूक व नगरच्या लोकांच्या निःशस्त्रीकरणाचे कार्य या दोन्ही बाबतीत श्री. प्रियोळकरांनी दादोबांचे समर्थन केले आहे.

प्रत्यक्ष चरित्रलेखन करताना चरित्रकाराला नायकाच्या जीवनात शिरण्याचा मोह आवरता आला नाही, तो नायकाशी तन्मय झाला म्हणजे त्याची तटस्थाची

भूमिका सुटते आणि मग चरित्रात नायकाऐवजी स्वत: चरित्रकार डोकावू लागतो. नायकाचे चरित्र म्हणजे चरित्रकाराचे आत्मचरित्र नव्हे. चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वावर चरित्रकाराच्या व्यक्तिमत्त्वाचे कुठल्याही परिस्थितीत आक्रमण होता कामा नये. स्वमतप्रतिपादनाच्या वा समर्थनाच्या निमित्त ने चरित्रकाराने चरित्रात डोकावता कामा नये. तो चरित्रनायकाचा वकील नव्हे, न्यायाधीशही नव्हे, चरित्रनायक ज्या लोकात फिरला वावरला, वागला, त्याना जसा तो दिसला तसा तो चित्रित व्हावा. परलोकात वास करणाऱ्या चरित्रनायकाची जिवंत आकृती जी वाढत गेली, परिस्थितीच्या दाबाखाली बदलत गेली आणि जिच्यामधे चरित्रकाराजवळच्या अस्सल माहितीमुळे चैतन्य ओतले जाते ती सतत वाचकांच्या डोळ्यापुढे, ठसठशीत जिवंत उभी राहावी. चरित्रनायकावर सतत प्रकाश झोत फेकण्यात, चरित्रनायकाच्या जीवनप्रवाहाचे सातत्य टिकवून धरण्यात चरित्रकाराचे खरे कौशल्य आहे. चरित्रकार जेव्हा त्रयस्थ असतो. चरित्रकाराचा नायकाच्या जीवनाशी संबंध नसतो. चरित्रनायक आणि चरित्रकार या दोघांचे जीवितप्रवाह पार भिन्न दिशांनी वाहतात, तेव्हा चरित्रकाराच्या चरित्रातल्या अस्तित्वाने नायकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या आकलनात व्यत्यय येतो. चरित्रनायकाच्या जीवनकथेचे प्रवाहित्व अकारण खंडित होते. चरित्रनायकाच्या कृतिउक्तीच्या संदर्भात चरित्रकाराच्या मल्लिनाथीची वा समर्थनाची आवश्यकता नसते. शक्यतो चरित्रनायकाच्या जीवनकथेलाच बोलू द्यावे. स्वत:बद्दल चरित्र नायकालाच बोलू द्यावे. कारण चरित्रनायक जसा होता किंवा आहे, तसा तो वाचकांना जाणून घ्यायचा असतो. वाचकांच्या डोळ्यापुढे उभे रहाणारे व्यक्तिमत्त्व चरित्रकाराऐवजी चरित्रनायकाचेच असावे.

नायकाचे चरित्र म्हणजे चरित्रकाराचे आत्मचरित्र नव्हे असे वर म्हटले ते अशा अर्थाने, की नायकाच्या चरित्रात चरित्रकाराचे आत्मचरित्र आले तरी चरित्र हे अखेरीस चरित्रच राहिले पाहिजे. 'स्मृति–चित्रे', 'आमची अकरा वर्षे' 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' या चरित्रात नायकाच्या चरित्रात चरित्रकाराचे आत्मचरित्र असा संकर होतो आणि तरीही चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या आकलनात तिळमात्र व्यत्यय येत नाही, उलट भरच पडते. कारण, इथे चरित्रनायक आणि चरित्रकार यांचे संबंध ति-हाईताचे नाहीत. त्या दोघांचे जीवनप्रवाह एकमेकात पार मिसळून गेले आहेत. त्यांच्या जीवनप्रवाहांचे वेगळे अस्तित्वच उरत नाही. चरित्रात मधूनमधून आत्मपर संदर्भ आले तरी कुठेही चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वावर चरित्रकाराच्या व्यक्तिमत्त्वाचे आक्रमण होत नाही. चरित्रनायकाच्या जीवनकथेचे प्रवाहित्व तेलाच्या धारेप्रमाणे अतूट वाहते.

चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे जास्तीत जास्त प्रामाणिक प्रकटीकरण करताना, व्यक्तिदर्शनाव्यतिरिक्त अन्य हेतूने केलेले लेखन, एकांगी चित्रण, तादात्म्य,

पक्षपात, भावविवशता आणि पूर्वग्रह यांचा अडथळा होतो. तो टाळून चरित्रातल्या आशयाशी, सत्याशी इमान राखायचे म्हणजे लेखन तटस्थाच्या वृत्तीने, निर्विकार-पणे झाले पाहिजे. चरित्रनायकाकडे त्रयस्थपणे पाहिल्याने चत्रिकाराला व्यक्ति-दर्शनाशिवाय अन्य आस्थाच मुळी उगत नाही. ताटस्थ्यामुळे चरित्रकाराची सत्यशोधक बुद्धी अबाधित राहते. चरित्रातून सत्य अविकृत स्वरुपात व्यक्त व्हायचे असेल तर आदर्श चरित्रकाराला अलिप्ततेची, निर्विकार तटस्थाची भूमिका टिक-विता येणे अपरिहार्य आहे. विष्णुशर्मा याने म्हटल्याप्रमाणे, 'शत्रोरपि गुणावाच्या दोषावाच्या गुरोरपि.'[४७] इतक्या पराकोटीला ती अलिप्तता पोचली पाहिजे. याकामी नायकाविषयी आंधळी सहानुभूती उपयोगाची नाही. डोळस सहानुभूती आणि तटस्थाची वृत्ती यांमधला समतोल राखता येणे आवश्यक आहे. तसा तो राखता आला म्हणजे मग आकसाने काही लिहिले जात नाही. अथवा वृथा गौरवही होत नाही. चरित्रविषय व्यक्तीच्या जीवनातील प्रकाशाबरोबरच अंधाराच्या छटा वाचकांच्या दृष्टीस पडतात. चरित्रनायका-विषयीचे सत्य अविकृत स्वरुपात व्यक्त होणे शक्य होते. चरित्रनायक जसा होता तसा तो चित्रित करण्याचे अमोघ सामर्थ्य अलिप्ततेमुळेच प्राप्त होते. चरित्रातले मूळ सत्य निर्लेपवृत्तीने, निर्विकार तटस्थाची भूमिका स्वीकारून अविकृत स्वरूपात व्यक्त करता आले म्हणजे चरित्रात एक आगळेच वास्तव डोकावू लागते. बॉसवेल डॉ. जॉनसनचा चहाता होता. जॉनसनवरच्या बॉसवेलच्या भक्तीचा त्याच्या चरित्रातील वास्तवावर अनिष्ट परिणाम होऊ शकला नाही, याचे कारण बॉस-वेलच्या तटस्थ वृत्तीत सापडते. डॉ. जॉनसनने त्याला ठामपणे बजावले होते, की 'मृताच्या स्मृतीबद्दल आपल्याला जर आदर वाटत असेल तर त्याहीपेक्षा अधिक आदर ज्ञान, सद्‌गुण आणि सत्य यांच्याबद्दल वाटला पाहिजे.'[४८] बॉसवेलला डॉ. जॉनसनबद्दल आदर होताच पण त्याहीपेक्षा अधिक आदर सत्याबद्दल होतो. त्यामुळेच तटस्थवृत्ती अंगी बाणणे त्याला शक्य झाले आणि तटस्थवृत्ती धारण केल्यामुळे सत्याची प्रखर उपासना शक्य झाली.

सारांश, चरित्रनायक जसा होता तसा तो होता. चरित्रकाराला त्याचे घडलेले जीवन कसे बदलता येईल ? साहजिकच चरित्रविषय व्यक्ती प्रत्यक्षाच्या

---

४७– देव, बा. ना. चरित्रनायकाच्या गुणांबरोबर त्यांचे दोषदर्शन करावे की नाही ?' या लेखाच्या आग्रभागी दिलेले अवतरण. विविधज्ञान विस्तर पु. ३६, अंक ८, पृ. ३०१.

48– Johnson, Samuel. ' The Rambler No. 60, Saturday, 13 October 1750, Also reprinted by Cliford James, Biography as an Art ', 1962, P. 43.

मर्यादित साकार झाली पाहिजे. आपल्या डोळ्यांपुढून सरकणारा जीवनपट अस्सल आहे, त्यातल्या घटना अवास्तव नसून वास्तव, शक्य कोटीतल्या आहेत, याची वाचकांना मनोमय खात्री पटायला हवी. चरित्र लेखनावरील प्रत्यक्षाचे बंधन आणि चरित्रवाचनाचा वाचकांवर होणारा परिणाम लक्षात घेता निर्भीड सत्य-दर्शन हे चरित्रकाराचे ब्रीद ठरते. किंबहुना निर्भीड सत्यकथनावरच चरित्राचे सामर्थ्य आणि अस्तित्त्व अवलंबून आहे पूर्ण सत्य केवळ अशक्यप्राय होय. तेव्हा व्यक्तिदर्शी घटितांच्या द्वारे जितके अधिकाधिक सत्य प्रकट होईल तितके ते यथार्थ व्यक्तिदर्शनास पोषकच ठरते. चरित्रविषय व्यक्तीचे प्रत्यक्षातले जीवन आणि चरित्रात होणारी त्याची पुनर्निर्मिती यामधे अविकृत संबंध प्रस्थापित व्हावेत म्हणून चरित्रकाराने पूजाप्रवृत्ती टाळली पाहिजे. कौटुंबिक, नैतिक, सार्वजनिक, ऐतिहासिक, धार्मिक आणि जातीय अभिनिवेशांपासून दूर राहिले पाहिजे. भावविवशता, व्यक्तिदर्शनाच्या हेतूशिवाय अन्य हेतूने केलेले लेखन, पूर्वग्रह, एकांकी दृष्टिकोन आणि तादात्म्य या सत्यप्रतिपादनाच्या आड येणाऱ्या गोष्टी टाळल्या पाहिजेत आणि शिवाय मूळ सत्य अविकृत स्वरूपात प्रकट व्हावे म्हणून त्याने अभिव्यक्तीसमयी तटस्थाची भूमिका टिकवून धरणे आवश्यक ठरते.

# तीन

# ' चरित्र आणि इतिहास '

चरित्र हा व्यक्तीच्या सत्य जीवनाचा वृत्तान्त आहे. या अर्थाने व्यक्तीच्या जीवनात जे जे घडले त्याचा तो इतिहास ठरतो. ऑक्सफर्ड शद्बकोशात चरित्राची व्याख्या ' The history of the lives of individual men...' अशी दिली आहे, ती याच अर्थाने. चरित्रात जेव्हा नायकाच्या केवळ व्यक्तिगत जीवनाचे चित्रण होते, तेव्हा या व्याख्येतील ' इतिहास ' या शद्बामुळे फारसे बिघडत नाही. कारण इथे ' इतिहास ' या शद्बाचा अर्थ ' सत्य जीवनाचा वृत्तांत ' असा मर्यादित अर्थानेच घेतलेला असतो. पण सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या वा ऐतिहासिक स्त्री पुरुषांची चरित्रे लिहिताना ' इतिहास ' या शद्बाचा चरित्रापुरता मर्यादित अर्थ लक्षात न घेता घटनांच्या निवेदनाला प्राधान्य देऊन लेखन होते, तेव्हा चरित्रनायकाचे वा नायिकेचे व्यक्तिमत्त्व दडपले जाते. इतिहास चरित्राचा बराचसा भाग बळकावून बसतो. चरित्राचे चरित्रपणच धोक्यात येते. तसे पाहिले तर सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्री पुरुषांच्या जीवनाला जेव्हा सार्वजनिकता व्यापून टाकते, तेव्हा त्याच्या चरित्रात सामाजिक, राजकीय अथवा इतिहास-कालीन व्यक्तींच्या चरित्रात ऐतिहासिक पार्श्वभूमी अपरिहार्य ठरते. अशा परिस्थितीत चरित्राचे चरित्रपण टिकवून धरायचे म्हणजे चरित्रात सामाजिक, राजकीय किंवा ऐतिहासिक पार्श्वभूमी किती असावी असा एक प्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नाच्या अनुषंगाने आणखी काही प्रश्न मनात गर्दी करून सोडतात. चरित्र आणि इतिहास या दोन स्वतंत्र कृती मानता येतील का ? त्या दोन स्वतंत्र कृती असल्यास चरित्र आणि इतिहास या दोहोंमधला फरक कोणता ? चरित्रात नेमका किती इतिहास येणे अपरिहार्य आहे ? ऐतिहासिक लेखनपद्धतीमुळे चरित्राच्या वाङमयीन स्वरूपावर कोणता परिणाम होतो ? चरित्रग्रंथाच्या विस्ताराला कोणते कारण संभवते ? ऐतिहासिक लेखनपद्धतीचा तर तो परिणाम नसेल ? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यापूर्वी चरित्र आणि इतिहास या दोन कृतींमध्ये काही साम्य सापडते की काय ते पाहू या.

व्यक्तीचे जीवन सत्यान्वेषी बुद्धीने कथन करणे हे चरित्राचे उद्दिष्ट. तेव्हा चरित्रकार हा इतिहासकारही असावा लागतो. असे म्हणतात, की इतिहासाची

अगदी तशीच पुनरावृत्ती होत नाही. माणसाची प्रवृत्ती इतिहासापासून धडा घेण्याची असते. इतिहास हा कर्तृत्व करण्याला उत्तेजन देत असतो आणि तसे उत्तेजन देताना मागील चुकांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सूचना देतो. इतिहासामुळे पुढच्या पिढीला मार्गदर्शन लाभते म्हणून History is a philosophy, teaching by example असेही म्हटले जाते. इतिहासाच्या उपयुक्ततेसंबंधाने बेकनने 'History makes men wise.' असे विधान केले आहे. इतिहासाकडून ही जी मार्गदर्शनाची अपेक्षा केली जाते त्यातच चरित्रवाङ्मयाचे बीज आहे. पूर्वजांचे आणि त्यांच्या भव्य, दिव्य कृतीचे पुण्यस्मरण व्हावे, जीवनाला काही वळण लागावे, हे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून कित्येक काळपर्यंत चरित्रे लिहिली गेली. चरित्राचे वाङ्मयीन उद्दिष्ट याहून फार वेगळे असले, तरी इतिहासाप्रमाणेच चरित्रापासून जीवनाला मार्गदर्शन लाभते, ही गोष्ट निर्विवाद आहे.

चरित्राचे विश्व प्रत्यक्षाच्या पायावर उभे राहते. इतिहासात सत्य नसेल तर तो इतिहासच नव्हे. इतिहास आणि चरित्र या दोन्ही कृतींचा भर वस्तुनिष्ठ निवेदनावर असतो. प्रत्यक्ष लेखन करताना लेखकांच्या मानसिक प्रक्रिया प्रामुख्याने वस्तुनिष्ठ असतात. त्यांना सत्यान्वेशी बुद्धीने कथन करावे लागते.

इतिहास हा राष्ट्राच्या सामुदायिक जीवनाचा वृत्तांत आणि ते जीवन गतकालीन असते. चरित्रनायकाच्या बहुधा मृत्युनंतर त्याचे चरित्र लिहिले जाते. इतिहास आणि चरित्र यांचा संबंध काही अपवादात्मक चरित्रे सोडल्यास भूतकाळाशी असतो.

लेखनातील सत्यान्वेषी भेदक दृष्टी, भूतकाळाशी असलेला संबंध आणि दोन्ही कृतींपासून काही शिकता येते, एवढे साम्य सोडल्यास चरित्र आणि इतिहास यामध्ये फार मोठी तफावत आहे.

चरित्र हा इतिहास असला तरी तो केवळ इतिहास नव्हे. त्याचे स्वरूप इतिहासाहून काहीसे भिन्न आहे. ही भिन्नता कोठे व किती प्रमाणात असते, हे तपासून पाहणे आवश्यक आहे. पाश्चिमात्यांकडे फार काळपर्यंत चरित्र ही इतिहासाचीच एक शाखा मानली गेली. याचा अपरिहार्य परिणाम असा झाला की, सुरवातीपासूनच चरित्रातून इतिहास आणि चरित्रे यांचे प्रमाणाबाहेर मिश्रण होत राहिले. चरित्राला स्वतंत्र असे स्थान मिळूच शकले नाही.

पहिल्या शतकाच्या अखेरीस टॅकिटसने (Tacitus) लिहिलेले अॅग्रिकोलाचे (Agricola) चरित्र (५९३ सी. डी.) हे उपलब्ध असलेले सर्वात जुने चरित्र समजले जाते. परंतु या ग्रंथालाही इतिहासच म्हणावे लागते. ऐतिहासिक चरित्रे लिहिताना रोमन चरित्रकारांनी शैली आणि मांडणी या दृष्टीने (Humanism)

---

1– Rawse, A. L. 'The use of History' Hodder and Stoughton 1946, P. 21.

च्या काळात स्यूटोनिअस (Suetonius) या इतिहासकाराचाच आदर्श डोळ्यापुढे ठेवला. फ्लोरेन्स (Florence) मधील उल्लेखनीय व्यक्तींच्या जीवनाचा आढावा घेताना फिलिपो विल्लानो (Fillippo Villani) सी. १३२५–१४०५ याने ऐतिहासिक चरित्रांचा पायंडा पाडला. जिऑर्जिओ वासारी (Giorgio Vasari) (१५११–१५७४)ने लिहिलेल्या 'Lives of the Most Eminent Painters, sculptors and Architects' या चरित्रात व्यक्तींच्या जीवनापेक्षा पार्श्वभूमीलाच प्राधान्य मिळाले आहे.

ग्रीक चरित्रकार आयसोक्रटिस (Isocaates) याने ज्यांना ऐतिहासिक चरित्रे म्हणता येईल, अशी चरित्रे लिहिली. झेनोफोन (Xenophon) ने लिहिलेले ॲगेसिलाउस (Agesilaus) चे चरित्र हे सर्वात जुने ग्रीक चरित्र समजले जाते, परंतु याही चरित्रात इतिहासाचे पारडे जड झालेले आहे.

मध्ययुगात राजेमहाराजे आणि बलाढ्य सैनिक यांचे सामर्थ्य हा ऐतिहासिक चरित्रांचा विषय होऊन बसला. आपल्या पराक्रमांचे अतिरंजित पोवाडे गाण्याकरिता राजेलोक चरित्रकार पदरी बाळगत असत किंवा त्यांना आर्थिक मदत देत असत. अशा चरित्रातून मध्ययुगातील धार्मिक विचारांचे रंग मिसळल्यामुळे चरित्रनायक परमेश्वराचे प्रेषित ठरले. आइन्हार्ड (Einhard) ने लिहिलेले The Life of Charlemagne, जुगर (Suger) ने लिहिलेले The Life of Louis the Fat आणि फ्रेंच वाङ्मयातील सफाईदार म्हणून गणले गेलेले जॉइनविल्ले (Joinville) चे Life of Saint Louis ही या काळातील उल्लेखनीय ऐतिहासिक चरित्रे होत.

डॉ. जॉन ड्रायडन यांनी चरित्र ही इतिहासाचीच एक शाखा मानली. ॲसर (Asser) ने लिहिलेल्या अल्फ्रेड दि ग्रेटच्या चरित्रात बराचसा इतिहास मिसळला गेला, तर डॉ. व्हाइट केनेट (Dr. White Kennet) यांच्या इंग्लंडच्या इतिहासात अनेक चरित्रे लिहिली गेली. बेकनने इतिहासाची काळ, व्यक्ती आणि कृती अशी तीन प्रकारांनी विभागणी केली आणि त्यातच एक प्रकार म्हणून त्याने चरित्राचा उल्लेख केला आहे. इतकेच नव्हे तर जॉन मोर्लेसारख्या अर्वाचीन चरित्रकाराला ग्लॅडस्टनच्या चरित्रात चरित्रापासून इतिहास वेगळा करण्याचे काम अवघड वाटले. चरित्राला लिहिलेल्या प्रस्तावनेत ते लिहितात— 'इतिहास आणि चरित्र यांमधली रेषा आखणे ही चरित्रलेखनात माझ्यापुढें असलेल्या अनेक अडचणीपैकी एक बिकट समस्या होती.'[२] अगदी सुरवातीपासून चरित्र आणि इतिहास यांच्या सीमारेषा पुसटच राहिल्या.

---

2– Morley, John, 'The Life of William Ewart Cladstoue' Macmillan and Co. 1903, Vol. I, Introductson, P. 1.

चरित्र आणि इतिहास यांचे घाट अगदी वेगळे आहेत. त्यांची उद्दिष्टचे फार भिन्न आहेत. चरित्रात इतिहास किती यावा यालाही काही मर्यादा आहे. यासंबंधी चरित्रकारांची लेखनभूमिका त्याकाळी पक्की झाली असावी असे दिसत नाही.

चरित्र आणि इतिहास या दोहोमधला फरक तपासून पाहताना इतिहासाचे मूळ स्वरूप आणि सध्याचे स्वरूप समजावून घेणे अगत्याचे ठरते. ' इति ह आस ' (या प्रकारे पूर्वी अशा अशा गोष्टी घडल्या) असा इतिहास शब्दाचा मूळ अर्थ आहे. इतिहासाची मूळातली कल्पना इतकी व्यापक होती, की त्यात सर्व वाङ्मयाचा समावेश खुशाल करता येई. पशुपक्ष्यादिकांचा, प्राण्यांचा, वस्तूंचा वर्णिलेला समग्र वृत्तांत म्हणजे इतिहास. ही तेव्हाची इतिहासाची कल्पना.

ग्रीक इतिहासकार हीरोडोटस याने त्याकाळी इतिहास म्हणून मानल्या गेलेल्या भाकडकथा काढून टाकून निवडक खऱ्या गोष्टी तेवढ्या वेचून काढल्या. वस्त्रगाळ करून उरलेला इतिहासाचा अंश त्याने चटकदार भाषेत, आकर्षक पद्धतीने वाचकांपुढे ठेवला. अर्थात असे करताना त्याला कल्पनेचा आधार घ्यावा लागला. तथापि इतिहासवाचनाची अभिरुची अशा रीतीने त्याने प्रथम निर्माण केली. इतिहास लेखनात कल्पनाशक्तीला भरपूर वाव मिळाल्यामुळे इतिहासाने साहित्याचे रूप धारण केले.

ग्रीक इतिहासकाराच्या कल्पनेहून थोडी वेगळी कल्पना मेकॉले साहेबांनी मांडली. ज्यामधे काव्य आणि तत्त्वज्ञान यांचे संमिश्रण एक रसत्वाने झाले आहे. अशा ग्रंथाला मात्र इतिहास ग्रंथ म्हणावे, असे इतिहासाचे लक्षण त्यांनी दिले आहे. या लक्षणात काव्याचा स्वीकार केला आहे तो अशासाठी, की विवक्षित इतिहास लेखकाची कल्पना, प्रतिमा अत्यंत उज्ज्वल असावी. गतकालीन गोष्टी त्याच्या कल्पना-मंदिरात अतिस्पष्ट रीतीने प्रकट झाल्या असल्या पाहिजेत. या उज्ज्वल प्रतिमेला तत्त्वज्ञानाची, कार्यकारणाचा शोध लावून घडलेल्या गोष्टी यथार्थ स्पष्ट होतील असे करणाऱ्या शास्त्राची जोड मिळाली; कल्पनेला बुद्धीची, मनोधर्माला ज्ञानधर्माची संगती झाली, अंतःकरण आणि मस्तक, भाव आणि बुद्धी एकरूप झाली; म्हणजे इतिहास शुद्धस्वरूपी होतो. गतकालीन गोष्टीस कल्पनेने वर्तमानकालीन करणे, दूर असेल त्यास निकट करणे, प्रत्येक वस्तूची योग्यता आणि कार्यकारणभाव पाहून त्या त्या वस्तूला योग्य स्थानापन्न करणे आणि कोणत्या कारणगोष्टीपासून कोणत्या कार्यगोष्टी निष्पन्न झाल्या त्यांचा यथार्थ नकाशा तयार करून वर्तमानकालाने कोणती दिशा घ्यावी याचा अंदाज करणे, हे मेकॉलेने इतिहासकर्त्याचे आद्य कर्तव्य मानले.

थुसिडायडीजने हिरोडोटसच्या इतिहासकल्पनेस आणखी आकुंचित करून इतिहासात फक्त राजकीय घडामोडींचाच समावेश केला. आणि सध्याच्या राजकीय

इतिहासाची बैठक तयार झाली. थुसिडायडीजने इतिहासात सत्याचा अचूकतेचा आग्रह धरला 'ऐतिहासिक कृतीचें चिरस्थायित्व आणि टिकाऊपणा लौकिक कथनातून होणाऱ्या रंजनापेक्षा त्यातल्या विधानांच्या अचूकतेवर अवलंबून असावा.'[३] विचाराधीन असलेल्या मुद्यांचा अचूकपणा हा इतिहासाचा पाया आहे. ही विचारसरणी त्याने ठामपणे मांडली. उपलब्ध असलेल्या सामग्रीची समर्पकता, बारीकसारीक तपशिलावरचे प्रभुत्व आणि निवेदनाच्या ओघात तपशीलाला गौण स्थान देण्याचे कसब, या गोष्टींचाही त्याने पाठपुरावा केला. थुसिडायडीजने इतिहासाला शास्त्रीय स्वरूप देण्याच्या दृष्टीने निर्णयात्मक पाऊल टाकले यात शंका नाही.

इतिहासात अचूकतेबरोबरच सत्याचा आग्रह धरला गेला, त्यामुळे इतिहासाला निश्चित असे शास्त्रीय स्वरूप मिळत गेले. इतिहास मंदिरात सत्य हेच दैवत मानले पाहिजे, या मताचा पुरस्कार करणारा पॉलिबिअस (Polybius) हा आणखी एक इतिहासकार होता; 'जिवंत प्राण्याचे डोळे काढून घेतले म्हणजे तो जसा निरूपयोगी ठरतो, तसे इतिहासातले सत्य जर तुम्ही काढून घेतले तर बाकी उरते ती कसलाही फायदा नसलेली कथा.'[४] असे प्रतिपादन त्याने केले.

इतिहास म्हणजे प्राचीन राजकारण आणि राजकारण म्हणजे अर्वाचीन इतिहास असे इतिहासाचे एक लक्षण फ्रीमन नावाने इतिहासकार सांगतात. अर्थातच यांचे राजकारण म्हणजे स्वसमाजात येणाऱ्या लौकिक, राजकीय, आर्थिक, नैतिक, धार्मिक इत्यादी सर्व घडामोडींचा संग्रह होय. या प्रमाणे दोन्ही लक्षणे मिळून गतकालीन गोष्टींचा यथार्थ व प्रमाणशुद्ध शास्त्रीय चित्रपट असे इतिहासाचे एक लक्षण सिद्ध होते.

मानवी जीवनातील घटनांबरोबरच इतिहासाच्या कक्षेत निसर्ग येताच पदार्थ विज्ञानासारखे शास्त्र इतिहासाच्या पंक्तीला येऊन बसले. 'व्यापक अर्थाने इतिहास, म्हणजे जे काही घडले आहे ते, केवळ मानवी जीवनातील अपूर्व गोष्टीच नव्हेत तर निसर्गातील गोष्टीही स्थित्यंतर घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा त्यात समावेश होतो आणि आधुनिक शास्त्राने दाखवल्याप्रमाणे पूर्णपणे अचल असे काहीच नसते आणि म्हणूनच संपूर्ण विश्व आणि त्यातल्या प्रत्येक भागाचा स्वतःचा इतिहास असतो.'[५] ही ब्रिटनच्या विश्वकोशामधील इतिहासाची व्याख्या पाहिली

3— 'History, Its rise and development' The Encyclopedia Americana, Vo 1. 14. P. 208.

4— 'History', Encyclopaedia Britannica, Vol. II, P. 594.

5— ,, Vol. 11, P. 594.

म्हणजे इतिहासाला कसे व्यापक आणि शास्त्रीय स्वरूप मिळाले आहे, याची कल्पना येते

इतिहासाच्या पंक्तीला पदार्थ विज्ञानासारखे शास्त्र येऊन बसले. याचा अर्थ असा, की इतिहासाचे क्षेत्र व्यापक झाले आहे. मात्र वर इतिहासाला शास्त्र म्हटले ते मर्यादित अर्थानेच. इतिहास म्हणजे तंतोतंत पदार्थ विज्ञानासारखे शास्त्र नव्हे. मनुष्यजातीचा अभ्यास करणे आणि पदार्थाचे गुणधर्म शोधून काढणे यात फरक आहे. पदार्थाच्या एका घटकाचे जे गुणधर्म तेच सगळ्या घटकांचे असतात. एका पक्षाच्या सवयीसंबंधाने जे विधान करता येईल, तेच सर्वसाधारणपणे इतरांच्या बाबतीतही करता येईल. परंतु मानवी जीवनाचे तसे नाही. एका माणसाच्या किंवा समूहाच्या इतिहासावरून दुसऱ्या माणसाच्या किंवा समूहाच्या इतिहासाचा उलगडा होत नाही. माणसाच्या जीवनाचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करणे अवघड असते, कारण मानवी जीवनात गुंतागुंत आणि विविधता फार आणि एका माणसाच्या जीवन इतिहासावरून समूहाच्या इतिहासाचे अनुमान करणे अशक्य असते. इतिहासातली घटिते नर्मदेतील गुळगुळीत वाटोळ्या गारगोट्यांसारखी स्वतंत्र नसतात. इतिहासातल्या घटितामध्ये प्रयोजकता असते. ती कार्यकारणभावाने एकमेकाशी जखडलेली असतात. इतिहासात कार्यकारणभावाने बांधलेल्या घटितांच्या आधारे सामान्य विधाने केलेली असतात. ही घटिते एकमेकात गुंतलेली, गूढ असल्यामुळे एकमेकापासून अलग करणे कठीण जाते आणि म्हणूनच इतिहासातल्या घटितांमध्ये जीवनातली गूढता, सूक्ष्मता आणि लवचिकपणा आढळतो. इतिहासातील घटिते एकमेकांपासून अलग करून स्वतंत्रपणे त्यांचा अर्थ लावणे असते. इतिहासाच्या अभ्यासात प्रत्यक्ष शास्त्रांची विशिष्ट, पद्धत निरुपयोगी ठरते. वर इतिहासाला शास्त्र म्हटले ते एवढ्याच अर्थाने की इतिहासात शास्त्राची अचूकता ज्ञानाची पद्धतशीर रचना आणि काटेकोर वस्तुनिष्ठा असते.

हेरोडोसच्या कल्पनेप्रमाणे इतिहास लेखनात कल्पनाशक्तीला भरपूर वाव मिळाल्यामुळे इतिहासाने साहित्याचे रूप धारण केले. परंतु पुढे हळू हळू इतिहास लेखनातील वस्तुनिष्ठा वाढत गेली. कधी इतिहासाचे क्षेत्र संकुचित झाले, तर कधी ते विस्तार पावले इतिहासात कलात्मकसिद्धीच्या अपेक्षेला मर्यादा पडत गेल्या आणि अखेरीस इसिहासाचे शास्त्र झाले. 'समाजशास्त्राच्या दुसऱ्या कुठल्याही शाखेपेक्षा इतिहास आपल्या अस्तित्वावर कला म्हणून हक्क सांगू शकत नाही. इतिहासातील कलात्मक सिद्धिची अपेक्षा बाळगली तरी शास्त्रीय अचूकता आणि विधायक विचार यापेक्षा कलात्मकतेचे महत्त्व गौणच ठरते. वस्तुतः, इतिहास

लेखनाची प्रगती म्हणजे कलेपासून शास्त्र या पदवीपर्यंत झालेला विकास असेच मानले पाहिजे.'[६]

इथे एक गोष्ट मुद्दाम लक्षात घेतली पाहिजे ती अशी की, इतिहास म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कितीतरी लेखनाला अनेकदा साहित्याचा दर्जा प्राप्त होतो, असा आपला अनुभव आहे. गिबनचा रोमन साम्राज्याचा इतिहास हा एक साहित्य-ग्रंथ आहे, अशीच रसिक वाचकांची साक्ष आहे. पण इतिहास हा ज्या प्रमाणात साहित्याचे रूप धारण करू लागतो, त्या प्रमाणात त्याचे इतिहास या दृष्टीने महत्त्व, त्याने प्रतिज्ञेने स्वीकारलेले वस्तुनिष्ठ स्वरूप कमी होऊ लागते. मराठी सारस्वताचा एक बहुमोल अलंकार असलेले बखरगद्य ह्याचे उत्तम उदाहरण आहे. ऐतिहासिक दृष्टया महत्त्वाच्या ठरणाऱ्या एखाद्या अस्सल कपटयाइतकेही मोल बखरींना द्यावयाला इतिहासाचार्य राजवाडे तयार नाहीत. साहजिकच इतिहासाचे वस्तुनिष्ठ स्वरूप टिकवून धरताना इतिहासात कलेला गौणस्वरुप प्राप्त होते.

इतिहास हे मर्यादित अर्थाने शास्त्र ठरले, तर इतिहासाची शाखा म्हणून गणले गेलेले चरित्र इतिहासापासून दूर होत गेले आणि वाङ्मयाची शाखा म्हणून त्याचे स्थान निश्चित होत गेले.

प्लूटार्कने पहिल्यांदा चरित्र आणि इतिहास या दोन स्वतंत्र कृती मानल्या. चरित्राच्या मूलभूत उद्दिष्टासंबंधी त्याची कल्पना अगदी स्पष्ट होती. अलेक्झांडरच्या चरित्राच्या प्रारंभी त्याने केलेले निवेदन चरित्राची वाङ्मयविषयक मूल्ये ठरविताना मार्गदर्शक ठरले. तो म्हणतो, ' एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती अशी की, माझा हेतू इतिहास लिहिण्याचा नसून जीवनचरित्रे लिहिण्याचा आहे, अतिविख्यात महत्कृत्ये आपल्याला नेहमीच माणसांमधल्या सद्गुण, दुर्गुणाचा स्पष्ट शोध लावून देतात असे नाही. केव्हा, केव्हा कमी महत्त्वाची गोष्ट, एखादी उक्ती किंवा थट्टा त्यांचा स्वभाव आणि प्रवृत्ती याबद्दल सुप्रसिद्ध वेढे, मोठमोठी सैन्ये आणि घनघोर युद्धे यापेक्षा अधिक उत्तम माहिती पुरवितात.'[७] त्याने लिहिलेल्या (Parallel lives) या चरित्राच्या लेखनातून उदित झालेली वाङ्मयविषयक मूल्ये आधुनिक चरित्र-वाङ्मयाच्या मूल्यांशी मिळतीजुळती आहेत.

प्लूटार्कने चरित्रनायकाच्या व्यक्तिगत जीवनाच्या चित्रणाला प्राधान्य दिल्यामुळे चरित्र आणि इतिहास या दोन कृतीमधील भिन्नता तर स्पष्ट झालीच. पण

---

6– ' History, Its rise and development,' The Encyclopaedia Americana 1947, Edition, Vol. 14, P. 206.

7– O ' Neill Edward H. ' A History of American Biography 1800–1935, Philadelphia 1935, P. 4.

त्याचबरोबर त्याने लिहिलेल्या चरित्राला वाङ्मयीन थाट प्राप्त झाला. ड्रायडेनच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे अशा चरित्रात, ' चरित्रनायकाच्या खाजगी बिऱ्हाडात तुम्हाला प्रवेश मिळतो, तुम्ही त्याला खाजगी पोषाखात पहाता आणि त्याच्या अत्यंत खाजगी वृत्ती आणि संभाषण यांचा तुम्हाला परिचय घडतो. तुम्ही सिप्यो (Seipio) आणि लॅलिअस (Laelius) यांना समुद्रकिनारी कालव्यांसारखे शिंपीतील मासे गोळा करताना पाहू शकाल, ऑगस्टसला (Augustus) बॉइज (Boyes) बरोबर ' व्राऊन्डींग स्टोन्स ' खेळताना आणि ॲगेसिलाउस (Agesilaus) ला आपल्या मुलांबरोबर घोड्यावरून फेरफटका मारताना पाहू शकाल.'[८]

चरित्र नायकाच्या जीवनातील वरवर महत्त्वाच्या सुव्यक्त व अर्थपूर्ण वाटणाऱ्या घटनांच्या द्वारे त्याच्या स्वभावविशेषांची उकल होईलच असे नाही. आणि म्हणूनच प्लूटार्क चरित्र नायकाच्या खाजगी जीवनात डोकावून वरवर क्षुद्र भासणाऱ्या, परंतु त्यांच्या स्वभावविशेषांचे यथार्थ दर्शन घडविणाऱ्या घटनांचा मागोवा घेत असे. मोठ्या कार्यात जे व्यक्तित्वाचे मर्म आढळत नाही, ते अगदी लहान गोष्टींतच नेमके सापडते आगि ज्याला या तरल छटा सूक्ष्मतेने टिपता येतात तोच यशस्वी चरित्रकार होतो. चरित्रनायकाच्या स्वभावाचे धागेदोरे उकलताना प्लूटार्कचे मन त्यांच्या मानसिक तेजाने वेधून घेतले आणि त्याच्या चरित्रात व्यक्तिदर्शनाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. व्यक्तिजीवनाचा इतिहास आणि राष्ट्राचा इतिहास या दोन इतिहासातील भिन्नता ही अशी व्यक्तीचे जीवन जाणून घेण्याच्या इच्छेतून निर्माण झाली आहे.

इतिहास लिहीत असताना लेखक प्रामुख्याने चरित्र लिहीत नसतो आणि चरित्र लिहीत असताना तो प्रामुख्याने इतिहास लिहू शकत नाही. चरित्रात महत्त्व असते ते व्यक्तिजीवनाला. चरित्रात घटनांना अर्थ प्राप्त झालाच तर तो व्यक्तिजीवनाच्या संदर्भात. इतिहासात महत्त्व असते ते केवळ घटनांना. अर्थातच इतिहासात व्यक्तींना गौण स्थान प्राप्त होते. तिथे घटनांच्या संदर्भात व्यक्ति जीवनाला अर्थ लाभतो. कारण व्यक्ती इतिहास घडवितात हे जरी खरे असले तरी इतिहासाच्या निर्मितीला व्यक्तीच्या कृतींबरोबरच इतर अनेक अधिक शक्ती कारणीभूत होतात, हे विसरून चालणार नाही. व्यक्तीबरोबरच शास्त्रीय प्रगती, आर्थिक प्रश्न, सामाजिक, भौगोलिक परिस्थिती इत्यादी घटक इतिहासाच्या

8- Pinto, Vivian D. Sola, ' English Biography in the Seventeen, Century ' 1951, P. 14. Also included in– Clifford, James L. ' Biography as an Art,' Oxford University Press 1962, BP. 18–19.

निर्मितीला हातभार लावतात. चरित्रात या घटकांचे अस्तित्व केवळ व्यक्ति-जीवनापुरते मर्यादित असते. चरित्रात व्यक्ती हाच मध्यबिंदू कल्पून त्याभोवती सर्व गुंफण करावी लागते. इतिहासात घटना केंद्रस्थानी असतात आणि व्यक्ती त्या घटना घडवितात. परंतु त्या घटनांची निर्मिती होत असताना व्यक्तीचे जीवन कसे उजळून निघाले हा भाग इतिहासकारांच्या दृष्टीने गौण ठरतो, त्याचे सारे लक्ष केंद्रित होते ते केवळ त्या घटनांच्यावर, त्या घटनांचा अन्वयार्थ लावण्याकडे, त्या घटनांशी निगडित असलेले व्यक्तीचे जीवन इतिहासकाराच्या दृष्टीने कमी महत्त्वाचे असते. या उलट चरित्रकार त्या जीवनाचेच चित्र रेखाटीत असतो.

इतिहासात सर्व समाजाचे जीवन अभिप्रेत असते. चरित्रात एका व्यक्तीच्या जीवनाचा समावेश होतो तर इतिहासात समष्टीचे जीवन सामावलेले असते. इतिहासकाराला सामुदायिक चळवळींची दखल घ्यावी लागते. ज्या सामुदायिक चळवळीतून राजकीय, सामाजिक घटना अथवा संस्था घडविल्या जातात, त्या राजकीय घटना, संस्थांशी त्याचा संबंध येतो. चरित्रकाराच्या दृष्टीने सामुदायिक जीवन गौण ठरते. सामुदायिक जीवनातील एक अनन्यसाधारण घटक तो वेगळा काढतो आणि त्याचे जीवनचित्र रेखाटतो. चरित्रकार व्यक्तीला जणू सूक्ष्मदर्शक यंत्राखाली धरून तिची तपासणी करीत असतो, तर इतिहासकार दूरदर्शकातून अखिल मानवजातीचे अवलोकन करतो.

चरित्रकार व्यक्तीच्या स्वभाव विकासाचे आलेखन करतो. इतिहासकार विचारप्रवाहांच्या विकासाचे आलेखन करतो. राष्ट्राच्या जीवनात औद्योगिक क्रांती-सारखी स्थित्यंतरे घडतात. त्यामुळे सामुदायिक जीवनाची घडीच पार बदलून जाते. माणसाच्या जीवननिष्ठा बदलतात. इतिहासकार ही स्थित्यंतरे आणि जीवनावर होणारा त्यांचा परिणाम यांचा परामर्ष घेतो.

'...व्यक्तींच्या सामाजिक, राजकीय जीवनातील विकासावर अचूक परिणाम साधणाऱ्या भूतकाळातील अपूर्व गोष्टी, त्यांच्या यदृच्छाजात अनुक्रमाने निश्चित करणे अथवा व्यक्त करणे, हा इतिहासाचा प्रांत आहे.'[९] राष्ट्राच्या म्हणा किंवा एखाद्या संस्थेच्या जीवनात संघर्षाचा काळ येतो. त्या संघर्षातून परिवर्तन घडते. ज्या तत्त्वप्रणालीमुळे, विचार प्रवाहामुळे हे परिवर्तन घडते, त्या विचारप्रवाहामुळे राष्ट्राची प्रगती झाली की अधोगती झाली, याचा अंदाज घेऊन राष्ट्राच्या विकासाचे चित्र उभे करणे, हा इतिहासाचा प्रांत आहे. फ्रान्सच्या इतिहासात फ्रेंच राज्यक्रांती आणि त्या क्रांतीमधून उदयाला आलेली लोकशाहीची मूल्ये यांना महत्त्वाचे स्थान मिळते. लोकशाही आणि समाजवादाचा अंगीकार

---

9– Dunniuig, William A. ' Truth in History and other essays, New York Morningside Heights, 1937, P. 4.

केल्यामुळे काही राष्ट्रांची प्रगती झाली, तर नाझीवादाच्या प्रभावामुळे काही काळ जर्मनीची पिछेहाट झाली. त्या त्या राष्ट्रांच्या इतिहासात या विचार-प्रवाहांची दखल घेतली जाते. उलट, व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत पसरलेल्या जीवनातील तारांबळ, धडपड, सिद्धी, यशापयश, सुखदुःख, यांचा मागोवा घेणे हा चरित्राचा प्रांत आहे.

इतिहासात कालक्रमाने घटनांची नोंद असते. इतिहासकाराने एक विशिष्ट कालखंड आपल्या डोळ्यापुढे धरलेला असतो.'...चरित्र म्हणजे चरित्रनायकाच्या आयुष्याचा शकावलीवजा इतिहास नव्हे किंवा त्याच्या जीवनकार्याशी निगडीत झालेल्या एकंदर कालखंडाचा इतिहास नव्हे, किंवा त्याची पत्रे, संकीर्ण टिपणे व्याख्याने इत्यादिकांचा संग्रहही नव्हे...'[१०] तर तो एक अंतरंगाचा परिचय असला पाहिजे असाच चरित्रलेखनाचा हेतू रा. प्र. कानिटकरांनी सांगितला आहे. इतिहासातले कालमहात्म्य चरित्रात नसते. चरित्रात असते ते व्यक्तिमहात्म्य इतिहासातून विशिष्ट कालखंडातील घटनांचे स्पष्ट चित्र वाचकांच्या डोळ्यापुढे उभे रहावे आणि त्या घटनांच्या द्वारे त्या कालखंडाला जो विशिष्ट अर्थ प्राप्त होतो तो चटकन् वाचकांच्या ध्यानी यावा. चरित्रातून चरित्रनायक सतत वाचकांच्या डोळ्यापुढे उभा राहिला पाहिजे. व्यक्तीच्या जीवनाद्वारे एरवी निरर्थक वाटणाऱ्या मानवी जीवनाला जो अर्थ प्राप्त होतो तो वाचकांच्या ध्यानी यावा. 'चरित्र हे ऐतिहासिक कालखंडाची ओळख करून घेण्याचे उत्तम साधन क्वचितही ठरत नाही. कोणत्याही शकाचा मानवी अर्थ पूर्ण करण्याचे ते एक नित्याचे उत्तम साधन आहे.'[११]

इतिहासाचा पसारा फार मोठा असतो. इतिहासकार दूरवर दृष्टी पोहचविण्याचा प्रयत्न करीत असतो. इतिहासात शक्यतो अधिकाधिक घटिते समाविष्ट केली जातात. इतिहासात घटिते सहजासहजी नाकारली जात नाहीत. नाकारण्यापूर्वी घटितांची कसून तपासणी व्हावी लागते. 'अतिनिवड आणि अतिसंक्षेप ही इतिहासातल्या विपर्यासाची मुख्य कारणे आहेत. कोणतेही घटित वगळण्यापूर्वी त्यामुळे कोणतीही भर पडत नाही याची इतिहासकाराने पक्की खात्री करून घेतली पाहिजे. इतिहासकाराला दर्शनी अप्रस्तुत भासणारे घटित खरोखरीच

---

१०– कानिटकर रा. प्र. 'कवींद्र रवींद्रनाथ टागोर,' चित्रशाला प्रेस, पुणे नंबर ३, फेब्रुवारी १९.२, प्रस्तावना, पृ. २.

11– Nevins, Allan. 'Gateway to History,' D. Appleton–Century Company, 1933, P. 341.

अप्रस्तुत आहे, की नाही हे ठरवावे लागते.[१२] इतिहासात अधिकाधिक घटिते सामावून घेतली जातात, याचे कारण इतिहासाकडून पूर्ण सत्याची अपेक्षा असते. सत्य हे इतिहासाचे जीविततत्त्व आहे.' सत्य हा इतिहासाचा आशय आणि सत्य शोधन हे इतिहासाचे उद्दिष्ट आहे.[१३] मात्र इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती अशी, की इतिहासातले सत्य म्हणजे वज्रलेख नव्हे. तथापि इतिहासाच्या सर्व संग्राहक शास्त्रीय स्वरूपामुळे इतिहासात पूर्ण सत्याची अपेक्षा चरित्रापेक्षा अधिक असते. आणि म्हणूनच इतिहासात निर्मळ सत्याला महत्त्वाचे स्थान असते. सामाजिक राजकीय वा ऐतिहासिक घटनांच्या निवेदनातून चित्रित होणाऱ्या पार्श्वभूमीला प्राधान्य देणाऱ्या ऐतिहासिक लेखनपद्धतीमुळे ग्रंथविस्तार अमर्याद होतो, याचे कारण घटितांच्या निवडीचा अभाव हेच होय.

चरित्रात फक्त व्यक्तीवर प्रकाश झोत टाकलेला असतो. चरित्राचा संबंध व्यक्ती आणि व्यक्तीच्या जीवनातील घडामोडी एवढ्यापुरता मर्यादित असतो. चरित्राचा पट व्यक्तीच्या जीवनावर अवलंबून असतो. चरित्रात घटितांची निवड ही अत्यंत आवश्यक बाब असते. त्यामुळे चरित्राचा जीवनपट मर्यादित राहतो. चरित्रात घटितांचा सहजासहजी समावेश होत नाही. केवळ स्वभावदर्शनास, व्यक्तीदर्शनास उपयुक्त तेवढीच घटिते स्वीकारली जातात. चरित्रातले सत्य प्रत्यक्षाशी जुळणारे असते. चरित्राचा विचार करताना त्या त्या व्यक्तीचे संपूर्ण सत्य व यथार्थ असेच व्यक्तिमत्त्व आपणाला दिसावे अशी अपेक्षा असते. परंतु शुद्ध शास्त्रीय सत्याचा निकष हाती घेऊन जर आपण अधिकाधिक विचार करू लागलो तर मात्र आपणाला ही अपेक्षा पुष्कळशी शिथिल करावी लागते. मृत चरित्र-नायकाच्या बाबतीत लेखक त्याच्या पुढे पसरलेल्या कागदपत्राचा गुलाम असतो. ती कागदपत्रे आणि अन्य साधने यांच्याद्वारे नायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे लेखकाच्या बुद्धीला जसे आकलन होईल तसे ते व्यक्तिमत्त्व चित्रित होणार. समकालीन नायकाच्या बाबतीत तो बराचसा भाग्यवान असतो. पण इथेही नायकाच्या मनाचा ठाव घेता येत नाही. चरित्रनायकाच्या कृति–उक्तींचा संग्रह त्याच्या हाताशी असतो आणि त्याच्या आधारावर नायकाच्या मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न चरित्र-

---

12– Wedgwood C. V. ' Art, Truth and History,' The London Magazine, May 1959 p. 37–39, 44–46, reprinted in ' Truth and Opinion,' London : Collins 1960. Also reprinted by Clifford, James L. ' Biography as an Art,' 1962, P. 218.

13– Dunning William A. ' Truth in History and other essays ' New York : Morning side Heights, 1937, P. 3.

कार करीत असतो. अपुरेपणा व काहीशी अविश्वसनीयता ही त्याच्या संग्रहाची वैशिष्टे, तर अमूर्तपणा आणि बहुरंगीपणा हे मानवी मनाचे गुणधर्म! मनुष्य जितक्या गोष्टी बोलतो, त्यापेक्षा त्याच्या पुष्कळ गोष्टी मूक राहतात. त्याच्या जितक्या गोष्टी आपल्याला माहीत असतात, त्यापेक्षा पुष्कळ गोष्टी अज्ञात राहतात. मग इतक्या अल्प साधनातून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे कितीसे स्वरूप चरित्रकाराच्या आकलनात सामावू शकेल? आणि म्हणूनच चरित्रात पूर्ण सत्याच्या अपेक्षा प्रत्यक्षात अशक्य ठरतात. पूर्ण सत्याच्या बाबतीत पडणारी मर्यादा आणि घटितांची निवड यामुळे चरित्र आटोपशीर आणि बांधेसूद होते.

टिळक चरित्रात केळकरांनी घटितांची पाखड निवड अशी केलीच नाही. टिळकांच्या राजकीय जीवनातील अधिकाधिक क्षण वेचले, चरित्रात अधिकाधिक घटिते सामावून घेतली, त्यामुळे टिळकांचे व्यक्तिमत्त्व आकार न घेता चरित्राचा नुसताच विस्तार झाला. या उलट, ना. सी. फडके यांनी लिहिलेल्या दादाभाई नौरोजींच्या चरित्रात नायकाच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश फेकणाऱ्या घटितांची अचूक निवड करून व्यक्तिदर्शन यथार्थपणे घडविण्याचा प्रयत्न झाल्यामुळे आटोपशीरपणा, बांधेसूदपणा ही त्या चरित्राची लक्षणीय वैशिष्ट्ये ठरतात.

इतिहास म्हणजे केवळ वृत्तांत निवेदन. इतिहासातल्या केवळ शास्त्रीय दृष्टीमुळे सत्य घटनांची कालक्रमानुसार नोंद होते आणि म्हणूनच तो बहुधा निर्जीव ठोकळ्यासारखा होतो. त्यातल्या तपशीलाची रुक्षता जाणवते. इतिहास ग्रंथाच्या पानापानातून त्याचे निर्जीवत्व भासते. चरित्रात घटनांपेक्षा घटनांचा निर्माता महत्त्वाचा असतो. चरित्रात व्यक्तीच्या जीवनातील निरनिराळ्या घटनांच्या प्रत्यक्ष वर्णनापेक्षा त्यात प्रतीत होणाऱ्या व्यक्तीच्या स्वभावविकासाला अधिक महत्त्व असते. घटनांशी निगडीत असलेले व्यक्तीचे जीवन त्या घटनांच्या निर्मितीत कसे उजळून निघाले, त्या घटनांच्या निर्मितीला व्यक्तीच्या कोणत्या अंतःप्रेरणा कारणीभूत झाल्या, त्या विशिष्ट परिस्थितीत व्यक्ती कशी वागली याची नोंद चरित्रात झाली म्हणजे चरित्रातला रूक्ष तपशील गळून पडतो. घटना बोलक्या होतात. व्यक्ती सजीव वाटतात.

द. ब. पारसनीस यांनी लिहिलेल्या महाराणी लक्ष्मीबाईच्या चरित्रात १८५७ च्या बंडानंतर ओरछाचा नबाब नथेखा याने झाशीवर हल्ला चढविला, या घटनेची नुसती नोंद करून पारसनीस थांबले नाहीत. नथेखाला लक्ष्मीबाईनी पाठविलेले पुढील उत्तरही त्यांनी नोंदले आहे: 'मी शिवराम भाऊंची सून आहे. तुमच्यासारख्या बुंदेले लोकांस बायका करून सोडण्याचे सामर्थ्य माझ्या अंगी आहे. ह्याकरिता दूरवर विचार करून युद्धास सिद्ध व्हा.' (पृ. १३८). अशा व्यक्तिदर्शी तपशिलातून लक्ष्मीबाईच्या व्यक्तिमत्त्वावर लख्ख प्रकाश पडतो आणि एरव्ही रुक्ष वाटणारी घटना बोलकी होते. लक्ष्मीबाईच्या व्यक्तिचित्रणात त्यामुळे जीव भरतो.

इतिहास चरित्रापेक्षा नीरस होतो. चरित्र अधिक सरस होते. याचे आणखी एक कारण असे आहे की, चरित्रात वाचकांचे अवधान एकाच व्यक्तीभोवती केंद्रित केले जाते. नायकाशिवाय अन्य व्यक्तींना गौणस्थान प्राप्त होते. त्यामुळे परिणामाची एकात्मता साधली जाते. वाचकांच्या मनावर व्यक्तिमत्त्वाचा ठसा ठसठशीत उमटतो. काशिबाई कानिटकरांनी लिहिलेले डॉ. आनंदीबाई जोशींचे चरित्र सरस बनले याचे कारण त्या चरित्रात आनंदीबाईंच्या जीवनाशिवाय अन्य गोष्टींना महत्त्वाचे स्थान मिळत नाही. सुरवातीपासून शेवटपर्यंत आनंदीबाई ही एकच व्यक्ती वाचकांच्या डोळ्यापुढे सतत उभी राहते. जॉन ड्रायडनचे विचार या मुद्याच्या मुळाशी हात घालणारे आहेत. तो म्हणतो; 'जेव्हा जाणीव एकाच गोष्टीवर एकाग्र आणि एकचित्त होते, तेव्हा ती ध्येयाच्या आसपास नेऊन पोचवते. विषयाचा प्रत्येक भाग जाणिवेत बुडतो आणि तो विषय स्पष्टपणे, पूर्णपणे अंतःकरणावर ठसतो. ॲरिस्टॉटल याकरिता कवितेत कृतीच्या एकात्मतेची शिफारस करतो, कारण मनाला एकदम अनेक गोष्टी पचविता येणे शक्य नाही. अथवा एकाच वेळी एकापेक्षा अधिक कल्पना पूर्णपणे ग्रहण करणे शक्य नाही. आनंद विचलित करणाऱ्या कोणत्याही गोष्टीमुळे तो कमी होतो आणि वाचकांचा अनेकांच्यापेक्षा एकाच माणसाच्या सुखदुःखांशी अधिक संबंध असल्यामुळे, लेखकाने स्वतःला या मर्यादित क्षेत्राशी निबध्द करून घेतले तर त्याला एका संपन्न कृतीची निर्मिती शक्य व्हावी.'[१४]

चरित्र ही व्यक्तिजीवनाची कथा. समूहाची सुख दुखे अंतकरणाला भिडत नाहीत. ती अनेकांत विभागली जातात. त्यामुळे त्यांची आच कमी होते. त्यांच्या-बद्दल एक प्रकारचा दुरावा वाटतो. व्यक्तींच्या सुखाने मन सुखावते आणि दुःख काळजाचा ठाव घेते. व्यक्तीची सुखदुःखे एकेकटयाचीच असतात त्यामुळे त्यांची तीव्रता जाणवते. डॉ. आनंदीबाई जोशीचे चरित्र वाचीत असताना त्यांच्या शैक्षणिक ध्येयपूर्तीमुळे आनंद होतो. तर अकाली मृत्यूची हळहळ वाटते. आनंदीबाई बोटीत बसल्यानंतर गोपाळरावांच्या मनाला पीळ पडतो. वाचकांच्या मनालाही ती वेदना जाणवते. मिशनरी बायांकडन आनंदीबाईंचा छळ झाला. आपले सत्त्व टिकवून धरताना त्यांना असह्य यातना झाल्या, त्यातूनच पुढे मृत्यू ओढवला. त्यांचा दुःखद शेवट मन सुन्न करून टाकतो.

व्यक्तीचे जीवन सत्यान्वेषी बुद्धीने कथन करणे हे चरित्राचे उद्दिष्ट,

---

14– John Dryden. 'The life of Plutarch,'prefixed to Plutarch 's Lives, Translated from the Greek by Several Hands (1683–6), Vol. 1. Reprinted by Ciifford, James L. 'Biography as an Art' Oxford University Press 1962, P. 18.

पूर्णसत्याच्या संदर्भात काहीशी शिथिल झालेली सत्याची मर्यादा, तंत्राचा भाग म्हणून मुद्दाम जाणीवपूर्वक केलेली घटितांची निवड, अंतरंगातले भावदर्शन आणि व्यक्तिमत्त्वाचे अणूरेणू एका आकृतिबंधात सजीव करण्याची जाणीव यामुळे चरित्राला ' प्रतिज्ञेने इतिहासाला जवळचे परंतु वाङ्मय ' असे काहीसे आगळेच रूप लाभले आहे.

चरित्र आणि इतिहास या दोहोमधला फरक आकलन झाला म्हणजे न. चि. केळकरांनी लिहिलेल्या टिळक चरित्राचे अपयश ऐतिहासिक लेखन पद्धतीत आहे. याबाबत शंका उरत नाही. टिळक चरित्रात टिळक ही व्यक्ती नसून चालती-बोलती संस्था आहे. चरित्राला त्या संस्थेच्या अहवालाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. चरित्र ही वाङ्मयाची शाखा आहे. हा विचार एकदा मान्य केला, म्हणजे मग चरित्राला अहवालाचे स्वरूप प्राप्त व्हावे, ही त्या चरित्राला वाङ्मयीन दृष्टचा हीणकस ठरविणारी बाब ठरते. मग हे असे का व्हावे ? या प्रश्नाचे उत्तर असे आहे, की टिळकांचे जीवन अनेक राजकीय, सामाजिक चळवळींनी व्यापलेले होते. त्यांच्या चरित्रात राजकीय, सामाजिक इतिहास येणे अपरिहार्य होते. त्या दृष्टीने पाहिले तर टिळक चरित्रात इतिहास आलाही फार चांगली गोष्ट झाली. पण इथे नुसती ऐतिहासिक घटितांची नोंद होते. टिळकांचे व्यक्तिमत्त्व आकार घेत नाही. इतिहासकथनात केळकर इतके रंगून जातात, की इतिहासातले फोलपट त्यांना दूर सारता येत नाही. एखाद्या माणसाला अवास्तव महत्त्व दिले म्हणजे तो डोक्यावर चढून बसतो. टिळक चरित्रात इतिहास अक्षरश: डोईजड झाला आहे. चरित्र वाचत असताना कित्येकदा असे वाटते, की इतिहास आपल्या मर्यादेत राहाता तर फार बरे झाले असते. कोणत्याही चरित्रातील राजकीय किंवा सामाजिक इतिहास (असला तर) उणे केला म्हणजे उरते ते फक्त जीवनदर्शन. टिळक चरित्रात इतिहासाने आपली पायरी सोडली आणि जीवनदर्शन दुष्प्राप्य झाले. या ग्रंथात इतिहास अमर्यादपणे पसरला आहे. तो इतका, की काही काही प्रकरणे स्वतंत्र निबंधवजा वाटतात, टिळक या व्यक्तीपुढे इतिहासाचा पडदा सतत उभा राहिल्यामुळे जीवनदर्शन अपूर्ण राहिले आहे, केळकरांना अनावश्यकाचा मोह टाळता आला नाही. त्यामुळे होते असे, की राजकीय घटनांच्या गर्दीत चरित्रनायकाचे जीवन जाणून घेण्याची इच्छा अतृप्त राहते, इतिहासाच्या फापटपसाऱ्यात टिळकांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाने चित्र उमटत नाही, व्यक्ती आणि पार्श्वभूमी यांच्या असमतोल चित्रणामुळे या चरित्राच्या वाङ्मयीन श्रेयाला मर्यादा पडतात.

वास्तविक चरित्रनायकाचा संबंध सार्वजनिक क्षेत्राशी असो किंवा नसो त्याच्या बाळपणाचे वर्णन करताना भोवतालच्या परिसराचे चित्रण व्हावेच लागते. पाळण्यात चरित्रनायकाचे कर्तृत्व असते शून्य. असते ती त्याच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारी परिस्थिती आणि म्हणूनच चरित्र नायकाचे बालपण चित्रित कर-

ताना जिथे तो वाढला ते जन्मस्थळ, ज्या नातेवाईकात तो वावरला ते नातेवाईक ज्या शाळेत तो शिकला ती शाळा आणि त्याचे आईवडील या भोवतालच्या परिसराचे वर्णन केले जाते. पण इथेंही एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती अशी, की व्यक्तीचे कुटुंब आणि मित्र, त्यांच्याबरोबरचे तिचे संबंध हा त्या व्यक्तीच्या जीवनाचा फार मोठा भाग असला तरी चरित्र लिहायचे ते त्या व्यक्तीचे, तिच्या आईवडिलांचे, मित्रांचे किंवा पूर्वजांचे नव्हे. अशा संबंधातून व्यक्ती आणि व्यक्तीच्या स्वभावाचा उलगडा होत असला तरी चरित्रनायकाने केवळ नायकाच्या भोवतालच्या परिसरातच, वर्तुळातच गुरफटून जाता कामा नये. व्यक्ती ही त्या परिसराच्या, वर्तुळाच्या केंद्रस्थानी असली पाहिजे. भोवतालच्या परिसराचे चित्रण पार्श्वभूमीपुरतेच झाले पाहिजे.

टिळकांच्या बालपणच्या परिसराचे वर्णन करताना केळकर त्या पार्श्वभूमीमधेच गुरफटून जातात. ते इतके, की टिळकांचे पणजे खोत होते हे सांगत असताना खोतीची व्याख्या देऊन मोकळे होतात. वास्तविक खोतीचा टिळकांच्या जीवनाशी प्रत्यक्ष संबंध आलाच नाही.

या उलट, डॉ. आनंदीबाईचे चरित्र लिहिताना काशिबाई कानिटकरांनी आणि दादाभाई नौरोजींचे चरित्र लिहिताना ना. सी. फडके यांनी चरित्रनायिका आणि चरित्रनायक यांच्या बालजीवनाचा परिसर रंगविताना व्यक्ती आणि पार्श्वभूमीच्या चित्रणात तोल साधलेला आहे.

कानिटकर डॉ. आनंदीबाईंच्या चरित्रात त्यांच्या आप्तांचा संदर्भ आणतात, परंतु तो आवश्यक तितकाच आणि तसे करीत असताना डॉ. आनंदीबाई ही व्यक्ती सतत वाचकांच्या डोळ्यापुढे उभी करतात.

दादाभाई नौरोजींच्या चरित्रात फडके यांनी दादाभाईंच्या बालजीवनाची पार्श्वभूमी रेखाटताना आप्तांचे संदर्भ आणले आहेत, ते आवश्यक तितकेच आणि चरित्रनायकाच्या बालपणचा परिसर उभा करताना अशाच घटितांची निवड केली आहे, की त्यामुळे चरित्रनायकाच्या बालमनाचा विकास त्यांना अचूक टिपता आला.

सार्वजनिक क्षेत्राशी संबंध नसलेल्या व्यक्तींच्या चरित्रात केवळ व्यक्तिगत जीवन रेखाटलेले असते. त्यांच्या प्रौढ जीवनाचे चित्रण करताना पार्श्वभूमीचा प्रश्न भेडसावत नाही. कारण अफाट सार्वजनिक जीवन त्यांच्या वाट्याला येत नाही. व्यक्तिजीवनाबरोबर सार्वजनिक जीवनाचा समन्वय कसा साधावा हा प्रश्न तिथे निर्माण होत नाही. लक्ष्मीबाईंनी लिहिलेल्या ‘ स्मृति–चित्रात ’, विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी लिहिलेल्या ‘ डॉ. जॉनसनच्या ’ चरित्रात किंवा लीलाबाई पटवर्धन यांनी लिहिलेल्या ‘ आमची अकरा वर्षे ’ या चरित्रात पार्श्वभूमी चित्रित करताना तोल सुटण्याची शक्यताच कमी होती. परंतु सार्वजनिक क्षेत्राशी संबंधित व्यक्तींच्या चरित्रात प्रौढ जीवनाचे चित्रण करताना कलात्मक

संयमाची अत्यंत आवश्यकता असते. अशा व्यक्तीचे सार्वजनिक जीवन वाचकांच्या समोर घडलेले असते किंवा त्यांना ते ग्रंथाद्वारे अथवा अन्य मार्गाने ज्ञात होण्याची शक्यता असते, पण त्याना ते कितपत ज्ञात झालेले आहे याचा चरित्रकाराला वेळोवेळी अंदाज घ्यावा लागतो. त्या संदर्भात घेतलेल्या निर्णयांवरच चरित्राला कोणते वळण मिळणार हे अवलंबून असते. प्रत्यक्षात मात्र होते असे की, व्यक्तिचित्रणाच्या मर्यादा सांभाळणारा लेखक, लिहिता लिहिता आपले तंत्र बदलतो आणि नायकाशी संबंधित अशा विवक्षित कालखंडाचा परामर्ष घेऊन मोकळा होतो. व्यक्तीचे जीवन जाणून घेण्याच्या उत्कट इच्छेने चरित्र हाती घेणाऱ्या वाचकाच्या पदरात शुष्क घटनांचे निवेदन पडते आणि त्याची निराशा होते. राजकारणी अथवा समाज सुधारकांच्या चरित्रात खाजगी जीवन आणि सार्वजनिक जीवन यांचा समन्वय साधून केलेली, प्रमाणबद्ध रचना क्वचितच आढळते. चरित्रकार लिटन् स्टॅचीच्या लेखनपद्धतीविषयी लिहिताना डेसमॉन्ड मॅकार्थी (Desmond Mac Carthy) यांनी पुढील अभिप्राय व्यक्त केला आहे. 'प्रसिद्ध स्त्री–पुरूषांच्या चरित्रात त्यांच्या व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनाची हकीकत समाधानकारकरीत्या एकात्म झालेली क्वचितच आढळते. शंभरातल्या नव्याण्णव चरित्रात चरित्रकार प्रथम नायकाच्या तारुण्याचे ओझरते दर्शन घडवितो आणि मग त्याच्या सार्वजनिक जीवनाचे लांबलचक कथन केल्यावर शेवटी एका प्रकरणात व्यक्तिगत जीवन चित्रित करून आपला प्रयत्न सोडून देतो. चरित्राच्या दृष्टीने जर चित्ताकर्षक काय असेल तर ते व्यक्तिगत जीवन आणि सार्वजनिक जीवन यामधल्या नेमक्या परस्पर क्रिया–प्रतिक्रिया. त्या मध्यवर्ती जिज्ञासेचे समाधान कलात्मकतेने, प्रत्ययकारीरीत्या कोणताही चरित्रकार करू शकला नाही.'[१५]

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस थॉमस कार्लाइलने लिहिलेल्या ऑलिव्हर क्रॉमवेल (१८४५) फ्रेड्रीक धी ग्रेट (१८५८–६५) आणि डेव्हीड मॅसनने (David Masson) लिहिलेल्या जॉन मिल्टन (१८५९–९४) या चरित्रातून नायकांच्या सभोवतालच्या परिस्थितीचे आणि त्याच्या सार्वजनिक जीवनाचे चित्रण पार्श्वभूमी म्हणून इतक्या अतिरिक्तपणे करण्यात आले, की ह्या चरित्रातले व्यक्तित्वदर्शन अत्यंत क्षीण झाले. व्यक्तीच्या सार्वजनिक जीवनातील घटना क्रमवार नोंदण्याच्या पारंपारिक पद्धतीमुळे चरित्रनायकाची व्यक्तिज्योत आपोआप मालवली जाते, याची योग्य जाणीव डॉ. जॉनसननाही झालेली होती. वर म्हटलेल्या पारंपारिक पद्धतीने लेखन करणाऱ्या चरित्रकारासंबंधी ते लिहितात–

15– Mac Carthy, Desmond. 'Lytton Stracney As a Biographer', Life and Letters, March 1932, P. 92.

'हाती घेतलेले चरित्रलेखनाचे काम निष्काळजीपणे पार पाडणाऱ्या अथवा ज्यांना आपल्या कामाच्या स्वरूपाची फारच थोडी ओळख असलेली दिसते अशाच लेखकांना अनेकदा चरित्रलेखनाचे काम देण्यात आले आहे. सार्वजनिक कागदपत्रांवरून केलेल्या कथनाहून वेगळे कथन करताना ते क्वचितच आढळतात. चरित्रनायकाच्या स्थानवृद्धीची अथवा कृतींच्या मालिकेची कालानुक्रमाने नोंद करीत असताना आपण जीवनचरित्र लिहीत आहोत अशी ते कल्पना करून घेतात. चरित्रनायकाच्या वृत्ती अथवा त्यांच्या वागणुकीकडे ते इतके थोडे लक्ष पुरवितात. की त्याच्या वंशानुचरितापासून सुरवात होऊन प्रेतयात्रेबरोबर संपणाऱ्या आणि विशेषरूप दिलेल्या अभ्यासपूर्ण कथनापेक्षा त्याच्या एखाद्या नोकराबरोबर थोडा वेळ केलेल्या संभाषणातूनही त्यांच्या खऱ्या स्वभावविशेषांबद्दल भरपूर माहिती मिळू शकेल.'[१६] अशा कृतीचे, साहित्य ह्या दृष्टीने मोल अत्यल्प ठरते. कारण केवळ सार्वजनिक जीवनातील वृत्तान्त निवेदनावर भर दिल्यामुळे त्या कृतीमधे चरित्रनायकाची व्यक्ती वाचकांच्या डोळ्यापुढे साक्षात करण्याचे सामर्थ्य उरत नाही.

डेसमॉन्ड मॅकार्थी यांनी वर उल्लेख केलेल्या नव्याण्णव चरित्रांपेक्षा टिळक चरित्र तरी कुठे वेगळे आहे ? टिळकांचे भावजीवन, खाजगी जीवन इथे संकोच पावले आहे. गुणदोषात्मक टिळक, मर्यादा असणारे टिळक इथे दिसत नाहीत. मर्यादांचे उल्लंघन करून अलौकिक झेप घेणारे टिळकही इथे दृग्गोचर होत नाहीत. प्रदर्शनानुकूल सजलेले सार्वजनिक जीवन, तेवढेच या चरित्रात दिसते.

न. र. फाटकांनी लिहिलेल्या न्यायमूर्ती रानडयांच्या चरित्रात सामाजिक पार्श्वभूमीला प्राधान्य मिळाले आहे. फाटकांचा पिंड इतिहासाभ्यासकाचा आहे. थोर व्यक्ती ही समाजबद्ध व्यक्ती आहे आणि त्या त्या काळच्या सामाजिक परिस्थितीनेच त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाला व कार्याला आकार येतो, हा त्यांचा दृष्टिकोन. त्यांनी लिहिलेल्या चरित्रात सामाजिक इतिहासाच्या प्रपंचात रानडे मधूनच डोकावतात, परंतु रानडे ही व्यक्ति सतत वाचकांच्या डोळ्यापुढे उभी करण्याचे सामर्थ्य नाही. सामाजिक इतिहासाआड व्यक्तिचरित्र लपून गेले आहे. व्यक्तीचे भावजीवन उपेक्षित राहिले आहे. तत्कालीन समाजाचे चित्र उभे करण्यात फाटक यशस्वी झाले आहेत, यात शंका नाही. परंतु त्यांच्या या यशातच चरित्राचे अपयश आहे.

वर एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस लिहिलेल्या दोन इंग्रजी चरित्रांचा

---

16– Samuel Johnson, ' In Praise of Biography ' The Rambler, No. 60, Saturday, 13 October 1750. Reprinted by Clifford, James L. ' Biography as an Art,' Oxford University Press 1962, P. 42.

उल्लेख केला. इंग्रजी वाङ्मयात एकोणिसाव्या शतकात इतिहासकारांनी चरित्राचे माध्यम वापरले. 'जीवन आणि काल' स्वरूपाची चित्रे लिहिली. चरित्रनायकाच्या जीवन मार्गाच्या चौकटीत संपूर्ण कालखंडाचे चित्र रेखाटण्याचा प्रयत्न झाला, इंग्रज इतिहासकारांचा चरित्राकडे पाहाण्याचा दृष्टिकोन व फाटकांचा दृष्टिकोन यात कितीसा फरक आहे तो पहा. 'प्रत्येक व्यक्तीवर तिच्या परिस्थितीचे प्रभुत्व होते हे अॅन्ड्रयूजनेदेखील जाणले होते... कोणत्याही व्यक्तीकडे एक मुक्त शक्ती या दृष्टीने पहाता आले नसते. कोणत्याही व्यक्तीचे तिच्या पिढीतील बौद्धिक, नैतिक आणि सामाजिक प्रवाह वगळून आकलन होऊ शकले नसते, हे त्याने ओळखले होते, समकालीन इतिहासकाराने व्यक्तीचे महत्त्व आणि आस्था नाकारली असे नाही. त्याचा एवढाच आग्रह होता, की व्यक्तीच्या वर्तणुकीपेक्षा तिचा सामुदायिक मनाशी जो संबंध असतो तो अधिक महत्त्वाचा होता आणि म्हणूनच बहुसंख्य लोकांनी कोणता विचार केला आणि त्यांनी काय केलें यापेक्षा व्यक्तीचा विचार आणि कृती याबद्दल त्यांना कमी आस्था होती. कारण बहुसंख्य लोकांच्या दृष्टि-कोनावर भवितव्य अवलंबून असते.'[१७]

आतापर्यंत सामाजिक, राजकीय पार्श्वभूमी आवश्यक असलेल्या नजिकच्या काळातल्या चरित्रांचा विचार केला. ऐतिहासिक प्रेरणेने लिहिलेल्या. ऐतिहासिक स्त्री पुरुषांच्या चरित्रात, ऐतिहासिक अभिनिवेशाला वाव मिळतो. अशा चरित्रात व्यक्तिचित्रण सजीव व्हावे म्हणून पुरेशा ऐतिहासिक पार्श्वभूमीची आवश्यकता असते. ऐतिहासिकदृष्टचा महत्त्व प्राप्त झालेल्या व्यक्तीचे इतिहासातले स्थान निश्चित व्हावे लागते. चरित्रातली वातावरणनिर्मिती वास्तव व्हावी म्हणून चरित्रकाराला नायकाने ज्या काळात इतिहास घडविला, त्या काळातील कला, संगीत, चालीरीती, माणसांच्या प्रेरणा, महत्त्वाकांक्षा, त्यांचे पूर्वग्रह आणि एकंदर त्यांची जीवनपद्धती यांचा ऐतिहासिक कागदपत्रांच्याद्वारे पूर्ण परिचय करून घ्यावा लागतो. चरित्रनायकाने काय केले हे सांगता सांगता लेखक या ना त्या निमित्ताने भूतकाळाशी समरस होतो आणि नायकाशी संबंधित अशा इतिहासाचा विवक्षित कालखंड वाचकांच्या डोळ्यापुढे उभा करतो. चरित्रा-तली व्यक्ती बाजूला राहाते आणि इतिहासाचे अवडंबर माजते.

'परशुरामभाऊ पटवर्धनांचे' चरित्र लिहिणाऱ्या निगुडकरांना व्यक्ती आणि पार्श्वभूमी यांच्या प्रमाणबद्ध चित्रणाला आवश्यक असा कलात्मक संयम बाळगता आला नाही. चरित्रनायकाविषयी माहिती देता देता कोरड्या तपशिलातून तत्का-

---

17– Ausubel, Herman. 'Historians and Their Craft,' A study of the American Historical Association (1884–1945), Columbia University Press 1950, P. 294.

लीन इतिहास ते उभा करतात. भाऊंचे व्यक्तिमत्त्व इतिहासाच्या पडद्याआड राहाते, याचे कारण परशुरामभाऊंचा ज्या ज्या लढायांशी संबंध आला त्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी रेखाटताना घटनांच्या माहितीपूर्ण निवेदनांनी भाऊंचे व्यक्तिमत्त्व झाकले जाते. कोरड्या ऐतिहासिक तपशिलातून तत्कालीन इतिहास उभा राहातो. पण भाऊंचे व्यक्तिमत्त्व आकार घेत नाही. निगुडकर नानांचे कारस्थान वाचकांच्या पुढे मांडतात, पण नानांच्या कारस्थानाची ज्या परशुरामभाऊंना नीटशी कल्पना आली नाही, त्यांच्या मनोभूमिकेवर प्रकाश टाकण्याची संधी गमावून बसतात. केवळ ऐतिहासिक घटनांच्या माहितीपूर्ण निवेदनात गुंतून राहिल्यामुळे व्यक्ती आणि पार्श्वभूमीचे प्रमाणबद्ध चित्रण त्यांना साधता आले नाही. हे एक ऐतिहासिक अभिनिवेशामुळे फसलेले चरित्र आहे.

जीवनातील भिन्नभिन्न उलटसुलट प्रवाहांच्या भोवऱ्यात चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाची घडण कसकशी होत गेली हे दाखविताना त्या प्रवाहांची, भोवऱ्यांची नोंद व्हावी हे ठीक आहे. कारण ह्या प्रवाहांच्या, भोवऱ्यांच्या बाहेर स्वतंत्रपणे व्यक्तित्त्वाचे मोजमाप केले तर चरित्रात अपुरेपणा राहील. पण चरित्रात व्यक्तीपेक्षा त्या प्रवाहानाच महत्त्वाचे स्थान मिळाले तर व्यक्तिदर्शनावर अनिष्ट परिणाम झाल्याशिवाय राहाणार नाही. चरित्रकाराला व्यक्ती आणि तिच्या भोवतालची परिस्थिती यांमधला तोल राखता आला पाहिजे. ज्या चरित्रात तसा तो राखला जातो, त्या चरित्रात व्यक्तित्त्वदर्शन यथार्थपणे होते. व्यक्तिजीवनाला आकार देताना परिस्थितीबरोबरच नियती आपली कामगिरी बजावत असते. व्यक्तित्त्वदर्शन घडविताना चरित्रकाराला या घटकांचे सापेक्ष महत्त्व जोखता आले पाहिजे. '...व्यक्ती इतिहास घडविते, तसाच तो यदृच्छेनेही घडतो आणि सामाजिक शक्तीही इतिहास घडवितात. या तिन्ही घटकांच्या कार्याचे निरीक्षण करण्याकरिता दैनंदिन अनुभवाच्या पलिकडे जाण्याची आवश्यकता नाही. आपल्यापैकी प्रत्येकजण काही निर्णय घेतो आणि त्यांचे इतरांच्या जीवनावर काही परिणाम होतात, ज्या जगामध्ये आपण राहातो त्या जगाकडून प्रत्येकावर मर्यादा घातल्या जातात आणि त्याचे नियंत्रण होते; दैवगतीच्या लहरीचेही प्रत्येकावर परिणाम होतात. चरित्रनायकाच्या संपूर्ण आयुष्यक्रमात प्रत्येक घटकाचे सापेक्ष महत्त्व किती हे ठरविण्याचे काम चरित्रकाराचे आहे.'[१८]

इंग्रजी वाङ्मयात व्हिक्टोरिया राणीच्या काळात कृतिप्रवण व्यक्तींच्या चरित्रांना साचेबंद स्वरूप प्राप्त झाले होते. कृतींच्या अनुरोधाने व्यक्तिमत्त्वाचे

---

18– Garraty, John A. 'The Nature of Biography,' Jonathan Cape 1958, P. 21.

मूल्यमापन करावयाचे आणि कृतींना अवास्तव महत्त्व देऊन चरित्र लिहून काढायचे, असा एक संकेत रूढ झाला होता. फळावरून वृक्षाची ओळख पटते म्हणून फळ म्हणजेच वृक्ष असे समीकरण मांडता येईल काय ? व्यक्तीच्या जीवित कार्याच्या आधारे व्यक्तिमत्त्वाचा शोध घेता येतो, हे खरे. व्यक्तीची ध्येयनिष्ठा, ध्येयाकरिता तिने सोसलेली झीज आणि तिची महत्त्वाकांक्षा यामुळे व्यक्तीच्या अंतःकरणाची कवाडे सताड उघडी करण्याची किल्ली उपलब्ध होते हेही खरे. परंतु व्यक्तीचे कार्य हाच तिच्या जीविताचा एकमेव हेतू असला तरी ते तिचे संपूर्ण जीवन नव्हे. व्यक्तीच्या जीवनात असे काही प्रसंग उद्भवतात, अशा काही शक्ती प्रवेश करतात की, त्या शक्ती आणि ते प्रसंग व्यक्तीच्या जीवित कार्याशी विसंवादी असतात. पण व्यक्तिमत्त्वावर सखोल परिणाम साधून जातात. चरित्रकाराला त्यांचा मागमूसही नसतो. कृती आणि त्यांचे परिणाम यांची व्यक्तिमनावर होणारी भावनात्मक प्रतिक्रियाही अशा चरित्रातून व्यक्त होत नाही. कृती आणि व्यक्ती यांचा संबंध जुळत नाही. कृतीपासून व्यक्ती अलग पडल्यासारखी वाटते, केवळ कृतींनाच महत्त्व दिल्यामुळे लेखक नायकाचे व्यक्तिमत्त्वच हरवून बसतो. डिझराएलीच्या राजकीय जीवनाची सुरवात अपयशाने झाली. पहिलीच निवडणूक तो हरला. पुढे निवडून आल्यावरही मंत्रीमंडळात त्याची वर्णी लागली नाही. त्याच्या पार्लमेंटमधल्या पहिल्याच भाषणाची रेवडी उडविण्यात आली. आन्द्रे मॉर्वाने डिझराएलीच्या चरित्रात अपयशाची त्याच्या मनावर होणारी भावनात्मक प्रतिक्रिया नोंदली आहे. त्यामुळे राजकीय कृतींच्या पार्श्वभूमीवर डिझराएलीचे व्यक्तिमत्त्व उठून दिसते. चरित्र-काराला मानवी स्वभावाचा शोध घ्यावयाचा असतो आणि म्हणूनच चरित्रनायकाने काय केले किंवा त्याच्या पदरात किती यश पडले यापेक्षा तो कसा होता हे चरित्रकाराच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. आन्द्रे मॉर्वाने डिझरायलीच्या कृती आणि त्याचे व्यक्तिमत्त्व यांची एकात्मता साधली आहे. डिझराएली भाषण करीत असताना काखेजवळ जाकिटाच्या भागात हात अडकवून उभा राही आणि एखादे विशेष खोचदार वाक्य उच्चारताना आधी थोडा वेळ थांबायचे, डाव्या हातातील रुमाल उजव्या हातात घ्यावयाचा, किंचित् खाकरून जरासा तोंडावरून रुमाल फिरविल्यासारखे करावयाचे आणि मग ते वाक्य उच्चारावयाचे. आणि पुन्हा उजव्या हातातून रुमाल डाव्या हातात घ्यायचा, ही त्याची विशिष्ट लकब असे, त्यात त्याचा आत्मविश्वास सूचित होतो. आन्द्रे मॉर्वाने क्षुल्लक दिसणाऱ्या कृतीं-तून डिझराएलीच्या जीवितकार्याला फाटा न देता तो कसा होता हे मोठ्या कौशल्यानें दाखविले आहे.

व्यक्ती हाच चरित्राचा केंद्रबिंदू आहे. तेव्हा चरित्रात व्यक्तीच्या भाव-

जीवनाला स्थान मिळावे. याचा अर्थ असा नव्हे, की ज्या जीवितकार्यासाठी त्याने आपले आयुष्य वेचले, ज्या जीविकार्याने त्याच्या व्यक्तित्वाला आकार मिळाला, त्या जीवितकार्याची उपेक्षा व्हावी. कृतिप्रवण व्यक्तीच्या जीवनातून कृती उणे केली तर त्या जीवनाला अर्थच उरणार नाही. राजकीय जीवन वगळून लिहिलेल्या टिळकांच्या चरित्राने कुणाचे समाधान होईल ? अशा व्यक्तीने काय केले हे सांगितल्याशिवाय ती कशी होती हे दाखविता येणार नाही. आणि म्हणूनच कृतिप्रवण व्यक्तींच्या चरित्रातून व्यक्ती आणि कृती यांची सजीव एकात्मता झाली पाहिजे चरित्रनायकाने काय केले हे वाचता वाचता तो कसा होता हेही वाचकांच्या लक्षात यावे. अशा चरित्रात व्यक्ती आणि पार्श्वभूमी यांचे संबंध, प्रस्थापित व्हावेत असेच सर एडवर्ड कूक यांना वाटते. 'ग्लॅडस्टनची अंदाजपत्रके, त्याची मिडलोथिअन मोहीम आणि होमरूलकरिता त्याने दिलेला लढा, या बाबतीत अवाक राहाणाऱ्या त्याच्या जीवन–चरित्राने कुणाचे समाधन होईल ? असा माणूस कसा होता, हे त्याने काय केले हे सांगितल्याशिवाय दाखविता येणार नाही. परंतु त्याचबरोबर त्याने काय केले आणि तो कसा होता यांमधले संबंध प्रस्थापित करणे आवश्यक आहे,'[१९]

चरित्रातून व्यक्ती आणि कृती यांचे संबंध प्रस्थापित व्हावेत. याचा अर्थ असा, की साहित्यिकाचे चरित्र लिहायचे झाल्यास, चरित्रग्रंथ वाङ्मयीन टीका ग्रंथ होऊ नये. साहित्यिकांचे सहित्य वगळून त्याचे चरित्र लिहिले तर ते अर्थशून्य ठरेल. लेखकाच्या वाङ्मयीन कृती हा त्याच्या जीवनाचा अविभाज्य भाग असतो. त्याच्या साहित्यातून त्याचे मनोक्षोभ शब्दांकित झालेले असतात. त्याच्या वाङ्मयीन कृतींची योग्य चिकित्सा जरुर व्हावी. पण ती त्या कृचींचा निर्माता जो लेखक त्या लेखकाच्या संदर्भात.

टिळक, गांधी, न्या. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले यांसारख्या राष्ट्रनेत्यांचा संबंध राष्ट्र, समाज आणि संस्कृती यांना नवे वळण देणाऱ्या व्यापक चळवळींशी येतो. म्हणूनच त्यांना ऐतिहासिक महत्त्व प्राप्त होते. चरित्रग्रंथात त्यांच्या व्यक्तिगत जीवनाशी राजकीय अथवा सामाजिक जीवनाची सांगड घालावी लागते. हे काम-नाजूक व जोखमीचे असते. 'चरित्राच्या पाऊलवाटेने इतिहास प्रदेशात प्रवेश करण्याचे काम शंका आणि अडचणींनी वेढलेले आहे. आपण निवडलेली अरुंद वाट सोडून जाणे कितपत चालण्यासारखे आहे ? स्वतःला फारच मर्यादा घालून घेतली तर आपण अरुंद वाटेने डोळे बांधलेल्या अवस्थेत चालतो, आपण जर अतिमुक्तपणे फारच पल्ला गाठला, तर मार्गाबाहेर जाणाऱ्या असंख्य पात्रांतून ज्या एका

---

19- Sir Cook, Edward. ' The Art of Biography,' ' The National Review, No. 374, April 1914, P. 571.

प्रवाहाने जाण्याचा आपण प्रयत्न करतो त्या प्रवाहाशी असलेली सरूपता आपण गमावून बसतो.[२०] ऐतिहासिक किंवा राजकीय पार्श्वभूमिलाच फार महत्त्व द्यावे तर व्यक्ती झाकली जाते. व्यक्तिदर्शनाची आबाळ होते. संयम राखून व्यक्ती-पुरतेच लेखन करावे तर ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या अभावी व्यक्तित्व उठून दिसत नाही. अशा ग्रंथात प्रथम व्यक्तिदर्शनाला आवश्यक इतकी पार्श्वभूमी निश्चित झाली पाहिजे. व्यक्तीचा जीवनक्रम आणि राष्ट्राचे भवितव्य यावर व्यक्ति-विशेष आणि ऐतिहासिक शक्ती यांच्या होणाऱ्या क्रियाप्रक्रियांचे सूक्ष्म अवलोकन झाले पाहिजे. व्यक्तिचित्रणाला आवश्यक तितकी ऐतिहासिक पार्श्वभूमी ठरविताना असे अवलोकन आधारभूत ठरते. एकदा का आवश्यक पार्श्वभूमी निश्चित झाली म्हणजे सर्वसाधारण ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या चौकटीत व्यक्तिचित्र चित्रित व्हावे. राजकारणी स्त्री पुरुषांच्या चरित्रात ऐतिहासिक पार्श्वभूमीला किती स्थान असावे यासंबंधी विवेचन करताना सर हेन्री क्रेक (Sir Henry Craik)– लिहितात : ' आपल्या काळातील प्रमुख घडामोडीत फार मोठा भाग घेणाऱ्या व्यक्तीचे चरित्र लिहिताना आपण स्वतःकरिता सर्वसाधारण इतिहासाची बांधणी केली पाहिजे; आणि तसे केल्यावर मग तात्पुरता माळा मोडावा तसे व्यक्तिदर्शनाला जे जे अनावश्यक असेल ते ते निर्दयपणे धडक मारून दूर केले पाहिजे.'[२१]

व्यक्तिजीवनाच्या परिघात येणारी आणि केंद्रस्थानी असलेल्या व्यक्तीशी संबंधित एवढीच ऐतिहासिक पार्श्वभूमी चरित्रात यावी. नाट्याला वास्तवाची डूब देताना रंगभूमीवरचे देखावे उपयुक्त ठरतात, तद्वत चरित्राला वास्तवाचा स्पर्श व्हावा म्हणून ऐतिहासिक पार्श्वभूमी उपयुक्त ठरावी. चरित्रातील व्यक्तीवर वाचकांचे लक्ष सतत खिळून राहील अशा बेताने ऐतिहासिक पार्श्वभूमीचा उपयोग व्हावा. पार्श्वभूमी हे चरित्राचे वैशिष्ट्य असेल तर व्यक्ती आणि पार्श्वभूमी यांचा सांधा जुळावा. ऐतिहासिक पार्श्वभूमीला व्यक्तीदर्शनाच्या कामी राबवून घेण्यात चरित्रकाराचे खरे कसब आहे. ' राजकारणाचा विषय हा राज-कारण धुरंधराच्या चरित्राचा भोवतालचा देखावा आहे. चरित्रकाराच्या रंगमंचा-वरील नटांपेक्षा भोवतालच्या देखाव्याला निष्ठुरपणे दुय्यमस्थान देणे ही चरित्रकाराची कला आहे. त्याने वाचकांची कलाकृतीबद्दलची आस्था कमी करण्याइतके अवधान विचलित होईल अशा पद्धतीने आपल्या रंगमंचावर देखाव्याची

---

20– Mckenna, Marthe. ' Write Your Own Best Seller,' Jarrolds Publishers, P. 163.

21– Mckenna, Marthe. ' Write Your Own Best Seller,' Jarrolds Publishers, P. 163.

सामग्री आणि सरंजामाचे सामान यांची गर्दी करून सोडता कामा नये.' [२२]

चरित्रात इतिहासाचे स्थान केवळ पार्श्वभूमी म्हणूनच उरते. चरित्रात व्यक्ती प्रमुख आणि पार्श्वभूमी गौण ठरते. पण टिळक चरित्रात इतिहासाचे स्थान पार्श्वभूमीपुरते नाही. हे त्या चरित्राच्या अपयशाचे कारण आहे. व्यक्तिमत्त्वाचे अणुरेणू एका आकृतिबंधात सजीव करण्याची केळकरांना जाणीव झालेली दिसत नाही.

आन्द्रे मॉर्वाने लिहिलेल्या डिझराएलीच्या चरित्रात इतिहासाला केवळ पार्श्वभूमीपुरते स्थान लाभले आहे, त्यामुळे राजकारणी डिझराएलीतला माणूस मनाची पकड घेतो. चरित्र वाचत असताना डिझराएली जिवंत होऊन साक्षात् पुढे उभा राहतो असे वाटेल, इतके प्रत्ययकारी चित्रण झाले आहे. फिकट अशा पार्श्वभूमीवर चित्र उठून दिसावे तद्वत डिझराएलीची व्यक्तिरेखा ठसठशीत रेखीव झाली आहे.

ज्या काळात स्त्रियांना शिक्षणाची बंदी होती, त्याच काळात डॉ. आनंदीबाई जोशींनी आपल्या पतीच्या मदतीने शिक्षणासाठी प्रयत्न केले. निश्चय, धाडस, चिकाटी इत्यादी गुणांच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपला शैक्षणिक उत्कर्ष साधला. त्यांच्या चरित्रात त्यांच्या साधनेला महत्त्वाचे स्थान आहे. न. चिं. केळकरांप्रमाणे तत्कालीन शैक्षणिक परिस्थिती कशी होती, एकंदर शाळा किती होत्या, अशिक्षित मुली किती होत्या, स्त्रियांच्या शिक्षणाकरिता किती परिश्रम घेतले जात होते किंवा किती विरोध होत होता, असल्या तपशिलात काशिबाई कानिटकर शिरत नाहीत. कथानकाच्या ओघात आवश्यक तिथे योग्य तो उल्लेख करीत जातात. त्यामुळे आनंदीबाईंच्या चरित्रात आनंदीबाईंच्या जीवनाशिवाय भोवतालच्या अन्य परिस्थितीला अवास्तव स्थान मिळत नाही आणि आनंदीबाईंचे व्यक्तिमत्त्व आकार घेत जाते.

प्लूटार्कने लिहिलेल्या अलेक्झांडरच्या चरित्रात आवश्यक इतक्या पार्श्वभूमीवर अलेक्झांडरचे व्यक्तिमत्त्व ठसठशीत उमटले आहे. सर एडवर्ड कूक लिहितात– 'प्लूटार्कने लिहिलेले अलेक्झांडरचे चरित्र ही एक श्रेष्ठ कृती आहे याचे कारण प्लूटार्कने कृती आणि घटना वगळल्या हे नसून त्याने त्यांना मनोदर्शक आणि स्वभावदर्शक बनविले. चरित्रविषय व्यक्तीला पूर्वभागी ठेवणे, घटना, कृती आणि स्थिती यांच्या पार्श्वभूमीवर एक माणूस म्हणून तिला ठळकपणे उभी करणे हे चरित्रकाराचे अत्यंत आवश्यक कर्तव्य आहे. आणि तशीच ती त्याची फार

22– Sir Lee Sidney. 'Principals of Biography,' The Leslie Stephen Lecture delivered in the senate house, Cambridge, on 13th May 1911, P. 28.

मराठी ... ठाणे
३९६९
२५७६९
३४१ अ ६
ग्रंथ शाळा (स्थळ प्रत)



मोठी अडचणही आहे. म्हणूनच कदाचित् पुष्कळदा कृतीप्रवण व्यक्तीपेक्षा साहित्यिकांची चरित्रे उत्तम वठतात, असे म्हटले जाते त्याचे ते एक कारण आहे. (दुसरेही सुचविता येण्यासारखे आहेच.) '[२३]

व्यक्तीच्या जीवितकार्याच्या संदर्भात, विवक्षित कालखंडाचा इतिहास सादर करण्यास हरकत नसावी. पण त्याकरिता चरित्राचे माध्यम वापरायचे असेल तर चरित्रनायकाने जे काही केले त्यातून तो कसा होता हे सूचित व्हावे. ऐतिहासिक लेखनपद्धतीचा अंगभूत दोष टाळून व्यक्तित्वदर्शनाचे उद्दिष्ट साध्य करायचे म्हणजे चरित्रातल्या इतिहासाला मर्यादा ही घातलीच पाहिजे.

इतिहासाला मर्यादा घालायची म्हणजे नेमके काय केले पाहिजे ? आणि इतिहास म्हणजे तरी काय ? इतिहास हा शब्द दोन अर्थांनी वापरला जातो. इतिहास म्हणजे घटनांची कागदोपत्री नोंद किंवा प्रत्यक्ष घटना. प्रस्तुत चर्चेच्या संदर्भात दुसरा अर्थ अभिप्रेत धरून चरित्रात इतिहासाला मर्यादा घालायची म्हणजे घटनांना मर्यादा घालायची. पण हे कसे शक्य आहे ?

टिळक चरित्रातल्या घटना त्या दृष्टीने तपासून पाहिल्या पाहिजेत. टिळकांच्या हयातीत अशा अनेक घटना घडल्या की, ज्यांच्याशी टिळकांचा थोडाफार संबंध आला असला तरी त्यात टिळकांचे व्यक्तिमत्त्व विशेष उठावदार रीतीने खुलून आलेले दिसत नाही. अशा अनेक गोष्टींचे टिळक चरित्रात भरपूर वर्णन आले आहे. संमतिवयाचा कायदा, पंडिता रमाबाईंचे शारदासदन इत्यादी काही प्रकरणे अशी आहेत, की वाचताना ' यात टिळकांचा संबंध काय ?' असे वाचकांना वाटावे. कित्येक प्रकरणांच्या शेवटी पुरवणी म्हणून जी पुष्कळशी पत्रे छापली आहेत त्यापैकी काहींचा टिळकांच्या जीवनाशी प्रत्यक्ष संबंध फार थोडा आहे. (उदाहरणार्थ तिसऱ्या खंडात पृ. ७३ व ७८ वर दिलेली, केळकरांना सत्यमूर्ती, अॅडव्होकेट मुनशी– आदीकडून आलेली पत्रे व केळकरांनी उत्तरादाखल त्यांना पाठविलेली पत्रे.) चरित्र ही वाङ्मयीन कृती असल्यामुळे व्यक्तिमत्त्वाला उठाव मिळेल अशाच पध्दतीने आणि तेवढ्याच प्रमाणात चरित्रात घटनांचा समावेश व्हावा. व्यक्तिजीवनाच्या परिघात येणाऱ्या घटनांपैकी फक्त व्यक्तिमत्त्वावर परिणाम साधणाऱ्या घटनांचाच अंतर्भाव चरित्रात व्हावा. ' सेनापतीच्या अथवा मुत्सद्याच्या जीवनक्रमाशी निगडित असे महत्त्वाचे प्रसंग इतिहासात ज्या पद्धतीने हाताळले जातात त्यापेक्षा वेगळ्या पद्धतीने चरित्रात हाताळले पाहिजेत. नेपोलिअनचे चरित्र लिहिणाऱ्या माणसाने आपले अवधान नेपोलिअनचा व्यक्तीविकास व घडण या गोष्टींवर केंद्रित केले पाहिजे. चरित्रनायकावर परिणाम साधणाऱ्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचेच तेवढे चित्रण

23– Sir Cook, Edward. ' The Art of Biography,' The National Review, April 1914, P. 272.

व्हावे.'[२४] पण हे अवधान व्यक्ती आणि काल स्वरूपाची चरित्रे लिहिणाऱ्या लेखकांना उरत नाही. अशा ग्रंथात चरित्रकाराने कोणते धोरण स्वीकारावे या संबंधाने आपले मत व्यक्त करताना चरित्र वाङ्मयाचे व्यासंगी टीकाकार एडमंड गॉस लिहितात : ' केंद्रस्थानी असलेल्या व्यक्तीच्या चित्रणात ठळकपणा येईल अशा पध्दतीने चरित्राचे लेखन झाले पाहिजे. एक गोष्ट उघड आहे, की मी जर डिझरायलीचे जीवन चरित्र लिहिण्यास प्रारंभ केला, तर मला इंग्लंडमधील एकोणिसाव्या शतकातील राजकारणाची उपेक्षा करून चालणार नाही. परंतु मला माझे लेखन त्या राजकारणाचा जो भाग स्वत: डिझरायलीला ठाऊक होता आणि ज्या भागाने त्याच्या आयुष्यक्रमावर परिणाम साधला अशाच भागापुरते मर्यादित केले पाहिजे.[२५]

कधी कधी घडलेली घटनाच फार मोठी असते. त्या संपूर्ण घटनेशी व्यक्तीचा संबंध असेलच असे नाही. व्यक्तीच्या जीवनाशी घटनांचा संबंध जेवढा असतो तेवढाच चरित्रात अभिप्रेत असतो. त्यापलिकडे त्या घटना चरित्राच्या दृष्टीने गौण ठरतात. व्यक्ती आणि समाज यांचा जिथे संबंध येतो; जिथे व्यक्ती आणि समाज यांच्या क्रियाप्रतिक्रिया होतात; तिथे व्यक्तीमुळे घटनेला अर्थ प्राप्त होतो. आणि घटनेच्या अनुरोधाने व्यक्तिमत्वाचा उलगडा होतो. चरित्रात केवळ असा सबंध महत्वाचा असतो. अन्य भाग अप्रस्तुत ठरतो. ' कादंबरीकाराला किंवा मानसशास्त्राला जसे मनोरचनेचे विश्लेषण करण्याचे साधन उपलब्ध असते, तसे ते चरित्रकाराला उपलब्ध नसते. परंतु ज्या प्रसंगाशी चरित्रविषयव्यक्तीची गाठ पडते, तो प्रसंग संपूर्ण ऐतिहासिक विकासाच्या संदर्भात त्याला समजून घेता येतो, त्या उमजण्याला चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या आकलनाची जोड देता आली तर त्याला त्या प्रसंगावर व्यक्तीचा जो ठसा उमटतो त्याचा मागोवा घेता येणे शक्य होईल. चरित्रविषयव्यक्ती म्हणजे संपूर्ण व्यक्ती नव्हे किंवा संपूर्ण समाज नव्हे. परंतु ज्या बिंदूवर दोघांच्या अन्योन्यक्रिया होतात, त्या बिंदूपाशी तो प्रसंग नायकाच्या व्यक्तिविशेषांवर प्रकाश पाडू शकतो आणि व्यक्तीची प्रतिक्रिया त्या प्रसंगाला उजळून टाकू शकते. '[२६]

---

24– Maurois, Andre. ' Biography,' Cassell 's Encyclopaedia of Literature, P. 59.

25– Maurois, Andre. ' Biography,' Cassell 's Encyclopaedia of Literature, P. 59.

26– Handlin, Oscar. ' The History in Men 's Lives ', Virginia Quarterly XXX, Summer 1954, P. 541.

चरित्रकाराने व्यक्तिदर्शनाला आवश्यक इतकी राजकीय, सामाजिक अथवा ऐतिहासिक पार्श्वभूमी निश्चित करून अनावश्यक घटितांचा मोह टाळला म्हणजे चरित्रात व्यक्ती आणि पार्श्वभूमी यांची प्रमाणबद्ध रचना शक्य होते. व्यक्तीच्या कृतींची तर नोंद होतेच, पण ती नोंद होत असताना त्या कृतींचा कर्ता जो चरित्रनायक त्याच्या व्यक्तिमत्त्वावर, स्वभावावर प्रकाश पडतो.

ना. सी. फडके यांनी लिहिलेल्या दादाभाई नौरोजी यांच्या चरित्रात व्यक्ती आणि पार्श्वभूमी याचे प्रमाणबद्ध चित्रण झाले आहे, याचे कारण त्या चरित्रात व्यक्तिचित्रणाला आवश्यक तेवढीच राजकीय पार्श्वभूमी चित्रित झाली आहे. फडके दादाभाईंच्या राजकीय, सामाजिक जीवनातील अशाच घटितांची निवड करतात. की ज्यांच्यामुळे दादाभाईंच्या व्यक्तिमत्त्वावर झगमगीत प्रकाश पडावा. फडके यांना अनावश्यक घटितांचा मोह टाळता आल्यामुळे, दादाभाईंचे चरित्र वाचत असताना त्यांचे जीवन जाणून घेण्याची इच्छा अतृप्त राहात नाही. दादाभाईंच्या जीवनात त्यांना भेटलेल्या अनेक व्यक्तींचे संदर्भ–चरित्रात येऊनही, त्या सामूहिकतेतून व्यक्ती ठळकपणे दिसते.

डिझराएलीच्या चरित्रात त्याने वर्तमानपत्र सुरू करण्याचा केलेला खटाटोप त्यात त्याला मिळालेला जबरदस्त फटका, त्याने लिहिलेल्या कादंबऱ्या त्याचा राजकारण प्रवेश आणि त्याने लढविलेल्या निवडणुका, त्याची पार्लमेंटमधली भाषणे, त्याचे प्रवास आणि त्याची पंतप्रधान म्हणून गाजलेली कारकीर्द यांचे धावते दर्शन घडते. या साऱ्या सामूहिकतेतून ग्लॅडस्टन, इंग्लंडची राणी, डिझराएलीची पत्नी, सर रॉबर्ट पील इत्यादी माणसे कमीअधिक प्रमाणात आपले काम करून जातात. परंतु या सामूहिकतेतून व्यक्ती स्पष्टपणे दिसते. व्यक्ती आणि पार्श्वभूमी यांचा सांधा जुळतो.

लिट्न स्ट्रॅचीने लिहिलेल्या क्वीन व्हिक्टोरियाच्या चरित्रात याचे सारे अवधान व्यक्तिदर्शनाकडे, जीवन दर्शनाकडे केंद्रित झाले आहे. साहजिकच राणीच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावाने ज्या घटना घडल्या आणि ज्या घटनांनी तिचे व्यक्तिमत्त्व घडविले अशाच घटनांवर त्याने वाचकांचे लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे राजकीय पार्श्वभूमी चित्रित होत असताना राणीचे जीवन जाणून घेण्याची जिज्ञासा जागविली जाते, तिच्या व्यक्तिगत जीवनातून सार्वजनिक जीवनाचे ओझरते दर्शन घडते. हेस्टर डब्लू चापमन (Hester W. Chapman) यांनी याच तंत्राचा पुरस्कार केला आहे. ' व्यक्तिगत जीवनातून सार्वजनिक वस्तुस्थितीची ओळख करून देणे ही अधिक स्वागतार्ह पद्धत आहे.'[२७] या तंत्राचा अपरिहार्य परिणाम

---

27– Chapman, Hester. W. ' Notes on Historical Biography, Times Literary Supplement, 28 August 1959, P. 498. Also reprinted by Clifford, James. L. ' Biography as Art ', Oxford Universit, Press 1962, P. 222– 223.

असा होतो, की व्हिक्टोरियाच्या चरित्रात तिचे जे दर्शन घडते ते राणी म्हणूनच नव्हे, तर एक स्त्री म्हणूनच.

ऐतिहासिक लेखनपद्धती चरित्रांच्या वाङ्मयीन वृत्तीला मानवणारी नाही. ऐतिहासिक लेखनपद्धती चरित्राच्या माध्यमातून इतिहासाचे उद्दिष्ट साध्य करू पहाते. वास्तविक चरित्राची कक्षा इतिहासाहून भिन्न आहे. चरित्राचे तंत्र वेगळे आहे. चरित्राचे उद्दिष्ट निराळे आहे. ऐतिहासिक लेखनपद्धतीने विवक्षित कालखंडातील घटनांची नोंद होते, पण व्यक्तीची जगाला ओळख पटत नाही. अशा चरित्रातील व्यक्ती क्वचितच हाडामासाच्या होतात. त्या भावनेने गदगदत नाहीत, संतापत नाहीत, प्रेम करत नाहीत, स्खलन पावत नाहीत. चरित्रात मानवी स्वभावातील स्थलकालाच्या मर्यादा ओलांडणाऱ्या शाश्वत, सार्वत्रिक, सर्वकालीन भागाचे चित्रण अभिप्रेत असते. चरित्राची वाङ्मयीन वृत्ती ती हीच—

'...चांगले चरित्र इतिहासाचे मानवीकरण करते. भूतकाळाबद्दल बहुतेक लोकांना एक व्यक्तिभावविरहित प्रचंड यंत्र या दृष्टीने आस्था नसते; त्यांच्यासारखी माणसे कशी वागली यात त्यांना रस असतो...'[२८] पण चरित्रकाराने एकदा का इतिहासाचे उद्दिष्ट पत्करले; इतिहासाचे तंत्र स्वीकारले; म्हणजे अशा चरित्रातून मानवी जीवनातील स्थल, काल निबद्ध, क्षणजीवी भागाचे चित्रण होते. चरित्रकाराचे घटनांच्या निवेदनावर लक्ष केंद्रित होते आणि व्यक्तिजीवनातील संघर्ष, मानवी जीवनातील शाश्वत भागाचे चित्रण, मानवजीवनाचा आविष्कार आदी चरित्रात वाङ्मयाचा परिपोष करणारे घटक उपेक्षित राहातात. चरित्राचा वाङ्मयीन घाटच बिघडतो. इतिहास आणि चरित्र यांच्या सीमारेषा अस्पष्ट होतात. सूर्योदयापूर्वी आकाश क्षितिजावर जिथे टेकलेले असते तिथे क्षितिजाच्या कडा धूसर होतात, तशी चरित्रातील व्यक्ती दिसेनाशी होते. चरित्रग्रंथ ना धड चरित्र ना इतिहास अशी आपत्ती ओढवते.

व्यक्तीचे सार्वजनिक जीवन हा इतिहासाचा प्रांत आहे. राजकीय इतिहासात व्यक्तीच्या सार्वजनिक जीवनाला महत्त्वाचे स्थान प्राप्त व्हावे हे अगदी योग्य आहे. पण व्यक्तीचे व्यक्तिगत जीवन हा चरित्राचा विषय आहे. चरित्रात काही झाले तरी खाजगी जीवनालाच प्राधान्य मिळणार. चरित्रात वर म्हटल्याप्रमाणे सार्वजनिक जीवनाचे स्थान केवळ पार्श्वभूमी पुरतेच ठरते आणि म्हणूनच चरित्रातून व्यक्तीचे व्यक्तिगत जीवन आणि सार्वजनिक जीवन यांचा समन्वय साधला जावा. चरित्रातल्या सामूहिकतेतून नायकाचे स्पष्ट दर्शन घडावे. टिळक चरित्राच्या अपयशातून एक गोष्ट स्पष्ट होते ती अशी, की चरित्रात जर व्यक्तीपेक्षा

---

28– Nevins, Allan. ' Is History made by heroes ? The Saturdey Review Nov. 5, 1955. Vol. HXXVIII, P. 43.

व्यक्तीच्या सार्वजनिक जीवनाला प्राधान्य मिळाले तर त्या व्यक्तीचा श्वास कोंडतो आणि चरित्राचा घाट बदलतो. 'अतिरिक्तपणे व्यक्तिबोध न करणाऱ्या पद्धतीमुळे दिशाभूल होते आणि चरित्रकाराने केंद्रस्थानी असलेल्या व्यक्तीची व्यक्तिगत जीवनातून पुनर्निर्मिती करण्याचे मुद्दाम नाकारल्याने फसगत होते; चरित्राच्या अखेरीस असा आत्मप्रत्यय येतो, की चरित्राचा उपयोग कालखंडाचा अभ्यास टांगून ठेवण्याकरिता खुंटीसारखा करण्यात आला आहे; चरित्रनायकाला निवांतस्थळी ठेवण्याइतकेच हे लेखन व्यवसायाच्या संप्रदायाला सोडून आहे. एकवेळ असे होऊ शकते, की चरित्रनायकाच्या बाबतीत एकाएकी गूढता निर्माण झाल्यामुळे सहकार्य अशक्य व्हावे, परंतु त्या बिंदूपर्यंत जीवनकथा जर योग्यतऱ्हेने हाताळलेली असेल, तर सार्वजनिकतेतून पडदपोशीतल्या जीवन चित्रणापर्यंत होणारे संक्रमण हा इष्ट बदल तर ठरतोच, पण त्यामुळे चरित्रकाराला दोहोंचा समन्वय करणारे त्याचे तंत्र उपयोगात आणण्याची संधी लाभते.'[२९]

ऐतिहासिक लेखनपद्धतीमुळे चरित्रात इतिहासाचे आधिक्य होते हे वर पाहिले. ऐतिहासिक लेखनपद्धतीचा ग्रंथविस्तार हा आणखी एक अपरिहार्य परिणाम आहे. चरित्रकाराचा नायकाशी दृढ परिचय तरी असतो किंवा त्याच्याशी त्याचे असे काही तादात्म्य होते, की विसराळू माणसाने आंघोळीला जाण्यापूर्वी घड्याळ काढून ठेवण्यास विसरावे तद्वत, ऐतिहासिक लेखनपद्धतीमुळे निर्माण होणारी अडचण त्याच्या ध्यानातून चटकन् निसटते आणि तो भूतकाळाशी एकरूप होतो. चरित्रनायक समकालीन असेल व चरित्रकाराला त्याचे सान्निध्य लाभले असेल तर उपलब्ध होणारी सामग्री इतकी विपुल असते, की चरित्रकार गोंधळतो आणि नायकासंबंधी माहिती देता येईल तितकी देत सुटतो. याचा अपरिहार्य परिणाम असा होतो, की चरित्राची लांबीरुंदी वाढते.

रानडे चरित्राच्या निमित्ताने महाराष्ट्रातील कितीतरी निरनिराळ्या चळवळींचा साद्यंत तपशीलवार इतिहास आणि कितीतरी इतर व्यक्तींची चरित्रे देण्यात फाटकांनी पानेच्या पाने खर्ची घातली आहेत. बडोद्याचे मल्हारराव गायकवाड प्रकरण, दयानंद सरस्वतींचा दक्षिणचा दौरा, दादाजी–रखमाबाई खटला इत्यादी घटना आणि वासुदेव फडके, सार्वजनिक काका, इत्यादीकांची चरित्रे यांना रानडे चरित्रात किती जागा द्यावयाची यासंबंधी मतभेदाला बरीच जागा आहे.

---

29- Chapman, Hester. W. 'Notes on Historical Biography', Times Literary Snpplement, 28 August 1959, P. 498, Also reprinted by Clifford, James. L. 'Biography as an Art', Oxford University Press 1962i P. 223.

टिळक चरित्रात नेमके असेच झाले आहे. केळकरांना टिळकांचे दृढ आणि आणि दीर्घकालीन सान्निध्य लाभले, त्यांच्या मोठ्या कार्यात सहभागी असण्याचा योग आला, विविध थोर व्यक्तींचा प्रत्यक्ष परिचय घडला, त्यामुळे त्यांच्यापाशी साधनसामुग्री इतकी विपुल होती, की काय सांगावे आणि किती सांगावे अशी त्यांची अवस्था झाली. केळकर चरित्राच्या प्रस्तावनेत लिहितात: ' आम्ही फक्त एकाच दृष्टीने हा चरित्रग्रंथ लिहिला आहे. ती दृष्टी म्हणजे प्रकरणवार साधार भरपूर व जुळवून माहिती देण्याची. ही पद्धती सर्वात अधिक नीरस ठरण्यासारखी असते. पण इतिहास कथनाच्या पायावरच पुढे गुणवर्णन, तात्त्विक विवेचन, वगैरेंची इमारत बांधता येते. यामुळे ज्याला सर्वांत कमी लेखन कौशल्य लागते अशी व निव्वळ काबाडकष्टाची पद्धति तेवढीच आम्ही स्वीकारून हा चरित्रखंड वाचकांना सादर केला आहे. '[३०] (पृष्ठ ३).

टिळक चरित्रात केळकरांनी इतिहासकथनाला प्राधान्य दिले यात शंका नाही, पण इतिहास कथनाला माहिती मिळवून देण्याचा सूर जोड देतो, तेव्हा तर सारे फारच बिघडते. माहिती पुरविण्याचे हे व्रत केळकरांनी किती निष्ठेने पार पाडले ते पहा: ' टिळकांचे पणजे केशव हे चिखलगावचे खोत असत ' हे विधान केल्या-बरोबर लगेच पुढे ' खोतकी हे वतन असून, बिनवसाहतीचे गाव वसविल्यामुळे आणि ओसाड पडलेली जमीन लागवडीस आणल्यामुळे, राजे लोकांकडून अनेक लोकांना ते देण्यात आलेले होते. ' (पृ. ४) अशी खोतकीची व्याख्या आढळते. ज्ञान प्रकाश हे पत्र १८४९ च्या फेब्रुवारी महिन्यात सुरू झाले, इतकी माहिती देऊन केळकरांचे समाधान होत नाही. आणखी पुढे जाऊन ते,' त्याचा आकार प्रथम सुमारे २०×८ इंच इतका असून त्याची आठ पृष्ठे असत. ते शिळा छापावर छापले जात असे. अशा पत्राची वार्षिक वर्गणी तेव्हा दहा रुपये होती..' (पृष्ठ ७३). इत्यादी बारीक सारीक तपशीलासह ज्ञानप्रकाशची माहिती पुरवितात. वास्तविक वाचकांना उत्सुकता असते ती टिळकांचे व्यक्तिमत्त्व समजावून घेण्याची. ज्ञान प्रकाशचा आकार त्यांच्या दृष्टीने गौण ठरतो, पृष्ठ ४७१–७२ वर ते लिहितात: ' कोणत्याही देशात मनुष्यास पुढारीपण यावयास त्याला परिस्थितीशी झगडावे लागते. परिस्थितींत समकालीन संस्थांचाही समावेश होतो. संस्था म्हणजे एकाच हेतूने प्रेरित झालेल्या कार्यकर्त्या माणसांचा संघ देशाची किंवा प्रांताची प्रगती मोजण्याचे संस्था हे वाटेवरचे मैलाचे दगड तर खरेच; कारण त्यांच्या निरनिराळ्या वेळच्या स्वरूपांवरून राष्ट्राच्या प्रगतीच्या स्वरूपाचा अंदाज करता येतो. पण मजल मोज-ण्याच्या मैली दगडांपेक्षा फौजेच्या चढाईच्या मार्गावरील लष्करी ठाणी ' किंवा

---

३०– केळकर, न. चिं. लोकमान्य टिळक यांचे चरित्र, १८९९ अखेर पूर्वार्ध १९२३, खंड १ ला, पृ ३, ४, ७३, ४७१–७२.

नाकी ' हेच वर्णन संस्थांना अधिक लागू पडेल.' मधूनच असे सिद्धांत मांडून स्वमत प्रतिपादनाची संधी केळकर साधून घेतात.

चरित्राला भार व्हावा इतकी ही वर्णने आहेत. चरित्रकार हा प्रवासातला गाईड नव्हे. ही वर्णने वाचताना काही ठिकाणी उत्सुकता वाटते, पण त्यांचा व्यक्तिदर्शनाशी काही संबंध नाही. उत्सुकता वाटते ती, ती अपरिचित असतात म्हणून. परंतु ही माहिती मिळवून देणे हे चरित्राचे कार्य नव्हे. चरित्राचे कार्य मनुष्याच्या व्यक्तित्वावर प्रकाश पाडण्याचे आहे. टिळक चरित्रात व्यक्तित्व बाजूलाच राहाते आणि माहिती पुरविण्याचे काम नेटाने पार पाडले जाते. लिट्न स्ट्रॅचीच्या शब्दात सांगायचे म्हणजे, ' चरित्र ज्ञानवर्धक असण्यापेक्षा प्रकाश पाडणारे असावे.'[३१] टिळकचरित्रात आलेल्या या माहितीत व्यक्तित्त्वदर्शनाचे सामर्थ्य नाही आणि म्हणूनच ती निरुपयोगी ठरते. व्यक्तित्वदर्शन यथार्थपणे होत नसेल तर अशी माहिती गाळणे अपरिहार्य आहे. टिळकचरित्रातला मुख्य दोष असा, की त्यात साधनसामग्री विपुल असूनही निवड व्यवस्थित झालेली नाही. चरित्र अनेक ठिकाणी पाल्हाळाने भरलेले आहे. टिळकांचे व्यक्तित्व मुळी आकार घेत नाही. मग त्यात जीव कोठून भरावा ? अशा चरित्राच्या संदर्भात नव्या आंतरराष्ट्रीय विश्वकोशामधे व्यक्त झालेला पुढील अभिप्राय समर्पक वाटतो. ' चरित्र नायकाचे स्वभावविशेष आणि त्याचे व्यक्तिमत्त्व चरित्रकाराने सतत डोळ्यापुढे ठेवले पाहिजे. विषयान्तर करणाऱ्या प्रबंधाच्या ओझ्याखाली या गोष्टी गाडल्या गेल्या तर त्याचे पुस्तक मग ते कितीही महत्त्वाचे वा चित्ताकर्षक असू द्या, ते चरित्र म्हणून नावापुरतेच उरते.'[३२]

चरित्रात व्यक्तित्वदर्शनाचा मूळ गाभा कायम राखून ग्रंथ विस्तार झाला, तर तो काही चरित्राचा दोष ठरत नाही. चरित्रकाराने खुशाल तपशिलात शिरावे, पण चरित्राला भारभूत होणारी आणि व्यक्तित्त्वदर्शनाला निरुपयोगी ठरणारी घटिते वर्ज केली पाहिजेत. चरित्रकाराला व्यक्तिदर्शनाचा रूळलेला मार्ग सोडून विषयांतराच्या आडमार्गाने जाण्याची परवानगी नाही. कदाचित् त्यामुळे चरित्रकाराचे श्रम वाढतील. पण चरित्रात निवड करण्याचे टाळले तर सारेच श्रम व्यर्थ होतात. बॉस्वेलने लिहिलेले डॉ. जॉनसनचे चरित्र हे एक लांबलचक पुस्तक आहे. पण तेच चरित्रवाङ्मयात अजोड ठरले. चरित्राच्या पहिल्यापानापासून शेवटच्या पानापर्यंत डॉ. जॉनसनची सजीव मूर्ती सतत वाचकांच्या डोळ्यापुढे

31– (' Biography should be illuminating rather than informative.')

32– Dunn, Waldo. H. ' English Biography,' J. M. Dent & Sons Limited 1916, P. 234–235.

उभी राहाते. हे त्या चरित्राच्या यशाचे मर्म आहे. तीन खंड मिळून १८९९ पृष्ठे खर्ची घातलेल्या टिळक चरित्रात हे असे होत नाही.

चरित्रनायक आणि उपलब्ध असलेली सामग्री यावर चरित्राचा विस्तार अवलंबून असतो. टिळकांसारखा नायक आणि उपलब्ध असलेली भरपूर साधन-सामग्री यामुळे टिळक चरित्राचा विस्तार झाला, हे खरे, पण विस्ताराबरोबरच केळकरांनी सरसताही गमावली. चरित्र ही एक वाङ्मयीन कृती आहे, याची बॉस्वेलला जाणीव होती, त्यामुळे डॉ. जॉनसनच्या चरित्राचा विस्तार होऊनही चरित्र सरस वठले, तशी केळकरांना जाणीव झालेली दिसत नाही. त्यामुळे चरित्राचा नुसताच विस्तार झाला आणि चरित्राला जडत्व आले. वाङ्मयीन दृष्टचा चरित्र अपयशी ठरले.

चरित्रातल्या ऐतिहासिक लेखन पद्धतीला अपरिहार्य मर्यादा आहेत. त्या लक्षात घेतल्या, की 'व्यक्तींची चरित्रे म्हणजे राष्ट्राचा इतिहास' हे कार्लाइलचे सुप्रसिद्ध विधान तपासून पाहाणे आवश्यक ठरते. कार्लाइलचे विधान शब्दशः असे आहे 'कोणत्याही देशाचा इतिहास ज्यांनी तो इतिहास घडविला त्यांच्या चरित्रात असतो.'[३३]

कार्लाइलच्या सुरात सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी आपला सूर मिसळला आहे. भारतवर्षीय प्राचीन चरित्रकोशाला लिहिलेल्या प्रस्तावनेत त्यांनी पुढील विधान केले आहे. 'पण इतिहास हा बहुवंशाने व्यक्तिचरित्रमय असतो. किंबहुना जगात इतिहास असा काही नसून जग म्हणजे एक मोठा व्यक्तिचरित्रकोशच होय.[३४]

चित्राव यांच्या विधानात अतिव्याप्तीचा दोष आहे चरित्रकोषाच्या लेखनाला स्थलाभावी मर्यादा पडतात चरित्रकोशाचे लेखन हे एक प्रचंड काम आहे· चरित्रकोशात चरित्राप्रमाणे व्यक्तीच्या पूर्ण व्यक्तिमत्त्वाचे वा जीवनाचे दर्शन घडणे दुरापास्त असते. साहजिकच चरित्रकोशात इतिहासाचे फार तर ओझरते दर्शन घडावे. कारण, चरित्रकोशाचे लेखन आणि इतिहास लेखन यांच्या उद्दिष्टात मुळातच फरक आहे. अशा परिस्थितीत संपूर्ण इतिहास समजावून घेण्याकरिता चरित्रकोश हे अत्यंत तोकडे साधन ठरते. व्यक्तिजीवनातून इतिहासाचे ज्ञान

---

33– Ausubel, Herman. 'Individual in History', from 'Historians and their Craft'– A study of the Presidential Addresses of the American Historical Association 1884–1945. P. 256– 257.

३४– चित्राव, सिद्धेश्वर शास्त्री, 'भारतीय प्राचीन चरित्रकोश,' प्रस्तावना (१९३२) पृ. १.

संपादन करण्याचा प्रयत्न म्हणजे बादलीने समुद्र उपसण्यासारखे आहे.

व्यक्ती ज्या काळात समाजाचा केंद्रबिंदू मानली गेली, त्याकाळात वरील विचारसरणी रुजली. इतिहासातल्या व्यक्ति एकतर वॉशिंग्टनप्रमाणे परमेश्वराचा अवतार किंवा तिसऱ्या जॉर्जप्रमाणे राक्षसी असत. समाजातल्या देवतुल्य नायकाकडे सामान्यजनांचा वाली ह्या दृष्टीने पाहिले जात होते. १८९० मध्ये जे. टी. मॉरसे (J. T. Morse) यांनी अमेरिकेतील मुत्सद्यांच्या चरित्रकोशाची योजना हाती घेतली. त्या योजनेच्या मुळाशी व्यक्तींच्या चरित्रातून राष्ट्राचा इतिहास उभा राहावा हीच कल्पना होती. व्यक्तीच्या इच्छेनुसार घटना घडतात हे त्या चरित्रकोशाचे गृहित तत्त्व होते. राष्ट्रीय घडामोडीचे मूल्यमापन करताना व्यक्तीच्या यशापयशाचे परिमाण वापरण्यात आले. पण पुढे इतिहासकारांचाच इतिहासाकडे पाहाण्याचा दृष्टीकोन पार बदलला. इतिहासाचे शास्त्र झाले, तेव्हा इतिहासकारांची असामान्य व्यक्तींबद्दलची आस्था संपली. त्यांचे लक्ष राजकीय, सामाजिक, आर्थिक संस्था घडविणाऱ्या अव्यक्तिगत शक्तींवर केंद्रित झाले.

इतिहास आणि चरित्र यांच्या मर्यादा व या दोहोतला फरक आकलन झाला म्हणजे कार्लाइलचे विधान तर्काशी विसंगत आणि वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे आहे, याची खात्री पटते. या संदर्भात एक गमतीदार हकिकत देण्यासारखी आहे. आर्चबिशप लँड (Archbishop Land) यांच्यावर प्यूरिटन पंथाच्या लोकांनी देशद्रोहाचा खटला भरला. प्रमुख आरोपांच्या बाबतीत आपण निर्दोष असल्याचे ते सिद्ध करू शकले. पण तेवढ्याने फिर्यादीचे समाधान होईना. आर्चबिशपना फाशी दिलेच पाहिजे असा त्यांनी आग्रह धरला. त्यांच्या हातून इतके छोटे छोटे गुन्हे घडले होते की, त्या सगळ्यांची गोळाबेरीज केली म्हणजे देशद्रोहाचा एक मोठा गुन्हा होईल, असे त्यांचे म्हणणे होते या जुलमाने आर्च बिशप संतापले आणि ते ओरडले, 'This is the first time in my life, that I ever heard men declare that 200 black cats make one black horse.'[३५] आर्चबिशप लँड यांच्या उद्गारातून कार्लाईलच्या विधानाला चोख उत्तर मिळते मांजर आणि घोडा हे भिन्न प्राणी आहेत. तेव्हा दोनशे काळ्या मांजरी म्हणजे एक घोडा होत नाही. चरित्र म्हणजे इतिहास नव्हे. इतिहास म्हणजे चरित्र नव्हे. व्यक्तींची चरित्रे म्हणजे राष्ट्राचा इतिहास हे विधान तर्काला सोडून आहे.

विवक्षित कालखंडाचे ज्ञान संपादन करण्यास चरित्र अपुरे ठरते. इतिहास सर्वसमावेशक असतो. एका संपूर्ण कालखंडाचे चित्र उभे करताना रचना सलग व्हावी लागते आणि म्हणूनच इतिहासात बारीकसारीक तपशिलाला महत्त्व

35– Nevins, Allan. 'Is History made by heroes'? The Saturday Beview No. 5, 1955, Vol. XXXVIII, P, 9.

प्राप्त होते. इतिहासकाराला त्याकरिता विशिष्ट कालखंडातील, जातिजमाती, बहुजन समाज, विचार प्रवाह इत्यादी अव्यक्तिगत शक्तींचे अवगाहन करावे लागते. चरित्रात काटकसर आणि रचनेची सफाई लक्षणीय ठरते. चरित्रकार अमर्याद पसरलेल्या भूतकाळातील आकलनीय व चरित्रनायकाशी संबंधित असे भाग वेगळे काढून त्यांचे चित्रण करतो. कारण प्रत्येकाच्या जीवनाला मर्यादा असते. काही झाले तरी चरित्रातून व्यक्तिजीवनाच्या परिघात येणाऱ्या भागाचेच चित्रण होणार. दुर्बिणीतून दूरवरचे विशाल, सलग दृश्य टिपावे तसे चरित्रातून होत नाही. चरित्राच्या झरोक्यातून त्रुटित दृश्ये दृष्टीस पडतात. हे सुटे सुटे दृश्यांचे कपटे गोळा करून, जुळवून डोळ्यासमोर धरले तरी मोकळ्या जागा राहातातच. शिवाय, चरित्रातील त्रुटित दृश्ये लागोपाठ क्रमाने येतीलच असे नाही. डगलस फ्रीमन (Douglas Freeman) यांनी लीचे (Lee) चरित्र चार खंडात पूर्ण केले. परंतु त्यांनी स्वतःला काही मर्यादा घालून घेतल्या. त्यांनी यादवी युद्धाचे पूर्ण चित्र रेखाटले नाही. व्हर्जिनियातले युद्धही पूर्णपणे चित्रित केले नाही लीने युद्धाचे प्रत्यक्ष जेवढे अवलोकन केले, तेवढ्याच भागाचे वर्णन चरित्रात आले आहे. जेम्स ट्रस्लो (James Truslow) यांनी अॅडाम्स (Adams) कुटुंबाचे १७६५ ते १९२० च्या दरम्यानचे सुस्पष्ट चित्र रेखाटले आहे. परंतु १८३० मध्ये जॅकसन (Jacson) च्या उदयाबरोबर अमेरिकेच्या राजकीय प्रवाहापासून हे कुटुंब दूर झाले. तेथून पुढे या कुटुंबामुळे अमेरिकेच्या इतिहासावर फारच थोडा प्रकाश पडतो. सायला (Sylla) ल्यूक्यूलस (Lucullus) आणि पॉम्पे यांची कृत्ये आणि पराक्रम हे मिथ्रिडॅट्रीक (Mithridatric) युद्धाचे लागोपाठ येणारे भाग आहेत. पण त्यांच्या चरित्रातून विविध दृष्टीने लिहिलेली वर्णने पूर्णत्वाने लिहिली गेली नसती तर या युद्धाची कल्पनाच आली नसती. पण हे ऐतिहासिक लेखनपद्धतीचा अवलंब केल्यामुळे शक्य झाले. एरव्ही चरित्रात त्रुटित दृश्येच टिपलेली आढळतात.

चरित्रकाराचा इतिहासाकडे पाहाण्याचा दृष्टीकोन बऱ्याचश्या बाबतीत उथळ असतो. चरित्रात अव्यक्तिगत, निर्माणक्षम शक्तींचा सूक्ष्म अभ्यास अभावानेच आढळणार. याचे कारण असे आहे, की चरित्राचा आकृतिबंध विचारप्रवाहांचा जोरदार उपयोग करण्यास प्रतिकूल ठरतो. पण सामाजिक अभ्यासातून उपलब्ध होणाऱ्या; सत्य आणि पूर्णज्ञान यावर आधारलेल्या; सूक्ष्म व अर्थवाही विचाराच्या द्वारे तर इतिहासाची पकड घेता येते. चरित्रकाराला रोमच्या पतनाचे कारण केवळ निरो आणि टायबेरियस यांच्या अधःपातात सापडले. इतिहासकार कदाचित ते बिघडलेले सार्वजनिक आरोग्य, मलेरिया, सात्त्विक आहाराचा अभाव किंवा आरोग्यरक्षणाच्या कमतरतेत शोधून पाहील. चरित्रकाराचा उथळ दृष्टीकोन स्वीकारून भूतकाळाकडे पाहण्याचा प्रयत्न अपुरा ठरतो.

चरित्रकाराचा इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टीकोन मर्यादित, केवळ व्यक्ती पुरताच असतो. चरित्रात महत्त्व असते ते इतिहासापेक्षा केंद्रस्थानी असलेल्या

चरित्रनायकाचे. याचा अपरिहार्य परिणाम असा होतो, की महान जीवननाटयात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तीच्या खाजगी जीवनाला चरित्रात महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. चरित्रात मूळात असे गृहित धरलेले असते, की राजकीय, सामाजिक संस्थेवर व्यक्तीची छाया पडलेली असते. पण प्रत्यक्षात अनेक व्यक्तींची छाया संस्थावर पडलेली असते. चरित्रात अंतरंगाचे भावदर्शन घडते. व्यक्तिमत्त्वाचा उजाळा दृष्टीस पडतो. पण इतिहास असा थोडाच उरतो. तेव्हा इतिहासाचे साधन म्हणून चरित्राचा उपयोग काही एका मर्यादेतच करता येतो.

चरित्राची वाङ्मयीन वृत्ती पाहाता चरित्रापासून इतिहासाची अपेक्षा करणे चुकीचे ठरते. चरित्र इतिहासाचे एक साधन आहे. आणि तेही अपुरे साधन आहे. एवढे तोकडे साधन हाती घेऊन एका संपूर्ण कालखंडाचा शोध घेण्याचा प्रयत्न तो यशस्वी कसा व्हावा ? व्यक्तीच्या जीवनातून भूतकाळाचा वेध घेण्याऐवजी समष्टीच्या जीवनातुन घेणे अधिक फलदायी ठरेल. चरित्र एकसुरी असते. इतिहासात स्वरैक्य असते. विविध स्वरांचा मेळ साधलेला असतो. इतिहासाची घडण केवळ व्यक्तीवर अवलंबून नसते. इतिहासाच्या निर्मितीत व्यक्तीबरोबरच वर म्हटल्याप्रमाणे विचार प्रवाह, सामाजिक, आर्थिक शक्ती आणि दैव हे घटक कार्यान्वित असतात. केवळ एकाच घटकाच्याद्वारे इतिहास जाणून घेण्याचा प्रयत्न एकांगी ठरतो. असा प्रयत्न सर्वांगाने व्हायला हवा. भूतकाळाच्या विविध घटकांचे पूर्ण आकलन केवळ व्यक्तिजीवनातून होणे अशक्य आहे. मग चरित्राकडून इतिहासाची अपेक्षा ती कशी करावी ? कार्लाइलने गणिती पद्धतीने मांडलेले समीकरण दुर्बोध वाटते. कार्लाइलने चरित्राकडून केलेली इतिहासाची अपेक्षा, चरित्राचे वाङ्मयीन स्वरूप लक्षात घेता चरित्राला झेपण्यासारखी नाही. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनी वर उद्धृत केलेलें प्रतिपादन करताना सर्वमान्य झालेली पाश्चात्यमूल्यें विचारात घेतलेली दिसत नाहीत. एरव्ही असे प्रतिपादन करावयास ते धजले नसते.

टिळकचरित्राच्या अपयशातून जे प्रश्न जाणवले, त्यांची उत्तरे सापडतात. ती अशी : चरित्र आणि इतिहास या दोन स्वतंत्र कृती आहेत. आपापले स्वातंत्र्य अबाधित राखून केवळ साधन म्हणून त्या एकमेकास सहाय्यभूत ठरतात. इतिहास हे शास्त्र आहे. इतिहास वाङ्मयाची शाखा नव्हे, चरित्र प्रतिज्ञेने इतिहास आणि वृत्तीने आहे वाङ्मयीन. ऐतिहासिक लेखनपद्धती मूलतःच चरित्राच्या वाङ्मयीन वृत्तीला बाधक ठरणारी आहे. चरित्राचा केंद्रबिंदू व्यक्ती आहे. चरित्रलेखन केंद्रगामी असते. चरित्रात ऐतिहासिक लेखनपद्धती केंद्रत्यागी ठरते. कारण ऐतिहासिक लेखनपद्धती व्यक्तींना गौण लेखते. त्यामुळे व्यक्तित्वदर्शनाचे मूलभूत उद्दिष्ट साध्य होऊ शकत नाही. परिणामाअंती चरित्राचे वाङ्मयीन अवमूल्यन होते आणि म्हणूनच चरित्रात इतिहास केवळ पार्श्वभूमीपुरता असावा पृष्ठसंख्या हे चरित्राच्या यशाचे गमक नव्हे. चरित्राची वाङ्मयीन वृत्ती कितपत जोपासली गेली आहे, यावर चरित्राचे यश अवलंबून असते.

# चार

## चरित्र : कला की कारागिरी ?

चरित्रातल्या व्यक्तित्वदर्शनामुळे चरित्र इतिहासापासून वेगळे पडते. चरित्रात्मक सत्याच्या आग्रहामुळे चरित्र आणि कादंबरी या दोन भिन्न कृती ठरतात. तर त्याच सत्याच्या आग्रहामुळे चरित्र आणि इतिहाश या दोन कृतीमध्ये पुन्हा जवळीक निर्माण होते. चरित्राला इतिहास, कादंबरी, मृत्यूलेख व कंटाळा यांनी घेरलेले आहे. चरित्रातला रुक्ष अंश तसाच राहू दिला तर तो चरित्राचा मृत्युलेख ठरतो. बरे तो नीरस अंश दूर करण्याकरिता चरित्राची कादंबरी करावी तर तोही चरित्राचा मृत्युलेखच ठरतो. चरित्रातला नीरस अंश दूर तर झाला पाहिजे. पण तसे करताना कल्पनेचा आधार घेता येत नाही. अशी काहीशी अवघड कामगिरी चरित्रकाराला पार पाडावी लागते. साहजिकच या विशिष्ट परिस्थितीत चरित्रलेखनाला कला म्हणावे, की कारागिरी म्हणावे असा पेच पडतो.

काही नामवंत टीकाकारांच्या मते आद्यकथा व आद्यचरित्रे यांच्या स्वरूपात फारसा फरक नव्हताच. गोष्ट सांगायची म्हटले म्हणजे एखाद्या थोर व्यक्तीच्या जीवनाची गोष्ट सांगण्याकडे प्रवृत्ती होणे साहजिकच आहे. चरित्रनायकास मोठे-पणा देण्याच्या हेतूने, चरित्रनिवेदनाला अद्‌भूतरम्य वा असंभाव्य वातावरणाची जोड मिळून त्याला कथेचे स्वरूप प्राप्त होणेही तितकेच स्वाभाविक आहे. यातच धार्मिक हेतूंची भेसळ झाली म्हणजे हे मिश्रण जास्तच सुलभतेने घडून येते. हिंदुस्थानातील प्राचीन काळातील लोकप्रिय कथा किंवा युरोपीय वाङ्मयातील संतचरित्रे ही अशा प्रकारची उत्कृष्ट उदाहरणे होत. मराठीत या संदर्भात हनुमंत स्वामींनी लिहिलेली रामदास स्वामींची बखर उल्लेखनीय आहे. अशा प्रकारच्या धार्मिक कथांकडून आपण काल्पनिक लौकिककथांकडे वळलो. फ्रेंच वास्तववादी कादंबरी प्रहसनातून विकसित झाली. इंग्रजी लेखकांना जेव्हा चरित्रातले सत्याचे बंधन असह्य झाले तेव्हा त्यांनी कल्पनेचा आश्रय घेतला आणि चरित्राची शाखा म्हणून इंग्रजी कादंबरी विकसित झाली. कित्येक वर्षे इंग्रजी चरित्रे आणि कादंबरी समांतर विकास पावली. विशिष्ट सत्याच्या आग्रहामुळे चरित्र आणि कादंबरी या दोन कृतींमधला फरक सुस्पष्ट होतो आणि म्हणूनच कादंबरीतली कला चरित्रात कितपत शक्य आहे, या मुद्याचा विचार करताना चरित्र आणि कादंबरी या दोन कृतींचा तौलनिक अभ्यास आवश्यक ठरतो.

कादंबरीतले चित्रण कल्पनेच्या पातळीवरून होते. कादंबरीत सर्वसामान्यपणे काल्पनिक व्यक्ती चित्रित होतात. कादंबरीतील व्यक्तिरेखा प्रत्यक्षातील व्यक्तींशी अगदी तंतोतंत शंभर टक्के जुळाव्यात अशी अपेक्षा करता येत नाही. फार तर त्यांचे प्रत्यक्षातील व्यक्तींशी थोडेफार साम्य असू शकेल. गारंबीच्या बापूमधील बापूची व्यक्तिरेखा गारंबीतल्या प्रत्यक्षातील व्यक्तीशी बरोबरी करू पाहते असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा बापूच्या व्यक्तिमत्त्वातील काही घटक प्रत्यक्षातील व्यक्तीशी जुळतात असे आपल्याला म्हणायचे असते. कादंबरीकार प्रत्यक्षाची, सत्याची चौकट झुगारून देतो. त्याची सारी भिस्त कल्पनेवर असते. कादंबरीकार नायकाच्या व्यक्तिमत्त्वास हवा तसा आकार देण्यास मोकळा असतो. तो जबाबदार असतो तो स्वतःलाच आणि आपल्या कलेच्या निकषांना. कादंबरीकार आवश्यक त्या घटितांचे संशोधन करू शकतो. त्यांना नवे रूप देऊ शकतो. समजा प्रत्यक्षातल्या व्यक्तीचे त्याने चित्रण केलेच, तर त्याला प्रत्यक्षातून स्वतःच्या इच्छेप्रमाणे निवड करता येते. प्रत्यक्षाला हवी तशी कलाटणी देता येते. चित्रित होणाऱ्या नायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास आणि संविधानक यावर त्याचे संपूर्ण नियंत्रण असते. कादंबरीकार जे काही सांगतो ते बरोबर असते. पण ते सत्य असेलच असे नाही. कारण, नवसर्जन ही प्रत्येक कादंबरीलेखनामागील लेखकाची प्रेरणा असते. कादंबरीकार प्रत्यक्षाला समांतर, प्रत्यक्षाचा अनुभव देणारी वास्तव, पण त्याच्या कल्पनाचित्रातील नवसर्जनाला सुसंवादी अशा नववास्तवाची, नव्या प्रत्यक्षाची निर्मिती करीत असतो

चरित्रातले चित्रण प्रत्यक्षाच्या पातळीवरून होते. चरित्रात प्रत्यक्ष जीवन जगलेल्या सत्य व्यक्तींचे चित्रण होते. त्या व्यक्ती मुळाबरहुकूम असतात. चरित्रांची मूळ प्रकृतीच अशी आहे, की चरित्रकाराला सत्याचे बंधन स्वीकारावे लागते. चरित्रकाराला नवनिर्मितीचे स्वातंत्र्य घेता येत नाही. तो फक्त शोध करू शकतो. कागदोपत्री पुरावा आणि स्मृती यांवर त्याची सारी भिस्त असते. चरित्रकाराला नायकाच्या जीवनाला हवा तसा आकार देता येत नाही. त्याचे व्यक्तिमत्त्व आपल्या मनाप्रमाणे घडविता येत नाही. अथवा कल्पनेने तपशील भरून काढता येत नाही. चरित्रातले नायकाचे जीवन मुळाबरहुकूम असले पाहिजे. चरित्रकारापुढे व्यक्ती असते ती अगोदरच जीवन जगलेली, विकसित व्यक्तिमत्त्वाची. तेव्हा कुठल्या एका प्रकरणात नायकाचे स्वभावविशेष बदलण्याची शक्यता नसते किंवा अन्य प्रकरणात संविधानकाला ढळ पोचण्याची भीतीही नसते. चरित्रनायकाच्या जीवनकथेची सुरवात, मध्य आणि शेवट यांबाबत संशोधन करावे लागत नाही. ते जीवन जसे घडले तसे त्याचे निवेदन करावयाचे असते. त्याला सत्यकथन करायचे असते. फक्त चरित्रनायक जसा होता तसा तो चित्रित करावयाचा असतो. चरित्रातली प्रत्यक्षातली व्यक्ती आणि कादंबरीतली व्यक्ती

यामधे ही जी तफावत आढळते याचे कारण असे आहे, की चरित्रात नवनिर्मितीला वाव नसतो. चरित्रकार व्यक्तिजीवनाची आणि व्यक्तिमत्त्वाची केवळ पुर्ननिर्मिती करीत असतो.

चरित्र आणि कादंबरी, यांमधला आणखी एक भेद असा, की कादंबरीतली व्यक्ती कादंबरीकाराला पूर्णपणे आकलनीय असते. कारण, कथा निवेदक जो कादंबरीकार तो तिचा निर्माता असतो. त्याला ती पूर्णपणे ज्ञात होते. दैनंदिन जीवनात आपल्याला परस्परांची वरवर ओळख पटते. आपण परस्परांना पूर्णपणे ओळखूच शकत नाही. कारण, प्रत्येकाच्या मनात एक असे दालन असते, की तिथे कुणालाच प्रवेश मिळू शकत नाही. त्या दालनात प्रवेश करून तिथल्या बारीकसारीक गोष्टी जाणून घेण्याची दिव्यदृष्टी आपल्याजवळ नसते. पण कादंबरीकाराची इच्छा असली तर कादंबरीतल्या व्यक्ती आपल्याला पूर्णपणे ज्ञात होऊ शकतात. वास्तवसृष्टीत प्रत्येक गोष्ट अनन्यसाधारण असते. या उलट, सर्व सृष्ट पदार्थांना कल्पनाविश्वात प्रतिरूपे असतात. बाह्य सृष्टीत ज्या गोष्टी अज्ञात असतात त्या माणसाच्या आंतरविश्वात ज्ञात असलेल्या गोष्टींसारख्या असतात. या उलट, आंतरविश्वांतील अज्ञात असलेल्या गोष्टींची बाह्य विश्वातील ज्ञात सृष्टी पदार्थांशी तुलना होऊ शकते. कल्पनाविश्वातील गोष्टी अपूर्ण असतात, इतर गोष्टींच्या केवळ तुलनेनेच त्यांची ओळख पटते, त्यांना पूर्णत्व येते. जे एरव्ही अव्यक्त राहते ते कल्पनेच्या आधाराने व्यक्त होते, कादंबरीवर कल्पनेच्या साह्याने परकायाप्रवेश करून नायकाच्या मनातील बारीकसारीक गोष्टी हलक्या हाताने टिपतो. तो नायकाविषयी बोलू शकतो, त्याच्या तोंडून बोलू शकतो किंवा त्याचे मनोगत आपल्याला ऐकवू शकतो. व्यक्तीच्या जागृत मनाबरोबरच सुप्त मनातल्या हालचाली हलक्या हाताने तो टिपतो. कादंबरीतली व्यक्ती स्पष्ट झाली नाही, कादंबरीकाराने तिच्याबद्दल सगळे काही सांगून टाकले नाही. तरी ती व्यक्ती स्पष्ट होण्यासारखी आहे, असा कादंबरीकार विश्वास निर्माण करतो. त्यामुळे कादंबरीत एरव्ही दैनंदिन जीवनात सापडणार नाही. अशी आगळीच वास्तवता सापडते.

व्यक्तीची सुख:दुखे, मनोराज्ये इत्यादींचे अद्‌भूत विश्व कादंबरीकार वाचकांसाठी खुले करतो. मानवी जीवनाची ही बाजू उलगडून दाखविणे हे त्याचे प्रमुख कार्य. पूर्ण ज्ञान हा केवळ भ्रम आहे, पण कादंबरीकार जे सिद्ध होऊ शकत नाही त्याचेही चित्रण करतो आणि पूर्णता गाठण्याचा प्रयत्न करतो. संकोचामुळ व्यक्तीचे खाजगी जीवन प्रकट होत नाही. पण कादंबरीत व्यक्तीचे अप्रकट जीवनही पूर्णपणे प्रकाशित होऊ शकते. आपल्या सुखदु:खांची परिणती अखेरीस कृतीमधे होते. आपली सुखदु:खे हा आपल्या खाजगी जीवनाचा भाग कादंबरीकाराला या खाजगी जीवनात प्रवेश मिळू शकतो. माणसाचे खाजगी जीवन बाह्य पुराव्याने

सिध्द होऊ शकत नाही. नायकाच्या मुखातून योगायोगाने बाहेर पडलेला शब्द, उंचावलेली भुवई किंवा दीर्घनिश्वास यामुळे त्याच्या खाजगी जीवनावर प्रकाश पडतो खरा, पण मग त्यामुळेच त्या जीवनातला खाजगीपणा नष्ट होतो. कल्पनेच्या अभावी चरित्रात असे केवळ खाजगी जीवन चित्रित होणे कठीण जाते.

कादंबरीत नायकाच्या बाह्य जीवनाबरोबरच त्याच्या आंतर्जीवनाचेही संपूर्ण दर्शन घडू शकते आणि म्हणूनच प्रत्यक्षातल्या व्यक्तीपेक्षा कादंबरीतल्या व्यक्ती सुसंगत आणि निश्चित असतात. प्रत्यक्षातले जीवन बेबंद, विस्कळीत योजनाहीन असते, तर कलाकृती ही सुरचित, सुश्लिष्ट व योजनाबद्ध असते. पुन्हा प्रत्यक्षातल्या व्यक्तींच्या कृतीमागले, वर्तनामागले कार्यकारण भाव, कधीही कोणालाही पूर्ण सत्याची प्रतिज्ञा घेऊन, सांगता येणार नाहीत. म्हणूनच त्यात सुसंगती दाखविता येणार नाही. कलाकृतीत सर्व कल्पनाजन्य असते, म्हणून कोणतेही जीवन योजनेत बसवता येते. त्यातील कार्यकारणभाव सांगता येतात. मनोविश्लेषण करता येते. हे शक्य आहे, म्हणूनच कलाकृती शक्य आहे. कारण कलाकृती म्हणजे रचना, कलाकृती म्हणजे अमूर्ताची केलेली मूर्ती.

या पार्श्वभूमीवर चरित्राचा विचार केला, म्हणजे चरित्रातल्या कलेच्या मर्यादा स्पष्ट होतात. चरित्रकाराला बाह्य आविष्करामुळे, पुराव्याने सिद्ध होणारे जीवन चित्रित करावे लागते. याचा अपरिहार्य परिणाम असा होतो, की चरित्रात नायकाविषयी सांगायचे तितके सांगूनही बरेचसे बाकी उरते. चरित्रविषय व्यक्तीचा बाह्य आविष्कार आणि कृती यांवर चरित्राचे लेखन अवलंबून असते. चरित्र-नायकाला कुणीतरी प्रत्यक्ष पाहिला, त्याच्या कृतींची दखल घेतली आणि तसा कागदोपत्री पुरावा उपलब्ध होऊ शकला तरच चरित्र लिहिले जाणार. याचाच अर्थ असा, की चरित्रात प्रकट तेवढेच जीवन चित्रित होते. नायकाचे, अप्रकट जीवन हे अप्रकटच राहते. चरित्रात कृताच्या अनुषंगाने व्यक्तीच्या अंतरंगाचे दर्शन घडविता येते. पण तिच्या अंतरंगात कल्पनेच्या साह्याने प्रवेश करण्याचें कादंबरीकाराचे स्वातंत्र्य चरिकाराला घेता येत नाही. चरित्रकार पुराव्याने शाबीत झालेले तेवढेच व्यक्तीचे स्वभावविशेष, कृतीमागील प्रेरणा नमूद करतो, तर कादंबरीकार प्रत्यक्ष पुरावा नसलेले परंतु सत्याशी सुसंगत वा संभवनीय असे स्वभावविशेष, प्रेरणा, विकार, विचार रंगवून व्यक्तींबाबतचे आंतरिक सत्य प्रगट करतो. कादंबरीत व्यक्तीचे बाह्यजीवन आणि आंतर्जीवन यामधे पूर्णपणे संबंध प्रस्थापित होतात, त्यांचे संयोजन होते तसे ते चरित्रात होत नाही. आंद्रे मोर्वा लिहितात, ' बाह्य जीवनाशी आंतर्जीवनाचे संयोजन घडवून आणण्यात ही जी अशक्यता असते त्यातच कादंबरीकारापेक्षा चरित्रकाराचे गौणत्व आहे.'[१]

---

1– Maurois, Andre. ' Aspects of Biography ', Translated from the French by S. C. Roberts, Cambridge University Press, 1929, P. 167.

चरित्र आणि कादंबरी या दोन कृतींचा तपशिलात शिरून जो जो अधिक विचार करावा, तो तो त्या कृतींमधले अंतर वाढत जाते. कादंबरीत जसा कल्पनेचा अनिर्बंध वापर करता येतो, तसा तो चरित्रात करता येत नाही. चरित्रात कल्पनेचा उपयोग काही एका विशिष्ट मर्यादेतच करता येतो. या विवक्षित मर्यादे-पलिकडे कल्पनेचा उपयोग चरित्राच्या मूळ प्रकृतीला मानवणारा नाही. चरित्रकार चरित्रविषयभूत व्यक्तीच्या गतजीवनाची पुनर्रचना करीत असतो. नवनिर्मिती नव्हे. चरित्रनायकाचे गतजीवन समजावून घेताना, तो भूतकाळ बऱ्याच स्पष्ट स्वरूपात डोळ्यासमोर उभा राहावा म्हणून कल्पनेची मदत घेणें आवश्यक ठरते. चरित्रनायक आपल्या स्वभावगुणास अनुरूप अशा रीतीने आपणाशी चालत बोलत आहे. आपण त्याच्या संगतीनेच वागतो आहो असा भास होईल, इतक्या कोटीला तन्मयता जाऊन पोचावी म्हणून कल्पनेचा उपयोग करावा लागतो. चरित्राची साधनसामग्री गोळा करताना, घटितांची जमवाजमव करताना किंवा एकत्र करताना लेखकाने कल्पनेचा भरपूर उपयोग करावा. परंतु प्रत्यक्ष लेखनप्रक्रियेत त्या साधनांचा उपयोग करताना ती साधने, तद्द्वारा उपलब्ध झालेली घटिते मूळ स्वरूपात अबाधित राहणे आवश्यक असते. वास्तव घटनांची कलात्मक मांडणी केली म्हणजे चरित्रग्रंथ मनोवेधक होतो, त्याला खरे सौन्दर्य प्राप्त होते, चरित्र-काराला कल्पिताच्या आधारे नवनिर्मिती करता आली नाही तरी, त्याच्यापाशी घटितसत्यास मनोवेधक स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी लागणारे कल्पनाकौशल्य अथवा कल्पकता भरपूर हवी. मात्र चरित्रकाराला कादंबरीकाराचे कल्पनेचे अनिर्बंध स्वातंत्र्य घेता येत नाही. चरित्रातली सगळी कला आहे निवेदनात आणि निवेदन असे असले पाहिजे की, साधने आणि तद्द्वारा उपलब्ध झालेली घटिते अबाधित राहतील. या संदर्भात लिऑन एडेल लिहितात, ' ...चरित्रकाराने इच्छा असेल तितके कल्पक असावे, आपली साधने एकत्र आणताना जितका तो कल्पक तितके अधिक चांगले, परंतु साधनांच्या बाबतीत त्याने कल्पना करता कामा नये.'[२] चरित्रकाराला केवळ भूतकाळाच्या आकलनासाठीच कल्पनेचा आश्रय घेता येतो. घटितांची कलात्मक मांडणी करताना कल्पकतेचा उपयोग होतो, या विशिष्ट मर्यादेत न राहता, जेंव्हा चरित्रकार कल्पनेच्या आधारे चरित्रनायकाचे मन उकलण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा तो कादंबरीचे तंत्र स्वीकारतो, इथे चरित्राची कला होते, चरित्राला चरित्र ही संज्ञाच अयोग्य ठरते.

विविध प्रसंगांच्या अनुरोधाने कादंबरीकार व्यक्तीच्या मनातील व्यापार उलगडू शकतो हे तर खरेच, परंतु त्यातही एक लक्षात येते, की व्यक्तीच्या सर्व

---

2– Edel, Leon. ' Literary Biography.' The Alexander Lectures 1955–56, Bupert Hart– Davis 1957, London. P. 1.

प्रकारच्या मनोव्यापारांचे चित्रण आणि विश्लेषण हे कार्य कादंबरी या वाङ्मय-प्रकारातच अधिक सुलभतेने होऊ शकते. व्यक्तीला कळणारे परंतु व्यक्ती ज्यांचा उच्चार करू शकत नाही असे ज्ञात पण अव्यक्त मनोव्यापार, व्यक्तीला ज्यांचे पुरेसे ज्ञान नाही असे अर्धज्ञान मनोव्यापार आणि व्यक्तीला अज्ञात असलेले मनोव्यापार कादंबरीकार अभिव्यक्त करू शकतो. हे त्रिविध मनोव्यापार उकलून दाखविण्याचे कादंबरीचे सामर्थ्य अनेक टीकाकारांनी मान्य केले आहे. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे (स्वभावलेखन) आणि श्री. मा. कुळकर्णी (कादंबरी रचना) या टीकाकारांनीही कादंबरीचे मनोगाहनातील हे वैशिष्ट्य आणि सामर्थ्य मान्य केले आहे. कादंबरीत अनुभवाचे अव्यक्त आणि अबोध विभाग अंतर्भूत होत असल्या मुळे तिची कक्षा नाटकापेक्षा किंवा चरित्रापेक्षा व्यापक ठरते. कादंबरीचे क्षेत्र फार विस्तृत आहे, कारण नाटकात अनुभूतींच्या सर्व अव्यक्त, अबोध विभागांचा आणि मनाचा आविष्कार ज्या बारकाव्यासहित घडविणे अशक्य असते तो कादंबरी सामावलेला असतो.'[3] मनोवगाहनात कादंबरीचे सातर्थ्य आहे. तर कल्पनेच्या-अभावी पुरेसे मनोलेखन करता न येण्यात चरित्राची असमर्थता आहे.

आंद्रे मोर्वा याने स्ट्रॅचीच्या क्वीन व्हिक्टोरियाच्या चरित्रातून त्याच्या कलेचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून एक उतारा दिला आहे. राणी मृत्युशय्येवर आहे. ती साधारण बेशुद्धीतच आहे. त्यावेळी शेवटच्या घटकेला तिच्या डोळ्यासमोरून गतायुष्याचा चित्रपट सरकत जातो, असे स्ट्रॅचीने वर्णन केले आहे. वर्णन बहारदार आहे यात शंकाच नाही. हे उत्कृष्ट काव्य आहे, येथे चरित्रकार कवीच्या पदवीला पोचला, असे मोर्वा म्हणतो तेही खरे आहे, पण ते काव्य आहे हेच खरे आहे. येथे चरित्रकाराने कादंबरीचे तंत्र स्वीकारले आणि त्यामुळे एक सुंदर चरित्र शेवटी शेवटी हकनाक बिघडले. प्रत्यक्षात या वर्णनाला कसलाही आधार नाही. राणीच्या मनात अगदी उलट विचार त्यावेळी असणे किंवा कदाचित काहीही नसणे, हे तितकेच शक्य आहे. वास्तविक सत्य घटनांवरून अनुमान काढणे ही चरित्रकाराची मर्यादा होय. त्यापलीकडे मनोविश्लेषणाच्या प्रांतात कल्पनेच्या साह्याने शिरण्याचा अधिकार त्याला नाही. चरित्रात कल्पनेचा उपयोग उपरिनिर्दिष्ट मर्यादेतच करता येतो. त्यापलिकडे कल्पनेचा आधार घेतला म्हणजे चरित्राची कादंबरी होते.

चरित्र आणि कादंबरी या दोन कृतींमधला नजरेत भरण्याजोगा भेद असा, की कादंबरीकार कथावस्तूचे सौन्दर्यग्रहण करता यावे म्हणून लेखनपूर्व अलिप्तता धारण करतो आणि प्रत्यक्ष अभिव्यक्तीसमयी वर्ण्यविषयाशी तादात्म्य पावतो

3– Drew Elizabeth. 'The Enjoyment of Literature,' W. W. Norton and Company, America, Cambridge University Press, 1935, ch. V. 'The Novel,' P. 109.

वर्ण्यविषयाशी कादंबरीकार जितका एकरूप होतो तितके त्याचे लेखन प्रत्ययकारी होते. लेखनपूर्व अलिप्तता आणि लेखनगर्भ तादात्म्य, ही कादंबरीतल्या कलेची वैशिष्टये म्हणता येतील. या उलट, चरित्रात लेखनपूर्व ताटस्थ्य स्वीकारून चालत नाही. चरित्रकार जितका पुढे असलेल्या साधनसामग्रीशी एकरूप होतो, तितके त्याला चरित्रविषय व्यक्तीच्या जीवनाचे आकलन सुस्पष्ट स्वरूपात होते. अगदी नेमकी कादंबरीकाराच्या उलट चरित्रकाराला अभिव्यक्तीसमयी तटस्थाची भूमिका स्वीकारावी लागते. प्रयोगशाळेतील ' वस्तू 'कडे पाहण्याची शास्त्रज्ञाची पूर्वग्रहमुक्त, तटस्थवृत्ती धारण करून चरित्रकार जितक्या अलिप्तपणे दुरून चरित्रनायकाचे जीवन चित्रित करतो, तितके ते वस्तुनिष्ठ वठते. चरित्रनायकाच्या जीवनाचे आकलन व्हावे म्हणून साधनसामग्रीशी एकरूप झालेल्या चरित्रकाराचे तादात्म्य नायकाच्या जीवनाची प्रत्यक्ष पुर्ननिमिती होत असताना टिकून राहिले, त्याला ताटस्थ्य धारण करता आले नाही, तर चरित्रनायक जसा होता तसा त्याच्या व्यक्तिमत्त्वाला आकार न मिळता, चरित्रकाराच्या कल्पनेनुसार त्याचे व्यक्तिमत्त्व आकार घेण्याचा धोका असतो. शिवाय, वाचकांना चरित्रकाराच्या अस्तित्वाची जाणीव होत राहिली, चरित्रकार जर मधेच डोकावत राहिला, तर चरित्रनायकाच्या जीवनाशी सहभागी झाल्याचा भास टिकून राहत नाही आणि वाचकांना त्या कृतीचा आस्वाद घेता येणे कठीण होते. डॉ. जॉनसनच्या चरित्रात बॉसवेल मधून मधून डोकावतो हे खरे आहे, पण तो डॉ. जॉनसनवर वाचकांचे लक्ष केंद्रीभूत व्हावे म्हणून पडद्यामागे राहण्याचे हे कौशल्य चरित्रकाराला साधले पाहिजे. ' The object of art is to conceal art ' या होरेस (Horace) च्या सुप्रसिद्ध अवतरणातील आशयासारखी चरित्रकाराची लेखनगर्भ अलिप्तता ही चरित्रातल्या कलेचा उच्च बिंदू आहे. लेखनपूर्व तादात्म्य आणि अभिव्यक्तीसमयीची तटस्थता कादंबरीतल्या कलेला मारक ठरतात. पण नेमके त्यामुळेच चरित्र वस्तुनिष्ठ वठते आणि वस्तुनिष्ठा ही तर चरित्रलेखनाला केवळ प्राणभूत होय. तेव्हा या विवक्षित दृष्टिकोनातून जरी विचार केला, तरी कादंबरीतली कला चरित्रात अशक्यप्राय वाटते.

चरित्रात कादंबरीतली कला अशक्यप्राय वाटते याचे आणखी एक कारण असे आहे, की कादंबरीत सत्याचा केवळ आभास निर्मिलेला असतो. सत्य हे केवळ गोंडस नसते, ते दाहक, कुरूप अंगेसुद्धा घेऊन येत असते. सत्याची दाहकता सहन न झाल्यामुळे माणसे कादंबरीकडे वळत असावीत किंवा असेही म्हणता येईल, की जे माणसांना प्रत्यक्षरीत्या सहन करता येत नाही, ते कादंबरीतून अप्रत्यक्षरीत्या दुरून सहन करण्याचा ती प्रयत्न करीत असावीत. एरव्ही भुरळ पडणाऱ्या, गोंधळात टाकणाऱ्या, दाहक वाटणाऱ्या आणि थकविणाऱ्या जीवनाचा कादंबरी-द्वारा कोणताही विपरीत परिणाम न घडता अगदी आरामात आस्वाद घेता येतो.

वास्तवाच्या कक्षा ओलांडून कादंबरीतल्या कल्पकतेच्या जगात वावरले म्हणजे एरव्ही असह्य वाटणारे जीवन सुसह्य होते. कारण, कादंबरीत सत्याचा आभास निर्मिलेला असतो. मातीच्या गोळ्याला आकार द्यावा तसे कादंबरीतले पात्र लेखकाच्या कल्पनेने आकार घेते. त्या पात्राच्या अस्तित्वासंबंधाने वाचकांची खात्री पटली, ते पात्र वास्तव आहे असा अभास निर्माण करण्यात कादंबरीकाराला यश आले म्हणजे कादंबरीचे काम भागते. कादंबरीकार अशा व्यक्तींच्या जीवनाचे कथन करतो, की ज्या त्याच्या कल्पनेत जन्माला येतात, विकसित होतात, बहरून येतात, बदलतात आणि आचर्यचकित करून सोडतात आणि हे सगळे कादंबरीकाराच्या कल्पनेमुळे होते कादंबरीकार कल्पनेने कादंबरीला जसा आकार येईल तसा तो येऊ देतो. मगच वास्तवाचा अपेक्षित परिणाम तो घडवू शकतो. निखळ सत्य, रुक्ष सत्य कादंबरीकाराच्या दृष्टीने निरुपयोगी असते आणि म्हणूनच तो आपल्या प्रतिभेने नवे सत्य निर्माण करतो. त्याच्या प्रतिभेचा स्पर्श होताच त्या सत्याला विश्वात्मकता प्राप्त होते. चरित्रकार मृत नायकाच्या (आणि बहुधा तो मृतच असतो) अस्थींमध्ये चैतन्य निर्माण व्हावे म्हणून वास्तवावर आभासांचे आवरण चढवितो, तर कादंबरीकार आभासातून वास्तवाची निर्मिती करतो.

चरित्र आणि कादंबरी यांच्या जीविततत्त्वांतील फरक असा आहे की, चरित्र हे प्रत्यक्ष घटना, सगेसोयरे यांच्या मदतीने निर्मिलेले असते, त्यांची बंधने त्यावर असतात, तर कादंबरी ही कादंबरीकाराने स्वतःच स्वतःवर जी बंधने लादून घेतलेली असतात, त्या व्यतिरिक्त कोणतीच इतर बंधने पाळीत नाही. चरित्र हे प्रत्यक्षावरच आधारले गेले पाहिजे, प्रत्यक्ष घडलेल्याच गोष्टी त्याच्या बुडाशी पाहिजेत आणि चरित्रासंबंधी बोलताना सत्य किंवा घटना हे जे शब्द वापरले जातात त्यांचा अर्थच असा आहे, की ह्या घटना किंवा ही सत्ये चरित्रकाराखेरीज इतरांनी पारखून ती सत्य आहेत असे ठरविले पाहिजे. चरित्रलेखक हा इतर ललित लेखकांप्रमाणे 'नवनिर्मिती' करीत नाही. चरित्रातील तपशील सत्यावर-हुकूम असलाच पाहिजे. कारण, नवनिर्मितीक्षम ललित साहित्यातील सृष्टीप्रमाणे चरित्रातील सृष्टी ही 'कल्पित' किंवा 'अपरसृष्टी' नसते, तर प्रत्यक्ष जीवनानुभवावर पोसली जाणारी पुनर्निर्मित सृष्टी असते. चरित्राचे लेखन म्हणजे सभोवताली कल्पनेचा अथांग सागर पसरलेला असताना मचव्यातले बंदिस्त जीवन जगण्यासारखे आहे. सत्याला बाध न आणण्याची जबाबदारी चरित्रकारावर आहे. हे विसरता कामा नये. चरित्रात जो जो सत्याचा आग्रह धरावा तो तो चरित्र कलेपासून दूर होते, आणि प्रत्यक्ष सत्याचा जो जो संबंध जास्त येईल तो तो कला ही कलास्वरूप राहणार नाही. म्हणजेच याचा अर्थ असा होतो की, कादंबरी-लेखनाला जसे पूर्णार्थाने कला म्हणता येईल, तसे चरित्रलेखनाला म्हणता येत नाही.

कलास्वरूप प्राप्त झालेले चरित्र सत्यापासून कसे दूर झालेले असते याचे उदाहरण म्हणून श्री. म. माटे यांचे ' परशुराम चरित्र ' दाखविता येईल. श्री. माटे यांच्या ' परशुराम चरित्राचे ' चित्रण कल्पिताच्या पातळीवरून झाले आहे, त्यामुळे या पुस्तकाला चरित्र का म्हणावे, असा प्रश्न पडतो. श्री. माटे यांनी परशुरामाच्या कथेला चरित्र म्हटले असले तरी ते कथाकादंबरीतल्या कलेकडे झुकलेले असल्यामुळे चरित्र या दृष्टीने साफ बिघडले आहे. पौराणिक कथा हा चरित्राचा विषय होऊ शकतो की काय हाच मुळी वादाचा प्रश्न आहे. कारण, ते वाङ्मय ऐतिहासिक साधनांच्या पहिल्या किंवा दुसऱ्या प्रकारच्या साहित्यात आपल्यापुढे उपलब्ध नाही. तो काल आणि ऐतिहासिक साधने अस्सल व अविकृत स्वरूपात उपलब्ध होऊ शकत नाहीत. श्री. माटे यांनी महाभारत, रामायण, हरिवंश यातून जे पशुराम चरित्र घेता येण्यासारखे होते, ते घेऊन ते आरंभी दिले आहे. (प्रस्तावना पृ. २). पण पुराणे मूळस्वरूपात आपल्यापुढे उपलब्ध नाहीत. त्यामुळे त्यातून मिळालेली व्यक्तिविषयक माहिती कितपत विश्वासनीय मानावी हा मोठा प्रश्नच आहे. या संदर्भात सिद्धेश्वरशास्त्री चित्राव लिहितात, '... पुराणांचे नीट समालोचन केल्यास असे दिसते की, वेदांपेक्षाही पुराणांचा काही भाग निःसंशय प्राचीन असावा. निदान त्यातील परंपरा तरी प्राचीन दिसतेच. मात्र त्यांची भाषा व रचना यावर संस्कार करण्याची पद्धत असल्यामळे पुराणांचे मूळ स्वरूप आपणास उपलब्ध होऊ शकत नाही. म्हणूनच त्यावर विश्वास ठेवताना पडताळा मिळावा अशी अपेक्षा असते.... एवंच प्रतिज्ञापूर्वक इतिहास सांगण्याकरिता प्रवृत्त झालेली पुराणे व त्यावरून इतर माहिती घेऊन प्रासंगिक ऐतिह्य वर्णन करणारे रामायण, महाभारत हे ग्रंथ प्राचीन इतिहासाची फार महत्त्वाची साधने होत. पण हे साधन-ग्रंथ वेदांप्रमाणे अविकृत व पूर्ण स्वरुपात आपल्यापुढे उपलब्ध नाहीत, ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय.'[४]

आपण सत्य सांगायला बांधलेले आहोत याची जाण चरित्रकाराला सतत असली पाहिजे. पण श्री. माटे यांना तशी जाण राखता आली नाही याचे कारण त्यांनी चरित्राकरिता निवड केली ती पौराणिक जीवनकथेची. याचा अपरिहार्य परिणाम असा होतो, की सबळ पुराव्याच्या अभावी मोकळ्या जागा भरण्याकरिता एकतर त्यांना कल्पनेचा आधार घ्यावा लागतो किंवा अनिश्चित विधाने करावी लागतात. सहस्रार्जुनाप्रमाणे त्याची मुले फार उर्मट आणि क्रूर निघाली. त्यांनीही बापाचाच कित्ता उचलला आणि जिकडे तिकडे दंगा धोपा सुरू केला. या त्यांच्या जुलूमजबरदस्तीच्या फेरफटक्यात ते जमदग्नीच्या आश्रमात आले व त्याची कामधेनू त्यांनी हरण करून नेली. अशी माहिती दिल्यानंतर श्री. माटे आणखी पुढे

---

४– चित्राव, सिद्धेश्वर शास्त्री, ' भारतवर्षीय प्राचीन चरित्रकोश ,' इ. स. १९३२, प्रस्तावना, पृ. २.

लिहितात, 'कोठे कोठे असेही म्हटलेले आहे की, खुद्द कार्तवीर्यनेच हे अपकृत्य केले.' (पृ. ३–४) म्हणजे इथे खुद्द लेखकालाच जमदग्नीची कामधेनू नक्की कोणी पळविली यासंबंधीचा पुरावा उपलब्ध होऊ शकला नाही, त्यामुळे असे अनिश्चित विधान करणे भाग पडले. शिवाय, हे विधान कलादृष्टयाही रसहानिकारक ठरते. पृथ्वीचे कश्यपमुनींच्या बरोबरीचे संभाषणही काल्पनिक आहे. क्षत्रिय नाहीसे झाल्यामुळे पृथ्वीचे रक्षण होईना. ती रसातळामधे प्रविष्ट होऊ लागली. तेव्हा कश्यपमुनींनी आपल्या अरूंत म्हणजे माडयांत तिला दाबून धरले. परशुरामाची आई रेणुका हिच्याबद्दल जमदग्नी ऋषीला संशय आला व हिला नष्ट करून टाकले पाहिजे असे त्यांनी ठरविले. पित्याच्या आज्ञेवरून परशुरामाने आपल्या आईचा वध केला. त्याचे आज्ञाधारकत्व पाहून जमदग्नी फार संतुष्ट झाला व 'वर माग' म्हणून म्हणाला. परशुरामाला मातृहत्त्येचे दुःख अनिवार झालेले होते. तो तत्क्षणी म्हणाला, 'माझी आई रेणुका हिला पुन्हा सजीव करा' पुत्राची ही विनंती जमदग्नीने मान्य केली व रेणुका सजीव झाली. असल्या अद्भूत घटनांचा मसाला या पुस्तकात ठासून भरलेला आहे. मूळ कथेतील या काल्पनिक, असंभाव्य, लोकविरुद्ध, अद्भुत घटना लेखकाने जशाच्या तशा घेतल्या असतील पण त्यामुळेच चरित्राला वास्तवाचा आधार उरला नाही. आडातच नाही तर पोहऱ्यात कुठून यावे ? अशी वास्तवाच्या बाबतीत या चरित्राची अवस्था झाली आहे. सत्य आणि कल्पना यांच्या मिश्रणामुळे चरित्राचे कलेचे अंग जोपासले गेले, नव्हे पुष्ट झाले. पण त्यामुळेच चरित्र साफ फसले. चरित्रात वस्तुनिष्ठा अशी कुठे उरलीच नाही. ही एक सत्याची मर्यादा ओलांडून, कथाकादंबरीतल्या कलेकडे झुकणारी आणि म्हणूनच चरित्र या नामाभिधानास अपात्र ठरणारी कृती आहे. हे ललित शैलीने लिहिलेले 'रोचक' पुस्तक आहे, चरित्र नव्हे. श्री माटे ज्याला परशुरामाचे चरित्र म्हणतात ते पहिल्या तेवीस पानात समाविष्ट झाले आहे. परशुरामाच्या चरित्रात पुराणे आणि इतिहास यासंबंधाची संकेत बोध प्रकरणातील चर्चा अप्रस्तुत ठरते. तीन ते सात ही प्रकरणे परशुरामासंबंधाने उद्भवणाऱ्या अनेक प्रश्नांची चर्चा करण्याकरिता खर्ची पडलेली असल्यामुळे त्यांचा वरील समीक्षेत विचार केला नाही.

चरित्र आणि कादंबरी या दोन कृतींच्या तौलनिक अभ्यासातून चरित्र ही कादंबरीतल्या कलेसारखी पूर्णार्थाने कला होऊ शकत नाही, हे वर पाहिले आहेच. चरित्र आणि चरित्रात्मक कादंबरी या दोन कृतींमधला फरक तपासून पाहणे तसेच उद्बोधक ठरेल. शिवाय, त्यामुळे 'पहिले बाजीराव पेशवे' या श्री. ना. वि. बापट यांनी लिहिलेल्या चरित्राचा नेमका घाट कोणता हे निश्चित करणे शक्य होईल. चरित्रात प्रत्यक्षातल्या व्यक्तीचे कल्पिताचा आधार न घेता व्यक्तिदर्शन

घडविलेले असते. चरित्रात्मक कादंबरीत प्रत्यक्षातल्या व्यक्तीची जीवनकथा कल्पिताच्या आधाराने सांगितलेली असते. चरित्रपर कादंबरीत चरित्र, कादंबरी आणि इतिहास एकजीव करण्याचा प्रयत्न होतो. चरित्रनायकाची जीवनकथा बारीकसारीक तपशीलासह न सांगता, त्या कथेचा केवळ अर्क वाचकांच्या पुढे ठेवून कालाच्या पार्श्वभूमीवर त्या व्यक्तीची, तिच्या जीवनाची पुनर्निमिती होते. व्यक्ती आणि घटना यांच्या ऐक्यातून परिणामाची एकात्मता साधली जाते. व्यक्तीचे जीवन एका रचनासूत्राभोवती गुंफण्याचा प्रयत्न होतो. कारण इथे लेखक नायकाच्या जीवनातल्या मोकळ्या जागा कल्पिताच्या किंवा स्वानुभूतीच्या आधारे भरून काढण्याचे स्वातंत्र्य भोगतो. चरित्रात्मक कादंबरीत व्यक्तीचे जीवन शोकान्तिकेच्या पातळीवरूनही चित्रित होऊ शकते. काल्पनिक संवाद, कल्पिताच्या आधाराने केलेली वातावरणनिर्मिती, हुबेहूब वर्णने, नाट्यमयता आणि कथेचा जिवंतपणा, सरसता ही अशा कृतीची वैशिष्टये ठरतात. चरित्राला कादंबरी म्हणावे तर या चरित्रात प्रत्यक्षातल्या व्यक्तीचे जीवन चित्रित झालेले असते. बरे चरित्र म्हणावे तर इथे लेखकाने सत्याची मर्यादा ओलांडलेली असते. म्हणजे चरित्रात्मक कादंबरीत लेखकाची भूमिका चरित्रकाराची, पण त्याने स्वीकारलेले तंत्र कादंबरीकाराचे असते.

'बाजीराव बल्लाळ' उर्फ 'पहिले बाजीराव साहेब पेशवे' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत लेखक ना. वि. बापट लिहितात, 'हे ऐतिहासिक कादंबरीच्या धर्तीवर लिहिलेले रसाळ चरित्र सर्वांनी लक्षपूर्वक वाचावे, त्यातील मर्म ध्यानात आणावे त्यापासून सद्बोध घ्यावा आणि आपले व आपल्या देशाचे हित साधावे, अशी ग्रंथकर्त्याची मनापासून इच्छा आहे.'[५] स्वतः ग्रंथकर्त्याने या ग्रंथास ऐतिहासिक कादंबरीच्या धर्तीवर लिहिलेले चरित्र असे म्हटले असले तरी या कृतीला ऐतिहासिक कादंबरीचा घाट लाभलेला दिसत नाही.

ऐतिहासिक कादंबरीत ऐतिहासिक पार्श्वभूमीवर काल्पनिक व्यक्तीचे चित्रण केलेले असते. ऐतिहासिक कादंबरीचा नायक बहुधा काल्पनिक असतो. ऐतिहासिक कादंबरीतील नायक जर काल्पनिक नसेल, तो ऐतिहासिक असेल तर ती कादंबरी ऐतिहासिक आणि शिवाय चरित्रपर ठरते. ऐतिहासिक कादंबरीचे लेखन म्हणजे एकापरीने इतिहासावर केलेले कलमच असते. ती पुराव्याने सिद्ध होऊ शकणाऱ्या स्थलकालनिबद्ध अशा प्रत्यक्षाच्या पायावर उभी केलेली कल्पनेची इमारत असते. हे प्रत्यक्षाचे अवशेष इतिहासातून वेचलेले असतात. ऐतिहासिक कादंबरीत ऐतिहासिक पार्श्वभूमी महत्त्वाची ठरते कारण, इथे चरित्रपर कादंबरीप्रमाणे वाचकांचे लक्ष व्यक्तीकडे फारसे वेधून घेतलेले नसते. ते व्यक्तीपेक्षा ऐतिहासिक

५– बापट नागेश विनायक. 'बाजीराव बल्लाळ उर्फ पहिले बाजीराव साहेब पेशवे,' निर्णय सागर प्रेस, इ. स. १९२१; सातवी आवृत्ती, प्रस्तावना, पृ. ८.

पार्श्वभूमीवर अधिक केंद्रीत करण्याचा प्रयत्न होतो. टीकाकार ऐतिहासिक कादंबरीकडून खरेपणाची अस्सलपणाची अपेक्षा करतात. ऐतिहासिक कादंबरीतील इतिहासाच्या खरेपणाबद्दल ट्रेसिडर शॅपर्डस् यांनी पुढील विचार मांडला आहे, ते लिहितात, ' पार्श्वभूमी म्हणून इतिहासाचा उपयोग करणाऱ्या कल्पनाकुशल लेखकाला कोणतेही स्वातंत्र्य देता येईल, पण सत्याचे अनावश्यक उल्लंघन करण्याची परवानगी देण्यात येऊ नये; सत्य घटिते जितक्या काटेकोरपणे अनुसरली जातात तितके ते पुस्तक चांगले होय. '[६] ऐतिहासिक कादंबरीचे आणखी एक नजरेत भरण्याजोगे वैशिष्टच असे, की कादंबरीकार मानवासंबंधांची उकल करून दाखवितो. त्याचे मुख्य कार्य विशिष्ट परिस्थितीत स्त्रीपुरुष कसे वागतात हे दाखविण्याचे असते.

चरित्रात्मक कादंबरीकाराचे कार्य विशिष्ट परिस्थितीत स्त्रीपुरुष कसे वागतात हे पाखवून पूर्ण होत नाही. विवक्षित व्यक्तीची कर्मगती आणि तिचे स्वभावविशेष यामधले संबंध त्याला दाखवावे लागतात. चरित्रात्मक कादंबरीतल्या व्यक्ती आणि घटना एका ऐतिहासिक व्यक्तीभोवती गोवलेल्या असतात. लेखकाचे सगळे अवधान त्या व्यक्तीभोवती केंद्रीत झालेले असते. म्हणजे याचाच अर्थ असा, की चरित्रात्मक कादंबरी अतिमूलकेंद्रित असते आणि म्हणूनच चरित्रात्मक कादंबरीत ऐतिहासिक कादंबरीप्रमाणे ऐतिहासिक पार्श्वभूमीला महत्त्व न मिळता व्यक्तीला मिळते. चरित्रात्मक कादंबरीत ऐतिहासिक पार्श्वभूमीला दुय्यम स्थान लाभते. इथे लेखक ऐतिहासिक व्यक्तीवर व तिच्याशी संबंधित अशा भोवतालच्या परिस्थितीवर प्रकाश झोत टाकताना काल्पनिक संवाद, काल्पनिक देखावे, काल्पनिक व्यक्ती निर्माण करून कादंबरीचे तंत्र स्वीकारतो. चरित्रात्मक कादंबरी म्हणजे एकापरीने ऐतिहासिक कादंबरीची शाखा होय.

पहिले बाजीराव पेशवे या कृतीला ऐतिहासिक कादंबरी म्हणावे तर या कृतीच्या केंद्रस्थानी बाजीराव ही ऐतिहासिक व्यक्ती आहे. शिवाय इथे ऐतिहासिक पार्श्वभूमीला गौण स्थान लाभले आहे. ते इतके, की लेखकाने पार्श्वभूमी रंगविताना इतिहासाचा खरेखोटेपणा, अस्सलपणा नीट पारखून घेतलेला दिसत नाही. या ग्रंथातील अनैतिहासिकतेची काही ठळक उदाहरणे सापडतात ती अशी.

बापट यांनी पृ. ३१ भाग ८ दरबारचे भाषण या प्रकरणात ' साताऱ्यास ' दरबार भरून बाजीरावास पेशवाईची वस्त्रे दिली '[७] असे विधान केले आहे. पण

6– Sheppard, Tressider. 'The Art and Practice of Historical Fiction,' Ch. XI, Sec. 11, PP. 160-61.

७– बापट नागेश विनायक. 'श्रीमंत बाजीराव बल्लाळ उर्फ पहिले बाजीराव पेशवे,' प्रकाशक, पांडुरंग जावजी, निर्णयसागर प्रेस, मुंबई १९२१, आवृत्ती सातवी, पृ. ३१.

प्रत्यक्षात ' तारीख १७ एप्रिल १७२० रोजी बाजीरावास शाहू छत्रपतीकडून पेशवाईची वस्त्रे कऱ्हाडनजीक मसूर मुक्कामी मिळाली '८अ हे सत्य आहे.

पितृवियोग (पृ. १९ भाग ५) या प्रकरणात बापट लिहितात. ' या प्रमाणे इ. स. १७१४ त बाळाजी विश्वनाथ पेशवा झाला. पहा नशिबाची तार कशी आहे. तो पुरुष लहानसा खर्डेघाशी कारकून होता. तो सहा वर्षामध्ये साताऱ्याच्या राजाचा मुख्य प्रधान झाला.' प्रभूचा कृपालव काय न करील ?' वास्तविक बाळाजी विश्वनाथाला पेशवेपद प्राप्त झाले. यात त्याच्या नशिबापेक्षा कर्तबगारीचा भाग जास्त होता. केवळ नशिबाचा जोर म्हणून युक्ती प्रयुक्तीने पाचसहा वर्षाच्या अल्पावधीत तो पेशवा झाला, ही भ्रामक समजूत आहे. बाळाजी विश्वनाथाच्या उदयाचे श्रेय सर्वस्वी त्याच्या कर्तबगारीकडे व अंगच्या गुणांकडे आहे. ' तुम्हा सारिखे अतुलपराक्रमी सेवक असता, स्वामींनी याचा हृद्रोग बाळगावा असा प्रकार नाही,'८ब असे बाळाजीविषयी शाहूचे उद्‌गार आहेत. यावरून पाच वर्षे कसून परीक्षा घेतल्यावर, जवळच्या मंडळीत हा इसम सर्वात लायक दिसला, तेव्हाच त्यास त्याने पेशवा केले. विशेषत: बाळाजी हरहुन्नरी, पडेल ते काम उरकणारा. व्यवहारदक्ष व कारस्थानी असल्यामुळे त्यास शाहूने हाताशी धरले. रामचंद्रपंता-इतका तो निस्वार्थी नव्हता. तो मतलबी तर खराच. परंतु एकदा स्वीकार केल्यावर तड पोचविणारा होता. शाहूस धरसोडीचा इसम नको होता. ' कर्ता ब्राह्मण, पेशवाईस योग्य '८क असे त्याच्याबद्दल खंडोबल्लाळाचे उद्‌गार आहेत.

पेशवाईची वस्त्रे स्वीकारताना प्रस्तुत चरित्रग्रंथात पृ. ३२ दरबारचे भाषण या प्रकरणात दिलेल्या बाजीरावाच्या भाषणात सबळ पुरावा सापडत नाही, हे भाषण म्हणजे चरित्रकाराच्या कल्पनेचे फळ दिसते.

महापुरुष (पृ. ३५) या प्रकरणात ब्रह्मेंद्रस्वामींच्या संबंधाने केलेले पुढील विधान तपासून पाहण्यासारखे आहे. '... स्वामींचे बाजीरावावर अप्रतिम प्रेम जडले. त्यासमयी लौकिकात अशी उपश्रुति पसरली की, शिवाजी महाराजांचा काल झाल्यावर त्यांचा पुत्र संभाजी याच्या अश्लाघ्य वर्तनाने स्वराज्य लयाच्या पंथास लागले, हिंदु धर्माचा उच्छेद होत चालल, व हिंदु प्रजेस परधर्मी म्लेंच्छ वगैरे राजे अनिवार पीडा देऊ लागले. या अनिष्टांचे निरसन होऊन हिंदु धर्म आणि हिंदु राज्य यांची पूर्ववत् संस्थापना व्हावी, एतदर्थ समर्थ रामदास स्वामीच

---

८ अ– सरदेसाई गो. स. ' मराठी रियासत ' –मध्य विभाग खंड १, श्री सयाजी साहित्यमाला, पुष्प ६५ वे, पृ. १३६. पे. द. पृ. १२७, १ शा. म. च., खंड ४, पे. व. आ. दुसरी, १९२५.

8 ब–क Ibid. P. 46. पत्र रा. म. रा. गुप्ते यांजकडून.

पुनः या महापुरुषाच्या रुपाने सज्जनगडाहून (परळीहून) धावडशीस प्रगट झाले.' बापट यांनी रामदासस्वामी आणि ब्रह्मेंद्रस्वामी यांचे जे ऐक्य कल्पिलेले आहे. दोघांनाही सारख्याच योग्यतेचे ठरविले आहे, त्यास इतिहासाचे पाठबळ मिळणे शक्य नाही. राजवाडयानी ऐतिहासिक प्रस्तावना खंड तिसरा पृ. १९३-१९४) ब्रह्मेंद्रस्वामी व रामदास यांची कलमवार तुलना करून खालील मुद्दे मांडले व ब्रह्मेंद्राची तुच्छ म्हणून रेवडी उडविली ते म्हणतात–

१) राष्ट्रीय व वैयक्तिक ह्या दोन्ही नीतींच्या दृष्टीने ब्रह्मेंद्राचे आंग्र्यांशी वर्तन अत्यंत निंद्य होते. रामदासस्वामींनी असे निंद्य वर्तन कोणाही सरदाराशी केले नाही.

२) पाटील, महार, कारकून वगैरे लहान सहान माणसांशी ब्रह्मेंद्र क्षुल्लक कारणावरून भांडत असे. रामदासस्वामींना भांडण हा पदार्थ माहीतच नव्हता.

३) महत्त्वाकांक्षा हा ब्रह्मेंद्राचा मुख्य हेतु होता. निजामुन्मुलुखाला भेटावे, इंग्रजांशी मैत्रा करावी, शाहूने पालखी आणावी, वगैरे मानाची हाव भार्गवरामास अतिशय होती. रामदासस्वामीस ही हाव बिलकूल नव्हती.

४) इस्टेट करण्याचा ब्रह्मेंद्राला नाद होता. रामदासांना इस्टेटीची वार्ताही नव्हती.

५) ब्रह्मेंद्राला पुण्यातील काळबोवासारखी अचकट बिचकट शिव्या देण्याची सवय होती, रामदासांना तो प्रकार माहीत नव्हता.

६) ब्रह्मेंद्राला हठयोग व समाधी ह्यांची आवड असे. रामदासांनी ही तालीम केली नाही.

७) पाऊस पाडणे, शाप देणे, संतानार्थ औशध देणे, भुते काढणे वगैरे चीरविद्या ब्रह्मेंद्राजवळ असे. ह्या ढोंगाची उपासना रामदास तुच्छ मानीत असत.

८) ब्रह्मेंद्र खुनशी व तिरसट स्वभावाचा असे. रामदास केवळ शांतीची मूर्ती असे.

९) सुवासिक तेले, उत्तम प्रावरणे व चमचमीत भोजन यांचा ब्रह्मेंद्र भोक्ता होता. रामदास स्वामींना ही देहसंतर्पणाची चाड नव्हती.

१०) ब्रह्मेंद्र व्होलटेयराप्रमाणे, व्याचबट्टा व सावकारी करी. रामदासांना व्यवसाय करण्यास वेळ नव्हता.

११) ब्रह्मेंद्र इतर साधूंचा मत्सर करी. रामदास सर्व स्वामींचा स्नेही असे.

१२) ब्रह्मेंद्र छत्रपतींपाशी इनाम गावे मागे. रामदासांनी शिवाजीने समर्पिलेले राज्य परत केले.

१३) ब्रह्मेंद्र लहानसहान शिफारशी करी. रामदासांना ह्या क्षुल्लक गोष्टीत पडणे आवडत नसे.

१४) ब्रह्मेंद्राला एक वाक्य सरळ व शुद्ध लिहिता येत नसे. रामदास मराठी सारस्वताचे उस्ताद आहेत.

१५) समर्थांनी रामदासीपंथ काढून भरतखंडात बाराशे मठ स्थापिले. ब्रह्मेंद्राचा पंथही नाही व शिष्यही नाही.

१६) रामदास स्वामी उत्तम कवी, स्पष्टवक्ता व नेमस्त कार्यकर्ता होता. ब्रह्मेंद्र ह्या पैकी एकही नव्हता,

१७) रामदास सृष्टिसौन्दर्याचा भोक्ता होता. चाफळ इतकी धावडशी सुंदर नाही.

१८) रामदासाच्या शिवाजीने सुंदर यवनी, मातुःश्री म्हणून परत पाठविलेली आहे. यवनी ठेवणारा बाजीराव ब्रह्मेंद्राचा आवडता शिष्य होता.

१९) रामदास भगवी वस्त्रें लेई, ब्रह्मेंद्र पुरभय्यीटोपी व मलमली झगा वापरी. असे आणिकही कित्येक भेद दाखविता येतील. परंतु सर्वांत मोठा भेद म्हटला म्हणजे राष्ट्रीय नीतीमत्ता वाढविण्याचा बाणा रामदासांच्या सर्व संस्थांत, लेखात, भाषणात व वृत्तीत दिसतो व ब्रह्मेंद्राच्या दिसत नाही. रामदासांच्या सर्व व्यवसायांचे मुख्य धोरण म्हटले म्हणजे महाराष्ट्रधर्म होय. ह्या महाराष्ट्रधर्माचे नावदेखील ब्रह्मेंद्राला माहीत नव्हते. ब्रह्मेंद्राच्या वेळी हे नाव लोपत चालले होते. असा कोणास संशय येईल. परंतु तसा प्रकार नाही. रा. करंदीकर आणि सहस्रबुद्धे यांनी छापलेल्या शाहूराजाच्या रोजनिशीतील शाहूच्या एका पत्रात (ते पत्र पुढे दिले आहे) महाराष्ट्रधर्म हा शब्द आलेला आहे. सदर ठिकाणी इंग्रजी भाषांतरकाराने महाराष्ट्र धर्म म्हणजे Religion of महाराष्ट्र असे भाषांतर केले आहे. परंतु ते बरोबर नाही, त्या स्थळी महाराष्ट्रधर्म या शब्दाचा अर्थ मराठ्यांचे कर्तव्य असा स्पष्ट आहे. शाहू छत्रपतीला महाराष्ट्रधर्म माहीत असावा व ब्रह्मेंद्राला नसावा. ह्यावरून ब्रह्मेंद्राच्या राजकीय ज्ञानाचा अंदाज करता येतो.[९] राजवाड्यांनी उल्लेखिलेले शाहूचे पत्र येणे प्रमाणे–

(१६५७ मार्गशीर्ष व. ९)

राजश्री फोंड सावंत भोसले सरदेसाई प्रांत कुडाळ यांसी पत्र की, 'राजश्री गोपाळ रामराव यांच्या कबिला तुम्ही अटकावून ठेविला आहे. त्यासी निरोप देऊन पाठवणे.' म्हणून पूर्वी तुम्हास लिहिले होते. परंतु ते गोष्टी न केली. ब्राह्मणाचा कबिला अटकेत ठेवावा हा महाराष्ट्रधर्म नव्हे. प्रस्तुत हे स्वामी सन्निध आहेत, तरी त्याचा कबिला त्यास मुक्त करून पाठवून देणे म्हणून पत्र १ सीत सलासीन मया व अलफ, रजब २२. [१०]

---

९– राजवाडे विश्वनाथ काशिनाथ. 'राजवाडे लेखसंग्रह'–भाग १ ला, ऐतिहासिक प्रस्तावना खंड ३ रा, इ. स. १९२८, पृ. १९३–१९४.

१०– प्रा. बेहेरे ना. के. 'पहिले बाजीराव पेशवे,' भारत– गौरव ग्रंथमाला, पुष्प ९२ वे, मे १९३०, पृ. १९९.

स्वामींच्या योग्यतेसंबंधाने रा. राजवाड्यांचा अभिप्राय, कठोर शब्दयोजना वगळल्यास, सारांशाने निर्विकार मनास पटण्याजोगा आहे, असेच रियासतकार सरदेसायांना वाटते. मराठी रियासत मध्यविभाग १ या ग्रंथात (पृ. २८० ते २८७) ब्रह्मेंद्र स्वामींच्या योग्यतेसंबंधाने त्यांनी मांडलेले विचार थोडक्यात असे ' ...रामदासांची योग्यता ब्रह्मेंद्रस्वामीस नाही. मनुष्यस्वभावाचे व जगाचे ज्ञान व राष्ट्रोद्धारणास लागणारे साहित्य जसे रामदासास अवगत होते तसे ब्रह्मेंद्रस्वामीस नव्हते. रामदासासारखे निःस्वार्थी राष्ट्रपुरुष क्वचितकाळी महद्भाग्याने निर्माण होतात. तेव्हा त्याजबरोबर ब्रह्मेंद्रस्वामीची तुलना करणे व्यर्थ आहे. सामान्य साधूपैकीच ब्रह्मेंद्रस्वामी होता. त्यास राष्ट्राची किंवा राजकारणाची जाणीव नव्हती. आपणास लोकांनी भजावे, मोठमोठे लोक आपल्या शिष्यगणांत असावे, याजकडून लोकांची व आपली अनेक कार्ये साधून घ्यावी, अशी व्यावहारिक महत्त्वाकांक्षा ब्रह्मेंद्राची होती. अर्थात त्याचे तेज व प्रभाव तितक्या मानाने कमीच होता. एखाद्या व्यक्तीच्या उत्कर्षापलीकडे समग्र राष्ट्राचे चिरंतन कल्याण कशात आहे हे जाणण्याची पात्रताच त्यास नव्हती. त्याच्या एवढ्या मोठ्या पत्रव्यवहारात अशी राष्ट्रीय भावना व्यक्त करणारे एकही वाक्य नाही.'

प्रस्तुत ग्रंथातील अनैतिहासिकता विस्ताराने तपासून पाहिली ती एवढ्याच-साठी, की या ग्रंथात ऐतिहासिक पार्श्वभूमीला किती गौण स्थान लाभले आहे, हे लक्षात यावे. बापटांनी १८७९ साली हे चरित्र लिहिले. तेव्हा राजवाडे, पारसनीस, खरे व सरदेसाई हे उदयास यावयाचे होते. आणि मराठ्यांच्या इतिहासाची साधने उजेडात यावयाची होती. साहजिकच या पुस्तकात ऐतिहासिक कादंबरीप्रमाणे इतिहासाला, ऐतिहासिक पार्श्वभूमीला महत्त्वाचे स्थान न लाभता, ते बाजीराव या व्यक्तीला मिळाले. इथे ऐतिहासिक व्यक्तीची जीवनकथा कल्पिताच्या आधाराने सांगितलेली आहे. म्हणजे लेखकाची भूमिका चरित्रकाराची असली तरी त्याने स्वीकारलेले तंत्र कादंबरीचे आहे. प्रस्तुत ग्रंथात लेखकाने उघड उघड चरित्रपर कादंबरीचा घाट कसा स्वीकारलेला आहे तेच आता पाहावयाचे आहे.

केवळ कादंबरीकाराला सहज शक्य असा व्यक्तीचे मनोगत उकलून दाख-विण्याचा पुढील प्रयत्न पाहा. ' अभ्युदय ' या प्रकरणात (पृ. ७) पत्नी गर्भारशी राहिली म्हणून तिची हातीपायी सुटका कशी होईल या चिंतेने व्याकुळलेले बाळाजीपंत मन दुसरीकडे लागावे यास्तव बखरीचा रुमाल काढून बसतात. त्यात शिवाजीने व्यंकोजीला लिहिलेले पत्र सापडले. ते वाचून झाल्यावर बाळाजीपंताने म्हटले, ' अहाहा; केवढी या प्रभूची योग्यता; थोर ते थोरच; हा उपदेश राजा-पासून रंकापर्यंत, लहानापासून वृद्धापर्यंत आणि ज्ञानशून्यापासून बृहस्पतीपर्यंत सर्वांनी घेण्यासारखा आहे असा धर्मप्रभू मिळण्यास महद्भाग्यच पाहिजे. आम्ही हतभाग्य म्हणून त्यांच्या पश्चात, आमची अशी दुर्बल स्थिती झाली. या प्रभूचा

नातू शाहू मोंगलांच्या सापळ्यात आहे. तो मोकळा होऊन ईश्वर कृपेने आपल्या पराक्रमी आजाच्या सिंहासनावर येऊन बसेल तर त्याजकडे मी डोक्याने जाईन, त्याच्या सेवेत हा देह झिजवीन, आणि या समयी मला पुत्र झाल्यास त्यासही असाच उपदेश करून राजकार्यात निष्णात करीन. ही माझी इच्छा विश्वंभर सफल करो.' असे मनात म्हणून बाळाजीपंत आणखी पुढे बखर वाचीत चालला. बखर वाचीत असताना बाळाजीपंताच्या मनात नेमके असेच विचार आले असतील हे कशावरून विश्वसनीय मानायचे? इथे बाळाजीपंतांचे मनोगत व्यक्त करताना लेखकाने कल्पनेचा आधार घेतला आहे' ही गोष्ट अगदी निर्विवाद आहे.

केवळ कादंबरीत शक्य अशी कल्पिताच्या आधाराने केलेली वातावरण निर्मिती हे या पुस्तकाचे एक वैशिष्ट्य म्हणता येईल, महाराजांची आज्ञा घेऊन, निजामाचे पुरे पारिपत्य करण्याकरिता बाजीराव पुण्याकडे निघाला. वाटेत पहिला मुक्काम चार कोसावर पांचवडास पडला. तेथील बालआंबराईत त्याच्या बिनीवाल्याने छावणी दिली तेव्हाचे पुढील वर्णन पाहा – 'ते गुलाबी थंडीचे दिवस होते. आंब्याच्या झाडांवर पाचेसारखे हिरवेगार राघू चिंव चिंव करीत होते व इतर पक्षांचा किलकिल शब्दही मधून मधून चालला होता. जिकडे तिकडे हिरवेगार गवत व दुर्वांची बेटे वाढली होती. झाडाखाली पानांच्या फटींतून उन्हाचे लहान लहान असंख्य कवडसे पडले होते. त्या जणू वाटोळ्या लांबोळ्या व बदामी वगैरे घाटाच्या आरशाच पसरून ठेवल्या होत्या असा भास झाला. दरबारच्या तंबूवर विस्तारयुक्त पाचवडांची दाट छाया होती. त्यांच्या पुढे काही अंतरावर कृष्णानदीचे स्वच्छ काळेभोर पाणी संथपणे वहात होते. पलीकडे पांडवगड व दुसरे डोंगर हिरवेगार दिसत होते. त्यांच्या आसपासची सर्व जमीन हिरव्या रंगाने रंगभूमीसारखी चमकत होती. गावच्या पाणवठ्याजवळ एक चिमणबाग होता. तेथे लिंबाच्या झाडांवर काही हिरवी, काही पाडास आलेली व काही पिवळीजर्द कागदी लिंबे लटकली होती. गाजरे, रताळी, भुईमूग व हुरडा खाऊन गाजरासारखी लाल गुराख्यांची पोरे हिंडत होती. ती आपल्या गुरांस पाणी पाजून पावा वाजवीत घराकडे हाकीत चालली, तेव्हा वासरांच्या ओढीने गाई शेपटचा चवरीसारख्या वर धरून चोखुरी उड्या टाकीत ह्यां करीत गावाकडे धावत चालल्या होत्या. एक पोर एका म्हशीला बदाबदा काठीने झोडपू लागले. तेव्हा ती रागाने उलटून त्याच्या अंगावर धावली, तेंव्हा ते भित्रे पोर घाबरून मागे कुंपणात पडले. काटे लागून त्याच्या अंगाचे लोचके निघाले. हे पाहून त्याला बाजीरावाने तत्काळ काढवून आपल्या अंगावरचे धोतर देऊन त्यास घरी लावून दिले...' (पृ. ८६–८७) बारीकसारीक तपशीलासह केलेले हे अलंकारिक वर्णन एखाद्या कादंबरीत शोभण्यासारखे आहे. चरित्रात नायकाचे सान्निध्य लाभलेल्या, समकालीन चरित्र-

कारालाच इतका सूक्ष्म तपशील उपलब्ध होऊ शकतो. दूरच्या काळातील चरित्र-काराला कल्पिताच्या आधाराशिवाय वर्णनात इतका सूक्ष्म तपशील भरता येणे शक्य नाही. या वर्णनातला बारीकसारीक तपशील भरताना लेखकाने कल्पनेचा आधार घेतलेला आहे. ही गोष्ट अगदी निःसंशय होय.

बापटांनी वर नमूद केल्याप्रमाणे बाळाजी विश्वनाथाचे मनोगत व्यक्त करताना ठिकठिकाणी केलेल्या कृत्रिम अवास्तव आणि आलंकारिक वर्णनाचा तपशील भरताना कल्पनेचा आधार तर घेतला आहेच. वर्णनात मनोरंजकता यावी म्हणून अतिशयोक्तीचाही वापर केला आहे. पण त्याशिवाय चरित्रनायकावर अलौकिक व्यक्तिमत्त्व लादले आहे. जेव्हा चरित्रनायकावर अलौकिक व्यक्तिमत्त्व लादले जाते किंवा वर्णनात मनोरंजकता यावी म्हणून अतिशयोक्तीचा वापर केला जातो, तेव्हा चरित्र आणि कादंबरी यांमधला फरक सहजगत्या पुसला जातो. चरित्राला कादंबरीचे रूप येते. प्रत्यक्षातील व्यक्ती चित्रित करताना या पुस्तकात मनोलेखन, कल्पिताच्या आधाराने केलेली वातावरण निर्मिती, अतिशयोक्ती यामुळे लेखकाने काही एक कलात्मक पातळी गाठली आहे यात शंका नाही, पण त्यामुळेच ही एक चरित्रात्मक कादंबरी झाली आहे.

आतापर्यंत चरित्र आणि कादंबरी, चरित्र आणि चरित्रात्मक कादंबरी. चरित्रात्मक कादंबरी आणि ऐतिहासिक कादंबरी या कृतींचा तौलनिक अभ्यास केला. या तौलनिक अभ्यासातून कादंबरी लेखनाला जसे पूर्णार्थाने कला म्हणता येईल. तसे चरित्रलेखनाला म्हणता येत नाही, असा निष्कर्ष काढला. आता ' चरित्र ही कला आहे ' असे आग्रही प्रतिपादन करणाऱ्या पक्षाचे म्हणणे काय आहे ते पाहू,

चरित्र ही कला आहे. हे मत प्रथम लिटन् स्ट्रॅचीने मांडले. इंग्रजी चरित्र-वाङ्मयाचे समालोचन करताना चरित्र कसे असू नये हे त्याने सूचित केले आहे. त्याच्या मते आधीचे इंग्लिश चरित्र ग्रंथ म्हणजे केवळ गौरवग्रंथ होते, स्तुतिपर मृत्युलेख होते; त्यात योजना नाही, रचना नाही, शैली नाही व अलिप्त वृत्ती नाही. एमिनन्ट व्हिक्टोरिअन्स या चरित्रग्रंथाला जोडलेल्या प्रस्तावनेत तो लिहितो, ' इंग्लंडमध्ये चरित्रकलेला वाईट दिवस आलेले दिसतात... ज्या दोन जाडजड ग्रंथाच्या आधारे मृतव्यक्तीची स्मृती टिकवून धरण्याची आपली प्रथा आहे, त्यातल्या सामग्रीची विस्कळित रचना, त्यांची गचाळ शैली, त्यातला स्तुति-पाठाचा कंटाळवाणा सूर, त्यातली निवडीची, अलिप्ततेची, रचनेची शोचनीय उणीव यामुळे त्यांची कुणाला ओळख झालेली नाही. स्मशानयात्रेची व्यवस्था पाहाणाऱ्याच्या परिवारगणाइतक्याच या गोष्टी परिचित आहेत आणि त्यांना मंदगती प्रेतयात्रेच्या हेंगाडेपणाची अवकळा आलेली असते.'[११]

11– Strachey, Lytton. ' Eminent Victorians,' Chatto and Windus, London, Seventh Impression, Dec. 1918 Preface, VIII.

लिटन् स्ट्रॅची याने चरित्र ही कलाकृती आहे असे सांगताना जो काही विचार मांडला आहे, तो थोडक्यात असा. चरित्र कलात्मक असले पाहिजे. त्यात निवड असली पाहिजे. पुनरुक्ती टाळली पाहिजे, चरित्रकाराने मिळालेल्या सामग्रीची सुश्लिष्ट रचना करून आकर्षक पद्धतीने निवेदन करावे. लेखकाला स्वतःची स्वतंत्र दृष्टी व वृत्ती पाहिजे. काही सिद्ध करणे, तत्त्वप्रतिपादन करणे हे त्याचे काम नव्हे, निःपक्ष वृत्तीने, स्वतःच्या बुद्धीप्रमाणे सत्य घटना सांगणे, भावनावश न होता सत्यदर्शन घडविणे हे चरित्रकाराचे खरे काम होय. एमिनन्ट व्हिक्टोरिअन्स या पुस्तकाला त्याने लिहिलेली प्रस्तावना जेमतेम अडीच पाने आहे. एका जुन्या प्रभावी व रूढ मताचे खंडन करण्यास व नवे मत प्रस्थापित करण्यास एवढे विवेचन त्याला पुरेसे वाटले असावे. पण त्याची मते प्रामुख्याने त्याने लिहिलेल्या चरित्र ग्रंथावरून जास्त निश्चित होतात. चरित्रात कलेचे नेमके स्थान कोणते हे ठरविताना लिटन् स्ट्रॅचीच्या Eminent Victorians, Queen Victoria आणि Elizabeth and Essex या चरित्रांची मदत होते. लिटन् स्ट्रॅचीने चरित्राचे क्षेत्र निवडले ते आपल्या सृजनशक्तीच्या मर्यादा लक्षात घेऊन. क्वीन व्हिक्टॉरिआ हे चरित्र चरित्रातल्या कलेच्या मर्यादा लक्षात घेऊन लिहिले गेले, म्हणूनच ते इतके उत्तम उतरले. स्ट्रॅचीला व्हिक्टॉरिआ राणीबद्दलची खडा न् खडा माहिती उपलब्ध होती. त्यामुळे सत्याच्या कक्षेत राहून चरित्रातला नीरस अंश दूर करण्याचा प्रयत्न यशस्वी ठरला. या उलट एलिझाबेथच्या चरित्रात काव्याची रसवत्ता, नाटयाची थरारी आणावी असा प्रयत्न त्याने आरंभिला. पूर्ण माहितीच्या अभावी चरित्रकार शोधनाची मर्यादा ओलांडून संशोधन करण्यास मोकळा राहिला. व्हिक्टोरिआच्या चरित्रात ज्या विभागाची माहिती उपलब्ध झाली नाही तो विभाग स्ट्रॅचीने थोडक्यात उरकून घेतला. पण एलिझाबेथच्या चरित्रात माहिती नव्हती तो भाग त्याने कल्पनेने भरून काढला. मूळ सत्य आणि कल्पना यांचे मिश्रण या चरित्रात होऊन, चरित्र व कला या दोहोंची फसगत झाली. सत्याची स्वाभाविक मर्यादा ओलांडून चरित्राची कादंबरी करण्याचा प्रयोग भोवला. क्वीन व्हिक्टोरिआ पेक्षा तुलनेने इलिझाबेथ हे चरित्र हीणकस ठरले. इलिझाबेथच्या चरित्रात सत्य व कल्पना यांचा संकर फलदायी झाला नाही.

इलिझाबेथ या चरित्राच्या अपयशामुळे चरित्र ही कला आहे. या स्टॅचीच्या विधानाचा पायाच ढासळून पडतो. चरित्राची कला करण्याचा प्रयोग फसला. याचे कारण सत्याची बंधने हा चरित्रवाङ्मयाचा आवश्यक दण्डक आहे. चरित्राची कला करायची ती सौन्दर्यनिर्मितीसाठी, चरित्रातला नीरस अंश दूर करण्यासाठी, पण तसे करताना कल्पनेचा आधार घ्यावा लागतो. आणि स्ट्रॅचीने तसा तो घेतला इथेच चरित्र बिघडले. ध्वन्यालोककर्ते आनंदवर्धनाचार्य यानी ललितलेखकांना असे स्पष्ट सांगितले आहे. की, ' मूळ घटनांत रसानुकूल स्थिती

नसेल तर मूळचे इतिवृत्त बदलूनसुद्धा रसानुकूल अशा स्वतंत्र (कल्पित) घटनांचा तपशील त्यांनी खुशाल घालावा. कारण, कवींचा कटाक्ष रसोत्पत्तीवर असल्याने नुसत्या इतिहासाशी त्यांना काही कर्तव्य नाही.[१२] पण सत्याच्या बंधनाने जखडलेल्या चरित्रात हे कसे शक्य व्हावे ? कल्पनेचा आधार न घेता केवळ सत्याच्या कक्षेत राहून चरित्राची कलाकृती करणे अशक्य आहे. याचाच अर्थ असा होतो की इलिझाबेथच्या चरित्राचे अपयश हे मूळातच चरित्रातल्या कलेचे अपयश आहे. इलिझाबेथच्या चरित्राने जर काही दाखवून दिले असेल तर ते हे, की चरित्रात जर काही कला असलीच तर ती कादंबरीतल्या कलेसारखी पूर्णार्थाने कला होऊच शकत नाही.

चरित्र लेखन ही कला आहे, हे मत आंद्रे मोर्वाने आवर्जून मांडले. स्ट्रॅचीने सांगितलेल्या सत्यदर्शन व अलिप्तता या चरित्रातल्या कलेच्या लक्षणाखेरीज आणखी दोन लक्षणे Aspects of Biography या ग्रंथात आंद्रे मोर्वाने सांगितली आहेत. व्यक्तिजीवनाची पुनर्घटना, पुनर्रचना व आत्माविष्कार ही ती दोन लक्षणे होत. प्रत्यक्षातल्या व्यक्ती या आपल्याला अनाकलनीय असतात. त्यांच्या कृतीमागले, आवरणामागले, कार्यकारणभाव आपल्याला कळत नाहीत. त्यांची संगती आपल्याला लागत नाही. कादंबरीसारख्या ललितकृतीत व्यक्तिरेखा लेखकच निर्मित असल्यामुळे तो दर पावलाला हे कार्यकारण स्पष्ट करतो व व्यक्तिजीवनाचे सुसंगत चित्र आपल्यापुढे उभे करतो. आंद्रे मोर्वाचे म्हणणें असे आहे, की, चरित्रकाराने हेच करावे. शेलीचे जीवन म्हणजे दोन स्त्रियांच्या भोवती गुंफलेली आश्चर्यकारक नि नैसर्गिक रचना आहे. (पृ. ५१) शेलीच्या जीवनात पाण्याचे प्रतीक प्रभावी ठरले आहे. (पृ. ७१) याचा अर्थ असा, की त्याचे आयुष्य पाण्याशी इतके संबद्ध आहे, की त्याला पाण्यात बुडून आलेला मृत्यू म्हणजे त्याचे जीवन एका सूत्रात गुंफण्याची ईश्वरी योजना होती की काय असे वाटावे. लहानपणी कागदाच्या होड्याकरून खेळला तो शेजारच्या ओढ्यात, ईटनच्या शाळेत असताना आवडते विश्रांतिस्थान म्हणजे शेजारची नदी : पहिली पत्नी हेरियट हिचा मृत्यू झाला तो पाण्यात बुडून, दुसऱ्या पत्नीबरोबर युरोपचा प्रवास केला तो बराचसा पाण्यात आणि शेवटी स्वतःला मृत्यू आला तो पाण्यात. चरित्रनायकाच्या जीवनातील असे मुख्य सूत्रशोधून काढून त्या भोवती त्याच्या जीवनाची पुर्नघटना केली म्हणजे त्यात एकात्मता येईल, त्या चरित्राला धार येईल, आकार येईल आणि अर्थातच ती एक सुंदर कलाकृती होईल.

इथे असा प्रश्न उपस्थित होतो, की अभावितपणे असे रचनासूत्र, जीवनाचे एक सूत्र वर्ण्य व्यक्तीच्या जीवनात सापडेलच असे कशावरून ? काही तत्त्वाने,

---

१२– प्रा. डॉ. वाटवे के. ना. 'संस्कृत काव्याचे पंचप्राण,' मनोहर ग्रंथमाला, पुणे, प्रकाशन ४६ वे. प्र. आ. १ जुलै १९४७, पृ. २८३.

ध्येयवादाने प्रेरित झाल्यामुळे प्रारंभापासून अखेरपर्यंत त्या एकाच सूत्राभोवती तिचे जीवन गुंफलेले असेलच असे कशावरून ? कादंबरीकार, ललित लेखक स्वतःच निर्माता असल्यामुळे व्यक्तीच्या जीवनाचे सूत्र आधी ठरवूनच तिला तो घडवितो. पण जिचे जीवन आधीच घडलेले आहे, अशी व्यक्ती चरित्रकाराच्या वाट्याला येते. ज्या गोष्टी चरित्रनायकाच्या जीवनात जशा घडल्या तशाच त्या वाचकांच्या पुढे ठेवावयाच्या असतात आणि म्हणूनच चरित्रकाराला हव्या असलेल्या सूत्रात चरित्रनायकाचे जीवन गुंफता येत नाही. अशा स्थितीत त्या व्यक्तीच्या जीवनात बळेच काही सूत्र गोविले तर कलात्मक रचनेसाठी त्याने सत्याला विकृत स्वरूप देऊन बळी दिल्यासारखे होईल, चरित्रनायकाचे जीवन जसे होते तसे ते चित्रित न होता, त्या सूत्राच्या गरजेनुसार, चरित्रकाराच्या इच्छेनुसार ते चित्रित होईल.

चरित्र नायकाचे व्यक्तिमत्त्व रेखाटताना चरित्रकार आपल्यापुढे पसरलेल्या कागदपत्रांवर बराचसा अवलंबून असतो. चरित्रनायकाचे जीवन एका सूत्रात गोवायचे म्हणजे त्याच्याविषयी लेखकाला खडा न् खडा संपूर्ण माहिती असावी लागते. पण हे क्वचितच संभवते. चरित्रकाराला नायकाच्या सावलीप्रमाणे त्याचे सतत सान्निध्य लाभूनही, त्याच्या मनाच्या चोरकप्प्यातल्या चिजा बाहेर पडतीलच असे नाही. चरित्रकार कादंबरीप्रमाणे त्या व्यक्तीचा निर्माता नव्हे. पूर्णमाहितीच्या अभावी एका सूत्रात व्यक्तीचे जीवन गोवण्याच्या प्रयत्नात व्यक्तिमत्त्वाचे अकालिक, भ्रामक अर्थबोधन मात्र पदरात पडते आणि चरित्र हे तर सत्याच्या भरभक्कम पायावर उभे असले पाहिजे. चरित्राची कला करण्याकरिता कादंबरी किंवा चरित्रात्मक कादबरीप्रमाणे व्यक्तीचे जीवन एका सूत्रात गोवण्याची मोर्वाची कल्पना किती भ्रामक आहे याचे विवेचन न्यूमन आय्. व्हाइट यांनी केले आहे. त्यांच्या विवेचनाचा थोडक्यात गोषवारा असा : चरित्राची कला करू पाहणाऱ्या कुणा भावी चरित्रकाराच्या सोयीसाठी अगोदरच आपले जीवन एका सूत्रात गुंफण्याची खबरदारी कुणी घेत नाही. जीवनाची अशी निश्चित पूर्णपणे सूत्रबद्ध रचना फारच थोड्यांना साधली आणि व्यक्तिमत्त्वाच्या गुंतागुंतीच्या, उलटसुलट प्रवाहांच्यामुळे व व्यक्तिभावविरहित, चहूबाजूनी घेरणाऱ्या अपघातांमुळे, असे सूत्र मूळ स्वरूपात टिकवून धरणे त्या थोड्यांपैकी जवळजवळ कुणालाच जमले नाही. व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिच्या जीवनात एकाऐवजी अनेक सूत्रे आढळण्याची शक्यता असते आणि तीही व्यक्तीने गोवलेली नसतात, तर मानवी दैव निश्चित करणाऱ्या सर्व शक्तींच्या क्रियाप्रक्रियामुळे गोवली जातात. एवढ्या सूत्रांच्या भोवती चरित्रनायकाच्या जीवनाची पुनर्घटना करायची म्हणजे घटितांची वाण पडणारच.जो जो घटितांची वाण पडते तो तो चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्व चरित्रकाराच्या पूर्वकल्पनेत कोंबण्याचा प्रयत्न होतो आणि मग

चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे अर्थबोधन नायकाच्या अनुभूतींतून न होता, ते चरित्रकाराच्या स्वानुभूतींतून होते. कोणते का रचनासूत्र असेना पूर्ण ज्ञानाच्या अभावी चरित्रकार त्या सूत्राच्या भोवती जी नायकाच्या जीवनाची पुर्नघटना करणार ती सत्याचा विपर्यास करणाऱ्या स्वानुभूतीच्या माध्यमातूनच. अशा चरित्रलेखनाचा व्यक्तिमत्त्वाच्या अर्थबोधनावर विपरीत परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.[१३]

आत्माविष्कार हा चरित्रलेखनकलेचा आणखी एक घटक आंद्रे मोर्वाने सुचविला आहे. मोर्वाच्या मते, कोणत्याही कलेचे आत्माविष्कार हेच प्रधान लक्षण होय. कोणतीही कलाकृती म्हणजे प्राधान्याने भावनांचा निचरा असतो. तो एक परिहार आहे. भार हलका करण्याची ती प्रक्रिया आहे. कलाकारांच्या मनात भावनांना उधाण आलेले असते. जोराने उसळून त्या बांध फोडू पाहत असतात. त्यांना वाट करून देणे त्याला अत्यंत अगत्याचे वाटत असते. त्या दाबातून स्वतःला मुक्त करणे अगदी अवश्य झालेले असते. त्यावेळी तो भावनांचे जे निरसन करतो. आविष्कार करतो, त्यातूनच कलाकृती निर्माण होते. किंबहुना तो आविष्कार हीच कलाकृती होय. डिकन्सची कादंबरी 'डेव्हिड कॉपरफिल्ड' जॉर्ज इलियटची 'द मिल ऑन द फ्लॉस', फ्लॉबेरची 'मादाम बोव्हारी' ही मोर्वाने आत्माविष्काराची उदाहरणे म्हणून दिली आहेत. 'मादाम बोव्हारी' हे माझेच जीवन होय, असे फ्लाबेर म्हणत असे. चरित्रलेखकाच्या जीवनाचा असा आविष्कार त्याने लिहिलेल्या चरित्रात झाला तरच ते चरित्र म्हणजे कलाकृती होईल. हे साधण्यासाठी पुन्हा चरित्रविषयाच्या निवडीचा प्रश्न आला. लेखकाने आपल्या भावना, आकांक्षा, श्रद्धा, आशा– निराशा या ज्या व्यक्तींच्या चरित्रात तितक्याच उत्कटतेने दिसून येतील अशाच व्यक्तींची चरित्रे लिहावी, असे मोर्वाचे मत आहे. शेली व डिझरेली यांची निवड करताना हेच धोरण आपण ठेवले होते असे त्याने सांगितले आहे.

मोर्वा म्हणतो, 'चरित्रासाठी मी शेलीची निवड केली याचे कारण असे की, तरुणपणी मी जी अनेक जीवितविषयक तत्त्वे मनाशी निश्चित केली होती, ती व्यवहारात आणताना परिस्थितीशी संघर्ष होऊ लागला, त्यामुळे अनेक प्रकारचे दुःख मला झाले व मन उद्विग्न झाले. शेलीच्या चरित्रात नेमके हेच घडले होते. तेव्हा त्याच्या चरित्रात पदोपदी मला माझे चरित्र दिसू लागले आणि त्याचे चरित्र लिहून दुःखभार हलका होईल असे वाटले. म्हणून त्यावेळी मी ते लिहून टाकले. त्यानंतर

13– White, Newmen I. English Institute Annual 1942, Ne, York. Morningside Heights, Columbia University Press 1943, P. 47.

डिझरेलीचे चरित्र अभ्यासले तेव्हा हाच अनुभव आला उत्तरवयातल्या डिझरेलीशी मी समरस होऊ लागलो. सनातन परंपरेचा अभिमान व लोकशाही वृत्ती यांचा समन्वय त्याच्या ठायी झाला होता. माझ्या मनाची ठेवण तंतोतंत तीच होती. डिझरेलीने आपले हे राजकीय तत्त्व प्रत्यक्ष व्यवहारात आणले. मला ते आणता आले नाही. तेव्हा त्याचे चरित्र लिहून त्याच्याशी एकरूप व्हावे व तेच यश आपण अनुभवावे असे मला वाटले आणि त्या हेतूने मी डिझरेलीचे चरित्र लिहिले.'[१४अ]

थोडक्यात म्हणजे चरित्रनायकाच्या जीवनात स्वतःच्या जीवनाचा साक्षात्कार होऊन त्याचे चरित्र लिहिणे म्हणजे दुसऱ्याच्या चरित्रात स्वतःचे चरित्र (आत्म-चरित्र) लिहिणेच होय. आंद्रे मोर्वाच्या मते चरित्रनायकाचे जीवन चरित्रकाराच्या जीवनाशी जुळते तेव्हाच असे आत्मचरित्र लिहिणे किंवा आत्माविष्कार करणे शक्य होते. पण इथे अडचण अशी उपस्थित होते, की चरित्रकाराचे जीवन नायकाच्या जीवनाशी अगदी तंतोतंत शंभर टक्के कसे जुळावे ? यावर मोर्वाचे उत्तर असे आहे, की विवक्षित भावनेची जाणीव होण्याइतका त्या भावनेचा प्रत्यय आला तरी पुरे आहे. तो लिहितो, 'पहिली गोष्ट म्हणजे तुम्हाला असे दिसून येईल. की हे क्वचितच शक्य आहे, चरित्रनायक नेहमीच चरित्रकारापेक्षा मोठा असतो, दुसरे म्हणजे चरित्रकाराला ऐतिहासिक जीवनक्रमात त्याच्या स्वतःच्या पूर्ण जीवनक्रमाचा शोध कधीच घेता येत नाही. त्याला शोध घेता येतो तो त्याच्या जीवनक्रमाच्या एका भागाचा आणि तोही क्षणिक, अगदी मर्यादित भाग... असे असूनही भावनेची जाणीव होण्याकरिता त्या भावनेचा दीर्घकाळ प्रत्यय घेतलाच पाहिजे असे नाही.'[१४ब]

आत्माविष्काराच्या खटपटीत सत्यापलाप होण्याची शक्यताच अधिक. स्वतः मोर्वाचा याबाबतीत शेलीच्या चरित्रातला स्वानुभव काय आहे तो पाहाण्यासारखा आहे. तो लिहितो, 'त्याची पत्रे, त्याच्या मित्रानी लिहिलेली पत्रे, त्याच्यासंबंधी जे जे काही लिहिले गेले होते ते सर्व मी क्रमाक्रमाने वाचले आणि अखेरीस त्यात बुडी मारली. माझे बरोबर होते काय ? मला ते ठाऊक नाही. मला तसे वाटत नाही. मला ते पुस्तक आवडतही नाही. माझ्या दृष्टीने ते त्यातल्या उपरोधिक सुराने बिघडले आहे आणि उपरोध मी स्वतःच माझ्यासाठीच योजला होता. मला माझ्यातली अद्‌भुतप्रियता मारून टाकायची होती आणि तसे करण्याकरिता शेलीतल्या अद्‌भुतप्रियतेचा मी उपहास केला...'[१५]

आत्माविष्कारामधला धोका मोर्वाला जाणवलेला होता म्हणून Aspects of Biography या ग्रंथात त्यासंबंधात चरित्रकारांना इषारा देताना तो लिहितो,

---

14– अ, ब Maurois, Andre. 'Aspect of Biography', Cembridge University Press, 1929, P. 111–112.

15– Ibid, P. 108.

' माझ्यावर विश्वास ठेवा, अशा प्रकारच्या चरित्रात जे अंगभूत दोष असतात त्यांची मला स्पष्ट जाणीव आहे. चरित्रकाराच्या आत्मविष्काराच्या, आत्मप्रकटी· करणाच्या इच्छेमुळे, चरित्रनायकाविषयी असलेल्या सहानुभूतीमुळे या द्वेषामुळे चरित्रकाराकडून अजाणपणे सत्याचा विपर्यास होण्याचा धोका असतो. ज्या प्रमाणात त्याच्या हातून तसे घडते त्या प्रमाणात त्याची पद्धत सदोष ठरते...'[१६]

असे असूनही चरित्राची कला करण्याकरिता मोर्वाने आत्मप्रकटीकरणाचा आपला आग्रह सोडलेला नाही अपवादात्मक बाबतीत का होईना. ते शक्य आहे, असाच त्याचा आग्रह आहे. तो पुढे लिहितो, ' परंतु काही दुर्मिळ बाबतीत ते शक्य दिसते, जर निवड सुदैवी ठरली आणि लेखकाच्या प्रकृतीला सुयोग्य ठरली तर चरित्रकार आपल्या नायकाच्या भावनांचा विपर्यास न करता स्वतःच्या काही भावनांची अभिव्यक्ती करू शकेल.'[१७]

आत्माविष्काराच्या खटपटीत सत्यालाप होण्याची शक्यता आहे. आत्मप्रकटीकरण हे अगदी अपवादात्मक बाबतीतच शक्य आहे. हे सगळे मान्य असूनही आत्मप्रकटीकरणाचा हा सर्व खटाटोप कशासाठी करावयाचा तर चरित्रनायकाच्या जीवनाचे आकलन व्हावे म्हणून. एक एक पाऊल मागे घेत घेत आंद्रे मोर्वा कुठपर्यंत येऊन ठेपला, हे त्याच्याच शब्दात स्पष्ट होण्यासारखे आहे. तो लिहितो., ' परंतु हे पूर्ण अनुसंधान, चरित्रकार आणि चरित्रनायक यांची ही परस्पर विनिमयता जर अलभ्य असेल, तर मला वाटते चरित्रकाराला काही बाबतीत आणि काही वेळा चरित्रनायकाप्रमाणे अनुभूतीचा प्रत्यय घेणे भाग पडल्यावाचून चरित्र लिहिणे जवळ जवळ अशक्य आहे. नाहीतर त्याला चरित्रनायकाचे आकलन कसे होऊ शकले असते.' [१८]

एकीकडे मोर्वाने सत्याचा आग्रह धरला आणि दुसरीकडे चरित्राची कला करण्याकरिता त्याने आत्माविष्काराचा मार्ग सुचविला. आणि त्यामार्गाने सत्यालापाची शक्यताच अधिक आहे, असे दिसून येताच हा सगळा प्रयत्न करायचा तो निदान व्यक्तिजीवनाचे आकलन व्हावे म्हणून, असे सूचित करून तो मोकळा झाला. स्वतःच्या विधानाला मुरड घालता घालता, आधार घेता घेता तो इतका मागे आला, की त्यामुळे मूळ विचाराच्या मर्यादाच स्पष्ट होतात. चरित्राची कला करण्याचा आत्माविष्कार हा काही बिनधोक आणि हमखास मार्ग नव्हे.

लिटन् स्ट्रॅची किंवा आन्द्रे मोर्वा हे ' चरित्र ही कला आहे ' असे म्हणतात. तेव्हा कला या शब्दाचा अर्थ काही एका मर्यादेतच घेतला पाहिजे. घटितांची निवड, मांडणी इत्यादी कलेचे काही घटक उपयुक्त ठरतात.

16– Idid, P. 116–117.
17– Idid P. 117.
18– Idid, Pp. 117–118.

एवढयावरून चरित्र लेखनाला कला म्हणणे चुकीचे ठरेल. वास्तविक सत्य आणि कल्पना यांचे मिश्रण जोपर्यन्त चरित्राच्या पचनी पडत नाही, तोपर्यन्त चरित्राची कला होऊच शकत नाही. चरित्राची कला करण्याकरिता चरित्रात खुशाल कल्पनेचा आश्रय घ्यावा असेही यापैकी कुणीही, स्पष्टपणे म्हटलेले नाही. मोर्वाचे तर म्हणणे असे आहे, की एकदा का चरित्रकाराने कल्पनेचा आश्रय घेतला म्हणजे पुन्हा प्रत्यक्षाच्या पातळीवर येणे कठीण जाते. तो म्हणतो : ' चरित्रकाराला कोणत्याही एका वटिताची निर्मिती करण्याचा अधिकार नाही. तो इतिहास लिहित आहे, कादंबरी नव्हे, आणि तो शपथ घेऊन साक्ष देत आहे. पुरावा नसेल तर अमुक दिवशी हवा बरी किंवा वाईट होती, असेही त्याला म्हणता येणार नाही... तुमच्याकडे पत्र असेल तर त्या पत्राचे अथवा त्यातल्या काही भागाचे अवतरण घ्या. विश्वसनीय साक्षीदाराने संभाषण जतन करून ठेवले असेल, तर त्याचा उपयोग करा. पण कधीही कल्पिताचा आश्रय करू नका. एकदा का तुम्ही चरित्र आणि कादंबरी यांमधली रेषा ओलांडली म्हणजे तुम्हाला कधीही तुमच्या पावलांचा मागोवा घेता येणार नाही. '[१९] मग चरित्रात केवळ कलेचे काही घटक आढळतात. एवढयावरून चरित्राला पूर्णार्थाने कला कसे म्हणता येईल ? जोपर्यंत कलेच्या दृष्टीने चरित्र कादंबरीशी बरोबरी करू शकत नाही, तोपर्यंत सत्य आणि सत्याशी सुसंवादी कल्पित यांच्या संमिश्रणातून साधलेली नवनिर्मिती चरित्रात शक्य नाही, तोपर्यंत चरित्र ही कला आहे, हे विधान संपूर्णपणे मान्य होण्यासारखे नाही.

उलट, चरित्र ही एक उच्च पातळीवरची कारागिरी आहे, असे वर्जिनिया वूल्फ या सुप्रसिद्ध लेखिका मानतात. कलापक्षाचे खंडन करताना त्यांनी पुढील मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यांचा पहिला मुद्दा असा, की विश्वव्यापक, शाश्वत, चिरकालिक, तेच निवडावे असे कलेचे धोरण असते. कलेचे आवाहन सर्व स्थळी सर्वकाळी, सर्व मानवांना पोचते ते या तिच्या गुणांमुळे. ती अमर होते ती या विश्वव्यापकतेमुळे. प्रत्यक्ष जीवनातील, प्रत्यक्ष घटनांतील क्षणजीवी भाग हा कलाकार गाळून टाकतो. प्रत्यक्ष घटनात जो क्षणजीवी भाग असतो तो भस्म करून टाकण्याची कलावंताच्या उज्ज्वल प्रतिभेत शक्ती असते. त्यातील चिरकाल टिकणारा, शाश्वत (अविनाशी) तेवढाच भाग घेऊन तो कलानिर्मिती करतो. कलावन्त जी निर्मिती करतो ती चिरकाल टिकणाऱ्या सत्यावरच आधारलेली असते. परंतु चरित्रकाराच्या वाटयाला क्षणजीवी, अशाश्वत अशा घटना येतातच. त्यामुळे चरित्र ही कला होऊच शकत नाही.

19– Maurois, Andre. English Institute Annal 1942, Columbia University Press, 1943, New York : Morningside Heignts, Pp. 16–17.

चरित्रकाराला क्षणजीवी, अशाश्वत घटनांचा स्वीकार करावा लागतो हे सत्य नाकारता येणार नाही. क्षणजीवी, अशाश्वत अशा घटना चरित्रकाराला फार तर अनावश्यक तितक्या टाळता येतील. पण काही अपरिहार्य ठरतातच. त्या पूर्णपणे गाळता येत नाहीत स्मृति–चित्रांसारख्या लालित्यपूर्ण चरित्रातही हा क्षणजीवी भाग टाळता आलेला नाही. (देवाचा दरबार पृ. ८७ ते ९३, भाग ३ रा). अशाश्वत घटनांच्या निमित्ताने चरित्रात नीरस अंश मुरून राहतो. इथेच चरित्रातल्या कलेला खरी मर्यादा पडते.

वर्जिनिया बाईचा आणखी एक मुद्दा असा आहे, की चरित्रातली सत्ये-चरित्रकाराखेरीज इतरांनी पारखून ती सत्य आहेत असे ठरविले पाहिजे. एखादा कलावंत ज्या प्रकारची सत्ये निर्माण करतो त्या प्रकारची सत्ये– की जी सत्ये त्याच्याशिवाय इतरांना पारखताच येत नाहीत– ती निर्माण करून जर त्याजबरोबर ही पहिल्या प्रकारची सत्ये मिसळली तर ती एकमेकांना मारक ठरतात. कादंबरीकाराने किंवा कवीने निर्मिलेल्या व्यक्ती ह्या एक प्रकारच्या स्वतंत्र जगात वावरत असतात. या जगातील घटना केवळ त्यांचा निर्माता जो कलावंत तोच पारखून घेत असतो. त्यांचा खरेपणा त्याच्या आत्मप्रत्ययाच्या खरेपणावर अवलंबून असतो. या आत्मप्रत्ययाच्या जोरावर तो जे विश्व निर्माण करतो ते दुसऱ्यांनी सांगितलेल्या प्रत्यक्ष घटनांतून निर्माण झालेल्या विश्वापेक्षा अधिक एकजिनसी, अधिक उत्कट आणि अधिक सूक्ष्मतरल असते. ह्या दोन भिन्न विश्वातील ह्या स्वरूपभेदामुळे ही दोन प्रकारची सत्ये एकमेकात मिसळू शकत नाहीत. जेथे जेथे ती एकत्र येतात, तेथे तेथे ती एकमेकांना मारक ठरतात. यावरून वर्जिनिया बाईंनी निष्कर्ष असा काढला आहे, की ही दोन विश्वे एके ठिकाणी आणण्याचे कार्य कोणीच करू शकत नाही. एकाच वेळी ह्या दोन विश्वांचा उपयोग कोणालाही करणे जमत नाही. या दोघांतून एकाचीच निवड एका वेळी झाली पाहिजे.[२०]

चरित्रातल्या मूळ सत्याला बाधा न आणता नीरस अंश कसा दूर करता येईल हा चरित्रातल्या कलेचा खरा प्रश्न आहे. चरित्रात प्रत्यक्षाचे विश्व आणि कलाकाराने निर्मिलेले विश्व एकत्र आणण्याचा प्रयत्न होतो, तो हा नीरस अंश दूर करण्याकरिताच. पण परिणाम मात्र असा होतो, की चरित्राचा देह सजविण्याच्या खटपटीत सत्याचा आत्माच गमावून बसण्याची पाळी येते आणि म्हणूनच या दोन विश्वातून एकाचीच निवड एका वेळी झाली पाहिजे असे वर्जिनिया वूल्फ म्हणतात ते एकदम मान्य होण्यासारखे आहे. प्रत्यक्षाचे विश्व आणि कलाकाराने निर्मिलेले

20– Woolf, Virginia. 'The Deate of the moth and other The Hogarth Press, Second Impression 1942, PP. 119–126.

विश्व एकत्र आणण्याच्या प्रयत्नातच 'पहिले बाजीराव साहेब पेशवे' आणि 'परशुराम चरित्र' या दोन पूर्वीच चर्चिलेल्या कृतींच्या अपयशाचे कारण सापडते.

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी हंस मासिकात लिहिलेल्या, 'संकराचे अपत्य' या लेखात 'चरित्र कला की कारागिरी' या विषयाचा ऊहापोह केला आहे. डॉ. सहस्रबुद्धे चरित्र ही कला नव्हे, ती कारागिरी आहे असेच मानतात. मात्र त्यांनी चरित्रलेखनात शास्त्रीय पद्धतीचा अतिरिक्त पुरस्कार केला आहे. त्यांनी आपल्या लेखात कलापक्षाचे खंडण करून शेवटी निर्णय घेतला आहे. तो असा, '...याचा अर्थ असा की, चरित्राची मांडणी शास्त्रीय पद्धतीनेच झाली पाहिजे. सत्य घटनांची चिकित्सा, त्या आधारे निवेदन, आक्षेप, खंडन– मंडन व शेवटी निर्णय ही शास्त्रपद्धति होय. चरित्रे या पद्धतीने व दृष्टिकोनातून लिहिली गेली तरच ती आपले उद्दिष्ट साध्य करू शकतील... या सर्व मर्यादा सांभाळून चरित्र चित्तवेधक करता आले तर ते अवश्य करावे. शास्त्रीय पद्धत नेहमी जड किंवा रुक्ष असलीच पाहिजे असे नाही.'[२१]

आंद्रे मोर्वाचा वर नमूद केलेला कलात्मक दृष्टिकोन अतिरिक्त आहे, डॉ. सहस्रबुद्धेंच्या शास्त्रीय दृष्टिकोनात अतिव्याप्तीचा दोष आहे. चरित्र ही वाङ्मयीन कृती आहे तो काही प्रबंध नव्हे. मोर्वाच्या अतिरिक्त कलात्मक दृष्टी-मुळे चरित्राची कादंबरी होण्याची शक्यताच अधिक. त्याचप्रमाणे सहस्रबुद्धेंच्या अतिरेकी शास्त्रीय दृष्टीमुळे चरित्राचा प्रबंध किंवा इतिहास होण्याची शक्यता जास्त. चरित्र ही कादंबरी नव्हे. तो प्रबंधही नव्हे. चरित्रनायक जसा होता तसा तो चित्रित व्हावा म्हणून चरित्रात काही प्रमाणात शास्त्रीय दृष्टीचा अंगीकार होणे आवश्यक आहे. चरित्रात शास्त्रीय दृष्टी आवश्यक ठरते ती मानसशास्त्रादींच्या आधारे व्यक्तीचे अंतरंग जाणून घेण्यापुरती. अस्सल साधनांच्या आधारे सत्य घटितांची चिकित्सा करून, त्या आधारे निवेदन करण्या-साठी. चरित्र अधिकाधिक वस्तुनिष्ठ व्हावे म्हणून. उपलब्ध असलेल्या पुराव्याच्या आधारे, शास्त्रीय अचूकतेने, व्यक्तीचे खरेखुरे चित्र रेखाटताना शास्त्रीय दृष्टी उपयुक्त ठरते ही गोष्ट अमान्य करण्यात काहीच अर्थ नाही. पण डॉ. सहस्रबुद्धेंना अभिप्रेत असलेल्या आक्षेप, खंडण–मंडन व निर्णय या शास्त्रपद्धतीमुळे चरित्राचे व्यक्तित्वदर्शनाचे उद्दिष्ट बाजूला राहून चरित्राला शास्त्रीय चिकित्सेचे स्वरूप प्राप्त होते. चरित्राचा वाङ्मयीन घाटच बिघडून जातो. व्यक्तिदर्शन घडविताना शास्त्राची अचूकता ही हवीच. व्यक्तीच्या अंतरंगाचा वेध घेता यावा म्हणून मानसशास्त्रही हवे. पण व्यक्तीपेक्षा समष्टीचा परामर्ष घेताना, समाजाचा विचार करताना, शास्त्रीय दृष्टी अधिक महत्त्वाची ठरते.

२१– डॉ. सहस्रबुद्धे, पु. ग. 'संकराचे आपत्य' हंस दिवाळी अंक, १९६१, पृ. १५६.

चरित्रात शास्त्रीय पद्धतीचा उपयोग काही एका विशिष्ट मर्यादेत केला तर त्याचा चरित्रावर इष्ट तोच परिणाम होतो. शास्त्रीय दृष्टीमुळे चरित्रकारातला संशोधक जागृत होऊन चरित्रात उच्चप्रकारची अचूकता आणि पूर्णता गाठण्यास मदत होते. एकोणिसाव्या शतकात प्रसिद्ध झालेल्या चरित्रांची साधनसामुग्री पत्रे, ऐतिहासिक कागदपत्रे आणि रोजनिशी वा रोजकीर्द (Journal) विश्वसनीय आहे, असेच काही म्हणता येत नाही. पण आज पाश्चात्त्यच काय पण मराठी चरित्रातही अचूकपणा यावा. चरित्राच्या विश्वसनीयतेबद्दल वाचकांची खात्री पटावी म्हणून परिश्रमपूर्वक प्रयत्न केलेले आढळतात, शास्त्रीयदृष्टीमुळे पुरावा निग्रही चिकाटीने हुडकून काढण्यास, दुय्यम दर्जाची साधने टाळून अस्सल साधनांवर प्रत्यक्षपत्रांवर लक्ष केंद्रित करण्यास मदत होते. उपलब्ध असलेली संशयास्पद माहिती कितीही आकर्षक असली तरी नास्तिक वृत्तीने तिचा खरेखोटेपणा पडताळून पाहिल्याशिवाय स्वीकार न करण्याच्या धोरणास, सत्याच्या फसवेगिरीचे पूर्ण अवधान राखून उपलब्ध झालेल्या पुराव्याचे अर्थबोधन करण्यास उत्तेजन मिळते. प्रा. ना. के. बेहेरे, यांनी लिहिलेल्या 'पहिले बाजीराव पेशवे' या चरित्रापुढे वर चरित्रात्मक कादंबरीच्या संदर्भात उल्लेखिलेले बापटांचे 'पहिले बाजीरावसाहेब पेशवे' हे चरित्र, चरित्र म्हणून फिके पडते. कारण, पहिल्या चरित्रात प्रा. बेहेरेंनी उपलब्ध असलेल्या पुराव्याची कसून छाननी करून, ऐतिहासिक कागदपत्रांसारख्या अस्सल साधनांच्या आधारे घटितांची चिकित्सा करून निवेदने केली आहेत. त्यामुळे त्यांनी लिहिलेले चरित्र वस्तुनिष्ठ वठले आहे.

शास्त्रीयपद्धतीमुळे येणारी अचूकता गाठण्याच्या अतिरेकी प्रयत्नातही धोका आहे. चरित्रकार जेव्हा शास्त्रपद्धतीच्या पूर्णपणे आहारी जातो, तेव्हा 'to accumulate all is to understand all' या अवतरणातला आशय त्याच्या मनावर ठसलेला असतो ती सर्वसंग्राहक बनतो. बारीक सारीक तपशीलांसह अधिकाधिक माहिती पुरविण्याचे धोरण अवलंबितो. किंबहुना तेच त्याचे साध्य होऊन बसते. साधनालाच साध्याचे महत्त्व प्राप्त होते. घटितांचे श्रेष्ठत्व मान्य करणारा चरित्रकार घटितांचा इतका संग्रह करतो की त्यात भारूडभरताडाचीही भरती होते. आवश्यकाबरोबर खूपच अनावश्यक येते. आवश्यक–अनावश्यकाची सरमिसळ होते. चरित्रकार जणू संशोधक बनतो. विद्वत्ता खर्ची घालून घटिते हुडकून काढली जातात. त्यासाठी पदार्थविज्ञानशास्त्राला उपकारक अशा वृत्ती, संख्याशास्त्र, यंत्रे आणि विविधपद्धतींचा अवलंब केला जातो. तो इतका की त्यांना एक विशिष्ट मूल्याचा दर्जा प्राप्त व्हावा. समाजशास्त्राचे संख्याशास्त्रीय मोजमाप, प्राणिशास्त्र, मानववंशशास्त्र इत्यादी शास्त्रांच्या आधारे चरित्रात संग्रहीत केलेल्या प्रचंड तपशीलांमुळे घटितांची गुंतागुंत आणि चरित्राचा आकार, वजन, . विस्तार

वाढला नाही तरच नवल. न. वि. केळकरांनी लिहिलेल्या टिळकांच्या प्रचंड चरित्र ग्रंथात टिळक कुठे सापडतच नाहीत. याचे कारण ' To accumulate all is to understand all ' या अवतरणातील आशयासारखे केळकरांचे धोरण होते. प्रचंड साधनातून व्यक्तिमत्त्वाचा आकार निश्चित होण्याऐवजी त्या ढिगाऱ्याआड टिळकांची व्यक्तिरेखा दडली गेली.

चरित्रलेखनावर नेहमीच वाङ्मयाचा अंतर्गत आणि शास्त्राचा बाह्य ताण पडत आला आहे. हॅरॉल्ड निकलसनचे म्हणणें असे आहे, की चरित्रातली शास्त्रीय दृष्टी कलात्मक दृष्टीला मारक ठरते. जो जो चरित्र शास्त्राची शाखा म्हणून ओळखले जाईल, तो तो वाङ्मयाची शाखा म्हणून चरित्राचे जे विशिष्ट स्थान आहे ते कमी होत जाईल, अशी त्याने भीती व्यक्त केली आहे. शास्त्रीय आणि कलात्मक आस्था मुळातच भिन्न आहेत. अतिरिक्त शास्त्रीय दृष्टीमुळे घटितांच्या सर्वसंग्राहकतेवर भर दिला जाईल. शास्त्राबद्दलची आस्था जसजशी वाढीस लागेल तसतशी ती अतृप्त राहील आणि संयोजनाची शक्ती, तसेच अभिव्यक्तीचे सामर्थ्य तोकडे पडेल. शास्त्रीय चरित्र तंत्रबद्ध होऊन त्याला विशिष्ट रूप दिले जाईल. केवळ निष्णात व्यक्तींनाच आकलन होऊ शकेल अशा पद्धतीने सर्व गुंतागुंतीसह मानसशास्त्रीय विकासाचा मागोवा घेणारी चरित्रे लिहिली जातील. ती उद्बोधक ठरतील, परंतु अशा चरित्रात मूलतत्त्वशोधक (analytical) शास्त्रीय बाजूवर भर दिल्यामुळे त्याच्या रचनेची कलात्मक बाजू दुबळी होणे अटळ आहे, असे निकलसनचे मत आहे. निकलसन म्हणतो:–

' मी असे सुचवीन की चरित्रातले शास्त्रीय दृष्टीबद्दलचे अगत्य वाङ्मयीन आस्थेला प्रतिकूल असून अखेरीस मारक ठरेल. '[२२]

हॅरॉल्ड निकलसनने जेव्हा वरील प्रतिपादन केले तेव्हा मनोविश्लेषण-शास्त्राचा वाङ्मयावरचा प्रभाव जाणवू लागला होता. मनोविकलन शास्त्राच्या प्रभावाने चरित्राचे वाङ्मयीन रूप लोप पावून चरित्रे म्हणजे case histories. होण्याची दाट शक्यता त्याला दिसून आली. सुदैवाने हॅरॉल्ड निकलसनची भीती निराधार ठरली. त्याने भविष्य वर्तविल्याप्रमाणे मनुष्याचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून काही चरित्रे लिहिली गेली ही गोष्ट खरी. पण त्यांचा वाचकवर्ग मर्यादित आहेत आणि अशी चरित्रे परंपरागत चरित्रांची जागा घेऊ शकली नाहीत. या बाबतीत आन्द्रे मोर्वाचे प्रतिपादन सार्थ ठरेल. तो लिहितो, ' माणूस हा अस्थिर प्राणी आहे. जोपर्यंत मेंदू, मज्जातंतू आणि मानवी संवेदन यांत्रिकीकरणाला

22– Nicolson, Harold. ' The Development of English Biography Press, 1927, pp.154–155.

जुमानत नाहीत, तोपर्यंत चरित्र पूर्णपणे शास्त्रीय होऊ शकणार नाही.'[२३] आणि झालेही तसेच. चरित्रकारांनी शास्त्रपद्धतीच्या मर्यादा ओळखल्या आणि चरित्राचे वाङ्मयीन अंग जोपासण्याचा प्रयत्न केला. शास्त्रीय आणि कलात्मक दृष्टींचा मर्यादित अंगीकार आणि समन्वय चरित्राच्या वाढीस उपकारक ठरला.

चरित्राचे वाङ्मयीन अंग जोपासण्याची इच्छा असूनही जो जो शास्त्र-पद्धतीचे दडपण वाढत जाते, तो तो हस्तगत झालेल्या सत्यापायी चरित्रकाराचा श्वास कोंडतो आणि वाङ्मयाची भुरळ पडल्यामुळे कल्पिताचा आश्रय घेण्यास फाजील उत्तेजन मिळते. चरित्राची कादंबरी होते. चरित्रात्मक कादंबरीचे कलेचे अंग पुष्ट होते. जीवनदर्शन लक्षणीय ठरते. पण चरित्रात्मक कादंबरी साधनांचा विधिनिषेध बाळगत नाही. या उलट, सत्याची बूज राखणारे पण केवळ घटितांच्या संग्रहात धन्यता मानणारे चरित्रसाधनांचा भरपूर उपयोग करून घेते. पण अशा चरित्रातले जीवनदर्शन थिटे पडते. एका कृतीत सत्यापलाप होतो, तर दुसऱ्या कृतीत कलेचे अंग जोपासले जात नाही. ही दोन आत्यंतिक टोकं टाळून सुवर्णमध्य गाठता यावा, सत्याच्या कक्षेत राहून चरित्रातला नीरस अंश दूर करता यावा, म्हणून चरित्रातल्या शास्त्रीय दृष्टीला कलात्मक दृष्टीची जोड मिळणे आवश्यक आहे. या कामी कलेचे कोणते घटक उपयुक्त ठरतात या महत्त्वाच्या मुद्याकडेच आता वळावयाचे आहे. त्यापूर्वी कारागिरी म्हणजे नेमके काय ते पाहिले पाहिजे.

कारागिरी म्हणजे कसबी शिक्षणाने आणि सरावाने आत्मसात केलेले कसब, कारागिरीला आपल्या निर्मितीची पूर्ण कल्पना असते. तो विशिष्ट प्रकारची साधने आणि परंपरागत तंत्र वापरतो. तर कलाकार पावलागणिक उपजत प्रतिभेच्या जोरावर आपली निर्मिती करीत असतो, शेवटपर्यंत त्याला आपल्या निर्मितीची कल्पना येत नाही. कलेमधे केवळ सरावापेक्षा, यांत्रिकतेपेक्षा, बुद्धि-वैभवाला अधिक महत्त्व असते. कलात्मकतेची संजीवनी देण्याकरिता लेखकाची जी प्रतिभाजन्य अंगभूत क्षमता लागते ती कारागिरीत आवश्यक नसते.

काही टीकाकार चरित्र ही कारागिरी मानतात याचे कारण चरित्रलेख-नात व्यक्तिगत बंधनापलिकडचे कुणालाही आत्मसात करता येईल असे तंत्र वापरलेले असते. आपल्या प्रतिभेच्या जोरावर कलाकार जशी काल्पनिक प्रतिसृष्टी निर्मितो, तशी ती चरित्रात नसते. चरित्र ही नवनिर्मिती नसून व्यक्तिजीवनाची पुनर्निर्मिती असते, हे वर पाहिले आहेच. अर्थातच चरित्रात व्यक्तित्वाच्या लेखक-निर्मित प्रतिभाजन्य अर्थबोधनास महत्त्वच उरत नाही. चरित्रनायक जसा होता तसा तो चित्रित व्हावा म्हणून व्यक्तिमत्त्वाच्या वस्तुनिष्ठ अर्थबोधनाची आवश्यकता

23– Edel, Leon. 'Literary Biography', Rupert Hart Davis, 1957, P. 6.

असते. चरित्रकाराच्या पुढे ज्या कागदपत्रांचा खच पडलेला असतो, ज्या कच्च्या-मालमसाल्यातून व्यक्तिमत्त्वाचा आकार निश्चित होतो, ज्या साधनसामुग्रीच्या कक्षेत राहून त्याला आपले उद्दिष्ट साधायचे असते, त्या साधनसामुग्रीमुळेच त्याच्या सृजनशक्तीला मर्यादा पडतात. बॉसवेलसारख्या सर्वोत्तम चरित्रकाराने म्हटले आहे, ' दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या निर्मितीपेक्षा चरित्रात श्रमाला काही प्रमाणात अवसर असतो.'[२४] याचे मुख्य कारण असे आहे, की उत्तम चरित्रलेखना-करिता सुरुवातीलाच यांत्रिक स्वरूपाचे प्रचंड श्रम खर्ची पडतात. शिवाय, चरित्राची साधने खंडप्राय असली तरी कादंबरीची साधने जशी हवी तशी वाकविता येतात, तशी ती लवचिक नसतात. चरित्रातली घटिते पूर्ण किंवा स्पष्ट असतीलच असे नाही, ती ताठर असतात. चरित्रकाराला जे सत्य वाटते त्या सत्याच्या मर्यादेतच आपला कार्यभाग उरकून घ्यावा लागतो. जे सत्य चरित्रकार हस्तगत करतो ते सुंदर आकर्षक असेलच असे नाही. किंबहुना कित्येकदा ते ओबडधोबड असण्याचाच संभव जास्त. चरित्रात जे सत्य असते ते सुंदर असेलच असे नाही; आणि जे सुंदर असते ते सत्य असेलच असेही नाही. कित्येकदा सत्य आणि सौन्दर्य यांची स्पष्टपणे फारकत होते, इथेच चरित्रातल्या कलेला मर्यादा पडतात. तथापि सत्याला मनोवेधक रूप देऊन; अर्थदृष्ट्या सधन करून; सत्य व सौन्दर्य यांची फारकत कशी मिटविता येते, त्यात चरित्रलेखनातील कला कशी सामावलेली आहे, याच मुद्याकडे आपण शेवटी वळणार आहोत. तत्पूर्वी चरित्रलेखनात कलेचे कोणते घटक उपयुक्त ठरतात ते पाहू.

चरित्रनायकाविषयी माहिती उपलब्ध करून देणाऱ्या साधनांची जमवाजमव केली; तद्द्वारा चरित्रनायकाच्या जीवनाचे आकलन करून घेतले आणि घटितांची कालक्रमानुसार गुंफण करून व्यक्तिमत्त्वाचे अर्थबोधन साधले; म्हणजे चरित्रकाराचे काम संपले. चरित्र लिहायचे म्हणजे केवळ नायकाविषयी उपलब्ध असलेला पुरावा गोळा करायचा आणि अनुरूप निवेदनाद्वारे तो वाचकांच्यापुढे ठेवायचा असाच समज फार काळपर्यंत दृढ झाला. चरित्र ही केवळ कारागिरी मानली गेली. वास्त-विक मृत नायकाला फिरून जिवंत करणे, तो खरोखर जसा होता तसा दाखविणे, हे कार्य असे आहे, की त्याला कवी किंवा कादंबरीकार यांच्या ठिकाणी असलेल्या प्रतिभेची जरी आवश्यकता नसली तरी त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या इतर गुणांची मात्र जरुरी असते. हे कामच असे आहे, की इथे पुरावा गोळा करणाऱ्या गुप्त हेराचे कसब अपुरे पडते. उपलब्ध झालेला समग्र पुरावा सादर करणे म्हणजे चरित्र नव्हे. ' खरेखुरे चरित्र टिपणे, पत्रे, दैनंदिनी किंवा उत्तम तऱ्हेने कालक्रमानुसारी

24– Prof. Lee, Sidney. The English Association Pamphilet No. 41, Sep. 1918, P. 8.

वर्गीकरण करून लिहिलेल्या सामग्रींची नोंद यापेक्षा अधिक असले पाहिजे. हे पुन्हा पुन्हा सांगण्याची आवश्यकता नाही. हे सगळे योग्य आणि कुशल कलावंताच्या मनातून गेले पाहिजे आणि ते आपल्यापुढे अशा पद्धतीने ठेवता कामा नयेत, की बारीकसारीक तपशीलाच्या बाबतही आपण चरित्रकारावर विसंबून राहिलेच पाहिजे, ते आपल्याला अशा पद्धतीने सादर केले जावेत, की केवळ उपन्यास आणि तपशील यांचे गाठोडे आपल्या दृष्टीस न पडता आपण एक कसबी रचना, सफाईदार चित्र पाहू.'[२५] चरित्रातली व्यक्ती वाचकांच्या डोळ्यापुढे जिवंत उभी करायची म्हणजे चरित्रकारापाशी कारागिरीवर मात करणारी वाङ्मयीन अचूक निर्णयशक्ती आणि संयोजनाची उपजत देणगी आवश्यक ठरते. आणि म्हणूनच चरित्र ही कथा–कादंबरीतल्या कलेशी बरोबरी करणारी कला नसली तरी कलेचे काही घटक चरित्रात उपयुक्त ठरतात.

कलेची सुरुवात अभिव्यक्तीने होते पुढे पसरलेल्या साधनांतून व्यक्तिमत्त्वाचा आकार निश्चित झाला म्हणजे मग घटितांच्या गुंफणीतून व्यक्तिमत्त्व साकार होते. इथेच चरित्राचा कलेशी संबंध येतो. विविध साधनातून प्रत्ययकारी निवेदनाद्वारे नायकाचे व्यक्तिमत्त्व आकार घेते. घटिते न पाखडता केवळ सायासाने एकापुढे एक कालक्रमानुसार ठेवून त्यांची बांधणी केल्याने, मनन न झालेल्या तपशीलातून जिवंत व्यक्ती आकार घेणे कठीण असते. विविधसाधनातून एकसंध अनुभूतीचा प्रत्यय यावा म्हणून चिकाटी, अचकता आणि दीर्घोद्योग हे चरित्रकाराचे गुण अपुरे पडतात. या गुणांना व्यक्तिदर्शी घटितांची अचूक निवड करणाऱ्या निर्णयशक्तीची जोड मिळणे आवश्यक आहे. प्रा. कु. एस. एल. अय्यर लिहितात. ‘ चरित्र ही एक कला व्हावी म्हणून चरित्राला आपल्या कच्च्या साधनातून रंगदार आकृतीबंधाची पुनर्रचना करावी लागते.'[२६] न. चि केळकरांनी लिहिलेल्या ‘ टिळक चरित्राचा ' हा एक दोष आहे, की केळकर अगदी बारीकसारीक तपशिलांची नोंद करतात. उपलब्ध असलेला सगळा पुरावा सादर करतात. चरित्रनायकाच्या जीवनातील अधिकाधिक क्षण वेचण्याचा प्रयत्न करतात. परंतु ही पूर्णता गाठताना चरित्रातील कलेची बाजू दुबळी होते, हे ते विसरतात. व्यक्तिदर्शनाचे धोरण न

25– Saintsbury, George. ‘ Some Great Biographies ' MacMillan ' Magazine June 1982, PP. 97–107, reprinted in ‘ The collected Essays and Papers of George Saintsbury, (1875–1990) (1923) Vol. I, P. 433.

26– Prof. Miss. S. L. Aiyar. ‘ Biographical novel ' Thesis submitted to Bombay University, (2353) University Library, P. 77.

सांभाळता केवळ अधिकाधिक घटितांची नोंद करण्याचे धोरण अवलंबिल्यामुळे चरित्रात कलेच्या दृष्टीने एक प्रकारचा थिटेपणा येतो. चरित्रात मधून मधून रुक्षता डोकावते. वाचकांची आस्था अखेरपर्यंत टिकून राहावी; त्यांच्या मनावर उमटणारा व्यक्तिमत्वाचा ठसा ठसठशीत व्हावा; म्हणून लेखक जाणीवपूर्वक मुद्दाम तंत्राचा भाग म्हणून प्रयत्न करताना दिसत नाहीत. बारीकसारीक तपशी-लाची नोंद करावयाची, चरित्रनायकासंबंधी देता येईल तितकी अधिकाधिक माहिती द्यावयाची आणि मग त्यातून व्यक्तिदर्शन जसे घडेल तसे ते वाचकांनी घ्यावे ही जुन्या चरित्रकारांची पद्धत केळकरांनी अवलंबिलेली आहे. याचा अपरिहार्य परिणाम असा होतो, की टिळकांचे व्यक्तिमत्त्व आकार घेत नाही.

चरित्रनायकाच्या जीवनातील प्रत्येक क्षण नि क्षण वेचणे केवळ अशक्य आहे. त्यादृष्टीने पाहिले तर चरित्रात निवड ही करावीच लागते आणि अपसया ती होतही असते. घटितांची निवड अशी अजाणता कोणत्याही मार्गदर्शक तत्वांचा अवलंब न करता केवळ अंःतप्रेरणेने होते, तेव्हा चरित्रलेखन कारागिरीच्या सदरात जमा होते. पण मुद्दाम चरित्रलेखनाच्या तंत्राचा एक भाग म्हणून जेव्हा ती जाणीवपूर्वक होते, तेव्हा चरित्रात आत्मनिष्ठा येते आणि चरित्राला कलेचा स्पर्श होतो मागे ' चरित्रातले सत्य ' या प्रकरणात घटितांची निवड केल्याने रचनेची शिथिलता दूर होऊन चरित्रात सलगपणा, आटोपशीरपणा येतो आणि चरित्र बांधेसूद होते असे म्हटले ते याच दृष्टीने. व्यक्तिदर्शी घटितांची अचूक निवड करताना चरित्रकाराची निर्णय शक्ती कसाला लागते चरित्रलेखनातल्या कलेच्या दृष्टीने घटितांची निवड किती आवश्यक आहे या संदर्भात श्री.के. आर. श्रीनिवास अय्यंगार लिहितात– 'चरित्र म्हणजे घटितांचे अरण्य नव्हे, नावां–तारखांची निर्जीव क्रमवार यादी नव्हे. चरित्राने घटितांचे व तारखांचे स्पंदन पावणाऱ्या जीवनात रूपांतर करून व्यक्तिमत्त्वाची निर्मिती केली पाहिजे आणि हे चरित्र-नायकाच्या जीवनातील महत्त्वाच्या घटितांची निवड करून, सूचक समूहातून त्यांची अभिव्यक्ती करून, प्रसंगी कलेच्या व सोयीच्या हेतूने प्रकाशाच्या रंगछटा खुलवून आणि छायेच्या कमी करून, कलात्मक पद्धतीलाच करता येणे शक्य आहे.'[२७]

चरित्रनायकाशी निगडित अशा कृती आणि व्यक्तिविशेषांचे भिन्न भिन्न घटक एकत्र बांधून ठेवणारी एकात्मता (Unity of Design) चरित्रात असते. परस्परांशी प्रत्यक्ष संबंध नसलेल्या ज्या अनेक प्रसंगांतून एकच व्यक्ती वावरत असते, त्या प्रसंगांशी चरित्रनायकाचे नाते सांगणारी ही एकात्मता असते.

---

27 - Iyengar, Shrinivas K. R. ' Lytton Strachey,' Chatto and Windus, London 1939, Ch. XI, P. 157.

वास्तविक चरित्र हा एका व्यक्तीच्या जीवनाचा इतिहास आहे. ही एकच गोष्ट चरित्राला एक प्रकारची एकात्मता प्राप्त करून देण्यास पुरेशी आहे. पण चरित्रातली एकात्मता म्हणजे केवळ घटितांचा 'कालक्रमानुसार अनुक्रम नव्हे. व्यक्तित्त्वदर्शन हे चरित्राचे उद्दिष्ट असल्यामुळे, चरित्रात घटितांची मांडणी होते ती नायकाच्या व्यक्तिमत्त्वाची रूपरेखा स्पष्ट होईल अशा तऱ्हेने. आपले ईप्सित साध्य व्हावे म्हणून चरित्रकार घटितांचे नायकाच्या जीवनात जे महत्त्व असते ते जोखून ती नीट पारखून घेतो. विवक्षित घटितांच्या द्वारे चरित्रनायकाच्या जीवनविषयक आकलनात भर पडते की नाही हेही तो नीट पारखून घेतो. घटिते चरित्रनायकाच्या जीवनात जशी संघटित झालेली असतात त्याच क्रमाने त्यांची चरित्रात मांडणी व्हावी लागते. या संदर्भात लॉर्ड डेव्हीड सेसील लिहितात, 'चरित्रकार आपल्याला सत्यकथा सांगत आहे आणि त्याने सत्याला चिकटून राहिले पाहिजे. त्याला घटना आणि व्यक्ती तयार मिळालेल्या असतात. त्यांची अभिव्यक्ती त्याने त्याला शक्य आहे तितकी अचूकपणे केली पाहिजे आणि त्या व्यक्त होताना त्यांचे प्रत्यक्षातले महत्त्व आणि अनुक्रम राखण्याची त्याने काळजी घेतली पाहिजे.' [२८] सुंदर, नक्षीदार, मखमली गालिचा हळू हळू उलगडावा, बघणाऱ्यांची जिज्ञासा तृप्त व्हावी, त्यांच्या डोळ्यांचे पारणे फिटावे, तद्वत चरित्रनायकाच्या जीवनाचा चित्रपट हळू हळू उलगडून दाखविण्यात चरित्रातली कला आहे. अनेक व्यक्तींशी, अनेक घटनांशी संबंध येऊन चरित्रनायक हळूहळू वाढत जातो. घटितांच्या मांडणीतून हळूहळू होणारी चरित्रनायकाच्या मनाची, व्यक्तिमत्त्वाची वाढ सशब्द व्हावी. घटितांची मांडणी अशी कालक्रमानुसार केल्याने रचनेला एक सरळ प्रवाहित्व लाभते. चरित्रातल्या जीवन प्रवाहाचे सातत्य, अखंडपणा मनोरम वाटतो. 'स्मृतिचित्रां'चे रूप वाहत्या पाण्यासारखे आहे.– गतिमान, निर्मळ, ताजे, नित्यनूतन आणि प्रसन्न ! स्मृतिचित्रातल्या घटितांच्या कालक्रमानुसारी मांडणीचे वानगीदाखल एक उदाहरण देतो. लक्ष्मीबाईंच्या लग्नाच्या वाटाघाटी सुरू झाल्या त्यावेळचे पुढील वर्णन पाहा– 'नाशकास ह्याच सुमारास नारायण वामन टिळक नावाचा विद्यार्थी कवी व वक्ता म्हणून लोकांच्या नजरेत भरू लागला होता, नानासाहेब पेंडशांना फार वाटू लागले, की मनूचे लग्न ह्याच्याबरोबर व्हावे.' [२९]

---

28– Lord Cecil, David, 'Introduction to An Anthology of Modern Biography' Thomas Nelon and Sons Ltd. June 1939, P. XIII.

२९– टिळक लक्ष्मीबाई, 'स्मृति–चित्रे' प्रकाशक केशव भिकाजी ढवळे. श्री समर्थ सदन, गिरगाव, मुंबई ४, भाग १ ला, प्र. आ. १९३४, पृ. ९,

(भाग१ ल: पृ. ९) अशा संदर्भातून वाचकांना कालाचे भान सतत राहते. कौशल्य आहे रचनेत मोठे, हे तत्त्व इथेही विसरता कामा नये. घटितांची मांडणी कलापूर्ण झाली असे तेव्हा म्हणता येईल, की जेव्हा भोवतालच्या अनेक व्यक्तीमधून अनेक घटनांतून चरित्रनायक सतत वाचकांच्या डोळ्यापुढे उभा राहील. वाचकांना आपण चरित्रनायकाच्या जीवनाच्या परिघात वावरत आहोत, त्याच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव टाकणाऱ्या सभोवतालच्या परिस्थितीत, त्याच्या बरोबरच जीवन जगत असल्याचा प्रत्यय येईल.

चरित्रात घटितांची मांडणी कालक्रमानुसार तर व्हावीच, पण घटिताच्या द्वारे व्यक्तिविशेषांच्या विकासाचा क्रम आलेखित व्हावा. त्यामुळे वाचकांची जिज्ञासा जागविली जाते आणि चरित्रनायकाच्या जीवनाबद्दल त्यांना विलक्षण आस्था वाटते. सुटया सुटया घटितांच्या द्वारे व्यक्तिविशेषांच्या विकासाचा क्रम आलेखित करणे अशक्य होते. जीवनातल्या महत्त्वाच्या घटना पूर्वी घडलेल्या घटनांशी निगडित असतात. घटितांचे परस्पर संबंध प्रस्थापित करणारे दुवे शोधून काढणे हे चरित्रकाराचे काम आहे. कारण, त्यामुळे व्यक्तिमत्त्व जाणून घेणे अधिक सुलभ होते. व्यक्तीच्या कृतीत अथवा विचारात असे दुवे सापडतात. एका कृतीतून दुसऱ्या कृतीवर प्रकाश पडतो. दुसऱ्या कृतीतून तिसऱ्या कृतीवर प्रकाश पडतो. त्यांचे परस्पर संबंध तपासून पाहिले आणि चरित्रातून टिपले म्हणजे व्यक्तिविशेषाचे बीज, विकास आणि परिपूर्णता अशी व्यक्तिविशेषांची एक चढती कमान पाहायला मिळते. चरित्रकाराला वाचकांच्या पुढे एक सलग, सुबोध आणि सत्यनिष्ठ जीवन उभे करावयाचे असते. व्यक्तिगत कृतींचा एक सलग धागा वाचकांच्या हाती देऊन, त्या आधारे व्यक्तिमत्त्वाचे परिपूर्ण दर्शन घडवायचे असते. महत्त्वाच्या घटनेशी निगडित अशा व्यक्तिगत कृतींच्या साखळीआधारे, त्या कृतींचे हेतू, प्रगती आणि फलित यांचे दिग्दर्शन झाले म्हणजे व्यक्तिविकासाची दिशा कळते. न. र. फाटकांच्या न्यायमूर्ती रानडे या चरित्रातील पुढील तीन घटिते या दृष्टीने तपासून पाहणे अगत्याचे ठरते. या तीनही घटितांच्या द्वारे त्यांच्या न्यायवृत्तीची तीक्ष्णता कशी वाढत गेली, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ही एक विशिष्ट बाजू कशी विकसित होत गेली याची कल्पना येते.

'...एका कोजागिरीला कीर्तन्यांची मंडळी जेजुरीकडे गेली होती. त्या योगाने घरात रात्री जागून माधवरावांबरोबर खेळण्याला त्यांच्या बहिणीशिवाय कोणी सोबती राहिला नाही. बहीण लहानच, तिच्या ध्यानात कोजागिरीचे महात्म्य राहिले नाही व रोजच्या सवयीप्रमाणे ती लवकर झोपी गेली. त्या रात्रीला सोंगट्यांचा डाव खेळण्याकरिता माधवरावांना कोणीच सोबती मिळाला नाही, तेव्हा एका खांबासमोर बसून त्यांनी डाव सुरू केला. खांबालाच त्यांनी प्रतिपक्षी

मानून उजव्या हाताने त्याचे व डाव्या हाताने आपले दान टाकीत संपविला. कर्मधर्मसंयोग असा की, खांबाचे दान सरस पडून डाव बिनतोड माधवरावांच्या अंगावर आला. हा प्रकार पाहत त्यांची चुलती शेजारी उभी होती. तिने निर्जीव खांबाला विजय मिळाला हे पाहताच माधवरावांना चिडविले, पण चीड ह्या भावनेला त्यांच्या स्वभाव रचनेत थाराच नव्हता असे म्हटल्यास चालेल. माधवराव शांतपणे चुलतीला म्हणाले की, खांबाच्या हाताला चांगले दान पडले, डाव त्याने जिंकला, त्यात बिघडले काय ?[३०]

हा झाला लहानपणचा प्रसंग, हे बीज सारखे वाढत गेले आणि माधवराव न्यायाधीश झाल्यावर प्रत्यक्ष व्यवहारात त्यांची न्यायवृत्ती प्रकट झाली ती अशी. माधवराव कोल्हापुरास न्यायाधीश झाल्यावर त्यांच्या वडिलांना त्यांच्या न्यायवृत्तीची तीक्ष्णता अनुभवण्यास सापडली. कोजागिरीच्या रात्रीस खांबाबरोबर सोंगट्यांचा डाव खेळून न्यायी स्वभावानुसार स्वतःकडे निर्विकार चित्ताने बिनतोड घेणारा महादेव मोठेपणीसुद्धा वृत्तीने जसाच्या तसा कायम होता, जगाच्या व्यावहारिक रहाटीत मुरून तरबेज होण्याची कला त्याने हस्तगत करून घेतली नव्हती. आपल्या लेकाला इन्साफाच्या कामांत कोणाची खाजगी भीडमुर्वत खपत नाही. कोणी भीड घालण्याचा प्रयत्न केल्यास त्याचे पित्त उसळते, हे गोविंदरावाना ठाऊक नव्हते, असे नाही. पण बापाची भीड आणि न्यायाधिकार यात विरोध होण्याचा कधी काळी प्रसंग आलाच तर आपला माधव न्यायदानाच्या कर्तव्यापुढे प्रत्यक्ष पित्याची पर्वा ठेवणार नाही, अशी गोविंदरावांची अटकळ झालेली नव्हती, गोविंदराव सहसा मुलाच्या वाटेस जात नसत, पुष्कळदा माधवरावांकडे घरगुती वशिल्याने दाद लावून घेण्याकरिता आलेल्या इसमांची परभारे गोविंदरावांनी हकालपट्टी केली होती. परंतु एकदा त्यांना दूरच्या आप्तापैकी असे खमंग 'प्रतिष्ठित कूळ भेटले की, त्यांच्या समोर त्यांचा काही केल्या इलाज चालेना. गळी पडून या कुळाने गोविंदरावांसह माधवरावांची बसण्याची खोली गाठली. माधवरावांनी उत्थानपूर्वक मोठ्या नम्रतेने त्यांचे स्वागत केले. गोविंदरावांनी थोडक्यात त्या गृहस्थाच्या कामाचा उच्चार केला व माधवरावांनी जास्त चौकशीऐवजी मौन स्वीकारल्याचे पाहून आलेल्या कुळाने आपले आख्यान आरंभले. आता कागदपत्र जवळ नाहीत, फुरसत असल्यास आणवतो ' इतकी प्रस्तावना झाल्यावर माधवरावानी फुरसतीच्या सबबीचा फायदा घेतला व त्यास मार्गस्थ केले. नंतर गोविंदराव उठून जाऊ लागले, तेव्हा माधवरावानी तीर्थरूपांशी पुढीलप्रमाण

३०— प्रा. फाटक न. र. 'न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र' निळकंठ प्रकाशन, सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ती, जानेवारी १९६६, पृ. ७–८.

विनंती केली :– सर्व कोल्हापूर आपले आहे व जो तो येऊन आपल्या कामाबद्दल भीड घालील असा प्रकार न झाला तर बरे. नाहीतर आपल्यास त्रास होईल म्हणून मला येथून दुसरीकडे बदली करून घ्यावी लागेल. कोणत्याही पक्षकाराचे काम घरी पाहावयाचे नाही किंवा त्याचे बोलणे खाजगी रीतीने ऐकावयाचे नाही असा माझा नियम आहे. तो आपण चालवावा. (पृ. ५७–५८)

रानड्यांच्या न्यायबुद्धीची परिणती दर्शविणारे तिसरे घटित असे. '... न्यायदानापूर्वी सुनावणीस आलेल्या प्रत्येक खटल्याचे कागद, पुराव्यात दाखल झालेल्या लहानसहान चिटोऱ्यासुद्धा, ते पाहून टाकीत, दोन्ही पक्षांना आपापले जतके मंडन करावयाचे असेल तितके करू देण्याला माधवरावांची हरकत नसे. निकाल देताना अत्यंत कसोशीने देत. त्यांचे निकाल पाहून हायकोर्टातल्या मोठमोठ्या जज्जांनासुद्धा आश्चर्यात बुडून जावे लागे. सबॉर्डिनेट जज्जाच्या कनिष्ठासनावर हा गृहस्थ आज असला तरी त्याची खरी योग्यता श्रेष्ठ प्रतीची आहे, हायकोर्टातल्या उच्चतम न्यायालयावर तो विराजमान झाल्यास त्याचा गौरव होण्याऐवजी त्या आसनाचाच बहुमान केल्याप्रमाणे होईल. असे हायकोर्टातल्या युरोपिअन जज्जांना माधवरावांचे निकाल पाहून वाटत होते व एकदा तर सरन्यायाधीश सर मायकेल बेस्ट्रॉप यांनी तसे बोलून दाखविल्याची एक आख्यायिका आहे. त्यांच्या निकालात नुसते बुद्धिचापल्याचे चमत्कार नसून परिश्रमाचे आणि विद्वत्तेचे चमत्कार दृष्टीस पडत. 'रानड्यांना आपले काम उत्कृष्ट रीतीने करण्याचा अभिमान दिसतो. त्यांचे कायद्याचे ज्ञान आणि त्यातली गती इतर सगळ्या सबॉर्डिनेट जज्जांहून जास्त आहे,' (पृ. १८१) असे सर मायकेल बेस्ट्रॉप यांनी आपले मत कळविले होते.

पुढे असलेले काम आस्थेने, बारकाईने, तळमळीने व प्रामाणिकपणे करण्याच्या सवयीमुळे कोर्टात फिर्याद दाखल झाली म्हणजे फिर्यादीबरोबर दाखल झालेले सर्व कागद पाहून टाकण्याचा माधवरावांचा परिपाठ होता. हे कागद पाहत असताना खटल्याचे मुख्य मुख्य मुद्दे व त्यासंबंधीची माहिती त्यांच्या स्मरणात पक्की बसे. काही वर्षांनी फिर्यादीचे कागद कारकुनाने पाहावे, सबॉर्डिनेट जज्जांनी पाहण्याचे कारण नाही, असा सरकारांतून नियम झाला, तरी माधवरावांची कागद वाचण्याची सवय सुटली नाही. कारकुनावर भरवसा न ठेवता ते स्वत: सगळे कागद वाचीत. असे का करिता म्हणून कै. मानकरांनी एकदा विचारले, तेव्हा ते म्हणाले की, दाव्यातले कागद अगोदर पाहून ठेवलेले असले म्हणजे दावा ऐकताना त्रास पडत नाही. पण विशेष आश्चर्याची गोष्ट त्यांच्या स्मरणशक्तीची आहे. फिर्याद दाखल होताच तिच्यासंबंधी कागद वाचण्याचे काम करता येईल; पण वर्षानुवर्ष त्या कागदातली माहिती बिनचूक लक्षात राहणे कठीण आहे.

माधवरावांच्या स्मरणशक्तीचा याप्रमाणे १८७५ व ७७ या दोन वर्षांत मानकर यांना अनुभव आला त्यांच्याजवळ एखाद्या खटल्याची गोष्ट काढली की, ताबडतोब त्यातल्या अगदी बारीकसारीक किरकोळ मुद्यांची माहिती त्यांच्याकडून मिळे, असे मानकरांनी लिहिले आहे.

माधवरावांनी सबॉर्डिनेट जज्ज या नात्याने दिलेले निकाल हायकोर्टातल्या मान्यतेमुळे वज्रलेप झाले आहेत य त्यायोगाने कायद्यांच्या रचनेत राहून गेलेल्या व अन्याय घडवून आणणाऱ्या चुका दुरुस्त होऊन लोकांच्या कल्याणास हातभारच लागला आहे.' (पृ. १८१–१८२)

वस्तुतः वरील घटिते कालक्रमानुसार मांडलेली आहेत. पण व्यक्तिविशेषाच्या एका सूत्राने ती बांधलेली आहेत, त्यामुळे रानडयांच्या न्यायबुद्धीचे बीज, विकास आणि फलित या चढत्या क्रमाने आलेखन होते आणि वर म्हटल्याप्रमाणे व्यक्तिविकासाची दिशा कळते. घटिते अशी एका धाग्याने बांधली गेली, एकजीव झाली म्हणजे घटितांच्या एकात्मतेतून नायकाच्या जीवनाबद्दल विलक्षण आस्था निर्माण होतें. हेच तत्व पण थोडया वेगळया शब्दात जेम्स फील्ड स्टॅनफील्ड (James Field Stanfield) यांनी विशद केले आहे. ते असे– ' एक चित्तावस्था आणि आस्था सर्वसाधारणणे अविभाज्य आहेत, त्यांचा परस्पर ठसा निश्चित करण्याकरिता प्रमुख यत्न आणि महत्त्वाच्या घडामोडी त्यांच्या सिद्धीपर्यंत अत्यल्प व्यत्ययाने दृष्टीपुढे ठेवल्या पाहिजेत. यत्न, मनोविकास आणि कृती यांचे चित्रण शक्य तितक्या जवळून त्यांचा उदय, प्रगती आणि पूर्णतेतून चालू ठेवल्याने गोंधळ टळतो, जिज्ञासा आणि अवधान तृप्त होते आणि गुंतून राहते.'[३१]

चरित्रविषयाची निवड हा चरित्रातल्या कलेचा आणखी एक घटक म्हणता येईल. चरित्रकाराला नायकाच्या जीवनातले सौन्दर्य नेमके हेरता आले पाहिजे. चरित्रनायकाच्या जीवनातल्या वाचकांची मने आकृष्ट करण्याच्या सामर्थ्यामुळे, सौन्दर्यामुळे चरित्राला कलास्वरूप देणे सुलभ व्हावे. माधवराव पटवर्धनांचे जीवनच असे आहे, की त्यातून एक कादंबरी सजली असती त्यांच्या जीवनातील काव्यमयता, व्यापक सखोल अनुभूती आणि संघर्ष यामुळे त्यांच्या चरित्राला कलात्मक स्वरूप देणे खानोलकरांना शक्य झाले. मूळच्या जीवनाचे सौन्दर्य आणि खानोलकरांची कला यांचा अपूर्व संगम माधवरावांच्या चरित्रात घडला आहे. चरित्रविषयाच्या जीवनाची अंगभूत झळाळी काही न्यारीच असली म्हणजे चरित्र कसे चित्तवेधक होते या संदर्भात आन्द्रे मोर्वा लिहितो: ' काही जीवनांना नैसर्गिक सौन्दर्य लाभलेले असते आणि योगायोगाने म्हणा किंवा त्यांच्या अस्तित्वातील

31– Stanfield, James Field. ' Biography as an Art,' ed. James L. Cliff ord, Oxford University Press, 1962, P 64.

अंगभूत शक्तीमुळे म्हणा स्वयंसिद्ध कलाकृतीप्रमाणे त्यांची रचना होते. कधीकधी या जीवनांतून असा काही गूढ बांधेसूदपणा प्रकट होतो, की जो रगड मासाच्या आवरणाखाली आच्छादिला की मानवी कृतींना सौन्दर्य प्राप्त करून देतो.' ३२

चरित्रलेखन अथपासून इतीपर्यंत वस्तुनिष्ठ असते याचा अर्थ असा नव्हे, की चरित्रात आत्मनिष्ठा नसतेच. चरित्रनायकाची निवड, घटिताची निवड या निमित्ताने चरित्रात वस्तुनिष्ठ सत्याच्या मर्यादित का होईना पण आत्मनिष्ठा येतेच. नायकाच्या समकालीन चरित्रकाराने जेव्हा त्याला पाहिलेले असते, अनेक अंगांनी त्याची ओळख करून घेतलेली असते, तेव्हा त्याच्या मनावर ठसणारी नायकाची प्रतिमा जिवंत, ठसठशीत असते. ही प्रतिमा लेखकाच्या मनावर उमटताना त्याच्या काही मानसिक प्रतिक्रिया होतात आणि त्यामुळे नायकाच्या प्रतिमेची चरित्रात पुर्ननिमिती होत असताना त्याचे लेखन अधिक आत्मनिष्ठ असते. वस्तुनिष्ठ सत्याच्या मर्यादेत चरित्राला आत्मनिष्ठेचे वावडे नाही आणि कलेत आत्मनिष्ठा अंतर्भूत असते.

उपलब्ध असलेल्या साधनांच्या सूक्ष्म परिशीलनातून चरित्रकाराच्या मनात नायकाची एक विशिष्ट प्रतिमा आकाराला येते. ती मूळ प्रतिमा जराही धक्का न लावता मूळ स्वरूपात जशीच्या तशी वाचकाच्या मनात प्रतिक्षेपित करताना चरित्र चित्तवेधक व्हावे. अखंड चित्तवेधकता आणि वाचकांच्या मनावर उमटणारा एकूण ठसा हे कलेचे मूलभूत घटक. पण रंजनाच्या भरीस पडल्यामुळे चरित्रातले सत्य विकृत होण्याची शक्यता आहे, त्याचे काय ? असाही एक प्रश्न इथे उपस्थित होण्यासारखा आहे. या प्रश्नाचे उत्तर ए. जे. प. सायमन्स (A. J. A. Symons) यांनी पुढील शब्दात दिले आहे. ते सार्थ वाटते. ते लिहितात– 'मला तसे वाटत नाही. कलात्मक जाणिवेला स्वतःची सत्यनिष्ठा असते आणि खरा चरित्रकार आपल्या माध्यमात संतुष्ट राहून भीती न बाळगता सत्याचे बोलावणे स्वीकारील कारण त्याचे साधन ही नक्षीकामाची सुई आहे घासण्याचा ब्रश नव्हे.' ३३ म्हणजे चरित्रकाराने मूळ सत्याला बाधा न आणता चरित्रातला नीरस अंश दूर केला पाहिजे. सत्यावर रक्तामासाचा स्तर चढल्याशिवाय त्या सत्यामागचा आशय समर्थपणे प्रकट होऊ शकत नाही. रुक्ष सत्याच्या धमन्यातून चैतन्य खेळविण्याचा एकच मार्ग दिसतो आणि तो म्हणजे चरित्रातल्या सत्याला कलात्मक सत्याची जोड द्यावयाची. न्यायमूर्ती रानडयांच्या चेहऱ्याची ठेवण, एकदम मनात भरण्याजोगी नव्हती, पण एकंदर शरीरयष्टी धिप्पाड व त्यातल्या त्यात डोके फारच

32– Maurois, Andre. 'Aspects of Biography' P. 45.

33– Symons A. J. A. 'Tradition and Experiment in present day Literature' Humphrey Milford, London 1929, P. 157.

विशाल असल्याने, पाहणाऱ्याच्या वृत्ती स्तिमित झाल्याशिवाय राहत नसत, धिप्पाड शरीराला व भव्य मुखश्रीला वर्णाच्या गौरत्वाची जोड मिळाल्यामुळे. त्यांच्या दर्शनाची परिणामकारकता वाढली होती. त्यांच्या चेहऱ्याच्या मानाने नाक योग्य प्रमाणात नव्हते, असे रानड्यांचे चरित्रकार मलबारी यांनी वर्णन केल आहे. 'भालप्रदेशाच्या विस्ताराखाली त्यांचे लहानसे नाक पाहून, मस्तकाच्या रचनेत सगळे साहित्य संपल्याने, उरलेल्या थोड्याशा साहित्यावर ब्रह्मदेवाने नाकाचे काम भागवून घेतले असावे. [३४] असे मलबारी लिहून जातात आणि रुक्ष तपशीलातला नीरस अंश भस्म होतो. माधवरावांच्या चेहऱ्याच्या मानाने त्यांचे नाक योग्य प्रमाणात नव्हते हे झाले चरित्रातले सत्य. कारण, ते प्रत्यक्षाशी जुळणारे आहे 'मस्तकाच्या रचनेत सगळे साहित्य संपल्याने उरलेल्या थोड्याशा साहित्यावर ब्रह्मदेवानें नाकाचे काम भागवून घेतले असावे.' हे विधान चरित्रकाराने कल्पनेच्या आधारे केलं असून त्यातले सत्य हे कलात्मक आहे. चरित्रातल्या सत्याचे निवेदन मूळ ज्ञात घटिताच्या संदर्भात वस्तुनिष्ठ पद्धतीने केलेले असते, तर कलात्मक सत्य लेखकाच्या मानसिक प्रक्रियेचा परिपाक असतो. इथे कलात्मक सत्यामुळे चरित्रातल्या सत्याला बाधा न येता, त्यातला नीरस अंश दूर होऊन कलेचे अंग जोपासले गेले आहे. कलात्मक सत्यामुळे प्रत्यक्षातले सत्य अर्थाच्या दृष्टीने सघन झाले आहे चरित्रातले सत्य अबाधित ठेवण्यात चरित्रकाराला यश तर लाभलेच पण त्याच बरोबर चरित्राचे ललितमूल्यही वाढले. म्हणजे प्रत्यक्षातल्या सत्यामुळे वाचकांच्या ज्ञानात भर पडली, तर कलात्मक सत्यामुळे त्याना वाङ्मयानंद चाखायला मिळाला. पण याबाबतीत एक आक्षेप शिल्लक उरतो तो असा, की चरित्रात कल्पनेचा वापर कितपत योग्य आहे ? या आक्षेपाचे सरळ उत्तर असे आहे, की जोपर्यंत चरित्रातल्या सत्याला ढळ पोचत नाही तोपर्यंत वाचकांच्या मनावर सत्याचा ठसा ठसठशीत उमटावा म्हणून कल्पिताचा आश्रय घेण्यात काहीच वावगे नाही. 'जोपर्यंत काल्पनिक घटिते ऐतिहासिक पुरावा म्हणून वाचकांच्यावर लादली जात नाहीत, तोपर्यन्त कल्पनेचा उपयोग पूर्णपणे करावा अशी माझी दृढ समजूत आहे.'[३५] असेच जेम्स एल. क्लिफोर्ड यांना वाटते. चरित्रातल्या मूळ सत्याला ढळ न पोचता, कलात्मक सत्याची जोड मिळाली तर चरित्रात सौन्दर्यजन्य लालित्य अवतरते आणि चरित्र वाचनीय होते. लक्ष्मीबाई टिळकांचे स्मृतिचित्र चित्तवेधक आणि वाचनीय झाले आहे, कारण त्या चरित्रावर ललितकृतीची छाया पडली आहे.

३४– प्रा. फाटक न. र. 'न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र,' दुसरी आवृत्ती, जानेवारी १९६६, पृ. १६७.

35– Clifford James L. The New York Times Book Review, 29 Jan. 1956, Vol. LXI–No. 5. P. 2.

लेखकाने योजिलेली भाषासरणी, वर्णनाचा उठावदारपणा, विवेचनाची मनोवेधकता, कोटिक्रमाची मांडणी इत्यादी वाङ्मयविषयक गुणांमुळे चरित्रात वाङ्मयाचा परिपोष होतो. चरित्रलेखनात अभिव्यक्ती, शैली, रचना या बाबतीत नवे नवे प्रयोग करण्यास भरपूर वाव आहे. जोपर्यन्त चरित्रातल्या सत्याला धक्का पोचत नाही. चरित्रनायक जिवंत वाचकांच्या डोळ्यापुढे उभा केला जातो, तोपर्यन्त रूढ संकेताची कोंडी फोडणाऱ्या कोणत्याही नव्या प्रयोगाचे रसिक वाचक स्वागतच करतील.

चरित्राला केवळ कारागिरी म्हणावे तर चरित्राचा संबंध जीवनाशी, मानवी भावनांशी येतो. सत्याने बंदिस्त चरित्राला आत्मनिष्ठेमुळे कलेचा स्पर्श होतो, बरे निखळ कला म्हणावे तर कल्पिताच्या अभावी चरित्रातली कला कथाकादंबरीतल्या कलेशी बरोबरी करू शकत नाही, हेही तितकेच खरे. चरित्रात कारागिरी आहे, कला आहे, शास्त्रपद्धतीही आहे. चरित्रनायकासंबंधी त्याच्या व्यक्तिमत्त्वासंबंधी अधिकाधिक माहिती उपलब्ध व्हावी म्हणून जेव्हा शास्त्रांची कास धरली जाते, तेव्हा चरित्रलेखन शास्त्रशुद्ध होते. चरित्रकार जेव्हा मानवी अनुभूती शब्दांकित करण्याकरिता आपल्या भाषेचे कसब ओततो, घटितांची निवड करून सफाईदार रचना करतो, तेव्हा चरित्राचे कलेचे अंग पोसले जाते. मानवी मनाइतकीच समृद्ध, विविध आणि लवचिक mercurial साधनसामग्री हाताळण्याचे कसब अंगी बाणावे, त्यावर प्रभुत्व मिळावे म्हणून त्याला कारागिरीची आवश्यकता असतेच. शास्त्र, कला, कारागिरी यांचा योग्य समन्वय साधण्यात चरित्राचे यश सामावलेले आहे. चरित्र ही कला की कारागिरी या सुरुवातीलाच उपस्थित झालेल्या प्रश्नाचे उत्तर असे देता येईल, की चरित्र ही केवळ कारागिरी नव्हे. ती केवळ कलाही नव्हे. एका टोकाला कला आणि दुसऱ्या टोकाला कारागिरी यांच्यामध्ये कोठेतरी चरित्रलेखनाचे स्थान आहे. बापटांच्या 'पहिले बाजीराव पेशवे' या चरित्रात कलेचे आत्यंतिक टोक गाठलेले आहे तर केळकरांनी लिहिलेले 'टिळक चरित्र' कारागिरीकडे झुकलेले आहे. या दोन टोकांमधला सुवर्णमध्य-गाठणे अधिक अधिक हितावह ठरते. लक्ष्मीबाईच्या स्मृतिचित्रात आणि गं. दे. खानोलकरांनी लिहिलेल्या माधवराव पटवर्धनांच्या चरित्रात असा सुवर्णमध्य गाठलेला आहे. हेच त्या चरित्रांच्या यशाचे मर्म आहे. स्मृतिचित्रे जितके वस्तुनिष्ठ तितकेच लालित्यपूर्ण आहे. माधवरावांचे चरित्र समग्र मराठी चरित्रवाङ्मयात वेगळे दिसेल असे आहे. याचे कारण खानोलकरांनी या चरित्रात माधवरावांच्या व्यक्तिमत्त्वाला जिवंत कलात्मक स्वरूप दिले आहे आणि तरीही ते चरित्र सत्याच्या कक्षेत राहते. आंद्रे मोर्वाच्या पद्धतीने, पण त्यापद्धतीमधले दोष टाळून लिहिलेले हे चरित्र आहे. जिथे आंद्रे मोर्वा फसला, तिथे खानोलकरांनी सावधगिरी बाळगली. लेखनातल्या निसरड्या जागा त्यांनी नेमक्या हेरल्या. कल्पनेचा मोह आवरला आणि वस्तुनिष्ठा टिकवून धरली. वर म्हटल्याप्रमाणे कला आणि कारागिरी या दोन आत्यंतिक टोकामधला सुवर्णमध्य त्यांना गाठता आला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
8769 25066
शाखा (स्थळ प्रत)

# पाच

# चरित्राचा विषय

चरित्रविषयाच्या निवडीचे क्षेत्र विस्तृत आहे. चरित्रविषयाची निवड हा काहीसा चरित्रकाराच्या इच्छेचा, आवडीनिवडीचा प्रश्न आहे. समग्र चरित्र वाङ्मय विचारात घेतले, तर आजवर विविधक्षेत्रातील विविध मनोवृत्तीच्या, विविध दर्जाच्या स्त्री पुरुषांची चरित्रे लिहिलेली आढळतात. चरित्रकाराला जर राजकारणाची आवड नसेल, तर चरित्राकरिता राजकारणी पुरूषाची निवड करण्याची त्याला कुणी सक्ती करीत नाही. अध्यात्मात रस घेणाऱ्या चरित्रकाराने कुणा संताची चरित्राकरिता निवड करावी, हे अगदी स्वाभाविक आहे. अगदी सहज जरी पाचपंचवीस चरित्रे चाळली तरी चरित्रकारांनी कुणी ना कुणी या ना त्या कारणास्तव चरित्रविषयाची निवड केलेली दिसते. कुणाला नायकाचे व्यक्तिमत्व आकर्षक, आनंददायक वाटलेले असते. तर कुणाला नायकाच्या जीवनातील संघर्षाने खेचून घेतलेले दिसते. कुणा चित्रकाराला नायकाच्या जीवनात काव्यात्मकता आढळलेली असते, तर कुणाला चरित्राने कलात्मक अंग जोपासण्याइतकी नाट्यमयता त्याच्या जीवनात सापडते, प्रत्येकजण आपापल्या दृष्टीने चरित्रविषयाची निवड करीत असतो. सर्वसाधारणपणे चरित्रनायकाचे जीवन, वाचकांची मने आकृष्ट करण्याचे, त्या जीवनाचे सामर्थ्य व उपलब्ध असलेली सामग्री यांवर चरित्रविषयाची निवड अवलंबून राहते.

चरित्राकरिता निवडलेली व्यक्ती मृत असली तर प्रश्नच मिटला. पण ती हयात असली तर तिच्या हयातीत चरित्र लिहावे, की लिहू नये. लिहिल्यास त्या चरित्रात नायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन कितपत पूर्णत्वाने घडविता येईल अशी शंका चरित्रकाराच्या मनात डोकावणे शक्य आहे. चरित्रविषय व्यक्तींच्या हयातीत लिहिलेली चरित्रे आढळतात. पण अशी चरित्रे संख्येने अल्प आहेत. कारण, अशा चरित्रांना चिरकालिक मूल्य उरत नाही, ती हंगामी स्वरूपाची असतात. जिवंत मनुष्याचे चरित्र जीव धरत नाही. आत्मचरित्रात व्यक्तीच्या स्वत:च्या शब्दात तिच्या स्वभावाची, अनुभूतींची अभिव्यक्ती होते. आत्मचरित्र लेखकाच्या हयातीत प्रसिद्ध झाले काय किंवा त्याच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले काय त्याचे महत्त्व सारखेच असते. ते मनोरंजक ठरेल किंवा रटाळ होईल, त्याला काही वाङ्मयीन मूल्य प्राप्त होईल किंवा नाही, हे ते आत्मचरित्र केव्हा लिहिले गेले यावर अवलंबून

नसते. आत्मचरित्र जेव्हा 'लागले नेत्र रे पैलतिरी', तेव्हा लिहिले जाते. आत्मचरित्राला साहजिकच स्थायी मूल्य प्राप्त होते. परंतु अशी आत्मचरित्रे पुष्कळदा म्हातारपणाच्या अंधुक स्मृतींवर आधारलेली असतात व ती नकळत असत्य सांगतात.

चरित्रविषय व्यक्तीच्या हयातीत लिहिलेल्या चरित्राला स्थायीमूल्य प्राप्त होत नाही असे वर म्हटले ते अशा अर्थाने, की असे चरित्र अपूर्ण असते. ते चरित्रनायकासंबंधीचे अर्धसत्य सांगते. चरित्रनायकाच्या जीवनाला केव्हा कशी कलाटणी मिळेल हे सांगता येत नाही. काही व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाला फार उशिरा आकार येतो. त्यांच्या कर्तृत्वाला फार उशिरा वाव मिळतो, कधी कधी आयुष्याच्या उत्तरार्धात सारे जीवन उजळून टाकणाऱ्या घटना घडतात. चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्वच तेव्हा पार बदलून गेलेले असते. साहजिकच तत्पूर्वी लिहिलेल्या चरित्रातून नायकाचे सच्चे व्यक्तिमत्त्व लपते आणि जुजबी उभे राहते. कारण पूर्वीच्या चित्रणाला बदललेल्या परिस्थितीत नवे अर्थ प्राप्त होतात. बदललेल्या परिस्थितीची दखल न घेता अपरिपक्व व्यक्तिमत्त्वाचे चित्र रेखाटणाऱ्या चरित्रातून त्या व्यक्तिमत्त्वाच्या काही छटाच तेवढ्या रंगविल्या जातात. पूर्वीचे चित्रण बदललेल्या परिस्थितीत एकांगी, अपूर्ण ठरते. एकांगी चित्रण हे बहुधा गैरसमज पसरविणारे असते. ते चरित्रनायकावर अन्याय करणारे ठरते.

माणूस हळूहळू पूर्णत्वाकडे जातो. उणेपणाची बजाबाकी करीत करीत पूर्णत्वाकडे झेप घेतो. कित्येकदा माणसाच्या उणेपणातूनच त्याचे मोठेपण सिद्ध होते अपरिपक्व व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविणाऱ्या चरित्रातून बहुधा नायकाच्या उणेपणावरच भर दिला जातो. त्यामुळे त्याच्या पुढच्या विकासावर त्या चित्रणाचा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असते.

चरित्रविषयाच्या हयातीत लिहिलेले चरित्र काहीशा धाकात लिहिले जाते. चरित्र नायकाच्या डोळ्यासमोर लिहिलेले चरित्र निर्भीडपणे. निःपक्षपातीपणे किंवा पूर्णपणे लिहिणे कठीण होते. उदा : विष्णुशास्त्री चिपळूणकरांची रत्नागिरीच्या हायस्कूलात बदली झाल्यानंतरची पुढील हकीकत पाहा. त्या शाळेचे हेडमास्तर, मि. वामन आबाजी मोडक हे दररोज सकाळी फिरावयास जात असत. त्यांची वाट विष्णुशास्त्री यांचे बिऱ्हाडावरूनच असल्यामुळे ते विष्णुशास्त्री यांस हाक मारून त्यांस फिरावयास बरोबर घेऊन जात, परंतु सकाळी फिरावयास गेल्याने लिहिण्यावाचण्याचा बहुतेक वेळ निघून जाई म्हणून, व शिवाय मि. मोडक यांच्यासारख्या आपल्यापेक्षा वयाने व अधिकाराने जास्त अशा गृहस्थाबरोबर फिरावयास बरोबर जाताना वाटेने रोजच्या रोज नवीन काय बोलावे ही विष्णुशास्त्री यांस पंचाईत पडल्यामुळे ते हेडमास्तरांबरोबर जरी ते प्रेमपूर्वक बोलावीत असत तरी जाण्यास

टाळाटाळी करू लागले. ते एकदा सांगत होते की, ' हेडमास्तरांची स्वारी एके दिवशी सकाळी आमचे बिऱ्हाडाशी येऊन मला हाक मारून दरवाज्यात काशीबा गडी उभा होता. त्याजपाशी चवकशी करीत आहेत हे मी ओटीवरून आडून ऐकिले. इतक्यात काशीबा आत धावत येऊन हेडमास्तर फिरावयास येण्याबद्दल बोलावीत आहेत म्हणून सांगू लागला. मी हळूच त्यास साधारण खुणेने सुचविले की, मी बाहेर गेलो आहे म्हणून सांग. यावरून हेडमास्तर त्या दिवशी तसेच एकटे फिरावयास निघून गेले.'[1] विष्णशास्त्र्यांचे चरित्र त्यांच्या मृत्यूनंतर बारा वर्षांनी प्रसिद्ध झाले. तेच जर त्यांच्या हयातीत लिहिले गेले असते, तर वरील वर्णनातील सत्यदर्शन कितपत टिकून राहिले असते याबद्दल शंकाच आहे. किंबहुना सत्यदर्शनाचा प्रयत्न चरित्रनायकाचे दृष्टीने अनिष्ट ठरला असता. इथे नेमकी परिस्थिती अशी आहे, की चिपळूणकर आणि श्री. मोडक यांचे संबंध लक्षात घेता चरित्रकाराने आपला हात आखडता घ्यावा. चरित्रनायकाच्या अस्तित्वाचे दडपण दूर झाल्यावरच चरित्रकार सत्यान्वेषणाचे स्वातंत्र्य भोगण्यास मोकळा होतो. चरित्र-नायकाच्या हयातीत लिहिलेले चरित्र दबलेल्या मनाने लिहिल्यामुळे अलिप्तपणे लिहिता येत नाही. असे चरित्र अभिनिवेशाने डागळण्याचा धोका असतो. कित्येकदा चरित्रनायकाची वाजवीपेक्षा फाजील स्तुती किंवा निंदा होते. चरित्रविषय व्यक्तीची प्रतिमा एकतर उजळली जाते किंवा त्या प्रतिमेचे रंग पुसट होतात. समजा, त्या चरित्रात विवक्षित कालमर्यादेत नायकाचे व्यक्तिदर्शन यथातथ्य घडले तरी तेवढ्याने त्या चरित्राला स्थायी मूल्य प्राप्त होत नाही. फार तर असे चरित्र भावी चरित्रकाराला साधन म्हणून उपयुक्त ठरावे. हयात व्यक्तीची निवड करून अगोदरच सत्याने बंदिस्त चरित्रावर लेखक स्वतःहून आणखी मर्यादा घालून घेतो. स्वतःला आणि चरित्रातल्या कलेला अकारण बांधून घेतो. चरित्रविषय व्यक्तीच्या मृत्यूने चरित्रकाराच्या मनावरची तिच्या अस्तित्वाची पकड सुटल्यामुळे चरित्र निर्भीडपणे, निःपक्षपातीपणे आणि पूर्णपणे लिहिता येते, चरित्र वस्तुनिष्ठ वठते.

चरित्रनायकाच्या हयातीत लिहिलेले चरित्र तात्पुरते असते. चरित्रनायकाच्या पूर्ण व्यक्तिमत्त्वाची ओळख पटावी म्हणून त्याच्या मृत्यूपर्यंत थांबणे आवश्यक ठरते. मृत्यूने माणसाच्या जीवनावर अखेरचा पडदा पडतो. मृत्यू हीच माणसाच्या जीवनाला पूर्णत्व आणून देणारी घटना आहे आणि म्हणूनच मृत व्यक्ती हीच चरित्राचा योग्य विषय होय, असे म्हणावे लागते. English Association या संस्थेच्या अध्यक्षीय भाषणात सर सिडने ली म्हणतात, 'ज्या जीवनक्रमाच्या

१– चिपळूणकर, लक्ष्मण कृष्ण. (हेडमास्तर हायस्कूल) 'विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे चरित्र,' सत्यप्रकाश छापखाना, पुणे, इ. सः १८९४, पृ. १८०

मागोमाग चरित्र जाते, तो जीवनक्रम पूर्ण असावा हा चरित्राचा आवश्यक गुण आहे. योग्य चरित्र आपल्या परिघातून जे जीवनक्रम अपूर्ण असतात. असे जिवंत व्यक्तीचे जीवनक्रम वगळते. कारण, मृत्यू त्या जीवनक्रमावरून शेवटचा हात फिरविण्याचे काम आखडून धरतो. कोणताही माणूस मृत्यू पावल्याशिवाय चरित्राचा विषय होण्यास लायक नाही.'[२]

मृत व्यक्ती हाच चरित्राचा योग्य विषय होय. हा विचार एकदा मान्य केला की तद्नुषंगाने चरित्रविषय व्यक्तीच्या मृत्यूनंतर चरित्र ताबडतोब लिहावे, की फार काळ लोटल्यावर लिहावे असाही एक प्रश्न उद्‌भवतो. चरित्रविषयभूत व्यक्तीच्या मृत्यूनंतर ताबडतोब चरित्र लिहिले तर भरपूर साधने उपलब्ध होतात. तद्वारा विपुल माहिती उपलब्ध होते. साधनांची विपुलता हे एका परीने वरदान ठरावे. पण साधने उदंड झाली, की चरित्रकार गोंधळतो. चरित्रकाराला आवश्यक अनावश्यकाचे तारतम्य राहत नाही. घटितांची योग्य ती निवड होत नाही. चरित्रग्रंथ अकारण फुगतो. रचना शिथिल होते. कलादृष्टचा ही गोष्ट अनिष्ट होय. या संदर्भात आणखी एक अडचण भासते ती अशी, की नायकाच्या मृत्यूनंतर चरित्र ताबडतोब लिहिल्याने चरित्रात विभूतिपूजा– अभिनिवेश किंवा कौटुंबिक अभिनिवेश डोकावतो. किंबहुना असे म्हणता येईल, की सत्याला विकृत स्वरूप देणाऱ्या तत्कालीन भावना, पूर्वग्रहदूषितता यांच्या प्रभावातून चरित्रातले वातावरण दोषमुक्त झाल्यावरच चरित्रविषय व्यक्तीच्या जीवनकथेत पुढील पिढ्या खऱ्या अर्थाने रस घेऊ शकतात. चरित्रनायकाच्या जीवनाचे भागीदार म्हणा किंवा साक्षीदार म्हणा, हयात असताना चरित्रात पसरणारे पक्षपाताचे धुके वितळणे कठीण असते. चरित्रनायकाच्या मृत्यूनंतर दूरच्या काळात त्या भावनांचा आवेग कमी होतो. चरित्रावर पडणारा त्यांचा प्रभाव क्षीण होतो. चरित्रनायकाचे जीवन-दर्शन निःपक्षपातीपणे, यथातथ्य घडविणे शक्य होते. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांची याबाबतीत आपले मत नोंदले आहे. ते असे ' कोणत्याही प्रसिद्ध व्यक्तीचे चरित्र त्याच्या हयातीत किंवा मरणानंतर लौकर प्रसिद्ध झालेले बरे. कारण, तसे झाल्यास चरित्रकारास भरपूर माहिती मिळण्याचा बराच संभव असतो. पण माहिती मिळण्याचा जितका संभव, तितकाच ती प्रसिद्ध करण्यास चरित्रकारास संकोच वाटत असतो. याचे कारण त्यास नायकाच्या चरित्राबरोबर समकालीनांची चरित्रेही द्यावी लागतात; व ती पुष्कळदा सदोष असल्यामुळें त्या संबंधाने त्यांचा रोष होत असतो. खुद्द चरित्रकाराचे (येथे कोल्हटकरांना चरित्रनायक अभिप्रेत असावा.) दोष दाखविण्यासही त्याच्या आप्तांचा राग ओढवून घ्यावा लागतो. विष्णूशास्त्र्यांच्या.

2– Sir Lee Sidney. 'The perspective of Biography,' The English Association Pamphlet No. 41, September 1918, P. 19

चरित्रकारास त्यांच्या समकालीनांच्या चरित्रातील सदोष भाग दाखविताना त्यांची क्षमा मागावी लागली आहे. म्हणजे एका हाताने तोंडात मारून दुसऱ्याने पाठ थोपटावी लागली आहे.'[3]

चरित्र नायकाच्या मृत्यूनंतर नजीकच्या काळात लिहिलेले चरित्र आणि दूरच्या काळात लिहिलेले चरित्र यात मूलत: फरक आहे. चरित्र विषय व्यक्तीच्या मृत्यूनंतर फार काळ लोटल्यानंतर चरित्र लिहिले तर साधनांची वाण पडते. तोपर्यंत उपलब्ध असलेली साधने नष्ट होतात. चरित्रनायकाशी संबंधित व्यक्तींच्या चरित्रनायकाविषयीच्या स्मृती पुसट होतात. अपुऱ्या साधनांपायी चरित्रकाराची पदोपदी अडवणूक होते चरित्रकाराला तर कल्पनेने मोकळ्या जागा भरून काढता येत नाहीत चरित्रकार केवळ कागदोपत्री पुराव्यावर अवलंबून असतो. पण केवळ कागदोपत्री पुरावा जीवनदर्शनाच्या कामी तोकडा पडतो. प्रा. ना. के. बेहेरेंनी लिहिलेल्या 'पहिले बाजीराव पेशवे' या चरित्रात बाजीराव आणि मस्तानी यांचे संबंध, बाजीरावाचे खाजगी जीवन उपेक्षित राहिले आहे. कारण, बेहेरेंना केवळ ऐतिहासिक कागद पत्रांवर अवलंबूनरहावे लागले आहे. दूरच्या काळात लिहिलेल्या चरित्रात जीवनदर्शक तपशिलाच्या अभावी जीवनाशिवाय अन्य तपशीलाने फार जागा अडविलेली असते. ते स्वभाविक असले तरी कलादृष्टया अनिष्ट होय. नजीकच्या काळात लिहिलेल्या चरित्रात अन्य तपशिलापेक्षा जीवनानें अधिक जागा व्यापलेली असते. इथे अन्य तपशील येतो. पण जीवनदर्शनाच्या तनुषंगाने अपरिहार्यपणें येतो तेवढाच. ते चित्रण जिवंत, जोमदार आणि प्रत्ययोत्पादक होते. चरित्र विषयभूत व्यक्तीच्या जीवनाचा तपशील यावेळी अगदी ताजा आणि जिव्हाळ्याचा असतो, त्यात एक तऱ्हेची जिवंतपणाची चमक असते. तो तपशील असा ताजा असे तोपर्यत चरित्रलेखन उरकून घेणे योग्य. नाहीतर फारकाळपर्यंत म्हणजे आस्था आणि मत्सर संपुष्टात येईपर्यंत थांबल्याने चरित्रकार बराचसा तपशील हरवून बसतो आणि मग त्याला उरलेल्या सामग्रीत आपले काम भागवून घ्यावे लागते. चरित्रलेखनाला 'शुभस्य शीघ्रम्' हेच धोरण उपकारक ठरते. चरित्रनायकाच्या जीवनाची कहाणी, त्याच्यासंबंधीच्या स्मृती क्षीण होण्यापूर्वीच पूर्णत्वाने, विविधरंगाने आणि परिणामकारकरीत्या सांगता येते, चरित्रनायकाला त्याच्या पिढीत जे महत्त्व असते ते पुढच्या पिढीत कमी होते. फार काळ थांबल्याने चरित्रनायकाचे ऐतिहासिक महत्त्व नीट जोखले जाईलच असे नाही. इतिहास

३— संपादक— खांडेकर, वि. स., माडखोलकर, ग. त्र्यं., माडखोलकर, गं. दे. 'कोल्हटकरांचा लेखसंग्रह' प्रकाशक— गं. दे. खानोलकर, गिरगांव, मुंबई नं. ४, १९३२, पृ. २५०, 'विविधज्ञानविस्तार,' पु. ३६, अंक ८, सन १९०५.

कागदोपत्री पुराव्यावरून लिहिता येतो. परंतु चरित्रे व्यक्तिगत माहितीवरूनच लिहिता येतात. व्यक्तिगत माहितीमुळे चरित्रात जिवंतपणा येतो. चरित्रांना पूर्णत्व लाभते. व्यक्तिगत माहिती हळूहळू कमी होत जाते आणि कालांतराने नष्ट होते. चरित्रनायकाच्या मनाचे नाजूक आकारविशेष, व्यक्तिगुणांचे तारतम्य आणि वागणुकीची वैशिष्ट्ये एकतर स्मृतींतून निसटून जातात किंवा त्यांना विकृत स्वरूप प्राप्त होते. ' Public memory is very short ' (लोकांच्या लक्षात फार दिवस गोष्टी राहत नाहीत) हे सुप्रसिद्ध अवतरण या संदर्भात सहजच स्मरते. म्हणजे होते असे, की जे ठाऊक असते ते ताबडतोब सांगता येत नाही आणि जेव्हा सांगता येण्यासारखे असते तेव्हा ते ठाऊक नसते.

चरित्रनायकाचा मृत्यू आणि चरित्राचे प्रत्यक्ष लेखन यांमध्ये किती कालावधी असावा हे निश्चित सांगता येणे कठीण आहे. चरित्रनायकाच्या जीवनाचे सारे तपशील प्रत्यक्ष स्पंदन पावत आहेत, त्याच्या जीवनाचे ठोके ऐकू येत आहेत, असा प्रत्यय पदोपदी यावा म्हणून चरित्राचे लेखन नायकाच्या मृत्यूनंतर शक्य तितक्या लवकर व्हावे. मात्र चरित्रकाराने घटितांची योग्य निवड करण्याची, अलिप्तता राखून अभिनिवेश टाळण्याची दक्षता घेणे आवश्यक आहे, त्यात चरित्र-काराला जर नायकाचा प्रत्यक्ष सहवास लाभला, त्याच्या जीवनाचा बारीकसारीक तपशिल त्याने मनाने टिपून घेतलेला असला, मग तर सोन्याहून पिवळे.

चरित्रनायक प्रत्यक्ष जीवन जगत असल्याचा प्रत्यय यावा म्हणन त्याच्या खाजगी जीवनातला बारीकसारीक तपशील वेचून, चरित्रनायक व त्याच्या भोवतालचा परिसर वाचकांच्या मनःचक्षूंपुढे जिवंत उभा करावा लागतो. शिवाय केव्हा केव्हा चरित्रनायक परिस्थितीचा पुत्र आहे, हे सिद्ध करण्यासाठीही अशा तपशीलाचा उपयोग होतो. चरित्रविषय व्यक्तीचा प्रत्यक्ष सहवास लाभल्याने, त्याच्या जीवनाचे सारे तपशील चरित्रकार आपल्या मनात साठवून ठेवतो. माणसाच्या चेहरेपट्टीपेक्षा त्याच्या उच्चारावरून, स्वरभेदावरून त्याचे व्यक्तिमत्त्व समर्थपणे जाणून घेता येते. प्रत्यक्ष सहवासामुळे चरित्रकाराला चरित्रनायकाचे त्याच्या उत्कर्षापकर्षाच्या काळात, आनंदाच्या क्षणी, दुःखातिशयात, कार्यमग्नतेत, सुस्तावलेल्या, रोगाने पछाडलेल्या अवस्थेत, लौकिक जीवनातच नव्हे तर खाजगी बैठकीतही, मनोदर्शन घडविणाऱ्या, व्यक्तिमत्त्व प्रकट करणाऱ्या विविध अवस्थांतून सूक्ष्म अवलोकन करता येते.

समकालीन चरित्रकाराला चरित्रनायकाशी संबंधित, त्याचे जीवन प्रभावित करणाऱ्या व्यक्तींशी व्यक्तिशः ओळख करून घेता येते. त्यांच्या संबंधाचे मूल्यमापन करता येते. ज्याचे चरित्र लिहावयाचे, त्या हाडामासाच्या व्यक्तीला त्याने याच देही, याच डोळा पाहिलेले असते. त्याची जिवंत प्रतिमा चरित्रकाराच्या

मन:पटावर कोरलेली असते त्याने त्याचा आवाज ऐकलेला असतो, त्याची बोलण्या-चालण्याची लकब निरखलेली असते, त्याचे बोल चरित्रकाराच्या कानात घुमत राहतात. हावभाव मनावर ठसतात उपलब्ध झालेला तपशील इतका सूक्ष्म आणि विपुल असतो, की दूरच्या काळातल्या चरित्रकाराच्या कानात घुमत राहतात. हावभाव मनावर ठसतात. उपलब्ध झालेला तपशील इतका सूक्ष्म आणि विपुल असतो, की दूरच्या काळातल्या चरित्रकाराला त्याचा हेवा वाटावा. आजच्या शास्त्रीय युगात इतका सूक्ष्म तपशील ध्वनिमुद्रणाच्या किंवा चलत्‌चित्रपटांच्याही द्वारे उपलब्ध होऊ शकणार नाही.

दूरच्या काळातला म्हणजेच पुढच्या पिढीतला चरित्रकार या बाबतीत परावलंबी असतो. ज्याचे त्याने कधी तोंड पाहिले नाही, त्याचे तो चरित्र लिहायला बसतो. थडग्यातल्या शांततेत त्याला फक्त कागदपत्रांची सळसळ ऐकू येते. कागदपत्रांच्या सूक्ष्म अभ्यासामुळे त्याचे लेखन वस्तुनिष्ठ झाले, तरी नायकाच्या जिवंत प्रतिमेला तो आचवतो. चरित्रविषयभूत व्यक्तीकडे स्वत:च्या डोळ्यांनी त्याला पाहता येत नाही इतरांच्या डोळ्यांनी तो पाहतो, अर्थातच पाहणाऱ्यांच्या चष्म्याचा रंग जसा असेल तशी ती प्रतिमा त्यांना दिसणार. या बहुरंगी प्रतिमांतून त्याच्या दृष्टीने खरीखुरी प्रतिमा शोधावयाची असते. जे पहिल्या प्रकारच्या प्रकारच्या लेखकाला तयार उपलब्ध झालेले असते. तेच प्राप्त करून घेण्याकरिता दुसऱ्याला कागदांशी झटापट करावी लागते.

चरित्रकाराच्या काळातून नायकाच्या काळात डोकावून पाहिले म्हणजे तत्कालीन चालीरीती, पेहराव, पदार्थ, दळणवळणाची साधने इत्यादींची नीटशी कल्पना येत नाही. तत्कालीन भाषेचीही नीटशी कल्पना येत नाही. चरित्रनायकाच्या काळातील भाषेच्या लकबी व तिचे रूप चरित्रकाराच्या काळात पार बदलले असते. चरित्राला वास्तवरूप लाभावे म्हणून हा तपशील अत्यंत आवश्यक असतो. नायकाच्या पुढच्या पिढीतील चरित्रकाराला पुढे पसरलेल्या साधनसामग्रीशी झटापट करूनही हा तपशील नीट हस्तगत करता येत नाही.

चरित्रविषय व्यक्तीशी समकालीन, तिचा प्रत्यक्ष सहवास लाभलेला चरित्रकार याबाबतीत भाग्यवान ठरतो. तो लिहायला बसतो, तो नायकाच्या जिवंत प्रतिमेसह, उपलब्ध झालेल्या कागदपत्रांमुळे त्याच्या स्मृती चाळवल्या जातात. स्मृतींच्या प्रकाशात प्रतिमा अधिक उजळ होते एवढेच. या संदर्भात बॉसवेलने म्हटले आहे, ' मला असे वाटते, की चित्रात आणता येईल अशी माझी चरित्राची योजना उत्तम आहे. कारण माझ्या वाचकांना वृद्धी पावणाऱ्या जॉनसनचा शक्य तितका जवळून सहवास लाभेल आणि जणू काय प्रत्येक प्रसंग

जसा घडला तसा पाहता येईल.'[४] बॉस्वेल अशी योजना आखू शकला आणि ती तडीस नेऊ शकला. याचे कारण त्याला लाभलेले डॉ. जॉनसनचे दीर्घकाल साहचर्य होय. चरित्रकाराला लाभणाऱ्या नायकाच्या सहवासाच्या संदर्भात जॉन गॅरेटी यांनी लिहिले आहे. ' निकट परिचयातून प्राप्त झालेले ज्ञान हा अमूल्य ठेवा आहे.'[५] ज्या चरित्रकाराला हा अमूल्य ठेवा लाभला, तो प्रत्यक्षातले सुंदर दृश्य हुबेहूब कागदावर टिपणाऱ्या, समोर बसलेल्या व्यक्तीचे जसेच्या तसे चित्र काढणाऱ्या कुशल चित्रकाराप्रमाणे तपशिलाचे गडदफिके रंग भरून चरित्रनायकाचे समकालीन जिव्हाळ्याने समृद्ध अशा लक्षावधी घटकांच्या संदर्भासहित आणि पार्श्वभूमीसहित सुरेख चित्र चितारतो, अगदी graphic तितकेच जिवंत आणि ठळक. ते चित्रण नायकाच्या प्रत्यक्ष सहवासातून केलेले, आणि म्हणूनच प्रत्ययकारी होते. दैनंदिन अनुभवातून ते स्फुरलेले असल्यामुळे, ते प्रत्यक्षपणे मनावर ठसते.

चरित्रकाराचे नायकाशी रक्ताचे नाते असते, तेव्हा तर कादंबरीत भरावा इतका सूक्ष्म जीवनदर्शी तपशील उपलब्ध होतो. जीवनदर्शनाच्या बाबतीत असे चरित्र कादंबरीशी बरोबरी करू पाहते. कादंबरीकाराला हा तपशील कल्पनेनें भरून काढावा लागतो. निकटच्या सहवासामुळे चरित्रकाराला तो कल्पिताचा आधार न घेता उपलब्ध होतो. चरित्रविषयभूत व्यक्तीशी चरित्रलेखकाचे किंवा लेखिकेचे पती किंवा पत्नीचे नाते असते. त्या जीवनप्रवाहाचा तो किंवा ती एक घटक असते, तेव्हा चरित्रात त्यांचे भावजीवन डोकावते. वैयक्तिक जीवनातील सुखदुःखे अगदी खाजगी जीवनातील प्रसंगांच्या वर्णनांनी चरित्र रम्य होते, चित्तवेधक होते, त्यात रस निर्माण होतो. भावनांचा सर्व तपशील, भोवतालच्या परिसराचे वर्णन यांनीच काव्य निर्माण होते. न. र. फाटकांनी लिहिलेल्या न्यायमूर्ती रानड्यांच्या चरित्रापेक्षा रमाबाई रानड्यांनी आपल्या आठवणीतून सांगितलेली त्यांच्या जीवनाची कहाणी अधिक सरस आणि लक्षवेधी झाली आहे. याचे कारण त्या आठवणी खाजगी जीवनातील तपशीलांनी ठासून भरलेल्या आहेत, हेच होय, रमाबाईंचे माधवरावांशी लग्न झाल्यावर त्यांचे वडील घरी गेले त्या दिवशीचा, लग्नानंतरच्या प्रथम भेटीतला पुढील प्रसंग पाहा. त्या लिहितात, ' ते गेले त्या दिवशी संध्याकाळीं सुमारे ६॥ वाजता कोर्टातून घरी आल्यावर मला गच्चीवर बोलावून नेऊन विचारले, गेलें का तुझे वडील ? मी होय, म्हणून सांगितले. पुनः विचारले.' तुझे माझ्याशी लग्न करून दिले आहे. पण मी कोण, माझे नाव काय

4– Kendall, Paul Murray. 'The Art of Biography,' George Allen and Unwin Ltd., London, 1965, P. 15.

5– Garraty John. A. 'The Natnre of Biography,' Jonathan Cape, London, 1958, P. 133.

वगैरे तुला माहिती आहे काय ?' 'मी होय' म्हणून मानेने सांगितले. 'मग सांग पाहू, माझे नाव काय ते ?' अशी आज्ञा होताच मी सर्व नाव जसे लोक म्हणून होते तसेच सांगितले. (लाजेचा भाग जसा समजावा तितका समजत नव्हता. काही का असेना.) पण ते ऐकून एक प्रकारचे समाधान झाल्यासारखे दिसले, असे मला पक्के आठवते. नंतर माझ्या माहेरची सर्व हकीकत विचारिली, व मीही ती मला माहीत होती तशी सर्व सांगितली. लिहिण्यावाचण्याची चौकशी केली, पण मला काही येत नव्हते. म्हणून त्याच रात्री एक पाटी व पेन्सील आणवून श्री गणेशाचा पहिला सात अक्षरी धडा घालून दिला. हा वेळपर्यन्त मला पाटीची अगर अक्षरांची ओळख नसल्यामुळे तेवढी सात अक्षरे न पहाता काढण्यास व ओळखण्यास जवळ जवळ दोन तास लागले, तेव्हा ती कोठे पक्की झाली...' प्रसंग अगदी लहानसाच. पण अशा वर्णनांनीच चरित्रात काव्य निर्माण होते. निकटच्या सहवासामुळे चरित्रकाराला, चरित्र विषय व्यक्तींच्या खाजगी जीवनातील किती सूक्ष्म तपशील उपलब्ध होतो, याची साक्ष देणारे त्याच चरित्रातील पुढील वर्णन पहा—

'जून सन १८९५ त आम्ही महाबळेश्वराहून वाठारास येत असता वाईच्या पुढे व वाठाराच्या अलिकडे एक रडतोंडीचा घाट लागतो त्या घाटाजवळ आम्ही आलो. पूर्वी स्वारीत फिरत असताना स्वतःची चाल अशी असे, की रोज बारा कोसांच्यावर बैलांना किंवा घोडयांना जास्त मजल द्यावयाची नाही व वाटेत घाट लागला तर घाट संपेपर्यंत स्वतः पायी चालावयाचे, गाडीत बसावयाचे नाही व घोडयांना हळूहळू पाउंडावर चालवीत आण, अशी कोचमनला निक्षून ताकीद असे. या वहिवाटीला अनुसरून भाडयाची गाडी होती तरी घाट जवळ येताच स्वतः खाली उतरून चालण्यास आरंभ केला. चि. सखु व नानू दोन्ही मुले सात व दोन अडीच वर्षाच्या वयाची होती. या दोघाना गाडीत ठेवून व शिपायाला त्यांच्याजवळ बसवून गाडी जपून घेऊन ये असे कोचमनला बजावून मी बरोबर चालण्याकरिता खाली उतरले; पण आम्ही तुझ्याबरोबर चालतो असे दोन्ही मुले म्हणू लागली व खाली उतरण्याची गडबड करू लागली. त्यांची कशी तरी समजूत घालून मी पुढे चालू लागण्याच्या पूर्वी दहा मिनिटे सहज निघून गेली. स्वतः तर गाडीतून उतरल्याबरोबर चालू लागण्यास आरंभ केल्यामुळे इतक्या अवधीत नजर पोहोचत नव्हती इतके लांब जाणे झाले होते; म्हणून लवकर जाऊन गाठण्याकरिता मी होईल तितक्या जलदीने चालत होते व रस्त्यावर मनुष्य नसेल तेव्हा मधूनमधून थोडीशी धावतही असे. इतकी घाई करण्याचे कारण, संध्याकाळची वेळ, आधीच स्वतःला दूरचे कमी न्याहाळते, बरोबर कोणी मनुष्य नाही, अशात समोरून एखादी गाडी आली तर कदाचित् गाडीचा धक्का स्वतःला लागेल, या भीतीने माझी एवढी सर्व घाई चालली होती.

जवळ येऊन ठेपल्यावर जरा स्वस्थपणाने चालणे होऊ लागले. जात्याच स्वतःची उंची जास्त असल्यामुळे सहज पाऊल लांब पडे व ठेंगण्या माणसाने आपल्याकडून बरोबर चालण्याची कितीही घाई केली तरी निभाव लागत नसे. त्यामुळे दोघात थोडेसे तरी अंतर पडे. या नेहमीच्या अनुभवाप्रमाणे आताही आम्हा दोघात सहजी दहाबारा पावलांचे अंतर पडले. एरव्ही मी जवळ आलेली पाहून रोजच्याप्रमाणे उभे राहून माझ्याकरिता हळूहळू चालण्यास आरंभ झाला असता; पण आजची वृत्ती वेगळी होती. संध्याकाळची वेळ, सूर्य नुकताच मावळल्यामुळे संधिप्रकाश पडला होता व उंच घाटावरून खालच्या सभोवतालच्या चित्रविचित्र देखाव्याकडे स्वतःची दृष्टी लागून राहीली होती. अशा गंभीर वेळी 'ऐसें भाग्य कई लाहता होईन। अवघें देखें जन ब्रह्मरूप' हा अभंग अगदी तल्लीनतेने घोळून घोळून म्हणणे चालले होते, यामुळे मी जवळ आले हे स्वतःच्या लक्षात आले नाही. अशा रीतीने, आम्ही थोड्या अंतराने चालत असता घाटाच्या माथ्यावर आलो. तेथे एका पुलाच्या जवळच दोन मोठ्या इंगळ्या सुमारे चार साडेचार इंच लांबीच्या व एक दीड इंच रुंदीच्या असाव्या, त्यांनी आपल्या नांग्या पाठीकडे वळविल्या असून त्या करंगळीएवढ्या जाड होत्या. त्यांचा रंग काळसर गुळाच्या पक्क्या पाकासारखा होता. त्या दोन्ही इंगळ्या स्वैरपणाने एकमेकींच्या मागे चालल्या होत्या.

स्वतःच्या पावलाकडे माझी सहजी नजर लागलेली असल्यामुळे त्या माझ्या दृष्टीस पडल्या. त्या बरोबर दुसरे किंवा तिसरे पाऊल त्याच्यावर पडेल अशी भीती वाटून मी अतिशय घाबरले व कदाचित् मोठ्याने ओरडले असते. पण काय झाले कोण जाणे इंगळ्यांवर पाऊल पडण्यापूर्वी आपण जाऊन गाठावे व हाताने पलीकडे करावे, अशा हेतूने मी जोराने धावत सुटले; पण तेथपर्यंत जाऊन पोहोचण्याच्या आधीच स्वतःचे जाणे त्या इंगळ्या ओलांडून दोनतीन पावले, पुढे झाले होते.

हा सर्व मजकूर लिहिण्यास पाचदहा मिनिटे लागली, पण ही गोष्ट प्रत्यक्ष घडण्यास दहापाच सेकंदही वेळ लागला नाही. धावत असतांना वाटेत इंगळ्या आहेत, पाय पडेल, असे हाक मारून किंवा मोठ्याने ओरडून मला सांगता येईना, इकडे तर, आता इंगळ्यांवर पाय पडणार असे मनात येऊन माझा जीव आतल्या आत गोळा होऊन अगदी कासावीस झाला. निमिषार्ध माझे डोळे आपोआप मिटले. पण लागलीच डोळे उघडून पहाते तो इंगळ्या ओलांडून पुढे गेलेले पाऊल पहिल्यासारखेच जोराने पडत आहे हे पाहून मला अत्यानंद झाला व एवढे मोठे अरिष्ट टळल्याबद्दल मी देवाचे उपकार मानीले. हे सर्व किती वेळात घडले, हे सांगता येणे कठीण आहे. मी जवळ जाऊन घाबरेपणाने विचारले, 'पायाला काही टोचले नाही ना ?'

हे माझे विचारणे जरा चमत्कारिक वाटले व लागलीच थांबून माझ्याकडे पाहून म्हटले, ' काय, काय विचारतेस; काय झाले आहे; इतका दम कशाने लागला, गाडी कोठे आहे,' वगैरे एकामागन एक प्रश्न भराभर विचारले...'[६]

दूरच्या संबंधातून चरित्र लिहिणाऱ्या, केवळ कागदपत्रांवर विसंबून राहणाऱ्या चरित्रकाराला इतका सूक्ष्म तपशील कसा उपलब्ध व्हावा ? सूक्ष्म जीवनदर्शक तपशील, भावजीवनाचे चित्रण, भोवतालच्या परिसराचे वर्णन आणि काव्य यांमुळे चरित्राला कथामूल्य लाभते, एकसंध ' कहाणी 'चा घाट येतो. त्यातील कथेचा ओघ कादंबरीप्रमाणे अखंड वाहत असतो. त्या प्रवाहात सापडलेला वाचकही प्रवाहाबरोबर पुढे पुढे खेचला जातो. कोणत्याही स्वभावसुंदर साहित्यकृतीमधे सापडावे इतके रंजकत्व अशा चरित्रात आढळते. ' आमच्या आयुष्यातील काही आठवणी ' आणि ' स्मृतिचित्रे ' ही पुस्तके वाचायला हातात घेतली, की खाली ठेववतच नाहीत.

जवळच्या नातेवाईकाने आपल्या एखाद्या पूर्वजाचे किंवा समकालीन निकटच्या आप्ताचे चरित्र लिहायचे ही मूळातच अवघड जबाबदारी आहे. नाते विसरून व शक्य तेवढी तिऱ्हाइताची भूमिका स्वीकारून चरित्र लिहायचे आणि पुन्हा ' सत्यासत्याशी मन केले ग्वाही ' हा न्याय अमलात आणायचा हे काम असावे तितके सोपे नाही. रक्ताच्या नात्यामुळे चरित्र बहुधा व्यक्तिपूजा–अभिनिवेशाने किंवा कौटुंबिक अभिनिवेशाने डागळते. चरित्रकाराला अभिनिवेश टाळता आला नायकाच्या सहवासाचा लेखनाच्या दृष्टीने अधिकाधिक फायदा उठविता आला तर ' स्मृतिचित्रां 'सारखी सहज सुंदर कृती निर्माण होते. एडमंड गॉसने म्हटले, आहे, ' विधवा हा चरित्राच्या सर्व रोगात अत्यत वाईट रोग आहे. विधवा म्हणजे अयोग्यतेचा विजय... ती डोळ्याच्या पापणीचे दांभिक लवणे व भालप्रदेशावर फेकलेला झगझगीत प्रकाश यांच्या साह्याने आपल्या पतीचे गुबगुबीत, गुळगुळीत चित्र रेखाटते. '[७] पण लक्ष्मीबाई टिळक या विधानाला अपवाद ठरल्या. आपल्या पतीचे आणि आपले स्वतःचे व्यक्तिचित्र आणि जीवनचित्र रंगविताना आत्मगौरव किंवा आत्मसंकोच होण्याची जी भीती, धास्ती किंवा शक्यता असते त्यातून लक्ष्मीबाई सहज सुटल्या आहेत. स्मृतिचित्रात अर्थपूर्ण अनुभवांची, अनुभवच्छटांची लहान मोठी रम्य चित्रे आहेत; ती एका व्यक्तीने आपल्या नजरेने टिपली आहेत; निवडून घेतली आहेत. लक्ष्मीबाई आयुष्यातील एकेक अनुभव सांगताना त्यातील

६– रानडे, रमाबाई, ' आमच्या आयुष्यातील काही आठवणी ', पुणे सेवासदन सोसायटीतर्फे प्रकाशित, पाचवी आवृत्ती, १९२८, पृ. २८.

7– Garraty John. A. ' The Nature of Biography,' Jonathan Cape, London, 1958, P. 134.

' रस ' नेमका निर्माण करतात. खाजगी जीवनातला सगळा तपशील इथे सजीव झाला आहे. सत्यदर्शन–यथातथ्य चित्रण हा त्यांच्या दृष्टीने पाहता ' स्मृतिचित्रे ' ही एक स्वभावसुंदर साहित्यकृती ठरावी.

चरित्रकाराला लाभणाऱ्या नायकाच्या प्रत्यक्ष सहवासाचे महत्त्व चरित्र कारांनी विद्वानांनी मान्य केले आहे. विष्णुशास्त्र्यांचे चरित्रकार ल. कृ. चिपळूणकर आणि लिहितात , ' चरित्र जे लिहिणे ते चरित्रनायकाबद्दल पत्रांनी माहिती लिहून आणून किंवा ती तोंडाने ऐकून लिहिता येणार नाही, चरित्र लिहिणारांचा चरित्रनायकाशी स्वतः पुष्कळ दिवस परिचय असला पाहिजे, त्याच विषयांची सर्व हकीगत त्यानें स्वतः डोळयांनी पाहिली असली पाहिजे, त्याचा स्वभाव, त्याची चालचालणूक, त्याचे लोकोत्तर गुण, त्याचे ठळक ठळक अवगुण. वगैरे सर्व लहानमोठया गोष्टी चरित्रकाराने स्वतः पाहिल्या असल्याशिवाय व त्याचे एकंदर कृतीबद्दल त्याचे ठिकाणी योग्य पूज्यभाव असल्याशिवाय त्यास ते चरित्र चांगले लिहिता येणार नाही... '[८] डॉ. जॉनसनलाही चरित्रकाराला लाभणाऱ्या नायकाच्या प्रत्यक्ष सहवासाचे चरित्रलेखनातले महत्त्व पटले होते. जॉनसनचे म्हणणे असे, की चरित्रकाराचा चरित्र नायकाशी स्वतःपूर्ण परिचय किंबहुना सख्य व निकट सहवास असल्यावाचून त्याचे हातून चरित्रलेखनाचे काम धडपणे व्हायचे नाही. सुदैवाने त्याला, पाहिजे होता तसाच चरित्रकार मिळाला.

डॉ. जॉनसन आणि बॉसवेल म्हणजे रामदास कल्याणाचीच जोडी. बॉसवेलची डॉ. जॉनसनशी ओळख थोडी थोडकी नव्हे, त्याच्या आयुष्याच्या पंच्याहत्तर वर्षापैकी चांगली एकवीस वर्षे होती. त्याच्या वयाच्या या एक तृतीयांश जीवनापैकी दोनशे शहात्तर दिवस तो त्याच्या प्रत्यक्ष सहवासात होता. इतक्या प्रदीर्घ साहचर्यात बॉसवेल स्वस्थ बसला नाही. त्याने आपल्या गुरूच्या प्रत्येक हालचालीवर बारीक नजर ठेवून तिजविषयी टाचण करून ठेवले गुरूजींनी बोलता बोलता सहज एखाद्या गोष्टीविषयी मत दिले किंवा विधान केले, की बॉसवेलच्या टाचण वहीत ते नोंदले गेलेच म्हणून समजावे, डॉ. जॉनसन बॉसवेलच्या दृष्टीने कुणी काल्पनिक व्यक्ती नव्हती. तो प्रत्यक्षातला होता. बॉसवेल डॉ. जॉनसनला बोलताना ऐकू शकत होता, त्याला स्पर्श करू शकत होता. तो डॉ. जॉनसनला ओळखत होता आणि डॉ. जॉनसनला ओळखणाऱ्या इतर लोकांनाही ओळखत होता. डॉ. जॉनसनच्या जीवनात त्याला प्रवेश मिळालाच, पण त्याच्या मित्रांच्या वर्तुळातही त्याला स्थान लाभले. कधी कधी डॉ. जॉनसनच्या जीवनात त्याला प्रसंग घडविणाराची संघटकाची भूमिका स्वतःकडे घेता आली. जे जीवन त्याला चित्रित

---

८– चिपळूणकर, लक्ष्मण कृष्ण (हेडमास्तर हायस्कूल), ' विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे चरित्र ' सत्यप्रकाश छापखाना, पुणे, १ जून १८९४ प्रस्तावना, पृ. २.

करावयाचे होते, त्या जीवनातील घटनांनी, प्रसंगाची, भेटीगाठीची योजना तो करू शकला. याचा अर्थ मात्र असा नव्हे, की त्याच्या सोयीसाठी त्याने डॉ. जॉनसनच्या प्रत्यक्ष जीवनाची रचना, घडण केली. ते त्याला शक्य नव्हते आणि आवश्यकही नव्हते. कुशल छायाचित्रकाराने छायाचित्र आकर्षक, ठसठशीत हुबेहूब यावे म्हणून Pose द्यावी तद्वत तो प्रसंग असे. काही घडवीत असे, की चरित्र विषय डॉ. जॉनसन शब्दग्राहकाने (Word-camera) टिपता यावा म्हणून जरा अधिक चांगल्या पोजमध्ये राहावा. बेसावध नायकाची उत्स्फूर्त प्रसंग घडवून अनेक क्षणचित्रे आपल्या शब्दग्राहकाने त्याने प्रतिमित करून घेतली. त्याला उपलब्ध असलेल्या साधनांचा धनी तर तो होताच, पण काही जिवंत प्रसंगाचा निर्माताही होता. अशी कितीतरी छोटी छोटी अगदी जशीच्या तशी क्षणचित्रे त्याने टिपली, कथनौघात अशा काही झपाट्याने ती मिसळून दिली, की वाचकांना जीवनप्रवाहाच्या सातत्याचा प्रत्यय यावा. एकच एक व्यक्ती सुरुवातीपासून शेवटपर्यंत जिवंत, ठळकपणे वाचकांच्या मनःचक्षूंपुढे उभी राहावी, बॉसवेलचे हे खास तंत्र म्हणता येईल. त्याला हे शक्य झाले; चरित्राला वास्तवरूप लाभले; याचे मूळ कारण हे आहे, की जॉनसनचा तो दीर्घकाल सहवर्ती होता, व्यक्तिगत अवलोकन अनुभवाला जिवंतपणा प्राप्त करून देते आणि बॉसवेलने केलेले चित्रण तर त्याच्या दैनंदिन अनुभवातून स्फुरलेले आहे.

चरित्रलेखनातले नायकाच्या सहवासाचे महत्त्व मान्य करूनही असे म्हणावे लागते, की चरित्रलेखनास केवळ नायकाचा सहवास अपुरा पडतो. चरित्रविषयाच्या निवडीचे स्वातंत्र्य चरित्रकाराला उपभोगता येते आणि म्हणूनच चरित्रकाराने आपल्या अनुभूतीच्या टप्प्यापलिकडची, अनुभूतीच्या क्षेत्रापलीकडची व्यक्ती चरित्राकरिता निवडू नये, हे उचित होय. नाट्यसंगीताचा गंधही नसलेल्या चरित्रकाराने बालगंधर्वांचे चरित्र लिहिण्याच्या भरीस न पडलेलेच बरे. समजा, चरित्रकाराने आपल्या अनुभूतीच्या टप्प्यापलिकडची व्यक्ती चरित्राकरिता निवडली तर त्याला नायकाने ज्या क्षेत्रात आपले आयुष्य घडविले, त्या क्षेत्राचे तांत्रिक ज्ञान आवश्यक आहे. चरित्रकाराचा वेळ आणि श्रम वाचावेत म्हणून असाही तोडगा सूचविता येईल, की, डॉक्टरने डॉक्टरचे चरित्र लिहावे, शास्त्रज्ञाने शास्त्रज्ञाचे चरित्र लिहावे. पण हा प्रश्न योगायोगाचा आहे. असा योग घडून आला तर फारच उत्तम. एरव्ही चरित्रकाराला नायकाच्या क्षेत्राचे तांत्रिक ज्ञान करून घेणे आवश्यक आहे. कित्येकदा असेही होते, की चरित्रविषय व्यक्ती अनेक क्षेत्रात चमकलेली असते. तेव्हा तर हा प्रश्न अधिकच बिकट होतो. एक तर चरित्रकाराला नायकाच्या विविध क्षेत्रांचे तांत्रिक ज्ञान हवे किंवा चरित्रलेखन त्या त्या क्षेत्राचे तांत्रिक ज्ञान असलेल्या अनेक विभागातून दिले पाहिजे. चरित्र नायकाच्या विशिष्ट क्षेत्रातील हालचाली स्पष्टपणे संकलितस्वरूपात चित्रित व्हाव्यात म्हणून चरित्रकाराला

नायकाचा सहवास तर हवाच पण नायकाच्या क्षेत्राचे तांत्रिकज्ञानही हवे. या संदर्भात जोसेफ अ‍ॅडिसन लिहितात. 'स्वत: सार्वजनिक व्यवहारात निष्णात असणाऱ्या आणि त्यामुळे माणसांचे वस्तूचे पूर्णज्ञान करून घेणाऱ्या व्यक्तींनाच फक्त मुत्सद्यांची समाधानकारक चरित्रे लिहिता येणे शक्य होते.'[९]

आध्यात्मिक अनुभव आध्यात्मिक विकासाच्या एका विशिष्ट पातळीवरून येतात. त्या अनुभूतीचे चित्रणही त्या विशिष्ट पातळीवरून करता येते. संतचरित्र-काराला सत्पुरुषाचा सहवास तर हवाच, पण त्याच्या आध्यात्मिक अनुभूतींचे आकलन व्हावे, त्यांचे चित्रण करता यावे, म्हणून काही एक आध्यात्मिक विकासाचा टप्पा गाठावा लागतो. संतांचे चरित्र बहुतांशी अंतरंगाचे असते. म्हणून चरित्रकाराची आध्यात्मिक भूमिका जशी प्रगत होत जाईल तसे ते अधिक आकलन होईल. गोंदवलेकर महाराजांच्या परिचितांपैकी एका गृहस्थाने गोंदवलेकर महाराजांचे चरित्र लिहावयास घेतले. ते जंगल खात्यात नोकरीला असल्यामुळे त्यांना भाऊसाहेब फॉरेस्ट म्हणत. भाऊसाहेबांनी आपले बाड मोठ्या कौतुकाने श्री महाराजांच्या हातामधे दिले. त्यांनी मधून मधून ते पाहिले आणि एकदम फाडून टाकले. भाऊसाहेब म्हणाले, ' महाराज, हे काय ?' तेव्हा गोंदवलेकर महाराजांनी जे उत्तर दिले ते या संदर्भात महत्त्वाचे वाटते. ते बोलले, ' भाऊसाहेब, संतांचा चरित्रकार जन्मास यावा लागतो. जो नामामध्ये इतका रंगला की त्याला स्वत:चा विसर पडला, त्यालाच माझे चरित्र कळेल. नुसत्या तर्काने ते कळणार नाही. सत्पुरुषांचे चरित्र हे जास्त मानसिक असते. त्यांच्या चरित्रामध्ये देहाच्या हालचालींना दुय्यम महत्त्व असते. आणि चमत्कारांना फारच कमी महत्त्व द्यायला पाहिजे. देहाच्या वाटेल त्या अवस्थेमध्ये भगवंताचे अखंड अनुसंधान असणे हेच संतांच्या चरित्राचे खरे मर्म आहे. आपण स्वत: भगवंताला चिकटल्याशिवाय दुसरा तसा चिकटलेला आहे किंवा नाही हे कळत नाही. म्हणून संतांच्या चरित्रकाराने स्वत: नामामध्ये रंगून जावे आणि नंतर त्याची आज्ञा घेऊन चरित्र लिहावे.'[१०]

चरित्रकाराला चरित्रविषय व्यक्तीचे सान्निध्य लाभले, ज्या क्षेत्रात त्या व्यक्तीचे जीवन घडले, त्या क्षेत्राचे तांत्रिक ज्ञान त्याने अवगत करून घेतले, तरी तेवढ्याने चरित्राच्या यशाची हमी देता येत नाही. चरित्रविषयभूत व्यक्तीचे व्यक्तिमत्त्वच जर आकर्षक नसेल, त्या व्यक्तीच्या जीवनात काही राम नसेल तर चरित्रकाराला त्या व्यक्तीचे सान्निध्य लाभूनही त्याचा चरित्रलेखनाच्या दृष्टीने फारसा उपयोग होण्यासारखा नाही. चरित्राचे यशापयश चरित्रकाराला लाभणाऱ्या

9– Garraty John. A 'The Nature of Biography,' Jonathan Cope, London, 1958, P. 143.

१०– प्रा. बेलसरे केशव विष्णु ' गोंदवलेकर महाराज यांचे चरित्र आणि वाङ्मय,' प्रसाद प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, १९६१ पृ. १८६.

नायकाच्या सान्निध्यावर तर अवलंबून असतेच पण त्याहीपेक्षा अधिक ते नायकाच्या व्यक्तिमत्त्वावर आणि त्याच्या जीवनावर कसे अवलंबून असते तेच आता पाहावयाचे आहे.

चरित्रविषयभूत व्यक्ती थोर असावी की सामान्य असावी या संदर्भात बरीच चर्चा झालेली आढळते. टीकाकारांनी या आगंतुक प्रश्नावरच भिन्न मते नोंदली आहेत. सिडने ली यासारख्या अर्वाचीन लेखकाने चरित्रविषय भव्य असावा असे आपले मत दिले आहे. चरित्रविषयाच्या कर्तृत्वाचे अनन्यसाधारणत्व म्हणजे भव्यता, असे त्याने भव्यतेचे स्पष्टीकरण केले आहे. त्याच्या मते शेक्सपीअर हा भव्य विषय ठरतो. कारण, शेक्सपीअरचे वाङ्मयीन कर्तृत्व अनन्यसाधारण होते. चरित्रविषयाची भव्यता प्रचलित लोकप्रियतेवर अवलंबून नसावी असेही त्याने प्रतिपादन केले आहे. इंग्लिश असोसिएशनने आयोजित केलेल्या व्याख्यानात ते म्हणाले, 'वाच्यार्थाने लक्षणीय असल्याशिवाय कोणतीही व्यक्ती चरित्रास लायक ठरत नाही. चरित्रकाराचा विषय नामांकित व्यक्तिमत्त्व आणि कृतींशी अशा अर्थाने संबद्ध असला पाहिजे की मानवी अनुभूतीच्या दैनंदिन मर्यादेत या गोष्टींची गाठ पडता कामा नये.'[११] थोडक्यात म्हणजे चरित्रनायक झाले बहु, होतील बहु, परी यासम हाच' असा असावा. असे व्यक्तिमत्त्व, असे कर्तृत्व गेल्या शंभर वर्षांत झाले नाही इतके ते अद्वितीय असावे.

आंद्रे मोर्वासारखा अग्रयावत चरित्रकारही थोडासा या मताकडे झुकल्यासारखा वाटतो. पण त्याने याबाबतीत ठाम मत मांडलेले नाही. या प्रश्नाची त्याने तात्त्विक चर्चा केलेली नाही. सामान्य माणसाच्या बाबतीत साधनांची वाण पडते ही एक तक्रारवजा व्यवहारिक अडचण त्याने दाखवून दिली आहे. त्याचे म्हणणे असे की नीतिबोधाच्या दृष्टीनेच थोर मनुष्य निवडू नये हे जरी खरे असले, तरी सामान्य मनुष्याच्या बाबतीत अशी अडचण उपस्थित होते, की त्याचे चरित्र लिहिण्यासारखी सामग्री फार थोडी मिळते. थोर मनुष्यासंबंधी वर्तमानपत्रात, त्याच्या पत्रव्यवहारात, दैनंदिनींत, किंवा इतर लोकांकडून तोंडी, पुष्कळशी माहिती मिळू शकते. सामान्य मनुष्य कधी दैनंदिनी लिहावयाचा नाही, कधी पत्रे जपून ठेवावयाचा नाही आणि वर्तमानपत्रात त्याच्यासंबंधी काय माहिती मिळणार? म्हणजे मोर्वाची अडचण असलीच तर ती व्यावहारिक आहे. बरे, ही अडचण अगदी अपरिहार्य आहे, असेही नाही. कधी कधी अचानक ती दूर होते. मोर्वाच्याच शब्दात हा मुद्दा स्पष्ट करता येण्यासारखा आहे. 'केव्हाकेव्हा असे घडते, की अवघ्या लोकांना जिवंत असताना अपरिचित असलेले स्त्री–पुरुष अपूर्व दर्जा

11– Sir Lee Sidney. 'The Perspective of Biograhpy,' The English Association Pamphlet, No. 41, September 1918, P. 8.

असलेल्या दैनंदिन्या व पत्रे मागे ठेवून जातात. जर या दैनंदिन्यांचा व पत्रांचा नंतर शोध लागला, तर त्यांच्या लेखकांबद्दल काही गूढ शिल्लक उरत नाही आणि ते चरित्रलेखनाकरिता वाजवी विषय ठरतात. सॅम्युएल पेपीज हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.[१२]

सामान्य मनुष्याच्या बाबतीत जी साधनांच्या कमतरतेची अडचण मोर्वाने उपस्थित केली आहे, त्याच स्वरूपाची अडचण थोरांच्याही बाबतीत उद्भवते. केव्हा केव्हा थोरांना आत्मप्रकटीकरणाची देणगी नसते म्हणा, किंवा सवय नसते म्हणा, थोर माणसे आपले मन उघड करीत नाहीत. ती बहुधा अबोल असतात. कित्येकदा इतरांच्यात मिळून मिसळून वागत नाहीत. त्यामुळे त्यांच्या अंतरंगाचा ठाव लागत नाही. थोरांची चरित्रे कित्येकदा समाधानकारक वाटत नाहीत, त्याचे हे एक कारण होय. डॉ. जॉनसन थोर होता. पण तितकाच तो बोलका आणि मिळून मिसळून वागणारा होता. आणि म्हणूनच बॉसवेलच्या दृष्टीने तो एक आदर्श विषय ठरला. मोर्वा म्हणतो त्याप्रमाणे थोर माणसाबद्दल उपलब्ध होणारी कागदोपत्री आणि ऐकीव माहिती बहुधा त्याच्या सार्वजनिक जीवनाची असते. खाजगी जीवनाची किल्ली अखेरीस विधवेच्या हाती राहते. ती हस्तगत झाल्याशिवाय त्याच्या जीवनाचे परिपूर्ण चित्र रेखाटता येत नाही. एरव्ही ते चित्रण एकांगी ठरते. सामान्य मनुष्याच्या बाबतीत जी साधनांची अडचण भासते, ती कित्येकदा थोरांच्या बाबतीतही जाणवते. सहजासहजी साधने उपलब्ध होत नाहीत म्हणून सामान्य माणसाची चरित्राकरिता निवड करू नये, हे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही. या प्रश्नाच्या व्यवहारिक बाजूपेक्षा तात्त्विक बाजूचा विचार व्हायला हवा. सिडने ली आणि आन्द्रे मोर्वा यांच्याप्रमाणेच लेस्ली स्टीफन् यांना चरित्रविषय व्यक्ती लक्षणीय, प्रख्यात असावी असे वाटते.

या प्रश्नाची नीट उकल व्हावी म्हणून सामान्य माणसाची चरित्राकरिता, शिफारस करणाऱ्या पक्षाचे म्हणणे काय आहे ते समजावून घेणे अगत्याचे आहे.

थॉमस कार्लाइलने सामान्यजनांची तळी उचलून धरली आहे. त्याच्या मते, सामान्य मनुष्याची चरित्राकरिता निवड करण्यास कोणतीच हरकत नसावी. कार्लाइल व्यक्तीपेक्षा व्यक्तीच्या जीवनाला अधिक महत्त्व देतो ही गोष्ट या संदर्भात लक्षात ठेवण्यासारखी आहे. तो लिहितो, ' अत्यंत लहान माणसाचे चित्र, त्याच्या जीवनयात्रेचे दृश्य थोरात थोर अशा माणसातही आवड उत्पन्न करू शकते. सर्व माणसे सांगता येणार नाही इतक्या प्रमाणात भाऊबंद आहेत; प्रत्येकाचे जीवन प्रत्येक माणसाचे चमत्कारिक द्योतक असते; मानवी चित्र

12– Maurois, Andre. ' Cassell 's Encyclopaedia of Literature, Volume I. Cassell and Company Ltd., London, P. 51.

प्रामाणिकपणे काढली तर मानवी भिंतींवरील सर्व चित्रात स्वागतार्ह ठरतात,'[१३]

कार्लाइल प्रमाणेच मार्थी मॅकेन यांनी सामान्य मनुष्याच्या बाजूने आपला कौल दिला आहे. ते सामान्य माणसाच्या असामान्य अनुभूतींना महत्त्व देतात. म्हणजे पर्यायाने तेही माणसापेक्षा माणसाच्या जीवनाचे महत्त्व मान्य करतात. ते लिहितात, 'सामान्य अनुभूतींचा प्रत्यय घेणाऱ्या असामान्य माणसापेक्षा असामान्य अनुभूतींचा प्रत्यय घेणारा सामान्य माणूस चरित्राचा उत्तम विषय होय.'[१४]

मार्सेल स्कॉब (Marcel Schwob) यांच्या मते चरित्रविषयाची निवड करताना लहान थोर हा प्रश्न गौण ठरतो. कार्लाइल आणि मार्थी मॅकेन यांच्या प्रमाणेच तेही चरित्रविषयाची निवड करताना व्यक्तीपेक्षा व्यक्तीच्या जीवनाला अधिक महत्त्व द्यावे, या विचाराचे आहेत. ते लिहितात, 'फक्त थोरांचाच जीवन चरित्रे आपल्याला आवडली असे चरित्रकार मानत आले आहेत. कलेच्या बाबतीत अशा विचारांना थारा नसतो. चित्रकाराच्या दृष्टीने क्रॅनॅचने रंगविलेले अज्ञात इसमाचे चित्र हे इरॅसमसच्या चित्राइतकेच मौलिक असते. या नंतरच्या चित्रात केवळ इरॅसमसच्या नावामुळे सौन्दर्य अवतरलेले नसते. बॉस्वेल व ऑब्री ज्या कलेमधे वरचढ ठरले त्या कलेचा जर आपण स्वीकार केला असता तर आपल्याला आपल्या युगातील अत्यंत थोर पुरुषाचे सूक्ष्म वर्णन करावे लागले नसते किंवा भूतकाळातील विख्यात व्यक्तींच्या वैशिष्ट्यांची नोंद करावी लागली नसती, तर देवासारख्या म्हणा किंवा सामान्य स्वरूपाच्या अथवा गुन्हेगारी जीवन जगणाऱ्या माणसांच्या व्यक्तिगत जीवनाचे तितक्याच काळजीपूर्वक कथन करावे लागले असते.'[१५]

मराठी टीकाकारांपैकी प्रा. रा. कृ. लागू हे सामान्यांच्या जीवनात रस घेणारे आहेत. आतापर्यंत थोरांची थोरवी गाण्यात चरित्रकारांनी धन्यता मानली. 'साध्याही विषयात आशय कधी मोठा किती आढळे' या कविवचनाप्रमाणे, सामान्यांच्या जीवनातही कधी असामान्यत्व आढळते याचा ते निर्वाळा देतात. सामान्य स्त्रीपुरुषांची चरित्रे जर आपल्याला उपलब्ध झाली, तर मराठी वाङ्मयाचे एक महत्त्वाचे दालन उघडल्यासारखे होईल असे त्यांना वाटते. दादोबा पांडुरंग

---

13– Carlye, Thomas. 'The life of John Sterling.' Chapman and and Hall Ltd.. London, Centenary edition, Introductory Chap. I. P. 7.

14– Mckema, Marthe. 'Write your own best selier,' Jarrolds Publishers, London, P. 163.

15– Maurdis, Andre. 'Aspects of Biography,' Cambridge University Press, 1929, P. 47.

आत्मचरित्र, चरित्र आणि आठवणी या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत ते लिहितात, 'आतापर्यंत तरी ज्या स्त्री पुरुषांवर प्रसिद्धीचा झगझगीत प्रकाश पडला आहे. अशांची चरित्रे लिहिली जातात. त्यांच्याच आठवणी लोक प्रसिद्ध करतात. राजा, राणी, विद्वान, सत्पुरुष, शास्त्रज्ञ, कलावंत, उद्योगपति, स्वातंत्र्यवीर इत्यादी व्यक्तींची चरित्रे, आठवणी वगैरे वाङ्मय प्रसिद्ध झालेले आहे. त्याचप्रमाणे दुष्ट, नष्ट, कपटपटु, खलपुरुषांची चरित्रे प्रसिद्ध व्हायला हवीत. तसेच उच्चनीचांच्या पातळीवरून नव्हे, पण निव्वळ मनुष्यत्वाच्या दृष्टीने विचार केला तर सामान्य स्त्रीपुरुषांची चरित्रे आणि आठवणी आपल्याला वैचित्र्यपूर्ण आणि उद्‌बोधक वाटतील. अशा स्त्रीपुरुषांच्या भवितव्यतेशी चाललेला नित्याचा झगडा, त्यांच्या आशा आणि आकांक्षा, आयुष्यात त्यांना मिळालेले यश आणि अपयश यांचे वर्णन जर आपल्याला वाचायला सापडेल तर आपण एकाद्या गंधर्वनगरीत प्रवेश केल्याचा अनुभव आपल्याला येईल...'[१६]

श्री वि. स. खांडेकरही व्यक्तीपेक्षा व्यक्तीच्या जीवनाला अधिक महत्त्व देतात. जीवनमूल्यांच्या उच्चतेच्या दृष्टीने ते या प्रश्नाकडे पाहतात. चकाकते ते सोने, अशी जरी जगरहाटी असली, तरी चरित्रनायकाकडे माणूस म्हणूनच पाहावे असा त्यांचा दृष्टिकोन आहे. ते लिहितात, 'लौकिक दृष्टि बहुधा स्थूल असते. त्यामुळे ते उघड उघड रम्य, भव्य अथवा उदात्त दिसते, त्याची मोहिनी तिच्यावर चटकन पडते. जे चमकते ते जगाचे डोळे दिपविते. दिवाळीच्या दिवसात बालकांचे लक्ष आपली वास्तु उजळविणाऱ्या पणत्यांकडे कुठे असते ? अंतराळाचा वेध घेत जाणाऱ्या चमकदार दारूसामानाचेच त्यांना कौतुक वाटते. जगरहाटीच अशी आहे. जग कुठल्याही क्षेत्रांतले शिखर गांठणारांची पूजा करीत बसते. केव्हा केव्हा आंधळेपणानेसुद्धा !

पण समाजाचे सर्व व्यवहार सुरळीत चालायला, माणसाची माणुसकीवरील श्रद्धा कायम टिकवायला असल्या मूठभर बड्या माणसांपेक्षा ठिकठिकाणी विखुरलेली छोटी मोठी माणसेच अधिक उपयोगी पडतात. त्यांचे कार्यक्षेत्र मर्यादित असते त्या क्षेत्रापलीकडे त्याचे नाव सहसा जाऊ शकत नाही. म्हणूनच त्यांना छोटी माणसे म्हणायचे. जीवनमूल्यांच्या उच्चतेच्या दृष्टीने पाहिले तर मोठी माणसे म्हणून गाजलेल्या व्यक्तींच्या अंगी असलेले सर्व गुण या वर्गातल्या व्यक्तींतही आढळतात. इतकेच नव्हे तर शिखरावर चढलेल्या मोठ्या माणसांच्या अंगी जे काही अवगुण परिस्थितीने निर्माण होण्याचा संभव असतो– शिखर गाठल्यामुळे डोळे फिरून जाणे, पायथ्याशी उभ्या असलेल्या लाखो लोकांविषयी एक प्रकारचे दूरत्व

---

१६– प्रियोळकर अ. का. 'दादोबा पांडुरंग चरित्र– आत्मचरित्र,' प्रकाशक के भि ढवळे, मुंबई, प्रथमावृत्ती, १९४७, प्रस्तावना, पृ. ३८.

निर्माण होणे, आपले हात आभाळाला लागले या समजुतीने विचाराचा तोल जाणे इत्यादि त्यापासून ही छोटी माणसे सहज अलिप्त राहू शकतात.'[१७]

या दोन्ही पक्षात एक समान गोष्ट आहे. ती म्हणजे चरित्र केवळ गौरवाकरिता किंवा नीतिबोधाकरिता लिहू नये, हे दोघांनाही मान्य आहे. माणूस म्हणून माणसाकडे पाहण्याची दृष्टी चरित्रकारांना अलिकडेच लाभली. जेव्हा ही दृष्टी लाभली तेव्हा सामान्य माणसाचे जीवनचित्र रेखाटण्याची प्रवृत्ती बळावली. चित्रकार आपल्या चित्राचा विषय निवडताना केवळ भव्य देखावे किंवा थोर व्यक्ती निवडतो असे नाही, तर देखाव्यातही त्याला कित्येक वेळा आकर्षणपणा दिसून तो तसाच विषय निवडतो, त्याप्रमाणेच चरित्रकाराचे आहे. कलेच्या क्षेत्रात लहान थोर हा भेद येऊ शकत नाही. चित्रकार एखाद्या सुंदर स्त्रीचे चित्र रंगविण्यात जितका आनंद मानील तितकाच एखाद्या कुरूप, तोंडावर सुरकुत्यांचे जाळे झालेल्या जख्खड म्हाताऱ्या–भिकाऱ्याचे वा भिकारणीचे चित्र काढताना त्याला आनंद होईल. चरित्र लेखनात सानथोर हा प्रश्न गौण ठरतो.

छोट्यामोठ्यांची सुखदु:खे सारखीच असतात. छोटीमोठी माणसे सारख्याच हेतूने प्रेरित होतात, आशेवर जगतात, मृगजळामागे धावतात, अडचणींना तोंड देतात आणि मोहाला बळी पडतात. छोट्याइतकीच मोठी माणसेही इच्छेच्या जाळ्यात अडकतात आणि आत्यंतिक सुखाच्या मागे लागून भ्रष्ट होतात. दोघांच्याही शक्ती आणि इंद्रियवेदना सारख्याच असल्यामुळे त्यांच्या सुखदु:खात तफावत पडत नाही. विविधप्रसंगी त्यांनी अनुभवलेल्या संवेदना सारख्याच असतात. गाय चोरीला गेल्यामुळे दु:खी झालेल्या शेतकऱ्याहून, परचक्रापायी राज्याचा काही भाग गमावून बसणाऱ्या राजाची वेदना काही वेगळी नसते. चरित्रात जेव्हा मानवी जीवनाच्या या सार्वत्रिक, शाश्वत भागाचे चित्रण होते, तेव्हा चरित्रनायक लहान की थोर हा प्रश्न निकालात निघतो. चरित्रकाराला नायकाच्या जीवनातला हा शाश्वतभाग जागरूकपणे टिपता आला तर नायकाच्या लहानथोरपणामुळे चरित्राचे काही बिघडत नाही. चरित्रनायक लहान की थोर हा प्रश्न मग आगंतुक ठरतो. आगंतुक अशा अर्थाने, की चरित्रविषयाच्या निवडीची कसोटी त्यावर अवलंबून नाही. क्लॉड एम्. फ्यूस (Claude M Fuess) यांनी म्हटले आहे. ' निर्जीव संतापेक्षा आकर्षक पापी ही चरित्राची उत्तम सामग्री होय. मानवी अंत:करणाचे आकर्षक नाट्य ज्याने जाणले आहे, अशा चरित्रकाराकडून अत्यंत गूढ व गौण उधळ्याचे जीवनही महत्त्वाचे आहे, असे भासविले जाण्याची शक्यता आहे.'[१८]

---

१७– पटवर्धन लक्ष्मीबाई. ' माझा नंदादीप,' पुणे ४, १९५९, प्रस्तावना, पृ. ४.

18– Fuess, Claude M. ' The Biographer and his Victims,' The Atlantic Monthly, January 1932, P .67.

चरित्रविषय व्यक्ती लहान असो, थोर असो, तिचे व्यक्तिमत्त्व कसे आहे हा प्रश्न इथे महत्त्वाचा ठरतो. चरित्रकाराला नायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे यथातथ्य चित्रण करावयाचे असते, ही गोष्ट या संदर्भात विसरता कामा नये. व्यक्तीला लाभलेली अमाप प्रसिद्धी हा काही चरित्रविषयाच्या योग्यतेचा पुरावा नव्हे. व्यक्तित्वदर्शन हे चरित्राचे उद्दिष्ट असल्यामुळे चरित्रकाराला नायकाच्या व्यक्तिमत्त्वातले आकर्षकत्व नेमके हेरता येणे आवश्यक आहे. नायकाचे व्यक्तिमत्त्व किती आकर्षक आहे, किती चित्तवेधक आहे, किती वैशिष्टचपूर्ण आहे. यावर चांगल्या विषयाची निवड अवलंबून असावी. मिळमिळीत व्यक्तिमत्त्वाच्या थोर पुरुषापेक्षा आकर्षक व्यक्तिमत्त्वाची सामान्य व्यक्तीच चरित्रविषय होण्यास लायक ठरते. या दृष्टीने पाहता निवड करण्यापूर्वी चरित्रकाराने नायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणं आवश्यक आहे. थोर पुरुषात आकर्षक व्यक्तिमत्त्व आढळले तर ठीकच. पण आकर्षक व्यक्तिमत्त्व असलेली व्यक्ती अप्रसिद्ध, म्हणून सामान्य आहे, एवढ्या-वरूनच ती चरित्राचा विषय होण्यास योग्य नाही असे विधान करणे चुकीचे ठरते. अनुभव मात्र असा आहे, की सामान्य व्यक्तीतील असामान्यत्व वाचकांच्या मनाची पकड घेते. 'नीच माणसांची अत्युत्कृष्ट चरित्रे, आत्मचरित्रे आहेत आणि त्याजबरोबर संतांची निजीव चरित्रेही आहेत. चरित्रांचे विषय त्यांच्या काळात महत्त्वाच्या व्यक्ती असाव्यात हेही केवळ पुरेसे नाही. चांगल्या विषयाचे पहिले गुण हे, की स्त्री किंवा पुरुषाचे जीवन खरोखरच संस्मरणीय असावे, कृतींमागे ठळक व्यक्तिमत्त्व असावे आणि चरित्रविषय व्यक्ती विशेष व चित्ताकर्षक असावी.'[१९]

चरित्राचे लेखन काहीसे पोस्टात पाकिटावर स्टॅम्प मारतात तसे आहे. लखोट्यावर उमटणारा ठसा मुळाबरहुकूम असतो. मुळातली मुद्रा ओबडधाबड असली तर कागदावर उमटणारा ठसाही ओबडधोबड असतो. मुळातली मुद्राच जर सुंदर आणि आकर्षक असेल तर कागदावर उमटणारा ठसाही तितकाच सुंदर आणि आकर्षक वठतो. चरित्रविषय व्यक्तीचे जीवननच मुळी मिळमिळीत असेल, वाचकांच्या मनाची पकड घेण्याचे सामर्थ्य त्या जीवनात नसेल, तर चरित्रात रंग तो कसा भरावा ? चरित्रकाराने आपली सगळी कला ओतूनही असे चरित्र उणे ठरले, तर तो त्या जीवनाचाच दोष म्हटला पाहिजे. चरित्रविषयभूत व्यक्तीच्या जीवनाचे तेज काही आगळेच असेल, तर चरित्र सरस आणि मनोवेधक झाल्या-शिवाय राहणार नाही. चरित्राचे यशापयश हे बरेचसे चरित्रविषयाच्या निवडीवर अवलंबून असते. चरित्रविषयाची निवड ही अखेरीस नायकाच्या व्यक्तिमत्त्वाची,

19– Sir Cork, Edward. 'Literary Recreation,' MacMillan and Co., London, 1918, P. 22.

जीवनाची निवड ठरते. चरित्रनायकाच्या ज्या जीवनातून त्याचे व्यक्तिमत्त्व आकारते, वाढते, विकसित होते, त्या जीवनात कोणते आंगिक गुण असावेत ते आता पाहू.

चरित्र विषयव्यक्ती सामान्य असली तरी चालेल परंतु तिच्या ज्या जीवनातून व्यक्तिमत्त्व फुलते त्या जीवनात सांगण्यासारखे काही असले पाहिजे. कवीला काव्य करण्याकरिता साधा विषय चालत असला तरी त्या साध्या विषयातही काही तरी मोठा आशय असेल, काही तरी लक्ष वेधून घेण्यासारखे असेल, तरच कवी तो विषय निवडतो. त्याचप्रमाणे चरित्रकाराला चरित्रविषय मोठासा भव्य किंवा लौकिकदृष्टया थोर नसला तरी चालतो. परंतु त्यात काही तरी आकर्षक गुण असावा लागतो. एखाद्याचे चरित्र लिहावयाचे म्हटले म्हणजे त्याच्या एकंदर जीवनपटात काही तरी निराळेपणा असावा लागतो आणि हा निराळेपणा शोधून काढण्याइतकी मार्मिक दृष्टी तरी चरित्रकारात असावयास पाहिजे. ज्याच्या जीवनचरित्रात किंवा स्वभावविकासात काहीतरी वेगळी चमक आहे, काहीतरी अद्भूतरम्य भाग आहे, अशा मनुष्याचे चरित्र आकर्षक व्हावे, हे अगदी स्वाभाविक आहे. थोडक्यात म्हणजे जे जीवन चित्रित करावयाचे ते मुळातच संस्मरणीय असावे. ज्या काळात स्त्रियांना शिक्षणासाठी घराबाहेर पडण्याची सोय नव्हती, त्या काळात टवाळांची अवहेलना सहन करून ज्या आनंदीबाई जोशींनी माध्यमिक शिक्षण पूर्ण केले, इतकेच नव्हे, तर विलायतला जाऊन कायिक, मानसिक यातना सहन करून वैद्यकीय शिक्षणाचे ध्येय गाठले आणि त्यापायी मृत्यू ओढवून घेतला, त्या आनंदीबाईंचे जीवन खचित्‌च संस्मरणीय आहे. ग्वाल्हेरचे यादवराव, ज्यांच्या चरित्राचा उल्लेख मागे येऊन गेला आहे, ते तसे पाहिले तर फारशी प्रसिद्धी न लाभलेले गृहस्थ, पण त्यांच्या चढउताराच्या जीवनातला संघर्ष, धडाडी, धंद्यातली जिद्द आणि धोरण यामुळे त्यांचे जीवन निश्चितच संस्मरणीय आहे.

चरित्र हृदयग्राही होण्यास चरित्रनायकाच्या जीवनात संघर्ष असणे आवश्यक आहे. संघर्ष मुळातच चित्तवेधक असतो. असा संघर्ष पाहण्यात माणसाचे मन रमावे अशी निसर्गसिद्ध योजना आहे. ज्या जीवनकथेत संघर्षाचा भाग नाही, तिने वाचकांचे व्हावे तसे मनोरंजन होणे शक्य नाही. नायकाच्या जीवनकहाणीत कोणत्या ना कोणत्या स्वरूपाची झुंज असली म्हणजे चरित्राची रंजकता वाढते. चरित्रविषयाच्या जीवनातील संघर्ष, विरोध हे चरित्रापासून होणाऱ्या चित्तरंजनाचे खरे कारण होय; आपल्या कृतीत या संघर्षाचे विरोधाचे चित्रण जितके यथातथ्य होईल तितकी आपली कृती अधिक मनोज्ञ ठरेल हे चरित्रकाराने पक्के लक्षात असू द्यावे. माधवराव पटवर्धनांच्या कमालीच्या चढउताराच्या जीवनातील संघर्षाचे चित्रण, हे खानोलकरांनी लिहिलेल्या त्यांच्या चरित्राचे बलस्थान आहे. कोणत्याही

स्वरूपाची झुंज, झटापट, संघर्ष चरित्रात डोकावला म्हणजे वाचकांचे चित्त वेधण्याची शक्ती चरित्रात उत्पन्न होते. याची साक्ष माधवरावांच्या चरित्रात मिळते. चरित्रनायकाच्या सार्वजनिक जीवनाचे चित्रण बहुधा रुक्ष होते. निदान त्यात रंजकत्वाचा भाग कमीच असतो. गार्गी भाटवडेकरांनी लिहिलेल्या सर भालचंद्र भाटवडेकरांच्या चरित्राला त्यांच्या सार्वजनिक जीवनाची पार्श्वभूमी लाभली आहे. पण हे पार्श्वभूमीचे चित्रण असावे तितके रुक्ष वाटत नाही, याचे कारण त्या चित्रणाला संघर्षाची बैठक लाभली आहे.

चरित्रविषयभूत व्यक्तीच्या जीवनानुभूती व्यापक आणि सखोल असाव्यात. वाचकांचा अनुभव समृद्ध आणि संपन्न करणे हे काही चरित्रलेखनाचे उद्दिष्ट नव्हे. पण चरित्रविषयाच्या व्यापक आणि सखोल अनुभूतींचा वाचकांच्यावर एक अपरिहार्य असा परिणाम होतो. त्या अनुभूतींच्यायोगे वाचकांच्या अनुभूतींची विस्तृतता समृद्धता, संपन्नता वाढते. चरित्रविषयाच्या अनुभूतीची समृद्धता जितकी प्रकट होईल आणि तिच्या आविष्काराचा परिणाम घडून वाचकांची व्यक्तिजीवनाबद्दलची जिज्ञासा जितकी तृप्त होईल, तितकी त्यांच्या अनुभवांची कक्षा रुंदावेल ही जिज्ञासा तृप्त होत असताना वाचकांना जीवनातले खाचखळगे कळतात. जीवनाकडे ते अधिक डोळसपणे पाहू लागतात. त्यांची जीवनाबद्दलची जाण प्रगल्भ होते. चरित्रात प्रत्यक्षातले जीवन चित्रित होते. चरित्रात शब्दांकित झालेल्या चरित्रनायकाच्या जीवनानुभूती लौकिक जीवनानुभूतीपेक्षा वेगळ्या नसतात, समकक्ष असतात. तशा अनुभूतींचा प्रत्यय वाचकांना एकतर आलेला असतो. किंवा पुढे येण्यासारखा असतो. प्रत्येकाचे जीवन एका विशिष्ट कक्षेत घडत असते. चरित्रविषयाच्या जीवनानुभूती जेव्हा त्या कक्षेला येऊन भिडतात तेव्हा त्या अनुभूती वाचकांना हव्याहव्याशा वाटतात. तो त्यांचा अमोल ठेवा असतो, भविष्यकाळी उपयोगी पडावेत म्हणून बँकेत पैसे राखून ठेवतात तसा. शिक्षणक्षेत्रात कार्य करणाऱ्या वाचकांना माधवरावांच्या चरित्रातून नोंदलेल्या त्यांच्या त्या क्षेत्रातल्या जीवनानुभूतींमुळे आपल्या स्वतःच्या अनुभूतींची कक्षा रुंदावल्यासारखे वाटले तर त्यात नवल नाही. माधवरावांच्या व्यापक आणि सखोल अनुभूती हे खनोलकरांनी लिहिलेल्या त्यांच्या चरित्राचे आणखी एक सामर्थ्यस्थान आहे. स्मृतिचित्रात शब्दांकित झालेल्या रेव्हरंड टिळकांच्या जीवनानुभूती वाचकांची जीवनाशी खऱ्या अर्थाने ओळख करून देण्यास समर्थ आहेत.

चरित्रविषय व्यक्तीचे जीवन स्फूर्तिदायक असले तर फार चांगले, स्फूर्ती देणे हे काही चरित्राचे उद्दिष्ट नव्हे. पण चरित्रनायकाचे जीवन, त्याचे कर्तृत्व जर प्रेरक असेल तर त्याचा वाचकांच्या मनावर काही एक अपरिहार्य असा परिणाम साधला जातो. चरित्रनायकाच्या जीवनामुळे वाचकांना विवक्षित कार्याविषयीची

प्रेरणा मिळते. त्यांच्या मनात स्वतःच्या कर्तृत्वशक्तीबद्दल भरवसा उत्पन्न होतो, चरित्रविषय व्यक्तीचे जीवन अथवा कर्तृत्व त्यांच्या आशेला पुनर्जीवन देते. उमेदीला ताजीतवानी करते. त्या जीवनापासून स्फूर्ती घेऊन ते क्रियाशील होतात. चरित्रनायकाची जीवनकहाणी अखेरीस वाचकांच्या मनाचा खुराक ठरतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शैक्षणिक ध्येय गाठणाऱ्या आनंदीबाई जोशींच्या जीवनापासून तत्कालीन स्त्रियांना शिक्षणाची स्फूर्ती मिळावी हे अगदी स्वाभाविक होते. या संदर्भात प्रा अय्यर लिहितात : ' शास्त्र किंवा कलेच्या क्षेत्रात ज्यांनी अग्रणी म्हणून लौकिक मिळविला आहे अशा मंडळींपेक्षा चरित्रनायक कमी प्रसिद्ध असला किंवा राष्ट्राच्या उभारणीत त्याने प्रमुख भाग घेतलेला नसला तरी त्यामुळे काही बिघडत नाही. ज्याचे खाजगी जीवन इतके विलक्षण निःस्वार्थी आहे की, जर त्या जीवनाचा इतरांना परिचय घडला तर ते त्यांना नित्य प्रेरणा देईल अशा सामान्य माणसाचीही चरित्रकार निवड करू शकेल '[२०]

चरित्रविषयभूत व्यक्तीच्या जीवनात मानवी मनाला आवाहन करण्याचे सामर्थ्य नजरेत भरण्याजोगे (Human appeal) असावे. खलपुरुष, दरोडेखोर, अनैतिक जीवन जगणारे इत्यादी अप्रतिष्ठित व्यक्तींच्या जीवनापासून स्फूर्ती कशी मिळावी ? असा एक आक्षेप या संदर्भात घेता येण्यासारखा आहे. दुष्कर्मामुळे अपकीर्ती झालेल्या व्यक्तींच्या जीवनापासून स्फूर्तीची अपेक्षा करता येत नाही, हे खरे आहे. पण अशा व्यक्तींच्या जीवनात वाचकांच्या मनाला आवाहन करण्याचे सामर्थ्य असेल तर त्यांची चरित्राकरिता निवड करण्यास कोणतीच हरकत नसावी. चरित्राच्या चित्तवेधकतेचे मर्म आकर्षक व्यक्तिमत्त्व असलेल्या प्रतिष्ठितांच्या अप्रतिष्ठितांच्या जीवनदर्शनात सापडते त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने ते चरित्राचा आशय जो मानवी स्वभाव त्यात सापडते... चरित्रविषयव्यक्ती प्रतिष्ठित असो, अप्रतिष्ठित असो चरित्रातून तिच्या प्रेरणांचे, मनोविकारांचे विश्लेषक, चित्रण यथार्थपणे झाले म्हणजे त्या व्यक्तीच्या जीवनातील कारुण्य, नैराश्य, अगतिकता आणि अपयश वाचकांना घेरते, अंतर्मुख करते, विचार करायला लावते. प्रतिष्ठितांच्या चरित्राबरोबरच अप्रतिष्ठितांच्या चरित्रांचे वाचकांना आकर्षण असते ते यामुळेच. या संदर्भात मार्थी मॅकेन यांनी केलेली विधाने उद्धृत करणे आवश्यक वाटते ते म्हणतात. ' खास करून तुमच्या पहिल्या चरित्राकरिता तुम्ही जो निवडता तो कुणीही असो, पण तो असा असावा की, ज्याच्या जीवनात मानवी मनाला आवाहन करण्याचे मनात भरण्याजोगे सामर्थ्य आहे... जो आपल्या अपयशातही व्यापक आवाहन करू शकतो; कारण जागतिक नायकांचे काही निसर्गतः दिसणारे गुणविशेष असतात आणि ज्यांच्यामुळे अपकीर्ती होते

20– Prof. Aiyar, S. L. ' The Biographical novel,' Thesis submitted 1958, P. 6?.

असेही विशेष असतात, पण अशा चरित्रविषयांची मानवी आवड नेहमीच अंती असणार. वाचकांच्या दृष्टीने सन्माननीय आणि अप्रतिष्ठा करणारे विशेष सारखेच ठरतात '[२१]

चरित्र विषय व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वातले आकर्षकत्व आणि जीवनातले सौन्दर्य चरित्रकाराला नेमके हेरता आले म्हणजे त्याने अर्धीअधिक लढाई जिंकल्या-सारखे होते. चरित्रविषयाची निवड करण्यासाठी आकर्षक व्यक्तिमत्त्व आणि वर चर्चिलेल्या आंगिक गुणांपैकी संस्मरणीय जीवन ह्या दोन निर्णायक कसोटचा ठरतात. चरित्रविषय व्यक्तीच्या संबंधाने भरपूर साधने उपलब्ध असावीत, ही आणखी एक आवश्यक बाब आहे. तिचा विचार विस्ताराने पुढच्या प्रकरणात करू.

---

21– MacKenna Marthe, ' Write your own best seller,' Tarrolds Publishers, London, P. 160.

❊

# सहा

# 'चरित्राची साधने'

साधनांची उपलब्धता ही चरित्रविषयाच्या निवडीच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे, असे मागच्या प्रकरणाच्या शेवटी म्हटले, ते अशा अर्थाने, की साधनांच्या अभावी चरित्रकाराची कुचंबणा होते, साधनांच्या अभावी कित्येकदा चरित्रलेखन अशक्य होऊन बसते. चरित्रकार बराचशा साधनांवर अवलंबून असतो. व्यक्ति-व्यक्तिदर्शनावर पडणाऱ्या मर्यादा व व्यक्तिदर्शन घडविण्यात मिळणारे यश साधनांच्या उपलब्धतेवर अवलंबून असते. चरित्रनायकासंबंधी माहिती देणारी भरपूर साधने उपलब्ध झाली म्हणजे चरित्रकाराचे काम सुकर होते. चरित्रनायकाच्या जीवनाचे पूर्णपणे आकलन करून घेता येते. उपलब्ध झालेली माहिती भरपूर असल्यामुळे चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणाऱ्या घटितांची निवड करून व्यक्तिदर्शन यथार्थपणे घडविता येते. या उलट, साधनांच्या अभावी पुरेसा व्यक्तिदर्शी तपशील उपलब्ध होत नाही. साहजिकच व्यक्तिदर्शनावर मर्यादा पडतात. चरित्रनायकासंबंधी व त्याच्या व्यक्तित्वासंबंधी पुरेशी माहिती उपलब्ध होऊ शकली नाही, तर लिहायचे तरी काय असा प्रश्न चरित्रकारापुढे उपस्थित होतो. माहितीचा अभाव ही चरित्रलेखनातली फार मोठी अडचण आहे. कारण, त्यामुळे व्यक्तित्वदर्शनाचे उद्दिष्टच मुळी साध्य करणे अशक्य होते.

मृत नायकाचे नातेवाईक जेव्हा साधनांचा पुरवठा तोडून टाकतात तेव्हा तर मोठी नाजूक परिस्थिती निर्माण होते. बहुधा चरित्रनायकाला प्रतिकूल असा पुरावा ते उपलब्ध होऊ देत नाहीत. धरलं तर चावतं आणि सोडलं तर पळतं, असा बाका प्रसंग निर्माण होतो. वॉल्टर जॉनसन हे इतिहासकार Sage of Emporia ची कागदपत्रे हताळत होते. विल्यम ॲलन व्हाईट यांनी आपले दप्तर त्यांना उपलब्ध करून दिले होते. एके दिवशी संध्याकाळी जॉन्सन ज्या खोलीत काम करीत बसले होते, तिथे व्हाईट आले आणि त्यांनी जॉनसनना प्रश्न विचारला, तरुण माणसा, कोणत्याही चरित्रकाराचा पहिला नियम तुला ठाऊक आहे. काय ?' यावर तो नियम कोणता असे जॉनसनने विचारले. व्हाईट लगेच उत्तरले, 'विधवेला ठार मारून टाका.'[1] व्हाईट यांनी असा निर्वाणीचा सल्ला दिला याचे कारण असे, की जेव्हा ते वूड्रो विलसन आणि कॅल्व्हीन कुलीज

---

1– Garraty, John. A. 'The Nature of Biography' Jonathan Cape 1958, P. 144.

(Calvin Coolidge) यांच्या चरित्राकरिता साधनांची जमवाजमव करीत होते, तेव्हा दोघांच्याही विधवांनी लोकांनी चरित्रकाराला माहिती पुरवू नये असा आग्रह धरला होता.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे चरित्रकार बेलसरे यांनी विष्णुशास्त्र्यांना स्वतः पाहिले नव्हते. शास्त्रीबुवांचे ग्रंथ वाचून, शास्त्रीबुवांबद्दल त्यांना विलक्षण पूज्यभाव वाटू लागला व त्यांच्याविषयी माहिती मिळवून त्यांचे चरित्र लिहावे, अशी बेलसरेंच्या मनात इच्छा उत्पन्न झाली. परंतु त्यास पुरेपुर माहिती न मिळाल्यामुळे आपल्या पुस्तकास 'विष्णुशास्त्री यांचे चरित्राचे व लेखांचे साधारण स्वरूप' असे नाव द्यावे लागले. प्रस्तुत चरित्राच्या प्रस्तावनेत ते लिहितात, 'हा आमचा प्रस्तुतचा लेख चरित्रग्रंथ नव्हे; तर चरित्र निरूपणात्मक निबंध आहे, ...सविस्तर चरित्र लिहावे असा जरी फार हेतू आहे (आणि हाच निबंध आणखी माहितीने भरून काढण्याला पुष्कळ जागा आहे) तरी पुरेशी साधने आमच्यापाशी नाहीत आणि ती मिळत तोवर हे काम तहकूब ठेवावे तर एकदा उचंबळलेल्या मनाचा हिरमोड होणार या भीतीने, जितकी माहिती मिळविणे शक्तीच्या आटोक्यात होते, तितकी मिळवून हा निबंध सजविला आहे. यामुळे याला सविस्तर चरित्र म्हणायला मन्‍ना संकोचच वाटतो'[२]

विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे चरित्र त्यांचे बंधू ल. कृ. चिपळूणकर यांनी लिहिले आणि ते बेलसरेंनीही लिहिले. परंतु या दोन कृतींमध्ये फार मोठी तफावत आहे. लक्ष्मणरावांना शास्त्रीबुवांच्या जीवनाची खडा न् खडा माहिती होती, त्यामुळे बेलसरे यांच्याप्रमाणे साधनांच्या अभावी त्यांची कुठेही अडवणूक झाली नाही. चरित्रकाराला नायकाचा प्रत्यक्ष सहवास लाभल्यामुळे नायकाच्या खाजगी जीवनाचा सूक्ष्म तपशील प्रस्तुत चरित्रात शक्य तिथे टिपला आहे. त्यामुळे चरित्र काही प्रमाणात सरस, लक्षवेधी आणि रंजक झाले आहे. चरित्रनायकाशी बंधुत्वाचे रक्ताचे नाते असूनही चरित्रकाराने विभूतिपूजा-अभिनिवेश, कौटुंबिक-अभिनिवेश टाळण्यात यश मिळविले आहे. प्रस्तुत चरित्र सत्यान्वेषी दृष्टीने अगदी अलिप्तपणे लिहिले आहे. इथे चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्व गुणदोषांसहित आकार घेते. समकालीनांच्या बाबतीत मात्र सत्यदर्शन घडविताना त्यांना चुचकारून घेतले आहे. निवेदनाच्या ओघात चरित्रकाराने नायकाच्या साहित्याचाही परामर्ष घेतला आहे. पण तो अगदी पार्श्वभूमीपुरता इथे जीवन आणि साहित्य यामधला तोल बिघडलेला नाही. चरित्रकाराने आख्यायिका आणि पत्रे यांच्या आधारे तपशीलाचे

२– बेलसरे खंडेराव भिकाजी, 'विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या चरित्राचे व लेखांचे साधारण स्वरूप' 'ज्ञान प्रभाकर' ग्रंथ प्रकाशक मंडळीने छापविले, मुंबई ऑक्टोबर, सन१८९१, प्रस्तावना, पृ. २-३.

नसनफिके रंग भरून विष्णुशास्त्रांचे चित्र सुरेख चितारले आहे आणि त्यांना हे शक्य झाले याचे एक कारण असे, की हवी असलेली साधने, हवा असलेला तपशील त्यांच्या जवळ सहज उपलब्ध होता.

बेलसरे चरित्र लिहायला बसले ते अपुरी साधने, अपुरी माहिती यांच्या आधारे. कोणत्याही चरित्रात व्यक्तिचित्रण यथातथ्य व्हावे म्हणून प्रथम चरित्र-नायकासंबंधाने इतकी माहिती पाहिजे असते, की तिच्यातून महत्त्वाच्या गोष्टी निवडण्यास सवड असावी. पण इथे माहितीच इतकी तुटपुंजी आहे, की घटितांची निवड करून यथार्थ व्यक्तिदर्शन अशक्य होते. प्रस्तुत चरित्रात कथनाच्या ओघात घटितांच्या द्वारे चरित्रनायकाच्या गुणावगुणांचा आविष्कार घडविण्याऐवजी, शास्त्रीबुवांच्या जीवनाची यादीवजा माहिती देऊन त्यांच्या गुणदोषांची स्वतंत्र चर्चा केली आहे. जीवनदर्शी तपशीलाच्या अभावी हे तंत्र स्वीकारावे लागले आहे. बेलसरे यांच्याजवळ असलेला जीवनदर्शी तपशील इतका तोकडा आहे, की त्या आधारे विष्णुशास्त्रांच्या जीवनाचे यथातथ्य चित्रण होत नाही. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकार घेत नाही. माहितीच्या अभावी चरित्राची पाने भरून काढण्याच्या प्रयत्नात अप्रस्तुताची अतिरिक्त चर्चा आणि पाल्हाळ हे दोन ठळक दोष या चरित्रात आढळतात. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे जीवनदर्शन, व्यक्तिदर्शन घडविण्याऐवजी त्यांच्या धर्ममतांचा उहापोह करण्यासाठी चरित्रकाराने जवळ जवळ सोळा पाने खर्ची घातली आहेत. लोकप्रियता म्हणजे काय, आमच्या लोकांच्या अंगी विलक्षण शैथिल्य कसे भरले आहे, पुणे शहर गुणिजनांचे माहेरघर कसे झाले इत्यादी अप्रस्तुत गोष्टींची चर्चा करून बेलसरे सारखी लांबण लावत राहतात. जन्मोत्सव प्रसंगी जन्मघटिकेच्या फार पूर्वी कीर्तन आटोपल्यामुळे मधली वेळ भरून काढण्यासाठी भजनाची लांबण लावणाऱ्या हरिदासासारखाच हा प्रयत्न होय. बरे, इतकी यातायात करून, या फापटपसाऱ्यात विष्णुशास्त्री कुठे दिसावेत तर तेही नाही. चरित्रनायकाचे धावते चित्रमय दर्शन आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध अंगांनी साकारलेले व्यक्तिमत्त्व चक्षुर्वैसत्यं वाचकांच्या नजरेसमोर उभे करण्याची आणि त्याचे मन भारावून टाकण्याची, त्याला स्वतःला हरवून टाकण्याची किमया बेलसरे करू शकले नाहीत. अपुऱ्या माहितीमुळे चरित्रलेखनाला एक स्वाभाविक मर्यादा पडते.

बेलसरे यांच्या प्रमाणेच केशव वामन पेठे यांनी साधने उपलब्ध नसताना, अपूर्ण माहितीच्या आधारे वामन दाजी ओक यांचे चरित्र लिहिले. त्या चरित्राला त्यांनी ' वामन दाजी ओक यांचे पुष्पभाषात्मक चरित्र ' असे नाव दिले. अलंकारिक पद्धतीचा अवलंब का करावा लागला या संबंधाने प्रस्तुत चरित्राच्या प्राक्कथनात ते लिहितात, ' काव्यसंग्रहाकरिता कै. वा. दा. ओक यांचे अत्यल्प उपलब्ध

माहितीच्या आधाराने लघुचरित्र लिहीत असतां, त्यांचे आलंकारिक चरित्र लिहिण्याची स्फूर्ति झाल्यामुळे प्रस्तुत चरित्र अस्तित्वात आले आहे. माहितीच्या अभावामुळे चरित्रास कमीपणा आलेला भरून काढण्याकरिता प्रस्तुत पद्धतीचे अवलंबन केले आहे.'[३] वस्तुत: अलंकारिक पद्धतीमुळे माहितीच्या अभावी चरित्रास आलेला कमीपणा भरून निघण्याऐवजी चरित्राच्या उणेपणात अधिकच भर पडते. 'दुःखानळाने भाजून गेल्यामुळे कृष्णवर्ण बनलेली ती टिपे, शाईच्या रूपाप्रत जाऊन त्यांचे वाळलेले शिटकाव वर्तमानपत्रातील वामनरावजींच्या मृत्युवार्तेच्या दुःखजनक लेखांचे रुप घेऊन बसले आहेत.' (पृ. २३) यात काव्य ते कितीसे आहे? या शब्दजालात सापडलेल्या वाचकावर वामनरावांच्या मृत्यूचा अपेक्षित परिणाम तो कितीसा होणार? इथें वामनरावांच्या मृत्यूच्या विरहाचा दाह पेठे यांना दाखविता आलेला नाही. 'जिंकलेल्या बळीच्या लोकांतरींच्या राज्यगृहात वामन त्याचा द्वारपाल झाला. तद्वत् मालाधिपतींच्या काव्येतिहाससंग्रह नांवाच्या अन्य राजगृहाशीं सदृश जो काव्यसंग्रह त्यात, विष्णुधृत मयूरकवितेचे आमचे चरित्रनायक आमरण दासानुदास होऊन राहिल्याचे सर्वश्रुत आहे.' (पृ. १३-१४३) काव्यसंग्रहाचे राजगृहाशीं साम्य दाखविण्यासाठी एवढी ओढाताण करून लेखकाने अलंकारांचा सोस पुरविला असला तरी त्यामुळेच वाचकांचा वाचता वाचता श्वास कोंडतो. चरित्र बोजड होते. 'काव्यरससमुद्रात, किंवा कीर्तीच्या मध्यगृहात किंवा नागपूरच्या सिटीस्कुलात... आमचे चरित्रनायक त्या विद्यालयाचे मुख्य गुरु झाले.' (पृ. १६) असली फुगलेली वाक्ये पाने भरून काढण्यास उपयुक्त ठरली तरी त्यामुळे व्यक्तित्वदर्शनाचे उद्दिष्ट बाजूलाच राहते.

या चरित्रात चरित्र असे फारच थोडे आहे अवांतर वर्णनाने चरित्र इतके पसरट केले आहे, की त्यामुळे चरित्राच्या मूळ आकाराची कल्पना येत नाही, येथून तेथून जमविलेल्या भारूड भरताडात नायकाचे व्यक्तिमत्त्व वाचकांच्या डोळ्यापुढे उभे करण्याचे सामर्थ्य नाही रबर ताण ताण ताणावा तसे हे चरित्र अलंकारिक शब्दयोजना, अकारण लांबण, पाल्हाळ, पांचट कोट्या, अप्रयोजकपणा इत्यादींचा अवलंब करून अतिरिक्तपणे ताणले गेले आहे. चरित्र पसरट झाल्यामुळे पृष्ठसंख्या वाढली पण त्यामुळे चरित्रनायकाच्या जीवनाच्या आकलनात तसूभरही भर पडली नाही. त्यामुळे हा पसरटपणा कृत्रिम वाटतो. चरित्रनायकाच्या जीवनाची यादीवजा माहिती देऊन बेलसरे यांच्या प्रमाणेच पेठे यांनीही त्यांच्या गुणावगुणांची चर्चा केली आहे आणि शेवटी भावी अपेक्षित आक्षेपांची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला आहे, तो प्रस्तुत चरित्रात अप्रस्तुत ठरतो. किंबहुना हा प्रयत्न चरित्र

३– पेठे केशव वामन, 'रसिकवर वामन दाजी ओक यांचे पुष्पभाषात्मक चरित्र,' मुंबई, सन १८९८, प्रानक्कथन, पृ. २३.

फुगविण्याकरिताच केला असावा अशी शंका घेण्यास जागा आहे. ल. कृ. चिपळूणकरांनी लिहिलेल्या शास्त्रीबुवांच्या चरित्रात त्यांचे जीवन आणि व्यक्तिमत्त्व सहजगत्या फुलत जाते, तसे इथे होत नाही. इथे चरित्र नायकाची जीवनकथा जागच्या जागी घुमत राहते. जीवनदर्शी तपशीलाच्या अभावी ती पुढे सरकतच नाही आणि शेवटी उरते ते शब्दजाल.

इथे पाने भरून काढण्याकरिता जे सांगावयाचे आहे ते सरळ न सांगता निरनिराळ्या वळणांनी व आडवळणांनी प्रगट होते. चरित्रनायकाचे अध्ययन दांडगे होते एवढी एकच गोष्ट चरित्रकाराने केवढ्या पाल्हाळाने स्पष्ट केली आहे ते पाहा: '... विश्वविद्यालयात किंवा पूर्वी त्यांनी जे अध्ययन केले, ते पहिल्यावर्गातील विद्यार्थ्यास शोभेसे होते पहिल्या वर्गाचे विद्यार्थी हे गाईसारखे होत. मूठभर गवत खाऊन व घोटभर पाणी पिऊन गाय आम्हास अमृततुल्य दूध देते. पहिल्या वर्गातील विद्यार्थी थोडेसे शिक्षण घेऊन विद्वत्तेची उत्कृष्ट रसाळ फळे आपल्या देशबांधवांस देतात. त्यास अनुसरूनच आमच्या वामनरावजींनी वर्तन केले. दुसऱ्या वर्गाचे विद्यार्थी पोपटासारखे असतात. म्हणजे त्यास जे शिकवावे तेच काय ते येते, अधिक काही समजत नाही. वामनरावजी जर या वर्गातले असते. तर त्यांचे हाती काव्यसंग्रहाचे काम देण्यास कोणीच धजला नसता आणि काव्यविवेचनाचे काम ते स्वतःच करू लागले असते, तर कवींच्या मूळ काव्याहून त्यात अधिक असे काहीच नाही असे पाहून, त्याकडे कोणी ढुंकूनसुद्धा पाहिले नसते. तिसऱ्या वर्गाचे विद्यार्थी फुटक्या भांड्याप्रमाणे होत. त्यात ओतलेले पाणी हळूहळू झिरपून साफ नाहीसे होते त्याप्रमाणे जर वामनरावजींचे शिक्षण असते, तर त्यांच्या वडिलांनी जी झीज सोसली ती व्यर्थ गेली असती व विद्वद्वर्य डॉ. भांडारकरांसारख्या गुरूंची मेहनत व्यर्थ गेल्यामुळे, ते त्यांच्या प्रेमास अंतरले असते, फार काय सांगावे, त्यांनी रत्नागिऱ्या म्हणजे बुद्धिमान या विशेषणास काळिमा आणिला असता. चवथ्या वर्गाचे विद्यार्थी उसाचा रस गाळण्याच्या फडक्याप्रमाणे होत. चांगला गोड रस फडके गळू देते व केरकचरा, उसाचा चोथा वगैरे त्याज्य भाग गच्च धरून ठेविते, तद्वत चरित्रनायक असते, तर भारत भागवतासारख्या पुराण ग्रंथातील नीती, भक्ती, प्रीती इत्यादी विषयासंबंधी चांगले वर्णिलेले भाग अगदी विसरून जाऊन, अत्यंत दुष्टजनाच्या नीतिभ्रष्ट व भक्तिनष्ट कथा, काही उद्देशाने– म्हणजे त्यांचा परिणाम किती वाईट होतो व सत्याचा कसा जय होतो हे दाखविण्याकरिता मुद्दाम वर्णिल्या आहेत त्यांचे उद्देश मनात न वागविता, केवळ त्या अरिष्टोत्पादक कथा स्मरणात ठेविल्या असत्या व असल्या कथा पुराणात आहेत म्हणून, 'आमची पुराणे शिमगा आहे यास्तव, पुराणग्रंथ गाढवांवर लादून समुद्रात फेकून द्यावे.' अशा प्रकारचे बाष्कळ व पोरकट विचार त्यांनी प्रदर्शित केले असते परंतु, मराठी

कवितेचे नशीब थोर म्हणून वामनरावजींच्या विद्यार्थिदशेतला क्रम प्रस्तुत वर्णिलेल्या नीचतर वर्गाकडे न फिरता, तो अत्यंत उच्चतर वर्गाकडे वळला यामुळेच त्यांचे एवढे देव्हारे माजले आहे. (पृ. १०–११) (वस्तुत: एवढा मोठा उतारा देणे हाही एक ग्रंथविस्ताराचा भाग होय असा आक्षेप घेता येईल. परंतु तो धोका पत्करूनही मुद्दा स्पष्ट व्हावा म्हणून उतारा विस्ताराने दिला आहे क्षमस्व.) शब्दजालात वाचकांना अडकवून आपल्याबरोबर फरफटत नेण्याच्या या प्रयत्नातून काहीच निष्पन्न होत नाही. शेवटी या एकूण प्रयत्नात चरित्रकाराने व्यक्तिदर्शनाचे उद्दिष्ट कितपत साध्य केले या प्रश्नाचे उत्तर नकारात्मकच द्यावे लागते. इथे पृष्ठसंख्येच्या पसाऱ्याव्यतिरिक्त फारसे लाभत नाही.

बेलसरे, पेठे यांनी लिहिलेल्या चरित्रांच्या अपयशातून एक गोष्ट निश्चित होते ती अशी, की माहितीच्या अभावी चरित्रलेखनाचा प्रपंच निरर्थक ठरतो. निरर्थक अशा अर्थाने, की त्या चरित्रातून चरित्रविषय व्यक्तीचे सम्यक् दर्शन घडत नाही किंवा व्यापक व्यक्तिमत्त्वाचा पूर्ण आलेख निघत नाही आणि म्हणूनच चरित्र लिहिण्यापूर्वी चरित्रकाराने नायकाविषयी भरपूर माहिती गोळा करणे आवश्यक ठरते. त्यासाठी चरित्रकाराने भरपूर साधने उपलब्ध करून घेतली पाहिजेत.

प्राचीन काळी जेव्हा छपाईचा शोध लागलेला नव्हता, छापखाने अस्तित्वात नव्हते, साक्षरतेचे प्रमाण कमी होते, चरित्रकारांना केवळ हस्तलिखिते आणि ऐकीव माहिती यावर अवलंबून राहावे लागत होते, तेव्हा साधनांच्या अभावी चरित्रकारांची कशी कुचंबणा झाली असेल हे लक्षात येण्यासारखे आहे. प्राचीन चरित्रकार साधनांच्या बाबतीत आजच्या चरित्रकारांपेक्षा फारच अभागी ठरला. राजकीय पुढाऱ्यांनी तेव्हाही दणकेबाज भाषणे केली असतील. पण त्यावेळी ती लिहून घेणारे लघुलेखक नव्हते आणि ती छापणारी वर्तमानपत्रेही नव्हती. पोस्टखात्याच्या अभावी त्यावेळच्या चरित्रकारांना चरित्र विषय व्यक्तीची पत्रेही फारशी उपलब्ध झाली नसतील. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुढच्या पिढीला उपयुक्त ठरावीत म्हणून कागदपत्रे साठवून ठेवण्याची कल्पनाही तत्कालीन लोकांना नव्हती. साहजिकच चरित्रकारांना चरित्र लिहायचे म्हणजे साधने जमविण्याकरिता पायपिटी करावी लागत असे. अपार कष्ट उपसावे लागत असत. चरित्रलेखन ही कष्टसाध्य गोष्ट ठरली. याचा अपरिहार्य परिणाम असा झाला, की मध्ययुगातही वर्षानुवर्षे कागदपत्रांची जमवाजमव करण्याचे श्रम न घेता, चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाची थोडक्यात रूपरेखा देऊन, त्याच्या काही वैशिष्ट्यपूर्ण विचारांची आणि कृत्यांची नोंद करून, चरित्रलेखन आटोपण्याची प्रथा पडली. चरित्रकारात बहुसंख्य वाचकांची रुची (General appeal) असलेल्या कृतींवर लक्ष केंद्रीभूत करण्याची वृत्ती वाढली.

छपाईचा शोध लागला आणि सर्व मनू पालटला. १४७६ च्या सुमारास विल्यम कॅकस्टन (William Caxton) यांनी Westminster Abbey च्या जवळपास पहिला छापखाना सुरू केला आणि भावी पिढ्यांचा अमूल्य वारसा ठरलेल्या लेखनाच्या कामाला येथून सुरुवात झाली. भराभर ग्रंथ छापखान्यातून बाहेर पडू लागले. वर्तमानपत्रे सुरू झाली. साक्षरतेचे प्रमाण वाढले. पोस्ट खाते सुरू झाले आणि पत्रांसारखे प्रभावी साधन उपलब्ध झाले. लघुलेखन, टंकलेखन यामुळे चरित्रनायकाच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या शब्दांची तात्काळ नोंद होऊ लागली. औद्योगिक क्रांतीनंतर शास्त्रयुगाकडे झपाट्याने वाटचाल सुरू झालेली होतीच. या परिवर्तनात विद्या व ललित कला यांच्या पुनरुज्जीवनाच्या चळवळीची भर पडली. या चळवळीमुळे लोकांना ऐतिहासिक दृष्टी लाभली. चलत्‌चित्रपट, ध्वनिमुद्रक यंत्र इत्यादी साधनांमुळे कधी नव्हता इतका सूक्ष्म तपशील आज चरित्रकारांना उपलब्ध होऊ शकतो.

चरित्रलेखनात साधनांचा जाणिवपूर्वक उपयोग करण्याचा पहिला प्रयत्न जॉन ऑब्री यांनी केला. ते रॉयल सोसायटीचे सभासद होते. चरित्रलेखनात अचूकता यावी या विचाराने त्यांना पछाडले होते. जॉन ऑब्रीनंतर साधनांचे महत्त्व ओळखणारा कालक्रमानुसार दुसरा आणि वरच्या दर्जाचा चरित्रकार म्हणजे बॉस्वेल होय. चरित्रकारांना लेखनात अचूकता गाठताना नेहमी जेम्स बॉस्वेलचा आदर्श डोळ्यापुढे ठेवावा लागेल.

चरित्राला कोणता घाट येणार हे उपलब्ध असलेली साधने आणि त्यांचे स्वरूप यावर अवलंबून असते. पत्रे, दैनंदिनी, आत्मचरित्र, आठवणी, आख्यायिका यासारखा जीवनदर्शी, व्यक्तिदर्शी तपशील उपलब्ध करून देणारी साधने चरित्र-काराच्या हाती लागली म्हणजे नायकाचे व्यक्तित्वदर्शन यथार्थपणे घडविता येते. चरित्राला वाङ्‌मयीन घाट प्राप्त होतो. श्री. केळकरांनी लिहिलेल्या टिळक चरित्रात जीवनदर्शी, व्यक्तिदर्शी तपशीलापेक्षा पार्श्वभूमीला प्राधान्य दिल्यामुळे टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचे अंशदर्शनच फक्त घडते. आणि चरित्राला इतिहासाचा घाट येतो. रघुनाथशास्त्री दात्ये यांचे ' शालिवाहन चरित्र ' केवळ बखरी आणि दंतकथांवर आधारलेले आहे. साहजिकच या चरित्रात अवास्तव, अतिरंजित, अद्‌भुतरम्य घटनांचे प्राबल्य आहे. ते इतके, की हे चरित्र आणि अरबी भाषेतील सुरसकथांचा तोंडवळा सारखा वाटावा. अस्सल साधनांच्या अभावी हे असे होते. चरित्र हे प्रत्यक्षावर आधारलेले असते. प्रत्यक्षाचे हे अवशेष गोळा करताना सर्वसाधने हाताळणे आवश्यक आहे. जितकी अधिकाधिक साधने गोळा करावीत तितक्या चरित्रात कमी उणीवा राहतात. चरित्रकाराच्या हाती भरपूर साधने लागली आणि तीही अस्सल असली म्हणजे चरित्रात उणिवा तर कमी राहतातच,

शिवाय, चरित्रात मोकळ्या जागा राहत नाहीत आणि त्या भरून काढण्याकरिता कल्पनेचा आधार घेण्याचाही प्रश्न उपस्थित होत नाही. चरित्रलेखनात अचूकता येते. चरित्र वस्तुनिष्ठ बठते. मागे 'चरित्र कला की, कारागिरी ?' या प्रकरणात नागेश विनायक बापट यांनी लिहिलेल्या बाजीरावांच्या चरित्रात अस्सल ऐतिहासिक कागदपत्रांच्या अभावी मोकळ्या जागा त्यांनी कल्पनेने भरून काढल्या आणि चरित्राला चरित्रात्मक कादंबरीचा घाट कसा प्राप्त झाला हे पाहिले आहेच. या उलट, प्रा. बेहेरेंना बाजीरावाचे चरित्र लिहिताना भरपूर अस्सल ऐतिहासिक साधने उपलब्ध झाली, त्यामुळे त्या चरित्रात अनैतिहासिकता आढळत नाही. चरित्रात अचूकता येऊन ते वस्तुनिष्ठ बठले. पण तरीही केवळ ऐतिहासिक दप्तरातील कागदपत्रावर बेहेरेंना अवलंबून राहावे लागले असल्यामुळे या चरित्रातून बाजीरावाच्या खाजगी जीवनावर प्रकाश पडत नाही. तेव्हा विषय एकच पण उपलब्ध असलेली साधने आणि त्यांचे स्वरूप यामुळे या दोन कृतींमध्ये एवढी तफावत पडली आहे.

चरित्रकाराची चरित्रविषय व्यक्तीशी ओळख असली तर उत्तमच; (आणि तशी ती अनेकवेळा असतेही). तथापि ओळख असली काय आणि नसली काय, चरित्रकाराला स्वतःच्या संकल्पित चरित्राची सामग्री गोळा करावी लागते. ज्या व्यक्तीचे चरित्र लिहावयाचे त्याने ठरविलले असते त्या व्यक्तीची पत्रे, टिपणे, रोजनिशा तशीच त्या व्यक्तीच्या नातेवाईकांकडून उपलब्ध झालेली माहिती आणि मित्रमंडळींच्या मुलाखती, अभिप्राय इत्यादी चरित्रग्रंथाचे साहित्य एकत्रित करताना चरित्रकाराला अतोनात श्रम करणे भाग पडते. त्यातून हे चरित्र जर एखाद्या राजकीय, सामाजिक किंवा वाङ्मयीन क्षेत्रात कीर्ती संपादन केलेल्या थोर व्यक्तीचे असले तर चरित्रकाराला आपल्या चरित्रनायकाच्या राजकीय, सामाजिक आणि वाङ्मयीन इतिहासाचा परिचय करून घ्यावा लागतो. पण इतके करूनही चरित्रविषय व्यक्तीच्या अंतरंगाची ओळख पटली असे त्याला निश्चितपणे सांगता येत नाही. कितीही साधने गोळा केली तरी चरित्रकाराचे समाधान होत नाही. सर भालचंद्र भाटवडेकरांचे चरित्र लिहिण्यापूर्वी शक्य तितकी साधने गोळा करूनही गार्गी भाटवडेकरांचे समाधान झाले नाही. चरित्राला लिहिलेल्या प्रस्तावनेत त्या लिहितात, 'चरित्रविषयक साधनांच्या अडचणी सतत भासत होत्या. पहिली अडचण अस्सल विश्वसनीय कागदपत्रांची पडली. घरातील संग्रहात पुष्कळ बहुमोल पत्रे कागद वगैरेंचा संग्रह होता, त्यांचा हे चरित्र लिहिताना चांगला उपयोग करून घेता आला. पण यापेक्षा जास्त कागदपत्रे सापडती तर चरित्रलेखनात दिसून येणाऱ्या कित्येक उणिवा सहज काढून टाकता आल्या असत्या. याशिवाय दुसरी साधने जुनी मासिके, वृत्तपत्रे, समकालीन व्यक्तींची चरित्रे वगैरे होत. ही साधनेसुद्धा

भरपूर प्रमाणात उपलब्ध झाली नाहीत. परंतु जेवढी मिळाली तेवढ्यांचा उपयोग केला आहे. केसरी, इंदुप्रकाश, टाइम्स ऑफ इंडिया, ज्ञानप्रकाश, व्यंकटेश्वर समाचार, गुजराती अशा काही वृत्तपत्रांच्या फायलींतून बरीच माहिती गोळा करता आली. भालचंद्रांच्या निबंध व्याख्यानांची पुस्तके, त्यांचा संबंध असलेल्या कमिट्यां-पैकी कित्येकांचे अहवाल मरहूम मलबारी शेटजींचे 'गुजरात अँड द गुजरातीज' यासारखी पुस्तके. अशी जीं साधने हाती आली, ती कारणी लावली आहेत.'४ चरित्रकारांना कितीही साधने उपलब्ध झाली तरी ती अपुरीच वाटावीत याचे एक कारण असे आहे, की ही सर्व साधने उपलब्ध असली समजा ती विश्वसनीय आहेत असे मानले, तरी शेवटी मनुष्याच्या जीवनात अशा कित्येक गोष्टी घडलेल्या असतात, की त्यांचा छडा लावणे अशक्य होऊन बसते. अखेरीस चरित्रनायकाच्या जीवनाबद्दलची माहिती उपलब्ध सामग्रीवरून जेवढी मिळते तेवढ्यावर चरित्र-काराला संतुष्ट राहावे लागते म्हणजे चरित्रकाराला आपल्यासमोर जी साधने असतील तेवढ्यावरून चरित्रविषय व्यक्तीचे चित्र रंगविणे भाग पडते हे स्पष्ट होय.

कितीही साधनं उपलब्ध झाली तरी ती अपुरीच पडतात, याचा अर्थ असा नव्हे, की चरित्रकाराने साधनांच्या बाबतीत अल्पसंतुष्ट असावे. उपलब्ध झालेल्या साधनांच्याद्वारे चरित्रविषय व्यक्तीच्या जीवनाचे यथातथ्य चित्रण करता येईल इतका जीवनदर्शी तपशील चरित्रकाराला उपलब्ध व्हावा, म्हणजे चरित्रातले जीवनदर्शन मर्यादित होत नाही. चरित्रविषयभूत व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेऊन, त्या व्यक्तिमत्त्वाचे यथार्थदर्शन घडविता येईल इतकी साधने चरित्रकारा-पाशी उपलब्ध असलीच पाहिजेत. यापेक्षा कमी साधनांच्या आधारे चरित्राचा प्रपंच मांडणे चुकीचे ठरेल. या संदर्भात लिऑन एडेल लिहितात, 'कागदपत्रामधून चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे वाचकांना अनुमान करायला लावण्यापेक्षा नायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे बळ नेमके कशात आहे याचा वेध घेणे हे आधुनिक चरित्रकाराचे काम आहे. माफक साम्य जरी चरित्रकाराला साधता आले तरी अधिक साधने खणून काढल्यावर आपण उभे केलेले चित्र पार पालटेल अशी भीती त्याने बाळगण्याचे कारण नाही, त्या साधनांनी चित्रणाला नवे परिमाण लाभू द्यावे परंतु आकृतिविशेष फारसे बदलू नये. काही झाले तरी, चित्र रंगविण्या-इतकी आणि निर्णयाप्रत येता येईल इतकी साधने त्याला उपलब्ध झालेली असतात, या उदंड साधनातून काही क्षणाची निवड करून चरित्रनायकाच्या जीवनातील नेमके नाटच त्याला पकडता येईल आणि काही उप आख्याने हुडकून

---

४– भाटवडेकर, गार्गी. 'डॉ. सर भालचंद्र कृष्णा भाटवडेकर,' प्रकाशक, मोरेश्वर भालचंद्र भाटवडेकर, मुंबई, १९३७, प्रस्तावक, पृ. ८.

त्या द्वारे व्यक्तमत्त्व स्पष्ट करता येईल, चित्रणात हुबेहूबपणा आणता येईल.'[५]

चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे यथार्थदर्शन घडविता येईल इतकी विपुल सामग्री गोळा करायची म्हणजे चरित्रकाराला साधने नेमकी कशी हुडकून काढा· यची याचे तंत्र अवगत व्हायला हवे. उपलब्ध झालेली साधने पुन्हा तपासून घेतली पाहिजेत. चरित्रकाराने साधनांचा शोध घेताना आणि त्यांची चिकित्सापूर्वक तपासणी करताना इतिहासकाराची भूमिका घेणे आवश्यक आहे. चरित्रकारांवर सत्यप्रतिपादनाची जबाबदारी असते आणि म्हणूनच साधने भरपूर उपलब्ध झाली तरी ती विश्वसनीय असावी लागतात. चरित्रविषय व्यक्तीच्या जीवनाची वस्तुस्थिती रेखाटताना पुराव्याची छाननी जितकी करणे शक्य आहे तितकी करावी लागते. विविध साधनांच्या द्वारे उपलब्ध झालेल्या घटितांचा खरेपणा तपासून पाहणे आवश्यक असते. चरित्रकारापुढे असलेल्या घटितांच्या संदर्भात स्वतः काही निर्णयाप्रत येण्यापूर्वी ती घटिते नीट जोखून घ्यावी लागतात. त्यांचे बारकावे, कानेकोपरे पारखून घ्यावे लागतात. इथेच चरित्रकाराला ऐतिहासिक दृष्टीची खरी आवश्यकता असते. सुप्रसिद्ध इतिहासकार ड्यूमस मॅलोन (Dumas Malone) यांनी या संदर्भात पुढील मत व्यक्त केले आहे. ते लिहितात, 'खरी सामग्री संपादन करण्याच्या प्रयत्नात शोधकाला कुठल्याही इतिहासकाराप्रमाणे उद्योगशील आणि मेहनती असलेच पाहिजे आणि त्या सामग्रीचे अर्थबोधन करताना त्याने तितकेच प्रामाणिक असले पाहिजे.'[६]

उपलब्ध झालेला पुरावा सत्याच्या निकषावर तपासून पाहणे हे काम असावे तितके सोपे नाही. आठवणींच्या संग्रहात समाविष्ट झालेली जाणत्या पुढाऱ्यांची विधानेही सत्याच्या कसोटीवर तपासून पाहिल्याशिवाय सहजासहजी स्वीकारता येत नाहीत. चरित्रनायकाच्या व्यक्तित्वाची, कर्तृत्वाची साक्ष देणाऱ्या मृतव्यक्तींची विधानेही तशीच तपासून घ्यावी लागतात. कुणी द्वेषापायी ती विधाने केलेली असतात, तर कुणी फाजील विनोदाने बोलून गेलेला असतो, शंभरात एखादाच ती विधाने इमानाने करतो. जाहिराती किंवा छोट्या पुस्तिकांचा चरित्रात उपयोग करताना तर फारच दक्षता घ्यावी लागते. प्रचारपत्रे कोणत्या परिस्थितीत कोणत्या हेतूने लिहिली गेली याची कल्पना जर चरित्रकाराला नसेल तर सत्यापासून तो दूर जाण्याची शक्यता असते. रोजनिशी, पत्रे यासारख्या अस्सल साधनांचा उपयोग करतानाही कौशल्य आणि तारतम्य हवे असते. कित्येकदा

---

5– 'Edel Leon, That one may say this was the man ?' The New York Times Book Review, June 24, 1956, P. 1.

6– Stranger Joseph. R. 'The Interpretation of History' Princeton University Press, 1943, P. 144.

अगदी क्षुल्लक, निसटते विचार आणि भाव रोजनिशीतून, पत्रातून नोंदले जाऊन त्यांना उगाचच प्रतिष्ठा प्राप्त होते. कधी कधी लेखकाच्या प्रांजळपणाबद्दल, त्याने भावना लपविण्याचा प्रयत्न केला असल्याची शंका घेण्यास जागा उरते. चरित्रकारापुढे पसरलेल्या साधनात कित्येक परस्परविरुद्ध व विसंगत गोष्टी त्याच्या नजरेस येतात. अशावेळी चरित्रकार तिठ्य वर उभा असतो अनेक परस्परविरुद्ध विसंगत गोष्टीतून नेमके सत्य कसे हुडकून काढायचे असा पेच त्याच्यापुढे पडतो. परंतु त्यातून तारतम्याने योग्य ती निवड करून व्यक्तीचे चित्र उभे करण्यात त्याची कला साठविलेली आहे. नाहीतरी एरव्ही पूर्ण सत्य हे चरित्रकाराच्या आवाक्या बाहेरचे असते. त्या बाबतीत सत्याच्या शक्य तितक्या जवळ जाण्याचा प्रयत्न करणे इष्ट होय. अनेक नामवंत चरित्रकारांनी हेच केले आहे.

ऐतिहासिक व्यक्तींच्या संदर्भात अनेक वाद निर्माण होतात. आपल्याकडे शिवजन्मतिथीसंबंधाने इतिहासकारांनी भिन्न मते नोंदली आहेत. तुकारामांची ' गाथा ' बुडविली की ' गीता ' बुडविली ? अशीही शंका कधी घेतली जाते. वामन पंडित व हरी एक का दोन ? हा वाद सुप्रसिद्धच आहे. साक्रेतीसने किती स्त्रियांशी विवाहकेला, असाही एक वादाचा प्रश्न आहे, रोलिन साहेबांनी लिहिलेल्या ग्रंथावरून साक्रेतीसचे चरित्र लिहिणाऱ्या कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी हा वाद मोठ्या कौशल्याने हाताळला आहे. चरित्रात सत्याचा विपर्यास होऊ नये म्हणून कृष्णशास्त्री फार जपतात. चरित्र वस्तुनिष्ठ व्हावे म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न करताना आढळतात. जिथे माहिती संशयास्पद आहे व निर्णय करता येत नाही, तिथे तळटिपा देऊन लेखकाने स्पष्ट उल्लेख केले आहेत. जिथे निर्णयाला वाव आहे तिथे कृष्णशास्त्र्यांनी सत्याच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न केला आहे साक्रेतीसच्या स्त्रियांच्या संदर्भात उपस्थित झालेल्या वादाच्या दोन्ही बाजू मांडून कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी सत्याकडे झुकणारा स्वतःचा निर्णय दिला आहे ते लिहितात, ' कोणी प्राचीन ग्रंथकार असे लिहितात की, साक्रेतीस ह्यास दुसरी एक बायको होती, तिचे नाव मिरतो... पिलापोनीससची लढाई चालली असता मोठी जरीमरी उठून अथेन्स शहरातील बहुत मनुष्ये मेली, मग पुनः लोकांचा भरणा लवकर व्हावा म्हणून अथेन्स शहरात असे ठरविले होते की, ज्यास पाहिजे त्याने एका काळी दोन बायका कराव्या. साक्रेतीस ह्याने ह्या ठरावाप्रमाणे दोन बायका केल्या होत्या, असे ग्रंथकारास वाटण्यास एका ग्रंथाचा आधार आहे. परंतु प्लेतो, जेनोफन वगैरे ग्रंथकार साक्रेतिसाचे शिष्य होते, त्यांस त्याची चांगली माहीतगारी होती. ते त्याच्या दुसऱ्या लग्नाची कोठे काहीच गोष्ट लिहीत नाहीत. तसेच जेनोफन दायदोरस वगैरे ग्रीस देशाचे इतिहासकार त्यांनी पिलापोनीसच्या लढाईची सविस्तर हकीकत लिहिली आहे; परंतु ती लढाई चालली असता अथेन्स शहरात वर

सांगितलेला कायदा ठरला होता, असे त्यांनी कोठेही लिहिले नाही, ह्यावरून साक्रेतीस ह्याने एका काळी दोन बायका केल्या होत्या, ही गोष्ट अगदी खोटी आहे असे सिद्ध होते.'[७]

प्लूटार्कने राजकीय पुढाऱ्यांची चरित्रे लिहिली. तो भरपूर साधने गोळा करीत असे. कागदोपत्री पुराव्याबरोबरच चरित्रनायकाशी समकालीन लोकांकडून मिळणारी ऐकीव माहिती आणि त्यांच्या अनुभवांचा तो चरित्राकरिता उपयोग करून घेत असे. परंतु ऐकीव माहिती नीट पारखून घेतल्याशिवाय तो स्वीकारीत नसे. एखाद्या घटनेच्या परस्परविरोधी हकीकतींपैकी चरित्रनायकाच्या व्यक्तिवैशिष्टयांशी व स्वभावाशी जुळणारी हकीकत तो स्वीकारीत असे.

एक अनुभवी चरित्रकार या दृष्टीने 'Young Samuel Johnson 'चे चरित्र लिहिताना, सत्यासत्याची पारख करताना जेम्स एल्. विलफर्ड यांनी कशी दक्षता घेतली हे त्यांच्याच शब्दात समजावून घेणे आवश्यक आहे. ते लिहितात, ' जॉन्सनच्या चरित्रकारापुढे एक प्रश्न सतत उभा आहे तो खरेपणाबद्दलच्या खात्रीचा. विश्वसनीय काय आहे नि काय नाही ? पुष्कळशा कथा एकाने दुसऱ्यास दुसऱ्याने तिसऱ्यास सांगितलेल्या ठरतात. काही अधिक सुप्रसिद्ध उपकथांचे बहुधा चार किंवा पाच निरनिराळे पाठभेद आढळतात. त्यातला कोणता निवडायचा ? जे काही मागे राहिले आहे त्यात केवळ कर्णोपकर्णी आलेल्या गोष्टी आणि प्रासंगिक गप्पा आहेत

पुराव्याच्या प्रत्येक तुकडयाचे पूर्णपणे मूल्यमापन करावयाचे म्हणजे बराच विस्तार झाला असता. शिवाय, प्रत्येक तपशील मोजूनमापून किंवा पारखून घेतला असता तर ती वाचकांच्या सहनशीलतेची अतिशय परीक्षा ठरली असती. अशा तऱ्हेची चर्चा मला शक्य होती तितकी मी टाळली आहे. आणि माझ्या दृष्टीने मला जे सत्याच्या अधिक जवळचे वाटले त्याचीच मी निवड करण्याचा प्रयत्न केला आहे. जिथे निर्णय संशयास्पद आहेत तिथे मी तसे म्हटले आहे. सर्वसाधारणपणे मी प्रत्येक प्रसंगाच्या अस्सल नोंदलेल्या हकीकतीचा उपयोग केला आहे.'[८]

विविधसाधनांद्वारे उपलब्ध झालेली घटिते सत्य तर असावीतच पण शिवाय त्या घटितात चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश फेकण्याचे अंगभूत सामर्थ्य असावे. कारण, चरित्रकाराला चिकित्सापूर्वक तपासणी करून उपलब्ध झालेल्या साधनांच्या द्वारे, चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाची रूपरेखा निश्चित करावयाची

---

७– चिपळूणकर, कृष्ण शास्त्री. 'साक्रेतिसाचे चरित्र,' प्रकाशक– शंकर नरहर जोशी पुणे, १९९८ आवृत्ती तेरावी. पृ. १२–१३.

8– Clifford, James. L. 'Young Samuel Johnson', William Heinemann Ltd., 1956, Preface, P. ix.

असते. साधनांच्या आशयाचे रुपांतर चरित्र विषयात करावयाचे असते. चरित्र-कारापुढे पसरलेली साधने– ते कागद, त्यावरची ती अक्षरे आणि शब्द हे चरित्र विषय व्यक्तीच्या जीवनाचे अवशेष अचेतन असतात, त्यात चेतना निर्माण करावयाची असते. विविध साधनातून उपलब्ध झालेला आशय एकजीव करून त्यातून चरित्रविषय व्यक्तीची जिवंत प्रतिमा उभी करावयाची असते. अखेरीस चरित्राची साधने म्हणजे तरी काय? थोडया व्यापक दृष्टीने पाहिले, तर चरित्राची साधने म्हणजे चरित्रनायकाच्या जीवनाबद्दलची माहिती असेच म्हणावे लागते. तेव्हा ही उपलब्ध झालेली साधने म्हणा, माहिती म्हणा कथेच्या ओघात एकजीव झाली पाहिजे. त्यातून चरित्रनायकाच्या जीवनाचे सारे तपशील स्पंदन पावत असल्याचा प्रत्यय वाचकाला यावा. त्यामुळे चरित्रनायकाचे धावते चित्रमय दर्शन आणि त्याच्या व्यक्तित्वाच्या विविध अंगांनी साकारलेले व्यक्तिमत्त्व चक्षुर्वैसत्यं वाचकांच्या नजरेसमोर उभे राहावे, त्याचे मन भारावून टाकण्याची, त्याला स्वतःला हरवून टाकण्याची किमया चरित्रकाराला साध्य व्हावी.

चरित्राची साधने भरपूर असावीत, त्यांची चिकित्सापूर्वक तपासणी व्हावी, त्यातून चरित्रनायकाचे जिवंत व्यक्तिमत्त्व वाचकांच्या मनावर ठसावे. हे वरील चर्चेतून हाती आलेले मुद्दे. आता व्यक्तित्वदर्शनाचे उद्दिष्ट साध्य करताना कोणकोणती साधने सहाय्यभूत होतात ते पाहू.

चरित्रविषयभूत व्यक्तीचे स्वतःचे लेखन हे चरित्राचे अत्यंत महत्त्वाचे साधन होय. कारण, त्याच्या स्वतःबद्दल त्याच्याइतकी इतरांना माहिती नसते. यात पुढील गोष्टींचा समावेश करता येईल.

१) आत्मचरित्र.
२) दैनंदिनी.
३) पत्रे.
४) त्याच्या प्रकाशित सृजनशील व इतर कृती :

| | | |
|---|---|---|
| साहित्यिक | – | साहित्य. |
| राजकीय सामाजिक पुढारी | – | भाषणे, मुलाखती. |
| कलावंत | – | संगीत, चित्रे. |
| शिल्पशास्त्रज्ञ | – | इमारती. |

इतर साधने पुढीलप्रमाणे–

१) आठवणी.
२) आख्यायिका.
३) पूर्वी वेळोवेळी इतरांनी लिहून ठेवलेले त्या त्या मुदतीपर्यंतचे म्हणूनच अपुरे चरित्रग्रंथ.

चरित्रनायकाचे इतर व्यक्तिगत अवशेष–

१) छायाचित्रें.

२) कपडे.

३) सर्व प्रकारचे संग्रह.

४) कात्रणें.

चरित्राची मानसशास्त्रीय साधने–

१) चरित्रनायकाचे आत्मपरीक्षणात्मक निरीक्षण.

२) चरित्रनायकाच्या ठाम कृती.
(शब्दापेक्षा कृती अधिक बोलक्या असतात).

३) हस्ताक्षर.

वरील साधनांपैकी काही ठळक आणि महत्त्वाच्या साधनांची आता विस्ताराने चर्चा करू.

आत्मचरित्र– हे अखेरच्या दिवसात लिहिले जाते. त्यामुळे आत्मचरित्र-काराला स्मृतींवर विसंबून राहावे लागते. आत्मचरित्रकाराला दिनचर्या लिहिण्याची सवय असेल, त्याच्याजवळ त्याचा पत्रव्यवहार उपलब्ध असेल तर फारच चांगले· पण तरीही बालपणाच्या स्मृती पुसट होतात. बालपणच्या घडामोडी लिहिताना स्मृतीला ताण द्यावा लागतो आणि म्हणूनच चरित्राकरिता आत्मचरित्राचा उपयोग करताना सावधगिरी बाळगावी लागते. आत्मचरित्र आत्मलक्षीपणे लिहिले गेले तरी ते सत्यनिष्ठ असेलच असे नाही. आत्मचरित्रलेखनामागची प्रेरणा आत्म-दर्शनाचीच असेल असेही नाही. आत्मदर्शनाशिवाय अन्य प्रेरणेने आत्मचरित्र लिहिले जाऊ शकते. आत्मचरित्रनिर्मिती मागची नेमकी प्रेरणा कोणती हे पाहिले पाहिजे. कधी कधी आत्मचरित्रनिर्मिती मागची प्रेरणा समर्थनाची असते. स्वतःचे कर्तृत्व आत्मचरित्रात फुगवून सांगण्याचाही प्रयत्न होतो शत्रूंवरचा राग काढण्या-करिता आत्मचरित्रासारखी सोयिस्कर जागा नाही. कित्येकदा आत्मचरित्रात नायकाचा फाजील विनय डोकावतो. आत्मगौरव, आत्मप्रदर्शन अगर आत्मसमर्थनार्थ लिहिली गेलेली आत्मचरित्रे त्या आत्मचरित्रकार व्यक्तींच्या जीवनाशी संलग्न असणाऱ्या जीवनाचे सत्यदर्शन घडवू शकत नाहीत. खऱ्याखुऱ्या आत्मचरित्र-निर्मितीस जी अलिप्तता आवश्यक असते, जो संयम हवा असतो, तो ह्यात आढळणे दुरापास्त असते. ह्या वाङ्मयप्रकाराकडे एका स्वार्थी दृष्टिकोनातून पाहिले' आपल्या विशिष्ट हेतुपूर्तीसाठी एक साधन म्हणून त्याचा उपयोग केला म्हणजे खरेखुरे आत्मप्रकटीकरण दुरावते. आत्मचरित्रात जेव्हा केवळ आत्मदर्शनाच्या हेतूने आत्मप्रकटीकरण होते, तेव्हाच ते आत्मचरित्र चरित्राकरिता अधिक उपयुक्त ठरते. कारण अशा चरित्रात जिथे आत्मचरित्राचा आधार घेतलेला असतो तिथे,

' A man 's own words are the man himself '[९] या अवतरणातील आशयाचा प्रत्यय येतो. चरित्रनायकाने स्वतःच स्वतःची जीवनकहाणी त्या आत्मचरित्रात केवळ आत्मदर्शनाच्या हेतूने सांगितलेली असल्यामुळे कुणालाही उपलब्ध होऊ शकणार नाही इतकी साधनसामग्री त्याला उपलब्ध झालेली असते. ज्या त्याच्या प्रेरणांवर अगदी कष्टाळू संशोधकालाही प्रकाश टाकता येणार नाही, त्या प्रेरणांचा अशा आत्मचरित्रात सहज उलगडा होतो. म्हणूनच कदाचित चरित्रनायकाची जीवनकथा मध्यस्थाच्या तोंडून ऐकण्याऐवजी ती त्याच्याच तोंडून ऐकणे वाचकांना अधिक पसंत पडेल.

दैनंदिनी– मराठी चरित्रात उणीव राहण्याचे एक मोठे कारण म्हणजे पत्रे, दैनंदिनी यासारख्या साधनसामग्रीचा तुटवडा. आपल्याकडे दैनंदिनी लिहिण्याचे व तो जपून ठेवण्याचे श्रम फारसे कुणी घेतलेच नाहीत. टिळकांसारख्यांनीही दैनंदिनी लेखनाकडे दुर्लक्षच केले. रेव्ह. टिळकांना दैनंदिनी लिहिण्याची थोडीशी सवय होती असे दिसते. श्री पांगारकरांनी मात्र चिकाटीने दैनंदिनी लिहिण्याचा क्रम चालू ठेवला होता. श्री पांगारकर आपल्या आत्मचरित्राच्या प्रस्तावनेत लिहितात, ' रोजनिशी ठेवण्याचा मला छंद १८९४ साली लागला. गेल्या चव्वेचाळीस वर्षांपैकी सुमारे चाळीस वर्षांच्या रोजनिशा आज मजजवळ आहेत. चांगला विचार कोठे आढळला, सुचला किंवा ऐकला, तर तो रोजनिशीत टिपून घ्यायचा, काही महत्त्वाचे प्रवास कोणाच्या गाठीभेठी, संवाद यांची टाचणे ठेवायची अशी सवय लागली.'[१०] पांगारकरांनी ' चरित्रचंद्र ' लिहिताना आपल्या दैनंदिनीचा चांगलाच उपयोग करून घेतला. पांगारकरांचे कुणी चरित्र लिहावयाचे ठरविल्यास त्यांच्या दैनंदिनीचा चरित्रकाराला चांगलाच उपयोग होईल यात शंका नाही. पण रानडे, टिळक, गोखले इत्यादी प्रसिद्ध पुरुषांची जी चरित्रे लिहिली गेली आहेत. त्यात दैनंदिनीचा भरपूर उपयोग केल्याचे कुठे दिसत नाही. टिळकांचे चरित्र लिहिताना श्री केळकर यांना दैनंदिनीचा अभाव कसा जाणवला ते त्यांनी ' गतगोष्टी ' या आत्मचरित्रात्मक ग्रंथात सांगितले आहे. ते लिहितात, ' लो. टिळक यांचे चरित्र तीन खंडात मिळून मी लिहिले. त्यावेळी पत्रव्यवहार व रोजनिशा यांच्या अभावामुळे होणाऱ्या हानीची जाणीव मला चांगलीच कळून आली... (केसरी–मराठा) पत्रांत उल्लेख झाला तो मुख्यत: राजकीय स्वरूपाच्या विषयांवरील त्यांच्या मतांचा आणि फार तर त्यांनी केलेल्या उघड चळवळींतील सभा संमेलने यांचा. पण या सर्वांच्या मागे वर्तमान-

9– Strager, Joseph R. ' The Interpretation of History ', Princeton University Press, 1943, P. 123.

१०– पांगारकर, ल. रा. ' चरित्रचंद्र म्हणजेच पांगारकरांचे आत्मचरित्र ' नाशिक, नगर. प्रस्तावना, पृ. १३.

-पत्रात अलिखित परंतु एखाद्या चरित्र-ग्रंथांत लिहिण्याचा योग्य असे कितीतरी प्रसंग घडले असतील याची कल्पना कोणालाही करता येईल. या गोष्टी म्हणजे खाजगी उद्योग, व्यक्ती व्यक्तींच्या गाठीभेटी, संभाषणे, सुखदुःखाचे प्रसंग म्हणजे एकंदरीने उघड सार्वजनिक जीवनाच्या पोषाख पेहरावाला आतून अस्तरा-सारख्या चिकटलेल्या पण बाहेरून दिसून न येणाऱ्या गोष्टी आणि व्यक्तिजीवनाचे स्वारस्य अशाच गोष्टीत असते हे कोणत्याही चरित्रग्रंथावरून किंवा आत्मचरित्र ग्रंथावरून दिसून येते'[११अ] या उताऱ्यावरून दैनंदिनी, पत्रे यामुळे जीवनदर्शी तपशील उपलब्ध होतो याची जाणीव श्री. केळकरांना झाली होती असे दिसते.

पाश्चात्य देशात या गोष्टीचे महत्त्व सगळ्याच लोकांना पटले आहे असे नाही. काही थोड्या थोरामोठ्यांच्या घराण्यात कागदपत्रे जपून ठेवण्याची पद्धती आहे. दैनंदिनी सर्वच लिहितात असे नाही. तरी याबाबतीत आपल्याइतकी अनास्था तिकडे दिसत नाही. ज्या थोर पुरुषांची चरित्रे प्रसिद्ध आहेत. त्या दैनंदिनीचा भरपूर उपयोग केल्याचे आढळून येते व अत्यंत खाजगी स्वरूपाचा पत्रव्यवहार चरित्रकाराला उपलब्ध झालेला दिसून येतो. शेलीच्या चरित्रात आंद्रें मोर्वा याने शेलेच्या प्रेमपत्रांचा उपयोग केला आहे. लुडबोग याने तर नेपोलियनने जोसेफाइनला लिहिलेली बरीचशी अत्यंत खाजगी पत्रे नेपोलियनच्या चरित्रात दिली आहेत. त्यामुळे नेपोलियनचे स्वभावचित्र खुलून दिसते. अर्थात ही सर्व पत्रे कोणीतरी जपून ठेवली आणि त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांचा चरित्रकारांना उपयोग करू दिला म्हणून त्यांची चरित्रे लिहिणे सुलभ झाले. नाहीतर शेलींच्या कवितेची चर्चा करण्यापलिकडे आणि नेपोलियनच्या लढायांची हकीकत देण्यापलिकडे चरित्रकार काही करू शकले नसते.

दैनंदिनी हे एक प्रामाणिक आत्मचरित्र असावे. पण दैनंदिनीमधे जे लिहिले जाते ते 'खरे' असतेच असे कशावरून ? असा एक आक्षेप दैनंदिनीच्या बाबतीत घेता येण्यासारखा आहे. या आक्षेपात काही प्रमाणात तथ्य आहे. अगदी सुखी दांपत्याच्या वैवाहिक जीवनातही काही गोष्टी हातच्या राखलेल्या असणारच आणि आपल्या मृत्यूनंतर एका आठवड्याने दैनंदिनी चाळताना त्या उजेडात आल्यावर, पत्नीने दैनंदिनीच्या चिंधड्या चिंधड्या उडवाव्यात अशी अपेक्षा कुणीही करणार नाही. त्या दृष्टीने पाहिले तर दैनंदिनीमधे देखील माणसाच्या स्वभावाचे पूर्ण दर्शन घडणे अशक्य आहे. बहुधा दैनंदिनीमधून ज्या तपशीलाबद्दलची आस्था निरंतर टिकून राहणार नाही, असा क्षणिक तपशील खच्चून भरलेला असतो. दैनंदिनीचे लेखन जेव्हा व्यक्तीच्या स्वत:पुरते मर्यादित असते, दैनंदिनी कुणाच्याही

---

११ अ– केळकर, न. चिं. 'गतगोष्टी अर्थात माझी जीवनयात्रा', प्रकाशक, यशवंत नरसिंह केळकर, प्र. आ. १९३९, हृद्गत, पृ. ३५.

हाती पडणार नाही, कुणीही ती वाचण्याची सुतराम शक्यता नाही याची तिला खात्री असते, तेव्हाच दैनंदिनीतून सत्यनिष्ठ मजकूर लिहिला जाण्याची शक्यता आहे. अशा वेळी सत्य दडवून ठेवण्याची आवश्यकता उरत नाही. नग्नावस्थेत स्नान करताना माणसाला स्वतःची लाज वाटू नये तद्वत आपल्या भल्याबुऱ्या कृतींची नोंद करताना शरम वाटण्याचे कारण उरत नाही. सॅम्युएल पेपीज (Samuel Pepys) ने लिहिलेली दैनंदिनी त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे अचूक आणि पूर्णदर्शन घडविणारी आहे. याचे कारण ती दैनंदिनी सांकेतिक लिपीमध्ये लिहिलेली आहे. आपली दैनंदिनी जगाच्या नजरेस पडणार नाही आणि पडली तरी ती वाचण्याची तसदी कुणी घेणार नाही याची त्याला पूर्ण कल्पना असल्यामुळे इतके सत्यनिष्ठ लेखन त्याच्या हातून घडले.*

दैनंदिनीतून चरित्रनायकासंबंधाने पूर्ण सत्य हाती येणे अशक्य असले तरी तेवढ्यावरून दैनंदिनीचे महत्त्व कमी लेखता येत नाही. चरित्रकाराला चरित्र-विषय व्यक्तीच्या दैनंदिनीतून जीवनदर्शी तपशील उपलब्ध होतो. दैनंदिनीतून उपलब्ध झालेला हा तपशील अंतर्वेधी, आत्मनिष्ठ असतो. चरित्रनायकाच्या अंतरंगाचे दर्शन घडविणारा असतो. दैनंदिनीतून चरित्रनायकाच्या जीवनातील काही घटना, इतरांशी त्याचे असलेले संबंध व त्याची विवक्षित वेळची मनःस्थिती यांचा बोध होतो. कित्येकदा दैनंदिनीतून चरित्रविषयभूत व्यक्तीच्या जीवन-विषयक तत्त्वज्ञानाचे आकलन होते. इमर्सनच्या दैनंदिनीच्या दहा भागांतून त्याच्या आत्मचिंतनातून उभे राहिलेले तत्त्वज्ञान, विचार, शिकवणूक यांच्या विकासाचा आलेख सापडतो. कधी कधी दैनंदिनीतून चरित्रनायकाने हाती घेतलेल्या कार्याचा वृत्तांत सापडतो. प्रवासवर्णनाची, नव्या प्रदेशाच्या शोधार्थ केलेल्या प्रयत्नांची नोंद बहुधा दैनंदिनीतूनच होते. आत्मचरित्रापेक्षा दैनंदिनी अधिक विश्वसनीय ठरते. कारण ते लेखन रोजच्या रोज केल्यामुळे चरित्रकाराला आपल्या स्मृतीला ताण द्यावा लागत नाही. दैनंदिनी लिहायला सुरुवात केल्यापासून लेखन थांबविते-

---

* 'Went to church this morning. Excellent sermon, but distracted by back view of pretty girl in the few in front. Offered her a hymn–book to make her turn round. Front view disappointing, and looked cross. Plate instead offertorybag, nuisance. Had to give half a crown. Must remember to put six pences in my pocket.'

---

Lay Thoughts of a Dean by W. R. Inge. Page– 77.
G. P. Putnam 's Sons, New York and London, 1926.

पर्यंतच्या काळात रोज जर नेमाने झाले तर चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास कसकसा होत गेला याची कल्पना त्या दैनंदिनीतून चरित्रासारखी असते. मात्र एक गोष्ट इथे नमूद करणे आवश्यक आहे ती अशी, की दैनंदिनीतून चरित्रासारखी, आत्मचरित्रासारखी चरित्रनायकाच्या परिपूर्ण जीवनकथेची अपेक्षा करता येत नाही. श्री न. चि. केळकरांनी दैनंदिनीचे महत्त्व पुढील शब्दात विशद केले आहे. ' रोजनिशीला मी रोजमेळाच्या कीर्दीइतकी किंमत सहज देईन. अशा कीर्दीत चुका किंवा खोटे लिहिणे कोठे होतच नसेल असे म्हणता येणार नाही हे खरे. परंतु ती गोष्ट क्वचित घडते. निदान व्यक्तीच्या विशेष गुण दोषांच्या हकीकती वगळल्या तरी निरपेक्ष, निःस्वार्थी, अशा हकीकती पुष्कळच असणार. तारीखवार लिहिलेल्या नोंदी व टिपणे यांचे इतिहास दृष्टचा महत्त्व मुळीच नाकबूल करता येणार नाही. जो मनुष्य रोजनिशी दुसऱ्याला फसविण्याच्या दृष्टीने लिहील तो आत्मचरित्र ग्रंथात तसे काय कमी लिहील ? आणि ज्या संकलित इतिहासाला आपण डोळे मिटून विश्वसनीयतेचे प्रदान करतो तो तर, तिसऱ्याने चवथ्याकडून हकीकती मिळवून जुळवून लिहिलेला, म्हणून आत्मचरित्रापेक्षा कमी महत्त्वाचा ठरतो. तात्पर्य, संकलित इतिहासापेक्षा आत्मचरित्रांचे ग्रंथ आणि त्याहीपेक्षा नियमित वेळी लिहिलेल्या रोजनिशा यांना सर्वोत्तम पहिल्या प्रतीचे इतिहास साधन हे पद सहजच प्राप्त होते असे मला वाटते.'[११ब]

पत्रे १७५७ मध्ये रेव्ह. विल्यम मेसन (Rev. William Mason) यांनी थॉमस ग्रे कवीच्या कवितासंग्रहाला जोडलेल्या संक्षिप्त चरित्रात पत्रांचा उपयोग केला. यामुळे चरित्रलेखनात एक नवा पायंडा पडला. निवेदनाचा एक भाग म्हणून कथनाच्या ओघात कुठेतरी कशीतरी त्यांनी ती पत्रे वापरली नाहीत. त्यांनी मोठ्या कौशल्याने थॉमस ग्रेच्या शब्दातच त्याच्या जीवनकहाणीचे कथन केले. म्हणजे एका परीने त्यांनी थॉमस ग्रेलाच स्वतःचा चरित्रकार बनविले. याचा योग्य तोच परिणाम झाला आणि येथून पुढे चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे अणुरेणू सजीव करण्याचे एक साधन म्हणून पत्रांचे महत्त्व सर्वच चरित्रकारांना पटले.

मेसननंतर बॉसवेलने डॉ. जॉनसनच्या चरित्रात त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे यथातथ्य चित्रण व्हावे म्हणून पत्रांचा भरपूर उपयोग करून घेतला. मेसनच्या तंत्रात सुधारणा करून वा भर घालून त्याने स्वतःचे तंत्र बनविले आणि व्यक्तित्व-दर्शनाच्या कामी ते मोठ्या कौशल्याने व प्रामाणिकपणे राबविले. पत्रांच्या जोडीला जॉनसनच्या लेखनातील उतारे, त्याच्या तोंडचे शब्द आणि त्याचे संभाषण यांचा उपयोग करून, मूळ तंत्राची व्याप्ती वाढविताना त्याने प्लूटार्कचा आदर्श डोळ्या-पुढे ठेवला आणि जॉनसननेच घालून दिलेल्या तत्त्वांचा अंगीकार केला. टेम्पल

११ ब– Ibid, P. 34–35.

यांना २५ फेब्रुवारी १७८८ मध्ये लिहिलेल्या पत्रात बॉस्वेलने मेसनच्या तंत्राचे पुढील शब्दात कौतुक केले आहे. तो लिहितो, 'मेसनने लिहिलेले ग्रेचे चरित्र उत्तम आहे. कारण, त्यात माणूस दाखविणारी पत्रे पेरलेली आहेत. त्याने लिहिलेले व्हाईटहेडचे चरित्र हे चरित्रच नव्हे, कारण त्यात सुरुवातीपासून शेवटपर्यंत पत्रही नाही किंवा वक्तव्यही नाही.'[१२अ] याच पत्रातील मजकूराचा त्याने जॉनसनच्या चरित्राच्या पहिल्या प्रकरणात पुढील प्रमाणे विस्तार केला आहे. त्यात जॉनसनच्या चरित्रात त्याने ज्या हेतूने पत्रांचा समावेश केला तो हेतू स्पष्ट झाला आहे. तो लिहितो, 'मेसनच्या ग्रेच्या जीवनवृत्तांतातील उत्कृष्ट योजनेचा स्वीकार आणि विस्तार करण्याचा मी निर्धार केला आहे. जिथे जिथे वृत्तांतकथनाची आवश्यकता आहे तिथे तिथे ते मी माझे सर्व बुद्धिकौशल्य ओतून केले आहे, परंतु... ही पद्धत अधिक जिवंत आहे आणि ती ज्यांनी त्याला प्रत्यक्ष ओळखले त्यांच्यापैकी कित्येकां-पेक्षा त्याची माझ्या वाचकांशी अधिक चांगली ओळख पटवून देईल अशी खात्री पटल्यामुळे मला शक्य आहे तिथे मी त्याची स्वतःची टिपणे, पत्रे किंवा संभाषणे सादर करतो... मी जितका तत्पर आणि उत्सुक होतो, तितके त्याचे मित्र असते तर त्याचे जवळजवळ पूर्णपणे जतन होणे शक्य झाले असते.'[१२ब]

विविध साधनांचा उपयोग करून चरित्रलेखनात बॉसवेलने नवे तंत्र निर्माण केले असे म्हणता आले नाही तरी एवढे मात्र खचित् की त्याने पत्रे, चरित्र-नायकाचे लेखन, संभाषण, आख्यायिका याबाबतीत पूर्वसूरींच्या इतकी उदासीनता दाखविली नाही. किंबहुना चरित्राचा वाचक वर्ग डोळ्यापुढे ठेवून त्यांच्या मनावर काहीएक परिणाम साधण्याच्या हेतूने चरित्रनायक सजीव होऊन वाच-कांच्या बरोबर चालत आहे, बोलत आहे असा प्रत्यय त्यांच्या पदोपदी यावा म्हणून या सगळ्या सामग्रीचा त्याने योजनाबद्ध उपयोग केला. मधूनच प्रासंगिक अर्थबोधकरून, चरित्रनायकाच्या जीवनाचा पुरावा हळूहळू सादर करीत जाण्याचे त्याचे हे तंत्र अनुभवजन्य होते, जॉनसनने भाग घेतलेल्या अनेक प्रसंगांच्या विविध-रंगी आणि यथातथ्य चित्रणामुळे त्याच्या जीवनकहाणीत अपूर्वाई आली हेही खरेच.

प्रामाणिकपणे लिहिलेले, आत्मकेंद्री पत्र चरित्रलेखनाचे अस्सल साधन ठरते. कारण पत्रात व्यक्तीच्या शब्दातच तिचे मनोगत व्यक्त होते. विश्वसनीयतेच्या दृष्टीने त्यातल्या त्यात अधिक मौल्यवान साधन म्हणून पत्रांचा उल्लेख करता

---

12अ – Macan. R. W,. 'Essays by Divers Hands', Vol. XII, Royal Society of Literature Transactions, Humphrey Milford, Oxford University press, PP. 108–109

12ब – Ibid, P. 109.

येईल. ‘ The most satisfactory form of biography is a well-edited correspondence ’[१३] असे प्रशस्तिपत्र या प्रकाराला लॉर्ड मोर्ले यांनी दिले आहे. पेशवाईवर प्रकाश पाडणारी पेशवेदप्तरातील पत्रे म्हणजे तत्कालीन इतिहास लेखनाचे योग्य सुलभ आणि प्रभावी साधन होय. ऐतिहासिक पुरूषांच्या चरित्रात ऐतिहासिक पार्श्वभूमी रेखाटताना अशी पत्रे उपयुक्त ठरतात. सरकारी दप्तरातील कागदपत्रे ऐतिहासिक पार्श्वभूमी रेखाटताना साधन म्हणून जितकी अस्सल तितकीच खाजगी पत्रे व्यक्तिजीवनाचा इतिहास लिहिताना अस्सल ठरावीत. आत्मचरित्रा-पेक्षाही पत्रे अधिक विश्वसनीय ठरतात. कारण पत्रात तात्कालिक नोंद होते. ती नोंद होत असताना पत्रलेखकापुढे घडलेला प्रसंग अगदी ताजा असतो. पत्रलेखक व वाचक या दोघांमधले संबंध जिव्हाळ्याचे असले म्हणजे अगदी साधेपणाने व मोकळेपणाने लेखकाचे हृदगत व्यक्त झालेले असते. आणखी महत्त्वाची गोष्ट अशी, की पत्राचे स्वरूप मर्यादित असल्यामुळे सहसा खाजगी असते. माधवराव पटवर्धनांनी आपले मित्र श्री. भाऊराव मराठे यांना लिहिलेली पत्रे, आनंदीबाई जोशींनी इंग्लंडहून त्यांचे पती गोपाळराव जोशी यांना लिहिलेली पत्रे किंवा शिवाजीने व्यंकोजीला लिहिलेले पत्र, अशा पत्रातून पत्र लिहिणारा, वाचणारा व त्यात निर्देशिलेल्या अन्य व्यक्ती या सर्वांविषयी तर्क करता येतो. पूर्वी पत्रांचा पसारा मुळात कमी होता. पण आज तो व्याप वाढल्यामुळे हे साधन अधिक सुलभतेनें, प्रभावीपणे वापरता येऊ लागले आहे. येथे सहज सुचणारा प्रश्न असा, की आपले पत्र जपून ठेवले जाईल, त्याला भविष्यकाळात महत्त्व प्राप्त होईल याची कल्पनाही नसताना घाईघाईने खरडलेल्या पत्रावरून व्यक्तिमत्त्वासंबंधीने अंदाज कसा बांधावा ? पण अशाच सलगीने लिहिलेल्या पत्रांतून लिहिणाराचे खरेखुरे व्यक्तिमत्त्व म्हणा किंवा स्वभाववैशिष्ट्ये म्हणा अनाहूतपणे प्रकट होतात. मात्र एखाद्याच पत्रातून व्यक्तिमत्त्वाचे पूर्ण दर्शन अपेक्षित करणे चुकीचे ठरेल.

पत्रांवरून व्यक्तिमत्त्व सूचित होते. चरित्रनायक स्वतःच पत्राचा विषय असल्यामुळे त्याचे व्यक्तिमत्त्व जणू हक्कानेच पत्रात सर्वत्र प्रकट होते. तो काय बोलतो, त्याला काय वाटते असल्याच गोष्टींची नोंद पत्रातून होते पत्रातल्या विशिष्ट प्रकारच्या पदयोजनेतून, शैलीतूनही ते व्यक्तिमत्त्व डोकावते. पत्रांद्वारे नायकाच्या अंतरंगाचा ठाव घेता येतो. नायकाच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे आकलन करून घेताना बाह्य अवलोकन अपुरे पडते. अवलोकनामुळे फार तर चरित्र-नायकाच्या योजना, त्याचे उद्योग व त्या उद्योगांची सिद्धी या बाह्यात्कारी कृती आणि त्यांचा काळ एवढ्याचीच फक्त कल्पना येऊ शकेल. पण पत्रांद्वारे त्या

13– Garraty, John. A. ‘ The Nature of Biography ’, Jonathan Cape, London, 1958, P. 162.

कृतीमागल्या प्रेरणा आणि चरित्रनायकाचे विचार प्रकट होतात. चरित्रविषय व्यक्तीच्या पत्रातल्या प्रत्यक्ष उपस्थितीमुळे, जादूची कांडी फिरविल्याप्रमाणे त्याची व्यक्ती जिवंत वाचकांच्या डोळ्यापुढे उभी राहावी असाच जणू उद्योग त्याने आरंभलेला असतो. पत्रात चित्रित झालेली मनःस्थिती पत्रातून मोकळेपणाने मारलेल्या गप्पा, त्यातून केलेला उपदेश किंवा निरर्थक बडबड, सांगितलेली एखादी बातमी किंवा सहानुभूतीपर दोन शब्द, व्यक्तिगत निवेदन वा चिंतनात्मक लेखन या सगळ्यातून लिहिणाराचे चरित्रातले व्यक्तिमत्त्व आकाराला येते. स्वभाव-लेखनाचे माध्यम म्हणून पत्रांचे महत्त्व आगळेच आहे. ' आमची अकरा वर्षे ' या चरित्रात समाविष्ट केलेली माधवराव पटवर्धनांची पत्रे वर वर चाळली तरी माधवराव हळवे होते, भाबडे होते. हळुवार अंतःकरणाचे होते आणि माणुसकीला जगणारे होते, ही माधवरावांची स्वभाववैशिष्ट्ये चटकन लक्षात येतात. या पत्रांच्या बाबतीत खुद्द लेखिकेने आपले मत नोंदले आहे. ते असे, ' त्यांनी घर सोडल्या-नंतरच्या बऱ्याचशा आठवणी व हकीगती त्यांचे बालमित्र रा. रामभाऊ मराठे यांनी सांगितल्या व त्यांच्या संग्रही असलेल्या माधवरावांच्या पत्रव्यवहारावरून मी त्या उद्धृत केल्या. त्यांच्या स्वभावावर व चारित्र्यावर प्रकाश पाडणारी ही पत्रे जर रामभाऊंनी जपून ठेवली नसती तर त्यांच्या पूर्वायुष्यातील बरीचशी हकीगत मला लिहिता आली असतीच अशी मला खात्री देता येत नाही. १९३३–३४ साली माधवरावांनी, स्वतः रामभाऊंना लिहिलेली पत्रे ते घरी घेऊन आले होते. माधवरावांना अशी एक खोड होती की, ज्या कागदपत्रांची त्यांना जरूरी नसे ते ते तेव्हाच फाडून टाकीत. तेव्हा ही पत्रे आणताना रामभाऊंनी बजावले होते की ' माझी पत्रे तू घेऊन जा पण त्यांचा फाडून सत्यानाश करण्याचा अधिकार तुला नाही. तुझे काम झाले की ती तू मला परत कर.' माधवरावांचा उद्देश त्यावेळी आत्मचरित्र लिहिण्याचा होता. तेव्हा ते लिहिताना त्या पत्रांचा उपयोग आपल्याला होईल म्हणून त्यांनी ती पत्रे आणली. परंतु त्यांचा तो हेतू सिद्धीस जाण्याच्या आधीच माधवराव वारले. शेवटी त्या पत्रांचा उपयोग मला झाला.'[१४ अ]

माधवराव पटवर्धनांनी लिहिलेल्या पत्रात जिथे आत्मचरित्रात्मक नोंद होते तिथे त्यांच्या अंतरंगाचा ठसा उमटतो. ' आमची अकरा वर्षे ' या चरित्रात ' माधवरावांचे स्नेही ' या प्रकरणात काही पत्रातले उतारे दिले आहेत. त्यात माधवरावांनी कठोर आत्मनिरीक्षण केले आहे. ' व्यावहारिक शहाणपण मला अजून शिकायचे आहे व ते मी शिकत आहे. तुझ्या ते प्रत्ययास आल्यावाचून राहाणार नाही. तसा मी अतिशय भोळा आहे ग, कित्येक वेळी माझ्या सहवासात

---

१४ अ– पटवर्धन लीलाबाई. ' आमची अकरा वर्षे', प्रकाशक य. गो. जोशी, पुणे. प्रथमावृत्ती. २९ नोव्हेंबर १९४५, हृद्गत, पृ. ३–४.

स्नेही म्हणून वावरणाऱ्या काही लोकांचे छक्केपंजे मी ओळखूच शकत नाही. गोष्ट होऊन गेल्यावर मागाहून सर्व प्रकार ध्यानात येतो. परंतु ' बून्द से गई सो हौद से नहीं आती ' अशी माझी स्थिती आहे. माझ्या व्यवहारीपणाने, फटकळपणाने, भाबडेपणाने माझे साऱ्या आयुष्याचे नुकसान झाले आहे. झाले ते झाले. आता मी एकटा नाही. माझ्या मूर्खपणाचे फळ मला आता एकट्याला भोगायचे नाही, त्याची वाटेकरीण तू आहेस हे मी जाणून आहे तेव्हा खरोखरच आता मी वचन देतो की, मी आता शहाणा होणार आहे. तुला दुःख देणार नाही, घे आपल्या बाळाला मांडीवर, विसरून जा गृहबाह्य जगाला आणि लाव त्याच्या ओठाला बोट आणि सांग त्याला की, ' बेटा, बापासारखा अव्यवहारी व भोळा होऊ नकोस.'[१४ब] कटू अनुभवाने होरपळून निघालेले, कात टाकणारे, परिस्थितीचे आव्हान स्वीकारणारे, माधवरावांचे आत्मलक्षी, व्यक्तिमत्त्व इथे प्रकटले आहे. चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्व समजावून घेताना पत्रातली आत्मचरित्रात्मक नोंद मोलाची ठरते.

थोडक्यात म्हणजे चरित्रनायकाची स्वभाववैशिष्टे, त्याच्या व्यक्तिमत्त्वांची रुपरेषा समजावून घेताना पत्रे उपयुक्त ठरतात. भर समुद्रात मार्गक्रमण करणाऱ्या बोटीवरच्या कप्तानाला दिशा ठरविताना नकाशा आणि होकायंत्र ही साधने उपयुक्त ठरावी अगदी तशीच आणि शिवाय चरित्रात व्यक्तिदर्शी पत्रांचा भरपूर उपयोग करता आला तर नायकाच्या शब्दातच त्याचे व्यक्तिमत्त्व आकाराला येते.

पत्र हाच मुळात एक जुना वाङ्मयप्रकार आहे. पत्रातून चरित्रनायकाची स्वभाववैशिष्टये, त्याचे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित झाले म्हणजे व्यक्तिदर्शन घडविणे सहज शक्य होते आणि चरित्राला वाङ्मयाचा घाट लाभतो. चरित्राला वाङ्मयाचा घाट लाभणे हे चरित्रकाराइतकेच त्याला उपलब्ध झालेल्या सामग्रीवर अवलंबून असते. उपलब्ध झालेल्या सामग्रीतून निवड करून तो एक कलात्मक पूर्णाकृती उभी करतो. पत्रातून चरित्रनायक व अन्यसमकालीन व्यक्ती यामधल्या अन्योन्यक्रियांची नोंद होते, त्यामुळे चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वासंबंधाने पुरेपूर माहिती उपलब्ध होते. पत्रलेखन करणाऱ्या दोन व्यक्तीमधे जितके जिव्हाळ्याचे संबंध असतात तितका पत्रात मोकळेपणा येतो. काही गाजलेल्या चरित्रांचे वाङ्मयीन अंग त्या चरित्रातल्या पत्रांमुळे जोपासले गेले आहे. पत्रांची निवड आणि मांडणी कलात्मक दृष्टीने अचूकपणे झाली तर त्या जीवनकथेत अस्वाददृष्ट्या भर पडल्याशिवाय राहत नाही. काशिबाई कानिटकरांनी लिहिलेल्या आनंदीबाई जोशींच्या चरित्राला वाङ्मयीन घाट लाभला आहे. कारण, त्या चरित्रात कानिटकरांनी आनंदीबाईंची निवडक पत्रे अशी काही कौशल्याने मधून मधून मिसळून दिली आहेत, की

१४ ब– Ibid, PP. 127–128,

घटितांचा क्रम तर पाळला जातोच पण आनंदीबाईंच्याच शब्दात त्यांचे व्यक्तिमत्त्व आकाराला येते. त्यांच्या जीवनकथेला सरळ प्रवाहित्व लाभते. उपलब्ध झालेल्या सामग्रीची केवळ मांडणी करून सफाईदार वाङ्मयीन कृती उभी राहू शकत नाही. लेखकाला पुढे पसरलेल्या सामग्रीचे आधी वाङ्मयीन मूल्य जोखता आले पाहिजे. त्याकरिता विवेकशील निर्णयशक्ती हवी आणि मग निवडलेल्या साहित्याची मोठ्या कौशल्याने, कल्पकतेने मांडणी झाली पाहिजे. असे मागे सर्वसाधारणपणे जे म्हटले तेच पत्रांच्या बाबतीतही म्हणता येईल. पत्र केवळ चरित्रनायकाच्या नावावर आले एवढ्याने ते प्रस्तुत ठरत नाही. एका ठिकाणी प्रस्तुत ठरणारे भलत्याच ठिकाणी दिले म्हणजे ते अप्रस्तुत ठरते. कथनाच्या ओघात पत्रे योग्य त्याच ठिकाणी आली पाहिजेत चरित्रनायकाचे बालमन प्रकट करणारे पत्र बालजीवनाचे चित्रण करताना उपयोगात आणणे प्रस्तुत ठरेल. चरित्रकाराने अप्रस्तुताचा मोह टाळणे आवश्यक आहे. चरित्रकाराला कलात्मक जाण असली म्हणजे अप्रस्तुताचा मोह टाळणे शक्य होते.

पत्रांची निवड करताना चरित्रकाराने तारतम्य बाळगणे आवश्यक आहे. चरित्रनायकाच्या पत्रव्यवहारात चरित्रनायकाला आलेली आणि त्याने लिहिलेली अशी दोन प्रकारची पत्रे असू शकतात. चरित्रविषयभूत व्यक्तीने लिहिलेल्या पत्रांची निवड करताना आत्मप्रकटनाचा सराव आणि त्या व्यक्तीचे अभिव्यक्तीचे सामर्थ्य लक्षात घेणे आवश्यक आहे. चरित्रविषय व्यक्तीला अन्य व्यक्तींकडून आलेल्या पत्रांची निवड त्या पत्रात त्या व्यक्तीच्या कृती आणि तिचे व्यक्तिमत्त्व यावर प्रकाश टाकण्याचे सामर्थ्य कितपत आहे यावर अवलंबून असावी. पत्रांची निवड ही लिहिणाऱ्या व्यक्तींवर अवलंबून असते. काही व्यक्ती अगदी मोकळे-पणाने आपल्या कल्पनांना आणि भावनांना पत्राद्वारे वाट करून देतात, तर काही हातचे राखून लिहितात, निवडलेल्या पत्रात फाजील आत्मगौरव, राजकारणाची शुष्क चर्चा, कल्पनाममत्व किंवा ती अकारण सजविण्याचा प्रयत्न असू नये. ती स्पष्ट संक्षिप्त असावीत. त्यात लिहिणाराचे अंतःकरण प्रकट व्हावे. ज्यांच्याकरिता ती लिहिलेली असतात त्यांच्या मनोवृत्तीवर (Humour) परिणाम साधणारे घरोब्याचे मोकळे वातावरण त्यात असावे. कधी कधी एकाच व्यक्तीच्या संदर्भात दोन वेग-वेगळ्या व्यक्तींना लिहिलेल्या पत्रात परस्परविरोधी विधाने आढळतात. अशा वेळी वर एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे सत्याच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करण्याशिवाय दुसरा मार्ग नसतो. पण म्हणूनच अनेक व्यक्तींना लिहिलेल्या सुट्या पत्रांपेक्षा एकाच व्यक्तीला लिहिलेल्या अनेक पत्रांचा संग्रह अधिक उपयुक्त ठरतो. कारण ती व्यक्ती आणि पत्रलेखक यांचे संबंध जिव्हाळ्याचे असले तर, मोकळ्या मनाने लिहिलेल्या पत्रात व्यक्तिगत जीवनावर प्रकाश पडतो व्यक्ति-

विकासाचा आलेख टिपता येतो, कित्येकदा सुसंगत विचारांची साखळी हाती लाभते आणि व्यक्तिजीवनाची कहाणी आकार घेते. आनंदीबाई आणि गोपाळराव यांच्या पत्रव्यवहारातून अशीच एक जीवनकहाणी आकार घेत जाते.

काव्यात्मक पत्रांमुळे चरित्राचे वाङ्मयीन अंग जोपासले जाते. साहजिकच अधिकाधिक काव्यात्मक पत्रांचा चरित्रात समावेश करण्याकडे चरित्रकारांचा कल असतो. पण ती फसवी असतात. फसवी अशा अर्थाने, की त्यात आतले एक बाहेरचे एक असा प्रकार असण्याची शक्यता असते. ती पत्रे चरित्रात समाविष्ट करताना अधिक चिकित्सक दृष्टी बाळगणे आवश्यक आहे. चरित्रकाराने पत्र-लेखकाच्या गुणसंपन्नतेविषयी सरसकट आदर, पक्षपात दाखविण्याच्या किंवा त्याच्या लेखनाच्या गुणवत्तेचे अमर्याद कौतुक करण्याच्या वृत्तीपासून दूर राहिले पाहिजे. अशा पत्रांची निवड करताना माणसाचे सर्वसाधारण मनोगत आणि त्याचे उणेपण लक्षात घेणे आवश्यक आहे. पत्रलेखक आणि ज्याला त्याने पत्र लिहिलेले असते ती व्यक्ती या दोघामधले संबंध कोणते आहेत. पत्रातल्या मजकुरातून काही एक हेतू साध्य करण्याचा वा विशिष्ट विषयावरचे मत काढून घेण्याचा प्रयत्न झाला आहे की काय. लिहिताना ती पत्रे ज्याला लिहिली त्याशिवाय अन्य वाचकवर्ग डोळयापुढे धरलेला आहे किंवा त्या पत्रांच्या भविष्यकालीन प्रसिद्धीवर डोळा ठेवून ती अधिक मेहनत घेऊन लिहिलेली आहेत की काय इत्यादी मुद्द्यांचा कसून विचार होणे आवश्यक असते.

**संभाषण व मुलाखती :**

पत्रांइतकेच संभाषण हे चरित्राचे उत्तम साधन आहे. समाजात माणूस प्रतिष्ठेचे आवरण घेऊन वावरत असतो, त्यामुळे त्याचा स्वभाव सहजासहजी बाहेर पडत नाही. त्याच्या व्यक्तिमत्त्वातले कच्चे दुवे हाती लागत नाहीत. मित्रांबरोबर किंवा निकटवर्तीयांबरोबर मोकळया वातावरणात शिळोप्याच्या गप्पा मारताना मूळ स्वभाव चटकन् प्रकट होतो. चरित्रनायकाबरोबर झालेल्या खाजगी संभाषणावरून किंवा घेतलेल्या मुलाखतीवरून त्याच्या स्वभावाची एखादी छटा किंवा व्यक्तिमत्त्वाचा एखादा पैलू जरी हाती आला तरी त्यामुळे व्यक्तिदर्शनास मदत होते. मात्र या बाबतीत स्मृतींवर भरवसा ठेवणे इष्ट नव्हे. फार दिवसांनी संभाषण आठवून आठवून लिहिण्याऐवजी चरित्रनायकाच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या शब्दांची तात्काळ नोंद होणे आवश्यक आहे. म्हणजे चरित्र लिहिताना मूळ आशय कमी होत नाही, चरित्रनायकाच्या निकटच्या सहवासात असलेल्या व्यक्तीलाच हे शक्य आहे. बॉस्वेलने डॉ. जॉनसनच्या सावलीप्रमाणे राहून तात्काळ नोंदविलेल्या संभाषणांचे त्याच्या चरित्रात निवेदन करण्याची कोणतीच संधी दवडली नाही. डॉ. जॉनसनच्या जिवंत व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करताना त्याने घेतलेल्या कष्टांना

दा. क्र. ३७६७ २५-६-८९ ग्रंथ ३१-७-८९



चरित्रवाङ्मयात दुसरी तोड नाही. टिळक चरित्रात संभाषणे आहेत. पण ती, बॉस्वेलने ज्याप्रमाणे तात्काळ नोंद करून मग ती दिली, तसे झालेले नाही. टिळकांच्या संभाषणात टिळक बोलत नाहीत तर, केळकरांच्या शब्दांत टिळकांना बोलावे लागते. कथनाच्या ओघात चरित्रनायकाचे संभाषण मधून मधून संवादरुपाने दिले म्हणजे निवेदनाचा एकसाचीपणा राहत नाही. त्या जीवनकथेला रचनेचे वैचित्र्य लाभते. 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' या न्यायमूर्ती रानड्यांच्या चरित्रात व स्वतः रमाबाईंच्या आत्मचरित्रात, लेखिकेने न्यायमूर्ती-बरोबर झालेली संभाषणे संवादरुपाने मधून मधून दिली आहेत. त्यामुळे रानडे यांच्या जीवनकथेत निवेदनाचा एकसुरीपणा उरलेला नाही. त्यांच्या जीवनकथेला रचनेचे वैचित्र्य लाभले, हे त्या चरित्राचे एक वैशिष्ट्य होय.

## आठवणी–

आत्मचरित्र, दैनंदिनी, पत्रे हे चरित्रनायकाचे स्वदस्तुरचे लेखन आणि म्हणून त्याचे महत्त्व आगळेच असते. परंतु पत्रे व दैनंदिनी याशिवाय चरित्र-नायकासंबंधी इतरांनी लिहून ठेवलेल्या आठवणी उपलब्ध झाल्या तर त्यांचा चरित्रकाराला चांगलाच उपयोग होतो. आठवणींमधे पत्रे व दैनंदिनी यांच्याइतके चरित्रनायकाचे खाजगी जीवन डोकावणार नाही, हे खरे, परंतु त्याचा स्वभाव, त्याची लोकांशी वागणूक त्याच्या सवयी, त्याच्या आवडीनिवडी इत्यादिकांवर अवश्य प्रकाश पडू शकेल आणि त्यातही या आठवणी रक्ताच्या नात्यातल्या माणसाने लिहिलेल्या असल्या म्हणजे सूक्ष्म जीवनदर्शी तपशील उपलब्ध होतो, न. र. फाटकांनी लिहिलेल्या चरित्रावरून न्यायमूर्ती रानडे खाजगी जीवनात कसे वागत होते याची नीटशी कल्पना येत नाही. पण तेच फाटकांनी लिहिलेल्या चरित्राला जोडून रमाबाईंनी लिहिलेल्या आठवणी वाचल्या म्हणजे रानडे यांच्या व्यक्तिमत्त्वाची सर्वांग परिपूर्ण व सुस्पष्ट कल्पना येते. चरित्रनायकाच्या संदर्भात अनेक लोकांनी निरनिराळ्या प्रसंगांच्या आठवणी सांगितलेल्या असल्या म्हणजे मनुष्याच्या स्वभावाच्या निरनिराळ्या बाजू समजून येतात. या दृष्टीने पाहिले तर पत्रे व दैनंदिनी यापेक्षा आठवणींचे महत्त्व अधिकच वाटते. पत्रामधे व दैनंदिनीमधे फारतर व्यक्तीच्या जीवनातील काही घटना, इतरांशी त्या व्यक्तीचे असलेले संबंध व क्वचित् तिची विशिष्ट वेळची मनःस्थिती चित्रित होते. व्यक्तीचा स्वभाव तिच्या लकबी इत्यादी गोष्टी तिच्या स्वतःच्या लेखनात कागदावर तितक्या स्पष्ट-पणे उमटू शकत नाहीत. त्या प्रत्यक्ष भेटीगाठीतच स्पष्टपणे लक्षात येतात. याचे कारण 'आठवणी व आख्यायिका, (आधुनिक मराठी गद्य, १९५७, संपादक रा. भि. जोशी. पृ. १६७) या लेखात न. चिं. केळकरांनी दिले आहे ते असे, की चरित्रनायकाच्या कोणत्यातरी एका गुणाने किंवा दोषाने किंवा लकबेने आठवण

करणाऱ्या मनावर इतर प्रसंगापेक्षा अधिक खोल असा ठसा उमटलेला असतो. बहुधा आठवणी ह्या अशा भेटीगाठीतूनच मनःपटावर कोरल्या जातात. मित्रमंडळीत मोकळ्यावातावरणात कोणत्याही प्रकारचा आडपडदा न ठेवता सहज माणूस बोलून जातो आणि त्यावेळी त्याचा खराखुरा स्वभाव लक्षात येतो.

आठवणींच्या बाबतीत एक धोका संभवतो तो असा की आठवणी लिहिणाऱ्या पुष्कळशा लोकात स्वतःकडे मोठेपणा घेण्याची प्रवृत्ती आढळते. आपल्याला थोडासा मोठेपणा मिळावा या बुद्धीने आठवण लिहिताना प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टीत थोडासा बदल करण्याची किंवा तिला तिखटमीठ लावण्याची प्रवृत्ती होते. चरित्रनायकाच्या थोरवीच्या अनुषंगाने स्वतःकडे मोठेपणा ओढून घेण्याची ही प्रवृत्ती चरित्रलेखनाच्या दृष्टीने अनिष्टच म्हटली पाहिजे. सत्य घटना निर्भीडपणे विशद करणे ही आठवणी सांगणारावरची फार मोठी जबाबदारी आहे. आठवणी आठवून आठवून सांगाव्या लागतात. म्हणजे त्या केवळ सत्यस्वरुपी असल्या पाहिजेत. त्यात सांगणाराची अन्योक्ती, वक्रोक्ती किंवा दुसरी कोणतीही ' उक्ती ' किंवा मखलाशी असता कामा नये. त्याचा लेख हा एक प्रकारचा ऐतिहासिक पुरावा होऊन बसण्याचा संभव असतो. म्हणून त्याने सर्वस्वी सत्याला स्मरून व इकडचे तिकडे काही एक न करता आपली माहिती काटेकोरपणे लिहिली पाहिजे. जेथे स्मरणशक्तीच तोकडी पडते तेथे इलाज नसतो. परंतु एरवी जे जसे घडले असेल, ते तसेच लिहिणे श्रेयस्कर असते. ज्या आठवणी लिहायच्या त्या पुराव्याच्या शास्त्राच्या मूळ तत्त्वाला धरूनच लिहिलेल्या हव्या. आठवण ही घडलेली गोष्ट प्रत्यक्ष ज्याने पाहिली त्यानेच ती कल्पिताचा स्पर्श न करता ' चक्षुर्वैसत्यं ' म्हणून सांगितलेली असावी. ऐकीव माहिती प्रायः त्याज्यच, निदान तशा प्रकारची आठवण ही दुय्यम प्रतीची समजावी. अशा दुय्यम प्रतीच्या आठवणींचा समावेश आख्यायिका या सदराखाली सहज होऊ शकतो. सत्य सांगणे ही जितकी आठवणी लिहिणाराची किंवा सांगणाराची जबाबदारी तितकीच त्या आठवणी सत्याच्या निष्कर्षावर चिकित्सापूर्वक पडताळून पाहण्याची जबाबदारी चरित्रकारावर येऊन पडते.

गार्गी भाटवडेकरांनी लिहिलेले डॉ. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकरांचे चरित्र हे एक भावनिक आहारी न जाता, नाते विसरून लिहिलेले चरित्र आहे. लेखिकेने चरित्र लिहिताना श्री. वामनराव भांडारे यांच्या सर भालचंद्रांसंबंधीच्या आठवणींचा भरपूर उपयोग करून घेतला. पण तसे करताना त्या आठवणी विश्वसनीय आहेत याची त्यांनी पूर्ण खात्री करून घेतली होती. हे त्यांच्या पुढील निवेदनावरून दिसून येईल. त्या लिहितात, ' मातापित्यांच्या बरोबरच श्री. वामनराव भांडारे यांच्याविषयी आदर व्यक्त करणे अवश्य आहे. वामनराव हे कसलेच नातेगोते नसतानाही, भालचंद्रांशी त्यांचा निकट व अखंड अकृत्रिम स्नेहसंबंध

राहिल्याने भाटवडेकर कुटुंबातील एक जिव्हाळ्याची व्यक्ती बनून गेले आहेत. भालचंद्र १८८५ साली मुंबईमधे वैद्यक व्यवसायासाठी आल्यापासून त्यांचा व वामनरावांचा स्नेह जमला. भालचंद्रांचे परमस्नेही कै. शांताराम नारायण, कै. आनंदराव दाभोळकर, यांचा व वामनरावांचा आप्तसंबंध असल्याने व भालचंद्र मुंबईत प्रथम जांभुळवाडीमधे कै. शांताराम नारायणांच्या घरात राहात असल्याने वामनरावांचा भालचंद्राशी परिचय होऊन त्या परिचयाचे थोड्या अवकाशातच गाढ स्नेहात रूपांतर झाले. भालचंद्र गिरगावात बांधलेल्या स्वत:च्या बंगल्यात राहू लागल्यानंतर वामनराव प्रतिदिवशी भालचंद्रांकडे येत असत व संध्याकाळी भालचंद्र सार्वजनिक कार्यासाठी निघाले की, वामनराव त्यांच्याबरोबर जात असत. भालचंद्रांच्या थोरवीचा अनुभव जसजसा वाढत गेला तसतसा वामनरावांचा त्यांच्याविषयीचा आदर वाढत गेला. त्या आदराला आज काही अन्वर्थक नाव द्यावयाचे झाले तर 'सतीभाव' म्हणता येईल. वामनराव हे भाविक नाहीत, उत्तम चिकित्सक आहेत. शांताराम नारायण, दाभोळकर, तेलंग यांच्या सान्निध्यात बालपण जात असता मूळच्या जिज्ञासू, चौकस वृत्तीमुळे सार्वजनिक कार्याची त्यांनी ओळख करून घेतली होती, शिवाय कै. डॉ. भगवंतराव पाटकर यांच्याबरोबर केवळ जिज्ञासेने त्यांनी पाश्चात्य वैद्यकाचाही अभ्यास केला होता. यामुळे भालचंद्रांचा वैद्यक व्यवसाय आणि सार्वजनिक सेवेचा व्यवहार या दोन्ही विषयांतील गोष्टींचा समजूतदारपणे वामनरावांनी संग्रह केला होता. वामनरावांची स्मरणशक्ती तर धड आहेच, पण त्यांच्यावर विश्वास ठेवण्याचे आणखी एक कारण आहे. वामनरावांना वैद्यक व्यवसायात किंवा सार्वजनिक कार्यात भालचंद्रांच्या संबंधाने विशेष काही घडले की, ते रोजनिशीप्रमाणे त्या त्या दिवशी तपशीलवार लिहून ठेवण्याची सवय होती. भालचंद्राबद्दल बोलणे निघाले की, संस्मरणीय कथा जणू काय आज डोळ्यासमोर घडत असल्यासारख्या पद्धतीने सांगण्याची कुशलता वामनरावांच्या अंगी आहे. भालचंद्राच्या हयातीत वामनरावांचा इतका अपरिहार्य निकट सहवास होता की, वामनराव हे भालचंद्रांचे 'उपरणे' आहेत. असे लोक विनोदाने म्हणत असत. मागल्या पिढींतील एखाद्या डॉक्टरचा किंवा पुढाऱ्याचा विषय संवादात निघून त्या अनुरोधाने भालचंद्रांची एखादी गोष्ट सांगण्यासारखी असल्यास वामनराव ती किती आदरपूर्ण तन्मयतेने सांगतात याची कल्पना शब्दानी देता येणार नाही. पुन: त्या गोष्टीचा कसलाही तपशील सुटायचा नाही; स्थल, काळ, प्रसंग आणि व्यक्ती यांचे वामनरावांना अस्खलित स्मरण असल्यामुळे भालचंद्राविषयींच्या ज्या अनेक बोधप्रत रम्य कथा प्रस्तुत चरित्रात आल्या आहेत, त्याचे सर्व श्रेय वामनरावांचे आहे. त्यांच्यासारखे चालते बोलते विश्वसनीय कथाभांडार जर या चरित्रलेखनास लाभले नसते, तर या चरित्राची उभारणीच करता आली नसती...'[१५]

१५– भाटवडेकर गार्गी. 'डॉ. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर', १९३७, प्रस्तावना, पृ. ८–९–१०.

**आख्यायिका–**

आख्यायिका मनोरंजक असतात. आख्यायिकांमुळे चरित्रातला नीरस अंश दूर होतो. चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा एखादा पैल त्यामुळे झगमगतो. स्वभावदर्शनाच्या दृष्टीने आख्यायिका उपयुक्त ठरतात. पण आख्यायिकेत खऱ्या-खोटयाचे मिश्रण इतके बेमालूम झालेले असते, की त्यांचे पृथक्करण करणे केवळ अशक्यच असते. आख्यायिकांच्या आधारावर कोणत्याही मोठ्या माणसाचा स्वभाव वाटेल त्या स्वरूपाचा बनवता येईल. म्हणजे चरित्रनायक जसा होता तसा तो चित्रित होईलच असे नाही. तेव्हा चरित्रात आख्यायिकेचा समावेश करताना विवक्षित आख्यायिकेमुळे चरित्र विषयव्यक्तीचे स्वभावदर्शन घडवून व्यक्तिमत्त्वाचे रसरसते पैलू दाखविता येणे कितपत शक्य आहे. ती विवक्षित आख्यायिका विश्वसनीय आहे किंवा नाही. हे दोन मुद्दे चरित्रकाराने लक्षात घेणे आवश्यक आहे. दत्तात्रय बळवंत पारसनीसांनी अयोध्येचे नवाब या त्रोटक चरित्रांच्या संग्रहात चौथ्या भागातील सुजाउदौलाच्या चरित्रात पुढील आख्यायिका दिली आहे. ‘ मनसूरअल्ली सफदरजंग ह्यास पुत्रसंतान नव्हते. त्याच्या पदरी अयोध्येसारखे मोठे राज्य, केवळ दुसरी पादशाहत, असे असून त्यास औरस संतती नाही, त्यामुळे तो नेहमी उदासीन व चिंतातुर असे. केव्हा केव्हा त्यास पुत्रावाचून राज्यसुख घेण्यापेक्षा फकिरी बरी असे वाटत असे. म्हणून पुत्रप्राप्तीस्तव तो नेहमी अतिथि अभ्यागत, फकीरफुकरा वगैरे गरीब लोकांस द्रव्यदान, वस्त्रदान, व अन्नदान करीत असे. त्याचप्रमाणे अयोध्येत ब्राह्मण व बैरागी यांचेकडून नेहमी अनुष्ठाने करवीत असे. शेवटी दैवयोगाने त्याच्या सत्कर्माचे सार्थक होऊन मुसलमानांची पवित्र भूमी जी मक्का तेथून एक अवलिया फकीर अयोध्येस आला. त्याने मनसूरअल्लीच्या स्वप्नात येऊन त्यास एक फळ दिले आणि असा आशीर्वाद दिला की, ‘ पुत्राकरिता तू अत्यंत श्रमी आहेस, तरी हे फळ आपल्या स्त्रीस भक्षावयास दे म्हणजे तुला पुत्रप्राप्ती होईल.’ ह्या प्रमाणे सांगून तो सत्पुरूष अंतर्धान पावला; नंतर मनसूरअल्लीने आपल्या पत्नीस ते प्रासादिक फळ भक्षावयास दिले. पुढे काही दिवसांनी तिला पुत्ररत्न प्राप्त झाले. तोच सुप्रसिद्ध सुजाउद्दौला होय ’ या आख्यायिकेच्या संदर्भात पारसनीसांनी एक तळटीप दिली आहे. ती अशी, ‘ ही सुजाउद्दौल्याच्या जन्माची हकीकत ‘ भाऊसाहेबांच्या बखरीमध्ये ’ प्रसिद्ध झाली असून ती नारोशंकर राजेबहाद्दूर ह्यांनी जनकोजी शिंदे ह्यास सुजाउद्दौल्याशी राजकारण करण्याचे प्रसंगी सांगितली म्हणून त्याच बखरींत लिहिले आहे.’[१६] प्रस्तुत आख्यायिकेचा चरित्रात समावेश करताना पारसनीसांनी पाहिजे तितकी चिकित्सक दृष्टी

१६– पारसनीस दत्तात्रय बळवंत. ‘ अयोध्येचे नवाब ’, बाबाजी सखाराम आणि कंपनी, मुंबई, १८९९, पृ. ३६–३७.

बाळगलेली नाही. स्वभावदर्शन आणि विश्वसनीयता या दोन्ही दृष्टीने प्रस्तुत आख्यायिकेची निवड योग्य वाटत नाही. अशा आख्यायिकांमुळे चरित्रातल्या वस्तुनिष्ठेला बाधा होते. रंजकतेच्या भरीस पडून चरित्रातली वास्तवता हरवून बसणे चुकीचे ठरते.

वास्तविक बखरींना गद्य सारस्वताचे स्वरूप प्राप्त झाले आहे. इतिहास-लेखनाचे साधन म्हणून त्यांचे महत्त्व कमी ठरते. बखरीत ऐतिहासिक तपशीलाची संगती लावताना इतिहासाला कल्पनेचे पंख चिकटतात आणि त्यांची ऐतिहासिक कादंबरी झाली नाही तरी इतिहासाहून निराळी आणि कादंबरीला जवळची अशी स्वतंत्र कलाकृती निर्माण होते. कारण, या साऱ्या प्रक्रियेत वास्तव सृष्टी आणि काल्पनिक सृष्टी यांचे बेमालूम मिश्रण झालेलें असते. तेव्हा चरित्रात बखरीत त्या आख्यायिकेचा समावेश जरा जपूनच केला पाहिजे. आख्यायिका झाली तरी ती काल्पनिक असता कामा नये. खुद्द पाहणाराने किंवा ऐकणाराने खुद्द मला सांगितली ' येथपर्यंत तरी तिच्या मुळाशी सत्याचा प्रत्यक्ष संबंध असला पाहिजे. ऐकीव माहितीचे निवेदन करताना निवेदकांनी कल्पिताचा आधार घेतला म्हणजे अखेर मूळ माहितीचे रुप पालटते आणि आख्यायिकेचे रूपांतर दंतकथेमध्ये होते. दंतकथा चरित्राच्या मूळ प्रकृतीला मानवणारी नाही आणि म्हणूनच दंतकथेचा चरित्रात समावेश करणे चुकीचे ठरते. रघुनाथ शास्त्री दात्ये यांचे शालिवाहन चरित्र दंतकथांच्या आधारे लिहिलेले असल्यामुळें पार बिघडून गेले आहे. तेव्हा बखरीतली अद्भुतरम्य आख्यायिका निवडताना पारसनीसांनी तारतम्य बाळगले नाही, असेच म्हणावे लागते.

**मानसशास्त्र–**

मानसशास्त्राच्या विविध व्याख्यात एकवाक्यता नाही. या संज्ञेशी व्याख्या काहीशी सैलपणे केली म्हणजे तिचे स्पष्टीकरण करणे सोयीचे होते. मानसशास्त्र म्हणजे मानसिक व्यवहारांचे शास्त्र, त्यात व्यक्तिमत्त्वाचे सूक्ष्म परीक्षण आले, मानवी हेतूंचे आपल्या परिवर्तक प्रेरणांच्या स्वरूपाचे, ज्या पद्धतीनें माणसे आंत-रिक ताण आणि बाह्यपरिस्थितीशी सामना करतात त्या पद्धतीचे आणि स्वप्नद्वारे उपलब्ध झालेल्या पुराव्याचे विश्लेषणही आले. स्वप्ने आशयाच्या दृष्टीने आता पूर्णपणे आत्मनिष्ठ गणली जातात. माणूस आत्मविश्वासी अथवा खिन्न, भित्रा वा बुजरा, शीघ्रकोपी किंवा तोतरा आणि गुन्हेगारी वृत्तीचा का असतो या प्रश्नांची उत्तरे देण्यास बुद्धी जेव्हा असमर्थ ठरते तेव्हा मानसशास्त्र ती उत्तरे मिळविण्याचा प्रयत्न करते. तऱ्हेवाईक व्यक्तींच्या संबंधाने आपल्याला एक प्रकारची जिज्ञासा असते. चमत्कारिक व्यक्ती आणि त्यांच्या चमत्कारिक वागणुकीचा उलगडा कर-ण्याचा प्रयत्न मानसशास्त्राकडून होतो. मानसशास्त्रामुळे विसंगतीपासून दूर

पळण्याची आता आवश्यकता उरलेली नाही. मानसशास्त्राने हे दाखवून दिले आहे, की तिटकारा आणि आकर्षण या परस्पर विरोधी चेतनांचा उगम एकाच ठिकाणी असतो. बदफैलीपणा इतकाच निष्ठुरपातिव्रत्य हा व्यक्तिविशेष आता संशयास्पद ठरतो. तेव्हा मानवी जीवनाचे कोडे उलगडू पाहणाऱ्या चरित्रकाराला मानसशास्त्र उपयुक्त ठरावे हे अगदी स्वाभाविक आहे.

आधुनिक चरित्रकारांना मानसशास्त्राच्या आधारे व्यक्तिमत्त्वाचे यथार्थ आकलन करून घेणे शक्य झाले आहे. गेल्या पाऊणशे वर्षांत मानसशास्त्राची वाढ आणि प्रगती झपाट्याने आणि अनेक दिशांनी होत आहे. मानसशास्त्राच्या प्रभावाने समग्र चरित्र लेखनाचा प्रांत उजळून निघाला आहे. त्याची व्याप्ती वाढली आहे, आणि त्यामुळे व्यक्तिमत्त्वाचे पुन्हा पुन्हा मूल्यमापन करणे शक्य झाले आहे. मानसशास्त्रामुळे मनुष्याचे पोषण आणि सभोवतालची परिस्थिती यातून निर्माण झालेली संकीर्णता आणि मना केलेल्या, दडपलेल्या भावनांच्या, विकारांच्या अभ्यासातून अंतर्गत जीवनाच्या विविध व्यापारांवर प्रकाश पडतो. आधुनिक मानसशास्त्राने चरित्रांस मानवी मर्यादांच्या, निराशेच्या, निष्फळ ठरलेल्या महत्त्वाकांक्षेच्या संदर्भात व्यक्तिमत्त्वाची दिशा पुन्हा शोधून काढण्यास, व्यक्तिमत्त्वाचे मूल्यमापन करण्यास भाग पाडले आहे. कादंबरी इतकाच चरित्रावर मानसशास्त्राचा प्रभाव पडू शकतो. मानसशास्त्रामुळे, मनोविश्लेषणामुळे आपला व्यक्तिमत्त्वातील गुंतागुंतीसंबंधीचा, व्यक्तिमत्त्वाच्या दडलेल्या चढउतारांसंबंधीचा समज दृढ झाला आहे. या शास्त्रामुळे आपल्या हेतूचे, इच्छावासनांचे अंधारे कोपरे धुंडाळून काढणे; कृतींच्या विविध तऱ्हा शोधून काढणे; शब्दांचे आणि अंगविक्षेपांचे चिन्हांकित मूल्य ठरविणे शक्य झाले आहे. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास मानसिक संघर्ष वर्तनाची मानसिक पार्श्वभूमी आणि मनोव्यापारातील गुंतागुंत यांचा अंतर्भाव मनोविश्लेषणात होतो. विविध प्रवृत्तोतील संघर्ष अभिव्यक्त करणे; व्यक्तीच्या मनातील उलटसुलट अशी विकारविचारांची वळणे दर्शविणे आणि व्यक्तीच्या कृतीमागील हेतू वा प्रेरणा उघड करणे; अशा निरनिराळ्या प्रकारांनी मनोविश्लेषण साधता येते.

मानसशास्त्राच्या रूपाने चरित्रलेखनाच्या मूळ प्रवाहाला एक छोटासा प्रवाह येऊन मिळाला आहे. त्यामुळे चरित्रकाराला अभ्यासाची नवी दालने खुली झाली आहेत. मात्र समग्र चरित्राला सामावून घेण्याची ताकद मानसशास्त्रात नाही. मानसशास्त्रज्ञाला जे खरे आहे अशी खात्री असते ते सिद्ध करण्यास तो असमर्थ ठरतो हे त्याचे फार मोठे अपयश आहे. याचा अपरिहार्य परिणाम असा होतो, की व्यक्तिदर्शन घडविताना चरित्रकार जेव्हा मनोविश्लेषणाचा उपयोग करतो तेव्हा त्याने एकतर एमील लुडवीगने क्लिओपॅट्राच्या चरित्रात राबविलेले लेखकाची

कल्पनाशक्ती चाळवणारे, कादंबरीचे तंत्र वापरलेले असते किंवा आंद्रेमोर्वाच्या Ariel प्रमाणे त्याने जीवनाकडे एका विशिष्ट दृष्टीनेच पाहिलेले असते. चरित्र-काराने व्यक्तिदर्शनाच्या कामी मानसशास्त्राचा उपयोग करून घ्यावा, पण त्या शास्त्राच्या आहारी जाऊ नये. मानसशास्त्राच्या बाबतीत फार उत्सुकता दाखविण्यात एक धोका आहे. तो असा, की त्यामुळे चरित्रात नायकाच्या जीवनाचे दर्शन घडण्याऐवजी त्यांच्या मानसिक विकृतीचेच दर्शन (Clinical exposition) घडण्याची शक्यता असते आणि म्हणूनच मार्क शोअरेर (Mark Schorer) लिहितात, 'चरित्रकाराला दुसऱ्या कोणत्याही सुशिक्षित माणसाप्रमाणे आधुनिक मानसशास्त्राच्या प्रगतीसंबंधाने माहिती हवी, परंतु मला असे वाटत नाही की त्याने स्वत: जणू काही मनोविकलन शास्त्रज्ञ (Psychoanalyst) असल्याप्रमाणे लेखन करावे.'[१७] चरित्रकाराला मानसशास्त्राकडून बरेचसे शिकण्यासारखे, घेता येण्यासारखे आहे. पण त्याच बरोबर त्याने हेही लक्षात ठेवले पाहिजे, की व्यक्ति-दर्शनाला शास्त्राचे रुप देता येत नाही. चरित्रात शास्त्रीय पद्धतीचा अतिरिक्त अवलंब झाला म्हणजे कलेची बाजू लंगडी पडते. मनोविश्लेषणाचा व्यक्तीच्या मानसिक विकृतीच्या नोंदणीशी संबंध असतो आणि मनोविश्लेषणामुळे त्या नोंद-णीचे स्पष्टीकरण, नामकरण आणि वर्गीकरण होते. चरित्रात मानसशास्त्राचा अधिकाधिक उपयोग करून घेण्याच्या भरीस पडल्यामुळे व्यक्तीपेक्षा व्यक्तीच्या मानसिक विकृतीवर लक्ष केंद्रित होते मानसशास्त्राकडून प्राप्त करून घेतलेल्या ज्ञानाच्या जोरावर चरित्रकार जेव्हा मनोविश्लेषण साधतो, तेव्हा ती व्यक्ती कशी होती हे न दाखविता त्या व्यक्तीच्या मानसिक विकृतीचे कथन करतो. व्यक्तीरूपाने मानसिक विकृतीचा एक मासला वाचकांच्यापुढे ठेवतो. वाचकांना प्रत्यक्ष रोगपाठ देण्याकरिता व्यक्ती प्रत्यक्ष जीवन जगत असल्याचा प्रत्ययच जणू तो पुसून काढतो. म्हणजे एकापरीने चरित्रकार व्यक्तिदर्शनाच्या, जीवनदर्शनाच्या उद्दिष्टाच्या मुळावरच घाव घालतो. चरित्राला Case History चे स्वरुप प्राप्त झाले म्हणजे चरित्राचा वाङ्मयीन घाट बिघडतो.

मानसशास्त्राच्या उपरिनिर्दिष्ट मर्यादा लक्षात घेऊनही कागदपत्रांच्याद्वारे व्यक्तिमत्त्वाचा शोध घेताना चरित्रकाराला मानसशास्त्र अधिक उपयुक्त ठरावे. (G. W. Allport) या मानसशास्त्रज्ञाने या संदर्भात केलेला व्यासंग चरित्र-लेखनाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. ऑलपोर्टने असे सिद्ध केले आहे, की खाजगी कागदपत्रात व्यक्तीच्या मनाची घडण प्रतिबिंबित होते. आधुनिक मानसशास्त्रज्ञ आज सजीव व्यक्तींच्या अभ्यासाकरिता वापरीत असलेली बरीचशी तंत्रे व्यक्तिगत

17– Kendall Paul Murray. 'The Art of Biography', George Allen & Unwin Ltd. 1965, P. 121.

कागदपत्रांच्या अतिसूक्ष्म आणि साक्षात्कारी परीक्षणासाठी चरित्रकारांना उसनी घेता येण्यासारखी आहेत.

चरित्रविषय व्यक्तीच्या लेखनातील विविध घटकांचे व कल्पनांचे यांत्रिक स्वरूपाचे विश्लेषण करणारे मानसशास्त्रीय साधन चरित्रकाराला उपयुक्त ठरण्यासारखे आहे. विल्यम बेअर्ड हेल (William Bayard Hale) यांनी उड्रो विल्सन यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास वर म्हटल्याप्रमाणे त्यांच्या लेखनाचे यांत्रिक स्वरूपाचे विश्लेषण करून केला. हेल यांनी या पद्धतीने विल्सन यांच्या लेखनातील विशेषणांची आवड व काही आवडत्या शब्दांची व शब्दसमुदायांची पुन्हा पुन्हा होणारी आवृत्ती यावरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर बराचसा प्रकाश टाकला. हेल नंतर मानसशास्त्रज्ञांनी चरित्रनायकांचा अधिक वस्तुनिष्ठ पद्धतीने अभ्यास केला आणि हेलच्या निरीक्षितविषयाला तात्विक बैठक दिली. याबाबतीत मानसशास्त्रज्ञांचे म्हणणे असे आहे की, व्यक्ती जेव्हा लेखन करतात तेव्हा शब्दांचा विनियोग करण्याची खास अशी पद्धत असते आणि त्यावरून काही प्रमाणात व्यक्तिमत्त्वावर प्रकाश पडतो. [१८अ]

एक जर्मन मानसशास्त्रज्ञ ए बिझमन (A. Busemann) यांनी विवक्षित उताऱ्यातील कृतिशील कल्पनांच्या (Verbal) संख्येला विशेषणांसारख्या (Adjectival) कल्पनांच्या संख्येने भागून एक क्रियांक action quotient (Aq) तयार केला. त्यांनी असे गृहीत धरले, की विशेषणासारख्या शब्दांच्या संख्येतील वाढ म्हणजे भावनात्मक अस्थिरतेचे निदर्शक होय. त्यांना असे आढळून आले, की त्यांनी काढलेले निष्कर्ष व त्याच व्यक्तींच्या बाबतीत Rorschachink– blot tests च्या उपयोजनेतून घेतलेले निर्णय मिळते जुळते होते.[१८ब]

डेव्हीड पी. बोडर (David P. Boder) या अमेरिकेतील मानसशास्त्रज्ञाने ए. बिझमन यांचे कार्य पुढे चालू ठेवले. बोडर यांनी काही निवडक कायदेविषयक कागदपत्रे, कादंबऱ्या, शास्त्रीय कागदपत्रे, जाहिराती आणि खाजगी पत्रे यांचा अभ्यास करून त्या त्या प्रकारातील विशेषणांची क्रियापदांशी असलेल्या प्रमाणा-संबंधाने इयत्ता ठरविली. साहजिकच खाजगी पत्रांपेक्षा अचूकतेसाठी धडपडणाऱ्या अवघड शास्त्रीय प्रबंधात विशेषणांचा अधिक भरणा असणार. विविध लेखन प्रकारातील प्रमाणांची इयत्ता ठरविल्यामुळे बोडर यांना भावनात्मक अस्थिरते-संबंधाने काही प्रमाणात अचूक निर्णय घेणे शक्य झाले. या संदर्भातील त्यांचे काही प्रयोग चरित्राच्या दृष्टीने सूचक आहेत. त्यांनी इमर्सनच्या दैनंदिनीतून पन्नास

---

18 A– Garraty John. A. 'The Nature of Biography', Jonathan Cape, London, 1958, P. 183.

18 B– Ibid. P. 183.

वर्षांच्या काळातील १३२ नमुने घेतले. कालांतराने जरी विशेषणांची क्रियापदांशी असलेल्या प्रमाणाची शेंकडेवारी त्या लेखनप्रकारातील इयत्तेशी जुळली, तरी प्रारंभी बोडर यांना विशेषणांच्या क्रियापदाशी असलेल्या प्रमाणात फार मोठी तफावत आढळली.

बोडर यांनी गृहीत गोष्ट आणि इमर्सनचे प्रत्यक्ष जीवन यामधले अन्योन्य संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला नाही. तथापि असा प्रयत्न चरित्रकाराच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. कधी कधी व्यक्तिजीवनातील भावनात्मक खळबळीचे कारण अगदी स्पष्ट असते. पण जेव्हा ते अस्पष्ट असते. तेव्हा ते त्या व्यक्तीच्या लेखनातील विशेषण क्रियापदांच्या प्रमाणावरून शोधून काढता येते. वर निर्देशिलेल्या इमर्सनच्या दैनंदिनीतील विशेषणे आणि त्याच्या जीवनातील भावनात्मक चढउतार यामधे काही एक उच्च प्रकारची सुसंगती आढळून आली तर त्यामुळ बोडरने मांडलेल्या योजनेची उपयुक्तताच सिद्ध होते. इमर्सनच काय, दैनंदिनी, पत्रे लिहिणाऱ्या, सातत्याने लेखन करणाऱ्या कोणत्याही चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून घेताना बोडर यांचे तंत्र महत्त्वाचे ठरावे.[१८क]

बोडरने विल्यम जेम्स यांच्या पत्रांचा असाच अभ्यास केला. १८८२ ते १९१० या कालखंडात लिहिलेल्या पत्रातील दर शंभर क्रियापदांमागे येणाऱ्या विशेषणांची संख्या त्यांनी ठरविली आणि मग जेम्सच्या जीवनात विविध कालावधीत पुरुषांना लिहिलेल्या पत्रातील विशेषणांच्या संख्येची. स्त्रियांना लिहिलेल्या पत्रातील विशेषणांच्या संख्येशी त्यांनी तुलना केली. त्यांना असे आढळून आले, की चाळीस ते पन्नास या वयमानात पुरुषांना लिहिलेल्या पत्रांपेक्षा स्त्रियांना लिहिलेल्या पत्रात विशेषणे खूपच होती, परंतु साठ वर्षानंतर लिहिलेल्या पत्रात विशेषणांची संख्या नेमकी उलटी होती. त्यांच्या अभ्यासातून उपलब्ध झालेली आकडेवारी खालील प्रमाणे–

**‘ अक्षरी दर शंभर क्रियापदांमागे येणारी विशेषणे ’**

| वयमान | पुरुषांना लिहिलेली पत्रे | स्त्रियांना लिहिलेली पत्रे | सरासरी |
|---|---|---|---|
| ४०–५० | ४३·२ | ६२·७ | ५२·९ |
| ६०–५* | ६१·५ | ४२·२ | ५१·८ |

जॉन गॅरटी यांच्यामते वरील आकडेवारीचा अर्थ वादाचा विषय होऊ शकेल परंतु तशी चर्चा मोलाची ठरेल.

---

18 क– Ibid, PP. 183–185.

* इथे बोडर यांना ६० ते ६५ वयमान अभिप्रेत असावे.

याच प्रकारच्या चरित्रकारांच्या दृष्टीने उपयुक्त ठरणाऱ्या काही अभ्यासांची दखल घेणे आवश्यक आहे. अल्फ्रेड कॉर्झिपस्की (Alfred Korzybski) या शब्दार्थ शास्त्रज्ञांचे Semanticists म्हणणे असे आहे, की विकृत शब्दार्थांच्या सवयीतून (bad semantic habits) विक्षिप्त, भेकड भ्रमिष्ट (Paranoid) व्यक्तिमत्त्व सूचित होते. एफ. एच्. सॅनफर्ड (F. H. Sanford) या मानसशास्त्रज्ञाने १९४२ साली या क्षेत्रात कसून अभ्यास केला. त्यांच्या मते लिखित अभिव्यक्तीच्या परिमाणविशिष्ट विश्लेषणाने व्यक्तिमत्त्वाचा वेध घेता येतो. या मताला काही प्रायोगिक पुराव्याने बळकटी आणली आहे. नंतरच्या संशोधनामुळे हे मत ग्राह्य ठरले आहे.

चरित्रविषयभूत व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वातील गूढतेचे आकलन व्हावे म्हणून चरित्रकाराला आणखी काही साधने उपयुक्त ठरण्याची शक्यता आहे. जॉन डोलर्ड (John Dollard) आणि ओ. एच. मावरेर (O. H. Mowrer) यांनी व्यक्तिगत कागदपत्रातून अभिव्यक्त होणारा ताण मापण्याचे साधन उपलब्ध करून दिले आहे. ज्यांच्या जीवनात काही भावनात्मक प्रश्न निर्माण झालेले आहेत, अशा व्यक्तींच्या अक्षरशः त्यांच्याच शब्दात काही सामाजिक कार्यकर्त्यांनी घेतलेल्या मुलाखती डोलर्ड आणि मावरेर यांनी अभ्यासिल्या. वास्तविक ते सामाजिक कार्यकर्ते त्या व्यक्तींना खरोखरच मदत करतात, की नाही हे शोधून काढणे हा त्या दोघांचा मूळ हेतू होता. त्यांनी त्या अहवालातील मानसिक अस्वस्थता किंवा ताण व्यक्त करणाऱ्या आणि दु:खपरिहार व्यक्त करणाऱ्या शब्दांची (R) संख्या मोजून ताण परिहारांक (Discomfort- Relief Quotient) तयार केला आणि त्याचे पुढीलप्रमाणे समीकरण मांडले. $DRQ = \frac{D}{D+R}$ त्या मुलाखतीतील प्रत्येक पानाचा वेगळा ताण- परिहारांक काढल्यावर, त्यानुसार उपलब्ध झालेले फलित आलेखरूपाने मांडल्यावर, त्यांना त्या फलिताचा मुलाखत घेतलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या विवक्षित वेळच्या मनस्थितीशी घनिष्ठ संबंध प्रस्तापित झाल्याचे आढळून आले. या पद्धतीने चरित्रकारांना खाजगी कागदपत्रांचा अभ्यास करता येण्यासारखा आहे. ज्यांनी पदोपदी मानसिक ताण सहन केला, अनेक भावनात्मक चढउतार अनुभवले. त्या माधवराव पटवर्धनांसारख्या व्यक्तीच्या पत्रांचा अभ्यास करताना तर ही पद्धत अधिकच उपयुक्त ठरावी.[१८ड]

आत्मचरित्राच्या द्वारे नायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे काही पैलू शोधून काढताना राल्फ के. व्हाईट (Ralph K. White) यांची विश्लेषणात्मक मूल्यांकनाची (Value-Analysis) पद्धत चरित्रकारांना उपयुक्त ठरावी. रिचर्ड राईट

18 ड- Ibid, P. 185.

(Richard Wright) यांच्या ' काळा मुलगा ' या आत्मचरित्राच्या अभ्यासातून हे तंत्र विकसित झाले. व्हाईट यांनी प्रथमतः रिचर्ड राईट यांचे आत्मचरित्र काळजीपूर्वक वाचून काढले आणि त्या वाचनाच्या आधारे रिचर्ड राईट विषयीचे आपले मत नोंदले. आत्मचरित्रावरून नायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेताना चरित्रकार सर्वसाधारणपणे हीच पद्धत अवलंबितात. पण व्हाईट यांनी ते आत्मचरित्र समासात स्वतः केलेले मूल्यांकन लिहीत आणि चरित्रनायकाने व्यक्त केलेल्या ध्येयांची नोंद करीत पुन्हा वाचून काढले. त्यांनी ही ध्येये आणि मूल्यांकन लघुलिपीत चिन्हांकित केली आणि पुन्हा पुन्हा येणाऱ्या त्या चिन्हांची संख्या मोजली. शेवटी त्यांनी राईटने ज्या मूल्यांचे ठासून प्रतिपादन केले होते. त्या मूल्यांच्या आधारे त्याचे आणखी एक विश्लेषण लिहून काढले.

व्हाईट हे निष्णात मानसशास्त्रज्ञ होते. त्यांनी प्राथमिक मूल्यांकनात केलेल्या अनुमानाचे प्रत्यन्तर चिन्हे मोजताना मिळाले. ज्या गोष्टींचे आत्मचरित्रात विपुल निवेदन झाले, त्या गोष्टींनी व्हाईटच्या मनाची पकड घेतली. राईटचे बालपण अत्यंत कष्टमय होते हे असेच एक सत्य चिन्हे मोजताना उघडकीस आले कारण, त्याच्या आत्मवृत्तात त्याच्या जीवनातील नैराश्य दर्शविणारी १, २०५ चिन्हे आढळली तर समाधान दर्शविणारी केवळ ३४९ चिन्हे सापडली. इतरांबद्दलचा त्याच्या मनातला तिरस्कार, इतरेजनांवर त्याने केलेल्या शेकडा ८९ टीकेतून दिसून आला. तो कुरापत काढणारा, वडिलांचा द्वेष करणारा होता. आईसंबंधाने त्याच्या भावना विसंगत होत्या. स्त्रियांच्या बाबतीतली त्याची उदासीनता, ज्ञानाबद्दल सत्याबद्दल त्याला वाटणारी आस्था इत्यादी व्यक्तिविशेष प्राथमिक विश्लेषणात उघडकीस आलेच पण त्याशिवाय नंतरच्या चिन्हे मोजणीच्यावेळी आणखी भरीव प्रकाश त्याच्या व्यक्तिमत्त्वावर पडला. शारीरिक सुरक्षिततेकडे रिचर्ड राईटचा रोख होता ही गोष्ट प्राथमिक मूल्यांकनाच्या वेळी व्हाईटच्या नजरेतून सुटली होती. पण ते रिचर्ड राईटचे फार मोठ्या प्रमाणात आणि वारंवार आत्मचरित्रात उल्लेखिलेलं ध्येय होते. नंतरच्या मोजणीतून असेही दिसून आले, की सामाजिक ध्येयवादाच्या बाबतीत राईट उदास होता. इतर निग्रो लोकांशी तो कधीही एकरूप होऊ शकला नाही. ज्यांच्याबद्दल त्याला तिरस्कार वाटला त्यांना त्याने नेहमीच धारेवर धरले.

विश्लेषणातून केलेल्या मूल्यांकनामुळे निदान अंतःप्रेरणेने घेतलेल्या निर्णयांना आळा बसतो. स्वतः व्हाईट यांनी असे दाखवून दिले आहे, की या पद्धतीच्या प्राथमिक अवस्थेत होणारा व्यक्तिमत्त्वाचा आत्मनिष्ठ अभ्यास अत्यंत आवश्यक आहे. प्राथमिक आत्मनिष्ठ अभ्यासाशिवाय ही पद्धत निरूपयोगी ठरते आणि चिन्हांच्या मोजणीतून उपलब्ध झालेल्या नव्या कल्पनांच्या आधारे सामग्रीचे पुन्हा एकदा आत्मनिष्ठ विश्लेषण झाल्याशिवाय त्या पद्धतीचे महत्त्व पूर्णपणे प्रस्थापित

होऊ शकत नाही. व्हाईट यांच्या मते या पद्धतीने रिचर्ड राईटचे व्यक्तिदर्शन व्यापक आणि मजबूत पायावर होते. कारण, या पद्धतीत आकडेवार माहितीचे अत्यंत काटेकोर पद्धतीने टीका करून अर्थबोधन झालेले असते.

व्हाईटच्या पद्धतीचे आणखी एक गुंतागुंतीचे तंत्र ए. एल्. बाल्डवीन (A. L. Baldwin) या मानसशास्त्रज्ञाने उपयोगात आणले. त्यांनी जेनी (Jenny) नावाच्या एका वृद्ध स्त्रीने ग्लेन (Glenn) आणि इसाबेल (Isabel) या विवाहित जोडप्याला लिहिलेल्या पत्रांतील आशयाचे विश्लेषण केले. जेनीची जीवनकथा थोडक्यात अशी–

जेनी आयर्लंडमधे जन्माला आली पण बालपणातच तिला कॅनडाला नेण्यात आले. लहानपणीच तिच्यावर भावाबहिणींच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी पडली. नंतर तिने लग्न केले, पण पतीच्या अकाली मृत्यूमुळे तिच्या एक महिन्याच्या मुलाच्या संगोपनाची काळजी तिला वाहावी लागली. रॉसवर (Ross) तिची अपार माया जडली. स्वतःच्या उत्पन्नात बसणाऱ्या चैनींचा त्याला उपभोग घेता यावा म्हणून ती स्वतःच्या पोटाला टाच लावून काटकसरीने जगत होती. रॉस मोठा होऊन स्वतःच्या पायावर उभा राहितोपर्यंत त्यांचे संबंध जिव्हाळ्याचे आणि सुखाचे होते. मग मात्र जेनी मुलाच्या मैत्रिणींचा द्वेष करू लागली. रॉसने लग्न करताच तिने त्याच्याबरोबरीचे संबंध तोडून टाकले पण तिला विरह सहन झाला नाही आणि रॉसने पत्नीशी घटस्फोट घेताच तिने रॉसशी पूर्ववत संबंध जुळविले. पुन्हा एकदा त्या दोघांमध्ये जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित झाले. पण रॉसच्या इतर स्त्रियांबरोबर असलेल्या हितसंबंधामुळे त्या दोघात भांडणे होत राहिली. कालांतराने रॉसला कानाच्या पाठिमागच्या हाडाचा संसर्गजन्य (mastoid infection) रोग होऊन तो एकाएकी कालवश झाला. जेनीने नंतर बऱ्याच नोकऱ्या केल्या पण तिला सुख लाभले नाही. सरतेशेवटी तिने एका वृद्ध स्त्रीच्या घरात प्रवेश केला. सुरुवातीलाच तिचे समाधान झाल्यासारखे दिसले, पण लवकरच तिने घरातल्या माणसांशी भांडायला सुरुवात केली. तिच्या जीवनाची अखेरची वर्षे अत्यंत दुःखात गेली. बाल्डवीन यांना जेनीची जीवनकथा तिने रॉसच्या मित्रांना आणि पत्नीला लिहिलेल्या पत्रांवरून कळली. बाल्डवीन यांचे जेनीच्या पत्रांचे आशयनिष्ठ विश्लेषण चार प्रकारच्या पुराव्यावर आधारलेले होते. त्यांनी त्या पत्रातून व्यक्त झालेल्या मनोवृत्तीच्या आणि कल्पनांच्या पुनरावृत्तीचा जेनीच्या शब्दातून घडणाऱ्या तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या परिचयाचा, त्यात उल्लेखिलेल्या विविध घटितांच्या आणि भावनांच्या संलग्नतेचा आणि शेवटी अशाच तऱ्हेच्या इतर प्रकरणांच्या अनुभवांचा उपयोग केला. जेनीच्या पत्रातील पुनरावृत्तीची आणि संलग्नतेची मोजणी करून त्यांनी व्यक्तिमत्त्वाच्या आशयिक विश्लेषणाला बळकटी आणली. आशयिक विश्लेषणातला अपुरेपणा दूर करण्याकरिता, त्या

विश्लेषणात अधिक सचोटी यावी म्हणून त्यांनी ही व्यक्तिगत रचनात्मक विश्लेषणाची पद्धत उपयोजिली.[१८इ]

बाल्डवीन यांनी केलेले आशयिक विश्लेषण अंशत: आत्मनिष्ठ होते. त्यांना जेनीच्या विधानांना मथळे देऊन त्यांचे वर्गीकरण करावे लागले. काही विधानांचे त्यांनी वर्गीकरण केलेच नाही, तर काही विधाने सर्वसाधारण सदरात एकत्र केली. 'पुरुष' हा एक आणि 'स्त्री' हा दुसरा वर्ग त्यांनी मानला होता. पण रॉसला त्यांनी एका तिसऱ्याच वर्गात ठेवला आणि ग्लेन आणि इसाबेल यांची एकाच समुदायात (Unit in themselves) गणना केली. त्यांनी घेतलेला प्रत्येक निर्णय आत्मनिष्ठ अभ्यासातून त्यांना जे जेनीचे आकलन झाले त्यावर आधारलेला होता. त्यांनी एकंदर चौदा मथळे निवडले आणि त्या मथळ्यांच्या संदर्भात जेनीने ज्या विविध वृत्ती प्रकट केल्या त्याप्रमाणे ते वेगवेगळे केले. उदाहरणार्थ 'रॉस' ह्या मथळ्याखाली येणाऱ्या सर्व संदर्भांचे अनुकूल, प्रतिकूल व तटस्थ असे वर्गीकरण केले. नंतर पुढे त्यांचे स्वार्थी, आळशी, अप्रामाणिक, हल्ला झालेला आणि त्याविरुद्ध अशा मथळ्याखाली स्पष्टीकरण केले. अशा रीतीने पुनरावृत्तीवर आधारलेले निर्णय यांत्रिकरीत्या तपासणे शक्य झाले.

भावनिक संलग्नतेच्या आधारे घेतलेल्या निर्णयांची विश्वसनीयता पारखताना बाल्डवीन यांनी जेनीच्या जीवनातील विस्तीर्ण टप्प्यांना व्यापणाऱ्या सर्वसाधारण कालखंडात आणि मग घटनात ती एका विवक्षित विषयावर लिहीत असताना पत्रांच्या लहान लहान कालदर्शक विभागात पत्रांची उपविभागणी केली. हे निर्णय देखील आत्मनिष्ठ होते. विवक्षित घटनेत वर निर्देशिलेले सर्व प्रकार संलग्न असल्याचे आढळून आले. 'रॉस–प्रतिकूल' आणि 'पैसे वाचविले' ह्या प्रकारांची जेव्हा योगायोगाच्या मर्यादेपलिकडे पुनरावृत्ती झाली तेव्हा बाल्डवीन असे धरून चालले, की या दोन संकल्पनांचे जेनीच्या मनात काही नाते असावे.

पत्रातल्या सर्व घटनांची जेव्हा वर्गवारी करण्यात आली, उपलब्ध झालेली माहिती पंचकार्डसवर उतरविण्यात आली, तेव्हा कॉम्प्युटिंग मशीनमुळे कोणतीही व्यक्ती, ध्येय अथवा कल्पनेचा उल्लेख किती वेळा झाला, प्रत्येक प्रकारच्या संदर्भाचे (उदा० : प्रतिकूल, अनुकूल) समग्र संदर्भाशी असलेले प्रमाण, आणि लेखकाच्या मनातले व्यक्ती आणि कल्पनांचे अंतर्गत नाते चटकन् ठरविता येणे शक्य झाले. महत्त्वाच्या पुनरावृत्ती आणि संबंध प्रस्थापित झाल्यावर पुष्कळ महत्त्वाच्या गोष्टी उजेडात आल्या. जेनीने मुलाच्या दृष्टीने अनुकूल संदर्भाचे भूतकाळाचे पुनर्जीवन (Past relived) या संदर्भाशी पुन्हा पुन्हा संबंध जोडले. यावरून रॉस जेव्हा वाढत होता आणि तिच्यावर पूर्णपणे अवलंबून होता त्या सुखी गतायुष्यात मनाने जाण्याची तिची इच्छा प्रदर्शित झाली.

---

१८ इ– Ibid, PP. 186–187.

ज्यांचे ते पद्धतशीर वर्णन करू शकले असे काही वर्गीकरणांचे गट समुदायाशी संबद्ध असतात, असे बाल्डवीन यांना आढळून आले. असा एक समुदाय त्यांनी केलेल्या अर्थबोधनासहित पुढे दिला आहे.

शोधलेला पैसा
(MONEY– sought)

शोधलेल्या नोकऱ्या
(JOBS–sought)

नाकारलेल्या नोकऱ्या
(JOBS–rejected)

स्वत: निरपराध बळी)
(HERSELF–innocent)
victim

प्रकृती–नाटयरूपाने दाखविलेली.
(HEALTH–dramatized)

बाल्डवीन यांच्यामते वरील समुदायात अधिकाधिक पुनरावृत्ती होणारी वर्गीकरणे आहेत. त्या वर्गीकरणांच्या अधिकाधिक पुनरावृत्तीवरून असे दिसून येते, की रॉसच्या बरोबर पुन्हा समझोता होईतोपर्यंतच्या काळात नोकरीचा शोध हा जेनीच्या जीवनातला अत्यंत महत्त्वाचा प्रश्न होता. एकाच समुदायातील दोन परस्पर विरोधी वृत्तींवरून एकाच प्रसंगाशी निगडित असलेल्या विसंगत भावनांची सूचना मिळते. जेनीला नोकरी का हवी होती आणि तिने नोकऱ्या का नाकारल्या हे ठरविण्यास पुरेशी माहिती उपलब्ध नव्हती. (पैशाचा शोध या संदर्भातून थोडाफार सुगावा लागतो.) स्वत: निरपराध बळी या संदर्भाचे नाते नोकरीच्या बाबतीतल्या दोन्ही वृत्तींशी आहे आणि त्यावरून असे स्पष्ट होते, की जेनीच्या अडचणीचे जे काही मूळ कारण होते त्याला नोकरीच्या शोधाने तिने आकार दिला आणि तिला असेही वाटले, की नोकरीची आवश्यकता वाटण्यात किंवा काम करण्यास असमर्थ असण्यात तिचा काही दोष नव्हता. या समुदायावरून असेही दिसते, की तिची प्रकृती फार बिघडलेली होती. निदान तिला असे वाटले, की तिची बिघडलेली प्रकृती हा तिच्या दुर्दैवी परिस्थितीचाच भाग होता.

दुसऱ्या एका समुदायावरून या पद्धतीचे सामर्थ्य आणि दोष दोन्ही दिसून येतात.

मृत्यू–योजलेला.
(DEATH–planned for)

पैशावर फार बारीक नजर.
(MONEY scrupulously regarded)

पैशाचे शंकेखोरपणे संरक्षण.
(MONEY suspiciously guarded)

या समुदायावरून बाल्डवीन यांना असे वाटले, की जेनी मृत्यूची अपेक्षा करीत होती. म्हणूनच तिने काळजीपूर्वक पैशाचे संरक्षण केले. मात्र ती पैशाचे संरक्षण शंकेखोरपणे का करीत होती याचे स्पष्टीकरण त्यांना देता आले नाही. त्याचबरोबर मृत्यू आणि पैशावरची बारीक नजर यामधले संबंध स्पष्ट झाले नाहीत, या वरवर असंबद्ध वाटणाऱ्या वृत्तीमधे आकडेवारीच्या दृष्टीने महत्त्वाचा संबंध होता ह्या वस्तुस्थितीने बाल्डवीन यांना मृत्यूकडे पाहण्याच्या तिच्या वृत्तीसंबंधाने अधिक तपशील उपलब्ध व्हावा म्हणून पत्रांची पुन्हा तपासणी करायला भाग पाडले. क्षुल्लक म्हणून पूर्वी त्यांच्या नजरेतून सुटलेल्या काही गोष्टी आता त्यांच्या लक्षात आल्या. मृत्यूनंतर आपला पैसा मित्रांच्या हाती पडेल याची खात्री करून घेण्याकडे तिचा रोख होता. (रस्त्यात मृत्यूशी गाठ पडल्यावर कोणी परक्या माणसाने पर्समधून पैसे चोरू नयेत म्हणून आपल्या काचोळीत ती पैसे शिवून ठेवत असे.) कर्ज न फेडता मृत्यू आला तर, या भीतीने कोणत्याही सहलीला जाण्यापूर्वी दूर असताना मृत्यू झाल्यास दफनविधीकरिता पैसे उपलब्ध व्हावेत म्हणून काही रक्कम ती ग्लेनकडे पाठवीत असे. जेनीची पैशावर फार बारीक नजर होती आणि ती आपल्या मालमत्तेचे काळजीपूर्वक संरक्षण करीत असे या गोष्टी बाल्डवीन यांच्या ध्यानी आल्या होत्या आणि म्हणूनच आपल्या विश्लेषणात त्यांनी या वर्गीकरणांचा समावेश केला होता, पण मृत्यूकडे पाहण्याच्या तिच्या वृत्तीशी असलेले त्या गोष्टीचे संबंध त्याच्या ध्यानात आले नाहीत. मोजणीमुळे या संबंधांच्या गूढ रचनेचा पूर्वी न घडलेला परिचय घडून आला.

बाल्डवीन यांनी जेनीच्या व्यक्तिमत्त्वाचे स्वत: केलेले मूल्यमापन, ज्यांनी तिच्या पत्रांचा अभ्यास केलेला होता, पण त्यांच्या आकडेवारीवर आधारलेल्या विश्लेषण पद्धतीचा अवलंब केला नाही, अशा पाच मानसशास्त्रज्ञांनी केलेल्या मूल्यमापनाशी ताडून पाहिले आणि व्यक्तिगत रचना विश्लेषण पद्धतीची परिणामकारकता सिद्ध केली. या तज्ञांपैकी फक्त एकानेच त्या पत्रातून बाल्डवीन यांच्याइतकी माहिती मिळविली आणि सगळ्यांनीच आकडेवारीवर आधारलेल्या अभ्यासातून घेतलेल्या निर्णयांच्या विश्वसनीयतेबद्दल निर्वाळा दिला. याशिवाय बाल्डवीन यांनी आणखी एका मानसशास्त्रज्ञाला पत्रे न वाचता केवळ आकडेवारीवर आधारलेल्या निर्णयाच्या अभ्यासावर आधारलेले अंध विश्लेषण करून जेनीचे वर्णन करावयाला लावले. त्या मानसशास्त्रज्ञाचे स्वभावलेखन बाल्डवीन यांनी व इतर सर्वांनी केलेल्या स्वभावलेखनाशी जुळले. आणखी विशेष म्हणजे बाल्डवीन यांनी केलेल्या आत्मनिष्ठ विश्लेषणांपैकी फक्त दोनच विश्लेषणात त्यांच्या नजरेतून सुटलेली माहिती होती. [१८फ]

---

१८ फ– Ibid, P. 188.

चरित्रनायकाच्या लेखनाद्वारे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणाऱ्या या मानसशास्त्रीय पद्धतीचे काही दोष जॉन गॅरटी यांनी दाखविले आहेत. ते असे : आशयनिष्ठ विश्लेषणाचे निर्णय पूर्वग्रह आणि पक्षपात यांमुळे डागळण्याची शक्यता आहे. नेमके काय मोजायचे ह्या निर्णयाचा परिणाम अंतिम फलितावर होण्याची शक्यता आहे. योग्य ते वर्गीकरण करणे आणि उपलब्ध झालेल्या सामग्रीला अचूक सांकेतिक चिन्हे देणे यावर या पद्धतीच्या निर्णयांचे मूल्य अवलंबून असते. सांकेतिक चिन्हे देण्याच्या पद्धतीची विश्वसनीयता पारखून घेता येण्यासारखी आहे, पण या पद्धतीद्वारे घेतलेल्या निर्णयांची अचूकता अखेरीस मूलभूत आत्मनिष्ठ निर्णयांच्या विश्वसनीयतेवर अवलंबून राहते. आशयनिष्ठ विश्लेषणाच्या बाबतीत आणखी एक अडचण संभवते ती अशी, की आजकाल संभाषण आणि आत्मचरित्र यासारखे प्रकाशित लेखन लेखकाशिवाय अन्य व्यक्तींकडून लिहिले जाते. या विशिष्ट परिस्थितीत या पद्धतीचा अवलंब करून घेतलेले निर्णय विश्वसनीय मानणे चुकीचे ठरते. शिवाय, काही माणसे आतल्या गाठीची असतात. त्यांचे अभिव्यक्तीचे सामर्थ्य तोकडे असले, म्हणजे मग त्यांच्या पत्रांचे किंवा आत्मचरित्रांचे असे विश्लेषण कितीसे उपयुक्त ठरणार ?

आशयनिष्ठ विश्लेषण पद्धतीच्या उपरिनिर्दिष्ट मर्यादा लक्षात घेऊनही जॉन गॅरटी यांना ही पद्धत उपयुक्त वाटते याचे कारण या पद्धतीने घेतलेले निर्णय क्षणिक प्रेरणा आणि पूर्वग्रहदूषितता यावर अवलंबून राहण्याची शक्यता असूनही, जर या पद्धतीचा योग्य तऱ्हेने उपयोग केला, तर चरित्रकाराचे आत्मनिष्ठ निर्णयांवरचे अवलंबन कमी होते; परस्पर विरोधी पुराव्यामुळे उत्पन्न होणाऱ्या शंकांचे सहज निरसन करता येते; निदान तशी शंका घेण्यास कमीतकमी जागा उरते; आणि घेतलेल्या निर्णयांबद्दल एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण होतो.

चरित्रनायकाच्या लेखनाद्वारे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेताना, व्यक्तिमत्त्वाच्या प्राथमिक बोधक्रियेत आत्मनिष्ठा हा प्रमुख घटक असतो. व्यक्तिविषयक आकलनाला ग्रहण करणाऱ्याच्या मनबुद्धीचा रंग येणे हे टाळता येण्यासारखे नाही. शिवाय त्याकामी चरित्रकाराला अंत:प्रेरणेचा उपयोग होतो. म्हणजेच प्राथमिक बोधप्रक्रियेत चरित्रकाराला नायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा केवळ अंदाज बांधता येतो. अंदाजात शंभर टक्के अचूकता गृहीत धरता येत नाही. अंदाज खरा असू शकतो किंवा तो खोटाही ठरू शकतो. वर निर्देशिलेल्या मानसशास्त्रीय पद्धतीमुळे चरित्रकाराला केवळ आत्मनिष्ठ निर्णयावर अवलंबून रहावे लागत नाही. तसे पाहिले तर चरित्रात शंभर टक्के वस्तुनिष्ठा अपेक्षिताच येत नाही. म्हणूनच ते चरित्र एरव्ही चरित्राचा इतिहास झाला असता. पण केवळ आत्मनिष्ठ निर्णयामुळे सत्याचा विपर्यास होण्याची शक्यता असते, म्हणून आत्मनिष्ठ निर्णयातून वस्तुनिष्ठ निर्णय घेता आला पाहिजे. वर चर्चिलेल्या मानसशास्त्रीय पद्धतीमुळे आत्मनिष्ठ

निर्णयाच्या आधारे वस्तुनिष्ठ निर्णयाप्रत येता येते व अधिकाधिक अचूकता गाठता येते, हे त्या पद्धतीचे वैशिष्टच आहे.

**हस्ताक्षर** (Graphology)

मानसशास्त्र इतकेच हस्ताक्षराचे शास्त्र चरित्रलेखनाच्या कामी उपयुक्त ठरावे. अक्षरांची गिचमीड, उजव्याबाजूला वळलेली अक्षरे, उभी अक्षरे, डाव्या-बाजूला कललेली अक्षरे, अक्षरांचा घोळ, पेनवर पडणारा दाब व त्यामुळे होणारी अक्षरांची कमी अधिक रुंदी, पेन उचकल्यामुळे एकाच सलग शब्दात किंवा वाक्यात येणारी तुटक अक्षरे, अक्षरांना जोडणाऱ्या अर्धवर्तुळाकार किंवा कोनाकृती रेषा, पेन न उचलता लिहिलेले शब्द. लिहिताना डाव्या बाजूला किंवा उजव्या बाजूला सोडलेली मार्जिन, सही करण्याची पद्धत यावरून लिहिणाऱ्याच्या त्या त्या वेळच्या मनोऽवस्थेची कल्पना करता येते. चरित्रनायकाने शारीरिक, मानसिक विकासाच्या विविध अवस्थातून जात असताना केलेले लेखन उपलब्ध झाले तर हस्ताक्षरावरून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा काही अंशाने अंदाज बांधणे शक्य होईल आज हे शास्त्र आहे त्या अवस्थेत त्या शास्त्राधारे व्यक्तिमत्त्वासंबंधाने केवळ अंदाज बांधणेच शक्य आहे. मानसशास्त्राची उपशाखा म्हणून हस्ताक्षराचे शास्त्र विकास पावत असले तरी चरित्राच्या कामी या शास्त्राचा उपयोग करून घेताना काही अडचणी संभवतात. पहिली अडचण अशी आहे, की हस्ताक्षरावरून घेतलेले निर्णय अंत:प्रेरणा आणि अनुभवावर अवलंबून असतात. विशिष्ट निर्णय देताना गोळा केलेल्या सामग्रीचे स्वरूप आणि उपयोगात आणलेले तंत्र, उपकरणें लक्षात घेता हस्ताक्षरावरून घेतलेल्या निर्णयाच्या विश्वसनीयतेबद्दल खात्री देता येत नाही. दुसरी अडचण अशी आहे. की हस्ताक्षरशास्त्राची वैचारिक चौकट निश्चित झालेली नाही. लिहिणाऱ्याच्या वेगवेगळ्या मानसिक अवस्थांचे, व्यवहारांचे ज्ञान हस्ताक्षरशास्त्रात उपलब्ध आहे आणि ते वाढतेही आहे. पण ह्या ज्ञानाला एका सूत्रात ओवता येत नाही आणि असे सूत्र मिळू शकेल की नाही ह्याविषयी शंका आहे. आधुनिक मानसशास्त्राच्या धर्तीवर सखोल संशोधन करण्यासाठी नवनव्या उपकरणांचीही आवश्यकता आहे. केवळ हस्ताक्षरावरून व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे धोक्याचे असले तरी लेखन हा एका परीने आत्मप्रकटीकरणाचा प्रयत्न आहे, हे नाकारता येत नाही. हस्ताक्षरशास्त्राचा आद्य प्रणेता प्रियर (Preyer) याच्या शब्दात सांगायचे म्हणजे, 'handwriting is brainwriting'[१९] निदान चरित्रकाराला नायकाच्या व्यक्तिमत्त्वासंबंधाने एक किंवा अनेक हस्ताक्षर-तज्ञांकडून व्यक्त झालेला अभिप्राय उपलब्ध झालेल्या अन्य पुराव्याशी पडताळून घेता येईल.

---

19– Roman Klara. G. ' Handwriting A key to Personality,' The Noonday Press, 1962, P. 6.

आतापर्यंतच्या विवेचनामुळे साधनांच्या बाबतीत काही निर्णयाप्रत येणे शक्य झाले आहे. माहितीशिवाय चरित्र लिहिणे केवळ अशक्य आहे. तेव्हा यथार्थ व्यक्तिदर्शनासाठी आवश्यक ती माहिती पुरवू शकतील इतकी साधने उपलब्ध होणे अपरिहार्य ठरते. विविध साधनांद्वारे उपलब्ध झालेल्या पुराव्याची चिकित्सा-पूर्वक छाननी होणे अगत्याचे आहे. तसेच परस्परविरुद्ध गोष्टीतून सत्याच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न व्हावा. उपलब्ध झालेल्या साधनसामग्रीतून चरित्रनायकाचे जिवंत व्यक्तिमत्त्व उभे राहिले पाहिजे. साधने हा चरित्राचा कच्चा मालमसाला आहे. ती काही पूर्णाकृती नव्हे. अखेरीस चरित्राची ती साधनेच आहेत, चरित्र नव्हे.

# सात

# प्रयोग आणि प्रवाह

चरित्रवाङ्मयाशी निगडित अशा मूलभूत प्रश्नांची चर्चा येथवर केली. पाश्चात्त्य चरित्रवाङ्मयातील प्रवाह आणि पाश्चात्त्य चरित्रकारांनी केलेले विविध प्रयोग यांची माहिती या संपूर्ण प्रकरणात देण्याचे योजिले आहे. पाश्चात्त्य चरित्र लेखनाच्या तुलनेने मराठी चरित्रलेखनासंबंधाने काही विचार करता यावा; मराठी चरित्रलेखनात प्रयोगशीलता कितपत आहे याविषयी काही एक निर्णय घेता यावा; या हेतूने हे प्रकरण प्रस्तुत प्रबंधात मुद्दाम समाविष्ट केले आहे.

कोणत्याही साहित्य प्रकारातील प्रचलित मूल्यांसंबंधी लेखकांच्या मनात धुमसत असलेल्या असंतोषाला नव्या प्रयोगाच्या रूपाने विधायक वळण लागते. नव्या प्रयोगाचे यश जेव्हा जबरदस्त असते, तेव्हा त्या प्रयोगाच्या प्रभावाने प्रचलित मूल्ये रद्दबातल ठरतात. नवी मूल्ये उदयाला येतात आणि रूढ होतात. चरित्रवाङ्मयावर फार काळपर्यंत नैतिक विचारांची घट्ट पकड होती. व्यक्तीचे जीवन जाणून घेण्याच्या जिज्ञासेने क्वचितच चरित्र लिहिले गेले. चरित्रकारांनी बहुधा स्वतःच्या कोणत्यातरी पूर्वकल्पनेच्या हेतूने, उद्‌बोधनाच्या हेतूने, वाचकांच्यापुढे आदर्श ठेवण्याच्या हेतूने व्यक्तिमत्त्वाला दुय्यम स्थान दिले. अगदी बॉसवेलचे तंत्र प्रतिष्ठा पावेतोपर्यंतच्या काळात कोणत्यातरी प्रचलित कल्पनेला वा ध्येयवादाला दृश्य स्वरूप देताना, सत्याला विकृत स्वरूप देण्याची, प्रतिकूल तपशील दडवून ठेवण्याची व एनकेन प्रकारेण चरित्रनायकाची स्मृती टिकवून धरण्याची वृत्ती आढळून येते. ही वृत्ती इतकी जबरदस्त होती, की प्रगतीच्या वाटा रोखल्या गेल्या. चरित्रनायकाच्या वारेमाप स्तुतीने भरलेली, केवळ त्याच्या पराक्रमाचे वा यशाचे पोवाडे गाणारी चरित्रे लिहिण्याचा जणू प्रघातच पडला. कोणत्याही व्यक्तीच्या जीवनाचे कथन कौशल्याने, सहानुभूतीने, सत्यनिष्ठेने, अलिप्तपणे केले म्हणजे त्या व्यक्तीच्या जीवनकथेत अपार गोडी निर्माण होते, ही कल्पना चरित्रकारांच्या मनात रुजायला फार वेळ लागला.

चरित्रनायकाचे केवळ गुणगान वा यशोगान गावयाची हरदासी परंपरा प्रथम बॉसवेलने मोडली. त्याने सत्यप्रतिपादनाचे व्रत मोठ्या निष्ठेने पाळले. डॉ. जॉनसनच्या व्यक्तिमत्त्वाचे आकलन करून देणारी कोणतीही गोष्ट त्याने

दडपून टाकली नाही, वा सत्य सांगायला तो कधी कचरला नाही. अत्यंत पूज्य मानलेल्या, स्वर्गवासी मित्राच्या व्यक्तिमत्त्वाची प्रतिकूल बाजू थोडी कमी करण्याची कु. हॅन मॉर (Miss Hannah More) यांनी त्याला केलेली विनंती त्याने साफ धुडकावून लावली. इतकेच नव्हे तर स्पष्टवक्तेपणा या चरित्र लेखनाच्या मूलभूत तत्त्वाशी त्याने इतके इमान राखले, की स्वत: चरित्रकारासंबंधाने डॉक्टर जॉनसनने व्यक्त केलेल्या तुच्छतेला चरित्रात योग्य ते स्थान लाभले आहे. सत्य प्रतिपादन हे जणू त्याचे अलिखित धोरण होते आणि ते त्याने काटेकोरपणे अमलात आणले. 'He would nor cut off the doctors' claws nor make his tiger a cat to please anybody,'[1] जॉनसनला एक चमत्कारिक मेंदूचा रोग जडला होता. हा रोग त्याच्या कुळात परंपरेने चालत आलेला होता. त्या योगाने त्याची वृत्ती वारंवार उदासीन होत असे, कोणत्याही गोष्टीविषयी उल्हास न वाटून त्याचे चित्त इतके उद्विग्न होत असे, की त्याला जिवाचादेखील कंटाळा येई. या मज्जारोगाच्या योगानेच त्याचा स्वभाव त्रासिक झाला होता व त्यास भ्रमिष्टपणा जडला होता. या भ्रमिष्टपणाचे अनेक प्रकार बॉसवेलने लिहून ठेवले आहेत. वास्तविक जॉनसनचा भ्रमिष्टपणा सर्वांनाच ठाऊक होता, पण अत्यंत आवश्यक अशा व्यक्तिवैशिष्टयांसंबंधाने चरित्रकाराने मूग गिळून बसावे असा त्यावेळचा शिष्टाचार होता. स्वत: जॉनसनने आपल्या तक्रारीचे वर्णन भ्रमिष्टपणा असेच केले आहे. पण चरित्रात उघडपणे त्याचा उल्लेख केल्याबद्दल बॉसवेलला मात्र दोष देण्यात आला. या वर्णनात बॉसवेलने भडकपणा आणला नाही किंवा हातचेही राखून ठेवले नाही. 'The powers of his great mind might be trouble s, and their full exercise suspended at times, bnt the mind itself was ever entire.'[2] या शब्दात नेमके सत्य त्याने जगापुढे ठेवले आणि ते सत्य इतके बोलके होते, की त्यावर मल्लिनाथी करण्याची बॉसवेलला आवश्यकताच उरली नाही. डॉ. जॉनसनच्या चरित्रात बॉसवेलने केवळ स्तुतीसुमने उधळलेली नाहीत, अथवा केवळ उपहासही केलेला नाही. चरित्रनायक जसा होता तसा तो चित्रित करण्यात त्याने आघाडी मारली. तसे पाहिले तर सत्य प्रतिपादन हे डॉ. जॉनसननेच विशद केलेले मार्गदर्शक तत्त्व होते. ही गोष्ट बॉसवेलच्या पुढील प्रतिपादनावरून स्पष्ट होते. 'प्रत्येक चित्राकृतीमधे छायेबरोबरच प्रकाशही

1– Sir Lee Sidney, 'Principles of Biography', Cambridge University Press, 1911, P. 46–47.

2– Sir Rait Robert, 'Boswell and Lockhart', Royal Society of Literature transactions. Essays by Divers Hands, Vol XII. P. 117.

असावा. हातचे न राखता जेव्हा मी त्याचे चित्र रेखाटतो, तेव्हा त्याने जी शिफारस केली तीच मी प्रत्यक्षात आणतो.'[३] बॉसवेलने या तत्त्वाचा अंगीकार केला एवढेच.

गुणवान कृतीच्या निर्मितीसाठी पडेल तो किंमत द्यायला आणि हवे ते परिश्रम घ्यायला बॉसवेल तयार होता. आपल्या गुरुप्रमाणेच बॉसवेल हा सत्याचा निःसीम भक्त तर होताच, पण चरित्रात अचूकता यावी म्हणून एका शब्दाचाही पडताळा पाहावयाचा असल्यास तो साऱ्या लंडनभर फिरे. जॉशुआ रेनाल्डस हे जॉनसनचे परमस्नेही असल्यामुळे बॉसवेलचाही त्यांच्याशी परिचय झालेला होता. 'चरित्राच्या प्रकाशनानंतर जॉशुआ रेनाल्डस यांनी वर्ड्स्वर्थजवळ या ग्रंथाबद्दल असा अभिप्राय व्यक्त केला की, या ग्रंथातल्या प्रत्येक शब्दावर जणू काही तो शपथेवर सांगितला आहे, असे समजून विश्वास ठेवावा. शुद्धलेखनाच्या चुका दुरुस्त करण्यापूर्वी शुद्धलेखनाचे कागद घरी आणण्याची बॉसवेलला सवय होती, आणि नोंदलेल्या संभाषणाच्या समयी हजर असलेल्यांपैकी त्याच्या सहवासातील कुणी असला म्हणजे, त्याला किंवा त्यांना तो चूक दुरुस्त करण्याची विनंती करीत असे, आणि तेवढ्यानेही समाधान झाले नाही, तर वादग्रस्त शब्द पडताळून पाहण्याकरिता तो सर्व लंडनभर फिरे. जॉशुआ रेनाल्डस यांच्या अभिप्रायावरून चरित्रात अचूकता यावी म्हणून बॉसवेल किती कष्ट घेत असे याची कल्पना येते.

साध्या आणि क्षुल्लक घटनांतच व्यक्तिमत्त्वाचे मर्म सापडते ही गोष्ट लिटन स्ट्रॅची, आंद्रे मोर्वा आणि लुडविग यांच्याइतकीच बॉसवेलला मान्य होती. पण या तिघांपेक्षाही बॉसवेल आणखी एका बाबतीत भाग्यवान ठरला. ज्याचे चरित्र लिहावयाचे त्या खुद्द जॉनसनचा त्याला प्रत्यक्ष सहवास लाभला. मागे चरित्रनायकाच्या सहवासाचे महत्त्व विशद करताना बॉसवेलच्या तंत्राचा उल्लेख येऊन गेला आहे. तेव्हा जॉनसनच्या सहवासातून त्याला सूक्ष्म तपशील कसा उपलब्ध झाला आणि त्याचा त्याने कोणता उपयोग करून घेतला ते पाहू. डॉ. जॉनसनचे मनोदर्शन घडविणारे, कोणत्याही तऱ्हेच्या पूर्वयोजनेशिवाय त्याच्या मुखातून बाहेर पडणारे स्वयंस्फूर्त शब्द बॉसवेलच्या कानावरून गेले होते. डॉ. जॉनसनच्या अंतःप्रेरणा आणि भावनांचे दर्शन घडविणारे त्याच्या चेहऱ्यावरचे लहानसहान बदल आणि हावभाव बॉसवेलने निरखले होते. ज्या प्रसंगातून डॉ. जॉनसनची जीवन कथा त्याला जशी प्रतीत झाली तशी ती त्याने वाचकांना सादर केली, ते प्रसंग त्याने काळजीपूर्वक टिपले होते. याचा अपरिहार्य परिणाम असा झाला, की बॉसवेल वाचकांना जॉनसनचे व्यक्तिदर्शन घडविणारा सूक्ष्म तपशील सादर करू शकला. बोलताना जॉनसन मधूनमधून तोंडाने वेगवेगळे आवाज

---

3- Ibid, P. 113.

काढीत असे. कधी कधी अगदी रवंथ केल्यासारखे किंवा काही तरी चघळल्या सारखे. कधी कधी तो कोंबडीच्या ओरडण्यासारखा आवाज काढीत असल्यासारखा जीभ टाळला लावून आत ओढीत असे. केव्हा केव्हा आपली जीभ तो वरच्या बाजूच्या पुढच्या हिरडयांवर आदळीत असे. जणू काही तो घाईत टू--, टू--, टू--करीत असल्यासारखे वाटावे. आणि हे सगळें करीत असताना बहुधा हसत हसत तो काहीतरी विचारात गढल्यासारखा दूरवर कटाक्ष फेकीत असे. केवळ शारीर व्यक्तिमत्त्व रेखाटतानाही दांडग्या निरीक्षणामुळे त्याला सूक्ष्म तपशील उपलब्ध होऊ शकला. अशा स्वत: अवलोकन केलेल्या क्षुल्लक पण व्यक्तिदर्शी तपशीलातून डॉ. जॉनसनचे जिवंत व्यक्तिमत्त्व उभे राहते.

डॉ. जॉनसनचे चरित्र सहज जरी चाळले तरी पानापानांवर अगदी क्षुल्लक पण व्यक्तिमत्त्वाचा साक्षात्कार घडविणारे प्रसंग रेखाटलेले आढळतात. बॉसवेलचे सूक्ष्म निरीक्षण आणि त्याला लाभलेला डॉ. जॉनसनचा सहवास यामुळे हे शक्य झाले हे खरेच. पण या प्रसंगांचे चित्रण प्रत्ययकारी व्हावे म्हणून आणखी दोन गोष्टींची आवश्यकता असते. चरित्रकाराला नायकाविषयी खडा न् खडा माहिती हवी. आपण ज्या काही क्षुल्लक गोष्टी करतो किंवा बोलतो त्या सगळयाच गोष्टीतून किंवा प्रत्येक थट्टेतून व्यक्तिमत्त्वाचा साक्षात्कार घडतोच असे नाही. नोकरचाकरांबरोबरच्या सगळयाच बोलण्यातून व्यक्तिमत्व प्रकट होते असेही नाही. ज्या चरित्रकाराला सहवासजन्य अवलोकनाची संधी मिळते, त्याला त्या संधीचा भरपूर उपयोग करून घ्यावयाचा असेल तर त्याला कोणती गोष्ट केवळ क्षुल्लक आहे, आणि कोणत्या क्षुल्लक गोष्टीत व्यक्तिदर्शनाचे सामर्थ्य आहे, हे नेमके हेरता आले पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे उपलब्ध झालेल्या माहितीचा त्याला भरपूर उपयोग करावयाचा असेल तर त्याने स्मृतीवर अवलंबून रहाणे धोक्याचे असते. बॉसवेलला साध्याही विषयात फार मोठा आशय शोधण्याची कला साधलेली होती आणि असा तपशील त्याने तात्काळ नोंदलेला होता. तो म्हणतो, 'अनुभवावरून मला असे आढळून आले, की माझ्या मित्राच्या संभाषणाचा मुळातला स्वाद कायम राखून ते संभाषण प्रकट करण्यासाठी गोळा करावयाचे म्हणजे त्याची विलंब न लावता तात्काळ नोंद होणे आवश्यक होते. त्याच्या बोलण्याची नोंद कालांतराने करावयाची म्हणजे फार काळ ठेवलेली आणि कोमेजलेली फळे अथवा भाज्या ताजी असताना त्यांची जशी चव असते अशी ज्या अवस्थेत उरत नाही त्या अवस्थेत जतन करण्यासारखे अथवा मुरविण्यासारखे होते.'[४] त्यामुळे डॉक्टर जॉनसनच्या चरित्रात जिथे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा

4– Garraty, John. A. 'The Nature of Biography', Jonathan Cafe London, 1958, P. 173.

साक्षात्कार घडविणारे प्रसंग वर उल्लेखिलेल्या कसोटीला उतरले, तिथे त्या प्रसंगांचे चित्रण प्रत्ययकारी झाले आहे.

चरित्रलेखनाच्या तंत्रात बॉसवेलने आणखी एक बदल घडवून आणला, तो साधनांच्या बाबतींत. त्याने जॉनसनचे व्यक्तिदर्शन घडविताना पत्रे, संभाषण आणि वरवर क्षुद्र वाटणारे परंतु व्यक्तिमत्त्वाचा साक्षात्कार घडविणारे शब्द आणि प्रसंग यांचा चरित्रात चांगलाच उपयोग करून घेतला. शेवटचे साधन फ्रान्समधे सुपरिचित होते. पण इंग्लंडमधे मात्र त्याचा कुणालाच पत्ता नव्हता. चरित्राचा बराचसा भाग त्याने स्वतःच्या दैनंदिनीवरून लिहिलेला आहे. डॉ. जॉनसनशिवाय अन्य व्यक्तिबद्दलची माहिती त्याने दैनंदिनीवरूनच घेतलेली आहे. त्यातही त्याने अवलंबिलेली आत्मचरित्रात्मक पद्धत अपूर्वच म्हटली पाहिजे निवेदनाचा एक भाग म्हणून कथनाच्या ओघात डॉ. जॉनसनची पत्रे, दैनंदिनींतले लेखन आणि काही प्रकाशित साहित्य त्याने मोठ्या कौशल्याने मिसळून दिले. डॉ. जॉनसनच्या कृतींचा आणि वक्तव्याचा रिपोर्टर असेच जणू त्याचे जॉनसन बरोबरीचे नाते होते. डॉ. जॉनसन बोलका होता आणि बॉसवेलजवळ बातमीदाराचे कसब होते, असा अपूर्व योग जुळून आल्यामुळे कथनाच्या ओघात मधून मधून जॉनसनचे संभाषण देण्यात त्याला चांगलेच यश लाभले. बॉसवेलने ही साधने काही नव्याने शोधून काढली नाहीत. पण त्याने त्यांचा एकाच चरित्रात एक समयावच्छेदे-करून योजनाबद्ध उपयोग करून घेतला. साधनांचा असा उपयोग पूर्वी कधीही करण्यात आला नव्हता. बॉसवेलने तो जाणीवपूर्वक केला होता. चरित्रलेखनाची ही वैशिष्ट्यपूर्ण योजना त्याच्या मनात पंचवीस वर्षांपेक्षा अधिक काळ घोळत होती.

वर निर्देशिलेल्या साधनांचा उपयोग करून चरित्रनायकाची मूर्ती वाचकांच्या डोळ्यापुढे ठसठशीत उभी करण्याचे वाचकांचे अवधान चरित्रनायकाभोवती खिळ-वून ठेवण्याचे बॉसवेलचे कसब वाखाणण्यासारखे आहे. तसे पाहिले तर या चरित्रात जॉनसनशिवाय अन्य गोष्टी आणि व्यक्तींच्या संदर्भात खच्चून तपशील भरलेला आहे. परंतु त्या तपशीलातून जॉनसनची व्यक्ती ठळकपणे उठून दिसते आणि तशी ती दिसावी म्हणून त्या मूर्तीवर जग हलवून सोडणाऱ्या ऐतिहासिक प्रसंगांचे किंवा प्रतापी व्यक्तींचे सावट पडू नये म्हणून तो फार जपत असे. डॉ. जॉनसनच्या जिवंत व्यक्तिमत्त्वाची पुनर्निर्मिती साधण्यात बॉसवेलने मिळविलेले यश टीकाकारांनीही मान्य केले आहे.

'अनेकांगी व्यक्तिमत्त्वाच्या श्रेष्ठ आकृतीबंधाशी बॉसवेलने केलेली दैनंदिन तपशिलाची अप्रतिम गुंफण आणि सलग, सचेतन अस्तित्वाशी साधलेला उत्कृष्ट

मेळ यामुळे जीवन जगले जात असल्याच्या संवेदनेची आश्चर्यकारक पुनर्निर्मिती होते.' ५

चरित्रलेखनाच्या कामी जे जे मनोरंजक आहे, लक्षणीय आहे, त्याचा उपयोग कसा करून घ्यावयाचा याची उपजत बुद्धी बॉसवेलकडे होती. उपलब्ध झालेल्या सामग्रीतून निवड, योजना, मांडणी आणि अभिव्यक्ती कशी करावयाची हे त्याला बरोबर ठाऊक होते. बॉसवेलची शैली हे त्याच्या लेखनाचे आणखी एक आकर्षण आहे. त्याच्या शैलीबद्दल हॅरल्ड निकलसन लिहितात, Boswel 's style in the first place is flowing and pleasant.' ६ स्वत: बॉसवेलला या बाबतीत आत्मविश्वास होता. टेम्पल यांना लिहिलेल्या पत्रात तो लिहितो, 'I surely have the art of writing agreeably.'७ त्याच्या लेखनाची आणखी काही वैशिष्टये विषद करताना हॅरल्ड निकलसन पुढे लिहितात, 'बॉसवेलला हुबेहूब प्रासंगिक तपशीलात रस होता व त्याची पाहिलेल्या, बोललेल्या गोष्टींबद्दलची स्मृती दांडगी होती. नाटचीकरणाचे त्याचे बुद्धिकौशल्य निर्विवाद होते, उदाहरणार्थ ज्या मेजवानीच्या प्रसंगी जॉनसन व विल्कीज (Wilkes) या दोघामध्ये सलोखा घडवून आणण्यात आला त्या मेजवानीचे त्याने केलेले वर्णन अपेक्षेप्रमाणे हुबेहूब आणि प्रत्ययकारी आहे. त्याच्या मानसशास्त्रविषयक शक्ती तीक्ष्ण नसल्या तरी जागरूक आहेत. शिवाय त्याच्या निरीक्षणशक्ती आश्चर्यकारक आहेत.'८

बॉसवेलने लिहिलेल्या डॉक्टर जॉनसनच्या चरित्राबरोबरच आधुनिक चरित्रवाङ्मयाची सुरुवात झाली, असे म्हणावयास हरकत नाही. बॉसवेलने पूर्वसूरींच्या कृतींचा सखोल अभ्यास केलेला होता. त्यातले दोष नेमके हेरले होते. त्याने जेंव्हा डॉक्टर जॉनसनचे चरित्र लिहिले तेव्हा त्याच्यापुढे आदर्श अशी कृती जवळ जवळ नव्हतीच. या उलट, बॉसवेलनंतरच्या बहुतेक लेखकांनी त्याने लिहिलेल्या डॉ. जॉनसनच्या चरित्राचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून लेखन केले. बॉसवेल आणि डॉक्टर जॉनसन यांची जोडी जमली. ही चरित्रवाङ्मयाच्या इतिहासातील एक सुदैवाची घटना म्हटली पाहिजे, तो एक अपूर्व योगायोग होता. डॉ. जॉनसनच्या

5– Kendall, Paul Murray.' The Art of Biography ',George Allen & Unwin Ltd , 1965, P. 99.

6– Nicolson Harold. ' The Development of English Biography ', Leonard and Virginia Woolf, London, Hogarth Lectures on Literature, 1927, P. 101.

7– Ibid, P. 101.

8– Ibid, P. 101.

जीवनातून बॉसवेलला चरित्राची सामग्री तर उपलब्ध झालीच, पण चरित्रलेखनाच्या तंत्राबद्दल काही सूचना मिळाल्या आणि डॉ. जॉनसनच्या लेखनातून आणि संभाषणातून काही मार्गदर्शक तत्त्वांचा लाभ झाला. बॉसवेल अत्यंत बुद्धिमान होता. बॉसवेलचा प्रेमळ स्वभाव, साधेपणा, तीक्ष्णबुद्धी, स्पष्टवक्तेपणा इत्यादी गुण असे आहेत, की त्यामुळे कसदार वाङ्मयाची निर्मिती व्हावी. या गुणांमुळेच त्याला डॉ. जॉनसनचे चित्र जिव्हाळ्याने इमानाने चितारता आले. डॉ. जॉनसनच्या चरित्राने लेखकांना व्यक्तिजीवनाची पुनर्निर्मिती करून काही एका उच्च प्रकारची कलात्मक पातळी गाठणारी, चिरकालीन कृती निर्माण करता येते, याची प्रचीती आली. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच चरित्रनायकाची पत्रे, दैनंदिनी, व संभाषणाद्वारे उपलब्ध झालेल्या सामग्रीची कलात्मक गुंफण करणाऱ्या बॉसवेलच्या तंत्राने आणि बॉसवेलच्या यशाने प्रभावित झालेले लेखक चरित्र वाङ्मयाकडे वळू लागले होते.

बॉसवेलचे यश फार मोठे होते. पण एवढ्यावरून त्याने लिहिलेले चरित्र परिपूर्ण होते, असे समजण्याचे कारण नाही. बॉसवेलला ठाऊक असलेला जॉनसन प्रथितयश होता. पण त्याच्या पूर्वायुष्याबद्दल बॉसवेलला फारच थोडी माहिती होती. त्यामुळे त्या चित्रणात पूर्णता येऊ शकली नाही. त्या चरित्रात यशोमंदिराच्या दिशेने मंदगतीने पुढे सरकणाऱ्या डॉ. जॉनसनच्या पूर्वायुष्यातील संघर्षाचे, छाया-प्रकाशाचे चित्रण आढळत नाही. याचा अपरिहार्य परिणाम असा होतो, की चरित्राचा सुरुवातीचा भाग कंटाळवाणा होतो, आणि त्यामुळे चरित्र पुढे वाचूच नये असे एखाद्यास वाटल्यास त्यात काही नवल नाही. पण एकदा का बॉसवेल १७६३ मध्ये जॉनसनबरोबर झालेल्या पहिल्या भेटीचे वर्णन करू लागला, म्हणजे त्याच्या लेखणीला धार येते, पुस्तकात चैतन्य खेळू लागते, आणि त्या जीवनकथेला गती प्राप्त होते. कारण, त्या दोघांची भेट झाल्यानंतरच्या जॉनसनच्या उर्वरित आयुष्यासंबंधाने बॉसवेलजवळ भरपूर माहिती होती. लेखनपद्धतीचा हा भेद बॉसवेलवर अपरिहार्यपणे लादला गेला.

मराठी चरित्रकारांवर बॉसवेलचा प्रभाव कितपत पडला हे या ठिकाणी तपासून पाहणे आवश्यक आहे. मराठेशाहीचा अस्त झाला आणि ब्रिटिशांच्या बरोबर त्यांचे वाङ्मय भारतात आले. मराठी साहित्याच्या इतर शाखांप्रमाणे इंग्रजी चरित्रांचा मराठी चरित्रांवर प्रभाव पडणे स्वाभाविक होते. तोपर्यंत, संस्कृत प्राकृत परंपरा खंड पावली होती. आंग्लाईच्या प्रारंभीच इंग्रजी चरित्रांचे भाषांतर करण्याचा सपाटा सुरू झाला. या प्रयत्नात मराठी अनुवादकांना बॉसवेलचा परिचय घडला.

प्रस्तुत ग्रंथात 'चरित्राचे उद्दिष्ट' या पहिल्या प्रकरणातच प्राचीन मराठी चरित्र वाङ्मयाच्या स्वरूपाची चर्चा केली आहे. बॉसवेलचा मराठी चरित्रांवर जो

प्रभाव पडला आहे तो जाणून घेणे सुलभ व्हावे म्हणून त्या चर्चेचे निष्कर्ष लक्षात घेतले पाहिजेत. पाश्चात्त्य चरित्रांप्रमाणेच प्राचीन मराठी चरित्रांवर धर्मभावनेचा पगडा होता. स्मरण आणि उद्बोधन या दोन हेतूंनीच ही चरित्रे लिहिली गेली. भक्ती-मुक्तीच्या अपेक्षेने ती लिहिली गेली. साहजिकच चरित्रनायकांची निवड धार्मिक क्षेत्रापुरती मर्यादित राहिली. या लेखनात सांप्रदायिक जिव्हाळा त्यांनी ओतला. श्रद्धेने, भक्तीने चरित्रविषयाला अवतारी पुरुष त्यानी मानला. त्याच्याभोवती अलौकिकत्वाचे वलय रेखाटले. त्याच्या अलौकिकत्वाची प्रचीती यावी म्हणून अद्भुताचा मुक्त वापर त्यानी केला. अशा चरित्रात चरित्रविषयाचा केवळ गुणगौरव आला. क्वचित उपलब्ध झालेल्या ग्रंथांचा आधार त्यानी घेतला. एरवी आख्यायिका, आठवणी हाच त्यांच्या चरित्रलेखनाचा आधार. मग या चरित्रांना वास्तवाचा आधार कसा लाभावा ? चरित्र कसे असावे यापेक्षा चरित्र कसे असू नये याची प्रचीती या चरित्रातून येते.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी लिहिलेले डॉ. जॉनसनचे चरित्र प्रसिद्ध झाले आणि या सांकेतिक परंपरेला धक्का बसला. मराठी चरित्रकारांना बॉसवेलच्या लेखनातला वेगळेपणा जाणवला. व्यक्तिदर्शनाच्या उद्दिष्टाचा एक निश्चित दृष्टिकोन लाभला. भक्ति-मुक्तीपेक्षा सत्याला महत्त्व प्राप्त झाले, व्यक्तिदर्शनाच्या कामी अंधश्रद्धेपेक्षा डोळस विवेचक बुद्धीच उपयोगी पडते अशी जाण निर्माण झाल्याबरोबर चरित्राला वास्तवाचा स्पर्श झाला. बॉसवेलच्या प्रभावामुळे संत चरित्रातली विभूतीपूजेची शिष्ट परंपरा पूर्णपणे मोडली असे जरी म्हणता आले नाही, तरी मराठी चरित्रात येथून पुढे व्यक्तिदर्शनांचे उद्दिष्ट हळूहळू रुजत गेले; धार्मिक क्षत्रापलिकडे जाऊन चरित्रविषयाची निवड होऊ लागली; केवळ ऐकीव माहितीवर विसंबून न राहता पत्रे, दैनंदिनी यालारख्या व्यक्तिदर्शी साधनांचा व सहवासातून उपलब्ध झालेल्या तपशीलाचा उपयोग करून चरित्रनायक जसा होता तसा तो चित्रित करण्याइतका आत्मविश्वास वाटू लागला. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे बंधू श्री. ल. कृ. चिपळूणकर यानी याच आत्मविश्वासाने शास्त्रीबुवांचे व्यक्तिदर्शन सत्यनिष्ठेने, अलिप्ततेने घडविले आहे.

बॉसवेलच्या मृत्यूनंतरच्या शतकात, सर्वसाधारण चरित्रलेखनात आणि तंत्रात फारच थोडी सुधारणा झाली. नजरेत भरण्याजोग्या कृती क्वचितच आढळतात. विसाव्या शतकाचा प्रारंभ होईपर्यंत तरी लेखनपद्धतीच्या दृष्टीने थक्क करून सोडणारी प्रगती झालेली आढळत नाही, १८३७ मधे व्हिक्टोरिआ राणी गादीवर आली तेव्हा पुन्हा एकदा चरित्रनायकाची स्मृती टिकवून धरणाऱ्या, चरित्रनायकावर स्तुतीसुमने उधळणाऱ्या आणि चरित्रलेखनाची अधोगती घडवून आणणाऱ्या चरित्रांना लोकप्रियता लाभलेली दिसते. ही चरित्रे रटाळ तर होतीच,

पण त्यांची लांबीही वाढली. १८३० मधे कार्लाइलने एका कंटाळवाण्या लांबलचक चरित्राचे समालोचन पुढील शब्दात केले आहे. 'सामग्रीचा ढीग गोळा करण्यात आला आहे, आणि शीघ्रगतीने इमारतीचे काम पुढे सरते. हाताला येईल तसा दगडावर दगड ठेवण्यात आला आहे. पूर्णपणे सोयीस्कर असेल तर, चरित्रात्मक चुन्याच्या गिलावाचो एखाद दुसरी थापी इथे तिथे पसरण्यात येत आहे. अशा रीतीने सर्वबाजूंनी ऊर्ध्व दिशा दाखविणारा, अत्यंत चमत्कारिक, बेडौल खांब एकाएकी उभा राहतो शिल्पशास्त्रीय गूढ म्हणून एखाद्या लहानशा शिल्पकृतीप्रमाणे तुम्ही तो पश्चात्कालाकरिता उभा राहू देता.'[९]

व्हिक्टोरिया राणीच्या काळातील चरित्रकार नव्हते. चरित्रनायकाच्या मित्रांच्या, नातेवाईकांच्या भावनांना जपणारे व संकेताला बळी पडलेले होते. त्यांच्या लेखनात पाल्हाळ होता म्हणूनच ही चरित्रे अकारण लांबली, असा या चरित्रांवर एडमन्ड गॉस यांनी चौफेर हल्ला चढविला. लिटन् स्ट्रॅचीचा उदय होण्यापूर्वी सतरा वर्षे अगोदर एडमंड गॉस यांनी पुढील प्रतिपादन केले होते : 'आपण इंग्लंडमधले लोक आपल्या मृताला ग्रंथाच्या दोन अवाढव्य खंडांच्या तिरडीखाली गाडून टाकतो आणि मूळातच जो कदाचित् सुंदर नसेल पण अपरिहार्य आणि विशेषकरून योग्य आहे असा एक विधी पार पाडून व ताजेतवाने होऊन पुढे जातो... ते दोन गंभीर खंड वरकरणी हजेरी लावणाऱ्या इतर मूक व्यक्तीप्रमाणे शवपेटीमागून नियमितपणे जातात.'[१०] शिवाय, काही बाह्य शक्तींचाही परिणाम चरित्रलेखनावर होत होता. इतिहास लेखनात शास्त्रीय वस्तुनिष्ठेवर जो भर दिला गेला, त्याचा एकोणिसाव्या शतकात चरित्रलेखनावर काहीसा इष्ट तर काहीसा अनिष्ट परिणाम दिसू लागला. चरित्रलेखनात वस्तुनिष्ठा तर आलीच पण त्याचबरोबर चरित्रनायकाविषयीच्या सहानुभूतीचा अभावही आढळू लागला. ज्या थंडगार वस्तुनिष्ठेचा पाठपुरावा करण्यात आला, ती व्यक्तिमत्त्वाच्या आकलनाच्या दृष्टीने, व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने हानिकारक ठरली.

तथापि या काळात चरित्रलेखनात आंतरिक बदल घडवून आणण्याचे प्रयत्नही होत होते, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस हातचे राखून लिहिण्याची प्रवृत्ती हळूहळू कमी होऊ लागली. चरित्रकार अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याची अपेक्षा करू लागले. पण व्हिक्टोरिया राणीच्या काळातील प्रवृत्तीचे विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापर्यंत तरी समूळ उच्चाटण झालेले नव्हते. 'Victorianism only died in 1921.'[११] असे हेरॉल्ड

---

9- John A. Garraty 'The Nature of Biography', Jonathan Cape 1958, Page 120-121.

10- Ibid. P. 97.

11- Ibid, P. 97.

निकल-सन म्हणतात ते अगदी खरे आहे. चरित्रलेखनातील विभूतिपूजेची शिष्ट परंपरा गॉसने प्रथम मोडली. १९०७ साली 'Father and son' या चरित्रात त्याने विभूतिपूजेच्या शिष्ट परंपरेपासून दूर जाण्याचा प्रयत्न केला. या चरित्राकरिता त्याने मर्यादित कालखंड निवडला आणि वडिलांविषयी अगदी स्पष्ट-पणे सत्य तेच लिहिले. या दोन्ही दृष्टीने पाहिले तर परंपरेपासून दूर जाण्याचा त्याचा प्रयत्न क्रांतिकारक म्हणावा लागतो.

एकोणिसाव्या शतकातील शास्त्राच्या भरारीपुढे माणसाचा ठेंगूपणा उघड झाला. योगायोग आणि अलौकिकशक्तींवर अविश्वास प्रकट करणाऱ्या शास्त्राच्या हेतुमूलकतेमुळे व्यक्तीच्या अभ्यासाला प्रोत्साहन मिळाले नाही. मानसशास्त्र मात्र याला अपवाद ठरले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी चरित्र व मानसशास्त्र यांची परस्परांवर जी क्रिया झाली, ती दोघानाही उपकारक ठरली. माणसाच्या अभ्यासाकरिता मानसशास्त्रज्ञांनी सुरुवातीला चरित्रांचा उपयोग करून घेतला, आणि नंतर चरित्रकारांनी व्यक्तिदर्शनाच्या कामी मानसशास्त्राला राबविले.

विशेषत: १९१० मधे फ्रॉइडचे Interpretation of Dreams हे पुस्तक प्रसिद्ध झाले, आणि व्हिक्टोरिया राणीच्या काळातील हातचे राखून लिहिण्याच्या प्रवृत्तीला जबरदस्त धक्का बसला. विसाव्या शतकातील काही ठळक शक्तींनी चरित्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या प्रयोजनाला सत्य सांगण्याच्या इच्छेला त्यापायी स्मृती टिकवून धरण्याच्या संकेताचा त्याग करावा लागण्याचा धोका पत्करूनही चालना दिली. एकोणिसाव्या शतकातील कल्पना, प्रवृत्ती आणि मूल्यं ज्यांना अमेरिकेत ही 'व्हिक्टोरियन' असे संबोधले जात होते, अशा मूल्यांविरुद्ध झालेली प्रतिक्रिया वर उल्लेखिलेल्या शक्तींपैकी एक ठळक शक्ती होती. या प्रतिक्रियेतूनच एक ठाम मत तयार झाले होते. विशेषत: जागतिक युद्धानंतर फार काळ लोटल्यामुळे व कागदोपत्री पुराव्याच्या उपलब्धतेमुळे चरित्रनायक व नायिकांसंबंधाने निर्णय द्यायला एकोणिसाव्या शतकातील नागरिकांपेक्षा आम्हीच अधिक सुस्थितीत आहोत, हे ते मत होय. व्हिक्टोरिया राणीच्या काळातील औचित्याच्या कल्पना, ढोंग, सदभिरुची आणि शिष्टसंप्रदायी परंपरांचे आविष्कार यांविरुद्ध झालेली भावनात्मक प्रतिक्रिया लक्षात घेण्याजोगी आहे. शिष्ट रीतींवर, ढोंगावर झालेल्या या हल्ल्याला मनोविश्लेषणाच्या विकासाने आणि प्रचाराने उत्तेजनच मिळाले.

मनोविश्लेषणाने चरित्रकाराला व्यक्तिमत्त्वाच्या अर्थबोधनाची, आकलनाची एक नवीन पद्धत उपलब्ध करून दिली आहे. मनोविश्लेषणाने मानवी वागणुकींच्या गतिशास्त्राचे (dynamics) नियंत्रण करणाऱ्या अनंगीकृत यंत्रणांचे लक्षण बांधले

आणि त्यांचे विशेष–धर्म–भेद दाखविले. अबोध मनाची समृद्धता आणि मूळचे सामर्थ्य प्रकाशात आणताना मनोविश्लेषणाने मानसशास्त्रीय अनुभूतींची असंख्य नवी क्षेत्रे दाखवून दिली. खास करून फ्रॉइडच्या पद्धतीने केलेल्या मनोविश्लेषणाचा रोख चरित्रनायकाची वागणूक आणि लैंगिक प्रवर्तकता यांचे महत्त्व विशद करण्या-कडे होता. मनोविश्लेषणाने स्त्रीपुरुषांना स्वतःच्या आणि इतरांच्या स्थिरवृत्तीने बेताल समाजविघातक प्रेरणांचा प्रतिरोध करायला शिकविले आणि एकोणिसाव्या शतकातील शिष्टाचारांविरुद्ध सुरू झालेल्या प्रतिक्रियेने जो प्रामाणिकपणाचा स्पष्टवक्तेपणाचा प्रारंभ केला होता, त्या हालचालीला जोराने गती दिली.

फ्रॉइडचा सिध्दांत असा, की व्यक्तीच्या मनात प्रवृत्तीचा संघर्ष वा विग्रह, निर्माण झाल्यावर त्यातील एखाद्या प्रवृत्तीचे निरोधन व्यक्तीला करावे लागते. या निरोधनांतूनच वेगवेगळ्या मानसिक यंत्रणा निर्माण होतात. सामाजिक रूढी, नीतिनियम यामुळे व्यक्तीला कामप्रवृत्तीसारखी मूलप्रवृत्ती दाबावी लागते. अशा वेळी समाजसंमत मार्गांनी निराळे रूप घेऊन ती प्रवृत्ती प्रगट होते. उन्नयन ही मानसिक यंत्रणा या प्रकारची आहे. प्रेमभंग झालेल्या कवीने प्रेमकाव्य करणे, किंवा मातृत्वसुखाला पारख्या झालेल्या स्त्रियांनी अनाथांवर वात्सल्य वर्षाव करणे, ही उन्नयनाची उदाहरणे आहेत. वर्तनामागील खरी प्रेरणा वा हेतू निषिद्ध असल्यास व्यक्ती आत्मवंचना करते, बुद्धिवाद्याला पटेल अशा भाषेत विवेचन करते. कधी व्यक्ती आपल्या हेतूचा आरोप दुसऱ्यावर करते, तर कधी दुसऱ्याचे अनुकरण ती एकरूप होऊन करते. व्यक्तीत काही न्यून असेल तर न्यूनगंड निर्माण होतो, तर कधी व्यक्ती त्यावर निराळ्या मार्गाने मात करण्याचा प्रयत्न करते. जीवनातील जाचणाऱ्या स्मृती, दुःखद अनुभव यांना डावलण्याचा प्रयत्न मानवी मन करीत असते. यातूनच वियोजन (स्मृतीतून तो भाग वगळणे) किंवा परागमन (विकासाच्या वरच्या अवस्थेतून खालच्या अवस्थेत येणे) हे प्रकार निर्माण होतात. थोडक्यात निषिद्ध प्रवृत्तीला समाजसंमत रूप देण्यासाठी, न्यूनावर मात करण्यासाठी, अपूर्णतेला पूर्णतेचे रूप देण्यासाठी जे विविध मार्ग मानवी मन शोधून काढते त्याचे दर्शन मानसिक यंत्रणात आपल्याला घडते.

चरित्र लेखनात मनोविश्लेषणाचा कितपत उपयोग होऊ शकेल, हे दाख-विण्याकरिता अपूर्ण माहितीमुळे पारंपारिक पद्धतीने हाताळता येणार नाही असा लिअनार्डो द व्हिन्की (Lenoardo da Vinci) सारखा विषय फ्रॉइडने निवडला. लिअनार्डोच्या जीवनाची केवळ रूपरेषा तेवढी ठाऊक होती, त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा थांगपत्ताही नव्हता. परंतु जर्मन भाषेत १९१० साली प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात फ्रॉइडने त्या कलावंताच्या अंतःकरणाच्या गाभ्यात प्रवेश मिळविला. तत्पूर्वी लिहिलेल्या कोणत्याही चरित्रापेक्षा हे चरित्र वेगळे होते. या ग्रंथात चरित्रनायकाच्या

शब्दातच त्याचे स्त्री-पुरुष संबंधविषयक कोणते मत होते, कामप्रवृत्तीचे उन्नयन त्याने कसे केले व का केले इत्यादी गोष्टी फ्रॉइडने स्पष्ट केल्या आहेत. एके ठिकाणी तो लिहितो, ' Leonardo thought sex so disgusting that human beings would soon die out if it were not a traditional custom.'[१२] फ्रॉइडच्या मते लिअनार्डोने आपल्या लिंगविषयक ओढीचे रूपांतर पुनरुज्जीवनाच्या कालातील माणसाला शोभेल अशा अतृप्त आणि सर्वव्यापक चौकसपणात केले आणि हे त्याने बुद्धिपुरःसर केले असेही नाही. त्याच्या अनौरसतेमुळे हे घडले. जीवनाची अत्यंत महत्त्वाची पहिली पाच वर्षे तो आपल्या आईजवळ राहिला. पिता म्हणून दाखविता येईल अशी वडिलांची प्रतिमा त्याच्या डोळ्यापुढे नव्हती. त्याच्या आईने स्वतःच्या पतिहीनतेची व त्याच्या पितृहीनतेची भरपाई करण्याकरिता त्याच्यावर मनस्वी प्रेम केले आणि त्याचे शृंगारिक जीवन erotic life अकालीच प्रगल्भ करून तिने त्याचे पौरुषत्व अंशतः हिरावून घेतले. हे थक्क करून सोडणारे विश्लेषण लिअनार्डोने सांगितलेल्या एका बालपणच्या स्मृतीवर आधारलेले होते. ' मी पाळण्यात असताना माझ्याकडे एक गिधाड आले. आपल्या शेपटीने त्याने माझे तोंड उघडले आणि पुष्कळवेळा माझ्या ओठावर त्याने शेपटी आपटली.'[१३] फ्रॉइडच्या मते ही स्मृती नसून केवळ कल्पना आहे आणि म्हणून त्याने ते स्वप्न ठरविले. त्या स्वप्नाला आपले मनोविश्लेषणाचे सिद्धांत लागू करून त्याने असे ठरविले, की गिधाडाची शेपटी म्हणजे लैंगिक चिन्ह (Phallic symbol) आणि ती एकंदर घटना म्हणजे अबुध्दिपुरःसर पुरुषेंद्रिय मुखात टाकून अतिकामाभिलाषेच्या तृप्तीची इच्छा (fellatio) या गृहीत गोष्टीमुळे बऱ्याच लोकांना धसका बसेल याची जाणीव फ्रॉइडला होती. त्याने पुढे असे स्पष्टीकरण केलेले आहे, की वर निर्देशिलेल्या पद्धतीने साधलेली अतिकामाभिलाषा म्हणजे ज्या संवर्धनाच्या अवस्थेत आपणा सर्वांनाच एकदा सुख लाभले, त्या अवस्थेची सुधारणा. लिअनार्डो संवर्धनाचे स्वप्न बाळगून होता, या विश्लेषणातून फ्रॉइडला असे दाखवायचे होते, की आईच्या आत्यंतिक मायेमुळे आणि त्याच्या अनौरसतेच्या लज्जेमुळे लिअनार्डो लैंगिक बाबतीत अतिउदास बनला.

लिअनार्डो ही अनौरस संतती होती. प्राचीन काळी सर्व गिधाडे मादया असून त्यांची गर्भस्थापना वाऱ्याकडून होते अशी लोकांची समजूत होती. लिअनार्डो गाढा व्यासंगी असल्यामूळे वरील दंतकथा त्याच्या वाचनात आली असली पाहिजे,

---

12– Leonardo Da Vinci– Sigmund Freud, Kegan Paul 1922 Page 14.

13– Ibid, P. 34 (Originally cited by Scognamiglio from the Codex Atlanticus, P. 65)

इच्छापरिपूर्तीमुळे आपल्या आईची गर्भधारणा गिधाड मादीप्रमाणे पुरुषांशी संबंध न येता झाली असावी अशी त्याने कल्पना करणे सहज शक्य होते.

लिअनार्डोच्या स्मृतीसंबंधाची हकीकत वाचताना फ्रॉइडने nibbio या इटालिअन शब्दाचा आपल्याला सोयीस्कर असा अर्थ लावला. वस्तुतः या शब्दाचा अर्थ गिधाडाहून भिन्न व कुठल्याही तऱ्हेचा पौराणिक संदर्भ नसलेला पक्षी असा होतो. फ्रॉइडने स्वतःच आपले स्पष्टीकरण गृहीतपक्ष आहे असे मान्य करून टाकले. मनोविश्लेषणाने व्यक्तिमत्त्वाच्या आकलनासाठी एक नवे तंत्र उपलब्ध करुन दिले असले, तरी या तंत्राच्या मर्यादा फ्रॉइडही ओळखून होता. चरित्रकारांनी अपुऱ्या माहितीच्या आधारे मनोविश्लेषणाकडून शंभर टक्के अचूक निर्णयाची अपेक्षा करू नये असेच त्याचे मत होते. मात्र एक गोष्ट इथे नमूद करणे आवश्यक आहे ती अशी, की फ्रॉइडने लैंगिक संबंधाना फारच महत्त्व दिले. ' Leonardo Da Vinci ' या चरित्रात तो लिहितो : ' चरित्रात्मक लेखनाचा प्रयत्न हा खरोखरच चरित्रनायकाच्या मानसिक जीवनाच्या आकलनासाठी आंतरवेध घेणारा असेल, तर खोटया विनयामुळे किंवा योग्य ती गोष्ट करण्याची मोकळीक असल्यामुळे बहुतेक चरित्रात घडते, त्याप्रमाणे ज्याची तपासणी करायची त्याच्या लैंगिक कृती व स्त्रीपुरुषसंबंध वैशिष्टयाकडे शांतपणे दुर्लक्ष करणारा नसावा.'[१४]

चरित्रनायकाविषयी लिहिताना त्याच्या लैंगिक जीवनाचे चित्रण टाळू नये असे फ्रॉइड म्हणतो, पण वस्तुस्थिती अशी आहे, की एडमन्ड गॉस, लिटन् स्ट्रॅची यांनी लिहिलेल्या चरित्रात नायकाच्या लैंगिक जीवनासंबंधाने अवाक्षरही न न काढता ती चरित्रे उत्तम वठली आहेत. एडमन्ड गॉसने आपल्या वडिलांच्या चरित्रात, चरित्रनायकाच्या संदर्भात लिंगविषयक चर्चा न करताही, हे चरित्र आधुनिक चरित्रकार ज्या स्वातंत्र्याचा उपभोग घेत आहेत, त्या स्वातंत्र्याच्या परिणतीच्या शिवेची खूण ठरले. चरित्रलेखनाला व्हिक्टोरिआ राणीच्या काळातील परंपरांच्या पाशातून अखेरीस स्ट्रॅचीने मुक्त केले. पण त्यानेही ' क्वीन एलिझाबेथ ' हे चरित्र सोडल्यास लैंगिक बाबींचा परामर्श घेतलेला नाही. बरे त्यामुळे स्ट्रॅचीने लिहिलेल्या चरित्रात उणेपणा राहिला आहे, असे म्हणावे तर तेही धाडसाचे ठरेल.

व्यक्तिदर्शन हे चरित्राचे उद्दिष्ट असल्यामुळे चरित्रलेखनात नायकाच्या लैंगिक जीवनाचा संबंध कितपत येतो, हे ठरविताना चरित्रकाराच्या विकृत पूर्वग्रहांवर विसंबून राहण्याऐवजी चरित्र नायकाचे व्यक्तिमत्त्व आणि स्वभाव लक्षात घेणे आवश्यक आहे. चरित्रनायकाच्या लैंगिक जीवनाचे चित्रण करायचेच झाल्यास त्या चित्रणामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या आकलनात कितपत भर पडते हे पाहिले पाहिजे. हे ठरविताना फ्रॉइडच्या सिद्धांताचा कितपत उपयोग होण्या-

---

14– Ibid, P. 13.

सारखा आहे ? फ्रॉइडच्या मनोविश्लेषणाच्या पद्धतीचा उपयोग करायचा म्हणजे चरित्रनायकाच्या स्वप्नांची, आन्तरोत्सर्गांची नोंद झाली पाहिजे. त्याच्या Endocrine glands चा कुणीतरी शोध घेतलेला असला पाहिजे. समजा, एकवेळ एवढी नोंद झालेली असली, तरी फ्रॉइडच्या पद्धतीचा अवलंब करून शेवटी हाती काय लाभते ? स्वत: फ्रॉइडने ' Leonardo da Vinci ' च्या चरित्रात काय साधले आहे ? फ्रॉइडने लिहिलेल्या लिअनार्डोच्या चरित्राला case history चे स्वरूप प्राप्त झाले आहे. ही गोष्ट या प्रश्नाचा विचार करताना दृष्टिआड करून चालणार नाही. चरित्रलेखनात लैंगिक जीवनाचा संबंध ठरविताना; वा प्रत्यक्ष विश्लेषणात्मक चित्रण करताना; फ्रॉइडच्या सिद्धांताचा फारसा उपयोग होण्यासारखा नाही. कारण, फ्रॉइडच्या पद्धतीचा उपयोग होतो तो बलवत्तर प्रवृत्तींच्या निरोधनाने विकृती निर्माण होते तेव्हा विरुद्ध प्रवृत्ती स्वप्ने, प्रमाद, कल्पनाचित्रे, रोगलक्षणे इत्यादी रूपांनी व्यक्त होते, प्रवृत्तीचे उन्नयन साधले नाही तर ती उफाळून येते, यासारख्या कल्पनांचा विनियोग चरित्रकारांनी करावयाचा म्हणजे ते विवक्षित लैंगिक विवेचन रोगनिदानविषयक (Pathological) ठरते. चरित्राला अपरिहार्यपणे शास्त्रीय चिकित्सेचे स्वरूप प्राप्त होते. चरित्रकार त्या चित्रणापुरता शास्त्रज्ञ बनतो. त्यामुळे चरित्राचे वाङ्मयीन अंग जोपासले जात नाही. या संदर्भात अर्नेस्ट बॉइड (Ernest Boyd) यांचे पुढील प्रतिपादन योग्यच आहे : ' जिथे लैंगिक संबंध हा महत्त्वाचा घटक नसतो तिथे प्रथम ते प्रकरण रोगनिदानविषयक आहे किंवा नाही ते ठरविले पाहिजे. ते प्रकरण जर रोगनिदानविषयक असेल तर मोर्वा व निकलसन यांच्या व्याख्येप्रमाणे चरित्रकार हा शास्त्रज्ञ ठरतो आणि चरित्राचा एक कलाकृती म्हणून, अभिव्यक्तीचे साधन म्हणून आपल्याशी असलेला संबंध तुटतो. जिथे लैंगिक संबंध रोगनिदानविषयक नसतात तिथे त्यांचे महत्त्व अगदी थोडे, जवळ जवळ नसतेच. अत्यंत सुखी लैंगिक जीवन असे असते की, त्याला इतिहास नसतो आणि चरित्राचा जसा पचनाशी संबंध नसतो तसाच तो लैंगिक बाबतीत कमी किंवा अधिक प्रमाणात नसतोच. कार्लाईलचे अपचन, गिबनची अंडवृद्धी, नेपोलिअनचा कर्करोग आणि फ्रेड्रिक दि ग्रेटचा त्वचारोग यांच्यामुळे या व्यक्तींच्याबद्दलची माहिती, समज व आकलन यात फार भर पडत नाही.'[१५]

चरित्रलेखनातली मनोविश्लेषणाची उपयुक्तता शंकास्पद असूनही चरित्रलेखनावरचा मनोविश्लेषणाचा प्रभाव काही काळ जाणवल्याशिवाय राहिला नाही. १९१० नंतर चरित्रवाङ्मयावर मनोविश्लेषणाचा ठसा उमटू लागला. पहिल्या महायुद्धानंतर तर मनोविश्लेषणाचा प्रभाव अधिकच जाणवू लागला. युद्धातून

15– Boyd Frnest. ' Sex in Biography ', Harper 's Magazine, Nov. 1932, Volume 165, P. 758.

उद्भवलेल्या मज्जातंतूच्या बिघाडाची हजारो प्रकरणे हाताळणाऱ्या डॉक्टरांच्या अनुभवामुळे फ्राइडच्या सिद्धान्ताना पुष्टी मिळाली. ही प्रकरणे सांकेतिक स्वरूपाच्या 'मानसिक धक्क्यांची' नव्हती, हे अगदी उघड होते. १९२० मध्ये फ्रॉइडचे 'General Introduction to psycho-analysis' इंग्रजी भाषेत प्रसिद्ध झाले. शिवाय, मनोविश्लेषणाच्या कल्पनेचा प्रसारही बराचसा झालेला होता. चरित्रकारांना मनोविश्लेषणाच्या योगाने चरित्रातल्या सत्याच्या बंधनातून मुक्त होण्याची, दडपलेल्या प्रेरणांचे अभिज्ञान प्राप्त होण्याची, मनोविश्लेषणाचा रोख स्त्री–पुरुषसंबंधावर असल्यामुळे त्यात अंगभूत असलेले संवेदनाप्रामाण्य आणि याहून अधिक म्हणजे चरित्रांचा खप वाढविण्याची शक्यता दिसू लागली.

फ्रॉइडच्या पद्धतीने लिहिलेल्या चरित्रांचे प्रमाण जसजसे वाढू लागले, तसतसे त्या पद्धतीवर आक्षेप घेणारे अथवा पाठपुरावा करणारे टीकाकारही पुढे आले.

चार्लस व्हिब्ली (Charles Whibley) यांनी १९२४ मधे फ्रॉइडच्या मनोविश्लेषणासंबंधाने पुढील अभिप्राय दिला आहे. 'आतापर्यंतच्या चरित्रलेखनाच्या प्रकट शत्रूंपैकी फ्रॉइडचा शिष्य हा सर्वांहून वाईट आहे. जीवनात आणि कलेत, जे काही सुंदर आहे, त्यावरून तो गोगलगायीसारखा सरपटत जातो.'[१६]

मनुष्याच्या मानसिक बोधजीवनाच्या खाली खोल अबोध जीवनाचा थर असतो आणि त्यात निरोधित प्रवृत्ती अंतर्भूत होतात, या फ्रॉइडच्या महत्त्वाच्या सिद्धांताचा प्रभाव जॉन गॉल्झवर्दी यांच्यावर पडलेला दिसत नाही. 'चरित्रलेखनाचा नायकाच्या अर्धप्रबुद्ध (sub-conscious) मनापेक्षा प्रबोध (conscious) मनाशी फार मोठा संबध असतो.[१७] असेच प्रतिपादन त्यांनी केले आहे.

बर्नार्ड डी व्होटो यांनी तर मनोविश्लेषणाला चरित्राचे क्षेत्र सोडून पुन्हा Consulting room कडे मागे वळावे लागेल असे भविष्य वर्तविले आहे. मानस शास्त्राची साधने चरित्रात निरुपयोगी असेच त्याना वाटते.

Oedipus complex चा शोध एमिल लुडविगलाही लागला होता. त्याने फ्रॉइडवर एक पुस्तक लिहिले. त्यात त्याने मानसशास्त्रावर आधारलेल्या चरित्रलेखनाचा आढावा घेतला आणि त्याला ते सारखेच टाकाऊ वाटले. तो लिहितो, 'फ्रॉइड जेव्हा इतिहासातल्या व्यक्तींची तपासणी करतो, तेव्हा तो रोग्याच्या

---

16– Charles Whibley. 'The Indiscretion of Biography', The English Rereiw, Dec. 1924, P. 772.

17– Galswor thy John. 'The creation of character in Literature' The Roman Lecture delivered in the Sheldonian Theatre, 21 May 1931, Oxford 1931, P. 7.

संपूर्ण देहाची तपासणी करण्याऐवजी फक्त एकाच इंद्रियाची आणि तीही नेहमीच जननेंद्रियाची तपासणी करणाऱ्या वैद्याशी सदृश असतो. माझ्या ग्रंथातील काही हजारो पानांतून तुम्हाला मनोविकलन शास्त्रातून जन्म घेणारी एकही कल्पना अथवा शब्दप्रयोग आढळणार नाही.'[१८]

आंद्रे मौर्वाच्या मते मानव आणि मानवी घटना हे एक विलक्षण गुंतागुंतीचे संयोजन आहे. आणि म्हणूनच फ्रॉइडच्या पद्धतीला अतिमहत्त्व देण्यात आले, अबोधजीवनाच्या बाबतीतही उगाचच नेट लावण्यात आला असे त्याला वाटते. आवश्यक तो पुरावा उपलब्ध होऊ शकत नाही म्हणून आंद्रे मोर्वाला मनोविश्लेषणात्मक चरित्र असाध्य वाटते. तो लिहितो ' आईन्स्टाईनच्या आंतरस्रावाच्या नोंदी सांभाळून ठेवण्यात आजच्या घटकेला कोण गुंतलेले आहे ? पॉल व्हॅलरीच्या एन्डोक्राईन ग्लॅन्डसची तपासणी कोण करीत आहे ? फ्रॉइडच्या पद्धतीने लेखन करणाऱ्या चरित्रकारांना नंतर स्पष्टीकरण करता यावे म्हणून बर्ट्रान्ड रसेलच्या स्वप्नांची नोंद कोण ठेवतो आहे ? व्यक्तीच्या हयातीत जर या मुद्यांची नोंद केली जात नाही तर त्या विकृतीदेखील परतवून न लावता येण्यासारख्या, अनन्यसाधारण व पूर्वस्थितीवर न येण्यासारख्या आहेत '[१९]

आंद्रे मोर्वाने उपस्थित केलेली आवश्यक पुराव्याची अडचण मान्य करूनही अर्निस्ट बॉइड म्हणतात, ' समजा ही अडचण दूर झाली तरी तेवढ्याने चरित्रात नायकाचे व्यक्तिदर्शन यथार्थपणे घडेलच असेही नाही. मानसशास्त्रीय सामग्रीच्या मदतीने उत्तम जीवन जगणे जिथे कठीण आहे, तिथे उत्तम चरित्र लिहिणे कसे शक्य व्हावे ? असा त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. ते लिहितात, ' दैनंदिन जीवनात आपल्याला एका गोष्टीची चांगलीच जाणीव आहे, की न्युरॉसीस, सायकॉसीस, इन्ट्रोव्हर्टस, एक्स्ट्रोव्हर्टस, कॉम्प्लेकसीस, आणि फिक्सेशन या निसरड्या बोलण्याऐवजी मानवी संबंध या परिभाषेचा शोध लागण्यापूर्वी जितके गुंतागुंतीचे होते, मानवी प्रेरणा जितक्या गूढ होत्या किंवा मानवी वर्तन जितके अतार्किक होते तितकेच ते आजही आहे. जर या मानसशास्त्रीय साहित्याचा उपयोग आपल्याला चांगली जीवने जगण्यासाठी होत नाही, तर ती लिहिण्यासाठी तरी का व्हावा ?'[२०]

---

18– Garraty John A. ' Biographers are only human ', the Saturday Review, 20 March 1954. P. 12.

19– Maurois Andre. ' Aspects of Biography ', Cambridge, 1929, P. 90.

20– Boyd Ernest. ' Sex in Biography ', Harper 's Magazine, Nov. 1932. Volume 165, P. 756.

जरा कमी आवेशाने टीका करणाऱ्या लेखकांनी मनोविश्लेषणाच्या शक्यतेसंबंधाने पूर्णपणे अटकळ बांधलेली नसली तरी त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे सोडून काढता येण्यासारखे नाहीत. चरित्रलेखनातील मनोविश्लेषणाच्या मर्यादा स्पष्ट करताना हॉवर्ड ममफर्ड जोन्स (Howard Mumford Jones) यांनी (English Journal, Vol.XXI) च्या फेब्रुवारी १९३२ च्या अंकात पुढील मुद्दे मांडले आहेत. मोकळ्या संयोगातूनच व्यक्तिमत्त्वाची प्रतीक योजना (Symbolism) समजावून घेता येते आणि मृत व्यक्ती या पद्धतीने पारखता येत नाहीत. मानसशास्त्रज्ञांनी कृती आणि अनुभूतींचा अर्थ प्रमाणांकित (Standardizing) करण्याची पद्धत निर्माण केलेली नाही. विश्लेषण करणारा कोणत्याही घटनेचा अमुक एक अर्थ लावू शकतो आणि व्युत्क्रमाने नेमका त्याच्या विरुद्धही अर्थ लावू शकतो. या वस्तुस्थितीमुळे निर्णयाच्या पक्केपणालाच सुरुंग लागतो. जोपर्यंत एक कल्पना व्यक्त करण्याकरिता वापरलेल्या चिन्हातूनच दुसरी कल्पना व्यक्त होते, तोपर्यंत मनोविश्लेषण करणारा लेखक स्वेच्छेने भरकटतच राहणार. फ्रॉइडच्या पद्धतीने केलेले चरित्रातले अर्थबोधन विश्वसनीय व्हावे म्हणून लेखक वरच्या दर्जाचा साहित्यिक आणि तसाच मानसशास्त्रज्ञ असायला हवा, पण हा एक दुर्लभ योग आहे. मुक्त सहवासातून मनाच्या पार तळाशी बुडालेल्या स्मृती कुशल मार्गदर्शनाखाली प्रकट करणे हा फ्रॉइडच्या पद्धतीने केलेल्या मनोविश्लेषणाचा महत्त्वाचा घटक आहे. पण मृत माणसाला स्मृतीही नसतात, विचारसंगतीही (Association) नसते किंवा प्रश्न विचारूनही काही हाती लाभण्यासारखे नसते. अर्थातच त्याने मागे ठेवलेली माहिती कितपत महत्त्वाची आहे, हे ठरविणेही कठीणच. शिवाय चिन्हांचे अर्थबोधन हे एकतर संयोगातून टिपलेल्या माहितीवर आधारलेले असले पाहिजे, वा त्या संदर्भात साधलेले असले पाहिजे. त्यामुळे कोणतेही अर्थबोधन कितपत बरोबर आहे, हे समजणे कठीण जाते.

मार्क लाँगकर (Mark Longakar) यांच्या मते अन्य पुराव्याद्वारे बनलेला दृष्टिकोन कदाचित् मनोविश्लेषणामुळे अधिक बळकट होऊ शकेल. परंतु पूर्ण व सत्य जीवनाला खरी आवश्यकता असते ती प्रत्यक्ष पुराव्याची. ते लिहितात– ' खरे पाहिले असता प्रत्येक चांगला चरित्रकार हा चांगला मनोविकलनशास्त्रज्ञ असतो, परंतु प्रत्येक चांगला मनोविकलनशास्त्रज्ञ खचितपणे चांगला समर्थ चरित्रकार असेलच असे नाही.'[२१]

सत्य शोधून काढण्याच्या दृष्टीने मनोविश्लेषणाच्या पद्धतीचा फारसा उपयोग होण्यासारखा नाही असे बर्नार्ड डीव्होटो यांचे मत आहे. ' चरित्रातल्या

21– Maurois Andre. ' Ethics of Biography ', English Institute Annual 1942, Morningside Heights, New York, 1943, P. 23.

सत्याप्रत पोहोचण्याची पद्धत या दृष्टीने मनोविकलनशास्त्राला काहीच महत्त्व नाही, मनोविकलनशास्त्राच्या आधारे आतापर्यंत लिहिलेले कोणतेही चरित्र गंभीरपणे सत्य मानता येणार नाही.[२२] या विधानाच्या समर्थनार्थ त्यांनी दिलेले कारण असे आहे, की मनोविश्लेषणात्मक चरित्रलेखनात काय घडले यापेक्षा काय घडले असावे याचीच चर्चा होते आणि चरित्राचा तर काय घडले असावे यापेक्षा प्रत्यक्ष काय घडले याच्याशीच संबंध असतो. प्रत्यक्ष काय घडले आणि काय घडले असावे यामध्ये एवढे अंतर असते, की ते कोणत्याही उपपत्तीने भरून निघण्याची शक्यता नसते. मनोविश्लेषणात्मक चरित्रकाराने जे काही घडले असावे असे सांगितलेले असते ते काही एका गृहीत तत्त्वाच्या आधारे काढलेले अनुमान असते. चरित्रकाराची ती कल्पना असते आणि म्हणूनच चरित्रनायकाशी तिचा काही संबंध नसतो. बर्नार्ड डीव्होटो यांनी मांडलेला आणखी एक महत्त्वाचा मुद्दा असा आहे, की मनोविश्लेषण हे चलनात्मक (dynamic) असते. मानसशास्त्रात ज्यांना १) **स्थानांतर**– (एका मानसिक प्रतिमेकडून दुसऱ्या मानसिक प्रतिमेकडे शक्तीचे स्थलांतर होणे, स्वप्नात एक प्रतिमा दुसऱ्याचे प्रतीक ठरणे किंवा व्यक्तीची एका वस्तू अथवा कृतीबद्दलची आवड बदलून दुसऱ्या वस्तू अथवा कृतीबद्दल आवड उत्पन्न होणे). २) **स्थित्यंतर**– (शारीरिक लक्षणाने सुप्त भावना, विकार, इच्छा इत्यादींची जागा घेणे). ३) **प्रतिकार**– (जड मनाला सचेतन करणाऱ्या मानसशास्त्रीय उपचाराला होणारा प्रतिकार). ४) **बदल**– (मानसरोग्याने आपल्या जीवनातल्या पूर्वीच्या व्यक्तींबद्दलच्या भावनांचा मनोविकलनशास्त्रज्ञावर आरोप करून बदल घडवून आणणे) म्हणतात त्या निरीक्षित विषयांशी वा अशाच काही मनोविषय शक्तींशी मानसशास्त्रज्ञाचा संबंध येतो. पण या शक्ती माणसाच्या मृत्यूबरोबरच नष्ट होतात. चरित्रकाराचे लक्ष अशा निरीक्षित विषयांनी कधीच वेधले जात नाही. कारण, कोणतीही मृत व्यक्ती त्या मनोविषयक शक्ती प्रत्यक्ष स्पष्ट प्रमाणाने दाखवीत नाही. साहजिकच त्या शक्तींविषयी बाह्य पुरावा उपलब्ध होऊ शकत नाही. हौशी मानसशास्त्रज्ञाला यातून मुक्तता करून घ्यायला काही सुगावे (clues) आणि मार्गदर्शक पुस्तके पुरेशी असतात. ते सुगावे आणि ती पुस्तके त्याला हवा असलेला मानसरोगी निर्माण करतात. याचा अपरिहार्य परिणाम असा होतो, की वाचकांना नायकाच्या मानसिक रोगाचे मनोरंजक अर्थबोधन सादर केले जाते. त्यातून कदाचित् लेखकाच्या मनोविकारांचे दर्शन घडेल, फार तर त्यातून त्याचे बदनामीचे कौशल्य वा प्रबोधनाची शक्ती (exhortory powers) निदर्शनास येईल. अधिक निपुण

22– Devoto Bernard. 'The Skeptical Biography', Harper's Magazine, January 1933, P. 185.

माणसाने ते अर्थबोधन साधले तर ज्या रहस्यकथेचे सुगावे कल्पित असतात, अनुमाने साच्यात बसविण्याकरिताच काढलेली असतात, त्या रहस्यकथेच्या कलेशी मिळते जुळते असेल. मनोविश्लेषणाने जे काही उपलब्ध करून दिलेले असते ते अंदाजाने, पूर्वतयारी वाचून एकदम असत्याच्या आधाराने, अगदी परीकथेसारखे चरित्रकाराला सत्य घटितांचा शोध घ्यावयाचा असतो. चरित्रकार जेव्हा मनोविश्लेषणाच्या पध्दतीचा अवलंब करतो, तेव्हा तो फक्त वरच्यासारखे अर्थबोधन साधतो. तो सत्याप्रत पोहोचू शकत नाही.

मनोविश्लेषणाच्या चरित्रलेखनातील उपयुक्ततेसंबंधाने टीकाकारांची प्रतिक्रिया संमिश्र स्वरूपाची आहे. डॉ. क्लार्क मॅथ्यू जोसेफसन (Mathew Josephson) जोसफ वुड क्रूच (Joseph Wood Krutch) लूइज ममफर्ड (Lewis Mumford) आदींनी अनुकूल अभिप्राय दिलेला आहे. लिंकनचे चरित्रकार डॉ. क्लार्क यांनी चरित्रकारांनी मानसशास्त्राचे पुरेसे ज्ञान नसल्यामुळे मनोविश्लेषणाचा हवा तितका उपयोग करून घेतलेला नाही. अशी तक्रार नोंदवून मनोविश्लेषणाच्या उपयुक्ततेसंबंधाने बार्न्झ (Barnes) प्रिझव्हर्ड स्मिथ (Preserved Smith) आणि जेम्स हार्वी रॉबिनसन(James Harvey Robinson) आदी इतिहासतज्ञांची साक्ष काढली आहे. मॅथ्यू जोसेफसन लिहितात :

'भोवतालच्या व्यक्तिगत जीवनाचे मोजमाप करताना बोध प्रेरणांच्या खाली असलेल्या अर्थबोध प्रेरणांचे तर्कशास्त्र जितके फलदायी ठरले तितकेच सामुदायिक समाजाचे स्पष्टीकरण करताना विचार विरुद्ध हितसंबंध यांचे तर्कशास्त्र फलदायी ठरले.'[२३]

लुईस ममफर्ड यांच्या मते चरित्रनायकाच्या अबोध मनाची दखल न घेणारा चरित्रकार एक तर आपल्या अज्ञानाचे किंवा भित्रेपणाचे प्रदर्शन करतो. मनोविश्लेषणाच्या पद्धतीमुळे अत्यंत अल्प पुराव्यावर आधारलेल्या तर्कांचा वा कल्पनेचा उपयोग केला जातो ही गोष्ट मान्य करूनही ते लिहितात, 'आंतरिक जीवनाचे अस्तित्व आणि महत्त्व दुर्लक्षित करण्याइतकी अमर्याद मोठी चूक करण्यापेक्षा आंतरिक जीवनाचे अर्थबोधन करण्यात चुका करणे अधिक बरे.'[२४]

लेखकांच्या साहित्य निर्मितीद्वारे त्याच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश फेकता येणे शक्य आहे, असे काही टीकाकारांना वाटते. त्यांनी या मताचा मन:पूर्वक पुरस्कार केलेला आहे. जोझफ वुडक्रूच यांच्या मते लेखक आणि त्याचे साहित्य सरूप ' identical ' असते. एडगर ॲलन पो (Edgar Allan Poe) संबंधाने

---

23– Garraty John A. ' The Nature of Biography ', Jonathan Cape, 1958, P. 117.

24– Ibid, P. 117.

चर्चा करताना जोझफ वुडक्रूच यांनी पुढील अभिप्राय व्यक्त केलेला आहे. ' The forces whieh wtecked his life were those which wrote his books ' क्लेमन्ट वुड (Clement Wood) हे स्वत: कवी होते. त्यांनी लिहिलेल्या एमी लोअल (Amy Lowell) च्या चरित्रात ते लिहितात : ' कवीच्या काव्यातून आपण त्याची प्रतिमा मिळवू अशा खात्रीने नवमानस शास्त्रांच्या प्रकाशात कवीच्या कृतीचा अभ्यास झाला पाहिजे.'[२५] लुइज ममफर्ड यांनी हर्मन मेलव्हील (Herman Melville) च्या चरित्रात त्याच्या पूर्वायुष्याचे चित्रण करताना त्याने लिहिलेल्या Redburn या कादंबरीचा भरपूर उपयोग करुन घेतलेला आहे.

' चरित्राची साधने ' या प्रकरणात मानसशास्त्रीय साधनांची विस्ताराने चर्चा केली आहे ती एवढ्यासाठीच की, मराठी चरित्रकार नवी नवी साधने हाताळण्याच्या बाबतीत फार मागे आहेत हे लक्षात यावे. मानसशास्त्रीय साधनांना व्यक्तिदर्शनाच्या कामी राबविण्याचा प्रयत्न मराठी चरित्रकारांनी कितीसा केला ? या प्रश्नाचे उत्तर नकारात्मकच द्यावे लागते. आंतरमानस चिकित्सा करणारे चरित्र मराठीत अजिबात आढळत नाही. काही चरित्रप्रकारांचा संपूर्ण अभाव मराठीत आहे, हे इथे नमूद केलं पाहिजे.

फ्रॉइडने व्यक्तीवर प्रकाशझोत टाकण्याकरिता मनोविश्लेषणाचा उपयोग केला, तेव्हा चरित्राला एका बाजूने शास्त्राचे आणि दुसऱ्या बाजूने सृजनशील साहित्याचे आव्हान स्वीकारावे लागले. शास्त्रांप्रमाणेच सृजनशील लेखकाने परंपरागत चरित्रलेखनावर सडकून टीका केली आणि चरित्रलेखनात नव्या कल्पना आणल्या. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस बऱ्याचशा व्हिक्टोरियाकालीन चरित्रांच्या रुक्षपणामुळे वाचकांची चरित्राबद्दलची आस्था कमी होऊ लागली होती. इथे प्रतिभावान लेखकांना सिद्ध सत्याऐवजी ज्याला ते ' उच्चतर सत्य ' म्हणत, त्या सत्याचा वा प्रमाणनिरपेक्षज्ञानाचा (Intuition) उपयोग करून आणि अचूकतेपेक्षा मनोरंजनाला महत्त्व देऊन चरित्रात पुन्हा चैतन्य खेळविण्यास वाव होता. बऱ्याच लेखकांनी चरित्रे कादंबरीच्या वळणावर लिहून काढली. हिलेर बेलक (Hilaire Belloc) हा त्यातलाच एक. त्याने पुरावा कल्पिला आणि जिथे घटिते संशयास्पद वा घोटाळ्यात टाकणारी होती, तिथे त्यांचे निश्चित अर्थबोधन साधले. या लेखकांच्या कृतींना शाश्वत मूल्य लाभले नाही. तरी चरित्रलेखनात चैतन्य ओतण्याच्या कामी त्यांची मदतच झाली. त्यांची उल्हसितवृत्ती, नव्या शास्त्राच्या धर्तीवरची वस्तुनिष्ठा आणि फ्रॉइडच्या पद्धतीने चरित्रे लिहिणाऱ्या मानसशास्त्रज्ञांचा स्पष्टवक्तेपणा, यामुळे जड पक्षपाती, शब्दावडम्बरांत गुरफटलेल्या व्हिक्टोरिया राणीच्या काळातील लेखन परंपरेला प्राणघातक टोला बसला आणि

25– Ibid, P. 117.

लिटन स्ट्रॅचीची व चरित्रलेखनातील विकासाच्या प्रयोगांच्या नव्यायुगाची पार्श्वभूमी तयार झाली.

वर म्हटल्याप्रमाणे व्हिक्टोरिया राणीच्या काळातील मूल्ये आणि वृत्ती पार उखडून टाकणारे मन्वंतर सुरू झाले, तेव्हा माणसे आणि राष्ट्रेच्या राष्ट्रे उध्वस्त करणाऱ्या पहिल्या महायुद्धाच्या तोफा झडत होऱ्या. ते युध्द सुरू होण्यापूर्वीच अस्वस्थ झालेल्या, खवळलेल्या कलावंतांनी व्हिक्टोरिया राणीच्या काळातील वृत्तीविरुध्द ओरड सुरू केली. स्वातंत्र्याच्या, प्रायोगिकतेच्या, उल्हसित करणाऱ्या एका नव्या दिवसाच्या, की ज्या दिवसाच्या प्रकाशात मानव आणि त्याच्या संस्थांना नव्याने अर्थ लावला जाणार होता, मानवाच्या वाढलेल्या सामर्थ्याची नव्याने अभिव्यक्ती होणार होती, त्या दिवसाच्या आगमनाचा उद्घोष सुरू केला. यातूनच (Dadaism, neoexpressionism, Freudianism) नवे वाद सुरू झाले, वाढीस लागले आणि त्यांचा फारच गवगवा झाला. या स्फोटक परिस्थितीचा, शक्तींचा चरित्रवाङ्मय प्रतिकार करू शकले नाही.

स्ट्रॅचीने आधुनिक चरित्रांचा प्रारंभ केला असे म्हटले जाते. वस्तुत: Eminent Victorians हा तत्पूर्वीच्या वीस वर्षांच्या प्रवाहांचा अत्युच्च बिंदू आहे. संक्षेपाची तारीफ. चरित्र ही एक वाङ्मयीन कृती असून त्या करिता सराव आणि कौशल्य यांची आवश्यकता आहे, असा आग्रह आणि शिष्ट संप्रदायी चरित्रासंबंधी नापसंती याबाबतीत स्ट्रॅची आणि एडमन्ड गॉस या दोघांमध्ये साम्य आहे. स्ट्रॅचीवर मानसशास्त्राचाही प्रभाव पडलेला होता. कादंबरीच्या वळणावर चरित्र लिहून काढणाऱ्या लेखकांप्रमाणे त्यानेही सत्याच्या बंधनापलिकडे जाण्याचा प्रयत्न केला. चरित्रवाङ्मयावर स्ट्रॅचीचा प्रेरणात्मक आणि तांत्रिक प्रभाव झपाट्याने पडला. स्ट्रॅचीच्या चरित्रविषयक चिंतनाला भरपूर लोकप्रियता त्वरित लाभली. याचे मुख्य कारण त्याने व्यक्तिमत्त्वाच्या आकलनासाठी मानसशास्त्रीय सिद्धांत राबविले, हे नसून त्या चिंतनामुळे चरित्रवाङ्मयात वैचारिक स्वातंत्र्याचे तत्त्व पुन्हा वहिवाटीत आले; त्या चिंतनामुळे व्हिक्टोरिया राणीच्या काळातील सामान्य शिळे सिद्धांत आणि वृत्ती यांच्या बंधनातून लोकमानस मुक्त-झाले हे होय.

मध्यंतरी स्ट्रॅचीच्या चरित्रविषयक चिंतनातून जे साध्य झाले होते, त्याची दखल घेण्यात आली होती. त्याची त्याच्या साधनसामग्रीपासूनची उपरोधिक अलिप्तता, आकर्षक शैली, निवडीतली रमणीयता आणि नाट्याचा स्पर्श या सर्वांचा चरित्रवाङ्मयावर कायमचा ठसा उमटला.

स्ट्रॅचीने फ्रेंच वाङ्मयाचा सखोल अभ्यास केलेला होता. असे म्हटले जाते, की त्याच्या पैलूदार, सुभाषितात्मक जोमदार भाषेने नटलेल्या शैलीचे मूळ फ्रेंच भाषेत सापडते. प्रासाद, तर्कशुद्धता आणि जिवंतपणा ही फ्रेंच भाषेची खास

वैशिष्टये स्ट्रॅचीच्या इंग्रजी भाषेत आढळतात. स्ट्रॅचीने गद्यातील प्रासाद आणि लालित्य इंग्रजी वाङ्मयात आणले. कोमलता, आनंदीवृत्ती सौन्दर्यासक्ती आणि अचूक, तर्कशुद्ध लेखनाकडे कल असलेल्या फ्रेंच मनापासून त्याने प्रेरणा घेतली. शिवाय, वास्तवतेचे, कलात्मक अभिव्यक्तीचे त्याला विलक्षण वेड होतेच.

स्ट्रॅचीने चरित्रलेखनात क्रांती घडवून आणली असे म्हटले जाते, ते अशा अर्थाने, की चरित्रलेखनाकडे एका नव्या दृष्टीने त्याने पाहिले. चरित्रनायकाच्या संपूर्ण जीवनाशी त्याला काहीच कर्तव्य नव्हते. त्याच्या जीवनातील ज्या भागातून व्यक्तीवैशिष्ट्ये प्रकट होतात त्याच भागाचे चित्रण त्याला अभिप्रेत होते. ' एमिनन्ट व्हिक्टोरिअन्स ' या चरित्राच्या प्रस्तावनेत घटितांची निवड आणि छाननी या दोन तत्त्वांचे त्याने प्रतिपादन केलेले आहे. त्याच्या मते चरित्रकाराला नायकाविषयी आवश्यकतेपेक्षा फारच अधिक माहिती असणे कित्येकदा गैरसोयीचे असते. चरित्र म्हणजे केवळ माहितीचा संचय नव्हे. चरित्रकाराला आवश्यकाची अत्यंत बारकाईने निवड करुन अनावश्यकाचा निष्ठुर त्याग करता आला पाहिजे. किंबहुना चरित्रातल्या कलेचे ते प्रमुख अंग आहे. वास्तविक ' एमिनन्ट व्हिक्टोरिअन्स ' हे चरित्र लिहिताना त्याने असा कालखंड निवडलेला होता, की ज्या कालखंडासंबंधाने विपुल माहिती उपलब्ध होती. पण त्याने उपलब्ध झालेल्या माहितीच्या ढिगाऱ्यातून अन्यत्र उपयोगात न आलेली पण नेमकी व्यक्तिदर्शी अशीच माहिती निवडली, त्याच्या व्हिक्टोरिया राणीच्या चरित्रातही कालक्रमानुसार काही मोकळ्या जागा आहेतच. कारण, स्वभावलेखनाच्या दृष्टीने ती वर्षे निरुपयोगी होती. राणीचा जन्म, तिचे गादीवर येणे, तिचा विवाह आणि तिची कारकीर्द या तिच्या जीवनातल्या अत्यंत महत्त्वाच्या घटना होत. या घटनांतूनच विवक्षित कालखंडावर आपला ठसा उमटविणारे राणीचे व्यक्तिमत्त्व उभे राहिले. एकाद्या कादंबरीकाराने साधन सामग्री निवडावी, अगदी तशीच आणि तितक्याच काळजीपूर्वक स्ट्रॅची घटितांची निवड करीत असे. आणि ही निवड करताना The biographer must search for the characteristic specimens which will illuminate his subject हे त्याचे धोरण असे.

घटितांच्या मांडणीतही स्ट्रॅचीचे असे खास वैशिष्टय होते. कुशल नाटककाराने रंगमंचावर मांडणीवरून जो परिणाम साधावा अगदी तसाच परिणाम घटितांची मांडणी करून तो साधीत असे.

चरित्रनायकाची निवड हा स्ट्रॅचीच्या कलेचा आणखी एक विशेष होता. त्याने अपूर्व व्यक्तिमत्त्वाचे नायक निवडले, त्यांच्या विषयीच्या माहितीने तो संपन्न झाला आणि त्या माहितीचा केवळ अर्क त्याने वाचकांच्यापुढे ठेवला.

प्लूटार्क आणि स्ट्रॅची या दोघामध्ये एका बाबतीत साम्य आहे. प्लूटार्क इतकाच स्ट्रॅचीलाही संक्षेप पसंत आहे. प्लूटार्कप्रमाणेच स्ट्रॅचीही चरित्रविषयाचे

पूर्णाकृती चित्र चित्रित करण्याऐवजी काही महत्त्वाच्या व्यक्तिविशेषांवर लक्ष केंद्रित करणे पसंत करतो. स्ट्रॅचीइतक्याच स्तुत्य संक्षेपाने त्याच्या कृतीचा सारांश कोणत्याही आधुनिक टीकाकाराला देता आलेला नाही. प्रमाणबद्धता (Proportion it more illuminating than masses of detail :) हे कलेचे तत्त्व स्ट्रॅचीच्या चरित्रात प्रकर्षाने आढळते. फ्लॉरेन्स नाईटिंगेलसारख्या स्त्रीच्या गजबजलेल्या, घाईगर्दीच्या जीवनाचे चित्रण करताना अगदी थोडच्या जागेत किती यश मिळविता येते, हे त्याच्या निबंधांनी दाखवून दिले आहे.

चरित्रकृतीत कालाचे भान राखण्यास स्ट्रॅची कधी चुकला नाही. वाचकांना कालप्रवाहाची जाणीव करून देण्यात कादंबरीकार कितपत यशस्वी होतो यावरून त्याची पारख होते. त्याचे कौतुक केले जाते. कालाचे सतत भान राखणे हा चरित्रातल्या जीवनचित्रणाचाही महत्त्वाचा भाग आहे. स्ट्रॅची हा असा चरित्रकार आहे, की जो कालाची जाण अगदी पूर्णपणे करून देतो, मग ते व्यक्तिचित्रण कार्डनल मॅनिंग, फ्लॉरेन्स नाइटिंगेल किंवा जनरल गॉर्डन यांच्याप्रमाणे अल्प प्रमाणात असो किंवा क्वीन व्हिक्टोरियाच्या चित्रणाप्रमाणे मोठ्या प्रमाणात असो. गॉर्डनच्या जीवनात काळ कसा धावत असतो. फ्लॉरेन्स नाइटिंगेलच्या जीवनाचा मधला टप्पा ओलांडल्यावर काळ कसा सरपटत जातो. मानवी जीवनातला करुण रस आणि हास्यरस जाणून घ्यायचा असेल, प्रयत्नांची भव्यता आणि व्यर्थता, जयपराजयाचे महत्त्व जाणून घ्यावयचे असेल तर हे सर्व महत्त्वाचे ठरते. स्ट्रॅचीच्या चरित्रात घटना नुसत्या पुढे पुढे सरकत नाहीत, त्या प्रत्यक्ष घडत असतात. स्त्रीपुरुष केवळ मृत नसतात, ते मरत असतात. चरित्र वाचत असता प्रत्येक गोष्ट कशी वाहत असते.

स्ट्रॅचीची महत्त्वाची कामगिरी अशी, की त्याने काही विशिष्ट जीवनांतील नाट्याचा ताल पकडून, त्यांच्या कालाच्या रंगछटांचे, स्वरूपाचे वर्णन करण्याचा प्रयत्न केला, आणि त्यात यशही मिळविले. त्या काळातील गौण व्यक्तींच्या वैशिष्ट्यांवर कधी कधी त्याने अधिक भर दिला, आणि त्यामुळे त्यांच्यातला मानवी अंश काही प्रमाणात कमी झाला हे खरे. परंतु प्रमुख व्यक्तींच्या बाबतीत असे घडलेले नाही. इतिहासातला कच्चा मालमसाला घेऊन आणि त्यातून नैतिक सत्याच्या फारसे भरीस न पडता, कादंबरीतल्या पात्रांप्रमाणे क्रिया प्रतिक्रिया करणारी पात्रे असलेली, नाट्यमय किंबहुना भावना उचंबळून टाकणारी संगीत नाट्य असलेली गद्यकथा स्ट्रॅची उभी करी. ती कथा उत्कर्षाला पोचताच त्या कथेची उकल होई.

व्हॉल्टेअरच्या लेखनाबद्दल स्ट्रॅचीला खूप आदर होता. व्हॉल्टेअरच्या लेखनातूनच त्याचे उपरोधिक लेखन प्रभावित झाले आहे. निष्ठुर विनोदावरचे त्याचे प्रभुत्व त्याने व्हॉल्टेअरपासूनच मिळविले. तीच ती व्हॉल्टेअरची बोचक

उपहासात्मक वाक्ये त्याने आपल्या कृतींच्या पानापानातून पेरलेली आहेत. जो जो स्ट्रॅचीच्या चरित्रांचे लक्षपूर्वक वाचन करावे, तो तो अशी भावना बळावत जाते, की त्याच्या चरित्रात विशेषणांचा आणि गुणविशेषणांचा मुद्दामच उपयोग केला आहे. पुढे पुढे सरकणाऱ्या कथानकात, येणाऱ्या प्रत्येक दुसऱ्या वाक्याच्या शेपटीत मेख असते. आश्चर्याची गोष्ट अशी, की 'The Lives of the poets' या निबंधात स्ट्रॅचीने जॉनसन लेखकांच्याकडे जणू काय ते गुन्हेगार होते अशा दृष्टीने पाहत असे अशी टीका केली आहे. पण खुद्द स्ट्रॅचीने चरित्रनायकांकडे यापेक्षा वेगळ्या दृष्टीने पाहिलेले नाही. त्याच्या उपरोधिक शैलीसंबंधाने क्लिफर्ड बॉअर शोअर (Clifford Bower Shore) लिहितात, 'स्ट्रॅचीने स्वत: आपल्या कैद्यांची उलट तपासणी तरुण, महत्त्वाकांक्षी सरकारी वकिलाच्या पाषाण हृदयी चिकाटीने केली.'[२६]

उपरोधातून दोषदिग्दर्शन होते हे खरेच, पण हे हत्यार काटकसरीने जपून वापरले नाही तर त्यातून मानवी स्वभावासंबंधी सहानुभूतीचा अभावच दिसून येतो. उपरोध हा एक मोठा घातक रंग आहे. तो हलक्या हाताने फासला पाहिजे. तो जड हाताने फासला म्हणजे नकोसा होतो. चरित्रनायकापेक्षा स्वत: चरित्रकार अधिक विद्वान, सूक्ष्मभेदग्राही आणि प्रांजल आहे, असा जेव्हा चरित्राचा गर्भितार्थ असतो तेव्हा चरित्रकाराकडून वाचक डिवचला जातो. उपरोधाचा येताजाता वापर केल्याने सत्याला विकृत स्वरूप प्राप्त होण्याची शक्यता असते. आपल्या उपरोधिक फिदीफिदी हसण्यामुळे स्ट्रॅची एक कुशल मूर्तिभंजक ठरला. पण अचूकते-कडे त्याने जितके लक्ष पुरविले त्याहीपेक्षा अधिक त्याने विरोधाभासाचा उपयोग केला. त्याला ऐतिहासिकतेचे भान उरले नाही. व्यक्तिजीवनातील छाया प्रकाशाचे त्याने केलेले चित्रण अतिरंजित झाले. व्यक्तीचे त्याने केलेले चित्रण हुबेहूब होते, यात शंका नाही. पण त्या चित्रणाला इतिहासदृष्टीने काही मूल्य उरले नाही.

स्ट्रॅची पुढे डॉ. जॉनसनचा आदर्श होता. तो विसाव्या शतकातला जॉनसन ठरला असता. पण सत्याबद्दलचा आदर ह्या अत्यंत आवश्यक अशा मूलवस्तूचा अभाव त्याच्यापाशी होता. स्वत:चा मतलब साधण्यासाठी तो नेमके सत्य टाळत असे. कूक यांनी लिहिलेल्या फ्लॉरेन्स नाइटिंगेलच्या चरित्राचे गुणाधिक्य मान्य करूनही त्याने कूक यांनी दिलेल्या वृत्तांताचा विपर्यास केला. जनरल गॉर्डन यांना मूर्ख ठरविण्यासाठी त्याने सत्यालाप करणारी साधने वापरली. कार्डिनल मॅनिंगचा धिक्कार करण्यासाठी समर्पक पुरावा दडपून टाकला आणि नवीन एलिझाबेथची प्रतिमा रंगविताना कल्पित पुरावा उपयोगात आणला. त्यामुळे त्याने लिहिलेली

---

26– Bower Shore Clifford. 'Lytton Strachey', March 1933, P. 44–45.

चरित्रे जरी मनोरंजक झाली, तरी त्यामुळे तत्कालीन चरित्रलेखनाला अनिष्ट वळण लागण्यास मदतच झाली.

१९१८ ते थेट स्ट्रॅचीच्या मृत्यूपर्यंत म्हणजे १९३२ पर्यंत स्ट्रॅची हा निःसंशय जगातला प्रभावी चरित्रकार ठरला. पण त्याच्या चरित्रकृतीपेक्षा त्याच्या चिंतनातूनच चरित्रवाङ्मयाला खरे मार्गदर्शन लाभले, असे म्हटले जाते याचे कारण, त्याच्या अनुयायांनी त्याच्या उपरोधिक शैलीचे अनुकरण करून चरित्रवाङ्मयाला पुढे अनिष्ट वळण लावले. त्याच्या उपरोधिक शैलीसंबंधाने जॉन गॅरटी लिहितात– ' He had a genius for damning his subjects by reproducing their own words without comment (and often, alas, out of proper context)'[२७]

स्ट्रॅचीचे ' एमिनन्ट व्हिक्टोरिअन्स ' हे चरित्र अगदी अनुकूल क्षणी प्रकटले, व्यक्तिमत्त्वाचे अर्थबोधन करणारी चरित्रे आणि कादंबरीतल्या कलेकडे झुकणारी चरित्रे याच वेळी झपाट्याने प्रकाशित होत होती. स्ट्रॅचीच्या चरित्राने या प्रवाहाला चालना मिळाली. नुसत्या अमेरिकेत १९१६ ते १९३० या दरम्यानच्या काळात ४,८०० चरित्रे प्रसिद्ध झाली. जीव्हानी पपीनी (Papini) चे ' लाईफ ऑफ ख्रिस्त.' स्ट्रॅचीचे ' क्वीन व्हिक्टोरिया,' आंद्र मोर्वाचे ' शेली ' आणि ' डिझराएली' ही चरित्रे आणि एमिल लुडविगचे ' नेपोलिअन 'चे चरित्र या चरित्रांनी विक्रीचा उच्चांक गाठला. काही चरित्राच्या तर ५०,००० वर प्रती संपल्या. महायुद्धानंतर लोकप्रिय झालेल्या या चरित्रांत पांडित्याचा आढळ होत नाही. अपवादात्मक चरित्रे सोडल्यास या चरित्रांनी इतिहासविषयक ज्ञानात फारशी भर टाकलेली नाही. माहिती पुरविणे हे या चरित्रकारांचे धोरण नव्हते. सहज उपलब्ध होणाऱ्या वरवर टिपलेल्या सामग्रीच्या आधारे नायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे अर्थबोधन साधण्याकडे चरित्रकारांचा कल होता. फ्रेंच आंद्रे मोर्वा, जर्मन एमिल लुडविग, ऑस्ट्रिअन स्टीफन झ्वाइग, इटालिअन जोव्हानी पपीनी, अमेरिकन गमेलिअल ब्रॅडफर्ड (Gamaliel Bradford) आणि फ्रान्सीस हॅकीट (Francis Hackett) इंग्लिश हेस्वेथ पिरसन आणि फिलीप गिडल या सर्वच चरित्रकारांच्या कृतींनी वेगवेगळे घाट स्वीकारले तरी त्या सर्वांनीच व्यक्तिदर्शनाचे उद्दिष्ट आपल्या डोळ्यापुढे ठेवले. बऱ्याच चरित्रकारांनी घटितांचा उपयोग करताना जाणीवपूर्वक पडताळून पाहता येण्यासारख्या पुराव्याचा मळलेला मार्ग न सोडता प्रमाणनिरपेक्ष ज्ञानाची अंतःप्रेरणेची कास धरली. त्यांच्या मते प्रत्येक व्यक्तिमत्त्व साधे सुधे असते, एकदा का व्यक्तिमत्त्वाची किल्ली सापडली- कदाचित् त्याकरिता दीर्घकाल अभ्यास करावा

27– Garraty John A. ' The Nature of Biography ', Jonathan Cape, 1958, P. 108.

लागेल, पण ती सापडली म्हणजे ग्रहणक्षमता वाढते, आणि मग चरित्र नायकाच्या सर्व कृती आपोआप एका सूत्रामधे गोवता येतात. जगातल्या सर्व कागदोपत्री पुराव्यापेक्षा प्रमाणनिरपेक्ष ज्ञानाने माणसाची उत्तम ओळख पटते असा स्टिफन झ्वाइगचा दावा होता. या चरित्रकारांना माणसाच्या कृतीपेक्षा माणसाबद्दल अधिक आस्था होती.

स्ट्रॅचीचा चरित्रवाङ्मयावर झालेला परिणाम अंशतः इष्ट आणि अंशतः अनिष्ट असा संमिश्र स्वरूपाचा ठरला. चरित्र वाङ्मयावरचा स्ट्रॅचीचा प्रभाव काहीसा उत्तेजक, काहीसा विघटन करणारा ठरला. चरित्रकारांना स्ट्रॅचीपासून घटितांची निवड करून आटोपशीरपणें रचनेची सफाई कशी साधावी, व्यक्ति-जीवनाचे चित्रण अलिप्तपणे कसे करावें, या गोष्टी शिकता आल्या हे खरेच. पण त्याच्या अनुयायांनी त्याच्या दोषांचेही अनुकरण केले. कादंबरीतल्याप्रमाणे अगदी हुबेहूब, स्वरूपदर्शी, चित्रण करण्याच्या पद्धतीचा, त्याच्या (fictional picture squeness) ची सहीसही नक्कल झाली. त्याच्या शैलीचे अंधानुकरण करण्याच्या प्रयत्नातून चरित्रवाङ्मयाला अनिष्ट वळण लागले. स्ट्रॅचीने घटितांची निवड व कलात्मक मांडणी करून जीवनकथा शक्य तितक्या कादंबरीच्या वळणावर लिहून काढल्या आणि त्यात व्यक्तींच्या मनातल्या हालचाली हलक्या हाताने टिपून, त्याचे मन उकलण्याचा प्रयत्न केला. याचा परिणाम असा झाला की, उघड उघड कादंबरीचा घाट स्वीकारलेली चरित्रे भराभर प्रकाशित होऊ लागली. आणि नवल असे, की व्हिक्टोरिया राणीप्रमाणे मरताना त्यातल्या बहुतेक नायक नायिकांच्या डोळ्यापुढून गतजीवनाचा चित्रपट सरकू लागला. मृतव्यक्तींच्या मनातली गुपिते उघड होऊ लागली.

वास्तविक वास्तवाच्या मूळ स्वरूपामुळे चरित्रनायकाच्या अंतर्मनाची कवाडे चरित्राकरिता सदैव बंद असतात. ती कवाडे उघडून आत डोकावून पाहण्याचा प्रयत्न चरित्रकाराच्या दृष्टीने अव्यापारेषुव्यापार ठरतो. चरित्रनायकाने स्वत: आपल्या मनाच्या संदर्भात केलेली विधाने किंवा लिहून ठेवलेला मजकूर उपलब्ध असला तर बाह्य पुरावा म्हणून चरित्रकाराला निश्चितपणे त्याचा उपयोग करता येईल. पण सबळ पुराव्याच्या अभावी मृत व्यक्तीच्या संज्ञाप्रवाहाचे चरित्रकाराने केलेले चित्रण वा अर्थबोधन ही त्याच्या मनाची निर्मिती असते. कारण अशा अर्थ-बोधनास सबळ पुराव्याचा आधार नसतो आणि म्हणूनच ते गूढ, अविद्यमान, काल्पनिक आणि अनिश्चित अनुमान ठरते. त्याचा प्रत्यक्षाशी संबंध असणे कठीणच. नवनिर्मिती, अनुमान आणि काल्पनिक अर्थबोधन केवळ कादंबरीतच शक्य आहे. चरित्रकार जेव्हा अशा गोष्टींचा अवलंब करतो तेव्हा तो कादंबरीचे तंत्र स्वीकारतो. आणि चरित्रनायकाच्या प्रत्यक्ष मनाचे दर्शन घडणे दुरापास्त होते. या संदर्भात

बर्नार्ड डी व्होटो यांनी केलेले विवेचन अर्थपूर्ण वाटते. ते लिहितात, ' चरित्रकाराला वास्तवतेच्या स्वरूपामुळे चरित्रनायकाच्या मनाच्या अंतर्भागात प्रवेश करण्याची मनाई असते. चरित्रनायकाने स्वतःच त्याच्या मनाबद्दल जे काही लिहिले असेल किंवा तो जे काही बोलला असेल ते चरित्रकार आपल्याला सांगू शकेल, पण त्याच्या मनातल्या आशयासंबंधाने चरित्रकाराला स्वतःच्या अधिकारात कोणतेही विधान करता येणार नाही. तिथे काय आहे हे त्याला समजू शकणार नाही, त्याला फक्त अंदाज करता येईल. कोणत्याही प्रकारचा अंदाज ही त्याच्या वाचकाला स्पष्ट आगाऊ ताकीद असते. जेव्हा चरित्रकार अंदाज करतो तेव्हा तो सत्यापासून दूर जातो आणि कल्पनेचा आश्रय घेतो. आपण शब्दाशब्दी करू या नको, तुम्ही अंदाजाला अप्रामाणिक म्हणण्याइतके माझे अनुकरण करण्याची आवश्यकता नाही. पण अंदाज निश्चितपणे काल्पनिक असतो– आणि म्हणूनच अंदाज चरित्राच्या दृष्टीने अयोग्य होय.'[२८]

स्ट्रॅचीचे व्हिक्टोरिया राणीचे चरित्र प्रसिद्ध झाल्यावर बरोबर सात वर्षांनी १९२८ मध्ये श्रीमती डी. इ. एनफील्ड (Mrs. D. E. Enfield) यांनी लिहिलेले ' L. E. L : a Mystery of the Thirties ' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. लॅटिशअ इ. लॅन्डन (Letitia E. Landon) या कवयित्रीची कथा या पुस्तकात सांगितलेली आहे. या बाईचा विवाह ब्रिटिश अफ्रिकेतल्या वसाहतीतील गव्हर्नरबरोबर झाला होता. विवाहानंतर थोड्याच महिन्यात गव्हर्नमेन्ट हाऊसमधे, शेजारी विषाची कुपी ठेवलेल्या अवस्थेत त्यांचा रहस्यमय मृत्यू घडून आला. साहजिकच त्यांच्याबद्दलचे लोकांच्या मनात कुतूहल निर्माण झाले होते. इतरांच्या दृष्टीने त्यांचे जीवन अद्भुतरम्य ठरले. या पुस्तकात स्ट्रॅचीच्या पवालावर पाऊल टाकून अगदी शेवटी कवयित्रीचे मन उकलण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यामुळे स्ट्रॅचीच्या ' क्वीन व्हिक्टोरिया ' या चरित्रातील त्या सुप्रसिद्ध वर्णनाची आठवण व्हावी. व्हिक्टोरिया राणीच्या मृत्यूसमयीचे स्ट्रॅचीने केलेले वर्णन हे असे आहे ' ...Yet, perhaps, in the secret chambers of consciousness, she has had thoughts, too. Perhaps her fading mind called up once more the shadows of the past to float before it.[२९] गंमत अशी, की लॅटिशअ लॅन्डन या कवयित्री-बाईच्याही डोळ्यापुढून मृत्यूपूर्वी असाच गत आयुष्याचा चित्रपट सरकत राहतो. दोन्ही वर्णनातले साम्य लक्षात यावे म्हणून श्रीमती एनफील्ड यांनी केलेले वर्णन

28– De Voto Bernard. ' The skeptical Biographer ', Harper's Magazine, January 1933, Volume 166, P. 189–190.

29– Strachey Lytton. ' Queen Victoria ', London Chatto & Windus 1921, P. 309.

पुढे देत आहे, 'L. E. L says good night to an English visitor, then leans against the parapet and reviews in detail her whole life as a record of failure, capped by a loveless marriage to a drunkard. Suicide is the only answer, and she commits suicide the next morning. There was only one course left open to her. Letitia had long ago provided herself with the means to follow it.'[30]

दोन्ही वर्णनातला तपशील भिन्न असला तरी ढब एकच आहे. व्हिक्टोरिया राणीच्या चरित्रातील वर्णनाप्रमाणेच या पुस्तकातील वर्णनाला प्रत्यक्षाचा आधार नाही. न्यूमन आय्. व्हाइट यांनी या एकंदर प्रकरणावर चांगलाच प्रकाश टाकला आहे. त्यांच्या मते लॅटिशअ इ लॅन्डन यांचा पती दारुड्या होता किंवा आपला विवाह अयशस्वी झालेला आहे, असा बाईनी समज करून घेतलेला होता. यापैकी कोणतीही गोष्ट खरी मानण्यास पुरेसा पुरावा उपलब्ध नाही. त्यांनी जर hydrocyanic acid घेतले असले तर ते चुकून जादा प्रमाणात घेतले नाही, असे सिद्ध करणारा पुरावाही उपलब्ध नाही. बरे त्यांनी ॲसीड घेतले हेही निश्चित नाही. कारण, कवयित्रीने जर ॲसीड घेतले असते तर तावडतोब तिथे उपस्थित झालेल्यांपैकी कुणाला तरी त्या खोलीत त्याचा वास आला असता. शिवाय, त्यापैकी कुणीही पंचनाम्याच्या वेळी तशी साक्ष दिलेली नाही. या उलट, औषध म्हणून प्रसंगी त्या hydrocyanic acid घेत असत ही गोष्ट त्यांच्या पतीला आणि नोकरांना ठाऊक होती, याबद्दल पुरावा उपलब्ध आहे. या बाईना कसल्यातरी चमत्कारिक फिटस् येत असत ही गोष्ट सर्वांनाच ठाऊक होती. बहुधा ते फेपरे असावे आणि त्याकरिता कधीकधी या ॲसिडचा उपचार सुचविलेला असे. या महत्त्वाच्या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष केले जाते. या वर्णनात मनोदर्शन घडविताना लेखिकेने सुचविल्याप्रमाणे कवयित्रीने hydrocyanic acid आत्महत्येकरिता जवळ बाळगले असते तर मग औषध म्हणून तिने त्याचा उपयोग कशाला केला असता ? न्यूमन आय्. व्हाइट यांनी पुढे असाही प्रश्न उपस्थित केला आहे, की जर ते ॲसीड प्रेमहीन म्हणून कल्पिलेल्या विवाहापासून मुक्तता करून घेण्यासाठी विकत घेतलेले होते, तर मग त्या ॲसिडच्या बाटलीवरची तारीख आणि बाईच्या विवाहाची तारीख यांची तुलना करून पाहणे यथोचित ठरले नसते काय ? बाईनी ती बाटली ज्या व्यक्तीशी त्यांचा विवाह व्हायचा होता तिची ओळख होण्यापूर्वीच विकत घेतलेली होती. तेव्हा इथे एक गोष्ट स्पष्ट होते ती अशी,

30– White Newman I. 'The Development, Use and Abuse of Insterpretation in Biography', English Institute Annual 1942, New York. Morningside Heights, 1943, P. 53.

की लॅटिशअ इ लॅन्डन यांच्या मृत्यूचा अर्थ लावताना लेखिकेने कल्पिताचा आधार घेतला आहे. या वर्णनापुरते का होईना वस्तुनिष्ठ सत्याची मर्यादा ओलांडून लेखिकेने कादंबरीचे तंत्र स्वीकारलेले आहे.

चरित्रवाङ्मयावर स्ट्रॅचीचा प्रभाव अंशत: विघटनकारक ठरला असे वर म्हटले ते अशा अर्थाने, की स्ट्रॅचीच्या 'नवीन व्हिक्टोरिया' चरित्रातील त्या सुप्रसिद्ध वर्णनातून त्याच्या अनुयायांनी सूचना घेतली आणि चरित्रातला नीरस अंश दूर करण्याच्या निमित्ताने चरित्रात कादंबरीच्या तंत्राचा अवलंब होत राहिला. यामुळे चरित्रपर कादंबरीची वाट मोकळी झाली. कादंबरीकारांचे हळू हळू चरित्राच्या क्षेत्रावर आक्रमण सुरू झाले. इतकेच नव्हे तर चरित्र आणि कादंबरी यांमधला भेद खोटा असून कादंबरीकार हाच खरा चरित्रकार होय, अशी भाषा सुरू झाली. कादंबरीच्या चरित्रावर झालेल्या आक्रमणाचा परिणाम ऑसबर्ट बरडेट यांनी पुढील शब्दात व्यक्त केला आहे, ' In the current search after the sprightly and picturesque, there is a tendeney to distort and to embroider'[३१]

प्रा. ना. सी. फडके यांनी दादाभाई नौरोजी यांच्या चरित्रात किंवा साने गुरुजींनी राजवाडे यांच्या चरित्रात अवलंबिलेले तंत्र स्ट्रॅचीच्या वळणावर गेले असले तरी ही दोन चरित्रे वगळता मराठी चरित्रकारांवर स्ट्रॅची किंवा आंद्रे मोर्वा यांचा फार मोठा प्रभाव पडला आहे, त्यांनी त्यांचे तंत्र पचविले आहे असे म्हणता येत नाही.

सत्य व्यक्तीची जीवनकथा लिहून काढताना कादंबरीचे तंत्र वापरण्याचा प्रयोग स्ट्रॅचीप्रमाणे आंद्रे मोर्वानेही केला. चरित्राची कला करण्याकरिता नायकाचे जीवन एका सूत्रात गुंफून त्या भोवती त्याच्या जीवनाची पुनर्घटना करण्याच्या त्याच्या तंत्रासंबंधाचे लेखकाने चरित्रात आत्माविष्कार साधण्याच्या त्याच्या तंत्रासंबंधाचे विवेचन मागे 'चरित्र कला की कारागिरी' या प्रकरणात येऊन गेलेच आहे. शेलीची जीवनकथा लिहून काढताना त्याने त्याचे जीवन एका सुत्रात गुंफून त्याच्या जीवनाची पुनर्घटना केली. त्याच्या चरित्रात आत्माविष्कार साधला. मोर्वाचे तंत्र फ्रान्समध्ये लोकप्रिय झाले. १९२५ च्या सुमारास फ्रेंच लेखकांवर तशा कादंबऱ्या लिहिल्या जाऊ लागल्या. मोर्वाच्या उदाहरणाने त्यातून चित्तवेधकता आणण्यासाठी कल्पित संवाद देण्यास उत्तेजन मिळाले. अशा कादंबऱ्यांचा हेतू सत्यकथेमध्ये रंजकत्व आणावे हा असतो, मनोरंजनाकरिता लेखक व्यक्तीच्या प्रकट जीवनाबरोबरच अप्रकट जीवनावर हक्क सांगतो. आपल्याला व्यक्तीविषयी पूर्णज्ञान

31– Burdett Osbert. ' Experiment in Biography ', Tradition and Experiment in present day literature, Humphrey Milford, London, 1929, P. 172.

आहे. तिच्या हेतूसंबंधाने पूर्ण समज आहे असे धरून चालतो. काल्पनिक संवाद, नाट्यमयता, हुबेहूब वर्णने आणि कल्पिताच्या आधाराने वातावरणनिर्मिती करून कादंबरीचे तंत्र स्वीकारतो. गंमत अशी आहे, की चरित्रनायकाच्या जीवनात जिथे फट राहते तिथे ती कल्पिताच्या आधाराने भरून काढण्याचा प्रयत्न होतो सत्य धुंडाळत बसण्यापेक्षा ते कल्पिणे सोपे असते.

नजीकच्या काळातील व्यक्तीचे जीवन चित्रित करताना कल्पिताचा वापर करण्यास वाव मिळत नाही, आणि त्याची आवश्यकताही नसते. कारण चरित्र-काराला आणि वाचकांनाही त्या व्यक्तिविषयी खडा न् खडा माहिती असणे शक्य असते. नसल्यास ती उपलब्ध होऊ शकते आणि समजा चरित्रकाराने कल्पिताचा आधार घेण्याचा प्रयत्न केलाच तर अमुक एक प्रसंग वा घटित कपोलकल्पित आहे, हे वाचकांच्या चटकन् लक्षात यते. चरित्र विश्वसनीय व्हावे, ते वास्तव असावे अशी चरित्रकाराची मनापासून इच्छा असते. तेव्हा उपलब्ध झालेल्या पुराव्यामुळे आपोआपच कल्पिताचा आधार घेण्यास प्रतिबंध होतो. दूरच्या काळातील व्यक्तीचे वा ऐतिहासिक व्यक्तीचे चरित्र लिहिताना माहितीच्या अभावी नायकाच्या जीवनातील मोकळ्या जागा कल्पिताच्या आधारे भरून काढण्यास भरपूर वाव मिळतो. त्या व्यक्तीविषयी वाचकांची माहिती अपुरी असते आणि म्हणूनच त्या व्यक्तीविषयी त्यांची जिज्ञासाही अधिक असते. वाच-कांची ही जिज्ञासा भागविण्याच्या प्रयत्नात चरित्रात सत्याऐवजी कल्पिताचा वापर होतो आणि चरित्रपर कादंबरी उभी राहते.

सत्य व्यक्तीची जीवनकथा कादंबरीच्या तंत्राने लिहून काढताना व्यक्तीविषयी पूर्णज्ञान गृहीत धरलेले असते असे वर म्हटले. पण काल्पनिक व्यक्तींच्या बाबतीत असे पूर्ण ज्ञान शक्य आहे आणि समर्थनीयही आहे. सत्य व्यक्तीच्या बाबतीत ते समर्थनीय ठरत नाही. नेमके सत्य काय आहे, हे शोधून काढल्याशिवाय चरित्र-काराला सत्य म्हणून काहीही दडपून देता येत नाही. चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे अर्थबोधन रंजक व्हावे म्हणून सत्य व्यक्तीचे जीवन कादंबरीच्या तंत्राने लिहून काढ-ण्याच्या प्रयत्नातून चरित्रकारांना चरित्राची साधने कशी गोळा करावी, नाट्याचा परिणाम कसा साधावा आणि उत्क्रांती आणि उत्तरोत्तर श्रेणीच्या नियमानुसार तपशीलाची मांडणी कशी करावी या गोष्टी शिकता आल्या. पण त्यामुळे चरित्रात भावनात्मकतेला उत्तेजन मिळून जिथे चरित्रातल्या व्यक्ती सुसंगत नाहीत, निश्चित नाहीत, तिथे त्या सुसंगत आणि निश्चित झाल्या पाहिजेत या कल्पनेचे पोषण झाले, ही गोष्ट अनिष्ट ठरली. चरित्रकाराला आपले अज्ञान लपविता येत नाही. ऑसबर्ट बरडेट लिहितात, 'चरित्रकार जेव्हा अज्ञान असतो, तेव्हा त्याने आपले अज्ञान मान्य केले पाहिजे. कारण, मनोरंजन करणे हा त्याचा हेतू नसून सत्य

सांगणे हा त्याचा हेतू आहे.'[३२] चरित्रपर कादंबरीचे स्वागत करताना या दोन कृतींमधला हा मूलभूत फरक लक्षात घेतला पाहिजे. मोर्वाने शेलीला कादंबरीचा विषय बनवून त्या पुस्तकाला ' Ariel : a Shelley romance ' हे नाव देण्याची खबरदारी घेतली. त्यामुळे ते शेलीचे चरित्र आहे असा कुणी गैरसमज करून घेऊ शकला नाही. चरित्रपर कादंबरी जेव्हा चरित्राच्या आधाराने उभी राहते; चरित्राचा बुरखा घेऊन उभी राहिलेली कादंबरी चरित्र म्हणून सादर केली जाते; तेव्हा आक्षेपाला जागा उरते. चरित्रपर कादंबरी ही एक कादंबरी या दृष्टीने, एक कलात्मक कृती या दृष्टीने सादर करण्याची खबरदारी घेतली नाही, तर वाचकांची प्रतिक्रिया दोषदर्शी होणे स्वाभाविक आहे.

चरित्रपर कादंबरीकारांनी प्रत्यक्ष पुराव्याच्या वाचनातून चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाबद्दलची जी कल्पना त्यांच्या मनात रुजली त्या कल्पनेला पोषक होईल असा पुरावा कल्पिला. याच तत्त्वानुसार पुष्कळशा चरित्रकारांनी प्रत्यक्ष पुराव्याला कल्पित पुराव्याची जोड देऊन कल्पिताश्रयी चरित्रे लिहिली. अर्थात ही चरित्रे लिहिताना त्यांनी अंतःप्रेरणेच्या, प्रमाणनिरपेक्ष ज्ञानाच्या आधारे चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे अर्थबोधन साधले. चरित्रनायकासंबंधी जे ज्ञान त्यांनी प्राप्त करून घेतले ते कल्पनेच्या आधाराने आणि कल्पनेत प्रमाणाची अपेक्षा नसते म्हणून प्रमाण निरपेक्ष हा शब्द इथे वापरला. फ्रेंच टीकाकार आणि चरित्रकार सेन्ट ब्यूव्ह याने प्रमाणनिरपेक्ष ज्ञानाच्या आधारे छानदार शब्दचित्रे रेखाटली. ज्याचे शब्दचित्र चित्रित करावयाचे त्याच्या कृतींशी तो एकरूप होत असे, एखादी व्यक्तिमत्त्वाची आविष्करणीय छटा, व्यक्तिमत्त्वाची किल्ली सापडेतोपर्यंत तो त्या कृतीचे वाचन आणि चिंतन करीत असे. ज्या क्षणी ही व्यक्तिमत्त्वाची किल्ली त्याच्या हाती लागे त्याच क्षणी त्याला हवी असलेली व्यक्ती सापडे, आणि त्या व्यक्तिचित्रणात प्राण ओतला जाई. याच पद्धतीच्या व्यक्तिमत्त्वाच्या आकलनाला मोर्वाने ' Understanding by a coup d ' e' tat ' असे म्हटलेले आहे, याची इथे मुद्दाम आठवण करून दिली पाहिजे.

याच तत्वाला अनुसरून एमिल लुडविग चरित्रनायकाच्या रंगीत चित्राशी वा तसबिरीशी एकरूप होत असे. चरित्रविषय व्यक्तीच्या तसबिरीपुढे दीर्घकाल चिंतन करीत असल्यावर त्या व्यक्तीच्या जीवनाचा त्याला अर्थ लागत असे. चरित्रलेखनात प्रमाणनिरपेक्ष ज्ञानाचा उपयोग करण्याची त्याची भूमिका त्याने पुढील शब्दात मांडली आहे. तो लिहितो, ' चरित्रकार व्यक्तिचित्रणाच्या कल्पनेने सुरुवात करतो आणि कागदपत्रात शोध घेऊ लागतो. कारण, मुळाशी प्रमाण निरपेक्ष ज्ञानाचे बळ असते.'[३३]

32– Ibid, P. 173.

33– Garraty John A. ' The Nature of Biography ', P. 114.

गमेलिअल ब्रॅडफर्ड हा प्रमाणनिरपेक्ष ज्ञानाचा युद्धपूर्व कालातील आणखी एक पुरस्कर्ता होता. ब्रॅडफर्डने १९१२ मधे चरित्रलेखनाला सुरुवात केली आणि त्याच्या मृत्यूपर्यंत म्हणजे १९३२ पर्यंत त्याने लेखन केले. त्याने स्वतःच केलेल्या विधानावरून असे दिसते, की सृजनशील लेखक म्हणून अपयशी ठरल्यावर तो चरित्रलेखनाकडे वळला. तसे पाहिले तर एका अर्थाने त्याला चरित्रकार म्हणता येत नाही. कारण, त्याने पूर्ण चरित्रे क्वचित्‌च लिहिली. त्याची पद्धत अशी होती, की स्त्रीपुरुषांचे काही ठळक व्यक्तिविशेष निवडायचे आणि त्याभोवती त्यांचे व्यक्तिचित्र रेखाटावयाचे. ही व्यक्तिचित्रे रेखाटताना त्याने प्रथम मानसशास्त्राचा, आणि नंतर मनोविश्लेषणाचा उपयोग केला आणि त्याना ' Psychographs ' असे नाव दिले. या पद्धतीने त्याने स्त्रियांची व्यक्तिचित्रे रेखाटायला सुरुवात केली आणि नंतर ती पद्धत प्रख्यात केली. येथपर्यंत तो एका निर्णयाला येऊन पोहोचला होता, की माणसाचे जन्मापासून मृत्यूपर्यंतचे बारीकसारीक तपशीलाने लिहिलेले नेहमीचे चरित्र असमाधानकारक, कलाहीन व कंटाळवाणे होते. त्याला असा विश्वास वाटू लागला होता, की काही ठळक व्यक्तिविशेष घेऊनच व्यक्तीचे उत्तम आकलन होऊ शकते, आणि त्यातून व्यक्तिचित्र वा ज्याला तो ' Psychograph ' म्हणतो, तो ' psychograph ' रेखाटणे शक्य व्हावे. या पद्धतीमुळे विशिष्ट व्यक्तिविशेष, स्वभाववैचित्र्य, मतिभ्रंश किंवा एखादी विशिष्ट गोष्ट करण्याचे सामर्थ्य व्यक्तिमत्त्वाच्या आकलनाचा गाभा ठरतो. उपलब्ध असलेल्या सामग्रीच्या संयोगीकरणातून चरित्रविषय व्यक्तीची पुनर्निर्मिती करून तिचे मानसशास्त्रीय शब्दचित्र उभे राहते. ब्रॅडफर्डची सूक्ष्मदृष्टी, कलोपकारक वा रसलक्षी काटकसर आणि सततचा सराव यामुळे त्यानें रेखाटलेंली शब्दचित्रे अगदी हुबेहूब आणि आंतरवेधी वठली आहेत. ब्रॅडफर्डच्या ' psychographs ' व्यक्तिदर्शनाचे उद्दिष्ट डोळयापुढे ठेवणाऱ्या चरित्र लेखनात बदल घडवून आणला आणि समग्र चरित्र वाङ्मयात नसली तरी अमेरिकन चरित्रवाङ्मयात विशेष भर टाकली.

गॅमलिअल ब्रॅडफर्डच्या पद्धतीला पुढील आक्षेप घेतले जातात. या पद्धतीने लिहिलेल्या चरित्रात जे व्यक्तिविशेष चरित्रकार उपयोगात आणू इच्छितो तेच पाहायला मिळतात आणि त्या व्यक्तिविशेषांना व्यक्तीच्या जीवनात जेवढे महत्त्व असते त्यापेक्षा कितीतरी अधिक महत्त्वाचे स्थान लाभते. व्यक्ती जशी होती तशी ती चित्रित करण्याच्या दृष्टीने psychography अपुरी पडते. बहुधा या पद्धतीमुळे वाचकांच्या मनावर उमटणारा चरित्रनायकाचा ठसा नकली असतो. एका दृष्टीने पाहिले तर psychographer मोठा भाग्यवान ठरतो. कारण, त्याला सहजगत्या खोडून काढता येत नाही. मृत व्यक्ती पुन्हा उठून उभी राहू शकत नाही, असा आत्मविश्वास असल्यामुळे तो अगदी सुरक्षितपणे गृहीत गोष्टी समजून तयार करू

प्रा... शा. क. ३७५७ ३५८६१ ग्रंथ ३४७८१६ ... शाखा (स्थळ प्रत)



शकतो. पण इथे एक धोका संभवतो तो असा, की चरित्रकार जर कोणत्यातरी कल्पनेने पछाडलेला असला तर त्या कल्पनेचा पाठपुरावा करण्यासाठी त्याला घटीतांचा जाणूनबुजून विपर्यास करण्याचा मोह होण्याची शक्यता असते, तो जर जागरूक नसला तर व्यक्तिमत्त्वाचा एखादा धागा उपलब्ध होऊनही तो त्याला पारखा होण्याची शक्यता असते आणि मग जेव्हा सर्व पुरावा गोळा केला जातो; आणि कागदपत्रांची बारकाईने छाननी होते; तरी देखील व्यक्तीसंबंधाने गोंधळात टाकणारे रहस्य बाकी उरतेच. आपण स्वत:लाच जिथे ओळखू शकत नाही तिथे फार पूर्वी मृत झालेल्या व्यक्तींना ते कसे ओळखावे ?

'अमेरिकन चरित्रवाङ्मयाचा इतिहास' या ग्रंथाचे कर्ते इ. एच्. ओनील यांचे तर म्हणणे असे आहे, की ब्रॅडफर्डच्या कृती म्हणजे चरित्रनायकाचा एक अभ्यास होय,ते लिहितात,' आत्म्याच्या शोधात आपल्या चरित्रविषयांना देह होते, दैनंदिन अस्तित्व होते हे सायकोग्राफर वारंवार विसरला. मानवतेच्या, चैतन्याच्या या अभावामुळे ब्रॅडफर्डची कृती म्हणजे जीवनाची पुनर्निर्मिती ठरण्याऐवजी एक अभ्यास ठरतो.'[३४]

एमिल लुडविगने चरित्रलेखनात प्रमाणनिरपेक्ष ज्ञानाचा उपयोग तर केलाच पण नेपोलिअन बिस्मार्कची चरित्रे त्याने नाटयाच्या तंत्राने लिहून काढली. लुडविग चरित्रकार होण्यापूर्वी नाटककार होता. नेपोलिअन, बिस्मार्कची चरित्रे लिहिण्यापूर्वी ही दोन मध्यवर्ती पात्रे योजून त्याने त्यांची नाटके लिहून काढली. तीन किंवा चार अंकी नाटकाच्या स्वरूपातच व्यक्तीचे जीवन आपण पाहू शकतो असे विधान त्याने केले आहे. वाचकांच्या दृष्टीने पाहिले तर नाटयात्मक चरित्र ही एक आधुनिक चरित्रलेखनातील आस्था उत्पन्न करणारी वृद्धी आहे. नाटयात्मक चरित्र म्हणजे ज्या नियमानुसार नाटकाची बांधणी होते, त्या नियमानुसार चरित्रनायकाचे जीवन पूर्णतेस आणणारी निवेदनाची पद्धत. या पद्धतीने लिहिलेल्या चरित्राचा एक लक्षणीय गुण असा, की त्या चरित्रात गती असते, जिवंतपणा असतो आणि त्यामुळे नायकाच्या जीवनप्रवाहाबरोबर वाचक सारखा पुढे पुढे खेचला जातो लुडविगने लिहिलेले नेपोलिअनचे चरित्र या दृष्टीने वाखाणण्यासारखे आहे. या चरित्राचा नायक आणि उपलब्ध असलेली सामग्री नाटयतंत्राला भरपूर वाव देणारी होती. लुडविगने राष्ट्राच्या वा महान चळवळींच्या भवितव्याशी निगडित असलेल्या अलौकिक बुद्धिमत्तेच्या पुरुषांच्या जीवनातला यशापयशात परिणत होणारा संघर्ष चितारला. ज्या व्यक्तींची चरित्रे त्याने लिहिली त्यांचे जीवनच असे होते, की लुडविगच्या पद्धतीने लिहिलेल्या त्यांच्या चरित्रात झपाटयाची गती, विरोध, उत्कर्ष आणि उत्कंठा आढळावी.

34– O 'Neill E. H. · A history of American Biography ' (1800–1935), 1935, P. 260.

स्ट्रॅचीच्या चरित्रांशी तुलनेने या चरित्राचा विचार केला तर ती पूर्ण आहेत असे आढळून येते. गर्त, नेपोलिअन आणि बिस्मार्क यांची चरित्रे वाचत असताना त्या त्या व्यक्तींबरोबर आपण वावरतो, त्यांच्या यशापयशाच्या दिवसातून ज्या कालखंडात ते दबलेल्या अवस्थेत वावरत असतात किंवा पदवीला चढलेले असतात, अशा दोन्ही कालखंडातून ते आपल्याला दिसतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असताना तो आपल्याला जाणवतो आणि तो विकास बरा की वाईट याबद्दल आपण निर्णय देऊ शकतो. चरित्रविषय व्यक्ती स्वत: त्या व्यक्तीला जशी वाटली किंवा इतरांना जशी आढळली तशी ती आपण पाहू शकतो. स्ट्रॅचीची ती वैशिष्टयपूर्ण शैली, त्याचा संक्षेप, उपरोध इथे आढळणार नाही. पण एक प्रकारची पूर्णता, गती आणि वास्तवता लुडविगच्या चरित्रलेखनात प्रकर्षाने जाणवते. स्ट्रॅचीने केवळ नाटयाचा परिणाम साधला, तर लुडवीगची लेखनपद्धती पूर्णपणे नाटयतंत्रावर आधारलेली आहे.

चरित्रलेखनात नाटयतंत्राचा अवलंब करण्यात एक धोका जाणवतो तो असा, की त्या पद्धतीमुळे लेखकाची कल्पनाशक्ती चाळवली जाण्याची वा मोकाट सुटण्याची शक्यता असते. स्वत: लुडविगला हा धोका नेहमीच टाळता आला असे नाही. याच कारणास्तव डेसमॉण्ड मॅकर्थी (Desmond Mac Carthy) यांना लुडविगने नाटयतंत्राला दिलेले अवास्तव स्थान रुचले नाही. लुडविगला काल्पनिक स्वगतामधे अवतरणे मिसळून देण्याची सवय होती. तो कागदोपत्री नोंद झालेल्या शब्दांचा उपयोग संदिग्ध संदर्भात करीत असे. चरित्रनायकाच्या मनातले विचार प्रकट करीत असे. नेपोलिनच्या चरित्रात नेपोलिअनने वेगळयाच संदर्भात केलेले वक्तव्य तो मिसळून देतो. काही ठिकाणी नेपोलिअनचे मनोगत व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. मॅकर्थी यांच्या मते लुडविगच्या लेखनात हे जे दोष निर्माण झाले. याचे कारण प्रमाणनिरपेक्ष ज्ञानावर त्याचा भलताच विश्वास होता. 'सत्यान्वेषणापेक्षा कल्पना करण्यात त्याचे सामर्थ्य असते आणि तो विश्वास संपादन केल्याशिवाय आपली आस्था जागृत करतो.'[३५] असे मॅकर्थी यांचे म्हणणे आहे.

उपरिनिर्दिष्ट चरित्रकारांची प्रमाणनिरपेक्ष ज्ञानाच्या आधारे चरित्रे लिहिली यात काही नवे नाही. चरित्रलेखनाला सुरुवात झाल्यापासूनच व्यक्तिमत्त्वाचे अर्थबोधन हा एक चरित्रलेखनातला महत्त्वाचा घटक आहे. मात्र या घटकाची चरित्रकारांना स्पष्ट अशी जाणीव विसाव्या शतकातच झालेली दिसते. आधुनिक पद्धतीच्या अर्थबोधनाला स्थूलमानाने बौद्धिक पुनरुज्जीवनाच्या काळात सुरवात झाली असे टीकाकार मानतात. डॉ. जॉनसनच्या Lives of the poets या

35– Mac Carthy Desmond. 'The Biographics of Encil Judwig', Life and Letters, Vol. 1. No. 1. June 1928, P. 52.

ग्रंथात सर्वसाधारण अनुभूतींच्या आधारे व्यक्तींच्या विवक्षित वागणुकीचा अर्थ लावलेला आहे. शिवाय, त्याने भोवतालच्या परिस्थितीला महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. मात्र पूर्वग्रहदूषिततेमुळे हे चरित्र डागळले आहे. व्यक्तिमत्त्वाचे आंतरिक अर्थबोधन हा आधुनिक चरित्र वाङ्मयातला एक नवा प्रकार आहे. एडमन्ड गॉस यांच्या मते आंतरिक अर्थबोधनाला एकोणिसाव्या शतकात सुरवात झाली. प्राचीन चरित्रकारांनी नायकाच्या आंतरिक व्यक्तिमत्त्वाची फारशी कदर केली नाही. त्यांनी प्रसंगोपात दखल घेतली ती सार्वजनिक हितावर परिणाम साधणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची. शिष्टसंमत रूढमार्गाला सोडून जाण्याचे धाडस त्यांनी केले नाही.

न्यूमन् आय्. व्हाईट यांनी चरित्रातल्या अर्थबोधनाचे सविस्तर विवरण केले आहे. त्यांच्या मते अर्थबोधनाचे तीन प्रकार संभवतात. अर्थबोधनाचा एक महत्त्वाचा प्रकार असा, की व्यक्तिमत्त्वाचे सूक्ष्मदर्शी आंतरवेधी आकलन करून घेणे, म्हणजे चरित्रकाराला खरेखुरे चित्रण तर करता येतेच, पण एरव्ही दडून राहिली असती अशी घटिते शोधून काढण्यास मदत करणारे प्रमाणनिरपेक्ष ज्ञान प्राप्त होते. असे अर्थबोधन मानवी मनाचे आकलन आणि व्यक्तीच्या मनात सहानुभूतीपूर्वक प्रवेश करता यावा म्हणून स्वतःचे मन गुंडाळून ठेवण्याचे सामर्थ्य यावर अवलंबून असते.

व्यक्तिजीवनाला योग्य ती पार्श्वभूमी लाभावी म्हणून अर्थबोधनाची आवश्यकता असते. गांधी, नेहरू, हिटलर ही मंडळी ज्या विशिष्ट कालात व परिस्थितींत भरभराटीला आली त्या कालाचे वा परिस्थितीचे अर्थबोधन झाल्याशिवाय त्यांचे व्यक्तिदर्शन यथार्थपणे होणे अशक्य आहे. मात्र चरित्रकाराला व्यक्ती आणि पार्श्वभूमी यामधला तोल सांभाळता आला पाहिजे.

चरित्रनायक जर राजकारण, साहित्य, संगीत वा अन्य कोणत्यातरी क्षेत्राशी एकरूप झालेला असेल, तर चरित्रकाराला त्याच्या जीवितकार्याचे आकलन झाले पाहिजे. नायकाच्या जीवितकार्याच्या इतिहासाचे, तंत्राचे अर्थबोधन करता आले पाहिजे. एरवी ते चित्रण अस्पष्ट, अपुरे होण्याची शक्यताच अधिक. चरित्रनायक जर साहित्यिक असेल तर अशा अर्थबोधनाची फारच आवश्यकता असते. कलावंत वा साहित्यिक हा आपल्या कलेतून, साहित्यातून जगत असतो आणि ज्याअर्थी चरित्रकाराला जिवंत व्यक्ती उभी करावयाची असते, त्या अर्थी त्या व्यक्तीच्या जीवनाशी अत्यंत निगडित एवढ्या साहित्याचे आकलन आणि अर्थबोधन होणे आवश्यक असते.

चरित्रनायकाच्या शब्दातूनच त्याचे व्यक्तिमत्त्व शक्यतो प्रकट व्हावे. पण बऱ्याचशावेळा घटिते अबोल असतात, संदिग्ध असतात. त्यांचा अन्वयार्थ लागत नाही. त्यामुळे वाचकांच्या ग्रहणशक्तीवर ताण पडतो. अशा वेळी चरित्रकाराने त्या घटितांचा अन्वयार्थ लावणे अथवा अर्थबोधन करणे क्रमप्राप्त ठरते. कारण,

वाचकांपेक्षा चरित्रकाराला नायकाच्या जीवनाची पार्श्वभूमी उत्तम कळलेली असते. त्याने उपलब्ध झालेल्या पुराव्याचा कसून अभ्यास केलेला असतो आणि त्यामुळेच वाचकांपेक्षा चरित्रकाराला नायकाचे हेतू समजण्याची संधी मिळते. अर्थबोधनामुळे व्यक्तीच्या कृतींमागल्या हेतूंचे, कारणांचे वा प्रेरणांचे आकलन होते. चरित्रात नायकाचे पूर्ण व्यक्तिदर्शन घडणे शक्य होते. चरित्रकार चरित्रविषय व्यक्तीच्या शारीरिक आणि त्याचबरोबर मानसिक बाजूचेही दर्शन घडविण्याचा प्रयत्न करतो. पण चरित्रकाराने विशेषत: व्यक्तिमत्त्वाचे आंतरिक अर्थबोधन करताना खबरदारी घेणे आवश्यक आहे. चरित्रात अर्थबोधन आवश्यकच असेल तर त्या अर्थबोधनाला सबळ पुराव्याचे पाठबळ हवे. चरित्र केव्हाही विश्वसनीय असले पाहिजे. सबळ पुराव्याच्या आधाराशिवाय केलेले अर्थबोधन विश्वसनीय ठरत नाही. स्ट्रॅचीने सबळ पुराव्याच्या आधाराशिवाय केलेले व्हिक्टोरिया राणीच्या संज्ञाप्रवाहाचे अर्थबोधन टीकाकारांच्या मते आक्षेपार्ह ठरले आहे. ' पुरेशा पुराव्याच्या पाठबळाशिवाय केलेले अर्थबोधन हे अत्यंत घातक असते, या मुद्द्यावर अती जोर देता येणार नाही. एक कामचलाऊ गृहीतपक्ष या दृष्टीने जवळ जवळ कोणत्याही परिस्थितीत प्रयोग म्हणून अर्थबोधन करता येईल, परंतु पूर्वकल्पनेत बसविण्यासाठी ज्या वस्तुनिष्ठ घटिताना विकृतरूप देता येणार नाही आणि जी घटिते त्या गृहितपक्षाच्या प्रकाशात क्रमाने, तार्किक संबंधाने एकमेकाशी जखडलेली आहेत अशा धटितांनी ते अर्थबोधन बळकट झाले पाहिजे.'[३६]

जर्मनीमधे लुडविगने, फ्रान्समधे आंद्रे मोर्वाने आणि इंग्लंडमधे स्ट्रॅचीने केलेल्या चरित्रलेखनातून उदयाला आलेल्या नवचरित्राचे स्वरूप समजावून घेणे उद्‌बोधक ठरेल. नवचरित्राच्या बाबतीत महत्त्वाची गोष्ट अशी, की हे चरित्र इतिहासाचा घाट न स्वीकारता, कादंबरीचा वा नाटकाचा घाट स्वीकारून प्रकटते. नवचरित्राने कादंबरीचे तंत्र स्वीकारले तरी त्यामुळे कादंबरीची अथवा ऐतिहासिक कादंबरीची निर्मिती होत नाही. नवचरित्रातली अभिव्यक्ती हुबेहूब असते, पण त्यातला बारीकसारीक तपशीलही अगदी अचूक असतो. नवचरित्र नवनिर्मिती करीत नाही हे खरेच पण ते पुनर्निर्मिती करते. कादंबरीकारांनी वास्तवाची जाणीव निर्माण करण्यात यश मिळविले होते. या उलट, पारंपारिक पद्धतीने चरित्रलेखन करणाऱ्या रूढमार्गवादी चरित्रकारांच्या सत्यवादित्वामुळे त्यांच्या पदरी पडलेले अपयश नवचरित्रकारांच्या डोळ्यापुढे होते. नवचरित्रकारांनी कादंबरीचे तंत्र स्वीकारून वास्तवाची पुनर्निर्मिती करण्यात यश मिळविले.

36– White Newmen I. ' The Development, Use and Abuse of Interpretation in Biography ', English Institute Annual 1942, New York Morning Side Heights 1943, P. 45.

नवचरित्र उद्बोधक आणि शिवाय मनोरंजकही आहे.

नवचरित्राचे दुसरे वैशिष्टय असे, की नवचरित्राचा भर योजनेवर, रचनेवर (design) असतो. नवचरित्राला या बाबतीत कादंबरीऐवजी नाटकाचे स्मरण होते. लुडविग चरित्रनायकाच्या जीवनाची तीन अंकी नाटकाप्रमाणे विभागणी कशी करीत असे यासंबंधाने वर उल्लेख येऊन गेला आहेच. नवचरित्र सेंद्रिय एकात्मतेच्या दृष्टीने रचनेची योग्य ती जाणीव ठेवून, ज्या रचनेमध्ये प्रत्येक उपाख्यान आणि प्रसंग समग्र रचनेत भर घालतो, अशा रचनेद्वारा चरित्रविषय व्यक्तीच्या जीवनाची अभिव्यक्ती करते. नवचरित्रात चरित्रविषय व्यक्तीच्या जीवनाची अभिव्यक्ती जाणतेपणाने वा अजाणतेपणाने संघटितरीत्या केलेली असते आणि ती अभिव्यक्ती प्रवाही असते. लिटन स्ट्रॅचीच्या चरित्रात जाणीवपूर्वक रचनेचा आणि नाटयदृष्टीचा भरपूर पुरावा आढळतो. या नाटयदृष्टीमुळेच प्रत्येक व्यक्ति-चित्राची सुरवात आणि शेवट तो अगदी काळजीपूर्वक करतो. तिथे नाटकातल्या ड्रॉपसीनप्रमाणे प्रारंभी वा अखेरीस नेहमी मनाची पकड घेणारे दृश्य असतेच इतर नवचरित्रकाराप्रमाणे व्यक्तिचित्राच्या सुरवातीस किंवा अखेरीस नाटयमय दृश्ये असावीत याबाबतींत लुडविगचीही खात्री पटलेली आहे.

नाटयदृष्टीशी विसंगत नसलेले नवचरित्राचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे अविकारी अलिप्तता हे होय. नवचरित्रकार विभूतीपूजक तर नाहीच नाही पण निंदकही नाही. नवचरित्रकार प्रेक्षकाची, निःपक्षपाती निरीक्षकाची भूमिका घेतो. चरित्रकाराने अलिप्तता धारण केली नाही तर त्याला विविध व्यक्ति-मत्त्वाच्या जीवनांचे पूर्ण आकलनासहित अर्थबोधन करता येणे शक्य होणार नाही. नवचरित्रकार निःपक्षपाती निरीक्षक असला तरी तो आस्थेवाईक व जिज्ञासू निरीक्षक आहे.

अविकारी अलिप्तता हे नवचरित्राचे एक वैशिष्टय असले तरी ते व्यक्तींच्या सोशिक, सत्त्वशील मानवतेचा आग्रह धरते. नवचरित्रातल्या व्यक्ती म्हणजे कालाच्या सूक्ष्मदर्शकातून निरखता येतील अशा मृत व्यक्ती नव्हेत. नवचरित्राच्या लोक-प्रियतेचे रहस्य असे, की त्या चरित्राच्या पानापानांतून वावरणाऱ्या व्यक्ती म्हणजे केवळ कळसूत्री बाहुल्या नसतात, तर ती हाडामासाची सामान्य माणसे असतात. स्ट्रॅची म्हणा, मोर्वा म्हणा, चरित्रनायकांच्या सामान्य मानवी स्वभावाचे दर्शन घडविण्याची कोणतीही संधी वाया जाऊ देत नाहीत. नवचरित्रकार चरित्रविषय व्यक्तींच्या मानवीस्वभावावर अधिक भर देतात याचे कारण ते मानसशास्त्राचे गाढे व्यासंगी आहेत. विशेषतः एमिल लुडविगने सर्व आयुष्यभर मानसशास्त्राचा व्यासंग चालू ठेवला, 'Emotional Murder' या विषयावर त्याने एक प्रबंधही लिहिला होता. बिस्मार्कवर लिहिलेला मानसशास्त्रीय निबंध हा त्याचा चरित्रलेखनाचा

पहिला प्रयत्न. कृतींची कसून तपासणी करून, त्या कृतींना चालना देणारे दडलेले हेतू शोधून काढण्याचे असामान्य सामर्थ्य त्याच्यापाशी होते. मोर्वादेखील मानसशास्त्राचा व्यासंगी होता, पण त्याचबरोबर त्याच्यापाशी सूक्ष्म विनोदवृत्ती होती. स्ट्रॅचीची मानसशास्त्रीय अवगाहनशक्तीही काही कमी नव्हती.

लुडविग, मोर्वा आणि स्ट्रॅची या तिघांच्याही चरित्रातून दैवाच्या आविष्करणाचे संदर्भ पुन्हा पुन्हा येतात. विशेषतः लुडविगच्या कृतींतले हे संदर्भ थक्क करणारे, मतिगुंग करून टाकणारे असतात. मोर्वा आणि स्ट्रॅची यांच्या दृष्टीने दैव महत्त्वाचे असले तरी त्याचे अंगीकृत कार्य शोकपर्यवसायी असलेच पाहिजे असे नाही. दैवामुळे अगणनीयतेचा, (incaloulability) निर्भारतेचा (imponderability) घटक उपलब्ध होतो. दैवाच्या संदर्भातून नवचरित्र विषण्णतेच्या अधःप्रवाहाचा आविष्कार घडविते. डिझराएली, शेली या मोर्वाच्या दोन्ही चरित्रनायकांना जीवन अखेरीस नैराश्याने भरलेले, निरर्थक, केवळ फसवणूक आहे असाच प्रत्यय येतो. स्ट्रॅचीच्या चरित्रांनाही विषण्णतेचा स्पर्श झालेला आढळतो. कधी कधी या विषण्णतेचे रूपांतर सार्वत्रिक अश्रद्धेत वा तुच्छतावादात होते.

नवचरित्रकारांची शैलीही आकर्षक आहे. ती ग्राम्य नाही. सहजासहजी घडलेली नाही मुद्दाम जाणीवपूर्वक टिकवून धरलेले तेज त्या शैलीतून ओसंडत राहते. प्रत्येक शब्द बोलका असावा म्हणून खूप मेहनत घेतलेली आढळते. जडावाचे काम करावे तशी वाक्यांची रचना केलेली सापडते, विशेषतः स्ट्रॅची आणि मोर्वा शब्दांची निवड अगदी अचूक करतात. वर्णनात ठळकपणा यावा म्हणून आटोकाट प्रयत्न केलेला आढळतो. विरोधाभास, सुभाषिते, व्याजोक्ती, भावविरोध आणि वक्तृत्वाचा छाप पाडणारे प्रश्न यामुळे कथानकात जिवंतपणा आणला जातो, रंग भरला जातो. कथनाच्या ओघात सापडलेले वाचकाचे मन विचलित होऊ नये म्हणून काळजी घेतली जाते. नवचरित्रात अगदी जशीच्या तशी हुबेहूब वर्णने आढळतात. चित्रमय वर्णने करण्यात स्ट्रॅची, मोर्वा, लुडविग या तिघांचाही हातखंडा आहे. नवचरित्र प्रतिमांचा उपयोग करते, नवचरित्राची घडण कधीकधी उपकथेच्या रूपाची असली तरी त्या उपकथा पृथक नसतात. परस्परानुकूल असतात. नवचरित्रात वास्तवता तर आहेच, पण समग्र चित्रणाचा एक घटक म्हणून प्रत्येक प्रसंगाचे यथार्थ दर्शन घडविलेले असते.

स्ट्रॅची, मोर्वा, लुडविग यांच्या चरित्रलेखनात आशय, घाट, तात्विक दृष्टिकोन आणि शैली या सर्वच बाबतीत विलक्षण साम्य आहे. स्ट्रॅची आणि मोर्वा यांनी अठराव्या शतकातील फ्रेंच चरित्रापासून स्फूर्ती घेतलेली होती. स्ट्रॅचीच्या 'Landmarks in French Literature' या ग्रंथात त्याला वाटणारे फ्रेंच शैलीबद्दलचे आकर्षण स्पष्ट झाले आहे. लुडविगला फ्रान्सच्या जीवनाबद्दल खास

आकर्षण होते. चोविसाव्या वर्षी नेपोलिअनवर त्याचे लक्ष केंद्रीभूत झाले. सव्वीस वर्षांनंतरचे त्याचे सगळे आयुष्य जर्मनीच्या बाहेर अठराव्या शतकातल्या फ्रेंच इतिहासकारांच्या आणि निबंधकारांच्या निकट मानसिक सान्निध्यात गेले. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन जी. ए. जॉनस्टन यांनी नवचरित्राचे बीज फ्रेंच वाङ्मयात सापडते असे आपले मत दिले आहे.' दोनशे वर्षांपूर्वीच्या फ्रान्सच्या वाङ्मयात नवचरित्राची, कोवळी, अगदी ताजी, केवळ जीवनाधार अशी मुळे खोल गेलेली आढळतात.'[३७]

महायुद्धानंतरच्या काळात छिद्रान्वेषी चरित्रलेखनाचा आणखी एक प्रकार रूढ झाला. स्ट्रॅचीच्या अनुयायांपैकी बहुतेकजण त्याचा विचार समजावून न घेता केवळ त्याच्या तंत्राची नक्कल करताना आढळतात. चरित्राचा जो घाट त्याने रूढ केला त्याकरिता सूक्ष्म संशोधन आणि अत्युत्कृष्ट वाङ्मयीन कसब आवश्यक आहे. त्याच्या अनुयायांपैकी बहुतेकांचा असा समज होता, की ज्या व्यक्तीचे चित्रण करावयाचे त्या व्यक्तीचे मनोविकार तिची ध्येये या संबंधी सहानुभूतीचा अभाव असणे हा चरित्रकाराचा अत्यंत आवश्यक गुण आहे चरित्रनायकाच्या अगदी अस्पष्ट हास्यातही त्यांना सहेतुक नेत्रकटाक्षाचा प्रत्यय येई. जिथे सुईने भागण्या-सारखे असे तिथे ते कुऱ्हाड लावत. लाकडी सोटयाऐवजी ते चौधारी तरवारीचा उपयोग करीत. स्ट्रॅचीच्या परंपरागत दैवतांचा खरा किंवा दिखाऊ कमकुवतपणा नेमका हेरण्याच्या अचूक उपजतबुद्धीमुळे चरित्रवाङ्मयाला वेगळेच वळण लागले. साधनांच्या सागरातून केवळ बादलीभर पाणी खेचून घेण्याच्या,अथांग मानवी जीव-नातून काळजीपूर्वक जिज्ञासेने केवळ वैशिष्टयपूर्ण नमुने तपासून घेण्याच्या स्ट्रॅचीच्या-पद्धतीने त्याच्या अनुयायांपुढे आदर्श उभा केला. त्याच्या ' एमिनन्ट व्हिक्टोरिअन्स, या चरित्राने धूर्तपणे निवड करून आणि पुराव्याचा मार्मिक तिरकसपणा साधून चरित्रनायकाच्या कीर्तीला सुरुंग कसा लावावा हे पूर्णपणे दाखवून दिले, स्ट्रॅचीने नेहमीच जरी पूर्ण सत्य सांगितले नाही, तरी व्हिक्टोरिया राणीच्या काळातील पूर्वसूरींच्या सत्याहून वेगळी सत्ये त्याने सांगितली. स्ट्रॅचीमुळे फारसे काही बिघडले नाही. कारण, त्याच्या सत्याच्या विकृतीला निदान रोगचिकित्सेचे मूल्य होते आणि मूर्तिपूजक भावनावशतेपेक्षा त्या विकृतीची प्रतिक्रिया निरोगी होती. अनेक गुरूं-प्रमाणे त्याच्या शिष्यांकडूनच त्याचा घात झाला. त्याच्या अतिउत्साही अनुयायांनी चरित्रवाङ्मयाला वेगळेच वळण लावले. चरित्रवाङ्मयात दोषैकदर्शी अथवा छिद्रान्वेषणाची (debunking) वृत्ती बळावली.

' Debunker ' – हा शब्द १९२३ मध्ये विल्यम इ. उडवर्ड यांनी बनविला

---

37– Johnston George Alexander. ' The New Biography ', The Atlantic Monthly, March 1928, P. 342.

आणि त्यांच्या 'Bunk' या कादंबरीत प्रथम वापरला. 'Debunking' ही छिद्रान्वेषी बुद्धीने चरित्रनायकातले दोष हुडकून वाचकाला 'ह्यात काय आहे, मीदेखील त्याच्या इतकाच चांगला आहे.' असे म्हणून चरित्रनायकाला नाक मुरडता येईल, अशा पद्धतीने त्याच्या योग्य स्थानावरून त्याला खाली खेचण्याची भावनात्मक पद्धत आहे. पहिल्या महायुद्धाने ध्येयवादाला इतकी ओहटी लागली, की ध्येयवादाचा झरा पार आटला. मर्दुमकीच्या वर्णनाला तर ध्येयवादाची मूलभूत गरज असते. सुवर्णयुगाची अपेक्षा करणाऱ्या पिढीची घोर निराशा झालेली होती. त्रस्त झालेल्या, भ्रमनिरास झालेल्या त्या पिढीनें दोषैकदर्शी वृत्तीचा आश्रय घेतला. शिखरावर आरूढ होण्यास असमर्थ ठरलेल्या लोकांनी, स्वतःची असमर्थता झाकण्यासाठी थोरामोठ्यांना स्वतःच्या पातळीवर खेचण्याचा प्रयत्न केला. नेमके सत्य हुडकून काढण्याच्या निमित्ताने दोषच तेवढे शोधून काढण्याचा अतिउत्साही प्रयत्न झाला. अशा चरित्रकारांचा सत्यदर्शनापेक्षा चरित्राच्या खपावर अधिक डोळा होता. चरित्रलेखनाबरोबरच संक्षोभजनक वृत्तपत्रव्यवसायाने खुमासदार, ग्राम्य शैलीने लोकांना, थोरामोठ्यांना उघड्यानागड्या स्वरूपात पाहायला शिकविले. प्रा. फ्रँक क्लेमेन्ट (Prof. Frank Klement) यांच्या मते 'माणसाचे अंगभूत महात्म्य आणि महत्त्व यावरची पारंपारिक श्रद्धा खणून काढण्यास मानसशास्त्रानेही हातभार लावला आहे.' चरित्रकारांची छिद्रान्वेषी वृत्ती इतक्या पराकोटीला पोचली की, १९२७ साली एडमण्ड पिरसन (Edmund Pearson) या टीकाकाराने पुढील भीती व्यक्त केली. 'The time is coming when the biographers are not going to the records, but to the neighbours'[३८]

क्षुल्लक दोष आणि दैनंदिन हालचालीचे अगदी बारकाव्याने वर्णन करून थोरामोठ्यांची किंमत सहज उतरविता येते. पण या गोष्टीची मनाला खटकणारी बाजू ही आहे, की एकांगी चित्रणामुळे चरित्रनायकावर अन्याय केल्यासारखे होते. केवळ छिद्रान्वेषी वृत्तीने चरित्रलेखन केल्याने चरित्रनायक जसा होता तसा तो चित्रित होत नाही. तेव्हा 'Debunking' हा प्रकार यथार्थ व्यक्तिदर्शनाच्या मुळावरच घाव घालणारा आहे. 'Ironic analysis is certainly an experiment, but in the dish that biographers prepare irony should be no more prominent than salt.'[३९] ऑसबर्ट बरडेट यांचे विधान या संदर्भात समर्पक वाटते.

---

38– Garraty John A. 'Biographers are only human', The Saturday Review, 20 March 1955, P. 13.

39– Eurdett, Osbert. 'Tradition and Experiment in present day Literature', 1929, P. 170.

आतापर्यंत चर्चिलेल्या नव्या पद्धतींनी १९२० ते १९३० च्या दरम्यान चरित्राच्या लोकप्रियतेत भर टाकली. पण कालांतराने या पद्धतीमुळेच चरित्राला उतरती कळा लागली. फ्रॉइडच्या पद्धतीने लेखन करणारे चरित्रकार, प्रमाणनिरपेक्ष ज्ञानाचा आधार घेणारे चरित्रकार आणि छिद्रान्वेषी चरित्रकार हुबेहूब व्यक्तिदर्शनाच्या आणि लेखनाद्वारे अर्थप्राप्ती करून घेण्याच्या खटपटीत एक गोष्ट विसरले ती अशी, की चरित्रलेखन मुळातच कादंबरी लेखनाहून भिन्न आहे. चरित्रात व्यक्ती कशी होती या बरोबरच तिच्या कृतींनाही महत्त्व असते. शिवाय, चरित्रलेखनावर उपलब्ध झालेला पुरावा आणि घटिते यांच्या मर्यादा पडतात. या सर्वच लेखकांचा रोख चरित्र, कादंबरीइतकेच मनोरंजक करण्याकडे होता. साहजिकच चरित्राची कादंबरी होण्याची वेळ येऊन ठेपली, तेव्हा रूढमार्गवादी चरित्रकारांनी टीकेची झोड उठविली. सत्याच्या मर्यादेतच लेखन करणाऱ्या परंतु जुन्या पद्धतीतील दोष टाळण्यात यश मिळविलेल्या बर्नार्डडी व्होटो सारख्या चरित्रकाराने तर चरित्राची कादंबरी करू पाहणाऱ्या लेखकांचा सत्याचा आभास निर्माण करण्याकडे कल असतो म्हणून ' Literary people should not be permitted to write biography '४० असे विधान केले आहे. इतर टीकाकारांनी नवचरित्रात इतिहासाचे अज्ञान लपविण्याकरिता साधन म्हणून माणसाचा उपयोग करण्याची जी प्रवृत्ती आढळते, तीबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. छिद्रान्वेषी लेखकांनी जुन्याच तंत्राचा अवलंब करूनही त्यांच्यावरही टीका झाली. छिद्रान्वेषी लेखकाचा व्यक्तिदर्शनापेक्षा स्वत: लेखक किती कुशल मूर्तिभंजक आहे हे दाखविण्याचा प्रयत्न होतो असे एका टीकाकाराने म्हटले आहे. हॉवर्ड ममफोर्ड जॉन्स यांनी नाझीवाद आणि साम्यवाद यांच्यापासून राष्ट्राला गंभीर धोका निर्माण झाला असताना अमेरिकेतील थोर पुरुषांच्या कीर्तीला अकारण सुरुंग लावून देशभक्तीची भावना क्षीण केल्याचा आरोप छिद्रान्वेषी लेखकांवर केला आहे. रूढमार्गवादी चरित्रकारांनी याहीपेक्षा कडक टीका मनोविश्लेषणात्मक पद्धतीने लेखन करणाऱ्या चरित्रकारांवर केली आहे. त्या टीकेची नोंद यापूर्वीच झाली आहे. या सर्व टीकेचा वाचकांच्या अभिरुचीवर नेमका कितीसा परिणाम झाला हे जरी सांगता आले नाही, तरी एवढे मात्र खरे, की या टीकेमुळे नवचरित्र खालावत गेले आणि पुन्हा एकदा रूढमार्गाकडे वळले.

एकोणिसशे चाळीसनंतर चरित्रलेखनातील सुधारणावादी प्रवाह ओसरू लागले होते. अशावेळी जुन्यानव्याचे संयोगीकरण करणारा एक नवीन प्रवाह चरित्रलेखनाला येऊन मिळाला. या नव्या पद्धतीने सुधारणावादी लेखनपद्धतींना

---

40– Devoto Bernard. ' The Skeptical Biographers ', Harper 's Magazine, January 1933, P. 184.

जुन्या पंडितांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून अव्वल साधनांच्या संशोधनाची जोड दिली. या पद्धतीने लेखन करणाऱ्या बहुतेक स्त्रियाच होत्या. त्यात कॅथेरीन ड्रिंकर बॉवेन (Catherine Drinker Bowen) लुईन्स हॉल थार्प (Louise Hall Tharp) आणि मॅडलीन बी. स्टर्न (Madeleine B. Stern) या भरीव यश संपादन करणाऱ्या प्रमुख स्त्रिया होत. श्रीमती कॅथेरीन ड्रिंकर बॉवेन यांनी या पद्धतीला निरूपणात्मक म्हटले. श्रीमती मॅडलीन बी. स्टर्न यांच्या मते ही 'कालक्रमानुसारी' किंवा सद्य:कालीन चरित्राचे ('biography-in- present tense) तंत्र स्वीकारणारी पद्धत होय. कल्पित तपशील आणि तयार केलेली अवतरणे यांना या पद्धतीत मज्जाव नव्हता. या दृष्टीने पाहिले तर ही काल्पनिक, काहीशी कादंबरीच्या वळणावर जाणारी पद्धत होती. चरित्रलेखनात प्रमाणनिरपेक्ष ज्ञानाचाही आधार घेणारी ही पद्धत होती. 'John Adams and the American Revolution' हे चरित्र लिहिताना श्रीमती बॉवेन स्फूर्तीकरिता चरित्रनायकाचे फोटो भोवती पसरून बसल्या आणि ज्या भोवती कथा उभी करता येईल अशा संविधानकाचा त्यांनी जाणीवपूर्वक शोध केला. अशा ग्रंथावर मानसशास्त्राचेही आक्रमण झालेले आढळते. चरित्रनायकाच्या विचारांचा, भावनांचा ओघ फ्रॉइडच्या मूळ तत्त्वांकडे जरी वळला नाही तरी त्यांना अशा ग्रंथात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. या पद्धतीचा अंगीकार करणाऱ्यांचा सूक्ष्म स्थलवर्णनाकडे अधिक रोख होता आणि त्यातही पुन्हा क्षुद्र तपशीलाच्या अभिव्यक्तीकरिता खूपच मेहनत घेण्यात येत असे. यातून वास्तवाचा परिणाम साधला जात असे. या पध्दतीने लिहिलेले चरित्र आणि कादंबरी यांमधला फरक श्रीमती स्टर्न यांनी दाखवून दिला आहे. तो असा 'कादंबरीच्या वळणावर चरित्र लिहिणारा चरित्रकार स्वत: चरित्रनायक असता तर त्याने जसा विचार केला असता किंवा संभाषण केले असते तसे तो लिहितो कालक्रमानुसारी चरित्रकार चरित्रनायकाच्या पत्रांतून, त्याच्या दैनंदिनीतून आढळणाऱ्या पुराव्याच्या आधाराने चरित्रनायकाने जसा संवाद साधला किंवा विचार मांडला त्याप्रमाणे तो लिहितो.'[४१] एकूण या पध्दतीने केलेल्या चरित्रलेखनाला सत्याचा आधार असतो. त्या दृष्टीने ते शास्त्रीय ठरते असेच श्रीमती स्टर्न यांना म्हणायचे आहे. या पध्दतीत वाचकांची फसवणूक करण्याचा प्रयत्न होत नाही, असा दावा श्रीमती बॉवेन यांनी मांडला आहे. चरित्रकार म्हणजे परमेश्वर नव्हे हे वाचक जाणतो. चरित्रनायकाच्या मनात चरित्रकाराला प्रवेश मिळू शकत नाही याची वाचकाला जाणीव असते. या पध्दतीने केलेल्या चरित्रलेखनात कथनाच्या पाठीशी ऐतिहासिक साधने व ऐतिहासिक पुरावा आहे या गोष्टीकडे त्यांनी मुद्दाम लक्ष वेधले आहे.

निरूपणात्मक पध्दतीत घाईघाईने घटिते एकत्र फेकलेली नसत किंवा ती पध्दत केवळ कसबीही नव्हती. त्या पध्दतीनुसार केलेले चरित्रनायकाच्या व्यक्ति-

मत्त्वाचे अर्थबोधन कदाचित् आत्यंतिक स्पष्ट असू शकेल, चरित्र नायकाच्या आयुष्यक्रमातील गुंतागुंत वा त्याच्या कृतीचे ऐतिहासिक महत्त्व कदाचित् दुर्लक्षिलेले असू शकेल, पण त्या चरित्रांच्या रचनेसाठी खूप मेहनत घेतलेली असे. काही प्रमाणात रूढमार्ग अनुसरणारे चरित्र रुक्षता टाळू शकते हे जगाच्या निदर्शनास येताच जुन्या नव्याचा समन्वय करणाऱ्या या चरित्रांना लोकप्रियता लाभली.

येथून पुढे सुधारणावादी रूढमार्गाकडे वळले आणि रूढमार्गवादी अधिकच सुधारणावादी बनले. स्ट्रॅची युगातील अतिरेक म्हणजे शास्त्रानुसारी इतिहासकाराच्या आत्यंतिक वस्तुनिष्ठेविरूद्ध आणि व्हिक्टोरिया राणीच्या काळातील चरित्रकारांचा भडकपणा आणि संकोचाविरूद्ध झालेली एक प्रतिक्रिया होती. रूढमार्गवादी पंडित चरित्रकारांना नवचरित्रकारांचे निसरडे संशोधन आणि तुसडा संवेदना प्रमाण्यवाद (cynical sensationalism) मान्य होण्यासारखा नव्हता. पण त्याचबरोबर त्यांच्यापासून जिवंत व्यक्तिदर्शनाचे, निःसंकोच निवेदन करणाऱ्या अर्थबोधनाचे आणि कलात्मक संघटना यांचे मूल्य त्यांनी जाणले. शतकाच्या सुरुवातीलाच ज्या रूढ मार्गस्थ पंडित चरित्रकारांनी चरित्राला हीनपणा आणला, ज्यांना सुधारणावाद्यांच्या तंत्राबद्दल अनादर वाटत होता, त्याच चरित्रकारांनी चरित्राबद्दलचा आपला दृष्टीकोन बदलला, आणि सुधारणावाद्यांच्या तंत्राचा अवलंब करण्यास सुरुवात केली. पंडितांच्या चरित्रासंबंधीच्या आस्थेने जीव धरला. चरित्रलेखनात इतिहासातल्या शंभर टक्के वस्तुनिष्ठेचा आग्रह कमी झाला. याचे कारण आता इतिहासाच्या शास्त्रीय, हेतुमूलक अर्थबोधनाची बैठक ढिली झाली होती. व्यक्तिमहात्म्यासंबंधाच्या लोकसत्ताक श्रद्धेला साम्यवादामुळे आणि नाझीवादामुळे तडा जाण्याची शक्यता निर्माण झाली होती, आणि म्हणूनच पंडितांना व्यक्तीच्या इतिहासातील भूमिकेचा पुन्हा विचार करून आपले मत बदलणे आवश्यक वाटले. बदललेल्या दृष्टीकोनातून लिहिलेल्या काही चरित्रांचे यशही पंडितांवर परिणाम साधून गेले. भरभराटीच्या काळात चांगल्या लेखकाला अर्थलाभाची संधी चालून येते. काही पंडितांच्या चरित्रांचा खपही फार झाला.

पाश्चात्य चरित्रकारांची अलिकडची पिढी शास्त्रीय निष्ठा आणि वाचनीयता, कल्पकता, कलात्मकता यांचा समन्वय साधणाऱ्या चरित्रासंबंधीच्या नव्या कल्पनेप्रत येऊन पोचलेली दिसते. आधुनिक चरित्रकारांच्या चरित्रासंबंधीच्या कल्पनेत पंडितांची शास्त्रीय दृष्टी आणि नवचरित्रकारांची कलात्मक दृष्टी यांचा समन्वय साधलेला आहे, ही एक समाधानाची गोष्ट आहे. तसे पाहिले तर चरित्र हे सारखे बदलत आले आहे. एन्केन् प्रकारेण चरित्रनायकाची स्मृती टिकवून धरणारी चरित्रे आणि आधुनिक चरित्रे यात महदंतर आहे. तरीदेखील व्यक्तिमत्त्वाची पूर्णपणे

पुर्ननिर्मिती ही अजुनही एक कल्पनाच आहे. असे असले तरी हे ही खरेच, की चरित्राचा आकृतीबंध प्रगल्भ होत आहे आणि अजुनही बदलण्याची शक्यता आहे.

पाश्चात्त्य चरित्रवाङ्मयातील विविध प्रवाह आणि प्रयोग यांची येथवर झालेली चर्चा लक्षात घेऊन मराठी चरित्रवाङ्मयाचा आपण विचार करू लागलो म्हणजे एक गोष्ट लक्षात येते ती अशी, की १९१८ ते १९४७ या दीर्घ कालखंडात मराठी चरित्रवाङ्मयाच्या प्रगतीचे किंवा विकासाचे टप्पे अथवा विविध बदलत्या प्रवृत्ती ज्या प्रमाणात दिसायला हव्या होत्या त्याप्रमाणात दिसत नाहीत. प्रा. ना. सी. फडके यांनी लिहिलेले दादाभाई नवरोजी यांचे चरित्र, साने गुरुजी यांनी लिहिलेले राजवाडे यांचे चरित्र किंवा लक्ष्मीबाई टिळक यांचे 'स्मृति–चित्रे' यासारखी काही निवडक चरित्रे वगळता मराठी चरित्रकार मळलेली वाट सोडून नवी वाट शोधून काढताना दिसत नाहीत.

*

# विभाग दुसरा

## आंग्ल कालातील मराठी चरित्रे

अव्वल इंग्रजीमध्ये प्रारंभी परकीयांची चरित्रे लिहिली गेली, तरी पहिले चरित्र ठरण्याचा मान स्वकीय व्यक्तीच्या चरित्रासच मिळतो. ' राजा प्रतापादित्याचे चरित्र ' हे ते चरित्र होय. हे चरित्रही अनुवादाच्या स्वरूपाचेच आहे. पंडित रामराव बसू यांनी इ. स. १८०१ मध्ये बंगालीत लिहिलेल्या या चरित्राचा अनुवाद फोर्ट विल्यम कॉलेजमधील मराठीचे अध्यापक पंडित वैजनाथ शर्मा यांनी १८१६ मध्ये केला आहे.

या ग्रंथाची एक प्रत कलकत्त्याच्या नॅशनल लायब्ररीत सापडली. त्यावरून वैजनाथ शर्मांचा चरित्रलेखनाचा हेतू स्पष्ट झाला आहे, तो असा की, प्रतापादित्याचे संक्षिप्त चरित्र फारशी भाषेत उपलब्ध आहे. शिवाय, बंगाली भाषेतही ते लिहिलेले आहे. ते प्रमाण मानून मराठी भाषेत आणावे. ' साहेब लोकांचे प्रती–प्राप्ती निमित्त रचना केली असे.' असा आणखी एक हेतू कानफाडापनामक वैजनाथ शिवरामाने सांगितला आहे. चरित्रकाराला साहेब लोकांची प्रीती प्राप्त करावी हा हेतू अभिप्रेत असल्यामुळे मूळ कृतीप्रमाणेच प्रस्तुत भाषांतरीत चरित्रात व्यक्तिदर्शनाचे उद्दिष्ट मागे पडले आहे. दिल्लीला गेल्यावर प्रतापादित्याने केलेले राजकारण, वसंतराय आणि त्याचा मुलगा गोविंदराय यांचा वध, ब्राह्मणाला दिलेला शब्द पाळण्यात दाखविलेली तत्परता आणि शेवटी पत्नीच्या वर्तनाबद्दल संशय आल्यावरून केलेले कठोर वर्तन या सूचक घटनांची नोंद झाल्यामुळे प्रतापादित्य महत्त्वाकांक्षी, दुष्ट, निग्रही होता, ही त्याच्या व्यक्तिमत्त्वाची बाजू लक्षात येते. परंतु साऱ्या तपशीलातून जिवंत व्यक्ती आकार घेत नाही. चरित्रनायक सतत वाचकांच्या डोळ्यापुढे उभा करण्यात चरित्रकाराला अपयश आलेले आहे. याचे कारण चरित्रकाराचे लक्ष प्रतापादित्यापेक्षा प्रतापादित्याशी संबंधित पार्श्वभूमीवर अधिक केंद्रित झाले आहे. या पुस्तकाची पहिली चाळीस पृष्ठे केवळ पार्श्वभूमीकरिता खर्ची पडलेली आहेत. या चाळीस पृष्ठात चरित्रकाराचे सारे अवधान प्रतापादित्याशी संबंधित व्यक्तीवर केंद्रित झाले आहे. चरित्रात प्रतापादित्याचे प्रत्यक्ष आगमन होते ते पहिली चाळीस पृष्ठे लोटल्यावर. विक्रमादित्याच्या पत्नीच्या डोहाळे जेवणाचे वर्णन चरित्रकाराने

अगदी बारीकसारीक तपशीलासह केले आहे. (पृ. ३९) प्रतापादित्याच्या सांगण्यावरून यशहराच्या घाटेवर वसविलेल्या नव्या शहराचे वर्णनही असेच तपशीलवार केले आहे. मात्र व्यक्ती आणि पार्श्वभूमी यामधला तोल चरित्रकाराला अखेरपर्यंत सांभाळता आलेला नाही. धूमघाटी वसविलेल्या नव्या शहराचे वर्णन करतानाही चरित्रकार तपशीलात शिरतो. तो इतका, की त्या वर्णनातला पाल्हाळ जाणवल्याशिवाय राहत नाही. (पृष्ठ ६४–७८) हे नवे शहर वसविल्यावर प्रतापादित्याच्या राज्यप्रतिष्ठापन समारंभाचे वर्णनही बारकाव्यासहीत केले आहे. प्रतापादित्याच्या व्यक्तिदर्शनात या साऱ्या वर्णनामुळे भर पडते असेही नाही. बलिदानाचा खेळ खेळणाऱ्या मुलांच्या उपकथेमुळे या चरित्राचा वास्तवाचा आधार सुटला आहे. हे सारेच वर्णन अद्‌भुतरम्य आहे. (पृ. ९२–९९ व पृ. १०४–१०५) प्रतापादित्यावर बादशहाने पाठविलेल्या वजिराला प्रतापादित्याच्या सैन्याने सरहद्दीवरून खूप आत घेतले व नदीकाठी दोन्ही बाजूने घेरून ठार मारले. बादशहाच्या जवळ जवळ बावीस उमरावांचा प्रतापादित्याच्या सैन्याने याच पद्धतीने पराभव केला यावरून एकतर बादशहाचे सैन्य युद्धनीतीत पारंगत नसावे, किंवा चरित्रकाराच्या सोयीसाठी हे असे घडत असावे असे वाटते. प्रतापादित्याशी युद्ध करायला आलेला मानसिंह त्याच्या आदरातिथ्याने भाळून युद्ध न करता परत जातो हेही एक नवलच. सत्याच्या बंधनापलिकडे जाऊन कल्पिताचा आधार घेतल्याने चरित्रकाराने लेखनात काही एक कलात्मक पातळी गाठली असली तरी त्यामुळेच चरित्राच्या विश्वसनीयतेला ढळ पोचतो, शुद्ध चरित्राच्या आसपासही ही कृती पोहोचू शकत नाही.

रघुनाथ शास्त्री दात्ये यांनी १८४० मधे छापलेल्या शालिवाहन चरित्रातल्या नायकाच्या जीवनातील घटना अवास्तव व अतिरंजित असल्यामुळे सरकारी शाळापुस्तक मंडळीने या पुस्तकास मान्यता दिली नाही, म्हणून लेखकाने ते स्वतः छापले. प्रस्तुत चरित्राच्या प्रस्तावनेत दात्ये लिहितात, ‘ शालिवाहनाचे चरित्र आजपर्यंत पुस्तकद्वारा प्रसिद्धीस न येण्याचे कारण काय असेल ते असो. हल्ली शालिवाहनाच्या इतिहासाचे पुस्तक पैठणात मिळाले व बखरीची पाहण्यात आल्या त्यावरून हे शालिवाहन चरित्र मराठी भाषेत केले आहे.’ (पृ. ४ प्रस्तावना)

चरित्राकरिता दूरच्या काळातील व्यक्तीची निवड केल्यामुळे चरित्रकाराला बखरी आणि दंतकथा यासारख्या साधनांवर भिस्त ठेवावी लागते. याचा परिणाम व्हायचा तोच होतो. शालिवाहन चरित्रात शालिवाहनाची कथा आहे. एवढ्या, पुरतेच ते त्याचे चरित्र एरव्ही कल्पनाममत्व आणि अद्‌भुतरम्यता यामुळे शालिवाहन चरित्राला चरित्राचा घाट असा लाभलेलाच नाही.‘ गोदावरीच्या तिरी पैठण नामक एक शहर आहे. तेथे पूर्वी सोमकांत नामक राजा राज्य करीत होता. तो नीतिमान व परम धार्मिक असे...’ (पृ. १) चरित्राची सुरुवात होते तीच मुळी अशी

गोष्टीसारखी. आणि मग बघता बघता कल्पनारम्य, अद्‌भुत वातावरणाचे वलय निर्माण होते. विक्रम आणि शालिवाहन या दोघांमध्ये घनघोर युद्ध झाले तेव्हा अखेरीस चमत्कार असा झाला, की विक्रमाचे शीर तुटून अंतरिक्षात उडाले आणि धड नर्मदा प्रवाही बुडाले. शिरकमल आकाशात उडाले होते ते नर्मदेच्या उत्तरतीरी जाताच वरच्यावर शिवगण घेऊन गेले. ते विक्रमाचे शिरकमळ शिवाने आपल्या रूंडमाळेत ओवून घातले आणि विक्रमाच्या मुखातून ज्योती निघाली, ती ईश्वराच्या मुखात शिरली. धड जे नदीत बुडाले ते वाहत, वाहत, समुद्रपंथाने द्वारकेस गेले. अशी त्या विक्रमादित्यास सद्‌गती मिळाली. (पृष्ठ १९-२०) विक्रमादित्यास अशी सद्‌गती मिळाली खरी, पण त्यामुळेच चरित्राची मात्र अधोगती झाली आहे. सत्याच्या कसोटीवर या पुस्तकाची पारख केली तर हाती शून्य लाभते. बखरी आणि दंतकथांच्या आधारे हे चित्रण झाले असल्यामुळे चरित्राला वास्तवाचा आधार उरलाच नाही. या पुस्तकातले चित्रण कल्पिताच्या पातळीवरून झाल्यामुळे चरित्राला कलेचा स्पर्श झाला खरा, पण इथेच चरित्र साफ फसले आहे. ते इतके, की चरित्र या अभिधानास ते अपात्र ठरावे. शालिवाहन चरित्राला जोडलेल्या पुरवणीत खुद्द रघुनाथशास्त्री दात्ये यांनी पुढील प्रतिपादन केले आहे,' अशी शालिवाहनविषयी कथा लोकात प्रसिद्ध आहे खरी पण वाटते की अशी असंभाव्य वर्तणूक त्याच्या हातून घडलेली नसावी. कोणी म्हणतील की घडल्यावाचून कोणतीही गोष्ट प्रसिद्धीस येत नाही. तर त्यांनी विचार करून पहावे. प्राय: दंतकथा व निर्मूळ वर्तणुकीच फार चालत आल्या आहेत... तशीच या शालिवाहनाविषयीही असंभाव्य दंतकथा असावी असे वाटते. (पृष्ठ २३-२४). चरित्रनायकाचे जीवन मुळात नसावे तसे ते चित्रित होत आहे, अशी शंका खुद्द दाते यांच्या मनात डोकावते यातच चरित्राच्या अपयशाचे मर्म आहे.

'राजा प्रतापादित्याचे चरित्र' व 'शालिवाहन चरित्र' या दोन्ही कृतींच्या मूळ कर्त्यांनी कथा आणि चरित्र यामध्ये फारसा फरक मानलेला नाही. चरित्रातल्या कलेला सत्याचे बंधन असते ही गोष्ट त्यांना उमगलेली नाही, या दोन्ही कृतींना चरित्र म्हणता येत नाही. तथापि त्यांचा परामर्श अव्वल इंग्रजीच्या प्रारंभी झालेल्या चरित्रपर लेखनाचे अशुद्ध स्वरूप लक्षात यावे आणि त्या पार्श्वभूमिवर चरित्र वाङ्मयाच्या प्रगतीचा मागोवा घेता यावा म्हणून केवळ पार्श्वभूमिवजा घेतला आहे.

चरित्रलेखनाच्या दृष्टीने अव्वल इंग्रजीचा प्रारंभ निराशेचा आहे. प्रतापादित्याचे चरित्र आणि शालिवाहनचरित्र या दोन ग्रंथांखेरीज १८१६ ते १८४० च्या दरम्यान लिहिलेले एकही चरित्र आढळत नाही. त्या काळी गद्य पुस्तके चरित्रासारखी लिहिण्याची प्रथाच नव्हती. स्वातंत्र्य गमावल्याचा तो

परिणाम असावा. मराठी पाऊल मागे पडले आणि इंग्रजी अम्मल सुरू झाला, त्या संधीकाळात लेखन करण्याइतके स्वास्थ्य पारतंत्र्यामुळे स्तिमित झालेल्या चरित्रकारांना लाभले नसावे. स्वतंत्रपणे, कलागुणांना समृद्ध असलेले चरित्रलेखन करणारा एकही लेखक या काळात पुढे येऊ नये यावरून उपरोक्त विधानाला पुष्टीच मिळते. प्रामुख्याने राजकीय स्थित्यंतराचा हा काळ होता. इंग्रजीचा संसर्ग जडून वाङ्मयीन स्थित्यंतर घडायला मधे काही काळ लोटणे आवश्यक होते. मधल्या काळात राजकीय पारतंत्र्यापाठोपाठ वाङ्मयीन परतंत्रता आली. १८४० नंतर काही काळ भाषांतरित चरित्रांनी ही पोकळी भरून काढली. इंग्रजी चरित्रांचा पांगुळगाडा अनुवादकांना अनेक दृष्टींनी सोयीचा ठरला. याकामी चरित्रमूल्यांचे अज्ञान त्यांना जडले नाही. स्वतंत्र परिश्रमाची आवश्यकता उरली नाही. सहजासहजी ग्रंथकर्तृत्वाचे श्रेय पदरी पडले. आणि त्याबरोबरच अर्थप्राप्तीही झालीच. हाताला येईल त्या चरित्राचा अनुवाद करण्याचा सपाटा सुरू झाला.

**भाषांतरित चरित्रे**

महादेव गोविंद कोल्हटकर यांच्या कोलंबसाचा वृत्तांत (१८४९) या ग्रंथात कोलंबसाच्या जलपर्यटनाचा वृत्तांत देणे हेच मुख्य उद्दिष्ट आहे. इथे प्रवासवर्णनाच्या मर्यादेत नायकाचे जीवन व व्यक्तिमत्त्व प्रकट झाले आहे. साहजिकच या ग्रंथाकडून पूर्ण चरित्राची अपेक्षा करणे चुकीचे ठरेल. कोलंबसाच्या जलपर्यटनाचा वृत्तांत देता देता, त्या पर्यटनाशी निगडित तेवढेच त्याचे जीवन व व्यक्तिमत्त्व इथे व्यक्त होते. बार्थोलोमेओ पेरेस्त्रेल्लोच्या मुलीला कोलंबसाबद्दल वाटणारे आकर्षण आणि त्याची विवाहात झालेली परिणती. या कोलंबसाच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाच्या घटनेची चरित्रकाराने अवघ्या एका वाक्यात बोळवण केली आहे. (पृ. ४) अनेक संकटांना तोंड देऊन परिस्थितीशी झुंज देत देत पर्यटने आटोपल्यावर अखेरीस फर्दिनान्द राजाच्या कृतघ्नतेमुळे कोलंबसाच्या मनाला झालेल्या यातना प्रस्तुत ग्रंथात मूकच राहतात. कारण इथे व्यक्तिचित्रणापेक्षा वृत्तान्तकथनाला प्राधान्य लाभले आहे. व्यक्तिदर्शनाची वा जीवनदर्शनाची कोणतीही संधी दवडू नये असे मुळी ग्रंथकाराला वाटतच नाही. जलपर्यटनाचा वृत्तांत, हा या पुस्तकाचा गाभा आहे, त्यामुळे निवेदनाची गती आणि घटनांची संगती लावण्यात लेखकाचे सारे अवधान गुंतलेले आहे. वधूवरांवर टाकलेल्या अक्षतांपैकी काही थोड्याच त्यांच्या डोक्यावर पडाव्यात तसे जलपर्यटनाच्या अनुषंगाने देशाभिमान, श्रद्धा, जिद्द, चिकाटी, सहनशीलता आणि मुत्सद्देगिरी हे कोलंबसाच्या व्यक्तिमत्त्वाचे काही पैलू सहज लक्षात येतात, पण त्याचे समग्र व्यक्तिमत्त्व शब्दबद्ध होत नाही.

विष्णु मोरेश्वर भिडे यांचे 'खुसरू राजाचा इतिहास,' (१८५२) हे चरित्र म्हणजे खुसरूच्या व्यक्तिगत जीवनाचा इतिहास नसून, तो खुसरूने मारलेल्या

लढायांचा इतिहास आहे. खुसरू एकसारखा लढाया मारीत जातो. त्याने सैन्य कसे जमविले, शिपायांना कसे वागविले, सैन्याची व्यवस्था कशी केली. त्याने शस्त्रास्त्रांच्या कोणकोणत्या सुधारणा केल्या इत्यादी युद्धविषयक निवेदनांनी चरित्राचा बराचसा भाग व्यापलेला आहे. इथे व्यक्ती आणि पार्श्वभूमी यामधला तोल साधण्यात लेखक अपयशी ठरला आहे. त्यामुळे या चरित्रात जीवन दर्शनाचे सामर्थ्यच उरत नाही. खुसरूने आर्मीनियावर केलेल्या स्वारीचे वर्णन विस्ताराने करण्यासंबंधी जी कारणे दिली आहेत (पृ. ५२–५६) त्यांची खुसरूच्या व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने काहीच आवश्यकता नव्हती. लढाईवर जाण्यापूर्वी घडलेल्या आब्रडेटीस व पांथीया यांच्या भेटीचे वर्णन ऐतिहासिकदृष्टचा महत्त्वाचे असले तरी खुसरूच्या व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने अप्रस्तुतच ठरते. (पृ. ११७–११९) डामडौल दाखवून लोकात आपल्याविषयी पूज्यबुद्धी निर्माण करण्याकरिता खुसरूने काढलेल्या मिरवणुकीचे वर्णन चरित्रकाराने बारीकसारीक तपशीलासह केले आहे. या साऱ्या फापटपसाऱ्यातून खुसरूचे व्यक्तिमत्त्व आकार घेत नाही. व्यक्तिदर्शी घटितांच्याद्वारे चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्व उभे करण्याऐवजी वरातीमागून घोडं न्यावं तसे चरित्राच्या शेवटी खुसरूचे गुणविशेष एकत्र नोंदले आहेत. परंतु व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने ही नोंद निष्फल ठरते.

प्रस्तुत चरित्राचा मूळ लेखक फ्रेंच इतिहासकार रोलिन याने सामरसचा इतिहास, जेनोफना व हीराउटस या दोन ग्रीस देशातील इतिहासकर्त्यांच्या ग्रंथावरून केला. (प्रस्तावना पृ. २) मतभेदाच्या स्थळी रोलिन जेनोफना प्रमाण मानतो कारण तो इराणच्या राजाच्या पदरी फार दिवस होता. रोलिनप्रमाणेच भाषांतरकार विष्णु मोरेश्वर भिडे यांना चरित्राला सत्याचा आधार असावा. याची योग्य जाणीव होती असे दिसते खुसरूचे वर्णन करताना 'ह्या सर्व वर्णनात इतर ग्रंथांचा आधार सोडून आम्ही पदरचे तिळमात्र लिहिले नाही.' (पृ १३१) असे ते स्पष्ट विधान करतात. साहजिकच प्रस्तुत चरित्रात युद्धाच्या धुमश्चक्रीतही अद्‌भूतरम्यतेला वाव मिळत नाही. मराठी चरित्र (अनुवादित का होईना) अद्‌भूतरम्यतेकडून वास्तवाकडे झुकत चालल्याची खूण या चरित्रात सापडते.

चरित्रकाराने प्रकरणाऐवजी अध्याय हा शब्द वापरलेला आहे. परंतु ते काही चरित्राचे रचना वैशिष्ट्य म्हणता येणार नाही.

कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी भाषांतरित केलेले, 'साक्रेतीसचे चरित्र' (१८५२) मात्र सर्व भाषांतरित चरित्रांहून तंत्र आणि परिणाम या दृष्टीने सर्वस्वी वेगळे आणि वरचढ आहे. मूळ चरित्राइतकीच कृष्णशास्त्र्यांना थोडीफार मूल्यविषयक जाणीव आहे आणि ती चरित्रातून व्यक्त होते, त्यामुळे या चरित्राने काही एक अपेक्षित उंची गाठली आहे, यात शंका नाही. इथे प्रथमतःच वाचकांचे

अवधान नायकाभोवती केंद्रित करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न झाला आहे. आपल्याला साक्रेतीसचे व्यक्तिदर्शन घडवायचे आहे याचे चरित्रकाराने सतत भान राखले आहे. याचा अपरिहार्य परिणाम असा होतो की, आत्यंतिक ध्येयवादी', चिंतनशील, निर्भय, निःस्पृह, सहनशील, उदार, तत्त्वनिष्ठ पण पुराणमतवादी परंपरेला चिकटून राहणारा असा साक्रेतीस व्यक्तिमत्त्वाच्या अंगोपांगासह उभा करण्यात मूळ चरित्रकाराइतकेच कृष्णशास्त्र्यांना यश लाभले आहे. चरित्रनायकाचे जिवंत व्यक्तिमत्त्व सलगपणे व संपन्नपणे वाचकांच्या डोळ्यापुढे उभे राहील अशा कलात्मकतेने घटितांची निवड इथे झाली आहे. विशेषतः मिलितसाने भरलेल्या खटल्याच्यावेळी साक्रेतीसने केलेले भाषण सविस्तर देऊन चरित्रकाराने त्याच्या व्यक्तिमत्त्वावर झगझगित प्रकाश टाकला आहे. शिवाय, घटितांच्या कालक्रमानुसारी मांडणीत धावत्या निवेदनाची सफाई आहे. त्यामुळे साक्रेतीसच्या जीवनकथेला प्रवाहित्व लाभले आहे. या प्रवाहीपणाने वाचकाला गुंतवून ठेवण्याचे सामर्थ्य या चरित्रात निश्चितच आहे.

सत्यविषयक जाणीव ही या चरित्राची आणखी एक जमेची बाजू, काही ऐतिहासिक ग्रंथ व 'अपालोजी ऑफ साक्रेतीस' या सारख्या ग्रंथाचा चरित्रकाराने कौशल्याने उपयोग करून घेतला आहे. सत्याचा विपर्यास होऊ नये म्हणून चरित्रकार जपताना दिसतो. सत्यासत्याच्या बाबतीत डोळस धोरण स्वीकारल्यामुळे हे चरित्र वस्तुनिष्ठ बनले आहे.

साक्रेतीसच्या जीवनातला संघर्ष चरित्रकाराने सुरेख चितारला आहे. मिलितसने साक्रेतीसवर भरलेल्या खटल्याच्यासमयी साक्रेतीसच्या जीवनातला संघर्ष शिगेला पोहचतो. या समयी साक्रेतीसने केलेल्या भाषणातून हा संघर्ष उत्कटपणे प्रत्ययाला येतो. त्याचे समग्र व्यक्तिमत्त्वच या प्रसंगामुळे कसाला लागते. या प्रसंगातून तावून सुलाखून निघालेले साक्रेतीसचे व्यक्तिमत्त्व वाचकांच्या मनःपटावर ठसठशीत ठसल्याशिवाय राहत नाही. संघर्षाच्या चित्रणामुळे चरित्राला लाभलेले वाङ्‌मयीन रूप लोभसवाणे आहे.

चरित्रातील बांधेसूद रचना मूळचीच असली तरी, कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी साक्रेतीसचा जीवनपट उलगडला आहे तो रसाळ भाषेत. चरित्रभर जीवनाचा सूर उमटला आहे.

मात्र रचनेतला पुढील दोष कदाचित तो मूळ चरित्रातला असावा. पण तो खटकल्याशिवाय राहात नाही. चरित्रकाराने अध्याय पहिला. अध्याय दुसरा अशी पौराणिकपध्दतीने प्रकरणांची विभागणी केली आहे. प्रत्येक अध्यायाच्या सुरुवातीला त्या त्या अध्यायाचा सारांश देण्याची काहीच आवश्यकता नव्हती. कारण त्यामुळे वाचकांची उत्कंठा अकारण मारली जाते.

कोलम्बसच्या जलपर्यटन वृत्तांताप्रमाणे सदाशिव गणेश लेले यांनी भाषांतरित केलेल्या 'कॅप्टन कूकसाहेब ह्याचे जलपर्यटनाचा वृत्तांत' (१८५३) या ग्रंथाचा कॅप्टन कूकच्या जलपर्यटनाचा वृत्तांत देणे हेच उद्दिष्ट आहे. इथेही व्यक्तीपेक्षा पार्श्वभूमीला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. फर्डीनान्द राजाच्या वर्तुळातली माणसे कोलम्बसाचा मनातून द्वेष करतात. त्याच्या जलपर्यटनाचे श्रेय आपल्याला मिळावे म्हणून सतत त्याचे पाय मागे खेचण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या मत्सरातून निर्माण झालेल्या संघर्षामुळे कोलम्बसची जीवनकथा चित्तवेधक होते. कोलम्बसाच्या वृत्तांताला निदान काही प्रमाणात कथेचे परिमाण लाभले आहे. पण इथे कॅप्टन कूकच्या जीवनकथेपेक्षा घटनांच्या निवेदनाचीच मातबरी अधिक. या निवेदनाला पुन्हा साचेबंदपणा प्राप्त झाला आहे. त्यामुळे हा वृत्तांत काही वेळा कंटाळवाणा होतो. कॅप्टन कूकचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे. शक्य असल्यास तिथले सृष्टिवर्णन देऊन स्थानिक लोकांची माहिती देणें. किनाऱ्याला जहाज लागल्याबरोबर स्थानिक लोक कसे वागले, त्यांनी व्यापार कसा केला. त्यात चोरटे किती होते वगैरे एकसाची माहिती येत राहिल्याने या लेखातला तोच तो पणा जाणवतो. पर्यटनविषयक माहिती आणि मधून मधून येणाऱ्या सृष्टिवर्णनामुळे या लेखनाला विस्तृत पार्श्वभूमी लाभली आहे एवढे मात्र खरे. पण त्यामुळे कॅप्टन कूकच्या व्यक्तिमत्त्वाचे अंशदर्शनही घडत नाही.

रचनेच्या दृष्टीने कोलंबसाच्या वृत्तांतापेक्षा थोडा वेगळेपणा इथे आढळतो, कारण कोलंबसाच्या वृत्तांताप्रमाणे तृतीयपुरुषी निवेदन इथे आढळत नाही. चरित्रकाराने काही पात्रे कल्पून त्यांच्या संवादातून वृत्तांत कथनाला सुरुवात केली आहे. आणि त्यातल्या एका पात्राने कथन पुढे चालू ठेवायचे अशी योजना केली आहे. नाट्याचा अवलंब (संवादापुरता) हे रचनेच्या दृष्टीने प्रस्तुत चरित्राचे वैशिष्टच होय. चरित्रकाराने या कल्पित व्यक्तींना मराठी वातावरण निर्माण करण्याकरिता मराठी नावे दिली आहेत. प्रत्येक दिवशी संध्याकाळी जलपर्यटनाची हकीकत सांगितली जाते. म्हणून प्रकरणांना पंधरावा संध्याकाळ, सोळावा संध्याकाळ अशी नावे दिली आहेत.

रचनेतला वेगळेपणा सोडल्यास हे एक व्यक्ती आणि पार्श्वभूमी यांमधल्या प्रमाणबद्ध रचनेचा अभाव आणि व्यक्तिदर्शनापेक्षा वृत्तांतनिवेदनावर दिलेला भर यामुळे चरित्र फसलेले आहे.

भास्कर हरि भागवत यांचे 'राजा राममोहन राय यांचे चरित्र' सर्वस्वी भाषांतरित नसले तरी स्वतंत्रही नव्हे. अनुवाद करताना त्यांनी काही ठिकाणी शब्दशः भाषांतर न करता साररूपाने निवेदन केले आहे. (ते पूर्णपणे स्वतंत्र नसल्यामुळे त्याचा समावेश भाषांतरित चरित्रात केला आहे.) प्रस्तुत चरित्राच्या प्रस्तावनेत भागवतांनी चरित्रलेखनाचा हेतू स्पष्ट केला आहे. तो असा, 'स्वदेशीय

लोकांनी हे पुस्तक वाचून यात राममोहन रायाविषयी जे काही लिहिले आहे त्यावर विचार करावा आणि त्यापासून आपले काहीतरी वास्तविक हित करून घ्यावे, हाच ते छापण्याचा माझा सगळा हेतू आहे.' (पृ. २) या मूळ हेतूला धरूनच भागवतांनी चरित्रनायकाचे धर्माविषयक चिंतन आणि कार्य एवढ्यापुरतेच आपले लेखन मर्यादित केले आहे चरित्र वाचून हातावेगळे केल्यावर वाचकांच्या मनावर ठसा उमटतो तो चरित्रनायकाच्या धर्मविषयक चिंतनाचा आणि कार्याचा. चरित्रनायकाचे धर्मविषयक विचार आणि कार्य वाचकांच्या मनावर ठसावे म्हणून भागवतांनी चरित्रनायकाच्या ग्रथांच्या प्रस्तावना आणि 'कलकत्ता रिव्हयू' सारख्या त्रैमासिकाचा उपयोग करून घेतला आहे. वेदांतांच्या इंग्लिश भाषांतराच्या प्रस्तावनेतून चरित्रनायकाचे मूर्तिपूजेविषयीचे विचार स्पष्ट होतात. (पृ. १९-२३) सामोपनिषदाच्या भाषांतरास लिहिलेली प्रस्तावना (पृ. २४-२५) व येशूच्या आज्ञा म्हणजे सुखाचा व शांततेचा मार्ग या ग्रंथाची प्रस्तावना चरित्रनायकाचे विचार कळावेत म्हणूनच उपयोगात आणलेली आहे. अर्थातच मूळ हेतूला धरून व्यक्ती आणि पार्श्वभूमि यांमध्ये तोल साधण्याचा यत्न इथे झालेला नाही. त्यामुळे होते असे, की चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्व आकार घेत नाही. त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट अशी, की प्रस्तुत चरित्रात कुठेही धार्मिक अभिनिवेश डोकावत नाही.

१८६० च्या आगेमागे मराठी चरित्रांनी इंग्रजीचा पांगुळगाडा सोडून स्वतःच्या पायाने वाटचाल सुरू केली होती. तरीही इंग्रजी चरित्रांचे अनुवाद होतच होते.

विष्णू परशराम रानडे यांचे 'जॉर्ज वॉशिंग्टन याचा इतिहास' (१८७२) हे चरित्र सडेतोड प्रामाणिकपणे लिहिलेले आहे. निर्भीड सत्यदर्शन हे या चरित्राचे वैशिष्टय म्हणता येईल. थोरामोठ्यांचे व्यक्तिमत्त्व गुणदोषमिश्र असते याची जाणीव या कृतीच्या मूळ कर्त्याला आहे आणि अनुवादालाही आहे. वॉशिंग्टन शेतीची कामे गुलामांकडून करून घेत असे याबद्दल चरित्रकाराने परखड उद्गार काढले आहेत.(पृ. २६ इथे चरित्रकाराचा स्पष्टवक्तेपणा प्रत्ययास येतो. वॉशिंग्टनचे व्यक्तिमत्त्व उभे करताना त्याची दैनंदिनी आणि पदे यांचा चरित्रकाराने उपयोग करून घेतला आहे. चरित्रकाराने नायकाच्या मोठेपणाबद्दल अवास्तव कल्पना बाळगलेल्या नाहीत, त्यामुळे चरित्रनायकातल्या माणसाचे दर्शन घडविणे त्याला शक्य झाले आहे. वॉशिंग्टन एके ठिकाणी आपल्या पत्रात लिहितो, 'हे माझे परमप्रिय मित्रा, मी लार्ड फेअर फाक्स यांच्या घरी आहे. आज जर माझे अंतःकरण शांत असते, तर माझा काल येथे आनंदाने गेला असता. येथे कर्नल जॉर्ज फेअर फाक्स याची मेहुणी आहे. ती बोलून चालून फार चांगली आहे. हिची माझी वारंवार गाठ पडते, यामुळे माझ्या मनात कामोद्भाव होतो व तेणे

करून ' लोलंदातील सुंदर स्त्रियांचे मला स्मरण होऊन माझ्या मनास फार दु:ख होते '.(पृ. ९) असा एखादा मानवी मन प्रकट करणारा छोटासा ' जलाराम ' दृष्टीस पडूनही वॉशिंग्टनचे व्यक्तिमत्त्व फारच क्षीणपणे व्यक्त झालेले दिसते. याचे कारण या चरित्राची रचना काहीशी विस्कळीत आहे. वॉशिंग्टनच्या व्यक्तिमत्त्वाची विविध अंगे उजळणाऱ्या घटितांची अचूक निवड व त्यांची कलात्मक मांडणी चरित्रकाराला साधलेली नाही. इथे व्यक्तिदर्शी घटितांचा सुसंगत अन्वय लावून सलग, एकजीव जीवनपट विणला गेला नाही. चरित्रकाराला थोडीफार आधुनिक दृष्टी लाभूनही काहीतरी हरवल्याची जाणीव राहते.

विनायक कोंडदेव ओक यांच्या ' पीतर धि ग्रेत ' या चरित्राइतकेच त्यांनी प्रस्तावनेत मांडलेले विचार महत्त्वाचे आहेत.' ...मनुष्याच्या स्वभावाचे संपूर्ण वर्णन करण्याविषयी आजपर्यंत पुष्कळ तत्त्वज्ञान्यांनी प्रयत्न केले, परंतु ते सफल झाले नाहीत. अग्नि म्हणजे काय, हे जसे काष्टदिकांच्या आश्रमाखेरीज दाखविता येत नाही. त्याप्रमाणे मनुष्याच्या स्वभावाची अनेक रूपे त्याच्या कृतींच्या आश्रमाशिवाय कधी दाखविता येणार नाहीत. असा सर्व विद्वान लोकांचा अभिप्राय झाला आहे...' (प्रस्तावना पृ. १) विद्वानांचा नुसता अभिप्राय देऊन लोक थांबले नाहीत तर प्रस्तुत चरित्रात व्यक्तिदर्शी घटितांच्या द्वारे नायकाचे अंतरंग उकलण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केला आहे. ' पीतर धि ग्रेत ' हा एक राजा म्हणून ' ग्रेट ' होताच, पण एक व्यक्ती म्हणूनही तो ' ग्रेट ' होता. इथे लिटन् स्ट्रॅचीच्या ' व्हिक्टोरिया राणी ' प्रमाणे पीतरची ओळख पटते ती राजा म्हणून नव्हे, तर एक सामान्य माणूस म्हणून. याचे कारण आटोपशीर राजकीय पार्श्वभूमीवर त्याचे व्यक्तिमत्त्व ओकांनी अचूक टिपले आहे. इथे राजकीय पार्श्वभूमीच्या चौकटीत व्यक्तिजीवन बसविले आहे. पीतर लढाईच्या तयारीत गुंतलेला असो, तो प्रत्यक्ष रणांगणांवर असो; किंवा वकिलातीबरोबर परदेशात गेलेला असो; तिथेही विविध घटनांच्या अनुषंगाने त्याच्या अंतरंगाचा उलगडा होत राहतो. पीतरवरचे वाचकांचे लक्ष विचलित होणार नाही याची चरित्रकाराने वारंवार दक्षता घेतली आहे. पीतरला बादशाही डामडौल कधीच पसंत नव्हता. राजा असूनही तो निरहंकारी मनाने वावरला. परदेशातही तो अगदी साध्या माणसासारखा राहिला. रशियाचा झार पाहण्याकरिता लोक कौतुकाने गोळा झाले म्हणजे तो अगदी बुजून जात असे. लोकांनी आपणाकडे टक लावून पाहणे त्याची त्याला स्वभावत:च फार चीड होती. एवढा मोठा रशियाचा झार. पण निढळाच्या घामाने मिळविलेली वस्तू वापरण्यात त्याला विलक्षण आनंद वाटे. त्याची ज्ञानलालसाही अपरंपार. त्याकरिता तो देशोदेशी हिंडला आणि जे जे चांगले आढळले ते त्याने रशियात आणले व रूढ केले. पीतरला लहानपणापासून पाण्याचे फार भय वाटे. एखादा लहानसा ओढा

ओलांडायचा असला तरी त्याच्या सर्वांगालाही घाम सुटे. पण या वैगुण्यावरही पुढे त्याने निग्रहाने मात केली. आधी केले मग सांगितले असा त्याचा खाक्या होता. तो एक उत्तम प्रशासक होता. देशकल्याणाची त्याची तळमळ वाखाणण्यासारखी होती.

निर्मळ सत्यकथनाचा गोडवा या चरित्राला व्यापून राहिला आहे. पीतरचे व्यक्तिमत्त्व उभे करताना चरित्रकाराने केवळ एकाच बाजूवर भर दिलेला नाही. या नाण्याच्या दोन्ही बाजू चरित्रकाराने वाचकांच्यापुढे ठेवल्या आहेत. त्याचे ठळक गुणविशेष, त्याने केलेल्या सुधारणा यांविषयी जितक्या स्पष्टपणे लिहिले आहे, तितक्याच स्पष्टपणे त्याच्या विषयासक्तीविषयी लिहिले आहे. त्यामुळे पीतरचे हे व्यक्तिदर्शन अधिक परिपूर्णतेला पोचू शकले. कसलाही आडपडदा न ठेवता नोंदलेली काही घटिते बोलकी आहेत. त्यांना समर्थनाची अवकळा आलेली नाही. 'त्याच्या लष्करामध्ये एका सरदाराची मोएन्सनामक एक कन्या फार रूपवती होती, तिजवर पीतरचे मन बसले. ती हाती लागण्यास त्याला फार खटपट करावी लागली. शेवटी त्याने तिला घराबाहेर काढून वेश्येप्रमाणे आपणापाशी ठेविले.' पुढे मोएन्साचे एका सरदाराशी असलेले संबंध उघडकीस आल्यावर त्याने तिला दूर केले. (पृ. ७९) इंग्लंडमध्ये असताना पीतर पुष्कळ मद्यपान करीत असे. ही सवय त्याला लहानपणापासून लागली होती. तो एकदोनदा नाटकासही गेला होता. तेथे क्रास नामक एका नर्तकी स्त्रीने त्याचे चित्त वेधले होते व तिची त्याची पुढे गाठही पडली होती. (पृ. ४८) पीतरला पुत्र झाल्यावर त्याच्या आनंदास पारावार उरला नाही. त्या निमित्ताने एकसारखा दहा दिवस उत्सव चालला होता. त्या समारंभात मद्यपानाची तर काही कमाल होऊन गेली. पीतरच्या वाड्यामध्ये शेवटची मजलस झाली त्यावेळी, त्याने फारच आग्रह चालविला. या आग्रहापायी मद्यपानाचा अतिरेक होऊन झारचा गुरु गतप्राण झाला. ही घटना नमूद करून पीतरच्या छांदिष्टपणाबद्दल चरित्रकाराने परखड लिहिले आहे. (पृ. १२८–१२९). पीतरने इंग्रिया प्रांत लुटून उध्वस्त करून टाकला. त्या संदर्भात त्याने जी कारणे दिली आहेत ती अगदी पोरकट आहेत असा चरित्रकाराने स्पष्ट अभिप्राय दिला आहे. तरी ही हल्ल्याची कारणे पोरकट आहेत असे म्हटल्यावाचून आमच्याने राहवत नाही.' (पृ. ६२) पीतरचे गुणदोष धारवाडी काट्याने तोलून त्यांची निर्भीड नोंद इथे झाली आहे. सत्यदर्शनाने या व्यक्तिदर्शनाला तोल प्राप्त करून दिला आहे. चरित्रकाराने हे लेखन अलिप्तपणे केले आहे. त्यामुळे या चरित्रात आगळीच वास्तवता डोकावते. व्यक्तिदर्शी घटितांचा प्रकाशझोत चरित्राच्या केंद्रस्थानी असलेल्या पीतरवर सतत पडत राहिल्याने त्याचे सलग व्यक्तिमत्त्व संपन्नपणे उभे राहते. त्याच्या स्वभावाचा खोल ठावही लागतो. त्याच्या सर्वांगीण जीवनाचा ठळक ठसाही उमटतो आणि त्याचा साद्यंत जीवनक्रम चलत चित्रपटाप्रमाणे डोळ्यांपुढे प्रत्यक्ष घडतो आहे असे वाटते.

स्वमतप्रतिपादनाच्या निमित्ताने (पृ. ५४ व पृ. ८३) व उद्बोधनाच्या निमित्ताने (पृ. ११६-११७) चरित्रकार डोकावला नसता तर ते उचित झाले असते.

चरित्राच्या शेवटी पीतरविषयीचे काही ग्रंथकारांचे अभिप्राय दिले आहेत. त्यांची काही आवश्यकता नव्हती. कारण, त्यात पुनरुक्ती आहे.

उपरोक्त दोष वगळल्यास हे चरित्र कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी अनुवादित केलेल्या साक्रेतीसच्या चरित्राइतकेच सरस आहे.

विनायक कोंडदेव ओक यांनी लिहिलेले 'आलफ्रेद धि ग्रेत' हे मराठी चरित्राला पडलेला अद्भुताचा विळखा दूर करणाऱ्या चरित्रांपैकी एक. ओक सत्य घटिते पाखडून घेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करतात. चरित्रातली घटिते सत्य असावीत याची कल्पना ओकांना होती. सत्य आणि कल्पित यांच्या सीमारेषा स्पष्ट झाल्याशिवाय ते घटितांचा सहजासहजी स्वीकार करीत नाहीत. यामुळे होते असे, की चरित्रनायकाविषयी उपलब्ध असलेल्या माहितीत अद्भुताचा माल-मसाला ठासून भरलेला असतानाही ते कल्पिताला डावलून घटितांची नोंद करतात. 'एदमंद राजाला देन्स लोकांनी ठार मारल्यानंतर ते निघून गेले. राजाचे धड तेथेच त्यांनी ठेविले. हे वर्तमान आंग्लोसाकसन लोकांस कळताच ते तेथे आले. आणि राजाची ती अवस्था पाहून फार दुःखी झाले. त्याची प्रेतक्रिया करण्याचा विचार त्यांनी मनांत आणला परंतु ते कृत्य त्यांच्या शिरावाचून खोळंबले म्हणून, ते शोधावयास ते लागले.' या संदर्भात ओक लिहितात, 'त्या विषयींच्या ज्या काही गोष्टी पुस्तकातून लिहिल्या आहेत, त्या मुळीच खऱ्या वाटत नाहीत. त्यातली एक गोष्ट अशी आहे की, ते लोक जेव्हा त्या अरण्यात ते शोधण्यास हिंडत होते, तेव्हा त्या शिराने ध्वनि करून, आपण अमक्या जागी आहो, असे सूचविले. दुसरी एक गोष्ट अशी आहे की, एका लांडग्याने ते शिर आपल्या पुढच्या पंजात अगदी हळू धरून मंडळीच्या मागोमाग, त्यास पुरावयाच्या ठिकाणी नेऊन ठेविले, आणि ते आपोआप त्या धडाशी जडून त्यास जडले.' ह्या दोन्ही गोष्टींत सत्य फार कमी आहे, किंबहुना नाही, असे म्हटले तरी चालेल. ह्यास्तव त्या इतिहासात घालण्यास योग्य नाहीत हे खरे. परंतु, तेव्हाचे लोक त्या खऱ्या मानीत होते, ह्यावरून ते किती भोळे होते, आणि त्यांचे ठायी अज्ञान किती होते, हे दिसून येते. (पृष्ठ २१-२२). आलफ्रेद अज्ञातवासात असताना त्याच्या औदार्या संबंधाने व धार्मिकपणाच्या संदर्भातही अवास्तव गोष्टी प्रसिद्ध आहेत. ओक लिहितात, '... ह्या स्थितीमध्ये असता, आलफ्रेदास नाना प्रकारच्या युक्तींनी वेळ काढून न्यावा लागला, त्या विषयीच्या अनेक चमत्कारिक गोष्टी पुस्तकातून लिहिल्या आहेत. त्यात किती एक त्याच्या औदार्याच्या आणि धार्मिकपणाच्या आहेत. त्या बहुतकरून कल्पित असाव्या असा समज आहे.' या गोष्टीपैकी जी

सर्वत्र प्रसिद्ध आहे, व संभवनीय आहे तीच ओकांनी इथे दिली आहे. (पृ. ४८) हेस्तिंगने आलफ्रेदशी लढाई सुरू केल्यानंतरचे पुढील वर्णन पाहा,–' नंतर काही दिवस शांतपणाने गेले. परंतु, देन्स लोक पुनः आपल्या आरमाराची तयारी करून पुनरपि एकदा थेम्स नदीत आले. त्या प्रसंगी आलफ्रेदाने त्यांचा पराभव ज्या रीतीने केला म्हणून किती एक प्राचीन इतिहासकारांनी लिहिले आहे, ती रीत फार चमत्कारिक आणि असंभवनीय वाटते, ती रीती अशी. आलफ्रेदाने, विलक्षण प्रयत्नाने, त्या नदीचा प्रवाह दुसऱ्या मार्गाने वाही असा करून देन्स लोकांची गलबते, एकाएकी, कोरड्या जमिनीवर राहात अशी केली आणि मग त्यांजवर एकदम हल्ला करून त्यांचा पराभव केला. ह्यातले काही एक खरे वाटत नाही. कांकी, थेम्स नदीसारख्या नदीतून मोठाली जाहाजे चालतात, तिचा प्रवाह, तिच्या पात्रातून काढून दुसरीकडे वाहीसा करणे, हे कृत्य मनुष्यास असाध्य आहे. ते आजपर्यंत कोणाही माणसास करिता आले नाही आणि त्या नदीचा पूर्वीचा प्रवाह अमक्या ठिकाणी होता असेही कोणी सांगू शकत नाही. तेव्हा ही सगळी गोष्ट कल्पित दिसते ' (पृष्ठ ९९–१००)

प्रस्तुत चरित्रात नायकाशी संबंधित व्यक्तींचे चित्रण पार्श्वभूमीपुरतेच झाले आहे. आलफ्रेदचा बाप एदलउल्फ मरण पावल्यावर त्याचा मोठा मुलगा एदलबाल्द सगळ्या राज्याचा धनी झाला. तोही आपल्या बापासारखा विषयी होता. त्याने जनाची व मनाची लज्जा सोडून आपले बापाची विधवा स्त्री जूदिथ हीस आपणाशी लग्न लावण्याविषयी आग्रह केला. तो तिला मानवला. आणि मग त्यांचे लग्न झाले. धर्माधिकाऱ्यांनी निषेध केल्यावर एदलबाल्द यास पश्चात्ताप झाला व त्याने तिला सोडून दिले. पुढे जूदिथ ही तिच्या दोघा नवऱ्याकडून जो जमीनजुमला बक्षीस मिळाला होता तो विकून आणि आपली सगळी चीजवस्तू बरोबर घेऊन स्वदेशी गेली. ती इंग्लंडमधून निघाली तेव्हा तिला आलफ्रेदाविषयी फार वाईट वाटले. फ्रान्सला पोहोचल्यावर थोड्याच दिवसांनी तिने तिसऱ्या राजाशी लग्न लावले. एथून पुढे आलफ्रेदच्या जीवनाशी तिचा संबंध उरला नाही. म्हणून तो जीवनप्रवाह ओकांनी इथेच तोडून टाकला आहे. चरित्रनायकाशी संबंधित अशाच घटितांचा परामर्ष घेऊन, अप्रस्तुत घटितांचा परामर्ष घेण्याचे ओक टाळतात म्हणूनच व्यक्ती आणि पार्श्वभूमी यांमधला तोल ढळत नाही.

चरित्रातल्या घटितांची मांडणी कालक्रमानुसारी असल्यामुळे आलफ्रेदच्या जीवनकहाणीस प्रवाहित्व लाभले आहे.

देन्स लोकापासून आपल्या शीलाचे रक्षण व्हावे म्हणून आपली तोंडे, नाके, गाल, कान आणि कपाळे, ओरबडून आणि कापून छिन्नविच्छिन्न करून टाकणाऱ्या जोगिणींची हृदयद्रावक कथा सांगून ओक पुढे लिहून जातात, ' परमेश्वराने

लावून दिलेल्या नीतिमार्गाने चालणाऱ्या मनुष्यास विनाकारण अशा विपत्ति भोगाव्या लागतात हे पाहून मनास फार वाईट वाटते.' (पृ. १२) ओक असे मधून मधून चरित्रात डोकावतात.

पृष्ठ ९ वर जूदिथच्या दुसऱ्या विवाहाच्या संदर्भात एदलउल्फ हे नाव चुकून पडले असावे. ओकांना तिथे एदलबाल्द अभिप्रेत असावा. एरवी जूदिथचा पहिला पती एदलउल्फ व दुसराही एदलउल्फ या विधानाची संगती लागत नाही.

या चरित्राची योग्यता बेताचीच असली तरी साधार चरित्र लेखनाचा एक उल्लेखनीय उद्योग म्हणून ते संस्मरणीय आहे.

कर्नल म्यॉलेसनकृत 'अकबर' या ग्रंथावरून माधवराव व्यंकटेश लेले यांनी लिहिलेल्या 'अकबर बादशहाचे' चरित्र (१८९८) या ग्रंथाची पहिली ६८ पृष्ठे बाबर, हुमायून व हिंदुस्थानची सोळाव्या शतकातील स्थिती इत्यादी पार्श्वभूमी-करिता खर्ची पडली आहेत. अकबराचे जीवन जाणून घेण्याच्या अपेक्षेने या चरित्राकडे वळणाऱ्या वाचकांची ग्रंथाच्या प्रारंभीच निराशा झाल्यावाचून राहणार नाही. कारण, या भागात लेखकाला ऐतिहासिक पार्श्वभूमीचे चित्रण अभिप्रेत असल्यामुळे त्याने केवळ घटनांच्या निवेदनावर भर दिला आहे. या घटनांच्या गुंतवळीतून अकबर शोधून सापडत नाही. ऐतिहासिक घटनांच्या रुक्ष, कोरड्या तपशीलात वाचकांना गुंतवून ठेवण्याचे सामर्थ्य नाही. साहजिकच या भागात चरित्र कंटाळवाणे होते. चरित्रकाराला स्वतःलाच याची जाणीव झाली असावी, नाहीतर उपोद्घातात त्याने पुढील निवेदन केले नसते. 'ज्या धर्मात परधर्मीयांशी वैर करण्याविषयी सक्त आज्ञा आहेत अशा धर्मात जन्मापासून वाढला असूनही ज्याने आपल्या बुद्धीला अप्रतिहत संचार करू दिला व आपल्या नैसर्गिक विचारा-नुरूपच वर्तनक्रम चालू ठेवला, असा एक अद्वितीय पुरुष व पिता व पति या नात्याने त्याचे वर्णन केले आहे. या पुस्तकात खरोखरच हाच भाग अतिशय महत्त्वाचा आहे, म्हणून त्याच्या पूर्वीचे भाग लिहून वाचकास त्रास दिल्याबद्दल क्षमा करावी.' (उपोद्घात पृ. ७).

अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणून लेले यांनी ज्याचा उल्लेख केला आहे, तो भाग पृष्ठ ६८ पासून पुढे सुरू होतो. या भागात चरित्र निदान वाचनीय तरी होते आणि त्या दृष्टीने ते काहीसे सावरले आहे यात शंका नाही. परंतु व्यक्ति-दर्शनाच्या दृष्टीने अखेरीस निराशाच पदरात पडते. कारण, या भागातही लेखकाचा भर माहितीपूर्ण निवेदनावर फार आहे. चरित्रनायकाच्या कृतीद्वारे त्याच्या व्यक्ति-मत्त्वावर प्रकाश टाकण्याचे आधुनिक चरित्रकारांचे कसब त्याला साधलेले नाही. शिवाय या भागात चरित्रकाराने अवलंबिलेल्या तंत्राचा अंगभूत दोष असा आहे, की त्यामुळे अकबराच्या जीवनकथेला प्रवाहित्व लाभत नाही. या भागात लेले यांनी व्यक्तिचित्रण करताना अकबराच्या जीवनाचे राजा आणि सामान्य माणूस

असे दोन भाग कल्पिले आहेत. त्यामुळे अकबराच्या व्यक्तिचित्रणात खाजगी जीवनाचा तपशील विभागला गेला आहे. अशा तऱ्हेची विभागणी एक व्यक्ती नजरेसमोर धरताना फारशी उपकारक ठरत नाही. व्यक्तिचित्रणाचे हे दोन कप्पे जुळवून चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे आकलन करून घेणे अवघड होते. कारण इथे चरित्रनायकाच्या जीवनप्रवाहाला सलगता उरली नाही. चरित्र नायकाचे व्यक्तिमत्त्व सुस्पष्ट आकार घेत नाही, ते वाचकांच्या मन:पटावर ठसठशीत कोरले जात नाही.

अकबराने नवा धर्म स्थापन केल्यानंतर तो स्वधर्मीयांच्या गळी उतरविण्यात त्याला यश लाभले नाही. याचे कारण अकबराचे अंगी नीतिधैर्याची उणीव होती. महमदी धर्माच्या लोकांकडून झालेल्या विरोधाला तोंड देण्याइतके मानसिक धैर्य त्याच्या अंगी नव्हते. या वस्तुस्थितीचे निवेदन चरित्रकाराने कटाक्षाने टाळले आहे. त्यामुळे या चरित्राच्या अखेरीस येणारा समर्थनाचा सूर जाणवतो.

चिंतामण गंगाधर भानू यांनी जॉन मोर्ले यांच्या ग्रंथाच्या आधाराने लिहिलेले काब्डेनचे चरित्र (१८९०) हे एक बऱ्यापैकी चरित्र आहे. या ग्रंथाच्या प्रारंभी येणारी आतांची माहिती आटोपशीर आहे. काब्डेनने राजकीय जीवनाला वाहून घेतल्यानंतर स्वाभाविकच या चरित्रात राजकीय पार्श्वभूमीचे चित्रण अपरिहार्य होते. पण परशुरामभाऊ पटवर्धनांच्या चरित्राप्रमाणे काब्डेनच्या चरित्रात राजकीय पार्श्वभूमी वाचकांना असह्य होत नाही. याचे कारण ती पार्श्वभूमी रेखाटली जात असताना काब्डेनच्या राजकीय जीवनातून तावून सुलाखून निघालेले त्याचे व्यक्तिमत्त्व इथे दुर्लक्षित झालेले नाही. या ग्रंथाचे वैशिष्टय असे, की काब्डेनचे राजकीय जीवन घडत असतानाच आकाराला येणारे त्याचे व्यक्तिमत्त्व त्याच्याच शब्दात स्पष्ट होत जाते, याकामी चरित्रकाराने काब्डेनची पत्रे, त्याची पार्लमेंटमधली भाषणे आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारे त्याच्या ग्रंथातले उतारे यांचा मोठ्या कौशल्याने उपयोग करून घेतला आहे. आतापर्यंतच्या सर्वच चरित्रकारांनी व्यक्ती आणि पार्श्वभूमी यामधला तोल सांभाळताना विस्तृत अशा सार्वजनिक वा राजकीय पार्श्वभूमीत नायकाच्या खाजगी जीवनाचा तपशील भरलेला आढळतो. इथे चरित्रकाराने केवळ काब्डनच्या राजकीय जीवनाशी निगडित अशाच घटनांची नोंद केली आहे. आणि ती नोंद होत असतानाच त्याची पत्रे, त्याची भाषणे आणि त्यांच्या ग्रंथातील उतारे यातून त्याचे मनोगत व्यक्त होत राहते. व्यापारात पडण्यापूर्वीचे त्याचे मनोगत पुढील शब्दात व्यक्त झाले आहे, ‘ खिशात एक फुटकी कवडी नसताना लांकाशायरमध्ये माझ्या अनुभवासह मला सोडला तर तेवढ्या भांडवलावर लाखो रुपये कमाई करीन.’ (पृष्ठ ७). काब्डनचा ओसंडून जाणारा

उत्साह आणि आत्मविश्वास पुढील शब्दातून व्यक्त होत नाही असे कोण म्हणेल ? संपत्ती मिळविण्याच्या कामात आड येणारे विघ्नांवर जोराने हल्ला करून त्यास पादाक्रांत करीनच करीन अशी प्रसिद्ध नेपोलियनसारखी माझी बालंबाल खातर जमा आहे.' (पृ. ७)

धान्यावरचा कर रद्द व्हावा, धान्य स्वस्त व्हावे म्हणून जिवापाड मेहनत करून त्याने चळवळ उभारली. एका वेळी एकच काम करायचे आणि तेही जीव ओतून असा त्याचा मूळ स्वभाव होता. बहुजन समाजाबद्दल त्याला वाटणारी तळमळ १८५३ मधे त्याने लिहिलेल्या ग्रंथात ओतप्रत भरलेली आहे. 'आपली सामाजिक स्थिती व विशेषत: समाजमनोऱ्याचा पाया जे कष्टकरी लोक त्यांची गृहस्थिती सुधारल्याशिवाय आपली राजपद्धती कधी चिरस्थायी होणार नाही. करिता आपली सामाजिक स्थिती सुधारावी.' (पृष्ठ ७७) उपासकांची देवालये जास्त बांधण्याबद्दल त्याकडे जेव्हा वर्गणी मागण्यात आली तेव्हा त्याने साफ सांगितले की, 'लोकांचे अन्न स्वस्त झाल्याशिवाय व त्याची दुपारची भ्रांत कमी झाल्याशिवाय त्यांच्या नीतिशिक्षणाची व्यवस्था करणे मूर्खत्वाचे काम आहे, शिवाय त्यास अन्न मिळवून देण्याकरिता मला जितकी यथाशक्ती मदत करवली तितकी केली आहे. अन्नाची आवश्यकता पहिली आहे. नीति, धर्म अगर विद्या ह्या गौण गोष्टी आहेत. तेव्हा पहिली सिद्ध झाल्याशिवाय दुसऱ्या गोष्टीस एक तनसडीसुद्धा माझ्याकडून मिळणार नाही' (पृ. ४२).

युद्धविरोधी भूमिका घेऊन शांततेचा प्रचार करताना लोकमताच्या प्रचंड लहरीविरुद्ध बोलणे व कृती करायला काब्डेन डगमगला नाही. 'रशिआशी लढाई करणे योग्य नाही, तीपासून अनंत अपराध उत्पन्न होणार,' (पृ. ८०). असा प्रसंग आला म्हणजे ठासून बोलायला तो चुकला नाही. दृढ निश्चयाने व महाधैर्याने त्याने स्वीकारलेल्या मार्गाचा त्याग न केल्यामुळे लोकांत त्याच्या मताचा हळू हळू प्रसार होत गेला, व शेवटी त्या मताचा इतका पगडा बसला, की यापुढे युरोपात ज्या अनेक लढाया झाल्या त्यात इंग्लंडने स्वत: शिरण्याची कधीही इच्छा प्रदर्शित केली नाही.

पंतप्रधान पाल्मर्स्टनने मंत्रिमंडळात येण्याचे आमंत्रण दिले तेव्हा काब्डनची आर्थिक परिस्थिती बिघडली होती. तरी तत्त्वनिष्ठा सोडून मंत्रिमंडळात सामील होण्याचे त्याने साफ नाकारले. मित्रांनी आग्रह केल्यावर त्याने उत्तरादाखल लिहिलेले पुढील पत्र पहा. 'माझी घरगुती स्थिती पाहिल्यास मी आलेलं काम टाकू नये असे आहे, पण ते माझ्या मनाविरुद्ध होईल व मी अपकीर्तीस मात्र पात्र होईन. मी केले आहे ते बरोबर आहे असा लवकरच प्रत्यय येईल.' (पृ. ८७).

वारा येईल तशी पाठ द्यावयाची हा गुण त्याच्या अंगात बिलकुल नव्हता फ्रान्सहून नेपोलिअनशी व्यापारिक संधी करून काब्डेन फ्रान्सला आला तेव्हा त्याने

व्याजी लावलेला सर्व पैसा बुडाला हे पाहून तो मोठ्या फिकिरीत पडला. त्याने आपल्या जुन्या एका मित्रास दुःखाने पत्र लिहिले, 'तुम्ही १०/५ जण मिळून माझ्या जमिनीवर मला पैसे द्याल तर बघा. माझ्या मागे मुलांचे काय होईल या काळजीनें माझे केस पांढरे होत चालले. प्रधानमंडळ वर्षाचे २,००० पौन्डांची जागा देण्यास तयार आहे पण मी ती पत्करू कोणत्या तोंडाने ? मुलाबाळांकरिता मी ती पत्करली असती पण काय करू ? सार्वजनिक मनुष्याचे पाठीमागे हे एक लचांड असते की त्याची सर्व गृहदुःखे जगापुढे मांडली जातात.' (पृ. ९१) फ्रान्सबरोबर करार करताना मानहानी सोसून त्याने आपले कर्तव्य पार पाडले व राणीने बहाल केलेली बारोनेटची पदवी नम्रतेने परत केली, हा व्यापारी करार घडवून आणल्याबद्दल पार्लमेंटकडून काही पैसे देण्याचे घाटत आहे. असे ऐकून काब्डेनने ब्राइट यास ती सूचना हाणून पाडण्याबद्दल लिहिले. त्यात मुख्य कारण दिले होते ते हे की,—'मुख्य प्रधानाची वागणूक अतिशय घाणेरडी व तिरस्कार-योग्य आहे. मला इंग्लंडचा वकील म्हणून पाठविले असताही मध्ये भिकार चाळे करून मला खाली पाहावयास लावले, दुसरा एखादा असता तर कामावर लाथ मारून निघून गेला असता, पण माझ्या मनातून हा तह कर्तव्यच म्हणून अपमान सोसून राहिलो. असल्या माणसाकडून मला एक दमडीसुद्धा नको.' (पृष्ठ ९७). थोड्याच दिवसांनंतर 'राणीने मेहेरबान होऊन तुम्हास बारोनेटची पदवी देण्याची मला परवानगी दिली आहे, कारण तुम्ही केलेले काम फार मोठे आहे. करिता ही पदवी आपण घ्यावी.' अशा अर्थाचे पाल्मर्स्टनने पत्र पाठविले त्यास, 'राणीच्या मेहेरबानीबद्दल मी फार आभारी आहे. पण माझे मन मला पदवी घेण्याची परवानगी देत नाही. हा मनोविकाराचा भाग आहे. समजुतीचा नाही. मी केलेल्या कामापासून लोककल्याण झालेले पाहिले म्हणजे माझे बक्षीस मला मिळाले.' (पृष्ठ ९७). असे त्याने उत्तर लिहिले.

प्रस्तुत चरित्राचा आणखी एक विशेष असा, की हे लेखन तटस्थपणे झाले आहे. त्यामुळे कुठेही झाकपाक करण्याचा प्रयत्न झालेला नाही. साहजिकच चरित्र-नायक जसा होता तसा तो वाचकांच्या डोळ्यापुढे उभा राहतो. काब्डेनने पहिलेच भाषण ठोकले त्यावेळी झालेली त्याची अवस्था चरित्रकाराने जशीच्या तशी टिपलेली आहे. 'सार्वजनिक सभेत त्याने पहिले भाषण केले त्यात घाबरून जाऊन तो अतिशय गोंधळला व मध्येच त्यास आपले भाषण थांबवावे लागले. व शेवटी अध्यक्षास त्याच्या तर्फेने माफी मागावी लागली.' (पृष्ठ ११).

काब्डेनने आपल्या पत्रात केलेले निसर्गवर्णन मूळ कथेच्या ओघात चरित्र-काराने मोठ्या कौशल्याने मिसळून दिले आहे. त्यामुळे चरित्राच्या रंजकतेत भर पडली आहे.

या चरित्राने 'पीटर घी ग्रेट' या चरित्राइतकी उंची गाठलेली नसली तरी अस्सल साधनांचा उपयोग करणारे, व्यक्ती आणि पार्श्वभूमी यामधला तोल साधण्याचा आटोकाट प्रयत्न करणारे, आणि म्हणूनच मराठी चरित्रात उल्लेखनीय ठरलेले हे एक चरित्र आहे.

भाषांतरित चरित्रांच्या अपयशाचे कारण शोधू पाहता एक गोष्ट स्पष्ट होते ती अशी, की काही अपवादात्मक कृती वगळता या कृतींच्या मूळ कर्त्यांनाच मूल्यविषयक जाणीव फारशी नाही, आणि भाषांतरकारांनाही ती नाही, तंत्र आणि परिणाम या दृष्टीने अनुवादकांनी या चरित्रांवर स्वतःचा ठसा उमटविलेला नाही. 'धन्याचा तो माल' ही भारवाही भूमिकाच त्यांनी स्वीकारलेली आहे. उदाहरणार्थ व्यक्ती आणि पार्श्वभूमी यामधली प्रमाणबद्ध रचना काही कृतींच्या मूळ कर्त्यांना जमलेली नाही, आणि अनुवादकांनाही ती साधलेली नाही. मूळ कृतीचे अपयश पुसून काढण्याचा वा त्याची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न अनुवादकांकडून झालेला दिसत नाही.

चरित्रलेखनाचे वाङ्मयीन उद्दिष्टच मुळी अनुवादकांना स्पष्ट झालेले नाही. काहींनी प्रस्तावनेत चक्क वाङ्मयबाह्य हेतूचा पाठपुरावा केला आहे. व्यावहारिक उपयुक्ततेची अपेक्षा बाळगणारी बोधवादी दृष्टी त्यांनी स्वीकारलेली आहे. थोर व्यक्तीच्या चरित्रापासून बोध घेता येतो ही प्रेरणा अनुवादांच्या मुळाशी आहे. साहजिकच चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे यथार्थ दर्शन सलगपणे, संपन्नपणे घडविणारी चरित्रे या कालखंडात अपवादात्मक आढळतात.

मूळ चरित्रकृती हेच अनुवादकाचे साधन असल्यामुळे चरित्र नायकाच्या जिवंत व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय यावा म्हणून विविध साधनांचा उपयोग करण्यचे कसब आत्मसात करण्याची संधी अनुवादकांना मिळाली नाही. परंतु अनुवादाच्या निमित्ताने पत्रे, दैनंदिनी या सारख्या व्यक्तिदर्शी साधनांचा परिचय त्याना घडला. हेही नसे थोडके.

अनुवादित चरित्रांचे विषय पाहिले तर त्यात राजेरजवाडे, योद्धे, शोधक, प्रवासी, तत्त्वज्ञ, विचारवंत, राजकारणी इत्यादी विविध क्षेत्रातील लोकांचा समावेश झालेला दिसतो. . धार्मिक क्षेत्र सोडून अन्य क्षेत्रातील व्यक्तींना इथे प्राधान्य मिळाले आहे, ही गोष्ट मुद्दाम लक्षात घेतली पाहिजे. मात्र अनुवादकांना अभिप्रेत असलेले चरित्राचे उद्दिष्टच चुकीचे असल्यामुळे व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने चरित्रे-विषय व्यक्तीचे जीवन व व्यक्तिमत्त्व पारखून चरित्र विषयांची निवड झालेली नाही. त्यानी चरित्राकरिता स्वकीयांपेक्षा परकीयांचीच निवड केली आहे व निवड करताना तारतम्य बाळगलेले नाही. हाताला येईल त्या ग्रंथाचा अनुवाद झाला.

अनुवादाकरिता अशाच चरित्रांची वर्णी लागलेली दिसते, की ती चरित्रे बहुधा ज्या काळात पाश्चात्त्य देशात मानवाला व मानवाच्या ऐहिक जीवनाला

महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते, तेव्हा लिहिली गेली. पाश्चात्त्य चरित्रकारांना जेव्हा चरित्रविषय व्यक्तीकडे माणूस म्हणून पाहण्याची दृष्टी लाभली होती. साहजिकच प्रस्तुत कालखंडात धार्मिक क्षेत्रापेक्षा इतर क्षेत्रातील व्यक्तींची चरित्रे लिहिली गेली, आणि हे करीत असताना मराठी वाङ्मयाला पडलेला अद्भुताचा वेढा विळखा सैल झाला व मराठी चरित्रे वास्तवाकडे झुकली.

अनुवादामुळे फारसे काही साधले नसले तरी एवढे मात्र खरे, की त्यामुळे सत्यविषयक जाण निर्माण होऊन, संतचरित्रांचा अपवाद वगळता साधार चरित्र-लेखनाची प्रथा रुढ झाली व सर्वसाधारणपणे चरित्रलेखनाला चालना मिळाली. या कामी दक्षिणा प्राईज कमिटीचे प्रोत्साहन उपकारक ठरले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे नागेश विनायक बापटांनी लिहिलेल्या 'पहिले बाजीराव पेशवे' या चरित्रपर कादंबरीलाच चरित्र म्हणून बक्षीस मिळाले. दक्षिणा प्राईज कमिटीच्या विज्ञान समीक्षकांचो मूल्यविषयक जाण जिथे उणी पडते तिथे अनुवादकांना चरित्राच्या कलात्मक अंगाचे भान कसे राहावे ? स्वाभाविकच या कालखंडात चरित्रकृतींची संख्या फुगली. परंतु वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने निराशाच पदरी पडते.

**दोन चरित्र संग्रह :**

ज्यांना शुद्ध अनुवादाचे स्वरूप नाही अशा पुस्तकांचा निर्देश येथे करावयास हवा. १८५१ मधे छापलेल्या 'रोम बादशहांचा वृत्तांत' या संग्रहात एकंदर चौदा रोमन बादशहांचा वृत्तांत आहे. यापैकी सीसर (पृ. संख्या ७५) व नीरो (पृ. संख्या २८) हीच काय ती संक्षिप्त चरित्रे म्हणता येतील. बाकीच्या बारा बादशहांचे विस्कळित वृत्तांत आहेत. त्यांना व्यक्तिचित्राचेही रूप लाभलेले नाही. क्लियोपात्राच्या उधळेपणाचे वर्णन करून चरित्रकाराने येशूख्रिस्ताचे उदाहरण वाचकांच्या पुढे ठेवले आहे.' धर्मपुस्तकातील उदाहरण ह्यापेक्षा किती भिन्न आहे, हजारो लोकांस पुरेल इतके अन्न जो आपल्या एका शब्दाने उत्पन्न करावयास समर्थ होता, त्यानेही त्या सर्वांची तृप्ती झाल्यावर म्हटले की, 'चुरा चारा गोळा करून एकही कण निरर्थक जाऊ देऊ नका.' (पृ. ४३-४४). येशू ख्रिस्ताबरोबरच त्याच्या भविष्यवाद्यांचेही कौतुक केल्याशिवाय चरित्रकाराला राहवत नाही.' पुढे होणाऱ्या गोष्टी सांगाव्या म्हटल्या, तर येशू ख्रिस्ताच्या भविष्यवाद्यांनीच सांगाव्या. त्यांची भविष्य सांगण्याविषयी पराकाष्ठा होती.' ऐझाम नावाच्या ज्योतिषाचा सीसरच्या जीवनाशी काडीमात्र संबंध नव्हता. पण तो पडला ख्रिस्ताचा अनुयायी, तेव्हा त्याची माहिती प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट झाली नाही तरच नवल. 'ऐझाया नामक भविष्यवाद्याने तर पृथ्वीवर ज्या कित्येक झालेल्या गोष्टी, त्या घडून येण्याच्या पूर्वीचे शेकडो वर्षांवर आपले पुस्तकात लिहून ठेविल्या होत्या. त्याने

सैरस बादशहा जन्मायाच्या पूर्वीचे त्याचे नाव, व तो कोणत्या रीतीने बाबीलन शहर जिंकील, हे भविष्य सांगितले होते. आपल्यास भविष्य कळावे म्हणून, तो ठक जोशांसारिखा दांभिकपणाने अनुष्ठाने करीत नसे. फक्त त्याची निष्ठा मात्र ईश्वरावर असे, तेणे करून, तो भगवंताचे स्मरण करी त्या काळी त्याला भविष्य सांगावयाचे ज्ञान प्राप्त होई.' (पृष्ठ ४०–४१).

तैतस या रोमन बादशहाच्या वृत्तांतात त्याने यहुद्यांबरोबर केलेल्या लढाईच्या भीषण परिणामाचे चित्र चरित्रकाराने रेखाटले आहे. तैतसपेक्षा त्याने केलेले यहुद्यांबरोबरीचे युद्ध, युद्धामुळे यहुद्यांचे झालेले हाल आणि येशू ख्रिस्ताने वर्तविलेले भविष्य यावरच चरित्रकाराचे लक्ष केंद्रित झाले आहे. युद्धात जबरदस्त मार खाल्ल्यांवर यहुद्यांची उपासमार झाली. मेरी नावाच्या स्त्रीने स्वपुत्राचे मांस शिजवून खाल्ले, या घटनेचा चरित्रकाराने लावलेला अर्थ असा : 'हे घोर कर्म करावयास ती स्त्री कशी प्रवर्तली असेल ते ईश्वरास ठाऊक. परंतु ही गोष्ट घडण्याच्या पूर्वी चाळीस वर्षांवर ख्रिस्ताने जे म्हटले होते त्याचा इथे बरोबर संबंध आहे, त्याला क्रूसावर द्यावयास नेला तेव्हा त्याच्यामागून पुष्कळ स्त्रिया शोक करीत चालत होत्या, त्यास त्याने म्हटले की, 'यरूशालेम येथील कन्यानो तुम्ही मजकरिता रडू नका. आपल्या स्वतःकरिता व मुलांकरिता रडा.' (पृ. १६४).

धार्मिक अभिनिवेश हे या पुस्तकाचे वैगुण्य होय. तैतसच्या शिपायांनी यहुद्यांचे पवित्र देवालय जाळून टाकल्यावर यहुद्यांचे जे हाल, त्यांच्यावर जो भीषण प्रसंग ओढवला त्याची चर्चा करताना चरित्रकार लिहितो, 'सुमारे दीड हजार वर्षे होऊन गेली. यहुदी लोक सर्व पृथ्वीवर भटकत आहेत, त्यांस घरदार किंवा देश काही नाही, जर ते डोळे उघडून आपल्या कल्याणाच्या गोष्टीकडे लक्ष देत नाहीत, तर अजूनही त्यांस तसेच जातिभ्रष्ट राहावे लागेल. जर ते येशूला आपला तारणारा मानून, त्याच्या क्रूसापुढे दीनवाणेपणे पश्चात्तापाकरिता पाया पडतील, तर अद्यापही त्यांस क्षमा होईल. ईश्वराने कृपाकरून, आपले प्रिय लोकांचा पुनः अंगीकार करावा, याकरिता सर्व ख्रिस्ती लोकांनी यत्न करीत असावा व ईश्वराची प्रार्थना करीत असावी. यहुदी लोकांनी जुना करार रक्षून ठेवला, म्हणून ख्रिस्ती लोकास त्यांचे फारच आभार मानले पाहिजेत, या ईश्वराचे आज्ञेवरून लिहिलेल्या करारात, कदाचित् कोणी आपले पदरचे लिहील, म्हणून त्या लोकांनी त्या करारातील एकूण शब्द मोजून ठेवला होता, परंतु इतके करूनही, जर ते त्या पुस्तकावर भाव ठेवून त्यातील सुबोध वाचते, तर ते ज्या तारणाराची इतका काळपर्यंत अपेक्षा करीत आहेत, तो केव्हाच आला असे त्यास समजते, आणि येशू ख्रिस्ताने जे काही सांगितले होते, ते जर मान्य करते. तर ते आजतागाईत जी दुःखे भोगीत आले ती न भोगिते.' (पृष्ठ १७२). या पुस्तकाच्या

शेवटी धार्मिक अधिनिवेशाचा कळस झालेला आहे. : आरंभी ख्रिस्ती धर्म हा लहानशा खड्याप्रमाणे होता, आणि तोच आता मोठ्या पर्वतासारखा आहे, अथवा एका मोहोरीच्या कणाप्रमाणे असून पुढे त्याचा वृक्ष झाला आहे... आता ख्रिस्ती धर्माचा विस्तार होत चालला आहे, त्यावरून ख्रिस्ती शास्त्रात जे भविष्य सांगितले आहे की, सर्व मूर्तिपूजक येशू ख्रिस्ताचा धर्म घेतील, व पृथ्वीवरील एकही देश ख्रिस्ती झाल्यावाचून राहणार नाही. ते खरे होईल.' (पृ. २०५).

प्रस्तुत संग्रहात मधून मधून हरदासासारखा चरित्रकार डोकावल्यामुळे चरित्रनायकाची व्यक्ती सतत वाचकांच्या डोळ्यापुढे उभी राहण्यात अडथळा होतो. इथे व्यक्तिजीवनाचा उपयोग धर्मप्रसारासाठी साधन म्हणून झाला आहे. धर्मप्रसाराच्या हव्यासापायी चरित्रकाराने व्यक्तिचित्रणाचे परिणामैक्य गमावले आहे. हे लेखन अलिप्तपणे व्हायला हवे होते. चरित्रकाराची तटस्थाची भूमिका यथार्थ व्यक्तिदर्शनास उपकारक ठरली असती.

जनार्दन रामचंद्रजी यांनी लिहिलेले ' कविचरित्र ' हा ६२ संस्कृत कवी, ४८ प्राकृत कवी, १३ तामिळ कवी, ५० तेलंगी कवींच्या चरित्रांचा संग्रह आहे. यातल्या काहींना तर चरित्रे म्हणणेही कठीण आहे. उदाहरणार्थ उगरप्पा ढंडनाथ (पृ. ७६), पुरुषोत्तम (पृ. १०१), गणिकानंद (पृ. १०१), क्षीरस्वामी (पृ. १०२), अपग्गा, मुरग्गा, वालीज, गणासंबंधर, अप्पर, माणिक्यव्यासर, सुदरर, अगस्त्य (पृ. २०८-२०९) इत्यादींच्या संबंधाने सात, आठ ओळींची माहितीपूर्ण निवेदने आहेत. एक व्यक्ती नजरेसमोर धरण्याच्या दृष्टीने ही माहिती अगदीच अपुरी आहे. एकाद्या चरित्रकोषात भरावी तशी ही माहिती आहे. पृष्ठसंख्या भरून निघण्यापलिकडे व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने यातून काही लाभत नाही.

शंकराचार्यांचे चरित्र (पृ.१-३०) हे त्यातल्या त्यात मोठे. शंकराचार्य म्हणजे हिंदुधर्मीयांना अत्यंत पूज्य अशी विभूती. त्यांच्या चरित्रातून एक आदर्श विभूती उभी करण्याचा प्रयत्न व्हावा हे ओघानेच आले. या चरित्रकाराचे नायकाला अनुकूल असे काही पूर्वग्रह आहेत. त्यामुळे तो आचार्यांकडे तटस्थपणे पाहूच शकत नाही. शिवाय, अति दूरच्या काळातील नायकाची निवड केल्यामुळे चरित्रकाराला माहितीच्या अभावी पुराणांवर व दंतकथांवर भिस्त ठेवावी लागली आहे. आचार्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती आदर्शाचे वलय उभे करताना चमत्कार, अवास्तव घटना आणि अद्भुताचा उपयोग या चरित्रात झालेला आहे. जे जसे घडले तसे ते या चरित्रात घडत नसावे किंबहुना ते घडविले आहे असे वाटत राहते. आचार्यांचे व्यक्तिमत्त्व इतके आदर्श आणि म्हणूनच अवास्तव झाले आहे, की यातून जिवंत व्यक्ती व्यक्त न होता एक आदर्श पुतळा आकार घेतो.

जे शंकराचार्यांच्याबद्दल तेच इतर अनेक कवींच्या बाबतीत म्हणता येईल.

या सर्वच व्यक्ती आदर्श आहेत आणि म्हणूनच अवास्तव आहेत. यातले एकही व्यक्तिमत्त्व मनाला भिडत नाही. या सर्वच व्यक्तिचित्रणातली कृत्रिमता व सांकेतिकता जाणवते. साऱ्याच व्यक्ती केवळ कळसूत्री बाहुल्याप्रमाणे वागणाऱ्या वाटतात, त्यात जीव भरत नाही. या चरित्रांचे नाते महीपतीच्या संतचरित्रांशी अधिक जवळचे आहे असे म्हणावे लागते.

**संत चरित्रे :**

हनुमंत स्वामींनी लिहिलेले श्री रामदासस्वामींचे चरित्र हे एक भक्ती भावाने लिहिलेले चरित्र आहे. प्रस्तुत ग्रंथात चरित्रनायक वाचकांच्या डोळयापुढे अशा पद्धतीने उभा केला आहे, की वाचकांना त्याच्या आध्यात्मिक सामर्थ्याचा प्रत्यय यावा. या ग्रंथाच्या पानापानातून चमत्कारांची इतकी नोंद झाली आहे, की क्षणभर या चमत्कारातच रामदासांचे सामर्थ्य सामावलेले आहे की काय, असे वाटावे. साहजिकच समर्थांनी महाराष्ट्राला शिकविलेला व्यवहारवाद आणि तत्कालीन, सामाजिक, राजकीय प्रश्नांची सोडवणूक करण्याकरता त्यांनी केलेले मार्गदर्शन या गोष्टींना या ग्रंथात त्यामानाने फारच अल्प महत्त्व लाभले आहे. त्यामुळे हे व्यक्तिचित्रण काहीसे एकांगी झाले आहे

चरित्रकाराचे सारे अवधान रामदासांवर केंद्रित झाले आहे. रामदास आणि रामदासांशी संबंधित व्यक्तींचेच संदर्भ चरित्रात येत राहतात. घटितांची मांडणी कालक्रमानुसारी असल्यामुळे या जीवनकथेला प्रवाहित्व लाभले आहे. मात्र चरित्राच्या प्रारंभी संक्षिप्त चरित्र देऊन त्यात नायकाचे कर्तृत्व वाचकांच्या निदर्शनास आणून दिल्याने वाचकांची जिज्ञासा मारली जाते याचे चरित्रकाराला भान उरलेले नाही. चरित्रात सत्य आणि कल्पित यांचे असे काही बेमालूम मिश्रण झाले आहे, की या कृतीत कलेचे अंग जोपासले गेले आहे. चरित्राने सत्याची मर्यादा ओलांडून कलात्मक पातळी गाठल्यामुळे चरित्र वाचनीय होते, पण विश्वसनीय होत नाही. चमत्काराचे प्राबल्य, अवास्तव अद्‌भूत घटनांचा वापर आणि अतिशयोक्तीचा आश्रय यामुळे चरित्राची रंजकता वाढली आहे खरी, पण त्यामुळेच या चरित्राला वास्तवाची बैठक उरली नाही. चरित्रकार वर्ण्यविषयाशी असा काही एकरूप झाला आहे, की अतर्क्याचे दर्शन घडविताना निर्माण होणारी भावविवशता आणि अतर्क्याच्या दर्शनातून येणारी अद्‌भुतता त्याला टाळता आली नाही. वाचकाला कल्पनारम्य वातावरणात नेऊन रमविण्याचे सामर्थ्य या चरित्राच्या अंगी निश्चित आहे.

रामदासांच्या मृत्यूनंतरचा चरित्राचा विस्तार व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

वास्तवाची बैठक सोडून रामदासांचे अलौकिकत्व प्रस्थापित करणारे चरित्र म्हणून पारंपारिक संतचरित्रात ते चपखल बसते.

रामचंद्र पांडुरंग आजरेकर यांनी लिहिलेल्या विष्णुबुवा ब्रह्मचारी(१८७२). या चरित्राच्या प्रारंभीच अद्‌भुताची छाया पडली आहे. जगदंबेचे प्रकट होणे. अंतर्धान पावणे, स्वप्नात येऊन, ' अरे विष्णु, क्षुधेने म्लान का झालास ? कालिका कुंडावर दक्षिणेच्या बाजूस मोठी शिला आहे, तिच्याजवळ कमलपत्राप्रमाणे वाटोळ्या लाल शिरांचा एक लहानसा वृक्ष आहे. तो उपटून पहा म्हणजे खाली लहानसा कंद मिळेल. तो खा, म्हणजे क्षुधा, तृषा, ग्लानि वगैरे यांची तुला बाधा होणार नाही.' (पृष्ठ १०-११) असे म्हणून क्षुधाशांतीची व्यवस्था करणे, आकाशवाणी होऊन लोकात जाऊन उपदेश करण्याचा आदेश मिळणे. दत्तात्रयाने प्रकट होऊन दर्शन देणे व अंतर्धान पावणे आदी घटनांनी प्रारंभीचा भाग व्यापला आहे. वेदोक्त धर्माचा कर्ता, रक्षणकर्ता अभिमान धर्ता, ईश्वरच आहे. या मताचा प्रसार करण्याकरिता ते फिरू लागले तेथपासून चरित्राला वास्तवाची बैठक लाभली आहे.

अवघ्या ६२ पृष्ठात आटोपलेल्या या ग्रंथाची रचना विस्कळित आहे. चरित्रकाराने स्वत:कडे केवळ निवेदकाची भूमिका घेतली आहे. इथे चरित्रनायकाच्या गुणदोषांची नोंद होते, पण घटितांच्या गुंफणीतून एक सलग व्यक्तिमत्त्व उभे राहत नाही. दोन व्यक्तिदर्शी घटिते सोडल्यास चरित्रकाराचा सारा भर निवेदनावर आहे. त्यामुळे प्रस्तुत चरित्रात विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचे व्यक्तिमत्त्व आकार घेत नाही.

रामचंद्र पांडुरंग आजरेकर शास्त्री यांना १८७२ मधे चरित्र नि:पक्षपातीपणे लिहायचे असते याची जाणीव होती. ही गोष्ट इथे मुद्दाम लक्षात घेतली पाहिजे. चरित्र नि:पक्षपातीपणे लिहिण्याचा निश्चय त्यांनी प्रस्तावनेत व्यक्त केला आहेच. वेदोक्त धर्माचा प्रसार करण्याकरिता ते कलकत्यास गेले असता महामारीचा उपद्रव होऊन जुलाब होऊ लागले व ओकारीही सुरू झाली. तेणे करून अतिशय ग्लानी आली व तृषा तर मी म्हणते. सेवेस मनुष्य नाही. एकतर परदेश, तशात परकीय भाषा, स्वत: आजारी अशा संकटसमयी सेवेकरिता खानु या नावाचा मुसलमान जातीचा मनुष्य दररोज एक रुपया मोल ठरवून ठेवला होता. त्याने स्वयंपाक, पाणी वगैरे सर्व कामे करावी अशी बोली ठरविली होती. त्याप्रमाणे त्याच्या हातून जेवण, खाण, पाणी, चहा वगैरे बंदोबस्त होऊन त्याचा फारच उपयोग झाला. पुढे कलकत्त्याहून जलमार्गाने मुंबईस येत असतांना बोटीचे यंत्र बिघडले. दुरुस्तीकरिता आठ दिवस लागले. दरम्यान शिधासामग्री संपली. तेव्हा ब्रह्मनिष्ठ विष्णुबुवांच्या पुढे ब्रह्मांड उभे राहिले. नाइलाजास्तव किरिस्ताव बबर्जीच्या हातचे खाल्ले. आणि मुंबईस आल्यावर नि:शंकपणे घडल्या गोष्टी सर्वांना सांगून टाकल्या. समाधानाची गोष्ट अशी की, चरित्रकारानेही या भ्रष्टा-

चाराच्या बाबतीत लपवाछपवी केली नाही. मात्र ही तटस्थाची भूमिका अखेरपर्यंत टिकली नाही. शेवटी शेवटी या चरित्रातले गौरवाचे प्रस्थ जाणवल्याशिवाय राहत नाही.

हे चरित्र बोजड भाषाशैलीमुळे बरेच अनाकर्षक झाले आहे.

पांगारकरांचे तुकाराम चरित्रातले तंत्र जरी पाश्चात्त्य घाटणीचे वाटले तरी अंतर्गत भाव तोच तो पारंपारिक महीपतीने घडविलेला आहे. इथे चरित्र उभे राहते ते आत्मचरित्राच्या आधाराने. पांगारकरांनी तुकारामाच्या अभंगाचा प्रस्तुत चरित्र लिहिताना भरपूर उपयोग करून घेतला आहे. 'तुका म्हणे होये मनासी संवाद । आपला वाद आपल्यासी ' (पृष्ठ २९०) तुकारामाचे अभंग हे असे आत्मगत भाषणासारखे आहेत. तुकोबांचे अभंगातून व्यक्त होणारे आत्मचरित्र हाच या चरित्राचा आधार आहे. आध्यात्मिक विकासाच्या विविध टप्प्यातून स्वरूपसाक्षात्काराप्रत जात असताना झालेली तुकारामाच्या मनाची जडणघडण चरित्रकाराने कौशल्याने टिपली आहे, ती अशा आत्मप्रकटीकरण करणाऱ्या अभंगांतूनच. आत्मनिवेदनाचा गोडवा या चरित्राला चहूअंगांनी व्यापून राहिला आहे. आत्मप्रकटीकरण करणारे अभंग या चरित्राच्या पानोपानी इतके विखुरले आहेत, की हे चरित्र परजिवी वाटावे. परजिवी अशा अर्थाने, की या चरित्राला आत्मचरित्राचा आधार नसता तर अनेक आपत्तीमुळे विरक्त झालेला, केवळ उपकारापुरता उरलेला, स्वरूपसाक्षात्काराकरिता तळमळणारा, तो दृष्टिपथात येत नाही म्हणून संतापणारा आणि असाध्य ते साध्य झाल्यावर परमेश्वराला योग्यता नसताना उगाचच त्रास दिल्याबद्दल ओशाळणारा, रामेश्वरभटासारखा दुर्विनीत सांप्रदायिक झाल्यावर त्याला देवासारखा मानणारा तुकाराम उभा करणे कितपत शक्य झाले असते याबद्दल शंका आहे कारण, इथे आत्मचरित्रात्मक घटकाचे अस्तित्व प्रभावी ठरले आहे.

या पुस्तकाचे तंत्र मळलेली वाट जोडणारे असले तरी संप्रदायनिष्ठा आणि भक्तिभाव जुनाच आहे. पांगारकर चरित्रनायकाशी असे काही तादात्म्य पावतात, की त्यांच्या रसाळ पण सत्यान्वेषणाबद्दल फारशी तमा नसलेल्या लेखनाचे नास्तिकांचा निषेध हे एक प्रमुख उद्दिष्ट ठरले आहे. पांगारकरांचा चरित्र नायकाकडे पाहण्याचा दृष्टीकोनच मुळात यथार्थ व्यक्तिदर्शनाला पोषक नाही. पांगारकर तुकारामाकडे पाहतात ते एक संत, आणि म्हणूनच अलौकिक विभूती म्हणून. साहजिकच तुकारामांना ते माणूस म्हणून ओळखू शकले नाहीत. तुकोबारायांनी सदेह वैकुंठगमन करून आपले विभूतिमत्त्व जगाला शेवटी दाखवून दिले असेच त्याना वाटते. सदेह वैकुंठगमनाचे त्यांनी शेवटी केलेले स्पष्टीकरण गुळमुळीत वाटते. या घटनेचा तर्कनिष्ठ अर्थ त्यांना लावता आला नाही. जाज्वल्य संप्रदायनिष्ठेमुळे संतांनी महाराष्ट्र नेभळा बनविला हे विधान खोडून काढताना त्यांच्या

लेखणीला धार येते. परमेश्वराने अभंगाच्या वह्या रक्षिल्या ही घटना 'उदकी राहिले कागद ।' या तुकोबाच्या अभंगाच्या आधारे नोंदला आहे. या वर्णनात अतिशयोक्तीचा मोह टाळून संयम राखला आहे. पण हा संयम अखेरपर्यंत टिकला नाही. चातकमंडळ या प्रकरणात तुकारामाच्या शिष्यांची माहिती देताना चमत्कारांना अग्रस्थान देऊन तुकारामाचे अलौकिक विभूतिमत्त्व अधिकच गडद रंगाने रंगविले आहे. अतीत दृष्टीचे धूसर वातावरण या प्रकरणाला व्यापून राहिले आहे.

तंत्र नवे, अंतरीचा भाव जुनाच, असे हे चरित्र आहे.

धो. बा. सहस्रबुद्धे यांनी लिहिलेल्या, 'श्री एकनाथ महाराज यांचे चरित्र' (१९२१) या ग्रंथाच्या पूर्वार्धात एकनाथांचे जीवनदर्शन घडविले आहे, तर उत्तरार्धात वाङ्मयदर्शन घडवून शिवाय नाथांचे अध्यात्म, धर्म आणि नीतिसंबंधी विचार ग्रंथित केले आहेत. हा विचार दर्शनाचा धागा जीवनदर्शनाच्या धाग्याशी पृ. १५५ वर पुन्हा जोडला आहे. रसाळ भाषा, प्रवाही निवेदन आणि मोजक्या व अचूक शब्दात रेखाटलेली प्रत्ययकारी शब्दचित्रे यामुळे तुलनेने उत्तरार्धापेक्षा पूर्वार्ध अधिक सरस वठला आहे. चक्रपाणी बसलेल्या घरात वैराग्याच्या वेशात प्रकट होणाऱ्या नाथांचे शब्दचित्र (पृ. ३८) जितके प्रत्ययकारी आहे तितकेच पृष्ठ ३९ वरचे वृद्धावस्थेतील चक्रपाणीचे शब्दचित्र ठसठशीत आणि रेखीव आहे, कोणत्याही प्रसंगाचे हुबेहूब प्रत्ययकारी वर्णन करण्याची हातोटी या चरित्रकाराला साधलेली आहे. त्यामुळे तो तो प्रसंग वाचकांच्यापुढे साक्षात उभा राहतो. वानगी दाखल एकनाथांच्या जलसमाधीचा वा दत्तदर्शनाचा प्रसंग सांगता येईल. चमत्काराशिवाय नमस्कार नाही म्हणूनच चमत्कारांचा समावेश प्रस्तुत चरित्रात झाला आहे. नमस्काराच्या अपेक्षेने चमत्कारांचा समावेश होतो याचाच अर्थ असा की हे लेखन होत असताना व्यक्तिदर्शनापेक्षा उद्बोधनाची दृष्टी प्रभावी ठरलेली असावी. शिवालयात झालेली आकाशवाणी, दत्तात्रयदर्शन यांसारख्या आख्यायिका व चमत्कार यामुळे चरित्राच्या रंजकतेत भर पडलीच, पण शिवाय उद्बोधनाच्या अपेक्षेने चरित्रनायकाचे दैवीकरणही साधले गेले. साहजिकच आख्यायिकांची व चमत्कारांची निवड करताना चिकित्सक दृष्टीचा अभाव दिसून यावा हे ओघानेच आले. पर्वतावर दत्तदर्शनासाठी उत्सुक झालेला एकनाथ जाळीत बसला असता त्याच्या मनात डोकावलेल्या नाना प्रकारच्या कल्पना चरित्रकाराला कशा कळल्या? इथे चरित्रकाराने कल्पनेचा आधार घेतलेला दिसतो. चरित्राला इथे कलेचा स्पर्श होतो. चरित्र वाचनीय होते, पण त्याकरिता वास्तवाची किंमत मोजावी लागते. उत्तरार्धाच्या पहिल्या भागात एकनाथांच्या वाङ्मयाचे स्वरूप विशद करताना त्यांच्या ग्रंथातील उतारे उद्धृत केले आहेत. त्यामुळे चरित्रग्रंथाचे वाङ्मयीन रूप अधिकच रेखीव होते. संत म्हटला म्हणजे तो अमानुष कोटींतला असलाच पाहिजे,

या संतचरित्रांच्या पारंपारिक संकेताला चिकटून राहिलेले, परंतु सहृदयतेनें लिहिलेले असे हे एक चरित्र आहे.

रामानंद बीडकर महाराजांनी ज्या क्षणी त्यांच्या जीवनाच्या दुसऱ्या पर्वात म्हणजेच अध्यात्मात प्रवेश केला त्याच क्षणी त्यांचे जीवन आंतरबाह्य पार बदलून गेले. याक्षणापूर्वीच्या जीवनाचे चित्रण आधुनिक चरित्रलेखनाशी मिळतेजुळते आहे, तर त्या नंतरच्या चित्रणाचा आंतरिचा भाव पारंपारिकच राहिला. नव्या जुन्याची सांगड हे ल. ग. बापट यांनी लिहिलेल्या त्यांच्या चरित्राचे वैशिष्टय आहे.

संतचरित्रात व्यक्तिदर्शनाची दृष्टी मुळातच कमी. पण या चरित्रात पहिल्या ४९ पृष्ठांत ती प्रभावी ठरली आहे. इथे चरित्रनायक जसा होता तसा तो चित्रित झाला आहे. या भागातले चरित्रलेखन त्रयस्थपणे झाले आहे. हा त्रयस्थ खरोखरीच त्रयस्थ आहे. त्रयस्थाचे ते सोंग नव्हे. एरव्ही पुढील मजकूर लिहायला चरित्रकार धजला नसता. चरित्रनायकाचे वडील बळवंतराव ह्यांचा बीडचे देशपांडे म्हणजे त्यांचे मामा ह्यांच्या मुलीशी विवाह झाला. परंतु ती मुलगी अर्धनारी असल्यामुळे हा विवाह होऊन न झाल्यासारखाच झाला. (पृष्ठ ५) किंवा बळवंतराव किल्ल्याची तपासणी करत असता शिंपी जातीच्या सुस्वरूप तरुण स्त्रीने ह्यांचे मन ओढून घेतले. ही स्त्री वाईट चालीची निघून दागिन्यांची अफरातफर केल्याच्या गुन्ह्यावरून चुरशीने त्या किल्ल्यात कैदी म्हणून नुकतीच दाखल झाली होती. तिची बळवंतराव ह्यांनी विचारपूस करून तेच किल्ल्याचे मुख्य अधिकारी असल्यामुळे त्यांनी तिची बंधमुक्तता केली व तिला आपल्या पदरी ठेवून घेतले. ...ह्या शिंपी जातीच्या स्त्रीपासून नाम्या व गण्या असे दोन मुलगे झाले. हिचे नाव पार्वती असे होते. परंतु तिला 'पारी' असे म्हणून हाक मारण्याची वहिवाट असे. पृ. ६–७) हे झाले चरित्रनायकाच्या वडिलांसंबंधाने. खुद्द चरित्रनायकासंबंधानेही निर्भीड सत्यकथन करायला चरित्रकाराने मागेपुढे पाहिलेले नाही एका वारांगनेच्या नेत्रकटाक्षरूपी जाळ्यात ते सापडले. भ्रमर जसा स्वैरवृत्तीने नित्य कमलांतील मकरंद सेवनांत दंग होऊन प्रेमपाशाने बंदिखान्यात पडतो व त्याला स्वकीयजनांचे विस्मरण पडते, तद्वतच महाराजांची स्थिती झाली. त्या त्यांच्या वर्तनाने व्यापार बंद पडला व काही कालाने ह्यांची स्थिती खालावत चालली. (पृ. २६–२७).

संतांना अलौकिकपद प्राप्त करून देण्याच्या भरीस पडल्यामुळे चरित्रात सत्याची बूज राखली जात नाही. पण इथे महाराज जे जे बोलले ते अगदी त्यांच्याच शब्दात पदरचा एकही शब्द न घालता लिहून ठेवले आहे. वडील निवर्तल्यावर गणपतराव डॉक्टर यांनी त्यांना आपणाकडे ठेवून घेतले. हे नाटकाचे फार शोकी होते. हे मूल कदाचित नाटकाच्या उपयोगी पडेल म्हणून ते त्यांना आपल्याबरोबर वरचेवर नाटकाला घेऊन जात असत. एके वेळी तर त्यांनी चरित्रनायकाच्या पायात तोडे घातले. डोळ्यात काजळ घातले व नाकाला नथ लावली व पातळ

नेसावयास दिले तर स्त्रीपार्ट मोठा मारू शोभेल असे म्हणाले. तेव्हा 'खालचे आधी छाटून टाकावे लागेल' असे महाराजांनी स्पष्ट उत्तर दिले. (पृ ११-१२)

संतांचे चरित्र कसे लिहावे याची एक वेगळी पण अचूक वाट या चरित्राने दाखविली आहे. प्रस्तुत चरित्रात या विशिष्ट भागाचे चित्रण करताना चरित्रकार नायकाकडे माणूस या दृष्टीने पाहतो. बीडकरांच्यातला माणूस इथे चरित्रकाराने ठसठशीत उभा केला आहे हे चरित्र वाचत असताना आपण कुणा संताचे चरित्र वाचत आहो असे मुळी वाटतच नाही. चरित्रकारानेच मधून मधून महाराज असा त्यांचा उल्लेख करून ही जाणीव जागती ठेवली आहे.

बीडकरांच्या अध्यात्मिक जीवनाचा प्रारंभ होऊन नर्मदा प्रदक्षिणेला सुरुवात झाल्यावर मात्र हे चरित्र पारंपारिक संत चरित्राच्या वळणावर जाते. येथून पुढे नवी वाट सोडून जुन्या मळलेल्या वाटेने वाटचाल सुरू होते. प्रदक्षिणेचे वर्णन करताना अद्भुताचा आश्रय घेऊन लेखकाने या चरित्राला पारंपारिक चरित्रांच्या पंक्तीला बसविले आहे. चमत्कारांचा समावेश झाल्याबरोबर या चरित्राचा वास्तवाचा आधार सुटतो. चरित्र अद्भुतरम्य कादंबरी इतकेच मनोवेधक होते. बीडकरांच्या आध्यत्मिक विकासाची दिशा दाखवणाऱ्या विविध प्रसंगांची नोंद इथे झाली आहे, त्या प्रसंगाच्या वर्णनातून त्यांचे आध्यात्मिक सामर्थ्य वाचकांच्या लक्षात यावे हाच हेतू मनाशी धरलेला आहे. या कामी चमत्कारांना वेठीशी धरले आहे. इथे भक्तिभावाचा निर्मळ झरा झुळझुळतो. नैतिक उद्बोधनाचा सुगंध दरवळतो. हा ग्रंथ वाचीत असताना वाचकांचे अंत:करण एका मंगल, तेजोमय व पवित्रवातावरणात नकळत प्रवेश करते. संत आपल्या आध्यात्मिक अनुभूती टिपून ठेवत नाही, ही चरित्रकारांच्या दृष्टीने फार मोठी अडचण आहे. बीडकरांनी त्यांच्या आध्यात्माच्या आंतरिक विकासाची झेप दर्शविणाऱ्या स्वानुभूती त्यांच्याच शब्दात लिहून ठेवल्या असत्या व त्यांचा उपयोग चरित्रकाराला करता आला असता, तर या चरित्रातील फार मोठी उणीव दूर झाली असती. चमत्कारावर विसंबून राहण्याची आवश्यकताच उरली नसती. लेखन वस्तुनिष्ठ पद्धतीने होऊन या चरित्राचे वेगळेपण कदाचित अखेरपर्यंत टिकविणे शक्य झाले असते. प्रस्तुत चरित्रात बापटांना पारंपारिकतेची कोंडी पूर्णपणे फोडता आली नाही, तरी आपल्या वेगळेपणामुळे हे चरित्र संतचरित्रात उठून दिसते.

संतचरित्रकारांची मानवाकडे आणि मानवाच्या जीवनाकडे पाहण्याची दृष्टीच यथार्थ व्यक्तिदर्शनाला पोषक नाही. त्यांनी मानवाला आणि मानवाच्या जीवनाला महत्त्व दिले नाही. या आयुष्यात काही संपादन करावयाचे असेल तर ते फक्त परलोकसाधन, ही त्यांची भूमिका असल्यामुळे देवाच्या खालोखाल देवाच्या भजनी लागलेल्या देवमाणसांची, साधुसंतांची चरित्रे मराठीत लिहिली गेली. साहजिकच 'वाटे चरित्र त्यांचे आपण काही तरावया गावे' म्हणून ती

लिहिली गेली. या सर्व संतचरित्रांच्या निर्मितीमागची प्रेरक भूमिका उद्बोधनाची मुख्यतः श्रद्धाळू भक्तिभावाची आहे.' काटेकोर सत्यकथनापेक्षा एकांगी भाविकतेवर त्यांचा सारा भर.' साधुसंत अतिमानुष कोटीतले अशी त्यांची दृढ श्रद्धा त्यामुळे ऐकीव दंतकथांवर विसंबून ही चरित्रे लिहिली गेली. डोळसपणे पाखड निवड अशी झालीच नाही. अर्थात अत्यादराच्या भावनेमुळे अद्भुतता आणि आपुलकीच्या प्रेमामुळे काव्यात्मकता हे या चरित्रांचे दोन ठळक विशेष आढळतात. त्यामुळे या चरित्रांना वाङ्मयीन रूप लाभते, त्यांची रंजकता वाढते. ती वाचनीय होतात पण विश्वसनीय होत नाहीत. संतांच्या चरित्रात संप्रदायनिष्ठा, भक्तिभाव आणि चमत्कार यांच्या जोडीला परसंप्रदायदूषणही आलेच. या चरित्रांचे जुने आदर्श आजही अनुसरलेले दिसतात. क्वचित् कुठे पदवीधरांनी लिहिलेल्या ग्रंथांचे तंत्र पाश्चात्त्य वळणावर गेले तरी अंतर्गत भाव महिपतीने घडविलेलाच दिसतो.

## ऐतिहासिक चरित्रे

इंग्रजी शिक्षणाच्या संसर्गाने जी सामाजिक, राजकीय पुनर्घटना सुरू झाली तिचे निश्चित परिणाम ३०।४० वर्षांच्या आतच दिसू लागले. राष्ट्रवादाचा उदय हा मराठी चरित्रवाङ्मयास उपकारक ठरलेला एक परिणाम, उपकारक अशा अर्थाने की, त्यामुळे आपल्या सांस्कृतिक परंपरेचे पुनरुज्जीवन करणे व मूल्यमापन करणे याची स्फूर्ती होऊ लागली. इतिहासाबद्दलची जिज्ञासा उत्पन्न होऊन, संशोधनाला चालना मिळाली. आपल्या इतिहासाचा इंग्रजी लेखकांना विपर्यास करताना पाहून स्वाभिमानी विद्वान अस्वस्थ झाले. १८६७ साली नीलकंठराव कीर्तने यांनी ग्रँड डफच्या इतिहासावर प्रतिकूल टीका केली. १८७४ मध्ये विष्णुशास्त्र्यांनी 'इतिहास' या विषयावर लिहिलेल्या मार्मिक नि विचारप्रवर्तक लेखाने तत्कालीन मराठी सुशिक्षितांमध्ये इतिहासाचे वाचन व संशोधन या विषयाची आस्था निर्माण केली. १८७८ मध्ये शाळिग्राम, साने, मोडक आणि चिपळूणकर यांनी 'काव्येतिहाससंग्रह' 'मासिक काढले आणि त्यातून साने यांनी संपादलेल्या बखरी प्रसिद्ध होऊ लागल्या. स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा यांचा अभिमान जसजसा वाढू लागला, न्यूनगंड नाहीसा होऊन आत्मविश्वास जसजसा बळावत गेला, तसतशी पारतंत्र्याच्या निराकरणाला पोषक होईल अशी देशाभिमानाची भावना जनमनांत प्रज्वलित होत राहिली. या प्रेरणेमुळे ऐतिहासिक संशोधनाद्वारे उपलब्ध झालेल्या तपशीलाआधारे लेखन करणारे नवीन चरित्रकार निर्माण झाले आणि त्यांनी इतिहास प्रसिद्ध व्यक्तींची चरित्रे लिहिण्यास सुरुवात केली.

ऐतिहासिक चरित्रांची ही शाखा पुढे चांगली पोसली गेली. १८७७ मध्ये शंकर तुकाराम शाळिग्राम यांनी 'बापू गोखले' यांचे चरित्र लिहिले. शाळिग्राम यांनी स्वाभिमानी राष्ट्रवादाच्या भूमिकेवरून केलेले हे लेखन, साहजिकच त्या

भूमिकेशी निगडित असलेल्या स्फूर्ती देणे या उद्दिष्टांत अडकून पडले आहे. चरित्रांचा उपयोग स्फूर्ती निर्माण करण्यासाठी होतो अशी त्यांची सरळ स्वच्छ भूमिका आहे. साहजिकच बापू गोखलेंचे व्यक्तिमत्त्व चित्रित होताना ऐतिहासिक पार्श्वभूमी आवश्यक होती. श्री. शाळिग्राम यांनी ऐतिहासिक पार्श्वभूमी रेखाटली, पण आवश्यक तेवढीच, आटोपशीर. विस्तृत ऐतिहासिक पार्श्वभूमी रेखाटण्याचा मोह एखाददुसरा अपवाद वगळता त्यांनी कटाक्षाने टाळला आहे. मुलूख हाताखाली घालावा ही बापूंची मनीषा पारंपारिक होती. हे सांगण्याकरिता तब्बल पाच पाने खर्ची घातली आहेत. (पृ. १६–२०) भोसले, शिंदे, होळकर यांच्याशी अजंठ्यास झालेल्या लढाईशी बापू गोखलेंचा जितका संबंध तितकीच पार्श्वभूमी चित्रित झाली आहे. (पृष्ठ १२). सर्जेअंजन गावी इंग्रजांच्या व शिंद्यांच्या १७२५ सालातील तहाविषयीचे तपशीलवार निरूपण शाळिग्राम यांनी कटाक्षाने टाळले आहे. व्यक्ती आणि पार्श्वभूमी यामधला तोल सांभाळण्याचा आटोकाट प्रयत्न करूनही या ऐतिहासिक पार्श्वभूमीतून बापू गोखलेंचे व्यक्तिमत्त्व सुस्पष्ट आकार घेत नाही. याचे आणखी एक कारण या चरित्राची रचनाच सदोष आहे. चरित्रकाराने प्रस्तुत चरित्र दोन भागात विभागले असून जवळजवळ १३० पृष्ठे युद्धविषयक घटनांनी व्यापलेली आहेत. या घटनांची कोरडी निवेदने सारखी पुढे पुढे सरकत राहतात. या घटनांतून बापू गोखले पराक्रमी असल्याची जाण निर्माण होते, परंतु बापू गोखलेंचे व्यक्तिमत्त्व सलगपणे व संपन्नपणे वाचकांच्या डोळ्यासमोर उभे राहणे जड जाते, याचे कारण बापू गोखलेचे रणांगणाशी निगडित जीवन व्यक्त होत असताना माहितीपूर्ण निवेदनावर इथे भर दिलेला आहे. व्यक्तिदर्शनाचे सामर्थ्य त्यात नाही. शाळिग्राम यांनी चरित्राकरिता निवड केली ती दूरच्या काळातील नायकाची. साहजिकच बखरीसारख्या दुय्यम साधनांवर त्यांना अवलंबून राहावे लागले आहे. कागदोपत्री पुराव्यावर विसंबून राहिल्यामुळे चरित्र नायकाच्या दैनंदिन खाजगी जीवनातील सूक्ष्म तपशील त्यांना उपलब्ध झाला नाही. आणि जो उपलब्ध झाला तो इतका अपुरा, की एक व्यक्ती नजरेसमोर आणण्याच्या दृष्टीने तो पुरेसा उपयोगी पडत नाही. हा तपशील मूळ निवेदनाशी एकरूप होणे आवश्यक होते. पण शाळिग्राम यांनी हा तपशील मूळ निवेदनापासून वेगळा काढून १३० पृष्ठांनंतर अवघ्या ११ पृष्ठांत नोंदला आहे. त्यामुळे प्रस्तुत ग्रंथात चित्रित होऊ पाहाणाऱ्या बापू गोखलेंच्या व्यक्तिमत्त्वाला सुघटित, सुस्पष्ट आकार प्राप्त होत नाही.

प्रस्तुत चरित्रात शाळिग्राम सारवासारव करण्याचा प्रयत्न करीत नाहीत. बापू गोखले पराक्रमी व स्वामीभक्त होते. पण मुत्सद्दी नव्हते आणि उतावळेही होते. परशुराम श्रीनिवास प्रतिनिधीच्या स्त्रिया दोन होत्या असे असूनही त्यांनी

एक तेलीण जवळ ठेवली होती. बाजीरावाच्या संदर्भात ते लिहितात. ' हे महाराज राज्यावर येताच ' वडिलांचे हातचे चाकर, त्यास न मिळे भाकर ' अशी जुन्या थोर थोर प्रधानांची अवस्था करून टाकली.' (पृष्ठ ७०) सत्यदर्शन ही या चरित्राची जमेची बाजू म्हणता येईल.

शाळिग्राम मधून मधून लैनीवर, घरवटना, जाफता यासारखी पेशवेकालीन शब्दांची रूपे वापरतात.

भिकाजी घोडदेव निगुडकर यांनी लिहिलेले ' परशुराम भाऊ पटवर्धन ' यांचे चरित्र (१८८२) ही एक फसलेली कृती आहे. या लेखकावर व्यक्तीपेक्षा इतिहासाचा पगडा अधिक आहे. व्यक्तीच्या संदर्भात माहिती देता देता तो काळ चरित्रकाराच्या नजरेसमोर जिवंत उभा राहतो आणि चरित्रातून आकार घेत जातो. वास्तविक इथे चरित्रनायकाच्या आप्तांची माहिती देण्याकरता रेखाटलेली पार्श्वभूमी आटोपशीर आहे. पण पुढे चरित्रकारातला इतिहासकार प्रबळ होतो आणि परशुरामभाऊंचा ज्या ज्या लढायांशी संबंध आला त्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी रेखाटताना घटनांच्या माहितीपूर्ण निवेदनात भाऊंचे व्यक्तिमत्त्व झाकले जाते. एकंदरीत या चित्रणात व्यक्तीपेक्षा काळ प्रभावी ठरतो. कोरड्या ऐतिहासिक तपशीलातून तत्कालीन इतिहास उभा राहतो. पण भाऊंची व्यक्ती इतिहासाच्या पडद्याआड अव्यक्त राहते. इथे घटनांचे निवेदन करताना केवळ माहिती पुरविण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे व्यक्तिदर्शनाला पुरेसा वाव मिळत नाही. कित्येकदा निगुडकर घटनांच्या द्वारे चरित्रनायकाच्या मनोभूमीकेवर प्रकाश टाकण्याची संधी वाया दवडतात. परशुरामभाऊंच्या पुत्राचा लढाईत पराभव करून कोल्हापूरकरांनी केलेली मानहानी भरून काढताना भाऊंच्या मनाची झालेली तगमग समर्थपणे उभी राहात नाही. नाना फडणीसानी रचलेल्या कारस्थानाची भाऊंना नीटशी कल्पना आली नाही.इथे भाऊंच्या मनोभूमिकेवर प्रकाश टाकण्यास भरपूर वाव होता. पण इथेही केवळ माहितीपूर्ण निवेदनाने काम भागविले जाते. त्यामुळे भाऊंचा सरळ स्वभाव व मानवी स्वभावाबद्दलचे अज्ञान वाचकांच्या मनावर ठसविण्याची एक सुरेख संधी वाया जाते. चरित्रकाराने असा व्यक्तिदर्शी तपशील मुख्य कथाभागापासून वेगळा काढून शेवटी उपोद्‌घातात दिला आहे. भाऊंची स्वामी कार्याविषयीची तत्परता, भूतदया, सरळस्वभाव, अंगिकृत कार्यातली चिकाटी, सहवासातील लोकांशी मनमोकळेपणाची वागणूक, हाताखालच्या सैनिकांसंबंधीची आत्मीयता इत्यादी व्यक्तिविशेष उपोद्‌घातात एकत्र नोंदून चरित्रकाराने काम साधले तेच समजत नाही. असा व्यक्तिदर्शी तपशील फुकट घालवल्यामुळे आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीला अवास्तव महत्त्व दिल्यामुळे मुख्य कथाभागात भाऊंचे सलग व्यक्तिमत्त्व आकार घेत नाही.

प्रस्तुत चरित्रात ऐतिहासिक ग्रंथाचा व कागदपत्रांचा साधन म्हणून उपयोग केला आहे. कोणती माहिती कोणाकडून मिळाली याचीही नोंद चरित्रकाराने निवेदनाच्या ओघात केली आहे.

चरित्रातला मिया मूठभर आणि त्याला इतिहासाची दाढी हातभर, असे हे चरित्र आहे.

द. व. पारसनीस यांनी लिहिलेले 'महाराणी लक्ष्मीबाई साहेब ह्यांचे, चरित्र' (१८९४) प्रमाणबद्ध रचनेचा उत्कृष्ट नमुना आहे. हे लेखन इतिहासाच्या दडपणाखाली झालेले नाही. लक्ष्मीबाईच्या व्यक्तिमत्त्वाचा कस ज्यात उतरतो अशा ऐतिहासिक घटना एकूण चार : (१) १८५७ सालचे बंड उद्भवल्यानंतर झाशीत ब्रिटिशांचे शासन उरले नाही, त्या संधीकाळात ओरछाचा दिवाण नथेखा याने झाशीवर केलेला हल्ला. (२) झाशीची राणी बंडात सामील झालेली आहे, अशा समजुतीने ब्रिटिशांनी केलेला हल्ला. (३) काल्पीची लढाई. (४) आणि ग्वाल्हेरचे अखेरचे युद्ध. लक्ष्मीबाईचे व्यक्तिमत्त्व प्रकट होते ते संस्थान खालसा झाल्यानंतर. ब्रिटिशांनी संस्थान कोणत्या पद्धतीने खालसा केले हे वाचकांच्या ध्यानी यावे म्हणून योग्य त्या ऐतिहासिक पुराव्याआधारे उभी केलेली पार्श्वभूमी नेमकी व आटोपशीर आहे या साऱ्याच घटनांची नोंद करताना त्यांचा उलगडा होईल इतकीच पार्श्वभूमी इथे चित्रित झाली आहे. इथे घटितांची उधळमाधळ झालेली नाही. रेखीव व आटोपशीर पार्श्वभूमीमुळे लक्ष्मीबाईवर परिस्थिती कशी उलटलेली होती, किंबहुना परिस्थितीने खलपुरुषाचे रूप कसे धारण केले होते, याची नीट कल्पना येते. उलटलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीतून कोंदणात हिरा बसवावा तसे लक्ष्मीबाईंचे व्यक्तिमत्त्व उठावदारपणे प्रकट होते.

बंडवाल्यांनी तीन लाख रुपयांची मागणी करून किल्ल्याला वेढा दिल्यावर लक्ष्मीबाईंनी मोठ्या युक्तीने आल्या प्रसंगातून मुक्तता करून घेतली. या प्रसंगी त्यांचे धैर्य व प्रसंगावधान कसाला लागले आहे. ओरछाच्या नथेखाला लक्ष्मीबाईंनी पाठविलेले उत्तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रखर प्रकाश टाकणारे आहे. 'मी शिवराम भाऊंची सून आहे. तुमच्यासारख्या बुंदेले लोकांस बायका करून सोडण्याचे सामर्थ्य माझ्या अंगी आहे. ह्याकरिता दूरवर विचार करून युद्धास सिद्ध व्हा.' (पृष्ठ १३८) झाशीच्या राणीने असे बाणेदार उत्तर तर दिलेच, पण नथेखाची युद्धात घमेंडही जिरविली. नथेखाविरुद्ध ओरछाच्या इतर सरदारांना राणीने ज्या युक्तिप्रयुक्तीने वळविले त्यावरून तिचा धोरणीपणा व प्रसंगावधान प्रकट होते. (पृष्ठ १४१) पुढे इंग्रजांनी झाशीवर हल्ला केल्यानंतर शहराचा दक्षिण तट काबीज केला ही बातमी समजताच लक्ष्मीबाईंना सहस्त्र विंचू चावल्याप्रमाणे एकदम दुःख झाले. शहर उध्वस्थ

झालेले पाहून त्यांची जी मनःस्थिती झाली ती चरित्रकाराने अचूक टिपली आहे. हे वर्णन जितके प्रत्ययकारी तितकेच हृदयद्रावक आहे. लक्ष्मीबाईचे व्यक्तिमत्त्व परिस्थितीपुढे दडपले जाणारे नव्हते. बाजू उलटलेली असताना जिवाची तमा न न बाळगता पतंगाने दीपकावर झेप घ्यावी तद्वत रणकुंडात त्या स्वतःला झोकून देत असत. त्यांच्या झंझावाती हल्ल्यापुढे शत्रुपक्षाचा टिकाव लागणे कठीण होत असे. पण अखेरीस राणीचा अतुल पराक्रम वाया जावा असेच विधीलिखित होते. दुर्दैवाने त्यांना साथ करणारी माणसं मिळाली ती हलगर्जी, अदूरदर्शी व सर ह्यू रोज यांच्याप्रमाणे योजनाबद्ध युद्धतंत्र अवगत नसलेली. बांदेवाला नबाब आपल्याच दिमाखात मिरवत असे, रावसाहेब पेशवे वरवर राणीला आदर दाखवीत असत. पण ते आपल्याच तंत्राने वागत. तात्या टोपे पराक्रमी खरे, पण त्यांच्या पराक्रमाला सर ह्यू रोज यांच्याप्रमाणे युक्तिचातुर्याची जोड नव्हती. आणि म्हणूनच राणीचा अंत ही शोकांतिका ठरते. इरेस पेटलेले शौर्य व्यर्थ गेले ही जाणीव मन अस्वस्थ करून सोडते.

राणीच्या पराक्रमाला अलौकिकाचा रंग देण्याकरिता अद्‌भुताचा वापर इथे झालेला नाही. सुदैवाने पारसनिसांना ऐतिहासिक अभिनिवेशाने झपाटलेले नाही. घटितांकडे ते अलिप्तपणे पाहू शकतात. त्यामुळे प्रस्तुत चरित्रात जे जसे घडले तशीच त्याची नोंद होते. हे एक ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे वस्तुनिष्ठ पद्धतीने लिहिलेले चरित्र आहे. झाशीचे संस्थान खालसा केल्यावर राणीने उमेश-चंद्र बानर्जी व एका युरोपिअन गृहस्थास ६०,००० रुपये देऊन विलायतेतील कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडे पाठविले. या दोघांनी जो खलिता सादर केला, त्यातील कलमे प्रस्तुत चरित्रात दिली आहेत. परंतु तेथे जाऊन त्यांनी काय कामगिरी केली, त्याची माहिती मिळत नसल्यामुळे ती दिलेली नाही व तसे पृष्ठ ९६ वर स्पष्ट नमूद केले आहे. बंडाला तोंड फुटल्यावर झाशीमध्ये ब्रिटिश अधिकाऱ्यांची जी कत्तल झाली त्यात लक्ष्मीबाईचा हात होता. या ब्रिटिश इतिहासकारांनी केलेल्या आरोपाला उत्तर म्हणून चरित्रकाराने दोन्ही बाजूंचा पुरावा सादर केला आहे व निर्णय घेण्याचे काम वाचकांच्यावर सोपविले आहे. (पृष्ठ १२१). राणी लक्ष्मीबाई इंग्रजांबरोबर युद्धास का सिद्ध झाली याचे खरे कारण चरित्रकारास देता आलेले नाही. (पृ. १७६–७७). जिथे निश्चित विधाने केलेली आहेत, तिथे तळटिपा देऊन त्यांच्या विश्वसनीयतेबद्दल पुरावा सादर केला आहे.

चरित्र विश्वसनीय व्हावे म्हणून पारसनिसांनी अत्यंत परिश्रमपूर्वक माहिती मिळविलेली आहे. कुठेही निराधार विधान करायचे नाही असे त्यांचे धोरण दिसते. राणीसाहेबांचे दत्तकपुत्र श्रीमंत दामोदरराव, राणीसाहेबांचे वृद्ध नोकर, झाशीच्या युद्धात हजर असलेले डॉ. लो व डॉ. सिल्व्हेस्टर, राणीसाहेबांच्या

सापत्न मातुश्री व बंधू, शिवाय श्री. डिग्बी इत्यादींच्याकडून मिळालेली माहिती व ऐतिहासिक कागदपत्रांचा पारसनिसांनी भरपूर उपयोग केला आहे. पृ.१९७ वर 'डेली न्यूज' मधले तात्या टोपेचे वर्णन दिले आहे. कुंचपासून दोन मैलावर झालेल्या युद्धाची हकीगत देताना सर ह्यू रोज यांच्या अहवालाचा उपयोग केला आहे. पृ. २५६.

प्रस्तुत चरित्रात साधार विवेचनाला अत्यंत चटकदार व रसाळ निवेदन पद्धतीची जोड मिळाली आहे.

पारसनीस काही ठिकाणी उपरोधाने लिहितात. तर काही ठिकाणी ब्रिटिशांना गोंजारून घेताना आढळतात. पुस्तकावर सरकारची इतराजी होऊ नये म्हणून ते जपत असावेत.

वासुदेव गोविंद आपटे यांनी अशोकासारख्या अती दूरच्या काळातील नायकाचे व्यक्तिमत्त्व अवघ्या ७९ पृष्ठात उभे करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत चरित्रात व्यक्तिदर्शनाचा प्रामाणिक प्रयत्न झालेला आहे, यात शंका नाही. तो यशस्वी झाला आहे, असे मात्र म्हणता येत नाही. याचे कारण या चरित्रलेखनाच्या काही मर्यादा आहेत. अती दूरच्या काळातील नायकाची निवड केल्यामुळे चरित्रकाराला कित्येकदा विधान करताना परस्परविरोधी पुराव्यातून नेमके सत्य हुडकून काढावे लागले आहे. काही ठिकाणी दंतकथांचा उपयोग करावा लागला आहे. काही शिवाय, चरित्रनायकाच्या जिवंत व्यक्तिमत्त्वाचा प्रयत्न येईल इतका खाजगी जीवनाचा तपशीलही त्याला उपलब्ध होऊ शकला नाही. त्यातल्यात्यात समाधानाची बाब अशी, की दंतकथांचा उपयोग सोडल्यास या चरित्रकाराने पुराव्याच्या अभावी कल्पिताचा आधार कुठेही घेतलेला नाही. जिथे पुरावा संशयास्पद असेल तिथे तळटिपा देऊन शक्य तो सत्याच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत चरित्राला लाभलेली नायकाच्या धार्मिक कार्याची पार्श्वभूमी बेताचीच आहे, व्यक्ती आणि पार्श्वभूमी यांच्या चित्रणाचा तोल इथे बिघडलेला नाही.

चरित्रकाराने पहिल्या प्रकरणातच अशोकाच्या जीवनकथेला प्रारंभ करण्यापूर्वी त्याच्या योग्यतेचे मूल्यमापन केले आहे. वास्तविक चरित्रनायकाचे जीवन वाचकांच्यापुढे ठेवल्यावर असे मूल्यमापन खुद्द वाचकानाच शक्य व्हावे. चरित्रकाराने हे काम स्वतःकडे घेतल्यामुळे चरित्राचे कथामूल्य क्षीण होते. चरित्रनायकाच्या जीवनाला कथा म्हणून काही एक मूल्य आहे, ते कोणत्याही कारणास्तव कमी होता कामा नये. चरित्रनायकाच्या जीवनकथेवर पडणारा प्रकाश मंद होता कामा नये. चरित्रनायकाच्या जीवनकथेवर वाचकांचे अवधान अखंडपणे खिळवून

ठेवण्यात चरित्रलेखनाची खरी कला आहे. निबंधात शोभण्यासारख्या मूल्यमापना-मुळे चरित्राच्या कलात्मक बांधणीला सैलपणा येतो. चरित्राला आवश्यक अशी सलगता तुटते शिवाय वाचकांची जिज्ञासा अकारण मारली जाते. त्याच कारणास्तव 'अशोकाचे लेख' या प्रकरणाचा प्रारंभीचा भाग अप्रस्तुत वाटतो. वाचकांना अशोकाचे जीवन जाणून घेण्याची जिज्ञासा असल्यामुळे कोणता शिलालेख कुठे सापडला व त्याची लांबी किती होती या कोरड्या तपशीलात वाचकांना रस असण्याची शक्यता कमीच. साहजिकच वाचकांना नायकाच्या जीवनापासून दूर नेणारा हा भाग अडगळीसारखा ठरला तर नवल नव्हे.

चरित्राचे साधन म्हणून शिलालेखांचा उपयोगही या चरित्राच्या जमेची बाजू होय. पाश्चात्त्य टीकाकारांनीही साधनांची चर्चा करताना शिलालेख जमेस धरलेले कुठे आढळले नाही. आपटे यांनी अशोकाचे व्यक्तिदर्शन घडविताना शिलालेखांचा व स्तंभावरच्या आदेशांचा कौशल्याने उपयोग करून घेतला आहे. शिलालेखातील प्रथमपुरुषी निवेदनांनी अशोकाच्या धार्मिक विचारांवर चांगलाच प्रकाश टाकला आहे. प्रजेच्या ऐहिक आणि पारमार्थिक कल्याणासाठी झटण्याची अशोकाची तळमळ त्याच्या चौदा आदेशातून व्यक्त होते.

इथे व्यक्तिदर्शी घटितांच्या गुंफणीतून चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्व उभे राहत नाही. व्यक्तिदर्शी घटितांच्या अभावी चरित्रकाराला निवेदनावर भर द्यावा लागतो. अशोकाच्या पराक्रमाची साक्ष देणारी एकही घटना प्रस्तुत चरित्रात आढळत नाही. उपगुप्त, वासवदत्ता, कुनाल यांच्या उपकथांमुळे मूळ कथा अधिकच रंगली आहे. दंतकथांमुळे चरित्र वाचनीय होते, हेही खरेच. पण अशोकाचे व्यक्तित्व वाचकांच्या मनःपटावर ठसठशीत आकार घेत नाही, हेही तितकेच, खरे.

'अयोध्येचे नबाब' (१८९९) या चरित्र संग्रहाचे कर्ते द. ब. पारसनीस यांनी प्रस्तुत संग्रहात व्यक्तिदर्शनाकडे लक्ष पुरविलेले नाही. चरित्रनायक कसा होता हे दाखविण्याऐवजी त्याने काय केले हे दाखविण्याकडे पारसनिसांचा कल आहे. त्यामुळे पारसनीस नुसते ऐतिहासिक घटनांचे धावते निवेदन करीत राहातात. ऐतिहासिक घटनांच्या गुंतवळीतून वर्ण्यविषय व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे रंग उजळत नाहीत. त्या त्या व्यक्तीची व्यक्तिरेखा चितारताना पारसनीस मुख्यतः ऐतिहासिक कागदपत्रांवर अवलंबून होते. ऐतिहासिक कागदपत्रांत बहुधा व्यक्ती-पेक्षा घटनांना महत्त्व लाभते. घटनांना प्राधान्य मिळालेल्या ऐतिहासिक कागदपत्रांचे जीवनदर्शनाचे सामर्थ्य तोकडे असते. कदाचित अशा कागदपत्रांवर पारसनीस अवलंबून राहिले हे त्यांच्या व्यक्तिरेखा अधुऱ्या राहण्याचे कारण असावे, प्रस्तुत संग्रहात महमदअली शहा, अमजदअली शहा या नबाबाच्या संबंधाने

इतकी त्रोटक माहिती दिली आहे, की त्यातून समर्थ व्यक्तिरेखा उभी राहत नाही. याला अपवाद नसिरउद्दिन हैदर त्याची व्यक्तिरेखा थोडाफार आकार घेते. कारण, इथे काही प्रमाणात घटनांपेक्षा व्यक्तीला महत्त्व लाभले आहे.

बाजीरावाने चिमणाजीस लिहिलेल्या पत्राचा समावेश पृष्ठ १६ वर सादतखानाच्या चरित्रात केला आहे. त्यातून सादतखानाचा बढाईखोरपणा व्यक्त होतो. परंतु असे उदाहरण दुर्मिळच.

प्रस्तुत चरित्रात सुजाउदौलाच्या जन्माची आख्यायिका ' भाऊसाहेबांच्या ' बखरीमधून घेतलेली आहे. आणि म्हणूनच ती काल्पनिक असण्याची शक्यता आहे. या आख्यायिकेचा समावेश करताना चरित्रकाराने पाहिजे तितकी चिकित्सक दृष्टी बाळगलेली नाही. अशा आख्यायिकांमुळे चरित्रातल्या वास्तवाला ढळ पोचते. उपरोक्त आख्यायिका वगळता पारसनिसांनी घटनांची निवेदने ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे केली आहेत. जिथे पुरावा उपलब्ध झाला नाही तिथे तसे स्पष्ट लिहिले आहे.

अयोध्या देशस्वरूप व प्राचीन माहिती, उपसंहार आणि स्थलवर्णन ह्या प्रकरणांत व्यक्ती आणि पार्श्वभूमी यात मेळ बसत नाही. प्रमाणबद्ध रचनेचा अभाव हे या कृतीच्या अपयशाचे एक ठळक कारण होय.

श्री. ना. के. बेहेरे यांनी लिहिलेले ' पहिले बाजीराव पेशवे ' (१९३०) हे एक बऱ्यापैकी चरित्र आहे. विशेषत: नागेश विनायक बापट यांनी लिहिलेल्या बाजीरावाच्या चरित्राच्या अपयशाच्या पार्श्वभूमीवर या चरित्राचे यश नजरेत भरण्याजोगे आहे. आपण चरित्र लिहीत आहोत याची पुरेपूर जाणीव बेहेरे यांना आहे. त्यामुळे हे लेखन वस्तुनिष्ठ झाले आहे. बापटांच्या मानाने बेहेरे यांनी ऐतिहासिक कागदपत्रांचा व खुद्द बाजीरावाच्या पत्रांचा भरपूर उपयोग करून घेतला आहे. साधार चरित्रलेखनाचा प्रामाणिक प्रयत्न म्हणून हे लेखन उल्लेखनीय आहे असे असले तरी बेहेरे इतिहासाच्या आहारी गेलेले नाहीत. इथे ऐतिहासिक पार्श्वभूमी बाजीरावाच्या व्यक्तिमत्त्वाला उठाव मिळेल इतकीच चित्रित झाली आहे. चित्रित झालेल्या पार्श्वभूमीच्या केंद्रस्थानी बाजीराव ही व्यक्ती आहे. पृष्ठ ६९ वर बारीक सारीक तपशीलासह केलेले बाजीरावाचे वर्णन प्रत्ययकारी झाले आहे. बाजीरावाने केलेल्या लढायातून त्याच्या स्वभाववैशिष्टयांवर प्रकाश पडतो. बेहेरे केवळ बाजीरावाने केलेल्या लढायांची जंत्रीवजा यादी देत नाहीत. त्या त्या लढाईच्या वर्णनातून बाजीरावाच्या युद्धनीतीवर, नाट्यमय हालचालीवर त्याच्या शौर्यावर, धैर्यावर प्रकाश फेकतात. त्या वर्णनातून त्याचे मन उकलले जाते. त्रिंबकराव दाभाडे निजामास फितूर झाल्यावर, मराठ्यांचा माळवा व गुजराथ प्रांतातील वाढता जोर पाहून त्यांच्या पारिपत्यासाठी बादशहाने

माळव्यात बंगषाला व गुजराथेवर अभयसिंगाला पाठविले. दाभाडयांच्या मदतीने बाजीरावाला आवरण्याचे बादशहाचे कारस्थान होते. शत्रूचे कारस्थान रंगविण्यापूर्वीच बाजीरावास ते मोडून काढावयचे होते. म्हणूनच दाभाडयांवर त्याने स्वारी केली. स्वकीयांशी लढताना बाजीरावाचे युद्धचातुर्य, मुत्सद्देगिरी, मनाचा कणखरपणा निदर्शनास आला. पण फितूर झालेल्या मंडळींच्या पदरात त्यांची चूक घातल्यावर बाजीरावाने त्यांच्याशी हेवादावा केला नाही किंवा वैरभाव धरला नाही. जानेवारी १७३७ मध्ये बाजीराव जातीने तळेगावास त्रिंबकराव दाभाडयांची आई उमाबाई हीच्या भेटीस जाऊन तेथे काही दिवस मुक्काम करून राहिला. बाजीरावाची या साऱ्याच अप्रिय व्यवहारातील माणुसकी अशा प्रसंगातून डोकावते. मात्र प्रस्तुत चरित्रात बाजीरावाचे खाजगी जीवन काही अंशाने अपेक्षित राहिले आहे.

बेहेरे बाजीरावाच्या जीवनातील घटनांकडे अलिप्तपणे पाहतात. त्यामुळे प्रस्तुत चरित्रात कुठेही बाजीरावाच्या व्यक्तिमत्त्वावर आक्रमण झालेले नाही.

सत्यकथनाच्या बाबतीत सोवळेपणा बहेरेना ठाऊक नाही. ऐतिहासिक तपशीलाबाबत जितकी चिकित्सक दृष्टी ते बाळगतात तितक्याच निर्भीडपणे व्यक्तीसंबंधी प्रांजळ निवेदन ते करतात. कान्होजी आंग्र्यांबद्दल पुढील निवेदन करताना ते जरादेखील कचरत नाहीत. ‘ कान्होजीला मथुराबाई, लक्ष्मीबाई व गहिनाबाई अशा तीन बायका असून इतर काही रक्षाही होत्या. त्याला औरस व अनौरस मिळून बरीच संतती होती. ’ (पृष्ठ २०१).

प्रस्तुत चरित्रात बाजीरावाच्या व्यक्तिगत जीवनाची झाकली मूठ उघडली असती, तर बाजीरावाचे स्वभावदर्शन समर्थपणे होऊन त्याचे व्यक्तिमत्त्व संपन्नपणे उभे राहिले असते. व्यक्तिचित्रणातला हा अपुरेपणा जाणवल्याशिवाय राहत नाही.

ऐतिहासिक चरित्रांच्या परंपरेतूनच, पुढे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तींची त्यांच्या सार्वजनिक जीवनाचे चित्रण करणारी चरित्रे लिहिली गेली.

## सार्वजनिक जीवनाचे चित्रण करणारी चरित्रे

कान्होबा रणछोडदास कीर्तिकर यांनी लिहिलेले चार्लस डार्विनचे (१८८५) चरित्र अत्यंत त्रोटक आहे. डार्विनच्या ग्रंथांची व सिद्धांताची थोडक्यात ओळख करून देणे हा या चरित्राचा मूळ हेतू आहे. डार्विनचे ग्रंथ आणि त्याने मांडलेले सिद्धांत एवढ्यापुरतेच हे लेखन मर्यादित असल्यामुळे या चरित्रात व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने निराशाच पदरात पडते.

माधव दामोदर आळतेकर यांनी लिहिलेल्या आगरकरांच्या (१९३०) चरित्राचे स्थूलमानाने तीन भाग पडतात. १ ते ८ प्रकरणात व्यक्तिदर्शन, ९ व्या

प्रकरणात विचारदर्शन व ११ व्या प्रकरणात साहित्यदर्शन अशी ही वर्गवारी आहे. चरित्रकाराने व्यक्तिदर्शनाचे उद्दिष्ट आपल्या डोळ्यापुढे ठेवले आहे. आगरकरांचे व्यक्तिमत्त्व चित्रित करता येईल अशाच तऱ्हेने घटितांची निवड केली आहे. शक्यतो आगरकरांच्या शब्दातच हे व्यक्तिमत्त्व वा विचार दर्शनाचे काम होईल याची दक्षता घेतली आहे. आगरकरांच्या व्यक्तिगत जीवनातला संघर्ष, दोन विचारप्रणालीतला वैचारिक संघर्ष, अशा संघर्षांच्या दुपदरी धाग्याने आगरकरांची जीवनकथा लपेटलेली आहे, त्यामुळे ती मनोवेधक होते. विद्यार्थिदशेत गरिबीशी सतत झुंज करून त्यांनी मिळविलेले यश वाचकांच्या मनाची पकड घेते. आपला बोजा दुसऱ्यावर पडू नये म्हणून खटल्याच्या दगदगीत आगरकरांनी नाटक लिहायला घेतले. एकदा अंतःकरणाला एखादी गोष्ट पटली म्हणजे तिचा उच्चार करताना सारे जग उलटले तरी त्याची पर्वा न करण्याइतका कणखरपणा त्यांच्या ठिकाणी होता. ढोंगाचे वैरी, स्थितप्रज्ञ, स्वाभिमानी, स्वावलंबी स्वभाव हे त्यांचे ठळक व्यक्तिविशेष नजरेत भरतात.

वैचारिक दास्यात जखडून ठेवणारा प्रमाणवाद त्यांना अमान्य होता. महाराष्ट्रात विद्येचे पुनरुज्जीवन घडविण्याचा प्रयत्न आगरकरांनी आपल्या लेखनाद्वारे केला. विचार आणि आचार यांच्या साहचर्याबद्दल त्यांचा कटाक्ष होता. विचार आणि आचारातल्या विसंगतीतून समाजातील ढोंगे निर्माण होतात. साहजिकच ढोंगी लोकांना आगरकरांनी आपली टीकेच्या माराने जर्जर करून सोडले त्यांनी मांडलेल्या आर्थिक विचारातून हिंदुस्थानच्या दारिद्र्याबद्दलची त्यांची पोटतिडीक स्पष्ट होते, राजकीय विचारातून स्वातंत्र्याबद्दलची आस्था आणि त्याचबरोबर बौद्धिक, सामाजिक गुलामगिरीबद्दलची चीड व्यक्त होते. शिक्षणविषयक विचारातून सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आग्रह व स्त्रीशिक्षणाला होणाऱ्या विरोधाचे खंडन कुणालाही पटेल अशा भाषेत केले आहे. सार्वत्रिक शिक्षणाबरोबरच, स्त्रीशिक्षणाचा विचार आगरकरांनी केलेला होता. ज्याला जे काम साधेल त्याने ते करावे अशी प्रत्येकास मोकळीक देण्यात ते करणाराचा अथवा करणारीचा आणि जगाचा फायदा आहे, हे त्यांचे ठाम मत होते. आगरकरांना समजून घेण्याच्या प्रयत्नात विचारदर्शन थोडे लांबले तरी कंटाळवाणे होत नाही

आगरकरांच्या वाङ्मयात्मक कामगिरीचे स्वरूप पहिल्या दहा भागात मधून मधून निर्दिष्ट झाले असल्यामुळे त्यासाठी निराळ्या लिहिलेल्या म्हणजे अकराव्या भागांत तिचे तेथपर्यंत परिस्फुटित न झालेले वर्णन दिले आहे. आगरकरांची भाषाशैली ओघवती आणि ओजस्वी आहे. त्यांच्या भाषेत जिवंतपणा आहे. आगरकर म्हणजे शब्दसृष्टीचा ईश्वर. इंग्रजी शब्दांना अचूक प्रतिशब्द

देण्याची हातोटी त्यांना साधली होती. प्रसंगपरत्वे उपमारूपकादिकांचा मार्मिक आणि अर्थपूर्ण उपयोग व मधून मधून सुभाषितांचा उपयोग ते करीत. त्यांच्या लेखनात मधून मधून संकृतप्रचुर भाषेचा आढळ होता. विषयानुरूप रसाचा परिपोष करण्याचे त्यांचे कौशल्य वाखाणण्यासारखे होते. इत्यादी त्यांची लेखन-वैशिष्टये चरित्रकाराने वाचकांच्या निदर्शनास आणून दिलेली आहेत.

आगरकर व टिळक यांच्यामधल्या वादातून दोघांच्याही व्यक्तिमत्त्वावर काही प्रकाश पडतो. आगरकरांचे व्यक्तिमत्त्व उभे करताना टिळकांचा उल्लेख होणे अपरिहार्य होते. चरित्रनायकाच्या गुणदोषांचे मूल्यमापन करताना लेखकाने स्वतःची मते चर्चेत आणता कामा नयेत. जीवनकथेच्या ओघात ते गुणदोष सूचित व्हावेत. टिळक आणि आगरकर या दोघामधील वादात चरित्रकाराने दोन्ही पक्षांची बाजू मांडून निर्णय घेण्याचे काम चरित्रकाराने वाचकांवर सोपवायला हवे होते. चरित्रकाराला आवश्यक अशा तटस्थाच्या भूमिकेला ते धरून झाले असते. पण कित्येकदा चरित्रकार स्वमतप्रतिपादनाच्या निमित्ताने चरित्रात डोकावतो व आगरकरांची वकिली करीत असल्याची जाणीव होते. या विवेचनात पाल्हाळही आहे. परतु प्रकरणाच्या अखेरीस आगरकरांच्या शब्दातच या वादावर प्रकाश टाकला आहे. तिथे मात्र चरित्र सावरले आहे. या वादामुळे मानवी स्वभावाच्या अधिक जवळ जाता येते. टिळक आणि आगरकर दोघेही आपापल्या हितसंबंधांना जपत होते. टिळकांचा प्राध्यापकांच्या ग्रंथलेखनाला विरोध असावा याचे आश्चर्य वाटते ग्रंथलेखनामुळे अर्थप्राप्तीच्या मागे लागून अध्यापनाकडे दुर्लक्ष होईल हा मुद्दा पटणारा नाही ग्रंथलेखनामुळे केवळ अर्थप्राप्ती होते, ज्ञानवृद्धी होत नाही काय ? प्राध्यापकांनी दैनंदिन अध्यापन सांभाळून फावल्यावेळी ग्रंथलेखन केले म्हणून बिघडले कुठे ? स्वतः केसरीचा व मराठाचा व्यवहार चालू ठेवून इतरांना बाहेरची कामे करण्यास विरोध म्हणजे दुराग्रह होय. टिळकांनी या संदर्भात त्यावेळी साधारण सल्लामसलत देण्यापलिकडे मी छापखान्याचे काम केले नाही असे जरी म्हटले तरी त्यांचा संबंध होता हे निश्चित. केसरी, मराठातून नियमितपणे लेखनाची हौस पुरवायची पण जबाबदारी मात्र स्वीकारायची नाही. या आगरकरांच्या वृत्तीतून त्यांच्या पुढल्या धोरणाची दिशा कळून येते. आगरकर शेवटी प्रिन्सिपल झाले आणि टिळकांनी केसरी, मराठा व छापखाना कधी सोडला नाही. असे असूनही पक्षाभिनिवेशामुळे पडद्याआड राहणे आळतेकरांना जमले नाही. आणि या चरित्रात पूर्वपक्ष व उत्तरपक्ष यांच्या लढतीचे रिंगण आखले गेले प्रो. कर्वे यांच्या पुनर्विवाहाच्या निमित्ताने टिळकांवर आळतेकरांनी कशी आग पाखडली आहे ते पाहा ' या विवाहाचे केसरीकर्त्यांनी प्रथम अभिनंदन केले.' पण ' आमच्या मंडळींनी ' कान धरताच, फक्त हा विवाह धर्मविधीप्रमाणे करण्यात आला म्हणून आपण त्यांचे अभिनंदन केले, असे त्यांनी जाहीर केले. लोकरंजनासाठी

आपली शेपटी पोटरीकडे वळविण्याचा केसरीवर या दिवसात वरचेवर प्रसंग येई आणि हा 'पशुपति' ही हे श्वानकर्म करण्याला मागे पुढे पहात नसे.' ((पृष्ठ ४३०–४३१) चरित्रनायकाची मूर्ती स्फूर्तिदायक आणि आकर्षक वठवावयाची, पण त्याच्या विरोधकांच्या मूर्तीवर मात्र विपरीत आणि अनुदार अभिप्रायांचे रंग फासावयाचे, हे कलादुष्ट व प्रचारात्मक धोरण आळतेकरांनी स्वीकारलेले आहे. मग या चरित्राचे लेखन त्रयस्थपणे कसे व्हावे ?

आगरकरांच्या जीवनातील घटितांचे अर्थबोधन व्हावे म्हणून पार्श्वभूमी इथे चित्रित होते. पण शेवटी त्या पार्श्वभूमीचा शोध आगरकरांकडेच वळतो.

आळतेकरांनी आगरकरांचे लेखन व पत्रे यांचा चरित्राचे साधन म्हणून उत्तम उपयोग करून घेतला आहे.

न. चिं. केळकरांनी लिहिलेल्या टिळक चरित्रात व्यक्ती आणि पार्श्वभूमी यांची प्रमाणबद्ध रचना आढळत नाही.

टिळक चरित्राचा पहिला भाग १९२३ साली व पुढील दोन भाग १९२८ साली प्रसिद्ध झाले. या तीन भागांची मिळून एकंदर पृष्ठसंख्या जवळजवळ दोन हजार आहे. पृष्ठसंख्या दोन हजार भरण्याचे एक कारण या ग्रंथात चर्वितचर्वण फार आहे. टिळकांशी प्रत्यक्षात संबंध नसलेला तपशील या चरित्रात फटाक्यात दारू ठासून भरावी तसा खच्चून भरलेला आहे. खोत म्हणजे काय ? क्रीडाभुवन म्हणजे काय ? अशा शब्दांच्या व्याख्या केळकर देत राहतात. क्रीडाभुवनाच्या सविस्तर वर्णनाचे (पृष्ठ २६९) काहीच प्रयोजन नव्हते. पाल्हाळ आणि अप्रस्तुताचा समावेश हे या चरित्राचे आणखी दोन ठळक दोष आहेत.

चरित्रकाराची भूमिका पक्षपाती पुरस्कर्त्याची नसून ती विवेचक विवरण कर्त्याची असते. प्रस्तुत चरित्रात चरित्रनायकाच्या प्रत्येक कृतीचे समर्थन करण्याकडे चरित्रकाराचा कल दिसतो. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचे सत्यान्वेषण न केल्याने पंचहौदमिशनच्या प्रकरणाबाबतही चरित्रकाराला गुळगुळीत समर्थनाशिवाय काही करता आलेले नाही.

चरित्रकाराचे व्यक्तिदर्शनाचे धोरण नसल्यामुळे या चरित्रात एक दोष राहून गेला आहे तो असा, की टिळकांचा पत्रव्यवहार काही प्रकरणांच्या शेवटी परिशिष्टांच्या रूपाने दिला आहे. त्या ऐवजी त्यातून टिळकांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारी काही पत्रे निवडून ती चरित्रातील निवेदनाच्या ओघात एकजीव करून टाकली असती तर निवेदनात अधिक रोचकता आली असती.

या चरित्रात केळकरांच्या भाषेचा प्रभाव जाणवल्याशिवाय राहत नाही.

व्यक्तिदर्शी तपशीलाची पाखडनिवड न करणाऱ्या सर्व संग्राहक शास्त्रीय-दृष्टीचा वरचष्मा आणि कलात्मक दृष्टीचा अभाव असलेले हे चरित्र पार फसले आहे.

न. र. फाटक हे कसलेले लेखक तर आहेतच पण एकेकाळी अनुभवी पत्रकारही होते. त्यांना रानडे यांच्यासंबंधीची माहिती विपुल मिळण्यासारखी होती व ती परिणामकारक रीतीने वाचकांच्यापुढे मांडण्याइतकी लेखणीची करामतही त्यांना साध्य होती त्यामुळे न्या. रानडयांचे हे चरित्र चित्तवेधक झाले आहे, हे आधीच मान्य केले पाहिजे. मात्र माहिती पुरविण्याचे धोरण सतत अवलंबिल्यामुळे 'आमच्या आयुष्यातील आठवणी' या रमाबाई रानडे यांनी लिहिलेल्या हृद्य ग्रंथातून माधवरावांच्या स्वभावाची जशी प्रत्ययकारी ओळख पटते तशी ती या चरित्रातून पटत नाही. न्या. रानडे यांचा तत्कालीन बहुतेक सर्व सामाजिक चळवळींशी कमी अधिक संबंध होता. काही चळवळीचे तर ते आद्य प्रवर्तक होते, तर काहींचे ते सूत्रधार होते, ही गोष्ट खरी आहे. आणि त्या दृष्टीने या चरित्राला सामाजिक पार्श्वभूमी लाभणे आवश्यक होते. मात्र ती रानडयांच्या व्यक्तिमत्त्वाचे यथान्याय दर्शन घडविण्याच्या दृष्टीने पुरेशी पडेल इतकीच रेखाटण्याचा कलात्मक संयम राखणे आवश्यक होते. परंतु न्या. रानडे यांच्या जीवनाशी दूरान्वयाने संबंधित पण प्रत्यक्ष संबंध नसलेल्या काही चळवळींचा व घटनांच्या वर्णनाचा अनावश्यक पसारा मांडल्यामुळे रानडे यांचे व्यक्तिमत्त्व या पसाऱ्यात गुदमरल्यासारखे झाले आहे. समाजसुधारक काम, देशभक्त काय किंवा सार्वजनिक क्षेत्राला वाहून घेणारे इतर लोक काय, यांच्या कौटुंबिक जीवनाला मर्यादा पडतात. त्यांच्या आयुष्याची सार्वजनिकता कौटुंबिकतेला काही प्रमाणात खाऊन टाकल्याशिवाय राहत नाही, हे खरे. फाटकांनी लिहिलेल्या रानडयांच्या चरित्रात सार्वजनिक जीवनाचा बारीकसारीकसुद्धा वृत्तांत येतो. पण खाजगी कौटुंबिक जीवन पार दडपले जाते. ते इतके, की जणू रानडयांना खाजगी जीवन उरलेच नव्हते असे वाटावे. पण ही शंका रमाबाई रानडयांनी लिहिलेल्या त्यांच्या आठवणी वाचल्या म्हणजे दूर होते.

फाटक न्या. रानडयांच्या न्यायदानातील तटस्थतेचे कौतुक करतात आणि त्याच रानडयांचे चरित्र लिहिताना स्वतःकडे त्रयस्थाची भूमिका घेत नाहीत, त्यामुळे या चरित्रात रानडे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे गुणदोषांसहित चित्रण व्हावयास पाहिजे होते तसे झालेले नाही. रानडयांच्या कृतीचे समर्थन करण्याचा प्रयत्न खटकल्याशिवाय राहत नाही. माधवरावांच्या द्वितीय विवाहाच्या घडामोडी जशा घडल्या तशा नमूद केल्यावर रानडयांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष जाणून घेण्याचे काम वाचकांचे. पण फाटक चरित्रनायकाशी असे काही तद्रूप होतात, की त्यांना ही घटना नमूद करून आपले काम पूर्ण झाले असे वाटत नाही. किंबहुना त्या घटनेचे समर्थन करणे हे आपले परमकर्तव्य आहे असे वाटते. माधवरावांच्या वतीने बरीच वकिली केल्यावर ते म्हणतात: 'अशा स्थितीत माधवरावांनी आपल्या तत्त्वाचा अनादर केला म्हणून त्यांस नाव ठेवणे कितपत योग्य आहे, याचा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध

वाचकांनी निर्णय लावावा'. (पृष्ठ १३७). फाटक निर्णय देत नसले तरी आधीच्या समर्थनामुळे या घटनेकडे ते तटस्थतेने पाहू शकले आहेत, असे वाटत नाही. वास्तविक या सगळ्याच घटनेतून काही एक निर्णय वाचकानी घ्यावयाचा असल्यामुळे फाटकांनी माधवरावांना सांभाळून घेण्याचे काहीच कारण उरत नाही. ही घटना अशी बोलकी आहे, की माधवरावांचा कचखाऊपणा स्पष्ट व्हावा. विधवा विवाह नाहीतर नाही, निदान विधवा बहीण घरात असताना कुमारिकेशी होणारा द्वितीय विवाह टाळणे रानडयांना शक्य होते. हा युक्तिवाद रानडयांना सुचला नाही असेही नाही. पण एरवी जी गोष्ट मनात करावयाची नसेल त्याबद्दल दुसऱ्याला न दाखविता युक्तिवादाने कुंठित करून गप्प बसावयास लावणारे व शेवटी आपल्या मनात असेल तेच करून मोकळे होणारे रानडे या युक्तिवादाला चिकटून राहिले नाहीत. इथे फाटक त्यांच्या मनात माधवरावांची जी आकृती ठसलेली आहे तिला कोणत्याही प्रकारचा कमीपणा येऊ नये म्हणून जपताना आढळतात. कदाचित रानडे यांच्या आजारी पत्नीच्या भावना दुखू नयेत म्हणून ते जपत असल्याची शक्यता आहे.

या चरित्रातील काही व्यक्तिदर्शी घटितांची निवड आणि त्यांची सुसंगत मांडणी याचा विचार यापूर्वीच येऊन गेला आहे.

'नामदार गोखले' (१९२५) यांचे चरित्र लिहिणाऱ्या साने गुरुजींना चरित्रविषयक मूल्यांची स्पष्ट जाणीव आहे असे दिसून येते. 'प्रत्येकाच्या स्वभावात काही ना काही तरी वैशिष्टय असते. सद्‌गुणांचा पुतळा एक परमेश्वरच असून अपूर्ण रहाण्यातच मौज व माणूसपणा आहे.' (पृष्ठ २६१). 'सर्वगुण संपन्न कोण असतो ? जीवन म्हणजे काळ्या पांढऱ्या तंतूंचा पट आहे, आणि असे आहे म्हणूनच त्यास शोभा आहे.' (२७५) चरित्रनायक जसा आहे तसा तो चित्रित व्हावा म्हणून प्रस्तुत ग्रंथात चरित्रकाराने धारण केलेल्या मानवी सहृदयतेचे आणि तटस्थवृत्तीचे मर्म वरील विधानात आढळते. प्रस्तुत चरित्रात कुठेही गौरवाचे प्रस्थ नाही. समर्थनाचा सूर नाही. चरित्रनायकाच्या गुणदोष मिश्र आणि म्हणूनच यथावत व्यक्तिमत्त्वाचे आणि अंतरंगाचे कलात्मक दर्शन इथे घडते. चरित्रनायकाविषयी पूज्यभाव कायम ठेवूनही त्याच्या जीवनातील व्यंगे चरित्रकाराने हळुवार हाताने उलगडून दाखविली आहेत. 'गोपाळ हा काही अलौकिक बुद्धीचा मनुष्य नव्हता किंवा अगदी 'ढ' ही नव्हता.' (पृष्ठ १४). 'वाङ्मय शिकविताना जी एक प्रकारची सहृदयता लागते ती व ग्रंथकाराचे मनोगताशी समरस होता येण्याची कला ही गोपाळरावात नव्हती.' (पृष्ठ २३). याचा परिणाम असा झाला की, 'त्यांची शिकवणूक परीक्षेसाठी जास्त उपयोगी नसे' (पृष्ठ २४). अशा परखड विधानातून सत्यदर्शनाचा अपार आनंद वाचकांना

भोगावयाला मिळतो. गोखल्यांचा उतावळेपणा निदर्शनास आणून देणारे माफी प्रकरण कुठेही सारवासारव न करता लिहिलेले आहे. गोखल्यांचा उतावळेपणा, मनुष्य स्वभावाचे अज्ञान, तापटपणा, हट्टीपणा, टीकेच्या व खळबळीच्यावर तरंगणारे मन, मनाचा मऊपणा, नादी स्वभाव, मनमिळाऊ निष्कपट भोळा सरळ स्वभाव, स्वतःची चूक कबूल करण्याइतका मनाचा मोठेपणा आणि वडील माणसांबद्दलचा विलक्षण आदर इत्यादी व्यक्तिमत्त्वाच्या अंगोपांगासहित गोखल्यांचे व्यक्तिमत्त्व जिवंतपणे शब्दात पकडले आहे. पण त्यातही पुन्हा व्यक्तिदर्शी घटितांच्या द्वारे हे व्यक्तिमत्त्व आपसूक फुलत नाही. तद्विषयक निवेदनावर चरित्रकाराने अधिक भर दिला आहे.

१८९५ मधील पुण्याची काँगेसची बैठक व सार्वजनिक सभेतून झालेली रानडेपक्षाची हकालपट्टी, १८९७ सालातली गोखल्यांची माफी, १९०७ सालातली सुरतेची काँग्रेस आणि १९१५ साली गोखले मृत्युशय्येवर असताना माजलेला काँग्रेसच्या समेटाचा वाद, ही बुद्धिभेद करणाऱ्या प्रसंगांची उदाहरणे आहेत. यातली एक बाजू लोकांना थोडीफार माहीत आहे व तीच प्रिय असल्याने सामान्यता दुसरी बाजू पाहण्याचा यत्न कोणी करीत नाही. गोखल्यांचे चरित्र लिहिणाराने ही दुसरी बाजू पाहणे अत्यंत आवश्यक आहे. रा. साने यांनी दोन्ही बाजू पाहून निर्णय देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु एका बाजूच्या मताचा त्यांच्या मनावर अतिशय पगडा बसला आहे, म्हणून म्हणा अगर दुसरी बाजू पाहण्याची सगळी साधने त्यांना प्राप्त झाली नाहीत म्हणून म्हणा, त्यांनी नमूद केलेल्या निर्णयात पक्षपाताचा भाग बराच आढळतो. या सर्व प्रकरणात टिळक आणि गोखले यांची तुलना निःपक्षपातपूर्वक झालेली नाही. किंबहुना त्यामुळे गोखल्यांच्यावर अन्याय होतो असे न. र. फाटकांनी प्रस्तुत चरित्राच्या विहंगावलोकनात सुचविले आहे. फाटक म्हणतात त्या परिस्थितीत चरित्रनायकाला तो आहे त्यापेक्षा कमी लेखण्याचा प्रयत्न एकवेळ झाला असेल, परंतु तो आहे त्यापेक्षा त्याला अधिक लेखण्याचा प्रयत्न कुठेही झालेला नाही. 'झाले बहु, होतिल बहु, आहेतही बहु, परंतु यासम हा' अशा विभूतिपूजेच्या भावनेने लिहिलेले हे चरित्र नव्हे.

गोखल्यांच्या तत्कालीन राजकीय घटितांशी जितका संबंध होता तितकेच त्यांचे चित्रण या चरित्रात झाले आहे, त्यामुळे या पुस्तकात व्यक्ती आणि पार्श्वभूमी यांचे चित्रण समतोल साधले आहे. राजकीय पार्श्वभूमी रेखाटली जात असताना मधून मधून गोखले वाचकांच्या डोळ्यापुढे उभे करण्यात चरित्रकाराला यश लाभले आहे.

गोखल्यांच्या जीवनकथेचे निवेदन करताना कालक्रम काटेकोरपणे पाळलेला नाही. जिथे गोखल्यांच्या जीवनाला पूर्ण विराम मिळाला, तिथेच चरित्र संपायला हवे होते. पण चरित्रकाराने गोखल्यांच्या मूळ जीवनकथेपासून स्वभावचित्रण

वेगळे काढून ते शेवटी दिले आहे. त्यातला स्वभावदर्शी तपशील मूळ कथेशी एक-जीव झाला असता तर व्यक्तिदर्शनाला अधिक उठाव मिळाला असता.

'आपला शिष्य कौन्सिलमधे झगडण्यास योग्य झाला आहे असे पाहून न्या. रानड्यांनी आपला देह १९०१ च्या जानेवारी महिन्याच्या १६ तारखेच्या उत्तररात्री खाली ठेविला' असे एखादे तर्कदुष्ट विधान सानेगुरुजी मधूनच करताना आढळतात.

चरित्राच्या अखेरीस वाचकांना 'सद्‌गुणांचे बीजारोपण करावे' हे सांगण्याकरिता चरित्रकार डोकावतो. (पृ. २७५)

सान्यांची भाषासरणी मनोवेधक, हृदयास हलवून सोडणारी असून त्यांच्या वर्णन शैलीत त्यांचे प्रेमळ, प्रांजळ व उदात्त मन स्पष्टपणे उमटलेले आहे.

वर नमूद केलेली रचनेतली शिथिलता उणे केल्यास हे एक बऱ्यापैकी चरित्र आहे.

कर्नाटकींनी लिहिलेले 'गुरुवर्य डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचे चरित्र' (१९२७) हे एक गुरुशिष्य नात्यातून लिहिलेले चरित्र आहे, त्यामुळे शिष्यत्वाचा भक्तिभाव चरित्रात मधून मधून डोकावतो व गौरवाचे प्रस्थ माजते कर्नाटकींनी चरित्रनायकाचे मोठेपण सिद्ध करण्याची कोणतीही संधी दवडलेली नाही. गौरव म्हटला म्हणजे एकांगीपणा आलाच, 'आमचा तर असा तर्क वहातो की, पुढे मागे भांडारकर, रानडे यांची 'धर्मपर व्याख्याने' म्हणजे हरदास बोवांचे आधारभूत ग्रंथच होऊन बसतील.' (पृष्ठ ३६५) असे एखादे भरमसाट विधान करायलाही ते कचरत नाहीत. टिळकांनी भांडारकरांवर केलेल्या टीकेच्या संदर्भात टिळकांची भांडारकरांसंबंधीची विधाने उद्धृत करून चरित्रकार स्वस्थ बसत नाही त्यावर मल्लिनाथी केल्याशिवाय चरित्रकाराला राहवत नाही. टिळक अस्वस्थ आहेत असे कळल्यावर भांडारकरांनी त्यांच्यासाठी प्रार्थना केली व सहानुभूतीची आशीर्वचनपूर्वक टिळकांस तार पाठविली. या घटनेची नोंद करून कर्नाटकी लिहितात.' इतकी क्षमाशील वृत्ती सामान्य संसारकरू माणसामध्ये दृष्टीस पडणे अगदी विरळा. ही वृत्ती केवळ साधुसंतांनाच शोभण्यासारखी होती आम्हास तर मंबाजी गोसावी व तुकारामबुवा यांच्यामधील एका प्रसंगाची आठवण झाली.' (पृष्ठ १८४). प्राचीन वस्तुसंशोधनात भांडारकरांनी केलेल्या कामगिरीबद्दल कर्नाटकी लिहितात, 'त्यांनी त्या क्षेत्रात इतके दिवस अर्ध शतकापेक्षाही जास्त दिवस कामगिरी केल्यामुळे व जी कामगिरी यांनी केली तिचे राष्ट्रीय दृष्टीने फार मोठे महत्त्व असल्यामुळे त्यांची जगातील महापंडितांत गणना होऊ लागली आणि त्या योगे अर्थात हिंदुस्थान देशाचे सुधारलेल्या राष्ट्रात कायमचे वजन वाढले' (पृष्ठ १२३). भांडारकरांच्या संस्कृत अध्यापनाचा प्रभाव तरी केवढा. 'त्यांची

बदली मुंबईस झाली तरी कित्येक वर्षे पर्यंत मॅट्रिकच्या परीक्षेतील जगन्नाथ शंकरशेटची एक तरी स्कॉलरशिप काही वर्षे रत्नागिरी हायस्कुलातील विद्यार्थ्यास मिळतच होती.' (पृष्ठ ७६) कर्नाटकीच्या गुरूभक्तीची साक्ष देणाऱ्या एकांगी अतिरिक्त, हास्यास्पद विधानांमुळे प्रस्तुत चरित्रास गौरवग्रंथाची अवकळा प्राप्त झाली आहे

भांडारकरांच्या अध्ययन आणि अध्यापन या क्षेत्रातील कामगिरीचा आढावा घेताना कर्नाटकींनी सूक्ष्म जीवनदर्शी तपशील भरला आहे. इथे जिवंत झरा फुटतो. काही काळ झुळझुळतो. पण शेवटपर्यंत हाच सूर त्यांना कायम ठेवता आला नाही. भांडारकरांच्या कीर्तीला ढळ पोचेल असे काही बोललेले, लिहिलेले त्यांना मुळीच खपत नाही. भांडारकरांविषयी आत्मीयता जिव्हाळा उफाळून यायला एवढे निमित्त पुरे होते, आणि मग त्यांची तटस्थाची भूमिका सुटते. चरित्रात नायकाचे जीवन व्यक्त न होता, चरित्राला वादविवादात्मक समर्थनाची अवकळा येते, या समर्थनाला पाल्हाळ, पुनरुक्तीची जोड मिळाली म्हणजे चरित्र रटाळ व कंटाळवाणे होते. भांडारकरांच्या दृष्टीने राजकारण हे आयुष्याच्या अनेक पैलूंपैकी एक पैलू. ते त्यांचे जीवन सर्वस्व नव्हतेच. अध्ययन आणि अध्यापन हे त्यांचे जीवित कार्य. फावल्यावेळी सामाजिक व धार्मिक सुधारणांकडे त्यांनी लक्ष पुरविले तेही सहाय्यक गौण भूमिकेवरून. त्यांच्या हातून भरीव राजकीय कार्य झाले नाही या नवाकाळकारांच्या, मालाकारांच्या टीकेला उत्तर देण्याचे कारण नव्हते. भांडारकरांच्या विचारसरणीचे समर्थन करण्याकरिता चिपळूणकर–टिळकांच्या विचारसरणीचे खंडन करण्याचेही काही कारण नव्हते. १८९७ साली पुण्याचे कलेक्टर मि. रँड व ले. आयर्स्ट यांचा खून झाल्यावर त्यांच्या प्रेत संस्काराला डॉ. भांडारकर गेले असता त्यांना मज्जाव करण्यात आला. एकदा अपमानास्पद कटू अनुभव आल्यानंतरही भांडारकरांचा ब्रिटिश सरकार संबंधीच्या धोरणात बदल झाला नाही. १९०३ साली लॉर्ड कर्झन साहेबांनी दिल्लीस भरवलेल्या दरबाराकरिता इतरांप्रमाणे डॉ. भांडारकरांना निमंत्रण करण्यात आले होते. परंतु दरबारास गेल्यावेळी डॉ. भांडारकरांना त्यांनी साहेबी टोपी न घालता आपले पागोटे व उपरणेच परिधान केलेले होते या शुल्लक सबबीवर, मज्जाव करण्यात आला. (पृष्ट ३९३). या दोन्ही उदाहरणांवरून त्यांच्या राजकीय कार्याच्या मर्यादाच स्पष्ट होतात. आणि तरीही कर्नाटकींनी त्यांच्या राजकीय कार्याची तरफदारी करण्याचा हट्ट सोडलेला नाही. लॉर्ड कर्झन यांनी काही युनिव्हर्सिटयामधून लोकपक्ष प्रबळ झाला असून तेथे सरकारी अधिकाऱ्यांनी आणलेली सूचना जशीच्या तशी पास होणे मुष्किलीचे होते असे पाहून १९०४ साली युनिव्हर्सिटचा सुधारण्याचे (खरे म्हणजे त्यांच्या स्वातंत्र्यावर घाला घालणारे) विधेयक वरिष्ठ

कौन्सिलपुढे आणले. या विधेयकाला ना. गोखले, सर फिरोजशहा मेहता यांनी कसून विरोध केला. विधेयकाचा हेतू शैक्षणिक सुधारणेपेक्षा आपले बहुमत राखणे हा होता. डॉ. भांडारकरांनी मात्र शैक्षणिक सुधारणेवर जोर देऊन विधेयकाला पाठिंबा दिला. भांडारकरांची शैक्षणिक दृष्टी असली तरी या बाबतीत सरकारची राजकीय वर्चस्वाची दृष्टी होती. विधेयकाला पाठिंबा देण्यात भांडारकरांच्यातला राजकीय मुत्सद्देगिरीचा अभाव दिसून आला. ज्याच्यावर टीका करावयाची त्याला भाजून काढायचे हे टिळकांचे धोरण होते. भांडारकर स्वत:हून या प्रकरणात गोवले गेले. सावज सापडल्यावर टिळक स्वस्थ बसणे शक्य नव्हते. 'हरिदासांचे दिवाण झालेले माणकेश्वर,' 'नेहमी पाण्यात राहतो म्हणून बेडकाने सृष्टीत होणाऱ्या पावसाच्या घडामोडीवर अभिप्राय देणे,' 'बाब्या बोल, म्हणून पाठीस लागणाऱ्या आईस उत्तर देणे' इत्यादी कडक शब्दात टिळकांनी त्यांची हजेरी घेतली. टिळकांच्या कठोर टीकेबद्दल कर्नाटकी अकारण अश्रू ढाळतात. पण त्यामुळे त्यांच्या दैवताचा कचखाऊपणा, कमकुवतपणाच उघडा पडतो.

कर्नाटकी केवळ घटितांच्या संग्रहात धन्यता मानतात त्यामुळे पत्रे, रोजनिशी, भांडारकरांनी वेळोवेळी महत्त्वाच्या विषयांवर प्रसिद्ध केलेली लहान लहान पुस्तके, जुने रिपोर्ट, वर्तमानपत्रातले, मासिकातले लेख, वैद्यांनी लिहिलेले भांडारकरांचे त्रोटक चरित्र, केळकरांचे टिळक चरित्र, न. र. फाटकांनी लिहिलेले रानड्यांचे चरित्र आणि प्रसिद्ध झालेल्या आठवणी इत्यादी साधनांचा भरपूर उपयोग करूनही प्रस्तुत चरित्रातले जीवनदर्शन थिटे पडते. चरित्रात कलेचे अंग जोपासले जात नाही. चरित्र लिहायचे म्हणजे नायकाविषयी उपलब्ध असलेला पुरावा गोळा करावयाचा आणि अनुरूप निवेदनाद्वारे तो वाचकांच्यापुढे ठेवायचा असाच त्यांचा समज झालेला दिसतो. उपलब्ध झालेला समग्र पुरावा सादर करणे म्हणजे चरित्र नव्हे, हे कर्नाटकी विसरतात. व्यक्तिदर्शनाचे धोरण न सांभाळता केवळ माहिती पुरविण्याचे धोरण अवलंबिल्यामुळे चरित्रात पार्श्वभूमी विस्तृत होते व मधून मधून रुक्षता डोकावते. भांडारकरांच्या प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात त्या काळच्या शैक्षणिक परिस्थितीचा विस्तृत आढावा घेतला आहे तो या माहिती पुरविण्याच्या धोरणानुसार. दक्षिणा फंडाची सविस्तर माहिती देण्याचे काहीच कारण नव्हते. भांडारकरांचा प्रार्थना समाजाशी संबंध असला तरी प्रार्थना समाजाचा प्रसार न होण्याची कारणमीमांसा प्रस्तुत चरित्रात अप्रस्तुत ठरते. लॉर्ड मेकॉलेच्या शिक्षण-विषयक धोरणाच्या गुणदोषांच्या चर्चेतला पाल्हाळ जाणवतो. या चरित्रात पुनरुक्तीचा दोषही आहेच. वानगीदाखल पृष्ठ ४०८ वर एका युरोपीयन सार्जंटाने केलेल्या भांडारकरांच्या अपमानाचे अथवा पृष्ठ ४४ ब्राह्मणांना दरसाल वाटल्या गेलेल्या लाखो रुपये दक्षिणेचे उदाहरण देता येईल.

भांडारकरांच्या जिवंत व्यक्तिमत्त्वाचे सलगपणे, संपन्नपणे दर्शन घडविता येईल तेवढीच घटिते शिल्लक ठेवून उपयोगात आणली असती तर प्रस्तुत चरित्राच्या रचनेतली शिथिलता दूर होऊन चरित्रात सलगपणा, आटोपशीरपणा आला असता आणि चरित्र बांधेसूद झाले असते.

कर्नाटकींनी लिहिलेली चरित्रे एक साची आहेत. 'नामदार न्यायमूर्ती काशिनाथ त्रिंबक तेलंग ' (१९२९) हे चरित्रदेखील ठरीव साच्यातलेच एक. त्यांच्या सर्वच चरित्रातून पक्षपात, समर्थन यामळे चरित्रनायक जसा होता तसा तो वाचकांच्या दृष्टीस पडणे दुराणस्त होते. प्रस्तुत चरित्रात चरित्रात्मक लेख, नाईक चुणिलाल पारेख, परमेश्वरम् पिल्ले, यांनी लिहिलेली तेलंगांची चरित्रे, न्या. रानडे यांचे चरित्र, लो. टिळक यांचे चरित्र, मोदीकृत फेरोजशहा मेहता यांचे चरित्र, सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांचे व्हॉल्यूम्स इत्यादी विपुल साधनसामग्रीचा उपयोग करूनही न्यायमूर्तींचे यथार्थ व्यक्तिदर्शन होत नाही.

माहिती पुरविण्याचे धोरण व खंडण, मंडणादी प्रपंचामुळे चरित्राची पार्श्व-भूमीचे असमतोल चित्रण आढळते.

तेलंगाचे घराणे मुंबईचे म्हणून मुंबई बेटाची सविस्तर माहिती चरित्रकाराने दिली आहे. ती निरुद्देश आहे. मात्र तेलंगाच्या वाङ्मयविषयक माहितीतून त्यांच्या तर्कनिष्ठ विचार पद्धतीची व व्यापक व्यासंगाची साक्ष पटते. न्या. तेलंग हे एक समाजसुधारक, तेव्हा त्यांच्या चरित्राला विस्तृत सामाजिक पार्श्वभूमी लाभते. प्रस्तुत चरित्रातील सामाजिक सुधारणांचा इतिहास समजून सामान्यतः वाचकांच्या ज्ञानात निश्चितपणे भर पडावी पण तेलंगाचे व्यक्तिमत्त्व अंधारातच राहते.

कर्नाटकींनी चरित्राकरिता ज्ञानी गृहस्थाची निवड केल्यामुळे नायकाचे दोष तर दिसतात, पण दाखवायचे कसे ? अशी काहीशी अवघडल्यासारखी त्यांची परिस्थिती झाली आहे. चरित्र त्यांना अलिप्तपणे लिहिताच येत नाही. तेव्हा एकीकडे दोष अंशतः मान्य करायचे आणि दुसरीकडे चरित्रनायकाला सांभाळून घेण्याचा प्रयत्न करायचा. अशी तारेवरची कसरत चरित्रात सर्वत्र आढळून येते.

न. चि. केळकरांनी लिहिलेल्या टिळक चरित्रात तेलंगाचा पैशाचा लोभ सुटलेला नव्हता असे सूचित करणारे विधान केले आहे. आरोप पूर्णपणे नाकारता तर येत नाही तेव्हा कर्नाटकींनी आडवळणाने चरित्रकाराला सांभाळून घेण्याचा प्रयत्न केला आहे. पैशाचा लोभ कुणाला सुटला नाही ? शास्त्रीबुवांच्या मृत्यु-नंतर त्यांचे बंधू ल. कृ. चिपळूणकर हे शास्त्रीबुवांच्या संस्था चालविण्याऐवजी उमरावतीस आपल्या चांगल्या पगाराच्या नोकरीस चिकटून राहिल्याचा दाखला त्यांनी दिला आहे. चरित्रकार नायकाचा पाठीराखा ही भूमिका स्वीकारल्यानंतर समर्थनाची अशी केविलवाणी धडपड करावी लागते.

तेलंग हे लघुतम प्रतिकाराच्या मार्गाने जाणारे होते हा आक्षेप अंशत: मान्य करूनही त्यांनी समर्थनाचा सूर कायमच ठेवला आहे. 'तेलंग हे जरी धीट व कर्ते सुधारक होते असे म्हणता येत नाही, तरी सामाजिक सुधारणा झाली पाहिजे असेच त्यांचे प्रामाणिक मत होते व त्या कामी ते अंत:करणपूर्वक सहाय्य करीत असत, त्यामुळेच सुधारक मंडळीच्या कार्यात सामील होत असत.' (पृ. २२६) यातला कौतुकाचा भाग असा की 'ते अत्यंत प्रामाणिक व सरळ मनाचे असल्यामुळे कौटुंबिक परिस्थितीने आपल्यात आलेला कमकुवतपणा त्यांना स्पष्ट दिसत असे. व तो ते कबूल करीत असत. त्यावर सफेती चढविण्याचा प्रयत्न ते कधीच करीत नसत (पृष्ठ २२५) आणि तरीही कर्नाटकी लिहितात.'... अशा स्थितीत तेलंग हे लघुप्रतिकाराच्या मार्गाने सुधारणा करणारे असून आपणही त्यांचेच अनुकरण करतो असे जे लोक म्हणत असत ते खऱ्या वस्तुस्थितीचा विपर्यास करीत असत.' (पृ. २२५) तेलंग हे कर्ते सुधारक होते हे सिद्ध करण्याची संधी चरित्रकाराने (पृ. २९८) वर साधली आहे, ती अशी 'अभ्यासाचे निमित्त करून तेलंगांनी गर्भाधान विधि पुढे ढकलला व अभ्यासक्रम पुरा होईपर्यंत कडकडीत ब्रह्मचर्य पाळले.' ही कर्नाटकींच्या मते तेलंगांनी स्वत:च्या बाबतीत अमलात आणलेली सुधारणा.

सामाजिक सुधारणेच्या बाबतींत तेलंग हे स्वत: प्रतिपादन केलेली मते संधी आल्यास आचरणात आणीत नसत म्हणून त्यांच्यावर दांभिकपणाचा आक्षेप घेतला गेला. प्रौढ विवाहाचे मंडन करणारे तेलंग पण त्यांनी आपल्या आठ किंवा दहा वर्षाच्या मुलीचे लग्न वडिलांच्या आग्रहाची सबब सांगून केले. यांचे कर्नाटकींनी केलेले समर्थन किती गुळमुळीत आहे ते पाहा. 'एक दोन प्रसंगी त्यांच्या हातून, त्यांच्या तत्त्वांविरूद्ध वर्तन घडले, ही गोष्ट खरी परंतु त्याची तशी कारणे होती त्या कारणांचे कित्येकास महत्त्व वाटेल, कित्येकास वाटणार नाही ती गोष्ट निराळी पण कारणे होती व घडलेल्या वर्तनाबद्दल त्यांना फार वाईट वाटले या गोष्टी सत्य आहेत... तत्वांशी विसंगत असे हातून वर्तन घडले म्हणून त्यांच्या ठिकाणी तत्वनिष्ठा मुळीच नव्हती अगर त्यांच्या हातून थोडीशी देखील गैरसोय सहन करणे होत नसे, असे कदापि म्हणता येणार नाही.' (पृष्ठ २८६) कर्नाटकींनीच दिलेले कारण असे की, 'आईबापांच्या इच्छेविरूद्ध कधी न जाणे हेच त्यांच्या आमरण वर्तनातील मुख्य तत्त्व होते त्यामुळे त्यांच्या हातून एक दोन वेळा सामाजिक सुधारणेच्या बाबतीत चुका झाल्या.' (पृष्ठ २८९) त्यातली पुन्हा धन्यतेची बाब अशी की, 'वडिलमाणसांकरिता जड मनाने तत्त्वनिष्ठेला मुकणे यात एक प्रकारचा स्वार्थत्यागच आहे असे कोण म्हणणार नाही?' (पृष्ठ २९३) या स्वार्थत्यागाचे दुसरे एक उदाहरण असे, की मुंबईच्या सारस्वत समूहाकडून त्यांना पानसुपारी झाली. तेव्हा त्या संस्थेच्या आमंत्रणाचा स्वीकार करण्याचे त्यांच्या

मनात प्रथम नव्हते कारण इतकेच की, ती जातिविशिष्ट संस्था· परंतु मग 'समूहा' च्या मंडळींनी काशिनाथ पंतांच्या वडिलांच्या मार्फत भीड घालताच तेलंगांनी त्या आमंत्रणाचा स्वीकार केला व ते पानसुपारीला आले.

चरित्रकाराच्या नायकाकडे पाहण्याच्या भावनिक व एकतर्फी दृष्टीमुळे त्याला सत्यशोधक दृष्टी लाभू शकलेली नाही. हे या चरित्रकाराच्या अपयशाचे एक कारण आहे. चरित्राच्या कलात्मक अंगाचे तर या चरित्रकाराला मुळीच भान नाही. शिथिल रचनेमुळे या चरित्राच्या अपयशात आणखी भर पडली आहे. समर्थनाचा भाबडा भाव व्यक्त झाल्यामुळे चरित्राला गुणगौरवग्रंथाची कळा आलेली आहे.

श्रीनिवास कर्नाटकी यांनी लिहिलेले 'भाऊ दाजी लाड यांचे चरित्र' (१९३१) जुन्या दोषांची पुनरावृत्ती करणारे म्हणजे कर्नाटकींच्या ठरीव साच्यातलेच आहे. भांडारकर व तेलंग या दोघांच्या चरित्रांच्या तुलनेने या चरित्रातली पार्श्वभूमी आटोपशीर आहे. तथापि चरित्रकराने रा. रा. पाणंदीकरांच्या आठवणी मद्रासच्या नटेसनचे पुस्तक मठस्थ गणेश शर्मा यांची 'सारस्वत रत्नमाला' एशियाटिक सोसायटीच्या त्रैमासिकांचे, खंड, बॉम्बे गॅझेट, टाईम्स ऑफ इंडियाच्या फाईल्स, मंडलिकांचे नेटिव्ह ओपिनिअन, लान्सेट व्हॉल्यूम १८५५, आणि मंडलिकांचे चरित्र इत्यादी विपुल साधन सामग्रीचा उपयोग करूनही चरित्रनायकाचे यथार्थ दर्शन घडत नाही, याचे कारण चरित्र लिहिताना कर्नाटकींच्या दृष्टीने, 'थोर पुरुषांचे चरित्र विशेषकरून तरुण व होतकरू लोकांपुढे नमुन्यादाखल ठेवणे हे एक अत्यंत आवश्यक असे कर्तव्य होते.' (पृ. ७). भांडारकरांच्या, तेलंगांच्या चरित्रात अशी आदर्श व्यक्ती उभी करण्याचा प्रयत्न झाला आणि भाऊ दाजींच्या चरित्रातही कर्नाटकींनी तेच उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवले.

भाऊदाजींची ज्ञानलालसा व परोपकार बुद्धी, अन्यायाची चीड, हे त्यांचे गुणविशेष काही घटितांच्या द्वारे सूचित होतात, तर काहींची नुसती नोंद झालेली आहे. परंतु इथे सर्व घटितांच्या सुसंगत अन्वय लावून सलग, एकजीव जीवनपट विणला गेला आहे असे वाटत नाही. भाऊ दाजींच्या जीवनाचे विविध कप्पे कल्पून हे चरित्र लिहिल्यामुळे त्यातून सलग व सुश्लिष्ट मूर्ती आकाराला येत नाही.

ग्रंथलेखनाच्या वेळी डॉ. भाऊ हे वारल्यासच मुळी अर्ध शतकापेक्षा अधिक काळ लोटला होता. साहजिकच त्यांच्या बालपणासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नसल्यामुळे ते चित्रण थोडक्यात आटोपलेले आहे. परंतु हे धोरण सर्वत्रच आढळून येत नाही. रॉयल एशियाटिक सोसायटीपुढे वाचलेली हेमाद्रि, हेमचंद्र (पृष्ठ५२) माधव, सायन (पृष्ठ ५८)ही टिपणे प्रस्तुत चरित्रात देण्यामध्ये माहिती पुरविण्याचेच धोरण आहे या धोरणाला अनुसरूनच भाऊ दाजींना अर्पण केलेल्या 'हिंदु

ग्रंथकर्त्यांची चरित्रे ' या ग्रंथातल्या भट्टोजी दीक्षित व महेश्वरभट यांची माहिती दिलेली आहे. डॉ. भाऊ दाजींना सापडलेली ' कालकाचार्यांची गोष्ट ' (पृष्ठ६२) दिल्यामुळे भाऊंच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश पडतो असेही नाही.

भाऊंनी एका विशिष्ट प्रसंगी प्रायश्चित घेतले आणि ते केव्हा लोकांस खूष करण्याकरिता तसे वागत असत. (पृष्ठ ९१) या आक्षेपाच्या संदर्भात कर्नाटकी लिहितात, ' या दोन्ही आरोपांसंबंधाने इकडे जास्त विस्तार करण्याची आमची इच्छा नाही, पण मृत माणसाच्या दोषांसंबंधाने बोलताना अगर लिहिताना आम्ही जरा उदार दृष्टीने विचार करून मग काय ते बोलावे अगर लिहावे हे बरे असे आम्हास वाटते... वडील माणसांच्या मुर्वतीखातर अगर दुसऱ्या अशाच कारणाकरिता प्रायश्चित्त घेतले तर त्यात आश्चर्य नाही. अगदी धारवाडी काट्याने पाहिल्यास कदाचित् हे वर्तन पहिल्या नंबरचे ठरणार नाही त्याच्या खालचे ठरेल. परंतु त्याचा त्या काळाकडे पाहून, क्षम्य दृष्टीने विचार केला पाहिजे, इतकेच आमचे म्हणणे आहे.' (पृष्ठ ९१–९२) भांडारकर, तेलंग यांच्या चरित्रांप्रमाणेच इथेही चरित्रनायकाला सांभाळून घेण्याचे धोरण दिसून येते.

प्रस्तुत चरित्रात क्वचित् द्विरूक्तीचा (पृष्ठ १२१–१३२) दोषही आढळतो.

कर्नाटकींना मूल्यविषयक जाण नाही हे या चरित्राच्या निमित्ताने पुन्हा एकदा दिसून आले आहे. त्यांची चरित्रे एकाच दावणीला बांधल्यासारखी वाटतात. या ग्रंथांमुळे ज्ञातिकार्य फळाला आले, व्यक्तींच्या कृतीची नोंद राहिली, तरी खऱ्या व्यक्तीची ओळख जगाला पटत नाही ती नाहीच. कर्नाटकींची सारीच चरित्रे सार्वजनिक अभिनिवेशानें दूषित झाली आहेत. त्यातलेच हे एक.

गार्गी भाटवडेकरांनी लिहिलेले ' डॉ. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर ' (सन १९३७) हे चरित्र कौटुंबिक अभिनिवेशापासून दूर कसे व किती राहता येते. याचें उत्कृष्ट प्रत्यंतर आहे. चरिनायकाशी ग्रंथकर्तीचें निकटचे नाते असूनही हे चरित्र तटस्थपणे लिहिलेले आहे. त्यामुळे पक्षपात, समर्थन या दोषांपासून ते पूर्णपणे दूर राहिले.

प्रस्तुत चरित्रात पहिल्या १ ते ५८ पृष्ठांत व अखेरच्या १९० ते २५२ पृष्ठात व्यक्तिदर्शनाचा प्रयत्न झाला आहे. मात्र व्यक्तिदर्शनाचा हा धागा अतूट राहिलेला नाही. प्रारंभी त्यांच्या कुटुंबाची माहिती देताना चितारलेली कौटुंबिक पार्श्वभूमी आटोपशीर आहे. आजोळच्या पळस्पे गावच्या वर्णनात सूक्ष्म तपशील भरलेला आहे. पृष्ठ १७ वरचे भालचंद्रांचे शब्दचित्र मोजक्या शब्दात रेखाटले आहे. भालचंद्रांच्या वैद्यकीय कौशल्याची साक्ष देणाऱ्या आख्यायिकातून आकाराला येणारे व्यक्तिमत्त्व या चरित्राबद्दल काही अपेक्षा निर्माण करते. चिमणाबाईच्या मृत्यूनंतर बडोदे संस्थानच्या नोकरीचा दिलेला राजीनामा, स्टँडिंग कमिटीच्या अध्यक्षस्थानी असताना जमाखर्ची अंदाजपत्रात सरकारास हवे असलेले काही

फेरफार त्यांच्यामार्फत घडवून आणण्याचा झालेला प्रयत्न, याबाबतीत भाटवडेकरांचे रोखठोक वर्तन व त्यातून दिसून येणारी सचोटी, रोगाचें निदान करण्यातील बिनचूक निश्चितपणा व अनाथ दुखणेकऱ्यांची काळजी घेण्याची दक्षता यामुळे पालनपूरच्या हॉस्पिटलला मिळवून दिलेली लोकप्रियता या साऱ्याच घटना व्यक्तिदर्शी आहेत. पृष्ठ १९० च्या पुढेही अशा काही घटनांची नोंद आढळते. बाँबे बँकिंग व क्रेडिट बँक अशा दोन बँकांचे भालचंद्र डायरेक्टर होते. या दोन्ही बँकांचे व्यवहार थांबले. बँकेतील पैशाची अफरातफर ज्यांनी केली त्यांना त्यांच्या अपराधाच्या शाबीतीप्रमाणे न्यायमंदिरात पुढे शिक्षा झाल्या, पण बँकेच्या व्यवहाराची चौकशी खुद्द सरकारने हाती घेताच पैशाची अफरातफर डायरेक्टरांवर शेकली. भालचंद्रांच्या सौजन्याचा फायदा घेऊन बाँबे बँकिंगमधल्या उलाढाल्या मंडळींनी त्यांच्या गळचात लाखा लाखाच्या दोन जामिनक्या बांधल्या होत्या. शिवाय, या दोन्ही बँकासंबंधात भालचंद्रावर एक लाख चाळीस हजारांच्या रकमेचा बोजा डायरेक्टर म्हणून टाकण्यात आला होता. याशिवाय, आणखी किरकोळ देणी साठ हजारांच्या घरातील होती, मिळून चार लाखांच्या ऋणात भालचंद्र सापडले. या प्रकरणात चार लाखाचा बोजा डोक्यावर असताना कागदपत्रात राहून गेलेल्या चुकीच्या आधाराने बुडत्याला काडीचा आधार या न्यायाने पाऊण लाखाच्या देण्याची घोरपड त्यास टाळणें अशक्य नव्हते. पण भालचंद्रांनी खोटी जबानी देऊन जबाबदारी टाळली नाही. या संकटाशी धीराने टक्कर देण्यास ते सिद्ध झाले. शिवरात्रीला इतर मंडळींच्या बरोबर जेवताना नोकराने घरातल्या माणसांना चांदीच्या वाटचा व इतरांना नुसत्या कल्हईच्या वाटचा मांडल्या, त्यावेळी सर्वांनाच चांदीच्या वाटचा मांडायला सांगून दाखविलेली समत्वबुद्धी या साऱ्या घटनातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश फेकला जातो. भालचंद्राचा दांडगा आत्मविश्वास, परिश्रमशीलता, उदारता, सचोटी, स्वाभिमानी स्वभाव, समत्वबुद्धी इत्यादी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू व्यक्त होतात. पण भालचंद्रांचे व्यक्तिमत्त्व सलगपणे, संपन्नपणे उभे राहत नाही. याचे कारण व्यक्तिदर्शनाचा धागा मधेच तुटतो. आणि उंचावलेल्या अपेक्षा पूर्ण होत नाहीत.

चरित्राच्या रचनेत मुळात दोष असा आहे, की भालचंद्रांच्या जीवनाचे विविध कप्पे कल्पून हे चरित्र लिहिले आहे. भाटवडेकरांच्या जीवनातली विविध कप्प्यातली माहिती यथामहत्त्वप्रमाण एकाच मुशीत कौशल्याने जिरवून तीतून एक सलग व सुश्लिष्ट मूर्ती आकारास येणे आवश्यक होते. पण होते असे, की चरित्रकर्तीने सार्वजनिक जीवनाचा कप्पा चरित्राच्या मधेच बसविला आहे. वास्तविक भालचंद्रांनी चळवळी उत्पन्न केल्या नाहीत. वैद्यक व्यवसाय हेच आपले प्रमुख कर्तव्य समजून सर भालचंद्र जन्मभर वागले. चळवळी निर्माण झाल्या की,

तारतम्याने त्यांतील ज्या लोकहितावह असतील, त्यांना साह्य करावयाचे असा त्यांच्या जीविताचा नियम होता. परंतु इथे सार्वजनिक जीवनाची पार्श्वभूमी रेखाटताना ऐतिहासिक सत्य निवेदन करण्यात यश आले असले, तरी ऐतिहासिक अभिनिवेश मात्र सुटलेला नाही. भालचंद्र फक्त सार्वजनिक व्यक्ती—एखाद्या यंत्रासारखी सफाईने सामाजिक जीवनात वावरताना दिसते. भालचंद्रांच्या सार्वजनिक कर्तृत्वाचे दर्शन घडवायचे हाच लेखिकेचा मूळ हेतू दिसतो. आणि तो सिद्धीस गेला आहे. चरित्रनायकाने जे काही केले त्यातून तो कसा होता हे सूचित करण्याची दक्षता घेतलेली नाही. केवळ त्याच्या सार्वजनिक कर्तृत्वाचा पाढा वाचणे याच उद्दिष्टात अडकून पडल्यामुळे माणूस म्हणून दारी वावरणाऱ्या भालचंद्रांचे संपन्न व्यक्तिमत्त्व, अकाली पत्नी निधनांनी व अनेक कुटुंबघातांनी घायाळ झालेल्या त्या शांतपुरूषाचे व्यक्तिमत्त्व लेखिकेला दाखविता आले नाही.

खानोलकरांनी विजापूरकरांचे चरित्र (१९२८) त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे सार्वजनिक चरित्र राजकीय पक्षभेदाने विकृत न झालेल्या दृष्टीने पाहून यथातथ्य रेखाटावे या हेतूने लिहिले. हे चरित्र लिहिताना व्यक्तिलिला— लळीत करून भगतवर्ग निर्माण करण्याचा हेतू नसल्याची ग्वाही त्यांनी दिली आहे. या मूळ हेतूला धरूनच चरित्रकाराने विजापूरकरांचे विद्यार्थिदशेतले अपयश स्पष्टपणे नोंदले आहे. ते प्रखर ध्येयवादी, समर्पित जीवन जगणारे, परिस्थितीपुढे न डगमगणारे, परंतु त्याचबरोबर कर्मठ होते हे सांगायला चरित्रकार डगमगलेला नाही. विजापूरकरांनी महत्प्रयासांनी नव्या विद्यालयाची प्राणप्रतिष्ठा करविली, सर महादेव चौबळांसारख्या प्रागतिक विचारांच्या माणसाला हाताशी धरून त्याच्या व्यावहारिक नडी सत्य न सोडता दूर करविल्या, रूष्ट झालेल्या टिळकांना मतभेद स्पष्ट असूनही—राजी राखून आपले काम साधून घेतले. एवढे सर्व त्यांनी साधले पण एक गोष्ट मात्र त्यांना साधता आली नाही आणि ती म्हणजे आपल्या माणसांवर दाब ठेवून त्यांच्याकडून आपले नियोजित कार्य बिनबोभाट घडवून आणणे ही होय. या दोषामुळेच मनात योजलेले शैक्षणिक हेतू अल्पांशानेही त्यांना साधता आले नाहीत, इतक्या स्पष्ट शब्दात विजापूरकरांच्या कार्याचे मूल्यमापन त्यांनी केले आहे. आणि त्याचबरोबर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची नाडी वाचकांच्या हाती दिली आहे.

प्रस्तुत चरित्रात खानोलकरांना विजापूरकरांच्या सार्वजनिक जीवनाचे चित्रण अभिप्रेत असल्यामुळे त्यांच्या सार्वजनिक जीवनाशी निगडित अशी वेदोक्तप्रकरण, कोल्हापूरकरांनी उगवलेला सूड, तुरुंगवास, समर्थ विद्यालयाची स्थापना इत्यादी घटनांची विस्ताराने नोंद झाली आहे. साहजिकच केवळ त्या घटनांच्या प्रतिक्रियेतून आकाराला येणारे व्यक्तिमत्त्व तेवढेच प्रस्तुत चरित्रात टिपलेले आहे.

विजापूरकरांच्या व्यक्तिगत जीवनाला इथे फारच अल्पस्थान लाभले आहे. व्यक्तिविषयक माहिती चरित्राच्या शेवटी थोडक्यात दिली आहे, परंतु स्वभाव-दर्शनाच्या दृष्टीने हा तपशील वाया गेला आहे. चरित्र वाचून हातावेगळे केल्यावर मनावर ठसा उमटतो तो फक्त त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा. विजापूकरांचे पूर्ण व्यक्तिमत्त्व जाणून घेण्याची जिज्ञासा अतृप्तच राहते. विजापूरकरांच्या पूर्ण व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देणाऱ्या चरित्राचे साधन म्हणून या ग्रंथाचे मोल दृष्टीआड करून चालणार नाही.

ना. सि. फडके यांनी लिहिलेल्या ' दादाभाई नवरोजी ' (१९२०) या चरित्रात घटितांची अचूक निवड आणि कलात्मक मांडणी या दृष्टीने टिळक चरित्राच्या आगमनापूर्वीच मराठी चरित्रांचे तंत्रदृष्टचा पुढचे पाऊल पडले होते. याची साक्ष मिळते. बारीकसारीक तपशीलाची नोंद करावयाची, चरित्रनायका-संबंधी देता येईल तितकी अधिकाधिक माहिती द्यावयाची आणि मग त्यातून व्यक्तिदर्शन जसे घडेल तसे घडेल ही पारंपारिक पद्धत फडक्यांनी अव्हेरली आहे. फडके घटितांचा फापट पसारा मांडत नाहीत. चरित्रनायकाच्या जीवनातील क्षण नि क्षण वेचत न बसता त्याच्या जीवनातील काही निवडक क्षण चरित्रातून टिपतात, त्यामुळे आटोपशिरपणा आणि बांधेसूद रचना ही चरित्राची वैशिष्टचे ठरली आहेत. केळकरांचे ' टिळक चरित्र आणि फडक्यांचे ' दादाभाई नवरोजी, ह्या दोन, तीन वर्षाच्या फरकाने प्रसिद्ध झालेल्या चरित्रातील तांत्रिक फरक जाणवल्याशिवाय राहत नाही.

फडक्यांनी व्यक्तिदर्शी घटितांची अचूक निवड करून त्यांची कालक्रमानुसार मांडणी केली आहे. बेवडचाच्या दुकानात दारूडचांचा धिगाणा पाहून बेवडचाच्या थेंबालाही आपण कधी स्पर्श करणार नाही अशी बाल दादीने शपथ घेतली तो प्रसंग किंवा क्रीडांगणावर भांडणाऱ्या व एकमेकाला शिव्या देणाऱ्या मुलांना पाहून अंतर्मुख बनलेल्या दादीने तोंडावाटे अपशब्द म्हणून कधीही निघू द्यावयाचा नाही असा निश्चिय केला, तो प्रसंग– अशा प्रसंगातून चरित्रनायकाच्या कोवळचा व्यक्तिमत्त्वाची जडण घडण फडक्यांनी कौशल्याने रेखाटली आहे.

फडके यांनी अगदी मोजक्या घटितांच्या गुंफणीतून दादाभाईंचे विकसित व्यक्तिमत्त्व उभे केले आहे. इंग्लंडमध्ये सुरू केलेल्या धंद्यात एका युरोपियन नोकरासंबंधाने फेरोजशहा मेहता व होरमसजी वाडिया यांनी सूचना देऊनही दादाभाईंच्या भोळसर स्वभावाने व फाजील विश्वास टाकण्याच्या खोडीनेच त्यांची स्वतःची फर्म बुडाली. बडोदचास दिवाण असताना कारभाराची चौकशी करण्या-करिता नेमलेल्या कमिशनच्या रिपोर्टास दादाभाईंनी उत्तर द्यावे म्हणून मल्हार-रावांनी हट्ट धरला तेव्हा दादाभाईंनी दिलेले उत्तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश

फेकणारे आहे, 'महाराज, विचार करून एखादा निश्चय ठरविला, की त्यापासून मी कालत्रयीही ढळणार नाही. माझे उपनाव दोर्डी सुंभाची दोरी–आहे. मला जाळलात तरी माझा पीळ सुटणार नाही... माझे म्हणणे तुम्हास ऐकायचे नसेल तर बडोदे सोडून मी चालता होतो.' इथे दादाभाईंच्या अनुभवाने परिपक्व झालेल्या व्यक्तिमत्त्वातला आत्मविश्वास व निश्चय प्रत्ययास येतो. राजकन्या लक्ष्मीबाई व सरदार पवार यांच्या खाजगी भांडणाचा फायदा घेऊन रेसिडेंट फेअर यांच्या चिथावणीने उत्पन्न झालेले भयंकर वादळ ज्या चलाखीने दादाभाईंनी मिटविले त्यावरून त्यांचे प्रसंगावधान आणि अचूक निर्णयशक्ती दिसून येते. या देशाबद्दलची त्यांची तळमळ भारतातल्या आणि इंग्लंडच्या पार्लमेन्टमधे त्यांनी केलेल्या भाषणामधून दिसून येते. अशी भाषणे या ग्रंथाच्या पानोपानी विखुरली आहेत.

प्रस्तुत ग्रंथात मधून मधून आत्मनिवेदन करणाऱ्या अवतरणातून फडक्यांनी दादाभाईंच्या मनाचे पापुद्रे हलक्या हाताने उकलले आहेत. टी. पी. ओकॉनॉरच्या मासिकातून त्यांनी दादाभाईंच्या संक्षिप्त चरित्रातला पुढील उतारा उदधृत केला आहे. 'मी लहान असताना एक विचित्र कल्पना माझ्या मनात अगदी पक्की बिंबून गेली होती, आणि अजूनही मला तिचा विसर पडला नाही. मला नेहमी असे वाटे की, माझे वडील मला माझे लहानपणीच सोडून परलोकी गेले म्हणून मला माझे आप्तइष्ट ज्या प्रमाणे प्रेमाने वागवितात त्याचप्रमाणे आकाशातील चंद्रसुद्धा माझ्याशी मोठ्या प्रेमळपणाने वागतो. त्याला माझी केवढी काळजी पहा. मी घराच्या पुढच्या अंगणात असो की, मागच्या गल्लीत जावो, तो आपला सर्वदा माझ्या बरोबर आहे. त्याचे ते निःसीम प्रेम पाहून माझ्या मनाला फार बरे वाटे, आणि अजूनही कोणी माझ्याशी प्रेमाने वागले, की मला फार समाधान होते.' (पृष्ठ ५) लहानग्या दादीच्या या चंद्रविषयक करूण आणि काव्यमय कल्पनेतून प्रेमासाठी भुकेलेल्या त्यांच्या अंतःकरणाची ओळख पटते. प्रोफेसर झाल्यावर दादाभाईंना वाटलेली धन्यता पुढील शब्दात व्यक्त झाली आहे. 'माझ्या जन्माच्या अवधीत मला अनेक सन्मानाच्या जागा मिळाल्या, परंतु 'प्रोफेसर' म्हणवून घेण्यास मला जी धन्यता वाटे. ती दुसऱ्या कोणत्याही पदवीत अगर जागेबद्दल मला वाटली नाही.' (पृष्ठ २२) इंग्लंडमधील १९०७ सालचे दुखणे अखेरचे समजून मायदेशी परतण्यासाठी त्यांना जी ओढ लागली, ती त्यांच्या मायदेशावरच्या भक्तीची निदर्शक आहे. 'मला माझ्या देशात जाऊन मरू द्या, या बाबतींत माझे मन वळविण्याचा जो प्रयत्न करील त्याला मी शत्रू समजेन, माझ्या अस्थी माझ्या परमप्रिय मायभूमीतच पडल्या पाहिजेत.' दादाभाईंच्या अंतरंगाची ओळख पटवून देणारी अशी काही विधाने फडक्यांनी मोठ्या खुबीने मधून मधून विखुरली आहेत.

वाचकांची उत्कंठा वाढविण्याचे कथा कादंबरीतले आपले कसब फडक्यांनी प्रस्तुत चरित्रातही वापरले आहे. रिपोर्टाला उत्तर देण्यावरून दादाभाई व मल्हारराव या दोघात उत्पन्न झालेला संघर्ष, फेअरवर झालेला विषप्रयोग वा राजकन्या लक्ष्मीबाईचे प्रकरण या घटनांचे वर्णन वाचकांची उत्कंठा वाढविणारे आहे.

प्रस्तुत चरित्रात चित्रित झालेली राजकीय पार्श्वभूमी आटोपशीर आहे. या पार्श्वभूमीचा केंद्रबिंदू आहे, दादाभाई नवरोजी, इथे वाचक आणि चरित्र नायक यामधे पार्श्वभूमीचा पडदा सतत उभा राहत नाही. कारण, इथे चित्रित झालेल्या पार्श्वभूमीला मर्यादा आहे ती दादाभाईंच्या जीवन परिघाची. त्या मर्यादेतच ती पार्श्वभूमी चित्रित होते. इथे पार्श्वभूमी चित्रित होत असताना दादाभाईंची व्यक्ती वाचकांच्या डोळ्यापुढे उभी करण्याची खबरदारी चरित्रकाराने घेतली आहे. व्यक्ती आणि पार्श्वभूमी यांच्या चित्रणात समतोल साधणारे जे काही थोडे चरित्रकार आहेत त्यात फडके यांचा समावेश होतो.

प्रस्तुत चरित्राने लिट्न स्ट्रॅचीच्या ' व्हिक्टोरिया राणी ' च्या चरित्राइतकी उंची गाठली नसली, तरी फडके यांनी अवलंबिलेले तंत्र मात्र काही प्रमाणात स्ट्रॅचीच्या वळणावर गेले आहे.

ऐतिहासिक, राजकीय वा सामाजिक पार्श्वभूमी आवश्यक असलेल्या या चरित्रांच्या संदर्भात काही विचार सुचतात ते असे :

१) या चरित्रातून व्यक्तींना प्राधान्य न येता बाह्य घटनांना प्राधान्य येऊ लागले. व्यक्तीपेक्षा पार्श्वभूमीला प्राधान्य मिळाल्यामुळे इतिहास चरित्राला मागे ढकलून पुढे येतो. ऐतिहासिक अभिनिवेश टाळून व्यक्ती आणि पार्श्वभूमी यांचे प्रमाणबद्ध चित्रण थोडयाच चरित्रकारांना साधले आहे.

२) व्यक्तिचित्रणापेक्षा पार्श्वभूमीला प्राधान्य देणाऱ्या ऐतिहासिक पद्धतीने लिहिलेल्या चरित्रात, विस्तृत पार्श्वभूमी आणि माहिती पुरविण्याचे धोरण यामुळे कला विघातक शास्त्रीय दृष्टी जोपासली गेल्याचे दिसून येते.

३) साहजिकच चरित्राची मांडणी करण्याची काही एक कलात्मक पद्धत असू शकते हा विचारच या चरित्रकारांच्या मनात डोकावत नाही. चरित्रनायकाची पत्रे, दैनंदिनी, आठवणी वगैरे चरित्राची साधने चरित्राच्या शेवटी परिशिष्टाच्या रूपाने स्वतंत्र प्रकरणात देणे, त्याच्या स्वभाववर्णनासाठी स्वतंत्र प्रकरणाची आणि तिही शेवटी योजना करणे इत्यादि प्रकार प्रथितयश लेखकांनी लिहिलेल्या चरित्र-ग्रंथातही आढळतात. कथा कादंबरीप्रमाणेच चरित्रात चरित्रविषय व्यक्तीचे स्वभावचित्रण विविध प्रसंगातून आपोआप व्हावयास पाहिजे. चरित्रकाराच्या निवेदनापेक्षा व्यक्तिदर्शी घटिते अधिक बोलकी ठरतात. तेव्हा विविधसाधने

काळजीपूर्वक तपासून, आपला विषय पूर्णपणे आत्मसात करून व या साधनाद्वारे उपलब्ध झालेल्या व्यक्तिदर्शी घटितांची निवड करून, ती निवेदनाच्या ओघात कालक्रमानुसार एकजीव करून टाकली, की त्यातून एक सलग व सुश्लिष्ट मूर्ती आकाराला येते. हा सारा व्यक्तिदर्शी तपशील मन मानेल तसा एकत्र नोंदल्यामुळे चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे यथार्थदर्शन या चरित्रकारांना शक्य असूनही घडविता आले नाही.

४) कलादृष्टचा विघातक असा आणखी एक दोष या चरित्रातून आढळतो. बहुतेक चरित्रकार नायकाच्या जीवनाचे विविध कप्पे कल्पून त्याच्या कर्तृत्वाचे तुकडे पाडून ' वाङ्मयात्मक कामगिरी,' ' राजकारणातील कामगिरी,' ' धंद्यातील कौशल्य ' अशा सदराखाली ते निरनिराळ्या प्रकरणामधून वर्णन करण्यात येते. हे कप्पे जुळवून एक व्यक्ती नजरेसमोर धरणे कठीण होऊन बसते. चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा वाचकांवर होणारा एकसंध परिणाम साधला जात नाही. व्यक्तीचे खाजगी, व्यक्तिगत जीवन व निरनिराळ्या क्षेत्रातील सार्वजनिक जीवन हे क्रियाप्रतिक्रियांनी परस्परात इतके गुंतलेले असते, एकजीव झालेले असते, की त्याचे असे कप्पे निर्माण करू पाहणे म्हणजे कृत्रिमतेची परमावधी होय. व्यक्तीच्या जीवनाचा तपशील एकाच मुशीत कौशल्याने जिरवून त्या जीवनाचे वर्णन एकजिनशी एखाद्या कादंबरीप्रमाणे स्वाभाविक ओघाने वाहणारे, असेच झाले पाहिजे.

५) व्यक्ती आणि पार्श्वभूमी, यांच्या समतोल रचनेतून, जीवनदर्शनातून आणि स्वभाव दर्शनातून चरित्राला वाङ्मयीन घाट येतो. पार्श्वभूमीचे असमतोल चित्रण करून व्यक्तिगत जीवनाला गौण स्थान देणाऱ्या व स्वभावदर्शनाकडे दुर्लक्ष करणाऱ्या चरित्रांचा वाङ्मयीन घाट बिघडलेला आहे ही गोष्ट इथे मुद्दाम लक्षात घेतली पाहिजे.

## व्यक्तिगत जीवन चित्रित करणारी चरित्रे (त्रयस्थांनी लिहिलेली)–

निबंधमालेतून विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी लिहिलेल्या डॉ. जॉनसनच्या चरित्राने (१८७६) आधुनिक मराठी चरित्रलेखनाला प्रारंभ झाला. मराठी चरित्रकारात येथून पुढे मूल्यविषयक जाणीव हळूहळू निर्माण होत गेली. प्रस्तुत चरित्रात तंत्रविषयक दोष असला तरी चरित्र आणि चरित्र नायक याकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन या चरित्राने दिला. एक कलात्मक वाङ्मयप्रकार या दृष्टीने चरित्राकडे पाहण्याचा हा पहिलाच प्रयत्न. व्यक्तिदर्शी घटितांची अचूक निवड हे या चरित्राचे वैशिष्ट्य आहे. डॉ. जॉन्सनच्या संबंधाने अव्वल दर्जाची विपुल सामग्री उपलब्ध होती. परंतु सामग्री इतकी असतानाही मराठीत लिहिताना फार विस्तार न करता जॉन्सनची व्यक्ती त्याच्या स्वभावगुणांसह वाचकांच्या मनश्चक्षूपुढे जिवंत उभी राहील इतक्या पुरताच तपशील मार्मिकपणे निवडून

काढण्यात मालाकारांचा कलात्मक संयम व तरतमभाव उत्कृष्ट रीतीने व्यक्त झाला आहे. प्रस्तुत चरित्रात शास्त्रीबुवांनी उपलब्ध झालेल्या तपशीलाचा केवळ अर्क उतरविला आहे. मधून मधून समयोचित संस्कृत सुभाषितांची, पखरण करून त्यांनी निवेदनात वेधकता आणली आहे. हे चरित्र उभे राहते ते डॉ. जॉनसनच्या जीवनाश्रयाने, त्यामुळे या चरित्राला वाङ्मयीन घाट लाभलेला आहे. आपल्या चरित्रकाराने चेहऱ्यावरच्या चामखीळसह आपले चित्र रेखाटावे असा डॉ. जॉनसनचा आग्रह होता. इथे चरित्रकाराने बॉसवेलने लिहिलेल्या डॉ. जॉनसनच्या चरित्राचा आदर्श अनुसरल्यामुळे चरित्रनायक जसा होता तसा तो चित्रित होतो. चरित्र-नायकाचे गुणदोषमिश्र जिवंत व्यक्तिमत्त्व साकार होते. शास्त्रीबुवांनी जॉनसनच्या बुद्धिमत्तेबद्दल जितक्या स्पष्टपणे लिहिले आहे. तितक्याच स्पष्टपणे त्याच्या रानवटपणाबद्दल, त्याने आयुष्यात एक, दोनदा टाकलेल्या वाकड्या पावलाबद्दल लिहिले आहे. प्रस्तुत चरित्रात डॉ. जॉनसन एक माणूस म्हणूनच वाचकांच्या डोळ्यापुढे उभा राहतो. माणसाबद्दलच माणसाच्या जीवनाबद्दल उत्कट आस्था बाळगणाऱ्या मराठी चरित्रांना चालना देण्याचे श्रेय चिपळूणकरांना देणे संयुक्तिक ठरेल.

प्रस्तुत चरित्रातला तंत्रविषयक दोष असा, की शास्त्रीबुवांनी जीवनकथा, स्वभावदर्शन व बोधग्रहण अशी चरित्राची विभागणी केली आहे. स्वभावदर्शन घडविणारा तपशील द्विरूक्ती टाळून मूळ जीवनकथेत मिसळून देणे आवश्यक होते. चरित्रनायकाचे व्यक्तिदर्शन यथार्थपणे घडविल्यानंतर बोधग्रहण आपोआपच होते. त्यासाठी स्वतंत्र प्रकरणाची आवश्यकता उरत नाही. इंग्रजी राष्ट्राचे जे गुण जॉनसनच्या ठायी प्रतिबिंबित झाले होते त्यांची चर्चा करणाऱ्या प्रकरणाची शास्त्री-बुवांना त्यांच्या राष्ट्रीय वृत्तीमुळे आवश्यकता वाटली असली तरी त्यात पुनरूक्ती फार आहे.

खंडेराव भिकाजी बेलसरे यांनीही विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे चरित्र (१८९१) लिहिले आहे. या चरित्रात बेलसरे यांनी ' गंडस्योपरिपिटका संवृत्ता ' (पृष्ठ ३३) यासारख्या संस्कृत वाक्यांशांचा उपयोग केला आहे. क्वचित् ते शब्दांची अशुद्ध रुपे वापरतात. उदा: काळक्षेप (स्कॉलर्शिप), गलासात, झेपून नेणे, टेर उडवून देणे इत्यादी, बेलसरे यांची भाषा हा एक टीकेचा विषय होऊ शकेल. परंतु प्रस्तुत चरित्रात प्रामुख्याने मूल्यविषयक दृष्टिकोनातून चरित्रे तपासून पाहावयाची असल्यामुळे तूर्त एवढी नोंद पुरे. प्रस्तुत चरित्रलेखनाला अपुऱ्या माहितीमुळे मर्यादा पडली आहे, ल. कृ. चिपळूणकरांसारखा विपुल व्यक्तिदर्शी तपशील बेलसरे यांना उपलब्ध झाला नाही. तथापि जो काही तपशील उपलब्ध झाला त्यातून शास्त्रीबुवांच्या व्यक्तिमत्त्वाचे काही पैलू व्यक्त

करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. मिळालेल्या माहितींचे मनन करून चरित्र-नायकाचे शील, त्याचे वर्तन, त्याची मते व त्याची लेखनसरणी इत्यादिकांविषयी जी तसबीर चरित्रकाराच्या कल्पनाशक्तीला दृग्गोचर झाली, ती तशीच्या तशीच त्यांनी वाचकांच्या दृष्टीपुढे धरली आहे.

बेलसरे यांनी पहिल्या ५७ पृष्ठात शास्त्रीबुवांच्या जीवनकथेचा धावता आढावा घेतला आहे व पुढे क्रमाक्रमाने त्यांचे स्वभावदर्शन घडवून त्यांची मते, त्यांची लेखनसरणी यांविषयी उहापोह केला आहे.

चरित्रकाराने शास्त्रीबुवांच्या जीवनकथेचे निवेदन तटस्थपणे केले आहे. विष्णुशास्त्री अभ्यासू असले तरी त्यांच्या बुद्धीचे तेज विश्वविद्यालयांत दिसून आले नाही, हे प्रांजळपणे नमूद केले आहे. शिक्षक या दृष्टीने त्यांचे अपयश तितक्याच स्पष्ट शब्दात नमूद केले आहे. ' शिक्षकांच्या ठिकाणी जे गुण असावे लागतात, त्यांचे नेमस्त वास्तव्यही त्यांच्या ठिकाणीदिसून आले नाही. आधी ते वर्गात आले आणि सर्व काही व्यवस्थेशीर असले तर ठीक, मग शिकणे साधारणपणे बरे होई. परंतु मुले जर का गोंधळ करू लागली व त्यांची शिकण्याची लहरच लागत नसली म्हणजे आटपले. शास्त्रीबुवांनी आपले सांगत जावे, काही बोलत असावे, आणि ज्यांना ऐकावयाचे असेल त्यांनी ऐकावे असा प्रकार असे. किंबहुना मले गडबड करू लागताच शास्त्रीबुवांनी आपली खुर्ची फिरवून, एखादे हातात असलेले पुस्तक वाचीत बसावे, असेही केव्हा केव्हा घडल्यावाचून राहत नसे. वरिष्ठांशी न पटल्यामुळे सरकारी शाळेत त्यांचे मन लागले नसेल, तेव्हा तेथली गोष्ट एक राहो, पण स्वतःच्या नव्या शाळेतही सरासरी हीच तऱ्हा. ' गुण-दोषांची चर्चा करताना शास्त्रीबुवांची आत्मश्लाघा, घमेंड, अवडंबर आणि निष्ठुर भाषासरणी या दोषांची नोंद स्पष्ट शब्दात झाली आहे.

शास्त्रीबुवांच्या ज्या बाणेदार, सतेज विचारांची पखरण त्यांच्या निबंध-मालेतून आढळते त्यांचे मूळ ज्या घटितांमधे आहे, त्यांचीही नोंद इथे झालेली आहे. भिडस्त, मायाळू, नाना फडके म्हणून एक गरीब वयोवृद्ध गृहस्थ, त्यांच्या लोभातले होते. या गृहस्थांनी आपल्या लहानपणी पेशवाईचा शेवटला भाग पाहिला होता व हे शास्त्रीबुवांच्या लहानपणी त्यांस आपल्या आठवणीच्या पेशवाईच्या गतवैभवाच्या गोष्टी सांगत व सांगता सांगता सद्‌गदित होऊन म्हाताऱ्याच्या डोळ्यातून वारंवार टिपे गळत. या गोष्टी शास्त्रीबोवास मनापासून आवडत व पुन्हा पुन्हा सांगण्याविषयी ते त्यांची विनवणी करीत. या गोष्टींनी पूर्वीच्या वैभ-वाची बरीच कल्पना होऊन देशाभिमानाच्या अंकुरास आरंभी खतपाणी मिळाले. (पृ० ६१) पुढे पुढे कृष्णशास्त्री व त्यांचे मित्र यांची सामाजिक, राजकीय विषया-वर चर्चा सुरू झाली म्हणजे शास्त्रीबुवांनी माडीतील खोलीत खुशाल खुर्ची टाकून

बसावे आणि दाराच्या फटीतून त्यांचे संवाद ऐकावेत असे होत असे. परंतु असा व्यक्तिदर्शी तपशील बेलसरे यांना फारच थोडा उपलब्ध झाला, त्यामुळे चरित्र वाचून हातावेगळे केल्यावर शास्त्रीबुवांच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडल्याचे समाधान लाभत नाही. ल. कृ. चिपळूणकरांनी लिहिलेले शास्त्रीबुवांचे चरित्र प्रसिद्ध होईतोपर्यंत या चरित्राने वाचकांची दुधाची तहान ताकावर भागली एवढेच.

एका गुजराथी गृहस्थाने चिपळूणकरांनी शाळा सोडली याचा उल्लेख करून आपल्या मित्राला वरिष्ठांशी जुळते घेऊन वागण्याचा सल्ला देणाऱ्या गुजराथीत लिहिलेल्या पत्राचाही समावेश प्रस्तुत चरित्रात केला आहे.

बेलसरे यांनी स्वीकारलेले तंत्रच मुळात सदोष आहे. चरित्रनायकाची जीवनकथा टाळून गुणदोषांची चर्चा त्यांनी स्वतंत्ररीत्या केली आहे. त्यामुळे व्यक्तिदर्शी तपशील त्यांनी व्यर्थ दवडला आहे. अपुरी माहिती आणि सदोष तंत्र यामुळे चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्व आकार घेत नाही.

मुजुमदारांनी लिहिलेले अण्णासाहेब किर्लोस्करांचे चरित्र वाचून अण्णासाहेब रंगेल, हौशी, उदार, मानी आणि अंगीकृत कार्याशी तन्मय होणारे होते इत्यादी त्यांचे गुणविशेष लक्षात येतात. पण ज्या किर्लोस्करांनी संगीत नाट्यकला पूर्णावस्थेस पोहोचविली त्यांचे नाट्यलेखन आणि नाट्यतंत्र यात बदल घडवून आणताना कसाला लागलेले व्यक्तिमत्त्व प्रस्तुत चरित्रात सलगपणे व समर्थपणे उभे राहत नाही. याचे कारण या चरित्राची रचना काहीशी विस्कळित झाली आहे. मुजूमदारांना अनावश्यक वगळून आवश्यकाची निवड नीट जमलेली नाही. पत्रे, वर्तमानपत्रातले लेख, काव्य, प्रशस्तीपत्रके यांचा त्यांनी भरपूर उपयोग केला आहे. परंतु यात भारूडभरताडच जास्त आहे. सुटया सुटया विखुरलेल्या घटितातून नायकाच्या व्यक्तिमत्त्वाची रूपरेषा स्पष्ट होत नाही. व्यक्तिविशेषांच्या सूत्राने बांधलेली घटितांची एकात्मता इथे आढळत नाही.

नाट्यलेखन आणि तंत्र यांत किर्लोस्करांनी नेमका कोणता बदल घडवून आणला हे समजण्याच्या दृष्टीने तत्पूर्वीच्या नाट्यलेखनाचा इतिहास संक्षेपाने सादर करणे आवश्यक होते. परंतु चरित्रकाराने हा इतिहास ग्रंथारंभीच वाजवी-पेक्षा अधिक दिला आहे. त्यामुळे कधी एकदा अण्णांचे चरित्र सुरू होते असे अण्णांचे जीवन जाणून घेण्यास उत्सुक झालेल्या वाचकास वाटल्यास त्यात नवल नाही. संगीत शाकुंतलाचा प्रयोग पाहिलेल्या प्रेक्षकांची प्रतिक्रिया व्यक्त करण्या-करिता वर्तमानपत्रातल्या पत्रव्यवहाराचा उपयोग चरित्रकाराने केला आहे. लोकमताची प्रतिक्रिया कळण्यापुरता या पत्रव्यवहाराचा उपयोग मर्यादित व्हायला हवा होता. शाकुंतलाच्या निमित्ताने नाट्यव्यवसायाशी निगडित असलेल्या सामाजिक आणि व्यावहारिक प्रश्नांचा काही विचार या पत्रव्यवहारातून होत आहे

असे भासले तरी तो बराचसा मूलभूत स्वरूपाची चर्चा करण्याऐवजी आकसाने लिहिलेला आणि वाचकांचे चरित्रनायकावरचे अवधान विचलित होईल इतका दीर्घ आहे. व्यक्ती चित्रणाला आवश्यक इतक्याच पत्रव्यवहाराचा उपयोग होणे आवश्यक होते. पण चरित्रकाराला हे अवधान न उरल्यामुळे या पुस्तकात काही ठिकाणी पाल्हाळ ठळकपणे आढळतो.

बेळगावला शिक्षक असताना आळस, रंगेलपणा, मंडळी, गाणे वाजविणे इत्यादी शोकामुळे किर्लोस्करांच्या नोकरीत नियमितपणा नव्हता असे निर्भीड विधान करणारा स्पष्टवक्तेपणा अखेरीपर्यंत टिकून राहिला नाही. अण्णासाहेबांच्या विधवा पत्नीच्या भावना दुखू नयेत म्हणून चरित्रकाराने कशी झाकपाक केली आहे, याचे कोल्हटकरांनी दाखवून दिलेले उदाहरण चरित्रातले सत्य या प्रकरणात दिलेले आहेच. तो प्रसंग या चरित्रात आढळत नाही.

हे एक नायकाच्या व्यक्तिमत्त्वाची पुरेशी दाद न घेणारे चरित्र आहे.

सौ. काशिबाई कनिटकरांनी लिहिलेले ' डॉ. आनंदीबाई जोशी (१९१२)हे चरित्र उभे राहते ते त्यातल्या जीवनाश्रयाने. किंबहुना या चरित्राला वाङ्मयीन-रूप लाभले आहे, ते त्यातल्या जीवनस्पर्शांमुळेच, वाङ्मयनिर्मिती ही जीवनाश्रयी घटना आहे, याचा प्रत्यय प्रस्तुत चरित्रात पुरेपूर येतो. आनंदीबाईंनी गोपाळ-रावांच्या इच्छेप्रमाणे निश्चय, धाडस, चिकाटी इत्यादी गुणांच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देऊन आपला शैक्षणिक उत्कर्ष साधला, या गोष्टीला त्यांच्या चरित्रात महत्त्वाचे स्थान लाभले आहे. हे जीवनदर्शन होत असताना स्थलकालाच्या मर्यादेत जखडून राहाणाऱ्या क्षणजिवी भागाचे चित्रण इथे झालेले नाही. काशिबाई कुठेही स्त्री शिक्षणावर भाष्य करीत नाहीत. स्त्रीशिक्षणाची परिस्थिती कशी होती वगैरे तपशीलात शिरत नाहीत. कथानकाच्या ओघात योग्य तेथे योग्य तो उल्लेख करीत जातात. त्यामुळे आनंदीबाईंच्या चरित्रात आनंदीबाईंच्या जीवना-व्यतिरिक्त अन्य गोष्टींना स्थान लाभत नाही. आणि सुरुवातीपासून शेवटपर्यंत आनंदीबाई ही व्यक्ती वाचकांच्या डोळ्यापुढे सतत उभी राहते. याचा अर्थ असा नव्हे की, या चरित्रात अन्य व्यक्ती येत नाहीत. अन्य व्यक्ती येतात पण त्यांचा आनंदीबाईंच्या जीवनाशी जेवढा संबंध तेवढ्या पुरत्याच आणि त्यातही विशेष असा, की त्या व्यक्तींच्या निमित्ताने जीवनातल्या शाश्वत भागाचे चित्रण होते: त्यांच्या निमित्ताने मानवी स्वभावाचे काही पैलू सहज उजळून निघतात. स्वतः लहान राहून पत्नीला मोठी करणारे, विरह असह्य होऊन टिपे गाळणारे, आणि अखेरच्या दुखण्यात अहोरात्र शुश्रूषा करणारे, गोपाळराव. प्रवासात आनंदीबाई स्वधर्मपराङ्मुख होण्यास तयार होत नाही म्हणून जळफळणारे जॉनसन पती–पत्नी, अमेरिकेला जाताना आनंदीबाईंच्या एकटेपणाचा फायदा घेऊन,

खालच्या डेकवर यंत्रे दाखविण्याच्या निमित्ताने नेऊन भ्रष्ट करण्याच्या प्रयत्नात असलेला बोटीचा इंजिनियर. वरवर गोड बोलणाऱ्या पण मनातून आनंदीबाईला बाटविण्याची इच्छा बाळगणाऱ्या व मनाप्रमाणे होत नाही म्हणून आनंदीबाईच्या जेवणाखाण्याचे हाल करणाऱ्या फिलाडेल्फिया कॉलेजच्या डीन मिस रिचेल बॉडले आणि ज्या देशातल्या रिचेल बॉडले व जॉनसन पतिपत्नी त्याच देशातल्या कारपेन्टर मावशी. पण त्यांनी आनंदीबाईंना फार लोभ लावला, त्यांच्या बऱ्या-वाईटाची चिंता वाहिली. राग, लोभ, प्रेम, द्वेष आदींच्या आहारी गेलेली ही माणसे चरित्राला जिवंतपणा आणतात.

प्रस्तुत चरित्रातून व्यक्त होणारे आनंदीबाई व गोपाळराव यांचे भावजीवन हा या जीवनदर्शनाचा आणखी एक स्तर. विरहाची भावना व्यक्त होताना हे भावजीवन अधिकच गहिरे झाले आहे. दोघांनी एकमेकाला लिहिलेल्या पत्रांतून परस्परांबद्दलच्या भावना मोकळ्या मनाने व्यक्त झाल्यामुळे एक प्रकारचे भावमधूर वातावरण या चरित्राला व्यापून राहिले आहे. हे चरित्र कादंबरीइतकेच चटकदार होते ते या भावजीवनाच्या मुक्त आविष्कारामुळे.

आनंदीबाईच्या जीवनप्रवाहांतर्गत कारुण्याचा एक अंत:प्रवाह सतत स्त्रवतो आणि अखेरीस मूळ प्रवाहाला झाकळून टाकतो. हरघडीला दैव त्यांची सत्त्व परीक्षा पाहते. आनंदीबाईंचे जीवन म्हणजे अडथळ्याची शर्यत. एका प्रसंगातून मार्ग काढावा तो दुसरा प्रसंग दत्त म्हणून उभा राहतो. हिंदुस्थानात निदान गोपाळराव तरी होते, पण परदेशात एकाकी, असाह्यपणे मुकाबला करावा लागला. खडखडीत उपास काढावे लागले. परिस्थितीवर मात करण्यात त्यांच्या साऱ्या शक्तीचा क्षय होतो. आणि अखेरीस परिस्थितीवर विजय मिळविल्याचे समाधान लाभते न लाभते तोच क्षयाने त्यांचा अंत होतो. त्यांचा अंत ही एक शोकान्तिका ठरते ती या अर्थाने.

आनंदीबाईंच्या संबंधी त्यांच्या आप्तस्वकीयांकडून माहिती मिळवून व पत्रे, रोजनिशी या सारख्या अस्सल साधनांचा उपयोग करून हे चरित्र लिहिले असल्यामुळे त्याच्या विश्वसनीयतेचे मोल वाढले आहे, पत्रातून आनंदीबाईंचे भावजीवन तर डोकावतेच, पण त्यांच्या अंतरंगाचेही दर्शन घडते. आनंदीबाईंच्या पतीबद्दलच्या भावना, मनोविकास व बौद्धिक झेप या पत्रांतून प्रकट होते. पत्रातली आत्मनिवेदने हा या चरित्राचा फार मोठा आधार आहे. पत्रातल्या आत्मचरित्रात्मक घटकांचे अस्तित्व या चरित्राला वरदान ठरले आहे. कारण, इथे कथाप्रवाहात पत्रे अशा काही कौशल्याने मिसळली आहेत, की आनंदीबाईंच्या शब्दातच त्यांची जीवनकथा उलगडली जाते.

भाषेच्या स्त्रीसुलभ सहजसुंदरतेमुळे, जिव्हाळ्यामुळे हे चरित्र विशेष सरस उतरले आहे.

कै. साने गुरूजींना चरित्राकडे पाहण्याची आधुनिक दृष्टी लाभलेली होती याचे प्रत्यंतर १९२) मधे लिहिलेल्या इतिहासाचार्य राजवाडे यांच्या चरित्रात सापडते, लिटन् स्ट्रॅचीची पद्धत पचवून मग त्याच्यासारखी कृती तयार करण्याची जिद्द त्यांनी इथे बाळगलेली दिसते. स्ट्रॅचीचा कलात्मक संयम गुरुजीना शक्य झाला, म्हणूनच इतकी बांधेसूद आटोपशीर कृती त्यांना निर्माण करता आली, एका छोटयाशा आकृतीबंधात राजवाडयांच्या व्यक्तिमत्त्वाचे अणुरेणू सजीव करण्याची किमया त्यांना साधली. व्यक्तिदर्शी घटितांची अचूक निवड व कलात्मक मांडणी यामुळे त्यांना सफाईदार रचना तर साधलीच, पण त्याच बरोबर स्वधर्म, स्वभाषा, स्वदेश यांच्याबद्दलची जिवंत कळकळ व अकृत्रिम प्रेम बाळगणारे. सभोवताली नैराश्यतिमिर पसरलेले पाहून संतापणारे, एकाकी कार्य करीत राहणारे, नि:स्वार्थी, नि:स्पृह, दणकट प्रकृतीचे राजवाडे उभे करण्यात यश मिळविता आले. प्रस्तुत चरित्रात पृष्ठ ७९ वर अगदी मोजक्या शब्दात रेखाटलेले राजवाडयांचे शब्दचित्र प्रत्ययकारी उतरले आहे. या चरित्रात राजवाडयांचे व्यक्तिमत्त्व तर आकार घेतेच पण त्यांच्या इतिहाससंशोधन, समाजशास्त्र व भाषाविषयक कर्तृत्वाचीही नीट कल्पना येते. इथे राजवाडयांच्या शब्दातच त्यांचे जीवनदर्शन घडविले आहे. राजवाडयांचे मनोगत व्यक्त करणारे काही परिच्छेद त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर लख्ख प्रकाश फेकतात.

प्रस्तुत चरित्रात सानेगुरुजींजवळील भावनेची संपन्नता, शैलीची सफाई यांना ओघवती भाषा व सरळ निवेदनाची जोड मिळाली आहे.

सानेगुरुजींनी जी चरित्रे लिहिली, ती सारी अतिरिक्त गौरवापायी उणीच आहेत. परंतु त्या सर्वात त्यांचे राजवाडयांचे चरित्र तटस्थपणे लिहिलेले आहे.

वेणूबाई पानसे यांनी लिहिलेल्या हरिभाऊ आपटे यांच्या चरित्रात कौटुंबिक जीवनास प्राधान्य मिळाले आहे. साहित्यिकाचे ग्रंथ व त्याचे जीवन यांचा आत्यंतिक संबंध असतो, हे पानसे यांचे मत. साहजिकच प्रस्तुत चरित्रात हरिभाऊंच्या जीवन-कथेचे निवेदन करताना व्यक्तिगत जीवनाचा विपुल तपशील भरलेला आहे. जिथे असा तपशील येतो तिथे हिरवळीच्या जागा निर्माण होतात. पण मधूनच वाङ्मयीन चर्चेचे रुक्ष कोरडे पट्टे अलिशान बंगल्याच्या शेजारीच झोपडी असावी तसे उमटले आहेत. त्यामुळे या हिरवळीचे सौन्दर्य धोक्यात आले आहे. पहिल्या चार प्रकरणातले जीवनदर्शन वाचकांच्या मनाची घट्ट पकड घेते. ओघवती भाषा व गतिमान निवेदन यामुळे या भागात हरिभाऊंच्या जीवनकथेला प्रवाहित्व लाभले आहे. हरिभाऊंचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व कसे घडत गेले याची कल्पना यावी असा मजकूर इथे नोंदला गेला आहे. लहानपणीच आई वारल्यामुळे नि:स्वार्थी, स्वर्गीय मातृप्रेमासाठी हरिभाऊंचे हृदय तळमळतच राहिले. स्वत: मातृविहीन असता

मातृप्रेमाची नितान्तरम्य चित्रे त्यांनी आपल्या कादंबऱ्यात रेखाटली आहेत. प्रेमळ व कर्तव्यनिष्ठ मातांची सुंदर चित्रे रंगवून त्यांनी आपल्या कादंबऱ्यांत मातृप्रेमाची आपली अपुरी राहिलेली हौस पुरी करून घेतलेली दिसते. हरिभाऊंचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे साहित्य यांचे अन्योन्यसंबंध इथे जसे स्पष्ट झाले आहेत तसे ते हा खळखळणारा जीवनौघ अडविणाऱ्या, केवळ वाङ्मयीन चर्चा करणाऱ्या प्रकरणातून होत नाही. एका म्यानात दोन तरवारी राहत नाहीत. व्यक्तिचित्रण व वाङ्मयीन चर्चा ही दोन उद्दिष्टे एकाच वेळी साध्य होणे मुळातच अशक्य. हरिभाऊंच्या सामाजिक, ऐतिहासिक कादंबऱ्यांची केवळ वाङ्मयीन चर्चा करणाऱ्या स्वतंत्र प्रकरणातून व्यक्तिचित्रणाचे उद्दिष्ट बाजूला सारले गेले आहे. त्यामुळे प्रस्तुत चरित्र हरिभाऊंचा जीवनौघ तेलाच्या धारेप्रमाणे अतूट राहत नाही.

प्रस्तुत चरित्रातल्या व्यक्तिचित्रणाच्या परिणामैक्याला बाधा आणणारा या चरित्राचा आणखी एक दोष असा, की हारिभाऊंचे स्वभावदर्शन त्यांच्या जीवन-कथेपासून वेगळे काढून स्वतंत्र प्रकरणात घडविले आहे. हा तपशील जीवनकथेत निवेदनाच्या ओघात सामावून टाकणे आवश्य होते. म्हणजे हरिभाऊंचे व्यक्तिचित्रण आहे त्यापेक्षा अधिक ठळक झाले असते. व्यक्तिचित्रणाच्या या चुकीच्या पद्धतीमुळे या ग्रंथाला एकपिंडता राहिली नाही.

डॉ. आनंदीबाईंच्या चरित्राप्रमाणे एक सलग जीवनपट या चरित्रात वाचकांच्या डोळ्यापुढे उभा राहत नाही. याचे आणखी एक कारण असे, की या चरित्रात घटितांची मांडणी कालक्रमानुसार झालेली नाही. चरित्रनायकाच्या जीवनाचे महत्त्वाचे कालखंड करून त्यातील माहिती संकलित रीतीने तेवढ्या पुरती एकत्र करून देण्याचा प्रयत्न झाला आहे. साहजिकच या चरित्रात हरिभाऊंचे जीवन प्रकट होते ते जीवनकथा, स्वभावदर्शन, वाङ्मयीन कामगिरी, सार्वजनिक कामगिरी अशा कप्प्याकप्प्याने हरिभाऊंच्या जीवनाचे हे तुकडे जुळवून एक व्यक्ती नजरेसमोर धरणे अवघड होते.

हरिभाऊंच्या दुसऱ्या विवाहाच्या संदर्भात समर्थनाचा सूर जाणवतो. पण असे उदाहरण एखादेच. हरिभाऊंचे चुलते अण्णासाहेब आपटे यांच्या व्यसनाधीन जीवनाच्या संदर्भात या चरित्रातल्या सत्यकथनाची धार जाणवते.

चरित्रनायकाच्या व्यक्तिगत जीवनाचा विपुल तपशील उपलब्ध असूनही असमाधानाला वाव देणारे असे हे चरित्र आहे.

चरित्रनायकाच्या व्यक्तिगत जीवनाचे चित्रण करणारी, त्रयस्थांनी लिहिलेली ही सारीच चरित्रे नायकाच्या व्यक्तिगत जीवनाचे दर्शन घडवितात. अभिनिवेश-टाळून चरित्रनायक अथवा नायिका प्रत्यक्षात जसे होते तसे दाखविण्याचा प्रामाणिक प्रयत्न या चरित्रातून झाला आहे. परंतु प्रत्यक्ष सहवासाच्या अभावी या चरित्र-कारांना चरित्रविषय व्यक्तींच्या अत्यंत खाजगी कौटुंबिक जीवनाचा सूक्ष्म तपशील

उपलब्ध होऊ शकला नाही. वास्तवातील तुटलेले दुवे संदर्भाच्या आणि पुराव्याच्या भक्कम आधारावर सांधता न आल्यामुळे या चरित्रातल्या जीवनदर्शनाला, व्यक्तिदर्शनाला घनता येत नाही. चरित्रनायकाच्या जीवनाची कलात्मक अभिव्यक्तीही त्यांना जमलेली नाही. कित्येकदा जीवनदर्शन आणि व्यक्तिदर्शन यांची फारकत झाल्यामुळे व्यक्तिदर्शनाचे परिणामैक्य या चरित्रांनी गमावले आहे. शिवाय, जो तपशील उपलब्ध झाला त्यातून व्यक्तिदर्शी घटितांची अचूक निवड करून त्यांची कालक्रमानुसार मांडणी करण्याचे कसबही त्यांना साधलेले नाही. चरित्रनायक व त्याची पत्नी यांच्या परस्परसंबंधातून प्रकटणारे भावजीवन उपेक्षित राहिल्यामुळे या चरित्रांचे कथामूल्यही क्षीण राहिले आहे. जीवनाश्रयाने वाङ्मयीन थाट लाभूनही या चरित्रात वाङ्मयाचा परिपोष झाला नाही. ती अपेक्षित उंची गाठू शकली नाहीत. याला अपवादभूत अशी दोनच चरित्रे, एक काशिबाई कानिटकरांचे ' डॉ. आनंदीबाई जोशी ' हे चरित्र आणि दुसरे साने गुरुजींनी लिहिलेले राजवाड्यांचे चरित्र.

**व्यक्तिगत जीवन चित्रित करणारी चरित्रे (आप्तांनी लिहिलेली)–**

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी १८७२ मध्ये आधुनिक चरित्रलेखनाला प्रारंभ केला, तर त्यांच्या बंधूंनी १८९४ मध्ये शास्त्रीबुवाचेच चरित्र लिहून चरित्रग्रंथ कसा असावा याचा एक आदर्श मराठी चरित्रकारांपुढे ठेवला. चरित्र लेखनाचे उद्दिष्ट आणि पद्धती यांविषयी आपली लेखन भूमिका पक्की करून, त्यानुसार चरित्र लिहिण्याचा हा प्रयत्न अत्यंत मोलाचा ठरतो. तत्पूर्वीच्या चरित्रातील प्रतिपादनाचा ओघ स्थूल मानाने गुणसंकीर्तनानुवर्ती होता. ल. कृ चिपळूणकरांना व्यक्तिदर्शन हे चरित्राचे उद्दिष्ट मान्य असल्यामुळे व्यक्तिमत्त्वाच्या वस्तुनिष्ठ न्याय्य मूल्यमापनाची त्यांना नितांत आवश्यकता भासली. साहजिकच चरित्रनायक जसा होता तसा तो चित्रित व्हावा म्हणून रक्ताचे नाते असूनही प्रस्तुत चरित्राचे लेखन तटस्थपणे झाले आहे, सामान्यपणे चरित्रकाराचे नायकाशी रक्ताचे नाते असले म्हणजे कौटुंबिक अभिनिवेश टाळणे अशक्य होते, मोरोपंतांच्या शब्दात सांगायचे म्हणजे, ' प्रिय सदोषही चांगले वाटू लागते. पण ल. कृ. चिपळूणकरांनी हे चरित्र सत्यान्वेषी दृष्टीने लिहिले आहे. चरित्रनायक व त्याचे संबंधित यांचे गुणदोष लेखकाने बिनदिक्कतपणे मांडले आहेत. कृष्णशास्त्र्यांचा बाहेरचा नाद व बाबा गोखल्यांचा आळस व स्वच्छंदीपणा, विश्णुशास्त्र्यांचा खुनशीपणा, शिक्षकी पेशातला हलगर्जीपणा या बाबतीत सत्यासत्य पारखण्याची वेळ आली की ल. कृ. चिपळूणकर गुळमुळीत न लिहिता निर्भीड सडेतोडपणाने लिहितात. त्यामुळे होते असे, की चरित्रनायकाचे जिवंत व्यक्तिमत्त्व त्याच्या गुणदोषांसहित आकार घेते.

प्रस्तुत चरित्रात लेखकाने शास्त्रीबुवांच्या साहित्याचा परामर्श घेतला आहे, परंतु तो आवश्यक तेवढाच. चरित्रकाराला नायकाचा प्रत्यक्ष सहवास लाभल्यामुळे

व्यक्तिगत जीवनाचा बारीकसारीक तपशील चरित्रातून टिपला आहे. जिथे असा तपशील येतो तिथे चरित्र चित्तवेधक होते. आख्यायिका आणि पत्रे यांचा चरित्रकाराने कौशल्याने उपयोग करून घेतला आहे.

हे चरित्र पूर्णपणे निर्दोष आहे असे नाही. चरित्रकाराने प्रारंभीच विष्णुशास्त्र्यांचे पूर्ण व्यक्तिमत्त्व थोडक्यात चित्रित केले आहे, कोणाचेही व्यक्तिमत्त्व प्रारंभीच पूर्ण सिद्ध झालेले नसते. जन्म आणि मृत्यू या कालावधीत ते सारखे बदलत, वाढत जाते. विकासाचा हा नैसर्गिक क्रम सोडून प्रारंभीच पूर्ण सिद्ध व्यक्तिमत्त्व साररूपाने चित्रित करणे म्हणजे कृत्रिमतेची परमावधी होय

'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' लिहिणाऱ्या रमाबाई रानडे, या पुस्तकात एके ठिकाणी लिहितात, 'मी माझ्यासंबंधाने अशी फारशी हकीकत लिहू नये म्हणून आरंभापासून हा विचार मनात ठेवून चालले आहे, पण चमत्कार हा की संसारात बायकोचा संबंध अगदी सावलीसारखा असल्यामुळे ते कितीही टाळू म्हटले तरी टाळता येत नाही. म्हणून स्वतःची (रानड्यांची) गोष्ट अगर मनाची स्थिती नीट समजण्याकरिताच जेथे माझा संबंध आला आहे, तेथे मात्र चालतच नाही, म्हणून ठेवीत आहे.' (पृष्ठ २३८, आ. १९२८) आठवणींच्या द्वारे आपल्या पतीचे चरित्र सांगणे ही या लेखनामागची मुख्य व महत्त्वाची प्रेरणा असल्यामुळे रमाबाईंनी स्वतःच्या जीवनापेक्षा आपल्या पतीच्या जीवनाला जास्त महत्त्व दिलेले आढळते. आपल्या स्वजीवनातील अनुभव सांगायचे म्हणून काही त्यांनी हे लेखन केले नाही. पतीचे चरित्र सांगता सांगता त्या अनुषंगाने आपले काही अनुभव अपरिहार्यपणे व्यक्त होतील तेवढेच. त्या पलिकड स्वतःबद्दल स्वतःच्या जीवनाबद्दल काही सांगायचे नाही अशी जी मर्यादा त्यांनी आखून घेतली आहे. त्या मर्यादेतच सारे लेखन पार पाडणे त्यांना शक्य झाले आहे. याचे कारण रमाबाईंचा जीवन प्रवाह रानड्यांच्या जीवनप्रवाहात पार मिसळून गेला आहे. त्या प्रवाहाचे स्वतःचे अस्तित्वच उरलेले नाही. रानड्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वापुढे त्यांचे व्यक्तिमत्त्व दबून गेले आहे त्यामुळे या आठवणी त्या रंगवून सांगतात, सांगता सांगता रंगून जातात. पण त्या आठवणींना आत्मचरित्राचे रंग चढत नाहीत.

प्रस्तुत चरित्रात आपल्या अंगभूत सौन्दर्याने बघणाराची नजर खिळवून टाकणारा गालिचा हळू हळू उलगडावा तसा न्यायमूर्ती रानड्यांचा जीवनवृत्तांत कालक्रमानुसार कथारूपाने सांगितला आहे. त्यामुळे कथेचा ओघ कादंबरीप्रमाणे अखंड वाहत राहतो. लेखिकेने सारे अवधान केंद्रित केले आहे, ते जीवनदर्शनाकडे. माधवरावांच्या जन्मापासून अंतापर्यंतचे जीवनदर्शन घडविताना कथेला कुठेही, फाटे फुटलेले नाहीत. आडवळणे घेतलेली नाहीत किंवा हे लेखन व्यक्तिदर्शनाव्यतिरिक्त अन्य उद्दिष्टात कुठेही अडकून पडलेले नाही. त्यामुळे होते असे की माधव-

रावांचा जन्म व मृत्यू ही दोन टोके साधणारी काळाची साखळी अतूट रहाते. या लेखनात एकपिंडता येते. सुरूवातीपासून शेवटपर्यंत माधवराव या एकाच व्यक्ती-वर वाचकांची नजर खिळून राहते. मधूनच माधवरावांचे वडील अथवा खुद्द रमाबाई डोकावल्या तरी त्यामुळे माधवरावांच्या व्यक्तिदर्शनाला उठावच मिळतो.

हे चरित्र उभे राहते ते माधवरावांच्या जीवनाश्रयाने. कादंबरीत भरावा तसा माधवरावांच्या व्यक्तिगत जीवनाचा सूक्ष्म तपशील इथे भरलेला आहे. हे चरित्र कादंबरी इतकेच चटकदार होते याचे एक कारण असे, की इथे भाव-जीवनाच्या उभ्या आडव्या नाजूक धाग्यांनी माधवरावांचा जीवनपट विणलेला आहे माधवरावांच्या आजारात व रमाबाईंच्या ऑपरेशनच्या वेळी एकमेकांच्या दुखण्याची चिंता वाहताना हे भावजीवन अधिकच गहिरे होते. या आठवणी प्रामाणिकपणे, मोकळ्या मनाने सांगितलेल्या आहेत. शिक्षणाच्या बाबतीत घरातील स्त्रियांकडून होणारा जाच रमाबाईंनी माधवरावांच्या कानावर कधी घातला नाही, कारण– ' आमच्या खऱ्या सुखासमाधानाची वेळ असल्या गोष्टीत जितकी जाईल तितके आमचे सुख कमी पडेल ' (पृष्ठ ५४) हे अंतरीचे गूह्य प्रकट कर-ताना संकोच त्यांच्या मनाला शिवला नाही. भावजीवनाच्या मुक्त आविष्कारामुळे हे चरित्र कादंबरी इतकेच चटकदार झाले आहे. या पुस्तकातले भावमधुर वातावरण वाचकाला या जीवनकथेशी जखडून टाकते, ज्या भावनोत्कटतेच्या संदर्भात कादंबरी श्रेष्ठ ठरते, ती भावनोत्कटता माधवरावांच्या आजारात रमाबाई देवासमोर प्रार्थना करतात त्या प्रसंगात काठोकाठ भरलेली आहे. या चरित्रात जो भावनिक अंश ठिबकतो त्यामुळे या चरित्राला सुस्पष्ट वाङ्मयीन आकार प्राप्त झाला आहे.

प्रस्तुत चरित्रात माधवरावांच्या व्यक्तिमत्त्वाच्या वेगवेगळ्या छटा उमटत जातात. रमाबाईंनी माधवरावांच्या स्वभावाच्या बारीकसारीक छटा हलक्या हाताने टिपल्या आहेत. लहानपणी माधव एकनादी व सरळ होता, त्याला डावपेच काही माहीत नव्हते व ते समजावयाचेही नाहीत. पहिल्यांदा धुळाक्षराच्या शाळेत घातल्यावर शाळेतून आला न आला की घरी सारा दिवस तेच आपल्याशी हळू हळू बडबडे व बोटाने भिंतीवर अक्षरे व उजळणी काढीत राहावयाचा, हाच याचा खेळ व हीच याची करमणूक. रस्त्यात उगीच खेळत असला तरी धुळीत उजळणी काढीत बसायचा, असा वेडा होता. जे करावयाचे त्यात प्रतारणा ठाऊकच नाही. कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी खांबाबरोबर सोंगट्या खेळताना खांबाचे दान प्रामाणिकपणे खांबाला दिले. आईने चूकून मोलकरणीच्या मुलाला मोठी वडी व स्वत:ला लहान वडी दिली तरी आईने सांगितल्याप्रमाणे मोलकरणीच्या मुलाला

मोठीच वडी दिली. या प्रामाणिकपणाचे प्रत्यंतर मोठेपणीही मिळते. मोठेपणी एका खटल्यात न्यायदानाचे काम निःपक्षपातीपणे व्हावे म्हणून वडिलांच्या मार्फत भीड घालणाऱ्या नातेवाईकाला दूर ठेवले. पंचहौद मिशनमधील सहा प्रकरणी पुण्याच्या लोकांकरिता भिडेखातर माधवरावांनी प्रायश्चित्त घेतले. मित्रांकरिता सहज हसत टीका झेलणारे माधवराव शिरस्तेदाराकडून हायकोर्ट जज्जाच्या जागी नेमणूक झाल्याचा हुकूम मिळाल्यावर आनंदाने वेडावून जात नाहीत. दुःखाचा डोंगर कोसळला तरी डगमगावयाचे नाही, किंवा सुखाच्या लाटा येऊन आदळल्या तरी हर्षातिरेक व्हावयाचा नाही. माधवरावांची स्वभाव वैशिष्टये लक्षात येतील अशाच तऱ्हेने एकेक आठवण सांगितली आहे. रमाबाईंच्या ऑपरेशनच्या वेळची आठवण अशा पद्धतीने सांगितली आहे, की माधवरावांचे रमाबाईंवर किती प्रेम होते हे तर लक्षात यावेच, पण इतरवेळी हळवेपणा न दाखविणारे माधवराव अशा प्रसंगी किती हळवे होतात, किती व्याकुळ होतात हे वाचकांच्या मनावर ठसावे. माधवरावांचे व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर साक्षात होते ते अशा स्वभावदर्शी घटितांच्याद्वारे

स्त्रीसुलभ भाषा आणि शाब्दिक, प्रसंगनिष्ठ विनोदाची नोंद हे या चरित्राचे आणखी एक वैशिष्टय,

प्रस्तुत चरित्रात माधवरावांच्या द्वितीय विवाहाच्या संदर्भात समर्थनाचा सूर जाणवतो. या घटनेकडे लेखिकेला अलिप्तपणे पाहता आलेले नाही. चरित्रनायकाकडे पाहण्याची भावनिक दृष्टी सत्यकथनाच्या आड येते.

रमाबाईंनी माहेरचा कुलवृत्तांत देताना पुढील प्रसंगाची नोंद केली आहे. त्यांचे शंकर उपासक पणजे गणपतराव भाऊ यांनी मातोश्रीला रागामध्ये दुरुत्तर केल्यानंतर पश्चाताप होऊन सागरेश्वराच्या मंदिरात जाऊन जिभेचा शेंडा कापून टाकला. जवळच असलेल्या गुरवाने तो अंगाऱ्यात बुडवून गणपतराव भाऊंच्या जिभेला चिकटवून दिला. वास्तविक या प्रसंगामुळे माधवरावांच्या व्यक्तिमत्त्वावर काही प्रकाश पडतो असेही नाही. माधवरावांचा या प्रसंगाशी संबंध असलाच तर तो दूरान्वयाने, तेव्हा प्रस्तुत चरित्रातल्या वास्तवाला गालबोट लावणारा हा प्रसंग गाळून टाकला असता तर काही बिघडले नसते.

आमची अकरा वर्षं,' (१९४५) हे पुस्तक लिहिण्यामागचा लीलाबाई पटवर्धन यांचा हेतू आहे तो आपल्या पतीच्या माधवराव पटवर्धनाच्या चरित्रपर आठवणी सांगायचा. या आठवणींच्याद्वारे लीलाबाईंना माधवरावांचे चरित्र लिहायचे आहे ही गोष्ट हे पुस्तक वाचताना सहज स्पष्ट होते. लीलाबाई माझे लग्न एका ध्येयवादी माणसाशी झाले होते. मला स्वतःला तेव्हा काही ध्येय नव्हतेच. ज्याच्याशी लग्न होईल त्याच्याशी जुळते घेणे हेच माझे इतर हिंदु स्त्रियांप्रमाणे ध्येय होते.' (पृष्ठ ५०). अशा शब्दात आपले मनोगत व्यक्त

करताना आढळतात. परंतु त्यांच्या मनाच्या अभिव्यक्तीला माधवरावांचे जीवन पूर्णपणे झाकून जाईल इतका वाव मिळालेला नाही. किंबहुना वाचकांच्या डोळ्यापुढे माधवराव ही व्यक्ती उभी राहील अशाच बेताने हे लेखन झाले आहे. माधवरावांच्या स्वभावाच्या बारीकसारीक छटा व्यक्त होतील अशाच आठवणी इथे सांगितलेल्या आहेत, थोडयाफार प्रमाणात आत्मचरित्रात्मकता इथे अवतरते यात शंका नाही. तथापि हे लेखन प्रामुख्याने चरित्रात्मकच आहे.

लीलाबाईंनी माधवरावांचे चरित्र फक्त अकरा वर्षे पाहिले, त्यापूर्वीचे ऐकले. साहजिकच त्यांनी पूर्वायुष्याचे चित्रण थोडक्यात उरकून घेतले. लग्नानंतरचे माधवरावांचे चरित्र त्यांच्या डोळ्यापुढे घडले असल्यामुळे, त्या जीवनाचे चित्रण करताना माधवरावांच्या व्यक्तिगत जीवनाचा सूक्ष्म तपशील भरला आहे. जीवनाश्रयामुळे या चरित्राला वाङ्मयीन घाट लाभला आहे. हे लेखन भारदस्त आहे, अति संयमित आहे. इथे न्या. रानडयांच्या किंवा डॉ. आनंदीबाईच्या चरित्राप्रमाणे भावजीवनाचा मोकळा आविष्कार आढळत नाही. आयुष्यात प्रेमविवाह झाला नाही तरी 'विधवा–विवाह' करावयाचा, नाही तर एखाद्या पतितेशी लग्न करावयाचे असे माधवरावांनी मनाशी ठरविले होते. पण परिस्थितीच अशी निर्माण झाली, की यापैकी एकही त्यांच्या वाटयाला आले नाही. लीलाबाईंशी चारचौघांसारखा ठरवून झालेला विवाह ही एक तडजोड होती. वांछित जीवन एक व प्रत्यक्षात वाटयाला आलेले जीवन दुसरेच या विरोधातून या जीवनकथेत असमाधानाची धूसर छटा मिसळलेली आहे. कधी तरी हे असमाधान 'मग काय तू फार सुंदर आहेस असं तुला वाटलं ?' (पृष्ठ ४७) अशा एखाद्या खोचक प्रश्नातून उफाळून येते. मात्र दुसऱ्या कुणी लीलाबाईंच्या रूपावर टीका केली की, ते म्हणत, 'ती दिसायला साधारण आहे. मी जाणूनबुजून तिच्याशी लग्न केले आहे. मला तिच्याशी संसार करायचा आहे. तेव्हा तिच्या रूपाबद्दल मला असमाधान वाटत नाही.' (पृष्ठ ४७) आपला संसार रंगला नाही याची जाणीव झाली म्हणजे ते आपल्या पत्रात लिहितात, 'काळाने व अनुभवाने मी असा कठोर बनलो आहे. आयुष्यातील बऱ्या वाईट अनुभवांनी स्वभावात एक प्रकारचा तेढेपणा आल्यावर तुझी माझी ओळख झाली. १९१७–१८ च्या काळात जेव्हा माझे मन अत्यंत निरामय व सुस्थित होते तेव्हा जर आपली ओळख होऊन विवाह झाला असता तर मला वाटते मी संसारात अधिक रंगलो असतो. पण अजूनही वेळ अगदीच टळली नाही. आपण अजूनही सुखी होऊन सहकार्य करीत राहू. मी असा चमत्कारिक आहे. मला सांभाळून घेणे हे तुझे काम आहे.' (पृष्ठ ५०) डॉ. आनंदीबाईंच्या किंवा न्या. रानडे यांच्या चरित्रातील भावमधुर वातावरणाचा अभाव प्रकर्षाने जाणवावा अशी ही परिस्थिती आहे. या आठवणी लीलाबाई रंगवून सांगत नाहीत. किंवा

सांगता सांगता रंगून जात नाहीत. याचे कारण भावनात्मक मीलनाचा क्षण त्यांच्या वाटयाला फार उशिरा आला. ' क्षण एक पुरे प्रेमाचा वर्षाव पडो मरणाचा ' या गोविंदाग्रजांच्या सुप्रसिद्ध काव्य पंक्तीची आठवण करून देणारा तो प्रेमाचा क्षण लीलाबाईंना लाभला आणि तोही अखेरच्या क्षणी. माधवराव मृत्यूशय्येवर असताना त्यांच्या बहिणीने माधवरावांच्या तोंडाला चव यावी म्हणून दिलेला आवळा लीलाबाई रागावतील म्हणून माधवरावांनी तो घेऊन मुकाटयाने ठेवून दिला. आपल्यावरील माधवरावांचा विश्वास व प्रेम पाहून त्याही स्थितीत लीलाबाईंना समाधान वाटले. या चरित्राचा शेवट हृदयस्पर्शी झाला आहे तो या दृष्टीने. कदाचित् येथून पुढे त्यांचा संसार रंगलाही असता. पण नियतीची इच्छा वेगळीच होती.

लीलाबाईंनी हे जीवनकथन करताना मुख्यत: अकरा वर्षांचा कालखंड आपल्या डोळयापुढे धरलेला आहे. त्यामुळे त्या कालखंडाच्या पूर्वीच्या परंतु माधवरावांच्या जीवनातील मर्मस्थानच्या घटना त्यांनी कातरल्या आहेत. माधवरावांच्या जीवनाच्या गूढरम्य भागाचे आकलन व्हावे म्हणून गिरीशांच्या ' स्वप्नभूमी ' कडे वळावे लागते. लेखिकेने स्वीकारलेल्या धोरणानुसार या लेखनाला ही एक स्वाभाविक मर्यादा पडलेली आहे.

लेखिकेने माधवरावांच्या पत्रांचा या आठवणी सांगताना चांगलाच उपयोग करून घेतला आहे. त्यांच्या पत्रात जिथे आत्मचरित्रात्मक नोंद झाली आहे, तिथे त्यांच्या अंतरंगाचा ठसा उमटतो. त्यातून त्यांच्या तत्कालीन मनस्थितीचे यथातथ्य चित्रणही झाले आहे.

काही चरित्रातून सर्वसाधारणपणे आढळणारा रचना दोष प्रस्तुत चरित्रातही आढळतो. तो असा की, या चरित्रात माधवरावांचा जीवनवृत्तांत कालक्रमानुसार कथारूपाने सांगितलेला नाही. त्यांच्या जीवनाचे वेगवेगळे खंड पाडून कथा निवेदन केल्यामुळे कथेचा ओघ कादंबरीप्रमाणे अखंड वाहत राहिलेला नाही. साहजिकच या चरित्राला एकपिंडता प्राप्त झालेली नाही. शिवाय, काही संदर्भांची पुनरुक्ती होते ती वेगळीच. हा दोष टाळता आला असता तर माधवरावांचे व्यक्तिदर्शन आहे त्यापेक्षा अधिक ठळक झाले असते.

रमाबाई रानडे यांच्याप्रमाणे लक्ष्मीबाई टिळक यांनी ' स्मृति–चित्रे ' रेखाटली ती आपल्या आठवणींच्याद्वारे पतीचे चरित्र सांगण्याच्या हेतूने, लक्ष्मीबाईही आठवणी रंगवून सांगतात, सांगताना रंगून जातात, त्या इतक्या की, त्या आठवणींशी निगडित अशा भूतकाळाशी त्या समरस होतात. आठवणींची उजळणी करताना भूतकाळातले जीवन जणू त्या पुन्हा समरसतेने जगू लागतात. टिळकांच्या जीवनप्रवाहातून त्या स्वत:ला वेगळया काढू शकत नाहीत. त्या जीवन प्रवाहातले

स्वत:चे अस्तित्व, स्वत:चे स्थान विसरू शकत नाहीत आणि मग होते असे की, या आठवणी शब्दबद्ध होत असताना त्यांना अनाहूतपणे आत्मचरित्राचे रंग चढतात. शिवाय, लक्ष्मीबाईंना स्वत:चे असे व्यक्तिमत्त्व आहे. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाइतकेच ते प्रभावी आहे. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वापुढे त्यांचे व्यक्तिमत्त्व दबून जात नाही. याचा परिणाम होतो असा, की टिळकांचे व्यक्तिमत्त्व रेखाटले जात असताना या चरित्रावर लेखिकेच्या आत्मचरित्राचा ठसा उमटतो. एकाच नाण्यावर दोन बाजूला दोन ठसे उमटलेले असावेत, तसे हे पुस्तक एकाच वेळी बायकोचे आत्मचरित्र आणि नवऱ्याचे चरित्र आहे. योगायोगाने घडलेला हा संयोग अपूर्व म्हटला पाहिजे.

स्मृति–चित्रांना लाभलेले वाङ्मयीन रूप दृष्ट लागण्यासारखे आहे. मुळातच स्मृतिचित्रांना अंगभूत कथामूल्य आहे. कोणत्याही चरित्राकडे वाचक आकृष्ट होतात ते चरित्र–विषयभूत व्यक्तीचे जीवन जाणून घेण्याच्या जिज्ञासेने. प्रस्तुत चरित्रात व्यक्तिजीवन जाणून घेण्याची ही जिज्ञासा तृप्त होते. याचे कारण अवघ्या अकराव्या वर्षापासूनच लक्ष्मीबाईंना टिळकांचा प्रदीर्घ सहवास लाभला. टिळकांवर त्यांचे निरतिशय प्रेम होते. टिळकांना त्यांनी पूर्णपणे जाणून घेतले होते. लक्ष्मीबाई इतक्या संवेदनाशील आहेत, की टिळकांच्या जीवनाचा अणू अणू त्यांनी नजरेने टिपलेला आहे. साहजिकच एकदा का त्या टिळकांची जीवनकथा सांगू लागल्या म्हणजे अशा काही रंगून जातात, की त्यांच्या कथानिवेदनाला अविरोध ओघ प्राप्त होतो. आठवणींची कालक्रमानुसार केलेली मांडणी आणि व्यक्तिविषयक उल्लेख करताना राखलेले कालाचे भान यामुळे हे प्रवाहित्व अधिकच भासमान होते. आपल्या प्रवाहीपणाने ही कथा वाचकांना खिळवून टाकते. टिळकांचा जीवनपट चलतचित्राप्रमाणे वाचकांच्या डोळ्यापुढून सरकू लागतो. साहजिकच स्मृति–चित्रांना एकसंघ कथेचा घाट प्राप्त होतो. त्रयस्थाने लिहिलेल्या चरित्रातल्या व्यक्तिचित्रणात--जीवदर्शनात खूप वेळा तुटकपणा येतो. तसा तो स्मृतिचित्रात येत नाही.

'माझे चरित्र लिहायचे झाले तर ते घडले तसे लिहा.' असे टिळकांनी बजावून सांगितले होते. टिळकांच्या इच्छेप्रमाणे हे लेखन तटस्थपणे झाले आहे. सत्यदर्शन--यथातथ्य चित्रण हाच लक्ष्मीबाईंच्या लेखनप्रकृतीचा मूळ धर्म आहे. दोष टाळून केलेले गाळीव चित्रण इथे आढळत नाही. जे सांगायचे ते लक्ष्मीबाईंनी बिनदिक्कतपणे सांगितले आहे. त्यात आतबाहेर असे काही नाही. टिळकांचे दयालुत्व, त्यांचे दातृत्व, प्रेमळपणा इत्यादीबद्दल जितक्या स्पष्टपणे लिहिले आहे तितक्याच त्यांच्या संतापी वृत्तीबद्दल, रागीटपणाबद्दल, विक्षिप्त-पणाबद्दल लिहिले आहे. लक्ष्मीबाई स्वत:च्या आणि टिळकांच्या जीवनाकडे

त्रयस्थपणे पाहतात. त्यामुळे आत्मगौरवातून आणि कौटुंबिक अभिनिवेशातून त्या निसटल्या आहेत. इथे सर्वसाधारणपणे गाळल्या जाणाऱ्या तपशीलाचे चित्रण करीत टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचे अधिक संमिश्र स्वरूपात दर्शन घडविले आहे.

चरित्रमूल्ये आणि तंत्र या बाबतीत पूर्णपणे अनभिज्ञ असलेल्या लक्ष्मीबाईंनी आठवणींची निवड आणि मांडणी अशी काही कलात्मकतेने केली आहे, की टिळकांच्या स्वभावाच्या बारीकसारीक छटा शब्दांकित होतात. नको तिथे वाहाते औदार्य दाखविणारे, व्यवहारशून्य, फुलपाखरी वृत्तीचे, संतापी, निःसंग पण मानी टिळक लक्ष्मीबाईंनी व्यक्तिमत्त्वाच्या अंगोपांगांसहित उभे केले आहेत. टिळक वृत्तीने संत होते. 'पुष्कळ अजुनी उणा । प्रभू, मी अजुनी उणा ।। ही उणेपणाची जाणीव टिळकांना सतत होती. उणेपणा उणे करीत करीत संतत्वाकडे त्यांच्या जीवनाचा ओघ झेप घेत होता. संतापी, नादिष्ट, अव्यवहारी, कविहृदयाचे टिळक कसले तरी श्रेय शोधीत अखेर संतपदाला पोचले, त्यांच्या बदलत्या, वाढत्या व्यक्तिमत्त्वाचा विकास लक्ष्मीबाईंनी अचूक टिपला आहे. प्रस्तुत चरित्रात टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाला जिवंत कलात्मक स्वरूप मिळाले आहे. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचे समग्र पैलू लक्ष्मीबाई चिमटीत पकडू शकल्या. प्रत्यक्ष सहवासामुळे प्रेमामुळे गर्द भावनांनी त्या पैलूंना वागवू शकल्या. मृत टिळकांना त्या इथे फिरून जिवंत करू शकल्या.

प्रस्तुत चरित्रात या नवराबायकोच्या विकासशील प्रगल्भ होत जाणाऱ्या संबंधाचे सुरेख चित्रण झाले आहे. हे चित्रण होत असताना त्यांच्या भावजीवनाचा रम्य आविष्कार घडतो. भावजीवनाच्या अभिव्यक्तीमुळे प्रस्तुत चरित्राला कथेचे परिमाण लाभले आहे. लक्ष्मीबाई व टिळक या दोघांचे एकमेकावर निरतिशय प्रेम होते. त्या दोघांचे भावनात्मक मीलन झाल्याची साक्ष देणारे अनेक प्रसंग प्रस्तुत चरित्रात आढळतात. एकदा सोंगटया खेळता खेळता टिळकांच्या अंगावर डाव उलटू लागला. लक्ष्मीबाईंना हसू लोटायचे आणि त्या हसू लागल्या, की टिळक चिडायचे. त्या दिवशी खेळता खेळता लक्ष्मीबाईंची सरशी होऊ लागली. त्यांचा हसण्याचा आवाज वाढू लागला. टिळकांच्या रागाचा पारा चढू लागला. शेवटी गोष्टी एवढ्या थराला गेल्या, की टिळकांनी चिडून सोंगटया, पट, फासे, गटारात फेकून दिले आणि शेवटी टिळकांनी बायकोला अंधारात लोटले. लक्ष्मीबाई जिन्यावरून गडगडत खाली आल्या. तसे टिळक घाबरले. ते घाबऱ्या घाबऱ्या आगपेटी शोधू लागले. ती सापडेना. शेवटी अंधारातच चाचपडत ते खाली आले व लक्ष्मीबाईंना उठवून वर घेऊन गेले. कारण, लक्ष्मीबाईंना तो सातवा महिना होता. एकदा टिळकांना वडिलांनी जवळ बोलावून दुसरी बायको करण्याचा सल्ला दिला. टिळक म्हणाले, ' मी तसे कधीच करणार नाही. माझा संसार नाही झाला तरी असले कृत्य माझ्या हातून कदापि घडणार नाही.' (पृष्ठ ४५ भाग १ ला)

विहीरीतले पाणी आटल्यावर मामंजींनी लक्ष्मीबाईंना रात्री जाऊन रानातून पाणी आणावयास सांगितले. टिळक लक्ष्मीबाईंना म्हणाले, 'भिऊ नको, मी पाणी आणीन.' त्यांनी पुढल्या दारून फिरायला म्हणून निघावे व लक्ष्मीबाईंनी मागल्या दारून पाण्याला निघावे. घराच्या आसपास थांबून टिळकांनी रानातून आणलेले पाणी लक्ष्मीबाईंनी घरात आणून साठवावे. असा क्रम सुरू झाला. नागपूरला असताना लक्ष्मीबाई आजारी पडल्या त्यावेळी टिळकांनी त्यांची आईप्रमाणे शुश्रूषा केली. विरहावस्थेतील आपली मन:स्थिती ते पुढील शब्दात व्यक्त करतात.

'जवळी असता एक दिवस नच कलहावाचून गेला.

जाता दूर सदा चिंतितो आता मी भार्येला' (पृष्ठ १५०)

एक दिवस टिळकांना भिकबाळी घालायची लहर आली. टिळकांची भिकबाळीची आवड पुरी करण्याकरिता लक्ष्मीबाईंनी खुशाल आपली नथ मोडून भिकबाळी बनविली. टिळक ख्रिस्ती झाल्यावर विरहाने दोघांचाही जीव कासावीस झाला. दोघांनीही रात्रीच्या रात्री तळमळत काढल्या. टिळक ख्रिस्ती झाले म्हणून लक्ष्मीबाईंना जो मानसिक धक्का बसला त्यातून त्यांची प्रकृती सुधारलेली पाहून खरा आनंद झाला तो टिळकांना. ख्रिस्ती झाल्यानंतर टिळक जलालपूरला पहिल्यांदा आले तेव्हा लक्ष्मीबाईंच्या धाकट्या भावाने त्यांना मार देण्याचे ठरविले तो कुऱ्हाड घेऊन इकडे तिकडे हिंडू लागला. तेव्हा लक्ष्मीबाई म्हणाल्या, 'तुम्ही त्यांना वाटेल तितके बोला, त्यांच्याशी भांडा, पण मारूबिरू नका,' (पृष्ठ ३० भाग २ रा.) अशा प्रसंगांची ही यादी खूपच लांबविता येईल. एवढे मात्र खरे, की जीवनाचा तळ गाठणाऱ्या अनुभूती दोघांच्याही वाट्याला आल्या. त्यांचे प्रेम अनेक प्रसंगातून तावूनसुलाखून निघाले आणि दृढ होत गेले. लक्ष्मीबाईंनी या प्रसंगांची नोंद अगदी मोकळ्या मनाने केली आहे. भावनोत्कर्षाच्या ठिकाणी चरित्रकाराला आपल्या कल्पनाशक्तीला लगाम घालावा लागतो. त्यामुळे भावनाजागृतीत आणि रसनिर्मितीत पदोपदी अडथळे येतात. पण एक एक प्रसंगातील स्वानुभव सांगताना लक्ष्मीबाई त्यातील प्रेम, कारुण्यादी रस नेमका निर्माण करतात. भावनोत्कटतेमुळे जी कादंबरी चरित्राला मागे सारून पुढे जाते त्याच कादंबरीशी हे चरित्र स्पर्धा करू पाहते.

प्रस्तुत चरित्राच्या केंद्रस्थानी टिळक आहेत. टिळकांशिवाय अन्य व्यक्तींचेही चित्रण इथे झाले आहे, पण ते टिळकांच्या जीवनाशी त्यांचा जेवढा संबंध आला तेवढ्यापुरतेच. सोनेनाणे धुऊन घेणारे नाना, पत्ता माहीत नसल्यामुळे आपल्या लाडक्या मनूला शोधण्यासाठी प्रेमाच्या ओढीने मुंबईभर वणवण फिरत चाळीचाळीतून डोकावणारे गोविंदराव मामा, मनू अनेक वर्षांनी घरी आली असता आपल्याला रडू येईल म्हणून रात्र होईपर्यंत तिच्याशी काहीच न बोलणारी

भिकूताई, सुनेचे पाणी प्यायचे भांडे पिकदाणी म्हणून वापरणारे, लाडू कुलपात घालून ठेवणारे कद्रू आणि दुष्ट मामंजी, नवऱ्याने लाथ मारल्यावर तोंडात पाण्याशिवाय काही न घेता रामराम म्हणत प्राण सोडणारी टिळकांची आई आणि आपल्या बहिणीने अशा रीतीने कोठे प्राण सोडला ते कसल्यातरी ओढीने मुद्दाम पाहून येणारी लक्ष्मीबाईंची आई, अंगावरचे कपडेदेखील गोरगरीबांना देऊन उघडे बोडके घरी येणारे महादेव भाऊजी, लक्ष्मीबाई कविता वाचीत नाहीत म्हणून त्या फाडून टाकणारा ठोंबरे, लक्ष्मीबाईंच्या हातचा फोडणीचा भात खाताना आपण पंचपक्वान्ने खात आहोत असा बहाणा करणारा धनाढ्य बुटींचा मुलगा बापूसाहेब, टिळकांची व दत्तूची आबाळ होईल म्हणून लक्ष्मीबाईंना नर्सिंगचे शिक्षण घ्यायला नालायक ठरवून परत पाठवून द्या असे हॉस्पिटलच्या चालकांना गुप्तपणे कळविणारे ह्यूम साहेब, ही सारी माणसे कारुण्य, खेळकरपणा, विक्षिप्तपणा, दुष्टपणा, औदार्य, प्रेम अशा अनेकविध मानवी भावनांनी, स्वभावविशेषांनी नटलेली आहेत. त्यांच्या निमित्ताने मानवी जीवनातील शाश्वत भागाचे चित्रण इथे झाले आहे. या हाडामासाच्या व्यक्तींनी चरित्राला जिवंतपणा आणला आहे. चरित्राचे वाङ्मयीन अंग जोपासले आहे आणि त्यातही लक्ष्मीबाईंच्या लेखणीचा एक विशेष असा की, एवढ्या माणसांच्या गर्दीतून टिळक ठळकपणे वाचकांच्या डोळ्यापुढे उभे राहतात.

प्रस्तुत चरित्रावर ललितकृतीची छाया पडली आहे. हे चरित्र एकाचवेळी सत्यदर्शनात्मक, खऱ्या अर्थाने व्यक्तिदर्शनात्मक आणि कलात्मक झाले आहे. कलात्मक अशा अर्थाने की, वस्तुनिष्ठ सत्याला कलात्मक सत्याची जोड मिळाली आहे. पहिल्यांदाच तांदळाच्या भाकरी केल्यावर त्या कशा झाल्या याचे वर्णन करताना लक्ष्मीबाई लिहितात, 'पहिल्या पावसानंतर जमिनीला जशा भेगा पडतात तशा माझ्या भाकरींना भेगा पडल्या होत्या.' ( पृष्ठ ४, भाग १ ला ). गोखले व टिळक ह्या दोघांची गोत्रे काश्यप व शांडिल्य. ह्या गोत्रांचे जुळत नाही. तेव्हा लक्ष्मी–नारायणाचा होऊ घातलेला विवाह होणार कसा ? असा प्रश्न पडलेला असताना खांबेटे शास्त्री यांनी काढलेला 'हा शास्त्राधार म्हणजे उतास जाणाऱ्या दुधावर शिपडलेले चार थंड पाण्याचे थेंब' (पृष्ठ १२, भाग १ ला) होते. लक्ष्मीबाई संग्राहक बुद्धीच्या तर टिळक नि:संग. लक्ष्मीबाईंना सारा पसार जतन करावासा वाटे 'मी माळावरच्या सापासारखी घरात नेहमी बसलेली. मी कधी बाहेर जाते व आपण कधी घर सफाईचे काम सुरू करतो असे टिळकांना होऊन जाई. मी बाहेर गेले की त्यांची दिवाळी उगवायची व नंतर माझा शिमगा सुरू व्हायचा.' (पृष्ठे भाग २) इथे वस्तुगत सत्याला कलात्मक सत्याची जोड मिळताच रुक्ष सत्यातला नीरस अंश गळून पडतो. नीरस सत्य सुरस होते. चरित्रात लालित्य अवतरते. प्रस्तुत चरित्रात प्रत्यक्ष घटित सत्यही लालित्यपूर्ण पद्धतीने मांडले आहे. तर्का इतकेच ते भावनांना आवाहन करू शकते. ते वाचकांना

सौन्दर्यास्वाद घडवू शकते. मुळातच लक्ष्मीबाईच्या भाषेत स्त्रीसुलभ बोलीभाषेची सजिवता आहे. भाषेच्या जिवंतपणाला विनोद आणि नाटच यांची जोड मिळाली म्हणजे हे चरित्र अधिकच चित्तवेधक नि वाचनीय होते. चरित्रातल्या सत्याच्या मर्यादेत राहुन त्यातला नीरस अंश दूर करणारे, चरित्रात वाङ्मयाचा परिपोष करणारे एक चरित्र म्हणुन 'स्मृतिचित्रांचे' स्थान समग्र मराठी चरित्र वाङ्मयात वरचे आहे. 'स्मृति चित्रे' या पुस्तकाचे अनन्यसाधारण महत्त्व जाणवते ते आणखी एका कारणासाठी. चरित्र ही एक वाङ्मयीन कृती आहे, या मूल्यविषयक विचाराला आपल्या अंगभूत गुणांनी या कृतीने बळकटी आणली आहे.

आप्तांनी लिहिलेली ही चरित्रे कला आणि कारागिरी यामधला सुवर्णमध्य गाठण्याचा प्रयत्न करतात. ती एकाच वेळी जीवनदर्शनात्मक, खऱ्या अर्थाने व्यक्तिदर्शनात्मक आणि कलात्मक आहेत. आप्तांनी लिहिलेल्या चरित्रात आणि त्यातही स्त्रियांनी लिहिलेल्या आपल्या पतीच्या चरित्रात कादंबरीत भरावा तसा सूक्ष्म तपशील भरला आहे. त्यामुळे जीवनदर्शनात, व्यक्तिदर्शनात कुठेही तुटकपणा जाणवत नाही. या चरित्रात स्वभावदर्शी घटितांची अचूक निवड करून त्यांची कालक्रमानुसार मांडणी केल्यामुळे चरित्र नायकाच्या जीवनौघाचे सातत्य अखेरपर्यंत टिकून राहते. या चरित्रातून जीवनदर्शनातच व्यक्तिदर्शन सामावलेले आहे. चरित्रनायकाच्या जीवनात जे घडले ते वाचता वाचताच तो कसा होता हेही वाचकांना उमजून येते. त्याच्या स्वभावाच्या विविध छटा मुळाबरहुकूम रेखाटल्या जातात. चरित्रनायकाच्या परिघात येणाऱ्या व्यक्तींच्या समुहातूनही तो ठळकपणे वाचकांच्या डोळ्यापुढे उभा राहतो. चिपळूणकरांचे चरित्र सोडल्यास चरित्रकर्ती आणि चरित्रनायक यांच्या भावजीवनाचा आविष्कार घडल्यामुळे या चरित्रांना कथेचे परिमाण लाभले आहे. चरित्रनायकासंबंधी सत्यासत्याची पारख करून अधिकाधिक पण अचूक माहिती देऊ पाहणारी शास्त्रीय दृष्टी आणि गाळीव पण व्यक्तिदर्शी तपशीलाद्वारे चरित्रनायकाच्या जीवनाची, व्यक्तिमत्त्वाची कलात्मक अभिव्यक्ती करू पाहणारी कलादृष्टी यांचा या कृतींच्या कर्त्यांनी योग्य समन्वय साधला आहे. सत्याच्या मर्यादेत राहून चरित्राची रंजकता वाढविण्यास त्यांना अपूर्व यश लाभले आहे. जीवनदर्शनामुळे या चरित्रांना वाङ्मयीन घाट तर लाभलाच, पण त्याचबरोबर या चरित्रात वाङ्मयाचा परिपोषही झाला आहे. परंतु कादंबरीशी स्पर्धा करू पाहणारी अशी चरित्रे थोडीच आहेत.

प्रस्तुत प्रबंधाच्या पहिल्या भागात विस्ताराने चर्चिलेल्या मूल्यांच्या आधारे आंग्लाईतील काही चरित्रे दुसऱ्या भागात तपासून पाहिली. येथवर जी चरित्रे तपासूल पाहिली त्यांचे वर्गीकरण रचनेच्या आधारावर केले असल्यामुळे त्या त्या प्रकारची वैशिष्टचे त्या त्या ठिकाणी स्पष्ट केली आहेत. यापुढे सर्वसाधारणपणे जे सांगता येण्यासारखे आहे ते पाहू.

मराठीत आंग्लाईच्या प्रारंभी व नंतरही जे चरित्र लेखन झाले त्याच्या मुळाशी वाङ्मयबाह्य प्रेरणा आहेत. हे लेखन स्मृती टिकवून धरणे, स्फूर्ती देणे व उद्‌बोधन या उद्दिष्टांनी झाले आहे. क्वचित वैजनाथ शर्मासारख्याने साहेब लोकांची मर्जी राखण्यासाठी चरित्रलेखन केल्याचे दिसून येते. पुढे भाषांतराच्या निमित्ताने व्यक्तिदर्शन हे वाङ्मयीन उद्दिष्ट साक्रेटस्, पिटर धी ग्रेट या सारख्या कृतींद्वारे परिचित झाले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी लिहिलेले 'डॉ. जॉनसनचे' चरित्र हे व्यक्तिदर्शनाचे उद्दिष्ट साध्य करणारे स्वतंत्र चरित्र होय. हे चरित्र अक्षरश: भाषांतरित नसले तरी ते लिहिताना चिपळूणांच्यापुढे बॉसवेलने लिहिलेले डॉ. जॉनसनचे चरित्र होते. शास्त्रीबुवांनी उद्दिष्ट आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनी बॉसवेलचा आदर्श डोळ्यापुढे ठेवला होता. बॉसवेलचा आदर्श अनुसरल्यामुळे वरवर क्षुल्लक वाटणाऱ्या तपशीलात व्यक्तिमत्त्वाचे मर्म असते ही गोष्ट त्यांनी लक्षात घेतली आहे. चरित्रनायकाचे जिवंत व्यक्तिमत्त्व त्याच्या गुणदोषासहित साकार करणारे हे चरित्र. येथून पुढे मराठी चरित्र लेखनात व्यक्तिदर्शनाचे उद्दिष्ट हळूहळू स्थिरावले. १८९४ मध्ये ल. कृ. चिपळूणकर यांनी आपले बंधू विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे चरित्र अभिनिवेश टाळून तटस्थपणे लिहिले आणि चरित्रनायकाचे व्यक्तिदर्शन अविकृतस्वरूपात कसे घडवावे याचा आदर्श मराठी चरित्रकारांपुढे ठेवला. यानंतर चरित्रनायकाचे व्यक्तिदर्शन यथार्थपणे घडविणाऱ्या काही मोजक्याच कृती निपजल्याही पण अभिनिवेश, तंत्रविषयक दोष आणि कलात्मकतेचा अभाव यामुळे मराठी चरित्रलेखन यथार्थ व्यक्तिदर्शनापासून दोन हात दूरच राहिले. आजही चरित्रनायकावर स्तुतिसुमने उधळणारे गौरवग्रंथ प्रसिद्ध होताना आढळतात. तथापि एवढे मात्र खरे, की मराठी चरित्रलेखनावरचा अवाङ्मयीन उद्दिष्टांचा प्रभाव आंग्लाईच्या अखेरीस उरला नाही.

आंग्लाईच्या प्रारंभी मराठी चरित्रकारावर अद्‌भुताची मोहिनी पडली होती. कलाकृतीचा घाट लाभलेली काही थोडी चरित्रे आणि संत चरित्रे सोडल्यास मराठी चरित्रकारांचे अद्‌भुताचे आकर्षण हळूहळू कमी झाले. मराठी चरित्रलेखनात प्रत्यक्षावर लक्ष केंद्रित करणारी शास्त्रीय दृष्टी जसजशी वाढीस लागली तसतशी ही चरित्रे वस्तुनिष्ठ होत गेली. मराठीत काही सत्यव्रत चरित्रकार आहेत. चरित्रनायकाचे वास्तव जीवनचित्र ते अलिप्तपणे रेखाटतात पण काहींना चरित्रनायकाकडे तिऱ्हाईतपणे पाहताच येत नाही. साहजिकच त्यांच्या कृतीत वास्तवाची पाया भरणी होऊनही अभिनिवेश सुटला नाही. त्यामुळे सत्य दडपले जाते, स्थूलमानाने संत चरित्रे विभूतीपूजा अभिनिवेशाने, ऐतिहासिक स्त्रीपुरुषांची चरित्रे ऐतिहासिक अभिनिवेशाने, राजकारणी व समाजसुधारकांची चरित्रे सार्वजनिक अभिनिवेशामुळे, निखळ उद्‌बोधनाच्या हेतूने लिहिलेली चरित्रे नैतिक अभिनिवेशाच्या योगाने आणि चरित्रविषय व्यक्तीच्या आप्तांनी लिहिलेली चरित्रे

कौटुंबिक अभिनिवेशापायी दूषित झालेली आढळतात. मात्र मराठी चरित्र लेखनात छिद्रान्वेशी दृष्टीने मुद्दाम जाणिवपूर्वक नायकाचे चारित्र्यहनन करण्याची प्रवृत्ती आढळत नाही.

मराठीत आंग्लाईच्या प्रारंभीच कथा– कादंबरीची आठवण करून देणारे, पूर्णपणे कलेच्या अंगाकडे झुकलेले चरित्र लेखन आढळून येते. हे लेखन संख्येने अल्प असले तरी ते संपूर्ण कालखंडात विखुरलेले आहे. शिवाय, शास्त्रीय व कलात्मक वृत्ती उत्तरोत्तर वाढीस लागल्या आहेत. तथापि नवे लेखन-तंत्र क्वचितच वापरात आलेले आढळते. सत्याच्या कक्षेत राहून चरित्राची रंजकता वाढविण्याची वृत्तीदेखील योग्य प्रमाणात वाढली नाही. बहुसंख्य लेखन कारागिरीच्या स्वरुपाचेच आहे.

आंग्लाईच्या प्रारंभी आणि नंतरही चरित्र व कलाकृती यातील वेगळेपण काही लेखकांनी ओळखलेच नाही. काही चरित्रकार नायकाच्या जीवनदर्शनाला कलात्मक रुप देता देता चरित्राची वास्तवाची बैठक पार हरवून बसतात, या चरित्रात कल्पिताचा, अद्‌भुताचा आश्रय घेऊन व्यक्तिचित्रण फक्त कलात्मक पातळीवरूनच होते. साहजिकच या कृतींना चरित्राचा घाट असा लाभलेलाच नाही. कुठल्याही खऱ्याखुऱ्या चरित्रात चित्रित होणारे जीवन केवळ घडलेले असते. काही घडलेले काही घडविलेले अशा समिश्र स्वरुपाचे ते नसते. त्यामुळे व्यक्तिचित्रणाला कलात्मक रुप देताना सत्याचे बंधन स्वीकारावे लागते. वैजनाथ शर्मा रघुनाथ शास्त्री, दाते, प्रा. माटे ह्यांच्याबरोबरच काही संतचरित्रकारही या बंधनाच्या पलिकडे गेले आहेत. प्राचीन संत चरित्राकारांप्रमाणेच आर्वाचीन संत चरित्रकारांनीही आपल्या लेखनाला वाङ्‌मयीन रुप देण्याचा प्रयत्न केला आहे, काव्यात्मकता स्वीकारली आहे, आलंकारिक भाषेत लिहिले आहे. काही ठिकाणी सूक्ष्म बारकावे देऊन परिणामकारक शब्दचित्रे रेखाटली आहेत. चरित्रनायकाविषयीच्या अत्यादराच्या भावनेमुळे अद्‌भुताचा आश्रय घेतला आहे. काही ठिकाणी चरित्रनायकावर अलौकिक व्यक्तिमत्त्व लादून वाचनात रंजकता यावी म्हणून अतिशयोक्तीचा वापर केला आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे त्यांनी सत्याचे आव्हान स्वीकारलेले नाही. त्यांच्या कृतीचा तोल सहाजिकच कलेकडे झुकतो. त्यामुळे या कृतींचे चरित्रपणच धोक्यात आहे.

मराठीत बहुसंख्य चरित्रे अशी आहेत, की ती लिहिताना जो तपशील उपलब्ध झाला त्यातून पाखडनिवड करून चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आकार निश्चित करण्याचा, मिळालेल्या सामग्रीची सुश्लिष्ट रचना करून आकर्षक पद्धतीने निवेदन करण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न झालेला आढळत नाही. जिथे भरपूर सामग्री उपलब्ध झाली तिथेही उपलब्ध झालेला समग्र पुरावा म्हणजे

चरित्र अशी न. चि. केळकरांसारख्या मातबर चरित्रकाराने समजूत करून घेतलेली दिसते. चरित्रनायकासंबंधी शक्य तितकी जास्त माहिती दिली म्हणजे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे अधिकाधिक आकलन होते अशा गैरसमजुतीने हे चरित्रकार माहितीपूर्ण निवेदनावर भर देतात. या चरित्रातून व्यक्तिजीवनाचा जो तपशील नोंदलेला आहे, तो अजाणता, कोणत्याही मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब न करता केवळ अंत:प्रेरणेने गोळा केलेला आहे. त्यात आवश्यकाबरोबर अनवश्यकाची सरमिसळ झालेली आहे. चरित्रातून नायकाच्या जीवनाचे अधिकाधिक क्षण वेचले म्हणजे आपले काम संपले. मग त्यातून वाचकांनी चरित्रनायकाचे व्यक्तिदर्शन जसे घडेल तसे घ्यावे अशी त्यांची अपेक्षा दिसते. या लेखनात योजना नाही, रचना नाही आणि शैलीही नाही. केवळ माहिती पुरविण्याचे धोरण अवलंबिल्यामुळे नुसत्या घटितांची जंत्री दिल्याने ही चरित्रे रुक्ष होतात व्यक्तिदर्शी घटितांची अचूक निवड करून त्यांच्या गुंफणीतून नायकाचे जिवंत व्यक्तिमत्त्व साकार करण्याची कलात्मक दृष्टीही या चरित्रकारांना लाभलेली नाही. साहजिकच रुक्ष घटितात मुरलेला नीरस अंश दूर करण्यात त्यांना यश लाभलेले नाही. मात्र या चरित्रकारांनी लेखनात अचूकपणा यावा, चरित्राच्या विश्वसनीयतेबद्दल वाचकांची खात्री पटावी म्हणून परिश्रमपूर्वक प्रयत्न केलेले आढळतात. एवढे मात्र खरे, की या चरित्रातून प्रत्यक्षावर लक्ष केंद्रित करणारी शास्त्रीय दृष्टी जोपासली गेली.

वर जी आप्तांनी लिहिलेली चरित्रे तपासून पाहिली, ती सत्याच्या कक्षेत राहून चरित्राची रंजकता वाढविण्याचा प्रयत्न करणाऱ्या चरित्रात मोडतात. 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी,' 'स्मृति-चित्रे' यासारखी कथेचे परिमाण लाभलेली, भावजीवनाचा आविष्कार घडविणारी, कला आणि कारागिरी यामधला सुवर्णमध्य गाठण्याचा प्रयत्न करणारी व चरित्रात वाङ्मयाचा परिपोष करून कादंबरीशी स्पर्धा करू पाहणारी चरित्रे हाताच्या बोटावर मोजता येतील इतकी मोजकीच आहेत. एकंदरीत मराठी साहित्यातील चरित्राचे दालन कथा कादंबरीइतके समृद्ध नाही.

१८१८ ते १९४७ या कालखंडात चरित्रनायकाच्या जिवंतपणी लिहिलेले चरित्र आढळले नाही. बहुतेक चरित्रे नायकाच्या पश्चात लिहिलेली आहेत. नायकाशी समकालीन चरित्रकारांनी लिहिलेली चरित्रे तशी थोडीच आहेत आणि तीही चरित्रनायकाच्या मृत्यूनंतर लिहिलेली आहेत. चरित्रनायकाचा प्रत्यक्ष सहवास लाभून लिहिलेली चरित्रे त्याहूनही कमी आहेत.

भाषांतरित चरित्रांच्यामुळे रुंदावलेली चरित्र लेखनाची कक्षा पुढे अधिकच विस्तृत झाली, चरित्रविषयाच्या बाबतीत मराठी चरित्रलेखन वैचित्र्यपूर्ण आहे. राजा, प्रवासी, तत्त्वज्ञ, धर्मसंस्थापक, कवी, संत, योद्धे, साहित्यिक, राजकारणी,

समाजसुधारक, इतिहाससंशोधक, शिक्षणतज्ज्ञ, प्राध्यापक, नट आणि नाटककार आदी विविध विषय मराठी चरित्रकारांनी हाताळले आहेत. भिन्न भिन्न क्षेत्रातील व्यक्तींची चरित्रे लिहिली जाऊ लागली. चरित्रलेखन खूपच विस्तारले तरी विषय हाताळण्याची पद्धती प्रा. ना. सि. फडके यांनी लिहिलेले दादाभाई नवरोजी यांचे चरित्र, साने गुरुजींनी लिहिलेले राजवाड्यांचे चरित्र किंवा लक्ष्मीबाई टिळकांनी लिहिलेले स्मृति–चित्रे यासारखी मोजकी चरित्रे सोडली तर रुळलेली चाकोरी सोडताना आढळत नाही.

भाषांतरकारांनी चरित्रनायकाची निवड करताना काही विशेष दृष्टी बाळगलेली दिसत नाही. काही चरित्रकारांनी संतांची आणि भक्तांची चरित्रे लिहायची अशीच आपल्या लेखणीला मर्यादा घालून घेतलेली दिसते. अर्थात त्यात त्यांच्या आवडीचा भाग अधिक आहे. काहींनी इतिहासापासूनच स्फूर्ती घेऊन ऐतिहासिक स्त्री पुरुषांचीच निवड केलेली दिसते. काहींनी आपुलकीच्या भावनेने नात्यातल्या व्यक्तींची निवड केली आणि ज्यांनी परक्यांची निवड केली त्यांनी बहुधा आपल्या वर्तुळातल्याच व्यक्तींना स्थान दिले. या चरित्रकारांनी चरित्रनायकाची निवड करताना त्याचे जीवन, त्याचे व्यक्तिमत्त्व, त्याच्या जीवनात असलेले कलावंताचे कुतूहल जागृत करण्याचे सामर्थ्य, त्या कुतूहलाचे समाधान करण्याची शक्ती, व्यक्तिमत्त्वाची आकर्षकता आणि एक व्यक्ती म्हणून असलेले वेगळेपण या गोष्टी नीट पारखून निवड केली असेलच असे सांगता येत नाही, भक्कम पुराव्याच्या अभावी या मुद्याचे संपूर्ण स्पष्टीकरण देता येणे कठीण आहे. कारण, या प्रश्नाचे उत्तर चरित्रलेखनाच्या हेतूशी निगडित आहे. मराठी चरित्रकार चरित्रलेखनाशी निगडित अशा प्रश्नांची प्रस्तावनेत चर्चा करताना वा आपली लेखनभूमिका मांडताना फारसे आढळत नाहीत. आपण चरित्रनायकाची निवड का व कशी केली यासंबंधाने निवेदनही कुणी केलेले आढळत नाही. डॉ. आनंदीबाईंचे चरित्र लिहिणाऱ्या काशिबाई कानिटकर व डॉ. जॉनसनचे चरित्र लिहिणारे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी त्या दोघांचे एक व्यक्ती म्हणून असलेले वेगळेपण जाणले असावे. या दोन्ही चरित्रकारांना निवडीची विशेष दृष्टी थोडीफार असावी. पण रेव्हरन्ड टिळकांसारखे प्रभावी व्यक्तिमत्त्व चित्रित करणाऱ्या लक्ष्मीबाईंनी आत्मियतेच्या भावनेशिवाय निवडीचा अन्य काही दृष्टिकोन बाळगला असेल असे वाटत नाही. मात्र एवढे खरे की, ज्या चरित्रकारांनी अवाङ्मयीन उद्दिष्टांनी चरित्रे लिहिली त्यांनी मनाशी बाळगलेल्या वाङ्मयबाह्य हेतूला धरूनच निवड केली. वर नमूद केल्याप्रमाणे त्यांची निवडीची काही एक विशेष दृष्टी असावी असे निदान त्यांच्या ग्रंथावरून तरी दिसत नाही.

मराठीतल्या चरित्रात जीवनदर्शनाला, व्यक्तिदर्शनाला मर्यादा पडण्याचे एक मोठे कारण म्हणजे पत्रव्यवहार, दैनंदिनी आणि आठवणी यांसारख्या साधन-

सामग्रीचा तुटवडा. आंग्लाईच्या प्रारंभीच चरित्रकारांना दंतकथा आणि आख्यायिका यांसारख्या साधनांवर विसंबून राहावे लागले आहे. पत्रे, दैनंदिनी, ऐतिहासिक कागदपत्रे, वर्तमानपत्रे, मासिके, भाषणे, आत्मपर निवेदने, चरित्रग्रंथ आणि आप्तांकडून मिळविलेली माहिती या सारख्या अस्सल साधनांचा हळूहळू मराठी चरित्रकारांनी पाठपुरावा केला. पण जिथे ही सामग्री उपलब्ध झाली तिथे चरित्रकार साधनांची चिकित्सापूर्वक तपासणी करताना आढळतात. विसंगत गोष्टींतून सत्याच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करताना आढळतात. पण नेमका व्यक्तिदर्शी तपशील गाळून घेण्याचे कौशल्य फारसे आढळून येत नाही. काशिबाई कानिटकरांनी लिहिलेले डॉ. आनंदीबाई जोशी हे केवळ खाजगी पत्रव्यवहारातून व्यक्तिगत जीवनाचा सूक्ष्म तपशील टिपून भावजीवनाचा आविष्कार घडविणारे एकमेव चरित्र. चरित्रनायकाच्या आत्मपरीक्षणात्मक निवेदनांचा उपयोग 'आमची अकरा वर्षे,' 'स्मृतिचित्रे' यासारखी चरित्रे वगळल्यास इतरत्र क्वचितच झालेला आढळतो. मात्र शिलालेखासारख्या साधनांचा नव्याने झालेला उपयोग उल्लेखनीय आहे.

मराठी चरित्रलेखनात प्रयोगशीलतेचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. कोणत्याही साहित्यप्रकारच्या मूळ प्रकृतीच्या अनुषंगाने मूलभूत मूल्यविषयक विचार उदित होतो. तर काही विचार पुढे यशस्वी कृतींच्या आधाराने उत्क्रांत होत जातो. मूल्यविषयक विचाराला आपल्या अंगभूत गुणांनी नव्याने चालना देणारे एकही चरित्र मराठीत आढळत नाही. प्रयोगशीलतेचा अभाव हे एक त्याचे कारण असू शकेल. चरित्रवाङ्मयात प्रयोगांना भरपूर वाव आहे. मराठीत चरित्रे व वाङ्मय यांची फारकत मिटू पाहते आहे. मराठी चरित्रकारांची मूल्यविषयक जाणीवही वाढत आहे. आता हवी आहेत ती नव्या वाटा शोधू पाहणारी चरित्रे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा

## वेष्टनावरील मजकूर–

वेष्टनावरील मोडीलिपीतला मजकूर पंडित वैजनाथ शर्मा यांनी अनुवादित केलेले ' राजा प्रतापादित्याचे चरित्र ' ह्या चरित्रातला आहे. पंडित रामराव बसू यांनी इ. स. १८०१ मधे बंगाली भाषेत लिहिलेल्या य। चरित्राचा मराठी अनुवाद पंडित वैजनाथ शर्मा यांनी १८१६ मधे केला आहे. प्रस्तुत परिच्छेदात त्यांनी आपली लेखन भूमिका स्पष्ट केली आहे. वैजनाथ शर्मा हे नागपूरकर भोसल्यांचे आश्रित होते. पुढे कलकत्त्यातील फोर्ट विल्यम कॉलेजमधे मराठीचे अध्यापक झाले. हा ग्रंथ श्रीरामपुरात शिलाप्रेसमधे छापला गेला. या ग्रंथाची मूळप्रत लेखकाला कलकत्त्याच्या नॅशनल लायब्ररीत सापडली. ही प्रत हस्तगत करताना श्री. भाऊपाध्ये, कलकत्ता नॅशनल लायब्ररी व मुंबई येथील रॉयल एशियाटिक सोसायटीची सेन्ट्रल लायब्ररी यांचे बहुमोल सहकार्य लाभले. या सर्वांचा लेखक आभारी आहे.

# : मराठी चरित्रांची सूची :

| | |
|---|---|
| १) आळतेकर, माधव दामोदर. | गोपाळ गणेश आगरकर,<br>(चरित्रात्मक निबंध)<br>भारत–गौरव–ग्रंथमाला, ३१८ ए,<br>ठाकुरद्वार, मुंबई नं. २, प्र. आ. १९३०. |
| २) आजरेकर, रामचंद्र पांडुरंग. | विष्णुबुवा ब्रह्मचारी,<br>गणपत कृष्णाजी छापखाना,<br>प्र. आ. १८७२. |
| ३) आपटे, वा. गो. | अशोक चरित्र,<br>प्रकाशक–गोपाळ बळवंत जोशी,<br>आनंद छापखाना, सदाशिव पेठ, पुणे,<br>साहित्य पुस्तकमाला, पुस्तक चौथे,<br>प्र. आ. फेब्रुवारी १९२९. |
| ४) ओक, विनायक कोंडदेव. | पीतर धि ग्रेस ह्यांचें चरित्र.<br>गव्हर्नमेंट सेंत्रल बुक डेपो, प्र. आ.१८७४. |
| ५) ओक, विनायक कोंडदेव. | आल फ्रेद धि ग्रेत ह्यांचे चरित्र,<br>प्रकाशक जावजी दादाजी,<br>निर्णय सागर प्रेस, मुंबई प्र. आ. १८८२. |
| ६) कर्नाटकी, श्री. ना. | गुरूवर्य डॉक्टर सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर,<br>प्रकाशन स्थळ २४९, रास्ते पेठ, पुणे,<br>प्र. आ. १९२७. |
| ७) कर्नाटकी, श्रीनिवास नारायण. | नामदार न्यायमूर्ति<br>काशिनाथ त्रिंबक तेलंग यांचे चरित्र,<br>भारत–गौरव–ग्रंथमाला, ३१८ ए.<br>ठाकुरद्वार, मुंबई, २, प्र. आ. १९२९. |
| ८) कर्नाटकी, श्रीनिवास नारायण. | डॉक्टर भाऊ दाजी लाड,<br>भारत–गौरव–ग्रंथमाला, ३१८ ए.<br>ठाकुरद्वार, मुंबई. २ प्र. आ. १९३१. |

९) सौ. कानिटकर, काशिबाई. — 'डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र' मनोरंजक ग्रंथ प्रसारक मंडळी, गिरगाव, मुंबई. द्वि. आ. १९१२.

१०) कीर्तिकर, कान्होबा रणछोडदास. — चार्ल्स डार्विन यांचे चरित्र, माजगांव प्रिंटिंग प्रेस, मुंबई, प्र. आ. १८८५.

११) केळकर, न. चि. — लोकमान्य टिळक, जगद्धितेच्छु छापखाना. ५०७ शनिवार पेठ, पुणे, खंड १ ला, सन १९२३. खंड २ रा, समर्थ भारत छापखाना, ३२५ सदाशिव पेठ, पुणे. इ. स. १९२८ खंड ३ रा. गणेश प्रिंटिंग प्रेस. ४९५ शनिवार पेठ, इ. स. १९२८.

१२) कोल्हटकर, महादेव गोविंदशास्त्री. —कोलम्बसाचा वृत्तांत, (ले. रॉबर्टसन) आ. ४ थी १८७३.

१३) खानोलकर, गंगाधर देवराव. — प्रोफेसर विष्णु गोविंद विजापूरकर, प्रकाशन स्थळ मुंबई, प्र. आ. १९२८.

१४) खानोलकर, गंगाधर देवराव. — 'माधव ज्यूलियन', स्वस्तिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई ४, प्र. आ. जुलै, १९५१.

१५) चिपळूणकर, कृष्णशास्त्री. — साक्रेतिसाचे चरित्र. प्रकाशक— शंकर नरहर जोशी. ८१८ सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ति तेरावी, १९१८.

१६) चिपळूणकर, विष्णुशास्त्री. — डॉ. जॉनसन, निबंध माला, वर्ष ३ रे, अंक ३६, नवी आवृत्ती, प्रकाशक शंकर नरहर जोशी, 'चित्रशाळा' प्रेस, पुणे. इ. स. १९१७.

१७) चिपळूणकर, ल. कृ. (हेडमास्तर हायस्कूल) — विष्णुशास्त्री चिपळुणकर यांचे चरित्र. 'सत्यप्रकाश' छापखाना, पुणे, १८९४.

| | |
|---|---|
| १८) चौबळ, महादेव विनायक. | रामदास स्वामींचे चरित्र,<br>संपादक महादेव विनायक चौबळ,<br>सूर्योदय छापखाना, ठाणे, इ. स. १८७१ |
| १९) जनार्दन रामचंद्रजी. | 'कविचरित्र'<br>गणपत कृष्णाजी छापखाना,<br>प्र. आ. १८६०. |
| २०) टिळक, लक्ष्मीबाई. | स्मृतिचित्रे.<br>(भाग १ ला –प्र. आ. १९३४.<br>भाग २ रा –प्र. आ. १९३४.<br>भाग ३ रा –प्र. आ. १९३५.<br>भाग ४ था –प्र. आ. १९३६.)<br>केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई ४. |
| २१) दात्यें, रघुनाथ शास्त्री | शालिवाहन चरित्र,<br>(भाषांतरित), अमेरिकन मिशन प्रेस,<br>मुंबई, प्र. आ. १८४० |
| २२) निगुडकर, भिकाजी धोंडदेव. | परशुरामपंत भाऊ पटवर्धन,<br>पुणे. प्र. आ. १८८२. |
| २३) पटवर्धन, लक्ष्मीबाई. | 'माझा नंदादीप,'<br>प्रकाशन स्थळ – २३ डेक्कन, जिमखाना<br>पुणे ४, प्र. आ. १९५२. |
| २४) पटवर्धन, लीलाबाई. | आमची अकरा वर्षें,<br>प्रकाशक –य. गो. जोशी,<br>सदाशिव पेठ, पुणे २. प्र. आ. १९४५. |
| २५) पांगारकर, लक्ष्मण रामचंद्र. | तुकाराम. मुमुक्षुकचेरी, पुणे,<br>प्र. आ. शके १८४२. |
| २६) पानसे, वेणूबाई. | हरि नारायण आपटे,<br>(चरित्र व वाङ्मयविवेचन),<br>बालोद्यान प्रेस, पुणे, प्र. आ. १९३१. |
| २७) पारसनीस, दत्तात्रेय बळवंत. | झाशी संस्थानच्या महाराणी<br>लक्ष्मीबाईसाहेब ह्यांचें चरित्र,<br>मुंबई, निर्णयसागर. १८९४. |

२८) पारसनीस, दत्तात्रेय बळवंत — अयोध्येचे नबाब, प्रकाशक–बाबाजी सखाराम आणि कंपनी, युसफ बिल्डींग, मुंबई, प्र. आ. सन १८९९.

२९) पेठे, केशव वामन. — ' वामनदाजी ओक यांचे पुष्पभाषात्मक चरित्र.' ' बॉम्बे न्यू प्रेस,' मुंबई, सन १८९८.

३०) प्रा. फडके, नारायण सीताराम. — दादाभाई नवरोजी, परचुरे, पुराणिक आणि मंडळी, मुंबई ४, तृतीयावृत्ती–१९३२.

३१) फाटक, न. र. — ' न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र ' निळकंठ प्रकाशन, सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ती,

३२) बापट वाईकर, नागेशराव विनायक — श्रीमंत बाजीराव बल्लाळ, (१) उर्फ पहिले बाजीरावसाहेब पेशवे, प्रकाशक पांडुरंग जावजी, मुंबई, आवृत्ती सातवी. सन १९२१.

३३) बापट, लक्ष्मण गणेश. — श्रीसद्गुरु रामानंद बीडकर महाराज यांचे चरित्र. प्रकाशक बापट ल. ग. २४५, शनिवार पेठ, श्री बीडकर महाराजांचा मठ, पुणे २ आ. तिसरी १९५१.

३४) बॉम्बे ट्रॅक्ट अॅण्ड बुक सोसायटी, — रोमन बादशहांचा वृत्तांत, बॉम्बे ट्रॅक्ट अॅण्ड बुक सोसायटी अमेरिकन मिशन छापखाना, मुंबई १८५१ (भाषांतरित).

३५) बेहेरे, नारायण केशव — पहिले बाजीराव पेशवे. भारत गौरव ग्रंथमाला, पुष्प ९२ वे ३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई २, प्र. आ. मे. १९३०.

३६) बेलसरे, खंडेराव भिकाजी. — विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या चरित्राचे व लेखांचे साधारण स्वरूप, ' ज्ञानप्रभाकर ' ग्रंथ प्रकाशक मंडळी, प्र. आ. ऑक्टोबर, सन १८९१.

३७) भागवत, इंदिरा. ' या, सदाशिव '
प्रकाशक डी. जी. जोशी,
५३३ सदाशिव पेठ, पुणे प्र. आ. १९४८.

३८) भागवत, भास्कर हरि. राजा राममोहन राय, (भाषांतरित)
गणपत कृष्णाजी छापखान्यात छापिले,
मुंबई. प्र. आ. १८५८

३९) भाटवडेकर, गार्गी. डॉ. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर,
प्रकाशक मोरेश्वर भालचंद्र भाटवडेकर,
२१५, चर्नी रोड, गिरगाव, मुंबई ४.
प्र. आ. १९३७.

४०) भानू, चिंतामण गंगाधर. काब्डेन, ' आर्यभूषण ' छापखाना,
पुणे, प्र. आ. १८९०.

४१) भिडे, विष्णु मोरेश्वर. खुसरू राजाचा इतिहास,
दक्षिणा प्राइज कमिटी,
ज्ञान प्रकाशन छापखाना, प्र. आ. १८५२.

४२) माटे, श्रीपाद महादेव. परशुराम–चरित्र. १
प्रकाशक वि. ग. ताम्हणकर,
१२ बुधवार, पुणे,
प्र. आ. १९३७.

४३) मुजूमदार, शंकर बापूजी. ' अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे चरित्र, '
' जगद्धितेच्छु ' छापखाना, पुणे.
प्र. आ. १९०४.

४४) रानडे, विष्णु परशुराम. जार्ज वाशिंग्तन, इंदु प्रकाश, मुंबई.
द्वि. आ. १८७४.

४५) रानडे, रमाबाई. आमच्या आयुष्यातील काही आठवणी.
(अथवा स्वतःसंबंधी काही गोष्टी),
प्रकाशक–गोपाळ कृष्ण देवधर,
सेवा सदन सोसायटी, सदाशिव पेठ,
पुणे प्र. आ. १९१०.

४६) लेले, माधवराव व्यंकटेश. अकबर बादशहाचे चरित्र.
डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी,
पुणे, प्र. आ. १८९८.

४७) लेले, सदाशिव गणेशशास्त्री — कपतान कूक साहेब ह्यांचे जलपर्यटनाचा, वृत्तांत, पुणे पाठशाळा छापखाना, पुणे. प्र. आ. १८५३.

४८) शर्मा, वैजनाथ — ‘ राजा प्रतापादित्याचे चरित्र ’ किताब कालिज फोर्ट वलियम, श्रीरामपुरांत छापला गेला‘ १८१५, (ही प्रत नॅशनल लायब्ररी कलकत्ता येथें उपलब्ध आहे).

४९) शाळिग्राम, शंकर तुकाराम — बापू गोखले यांचे चरित्र, प्रकाशक –वासुदेव मोरेश्वर पोतदार, निर्णयसागर छापखाना, मुंबई. आ. तिसरी, १८८९.

५०) सहस्रबुद्धे, धोंडे बाळकृष्ण — श्री एकनाथ महाराज यांचे चरित्र, प्रकाशक पांडुरंग जावजी, निर्णयसागर प्रेस, मुंबई. आवृत्ती ४ थी, १९२१.

५१) साने, गुरुजी — कै. ना. गोखले यांचे चरित्र, प्रकाशक: विश्वनाथ गणेश ताम्हणकर, प्र. आ. १९२५.

५२) साने, पां. स. — इतिहासाचार्य राजवाडे, प्रकाशक श्रीधर नारायण हुद्दार, अभिनव ग्रंथमाला पुष्प ७ वें. प्र. आ. जून १९२८.

## संदर्भ सूची : कोश, विश्वकोश

### मराठी

१) आपटे, व्ही. एस्. — संस्कृत इंग्रजी शब्दकोश संपादक गोडे, १९५८ पृ. ६९९

२) चित्राव, सिद्धेश्वर शास्त्री, — ‘ भारतवर्षीय प्राचीन चरित्रकोश,’ इ. स. १९६२, प्रस्तावना.

३) दाते य. रा. पुणे १९३४, विभाग ३ रा. पृ. ११५०.

४) वाचस्पत्यम्. चतुर्थ–भाग चौखम्बा संस्कृत ग्रंथमाला १९६२ पृ. २९०१.


### इंग्रजी


5) Chambers Encyclopaedia Vol. 2, 1955, P. 320.

6) Gollier 's Encyclopedia Vol. 3. 1957, P. 429.

7) Murray James (ed). 'Oxford New English Dictionary' 1888, Vol. I. A. and B. P. 870

8) Monier Williams ' Sanskrit English Dictionary ' London 1899, P. 390.

9) Mourois Andre. ' Biography ' Cassell 's Encyclopaedia of Literature.


## मराठी नियतकालिकांतील लेखसूची


१) आपटे, वा. गो. ' इतिहास व चरित्र ' विविधज्ञान विस्तार, पु. ३२, अंक ५, मे १९०१.

२) भागवत, दुर्गा ' चरित्र ' (एकोणीसशे एकवीस ते अठ्ठावन) आलोचना डिसेंबर १९६४.

३) चाफेकर, ना. गो. ' निवडक लेख ' गणेश महादेव आणि कंपनी, ऑगस्ट १९२४.

४) देव, बा. ना. ' चरित्रविषय नायकाच्या गुणांबरोबर दोषदर्शन करावे की नाही ?' विविधज्ञान विस्तार. पु. ३६, अंक ८ ऑगस्ट १९०५.

५) विविध ज्ञानविस्तार, पु ३६. ऑगस्ट १९०५.
६) सहस्रबुद्धे, पु. ग. — 'संकराचे आपत्य' हंस, दिवाळी अंक, १९६१.

## मराठी ग्रंथ व ग्रंथसमाविष्ट लेख सूची

१) कानिटकर, रा. प्र. — 'कवींद्र रवींद्रनाथ टागोर,' चित्रशाळा प्रेस, पुणे नंबर २, फेब्रुवारी १९३२, प्रस्तावना.
२) केळकर, न. चिं. — लोकमान्य टिळक यांचे चरित्र १८९९ अखेर, पूर्वार्ध १९२३ खंड १ ला.
३) केळकर, न. चिं. — गतगोष्टी अर्थात माझी जीवनयात्रा, प्रकाशक– यशवंत नरसिंग केळकर, प्र. आ. १९३९, हृदगत.
४) श्री. गोविंद प्रभु चरित्र, — सं वि. भि. कोलते.
५) खांडेकर, वि. स. माडखोलकर, ग. त्र्यं. खानोलकर, गं. दे. — कोल्हटकरांचा लेखसंग्रह, १९३२. मूळ लेख 'अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे चरित्र' विविधज्ञान विस्तार, अंक ८, १९०५.
६) चित्राव, सिद्धेश्वर शास्त्री. — 'भारतीय प्राचीन चरित्रकोश' प्रस्तावना, ( ९३२).
७) चिपळूणकर, कृष्णशास्त्री. — 'साक्रेतिसाचे चरित्र' प्रकाशक– शंकर नरहर जोशी, पुणे, १९१८ आवृत्ती तेरावी.
८) चिपळूणकर, ल. कृ. (हेडमास्तर हायस्कूल) — 'विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे चरित्र' सत्यप्रकाश छापखाना, पुणे १८९४.
९) जोशी, अ. म. माचवे प्रभाकर — 'चरित्र, आत्मचरित्र आणि टीका' १९४२.
१०) जोशी, अ. म. — 'चरित्र, आत्मचरित्र' (तंत्र आणि इतिहास) १९५६.

११) पटवर्धन, लक्ष्मीबाई. — 'माझा नंदादीप' प्रकाशन स्थळ २३, डेक्कन जिमखाना, पुणे ४, १९५२.

१२) पटवर्धन, लीलाबाई. — 'आमची अकरा वर्षे' प्रकाशक– य. गो. जोशी, पुणे प्रथमावृत्ती १९ नोव्हेंबर १९४५, हृद्गत.

१३) पांगारकर, ल. रा. — 'चरित्रचंद्र म्हणजेच पांगारकरांचे आत्मचरित्र' १९३८.

१४) पारसनीस, दत्तात्रय बळवंत. — 'अयोध्येचे नबाब' बाळाजी सखाराम आणि कंपनी, मुंबई १८९९.

१५) प्रियोळकर, अ. का. — 'दादोबा पांडुरंग चरित्र–आत्मचरित्र,' प्रकाशक के. भि. ढवळे, मुंबई, प्रथमावृत्ती, १९४७, प्रस्तावना.

१६) पेठे, केशव वामन. — 'रसिकवर वामन दाजी ओक यांचे पुष्पभाषात्मक चरित्र' मुंबई, सन १८९८.

१७) प्रा. फडके ना. सी. — 'माझ्या साहित्य सेवेतील स्मृती' भाग १ ला, कॉन्टिनेन्टल बुक सर्व्हिस पुणे, १५ सप्टेंबर १९४३.

प्रा. बनहट्टी, श्री. मा. — 'आर्वाचीन मराठी साहित्य' (१८७३ ते १९३५) संपादक नेने, वि. पा बडोदे, १९३५.

१८) प्रा. फाटक, न. र. — 'न्यायमूर्ती' महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र, निळकंठ प्रकाशन, दुसरी आवृत्ती, १९६६.

१९) बापट, लक्ष्मण गणे. — 'श्री सद्गुरु रामानंद बीडकर महाराज यांचे चरित्र' आ. ३, १९५९.

२०) बापट, नागेश विनायक. — 'बाजिराव बतलाल उर्फ पहिले बाजीराव साहेब पेशवे', निर्णय सागर प्रेस, इ. स. १९२१, प्रस्तावना, पृ. ४.

२१) प्रा. बेलसरे केशव विष्णु. — 'गोंदवलेकर महाराज यांचे चरित्र आणि वाङ्मय,' प्रसाद प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, १९६१.

२२) बेलसरे, खंडेराव भिकाजी — 'विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या चरित्राचे व लेखाचे साधारण स्वरूप' 'ज्ञान प्रभाकर' ग्रंथ प्रकाशक मंडळीने छापविले, मुंबई, ऑक्टोबर, सन १८९१, प्रस्तावना.

२३) प्रा. बेहेरे, ना. के. — 'पहिले बाजीराव पेशवे.' भारत–गौरव ग्रंथमाला, पुष्प ९२ वे मे १९३०.

२४) भाटवडेकर, गार्गी — 'डॉ. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर' प्रकाशक, मोरेश्वर भालचंद्र भाटवडेकर मुंबई, १९३७, प्रस्तावना.

२५) भावे, विनायक लक्ष्मण — 'महाराष्ट्र सारस्वत' आ. ३, १९२८ भाग २.

२६) राजवाडे, विश्वनाथ काशिनाथ — 'राजवाडे लेखसंग्रह' भाग १ ला ऐतिहासिक प्रस्तावना खंड ३ रा. इ. स. १९२८.

२७) रानडे, रमाबाई — 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' पुणे सेवासदन सोसायटीतर्फे प्रकाशित, पाचवी आवृत्ती, १९२८.

२८) प्रा. डॉ. वाटवे के. ना. — 'संस्कृत काव्याचे पंचप्राण' मनोहर ग्रंथमाला, पुणे प्रकाशन ४६ वे, प्र. आ. १ जुलै १९४७

२९) प्रा. वेर्णेकर, श्री. मा. — 'आर्वाचीन संस्कृत साहित्य,' नागपूर, सन १९६३.

३०) सरदेसाई, गो. स. — 'मराठी रियासत' मध्य विभाग खंड. श्री सयाजी साहित्यमाला, पुष्प ६५ वे पृ. १३६ पे. द, पृ. १२७ १ शा. म. न. खंड ४, पे, ब. आ. दुसरी, १९२५.

३१) साने गुरुजी — 'ना. गोखले चरित्र,' प्रस्तावना आ. र. मार्च १९६६.

# इंग्रजी ग्रंथांची सूची


1) Prof Miss S. L. Aiyar — ' Biographical novel ' Thesis Submitted to Bombay University, (2353). University Library.

2) Ausubel, Herman — ' Historians and Their Craft ' A study of the presidential Addresses of thc American Historical Association (1884–1945), Columbia University Press 1950.

3) Prof Basil W. — ' The Seventeenth Century background,' Chatto & Windus 1934.

4) Balch, Marston. — ' Modern Short Biographies and Autobiographies,' Harcourt, Brace and Company 1939.

5) Bower Shore, Clifford — ' Lytton Strachey,' March 1933, P. 44–45.

6) Burdett Osbert — ' Tradition and Experiment in Present day literature ', Oxford University Press, 1929

7) Brooke, Van Wyck — ' Sketches in Criticism ' I. M. Dent & Sons 1934.

8) Carlyle Thomas — ' The life of John Sterling.' Chapman and Hall Ltd. London Centenary edition, Introductory Chap. I.

9) Clifford, James L. — ' Biography as an art ', 1962. ' Young Samuel Johnson ' William Heinemann Ltd. 1956, Prefae.

10) Sir Cork, Edward. ' Literary Recreations,' Macmillan and Co., London, 1918.

11) Drew, Elizabeth. ' The Enjoyment of Literature ' Cambridge University Press, 1935.

12) Dryden John. ' The life of Plutarch ' prefixed to Plutarch 's Lives, Translated from the Greek by Several Hands (1683-6) Vol. I. Reprinted by Clifford, James L, ' Biography as an Art ' 1962.

13) Dunn Waldo H. ' Enghish Biography ' New York E. P. Dutton & Co, 1916.

14) Edel, Leon. ' Literary Biography ' The Alexander Lectures 1955-56. Rupert Hart Daris 1957, London'

15) Ellis, Havelock. ' An open Letter to Biographers ' View And Reviews ' Houghton' Mifflin Company, 1932.

16) Galsworthy, John. ' The Creation of Character in Literature ' The Roman Lecture delivered in the Sheldonian Theatre 21 may 1931, Oxford 1931. P. 7.

17) Garraty, John A. ' The Nature of Biography ' Jonathan Cape 1958.

18) Gosse, Edmund. ' Father aud son ' William Heinemann, London 1907.

19) Haines, Helen E. ' Living with books ' New York Mornimgside Heights, Columbia Univesty Press, 1st edition, 1935, P 1939.

20) Iyengar, shrinivas K R. ' Lytton Strachey ', Chatto and Windus, London, 1939. Ch. XI.

21) Johnson Samuel The Rambler No. 60, Saturday, 13 October 1750,
Also reprinted by Clifford, James.
' Biography as an Art ' 1962

22) Dunning, William. A. ' Truth in History and Other essays ' New York Morning side Heights, 1937.

23) Kendall, Paul Murray. ' The Art of Biography ' George Allen and Unwin Ltd. 1966.

24) Sir Lee Sidney. ' Principles of Biography ', The Leslie Stephen Leetures delivered in the Senate house, Cambridge, on 13 th May 1911.

25) Leonardo Da Vinci Sigmund Freud, Kegan Paul, 1922. Page 14.

26) Macan R. W. ' Essays by Diverse Hands, Vol. XII.
Royal Society of Literature Transactions, Humphrey Milford, Oxford University Press.

27) Maurois, Andre ' Aspects of Biography ' Translated from the French by S. C. Roberts,
Cambridge University Press, 1929, P 167.

28) Nevins, Allan ' TheGate way to Histary,' D. Appleton Century 1938.

29) Nicolson, Harold ' Development of English Biography ' 1927.

30) Mckenna, Marthe — ' Write your own best Seller,' Jerrolds Publishrs London Limlted.

31) Morley John — ' The life of William Ewart Gladstone ' Macmillan and Co. 1903, Vol. I. Introduction.

32) Murray James (ed) — ' Oxford New English Dictionary 1882. Vol. I A and B.

33) O' Neill Edward H. — ' A History of American Biography,' Philadelphia 1935.'

34) Pearson, Hesketh — ' About biography Royal Society of Literature Essays by diverse hands, Vol. XXIX

35) Pinto, Vivian De sola — ' English Biography in the Seventeenth Century ', George G. Harrap & o Ltd. 1951.

36) Rawse, A. L. — ' The use of History ' Hodder and Stoughton 1946.

37) Sir Rait Robert — ' Boswell and Lockhard ' ' Royal society of Literature transactions, Essays by Diverse Hands, Vol. XII P 117.

38) Roman, Klara G. — ' Handwriting A Key to Personality ' The Noonday Press, 1926.

39) Stanfield, James Field — ' Biography as an Art ' ed. James L. Clifford, Oxford University Press. 1962.

40) Strachey, Lytton — ' Eminent Victorians ' London Chatto & Windns 1918.

41) Strager, Joseph R. — ' The Interpretation of History ' Princeton University Press, 1943,

42) Symons A. J. A — ' Tsadition and Experiment in Present day Literature ' Humphrey Milford. London 1929.

43) Woolf Virginin — ' The Death of the moth and other essays ' The Hogarth Press, Secoud Impression 1942.

# इंग्रजी नियतकालिकांची सूची

1) Boyd Ernest — ' Sex in Biography ' Harper's Magazine, Nov. 1932, Volume 165, P. 758.

2) Charles, whibley — ' The Indiscretion of Biography ' The English Review, Dec. 1924, P. 772.

3) Chapman, Hester W. — ' Notes on Historical Biography ' Times Literary Supplement, 28, August & 1956.

4) Clifford James L. — The New York Times Book Review, 29 Jan. 1956, Vol. LXI– No 5

5) Sir Cook Edward — ' The Art of Biograhy,' The National Review, No 374 April 1914.

6) Croker, John Wilson — ' Boswell 's life of Johnson ' London, 187 E (in one Volume) P. Xvii.

7) Devoto, Bernard — ' The Skeptical Biographer,' Harper 's Magzine, Jannuary 1933, Volume 166.

8) Edel, Leon — ' That one may say this was the man ' The New York Times Book Rereiw. June 24, 1956.

9) Fuess, Claude. M. — 'The Biographer and his Victims,' The Atlantic Monthly, January 1932.

10) Fuess, Claude, M. — ' Debunkery And Biography,' Atlantic Monthly CLI March 1933, Volume 151, Number 3.

11) Gosse, Edmund. — ' Ethics of Biography ' The Cosmopolitan, July 1903, Reprinted by Clifford, James L. ' Biography as an Art ' Oxford University Press 1962.

12) Handlin, Oscar. — ' The History in Men 's Lives,' Virginia Quarterly XXX, Summer 1954.

13) Johnson, Samuel — Idler, No. 84. 24 November 1759.

14) Johnston, George Alexander — ' The New Biography,' The Atlantic Monthly, March 1929, P. 342.

15) Sir Lee Sidney — ' The Perspective of Biography,' The English Association Pamphlet, No. 41, Sep. 1918.

16) Mae Carthy, Desmond — ' The Biographies of Encil Judwig,' Life and letters, Pol. I. No 1, June 1926, P. 52.

17) Maurois, Andre — ' Ethics of Biography ' English Institute Annual, 1943.

18) Lytton Strachcy As a Biographer,' — Life and Letters, March 1932.

19) Mumford, Lewis — ' The Task of Modern Biography, English Journal 1934, XXIII.

20) Mac Carthy, Desmond — ' Modern Biography,' Life and Letters, Vo.l. 1, No. 2, July 1982.

21) Nevins, Allan ' Is History wade by heroes ?' The Saturday Review Nov. 5, 1955. Vol. XXX VIII.

22) Partington, Wilfred ' Should A Biographr Tell ?' Atlantic Monthly August– 1947. Volume 180, Number 2.

23) Saintsbury, George Some Great Biographies ' Macmillan 's Magazine, June 1892.

24) Samual Johnson ' In Praise of Biography ' The Rambler, No. 60, Saturday 13 October 1750, Reprinted by Clifford, James. L. ' Biography as an Art,' 1962.

25) Smith, V. A. ' Macaulay Essay on Warren Hastings 1911.

26) White, Newman. I. English Institute Annual 1942, New York, Morningside Heights. Columbia University Press 1943,

27) White, Newman I. ' The Development, Use and Abuse of Interpretation in Biography ' English Institute Annual 1942, New York, Morningside Heights, 1943, P. 53

28) Life, 17 September 1777 (111, 154-55) Also reprinted by Clifford, James–L. ' Biography as an Art ' Oxford University Press, 1962.

29) The Hypochondriack ' No. 36, London Magazine, August 1780. Also reprinted by Clifford, James L. ' Biography as an Art,' Oxford University 1962.

30) ' English Institute Annual,' 1942, New York, Morningside Heights, 1943.

## शुद्धिपत्रक

| पृ. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३८ | २० | निर्भत्सरी | निर्मत्सरी |
| २८ | २४ | कशाला | कसाला |
| ३९ | १० | विनशर्तदणे | बिनशर्तपणे |
| ४६ | ६ | आम्त्यांचे | आप्तांचे |
| ५९ | २६ | होऊन | हेरून |
| ६० | ५ | लागते | लाभते |
| ७१ | १२ | आघातात | ओघात |
| ७१ | ३० | वेष | द्वेष |
| ७३ | १० | घेत | येत |
| ७७ | १ | मर्यादित | मर्यादेत |
| ७८ | २२ | ती | तो |
| ८३ | २१ | अर्थ लावणे असते | अर्थ लावणे कठीण असते |
| १०५ | १३ | आधिकच | आधिकय |
| ११४ | १८ | कादंबरीवर | कादंबरीकार |
| ११५ | २३ | कृताच्या | कृतीच्या |
| १२३ | १२ | पाखवून | दाखवून |
| १ ५ | २६ | आधार | माघार |
| १४२ | ३ | कथेत | कक्षेत |
| १४८ | ९ | जतके | जितके |
| १५९ | ३० | चित्रात | चित्तात |
| १७२ | १६ | निजाव | निर्जीव |
| १९३ | १४ | अंतर्वेवेधी | अंतर्वेधी |
| १९४ | २ | चरित्रासारखी | येण्यासारखी |
| १९५ | २१ | त्यांच्या | त्यांना |
| १९८ | ३ | व्यवहारीपणाने | अव्यवहारीपणाने |
| २०२ | २४ | निष्कर्षावर | निकषावर |
| २१७ | ६ | उचकल्यामुळे | उचलल्यामुळे |
| २२० | ८ | काणले | आणले |
| २३५ | २ | सोडून | खोडून |

| | | | |
|---|---|---|---|
| २३७ | १८ | अर्थबोध | अर्धबोध |
| २३८ | २ | wtecked | wrecked |
| २३९ | ३१ | सखोस | सखोल |
| २४१ | ४ | it | is |
| २५६ | ९ | incaloulability | incalculability |
| २६६ | १० | जडले | नडले |
| २७१ | २ | जलाराम | जलाशय |
| २८५ | २४ | जोडणारे | सोडणारे |
| २९४ | १८ | प्रयत्न | प्रत्यय |
| २९५ | ९ | जमेशी | जमेची |
| २९७ | १० | अपेक्षित | उपेक्षित |
| २९८ | १८ | आपली | आपल्या |
| ३०० | ८ | शोध | ओघ |

REFBK-0025069

समर्थ प्रकाशन
वेष्टन-मांडणी
कल्पकला
२२३सी, अजिंक्य निवास
शिवाजी पार्क, मुंबई-१६.

# मराठी चरित्र मूलतत्त्वे व समीक्षा

डॉ. ग. का. रायवते

मूल्य ८० रुपये